म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ऐ. पवाडे
सं. क्र. 587

REFBK-0018650
REFBK-0018650

११९८३ / २५।८।८२ मू-प्रकाश ५४१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

13 AUG 1975
13 AUG 1975
1 OCT 1975
18 OCT 1978
21 MAR 1979
7 SEP 1980
14 MAR 1982
18 APR 1982
2 MAY 1982
25 JUL 1982
25 AUG

[क्र. मा. प.]

विश्वमोहिनी पुस्तक ३

# हिमफुलांच्या देशांत

प्रा. प्रभाकर तामणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

REFBK-0018650

। जे चातुर्यार्थकलाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमस्कारिलि मियां ।।

**प्रकाशक** : आ. अ. अंतरकर, विश्वमोहिनी प्रकाशन, ६२/१२ कर्वे रोड, पुणें ४.

**मुद्रक** : मु. शं. किर्लोस्कर, किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकरनगर, पुणें ९.

**प्रथमावृत्ति** : २९ मार्च १९७२. मूल्य : १६ रुपये

© प्रा. प्रभाकर वसंत तामणे

**मुखपृष्ठ** : रमेश तळेगांवकर. **आंतील रचना व चित्रवर्णनें** : आनंद अंतरकर

**श्री. अमरीश त्रिवेदी**

आणि

**सौ. शशिकला त्रिवेदी**

यांस

सप्रेम...

# ऋणनिर्देश

अमेरिकेला दुसऱ्यांदां जाऊन आल्यावर माझ्या तिथल्या अनुभवांसंबंधींचे कांहीं लेख 'किर्लोस्कर', 'केसरी', 'वाङ्मयशोभा', 'वालवाडी', 'वहिनी' इत्यादि नियतकालिकांत मीं लिहिले. पण सातत्यानं लेखन करणं हें माझ्या स्वभावांतच नसल्यानं आणखी कितीतरी लेख लिहायचे असूनहि मी चालढकल करीत होतों. अशांतच एक दिवस 'हंस'चे आद्य संपादक श्री. अनंत अंतरकर यांनी 'हंस'साठीं माझ्या अमेरिकाविषयक लेखमालेची योजना निश्चित केली. कोणत्या महिन्यांत कोणता लेख द्यायचा तेंसुद्धां त्यांनीं मला ठरवून दिलं. पण ते असतांना त्यांच्यासाठीं मी त्यांपैकीं कांहींच लिहूं शकलों नाहीं. पण त्यांना मीं शब्द दिला होता, म्हणून 'हिमफुलांच्या देशांत...' ही लेखमाला 'हंस'मधून लिहायला लागलों. अर्थात् 'हंस'चे आजचे संपादक श्री. आनंद अंतरकर ह्यांनीं तगादा लावूनच माझ्याकडून सारे लेख लिहून घेतले. तेव्हां ह्या ग्रंथाचं सारं श्रेय ह्या रसिक पिता-पुत्रांचं आहे.

परदेशांत आपण कितीहि हिंडलों-फिरलों तरी मनाची तृप्ति कधींच होत नाहीं. तिथल्या जीवनाशीं एकरूप होऊन तें प्रत्यक्ष जगतांना तर भिन्नभिन्न प्रकारच्या अनुभवांनीं मन भारावून जातं. एक प्रकारचं झपाटलेलं गतिमान् जीवन जगतांना सगळ्याच गोष्टींची नोंद करतां येत नाहीं, तपशीलवार माहिती लिहून घेतां येत नाहीं. छायाचित्रंसुद्धां किती घ्यायचीं त्याला मर्यादा पडते, आणि ह्या जाणिवेची रुखरुख मनांत सतत असते. पण एकदां लिहायचें ठरवल्यानंतर मीं अमेरिकेंत जोडलेल्या नात्याच्या आधारावर पत्रव्यवहार करून माझ्या लेखनासाठीं आवश्यक असणारी तपशीलवार माहिती आणि काही छायाचित्रं मीं तिकडून मागवून घेतलीं. ह्याबद्दलचा माझा अनुभव फार चांगला आहे. नुसतं माझं पत्र पोंचतांच 'न्यू जर्सी स्टेट स्कूल ऑफ कॉंझर्व्हेशन'चे डिरेक्टर डॉ. जॉन जे. कर्क

( Dr. John J. Kirk ), 'अर्लिग्टन नॅशनल सिमेटरी 'चे 'कम्युनिटी रिलेशन्स् ऑफिसर' डेव्हिड बी. अॅलन ( David B. Allen ), U. S. Department of the Army, 'शिकागो पोलिस 'चे सुपरिन्टेंडंट ओ. डब्ल्यू. विल्सन ( O. W. Wilson ), 'FBI 'चे डिरेक्टर जे. एडगर हूवर ( J. Edgar Hoover ) या सर्वांनीं तांतडीनं 'एअर मेल 'नं आवश्यक ती माहिती आणि भरपूर छायाचित्रं मला पाठवलीं. 'अमेरिकेंतल्या अंधारांत' आम्ही सांपडलेलों असतांना त्याच वेळीं अमेरिकेच्या इतर भागांत काय काय घटना घडत होत्या त्याची माहिती 'न्यूयॉर्क टाइम्स 'नं प्रसिद्ध केलेल्या "The Night The Lights Went Out" या छोटया पुस्तकांत मला मिळाली. त्यांतलीं कांहीं छायाचित्रंहि आम्हीं वापरलीं आहेत. ह्यांव्यतिरिक्त बाकीचीं सर्व छायाचित्रं मी स्वतःच घेतलेलीं आहेत.

अमेरिकेंतलं माझं वास्तव्य सुखाचं व्हावं यासाठी तिथल्या माझ्या तिन्ही 'होस्ट फॅमिलीज्'– बिंघॅम (Bingham), फेअरवेदर ( Fairweather ), आणि हॉप्किन्स् (Hopkins) यांनीं जी तसदी घेतली त्याबद्दल मी त्या सर्वांचा ऋणी आहें.

**–– प्रभाकर तामणे**

# अनुक्रम


| | |
|---|---|
| पहिली झेंप | १ |
| मंतरलेले दिवस मॉंट्क्लेअरचे | १३ |
| 'लेट्स स्टे ग्रीन' : कॅंप वॅपालानी | २७ |
| तिथें तयांच्या दफनभूमिवर | ४१ |
| नव्या जगांतला पहिला श्वास | ५५ |
| सोनेरी दिवस बॅरिंग्टनचे | ७१ |
| निसर्गाशीं अद्वैत | ८९ |
| फोन नं. PO–5–1313 | १०७ |
| 'डेंजर : मेन कूकिंग !' | १२० |
| पश्चिमेचे वाङमयीन वारे | १३४ |
| अमेरिकेंतले बालमित्र | १४७ |
| अनामिक बंध | १५२ |
| 'FBI' : अमेरिकेचे डोळे | १७५ |
| स्वप्ननगरी : न्यूयॉर्क वर्ल्ड्स् फेअर | १९३ |
| चाकांवरची फिरती दुनिया | २०८ |
| यंत्र : अमेरिकन जीवनाचें तंत्र | २२२ |
| सिंदबादची दुसरी सफर | २३३ |
| अमेरिका अंधारांत | २४७ |
| पाऊस : हिमफुलांच्या देशांतला | २६१ |

# पहिली झेप

खरोखर कांहींकांहीं वेळां वाटतं, हें आयुष्य कसं एखाद्या अद्‌भुत स्वप्नासारखं चाललंय्. अशक्य वाटणाऱ्या गोष्टीसुद्धां कधीं कधीं किती अनपेक्षितपणें आयुष्यांत घडून येतात! फार पूर्वीपासूनचं माझं एक स्वप्न होतं– इंग्लंडला, अमेरिकेला जायचं! जायची इच्छा तर फार उत्कट होती. पण कसं जायचं, कां जायचं, तें मात्र कळत नव्हतं. स्वतःच्या खर्चानं जाणं कठीण होतं. आणि कॉलेजांत शिकवण्याचा माझा विषय 'मराठी' हा असल्यानं 'उच्च शिक्षणासाठीं' वगैरे कारणंहि आमच्यापुरतीं वाद झालेलीं होतीं. संयुक्त महाराष्ट्राच्या, बृहन्महाराष्ट्राच्या कक्षा मला माहीत होत्या. मराठीच्या प्रोफेसरनं साता समुद्रापलीकडं जाणं हें त्या कक्षा ताणून ताणून तोडल्या तरी त्यांत बसणं शक्य नव्हतं. अशा परिस्थितींत माझं अमेरिकेला जाणं घडलं. एकदा नव्हे तर लागोपाठ दोनदां! कसं घडलं हें! हजारों मैलांच्या विमानप्रवासाची जबरदस्त रेषा अचानकपणें हातावर उमटली असावी! मला तरी दुसरं कांहीं कारण सुचत नाहीं!

१९६४ सालच्या जानेवारींत केव्हांतरी एक दिवस आमच्या कॉलेजांत दिल्लीच्या 'एक्स्पेरिमेंट इन् इन्टरनॅशनल लिव्हिंग' ह्या संस्थेचं एक परिपत्रक आलं. सहज जिज्ञासेनं दिल्लीला अर्ज पोचण्याची तारीख पाहिली. ८ जानेवारी तारीख होती. परिपत्रक आमच्या हातांत पडण्यापूर्वीं ती कधींच उलटून गेली होती. विद्यापीठांत तें परिपत्रक पुष्कळच आधीं आलेलं होतं. पण त्यावेळचा

तिथला लाल फितीचा संथ कारभार आणि नंतरची नाताळची सुट्टी यांच्यामुळं तें इतक्या उशिरां आमच्या हातांत आलं होतं. खरं म्हणजे आतां तारीख उलटून गेल्यावर त्या गोष्टीचा विचारसुद्धा करण्यांत कांहीं अर्थ नव्हता. पण मनांत आलं, सत्य काय तें दिल्लीला कळवावं. कदाचित् तारीख उलटून गेल्यावरसुद्धां ते अर्जाचा विचार करतील ! कुणीं सांगावं ! पुरुषस्य भाग्यम् ! आणि अखेर झालंहि तसंच ! अर्जाचा नमुना माझ्या हातीं पडण्यांत पुन्हां पांचसहा दिवस गेले. आणि अखेर २१ जानेवारीला मी माझा अर्ज पाठवूं शकलों. उशीर कां झाला त्याबद्दलचा माझा प्रामाणिक खुलासा त्यांना पटला असावा. म्हणूनच माझ्या अर्जाचा विचार होऊनं मला मुंबईला 'इंटरव्ह्यू 'साठीं आमंत्रण आलं. 'इंटरव्ह्यू ' चांगला झाला. आणि ११ मार्चला एक दिवस एक फार छान पत्र मला आलं, " Please accept our congratulations .... !" वगैरे.

पत्र वाचलं. चांगलं दोनतीनदां पुनःपुन्हां वाचलं. आणि खरं सांगतों, खूप आनंद झाला. मन फार फार सुखावलं. खूप दिवसांची माझी इच्छा आतां सफल होणार होती ! मन तर केव्हांच अवकाशांत भ्रमण करायला लागलं होतं, देहाचीहि तीच अवस्था झाली असती, पण न्यूटननं तो गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त शोधून काढला होता ना, तो आमच्या जडदेहाला तसं कांहीं भरकटूं देईना ! म्हणूनच केवळ त्यानंतर मी जमिनीवर चालत होतों एवढंच ! . . .

. . . एकदां निवड झाल्यानंतर मग दिल्लीहून भराभर 'एक्स्पेरिमेंट 'चीं सूचना-पत्रं यायला लागलीं. आयुष्यांत पुणें-मुंबईचासुद्धां विमान-प्रवास मीं कधीं केला नव्हता. त्यामुळं माझ्या दृष्टीनं सगळीच नवलाई होती. त्यांत अमेरिके-सारख्या कमालीच्या प्रगत देशांत जाऊन यायचं होतं. त्यामुळं तिकडे जाऊन आलेल्या लोकांच्या भेटीगांठी घ्यायला लागलों. अधिकारवाणीनं त्यांनी ऐकवलेले अनुभवाचे बोल ऐकायला लागलों. या बाबतींत प्रसिद्ध लेखक अरविंद गोखले अन् मुबईचे सुप्रसिद्ध नट-दिग्दर्शक आत्माराम भेंडे यांनीं मला फार चांगलं मार्गदर्शन केलं. पासपोर्ट, व्हिसा, 'पी '– फॉर्म, इंटरनॅशनल हेल्थ सर्टिफिकेट वगैरे बाबतींत 'एक्स्पेरिमेंट 'चीं मार्गदर्शनपर पत्रं येतच होतीं. त्यामुळं तशी कांहीं अडचण भासली नाही. बऱ्याचशा गोष्टी 'एक्स्पेरिमेंट 'मार्फत परस्परच होणार होत्या.

दर वर्षी 'एक्स्पेरिमेंट 'कडून त्यांच्या सांस्कृतिक देवाण-घेवाण योजनेंत डॉक्टर्स, नर्सेस, कॉलेज-टीचर्स, सोशल वर्कर्स, तंत्रज्ञ, संगीतज्ञ असे निरनिराळे 'स्पेशल इंटरेस्ट ग्रुप्स ' अमेरिकेला व इतर युरोपिअन देशांत पाठवले जातात. १९६४ सालीं प्राध्यापकांच्या 'स्पेशल ग्रुप 'मध्यें माझी निवड झाली होती. आमच्या 'ग्रुप 'साठीं भारतांतून एकूण ९ प्राध्यापक त्यांनी निवडले होते. त्यांपैकीं कलकत्त्याच्या राणी बिर्ला गर्ल्स कॉलेज 'च्या भूगोलाच्या प्राध्यापिका सौ. सेवती मित्रा

ह्या आमच्या ‘ग्रुप लीडर’ होत्या. आम्ही अमेरिकेला जाण्यापूर्वी दिल्लीला आम्हां सर्वांसाठीं ४-५ दिवसांचा ‘ओरिएंटेशन कोर्स’ होता. त्या वेळीं माझी अन् त्यांची भेट होणारच होती. पण तत्पूर्वींच पत्ररूपानं तरी परस्परांचा परिचय व्हावा म्हणून ५ जूनलाच त्यांनीं मला पत्र पाठवून स्वतःचा परिचय करून दिला, माझीहि माहिती विचारली. माझी निवड झाल्यापासून मी अमेरिकेला जाईपर्यंतच्या काळांत मला किती पत्रं आलीं अन् मीं किती पत्रं लिहिलीं त्याची गणती करणंच अशक्य होतं. एवढंच सांगतों, त्या काळांत मी म्हणजे अनेक ठिकाणीं धावपळ करणारं अन् उरलेल्या वेळांत सतत पत्रं लिहिणारं एक यंत्र बनलों होतों.

दिल्लीच्या आमच्या ‘ओरिएंटेशन कोर्स’ची सुरुवात ७ जुलैला झाली. १० तारखेपर्यंत ‘कोर्स’ चालणार होता. ११ जुलैची तारीख आम्हांला दिल्लीला कांहीं खरेदी करायची असली तर त्यासाठीं मोकळी ठेवण्यांत आली होती. १२ जुलैला सकाळीं आम्ही ‘एअर इंडिया’च्या ‘चार्टर्ड’ विमानानं अमेरिकेला जाणार होतों. ‘१२ जुलै!’ ही तारीख कळतांच मला पानशेतच्या दुर्दैवी घटनेची आठवण झाली! मी पुण्याचा! बरोबर तीनच वर्षं झालीं होतीं त्या घटनेला! त्या दिवशीं मी पुण्यांतच होतों. उघड्या डोळ्यांनीं तो हाहाःकार पाहिलेला होता. तीन वर्षं झालीं होतीं. पण आठवणी अजून ताज्याच होत्या. ‘१२ जुलै’ या दिवसावरच कसलं तरी अशुभ सांवट कायमचं पडलेलं होतं; आणि त्याच दिवशीं मी प्रथमच विमानांत पाऊल ठेवणार होतों. मनांत उगीचच नाहीं नाहीं ते विचार यायला लागले. वाटलं, कांहीतरी कारणानं ही तारीख बदलली जावी, म्हणजे मग आपल्याला कांहीं धोका नाहीं! आणि झालंहि तसंच! नक्की काय घडलं कुणास ठाऊक! पण १२ जुलैच्या ऐवजी ‘११ जुलै’ हीच तारीख निश्चित झाल्याचं आम्हांला कळवण्यात आलं.

आमचा कॉलेजच्या प्राध्यापकांचा ‘ग्रुप’ धरून एकूण आठ ‘ग्रुप्स’ अमेरिकेला बरोबरच जाणार होते. सगळे मिळून आम्ही एकूण ७८ भारतीय ‘एक्स्पेरिमेंटर्स’ होतों. ‘ओरिएंटेशन कोर्स’साठीं आम्हां सर्वांची राहण्या-जेवणाची व्यवस्था दिल्लीच्या ‘मॉडर्न स्कूल’मध्यें केलेली होती. व्यवस्था फारच चांगली होती. पण आमचं ‘ओरिएंटेशन शेड्यूल’ मात्र जबरदस्त होतं. रोज सकाळीं ८पासून रात्रीं साडेदहा अकरापर्यंत ‘ग्रुप मीटिंग्स’, ‘फिल्म शोज्’, भाषणं इत्यादि निरनिराळ्या कार्यक्रमांनीं आम्हांला बांधून टाकलं होतं. दुपारी साडेबारा ते तीन हा ‘लंच अँड रिक्रिएशन’चा वेळ आणि संध्याकाळीं ६ ते ७ ‘खेळांचा वेळ’ एवढाच काय तो आम्हांला ‘दिलासा’ वाटायचा. पण एक गोष्ट मात्र कबूल केलीच पाहिजे. ह्या चार दिवसांत झालेल्या चर्चा, ऐकलेलीं दोनतीन भाषणं आणि आम्ही पाहिलेल्या एकूण १० छोटया फिल्म्स् यांनीं आम्हांला अमेरिकेची आणि तिथल्या समाजाची

खूपच चांगली माहिती झाली. अमेरिकेच्या जेवणाखाण्याच्या पद्धतीपासून तों बोलण्याचालण्याच्या ' मॅनर्स–एटिकेट्स् 'पर्यंत सगळी माहिती आम्हांला दिल्लीच्या त्या वास्तव्यांतच झाली.

नऊ तारखेच्या संध्याकाळीं आम्हांला सर्वांना दिल्लीच्या 'फ्रेंड्स् कॉलनी'तील 'मनोर हॉटेल'मध्यें 'एक्स्पेरिमेंट ईव्हिनिंग' साजरी करण्यासाठीं खास बसेस्‌मधून नेण्यांत आलं. अत्यंत त्रोटक अशीं एकदोन स्वागतपर, शुभेच्छादर्शक भाषणं, खाणंपिणं, गप्पा मारणं, गाणं-नाचणं एवढाच तिथल्या उल्हसित वातावरणांतला कार्यक्रम होता. हॉटेलच्या विस्तीर्ण आणि रम्य परिसरांतच हा सगळा मोकळ्या वातावरणांतला आनंद–सोहळा आयोजित करण्यांत आला होता. वेळ सुंदर संध्याकाळची होती. आजूबाजूच्या छोट्याछोट्या डेरेदार झुडपांमध्यें रंगीबेरंगी चिमुकले दिवे लावलेले होते. चांदण्याचा आभास निर्माण करणाऱ्या मंद निळसर प्रकाशानं तिथलीं पांढरींशुभ्र सिमेंटचीं गुळगुळीत 'टेनिस कोर्ट्स्' उजळून निघालीं होतीं.

कार्यक्रम संपायच्या सुमाराला कांहीं अमेरिकन तरुण-तरुणींनीं ध्वनिमुद्रित संगीताच्या तालावर गतिमान 'स्क्वेअर डान्स'चं प्रात्यक्षिक करून दाखवलं. त्यांतली गति आणि चैतन्य मला फार आवडलं. डान्स संपतांच आम्ही सर्वांनीं कौतुक-निदर्शक टाळ्या वाजवल्या. सुहास्य मुद्रेनं आमच्या कौतुकाचा स्वीकार करीत ते अमेरिकन्स म्हणाले, "चला, आता तुम्ही सगळे आमच्यांत या ! आम्ही शिकवतों तुम्हांला हा स्क्वेअर डान्स !"

— आम्ही सगळे एकमेकांच्या तोंडाकडे पहायला लागलों. आजवर भारतीय संस्कृतीनं मनावर केलेले संस्कार अजून पक्के होते. अनोळखी परस्त्रियांचे हात धरून नाचणं हें त्या संस्कारांत बसत नव्हतं. आमच्यापैकीं त्यांतल्या त्यांत धीट असलेले कांही तरुण-तरुणी पुढं सरसावले आणि त्यांच्यांत मिसळले. मी मात्र पाऊल मागं घेतलं. वास्तविक पहातां ती दिल्ली होती. तिथं मला कुणीहि ओळखत नव्हतं. त्यामुळं संकोच वाटण्याचं खरं म्हणजे कारण नव्हतं ! पण ही 'अमेरिका' नव्हे, हा 'हिंदुस्थान' आहे हें मी अजून विसरूं शकत नव्हतों ! . . .

. . . ११ जुलै उजाडली ! आयुष्यांतला एक अपूर्व अनुभव घ्यायला मन उत्सुक झालं होतं. पहांटे चारलाच उठलों, अन् सव्वासहाला 'मॉडर्न स्कूल'चा निरोप घेऊन बसेसमधून आम्ही 'पालम'– विमानतळाकडे निघालों. पंधरा मिनिटांतच आम्ही पालमला आलों. सामानाची सर्व व्यवस्था झाल्यानंतर तिथल्या 'ब्रेकफास्ट रूम'मध्यें आम्हीं 'ब्रेकफास्ट' घेतला; आणि सकाळीं साडेआठ वाजतां उड्डाणासाठीं अगदीं तयार होऊन आम्ही विमानाची वाट पाहूं लागलों.

आम्हांला अमेरिकेला नेणारं ' एअर इंडिया 'चं ' चार्टर्ड प्लेन ' मुंबईहून येणार होतं. त्याप्रमाणं तें आलं. पण वाईट हवेमुळं त्याला विमानतळावर उतरतां मात्र येईना. तें तसंच आकाशांत घिरट्या घालीत फिरूं लागलं. एका हेलिकॉप्टरनं त्याला मार्गदर्शन करून खालीं उतरवण्याचा प्रयत्न केला. पण त्यालाहि त्यांत यश आलं नाहीं. हें एक नवीनच विघ्न आमच्या मार्गांत सुरुवातीलाच उपस्थित झालं होतं. विमान वरतीं आकाशांत घिरट्या घालतांना दिसत होतं, पण त्यांत बसायचा मात्र अजून योग येत नव्हता. अखेरीस साडेनऊ वाजतां एक ' अनाउन्समेंट ' झाली, अन् आमचे चेहरे एवढेसे झाले. आम्हांला नेण्यासाठी आलेलं विमान उतरूं न शकल्यामुळं तसंच परत गेलं होतं ! आता संध्याकाळीं केव्हांतरी तें पुन्हा येणार होतं. तोंपर्यंत आमची सोय ' एअर इंडिया 'नं त्यांच्याच मार्फत ' कॉनॉट प्लेस '-मधल्या ' हॉटेल सेंट्रल कोर्ट 'मध्ये केली होती. कारण पालमवर पाऊल टाकल्यापासून आम्ही आतां ' एअर इंडिया 'च्या ' महाराजा 'चे पाहुणे झालों होतों. हॉटेल ' एअर कंडिशण्ड ' होतं. मीं सहज चौकशी केली. दोन बिछान्यांच्या एका खोलीला ५१ रु. रोज भाडं होतं. आंकडा ऐकून मुकाट्यानं जेवायला लागलों !

. . . .संध्याकाळी सव्वापांचला आम्ही परत ' एअर इंडिया 'च्या ' कोचेस् 'नं पालम विमानतळावर आलों, आणि आकाशाकडे डोळे लावून दूरवर आमचं विमान कुठं दिसतंय् का त्याची वाट बघायला लागलों. आम्हांला सर्वांना निरोप द्यायला त्या वेळचे सेंट्रल कॅबिनेट मिनिस्टर श्री. जयसुखलाल हाथी हे आले होते. आमच्या ' एक्स्पेरिमेंट 'च्या ' अॅडव्हायझरी बोर्ड 'चे ते एक सभासद होते. सकाळींसुद्धां ते आलेच होते. श्री. हाथींखेरीज सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश जस्टिस प्र. बा. गजेंद्रगडकर, राजकुमारी अमृत कौर, उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्रभानु गुप्ता, महाराष्ट्रांचे त्या वेळचे मंत्री शांतिलाल शहा, युनियन डेप्युटी मिनिस्टर अहमद मोहिउद्दीन वगैरे आणखी सात मोठे लोक ' अॅडव्हायझरी बोर्ड 'वर होते. पण त्यांच्यापैकी कुणालाहि ' पालम 'वर येणं जमलं नव्हतं. शेवटीं ' हाथी ' हेच आमचे ' साथी ' ठरले !

' एक्स्पेरिमेंट 'चे नॅशनल सेक्रेटरी श्री. अमरीश त्रिवेदी हे तर सदासर्वकाळ आमच्या पाठीशीं सावलीप्रमाणं वावरत होते. ते आणि त्यांच्या हसतमुख पत्नी सौ. शशिकला त्रिवेदी ह्यांनीं आमचा अमेरिकेचा दौरा निर्विघ्नपणें पार पडून यशस्वी व्हावा यासाठीं जे परिश्रम घेतले त्यांना तर खरोखरच तोड नाहीं. प्रत्येक ' एक्स्-पेरिमेंटर 'कडे त्यांचं वैयक्तिक लक्ष असे. दोघांच्याहि बोलण्यांतला आणि वागण्यातला गोडवा केवळ अविस्मरणीय होता. आपल्या घरचंच एखादं मंगलकार्य असावं अशा थाटांत दोघांचीहि एकसारखी धावपळ चाललेली होती. सकाळीं

आमचं विमान येऊन परत गेलं आणि ठरलेल्या कार्यक्रमांत बदल झाला याचं आमच्या-पेक्षां त्यांनाच अधिक वाईट वाटलं असावं.

. . . संध्याकाळीं साडेसातला ' एअर इंडिया 'नं आमच्या ' स्पेशल फ्लाइट'ची घोषणा केली. इतका वेळ वाट बघून आम्ही सर्वजण अगदी' कंटाळून गेलों होतों. तेव्हां साडेसातला आकाशांतून आमचं विमान खालीं उतरतांना दिसतांच सर्वांनीं लहान मुलासारख्या टाळ्या वाजवून त्याचं स्वागत केलं.

– बोइंग ' सेव्हन-ओ-सेव्हन ' जातीच्या आमच्या त्या जेट विमानाचं नांव होतं ' एव्हरेस्ट ' ! कॅप्टन बोस हे त्याचे कमांडर होते. एकूण १६८ सीट्सचं तें विमानं होतं. बरोबर सव्वाआठला आम्हीं विमानांत प्रवेश केला. आठ-चाळीसला विमान धांवपट्टीवर धांवायला लागलं; आणि चारसहा मिनिटांतच त्यानं वेगानं आकाशांत झेप घेतली.

. . . . . नवी दिल्ली–तेहरान–इस्तंबूल–अथेन्स–लंडन–न्यूयॉर्क–ब्रॅडलेफिल्ड असा आमचा प्रवासाचा मार्ग ठरलेला होता. रात्री दहाला विमानांत उत्कृष्ट जेवण मिळालं. नंतर मात्र विमानांतलं हळुवार ' इंग्लिश म्युझिक ' कानावर येत असतांनाच हळूंहळू डोळे मिटायला लागले.

– रात्रीं एक वाजता कुणीतरी माझ्या जवळ येऊन मला उठवून म्हटलं, " अरे, झोंपलांत काय ? तें बघा, खाली तेहरान आलंय् ! "

मीं डोळे उघडून खिडकींतून बाहेर पाहिलं. आमचं विमान तेहरानवर घिरट्या घालीत होतं. खालीं अक्षरशः हजारों दिव्यांचा समुद्र वेडाबांकडा पसरलेला दिसत होता. अंधाराच्या काळ्याभोर जमिनीवर दिव्यांच्या रांगोळीचे ठिपके ठेवावेत तसं तें दृश्य दिसत होतं. दहा मिनिटांतच आमच्या ' एव्हरेस्ट 'चीं चाकं जमिनीला लागलीं. त्या वेळीं स्थानिक वेळेप्रमाणं रात्रीचे ११–१० वाजले होते.

प्रत्येक ठिकाणी त्या त्या देशाचे ' एक्स्पेरिमेंटर्स ' आमच्या विमानांत येणार होते. ' तेहरान 'ला इराणचे एकूण २० ' एक्स्पेरिमेंटर्स ' आमच्या विमानांत चढले. जवळजवळ एकजात सगळे तरुण-तरुणी सुंदर होते. विमान स्वतंत्रच असल्यामुळं कोणीहि कुठंहि बसावं, कंटाळा आला तर विमानांतच इकडेतिकडे फिरावं असा सगळा मामला होता. त्यानंतर प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यांत असेच १५–२० ' एक्स्पेरिमेंटर्स ' आमच्यांत येत होते. नवीन नवीन ओळखी होत होत्या. थोडीफार ओळख होतांच गप्पांच्या ओघांत एकमेकांच्या नांवांची, पत्त्यांची देवाण-घेवाण होत होती. कुणी कुणाशीं ओळख करून देण्याचं कारणच नव्हतं. सगळेजण एकाच भावनेनं भारलेले होते. एकाच अनुभवासाठीं अमेरिकेला चालले होते. विमानांत कितीतरी नवीन नवीन ओळखी झाल्या. तेहरानची कु. फतिमा घाझी, कु. नासरीन हेक्‌माटी, तेहरानचाच फवामार ताकेश, अथेन्सची कु. हेलन स्टिरिओपौलू,

तिची मैत्रीण कु. रेजिना पपाजॉर्जाकोपौलू ह्या सगळ्यांच्या ओळखी विमानांतच झाल्या.

त्यांतल्या त्यांत अथेन्सच्या हेलन आणि रेजिना ह्या दोन ग्रीक मुलींशीं माझा अधिक चांगला परिचय झाला. कारण जवळजवळ सगळा प्रवास संपेपर्यंत विमानांत त्या दोघी माझ्या शेजारींच बसल्या होत्या. त्यामुळं आमच्या तिघांच्या गप्पा खूप रंगल्या.

हेलननं आमच्यावरोबरच्या साडी नेसून पोट उघडं टाकणाऱ्या भारतीय तरुणी प्रत्यक्षांत प्रथमच पाहिल्या होत्या. त्यामुळं त्यांच्या पोषाखाकडं माझं लक्ष वेधून ती आश्चर्यानं उद्गारली, " I wonder how women in India don't catch cold when they leave so much portion of their stomach open ! "

" खरंच, त्या पोट कां उघडं टाकतात ?"– हेलनशीं सहमत होत रेजिनानं मला विचारलं.



**भारतीय स्त्रियांचा 'पोट'प्रश्न उपस्थित करणाऱ्या दोन ग्रीक सुंदरी–कु. रेजिना आणि कु. हेलन**

– असला चमत्कारिक प्रश्न मला कधींकाळीं कुणीं विचारील ह्याची कल्पना नव्हती. त्यामुळं मी जरासा बेसावध होतों. पण क्षणांत प्रसंगावधान राखून मीं हसत म्हटलं, " त्यांना तुमच्यासारखे पाय उघडे टाकायला आवडत नाहीं, म्हणून त्या पोट उघडं टाकतात ! "

माझ्या ह्या बोलण्यावर दोघीहि खूप हंसल्या. त्यांना भारताबद्दल फारच थोडी माहिती असल्याचं मला आढळून आलं. मला तरी 'ग्रीस'ची कुठं काय माहिती होती ? एकमेकांच्या देशाच्या ज्ञानाच्या बाबतींत दोन्ही बाजूंनीं आनंदच होता ! त्यामुळं आमचं अज्ञान प्रगट करणारे मार्मिक प्रश्न आम्ही परस्परांना निःसंकोचपणें विचारत होतों !

भारतीय स्त्रीजीवनाबद्दल त्यांना जास्त कुतूहल दिसलं. 'भारतीय बायका ऑफिसांत जाऊन नोकऱ्या करतात का ? . . . समाजांत त्यांना पुरुषांच्या बरोबरीनं समान हक्क असतात का ? . . . प्रत्येक भारतीय स्त्रीला पुष्कळ मुलं असतात का ? . . . .' असे अनेक प्रश्न त्यांनी मला विचारले. " त्या साड्या कशा नेसतात ? " हा प्रश्नहि त्यांनीं मलाच विचारला. तेव्हां मात्र मीं त्यांना सांगितलं, " बायांनो, हा विषय शब्दांनीं स्पष्ट करून सांगण्यासारखा नाहीं ! त्याचं प्रात्यक्षिकच तुम्हीं बघायला हवं. . . . विमान सुखरूप खालीं उतरल्यावर – अमेरिकेंत ! आणि तेंसुद्धा माझ्याकडून नव्हे ! ! "

– भारतीय जनतेचा एकंदर जीवनक्रम समजावून घेतल्यावर चिंतातुर स्वरांत हेलन म्हणाली, " Indian people don't dance, don't drink, men and women seldom come together to enjoy. Then how do they enjoy life at all ? "

" आता आमचे लोकहि चांगलेच 'सुधारत' चालले आहेत ! ह्या सगळ्या गोष्टी आमच्याकडे हळूंहळू येत चालल्या आहेत ! "– असं सांगून मीं तिची चिंता दूर केली.

. . . . बोलतांबोलतां लंडन केव्हां आलं तें आम्हांला कळालंसुद्धा नाहीं. लंडनला आम्ही उतरलों तेव्हां स्थानिक वेळेप्रमाणं सकाळचे ७–१० झाले होते. हवेंत विलक्षण गारवा होता. 16°C टेंपरेचर होतं. लंडनच्या विमानतळावरच असलेल्या 'Tavern in Sky' हॉटेलांत आम्हीं ब्रेकफास्ट घेतला. न्यूयॉर्कला पोंचल्यावर जेवण केलं. न्यूयॉर्कहून वीस मिनिटांत आम्ही ब्रॅडलेफिल्डला आलों. स्थानिक वेळेप्रमाणं त्या वेळीं दुपारचे अडीच वाजले होते. तारीख '१२ जुलै' होती ! हिंदुस्थानांतून निघाल्यापासून माझ्या घड्याळांतली वेळ मी कुठंच बदललेली नव्हती. त्यामुळं माझ्या घड्याळांत त्या वेळीं रात्रीचे साडेअकरा वाजले होते !

आमच्या सगळ्या एवढ्या लोकांना ' कस्टम्स 'मधून बाहेर पडायला जवळ-जवळ दोन तास लागले. संध्याकाळीं ५ वाजतां ' पीटर पॅन बस लाइन 'च्या ' एअर कंडिशण्ड ' बसेस्मधून आम्ही ब्रॅडलेफिल्डचा विमानतळ सोडला, आणि बरोबर सात वाजतां ' पटनी 'ला आलों.

' पटनी ' ( Putney ) हें व्हर्मांट् स्टेटमधलं एक अतिशय निसर्गसुंदर छोटंसं गांव आहे. अमेरिकेंतलं ' एक्स्पेरिमेंट 'चं मुख्य केंद्र पटनीला आहे. तिथं ' ओरिएंटेशन 'साठीं दीड दिवस आमचा मुक्काम होता. पटनीला दुसऱ्या मार्गांनीं आमच्या आधींच विमानानं आलेले इराक, लेबॅनॉन, सिरिया, जॉर्डन, अर्जेंटिना, मेक्सिको, तुर्कस्तान, थायलंड, फिलिपाइन्स, घाना, जपान इत्यादि देशांतले ' एक्स्-पेरिमेंटर्स ' आम्हांला भेटले. पुन्हा नवीन ओळखी, नवे स्नेहबंध निर्माण झाले.

आम्ही पटनीला पोचलों त्याच दिवशीं रात्रीं साडेआठला ' जनरल मीटिंग ' झाली. ' एक्स्पेरिमेंट 'चे प्रमुख प्रवर्तक डॉ. वॉट ( Wott ) यांचा क्लॅरेन्स फॉक ( Clarence Falk ) यांनी फार चांगल्या भाषेंत परिचय करून दिला. निरनिराळ्या देशांतल्या ' एक्स्पेरिमेंटर्स 'नी डॉ. वॉट यांना कांहीं भेटवस्तू दिल्या. डॉ. वॉट यांनीं उत्तरादाखल केलेलं भाषण तळमळीचं आणि उपदेशपर असं असूनहि तें मुळींच कंटाळवाणं झालं नाहीं, याला कारण त्यांची मिस्किल आणि अनौपचारिक भाषणशैली !

दुसऱ्या दिवशीं सकाळपासून ' ग्रुप मीटिंग्स् ', भाषणं वगैरे ' ओरिएंटेशन ' सुरू झालं. संध्याकाळीं ५ वाजतां अमेरिकेचे भारतांतील माजी राजदूत प्रो. जॉन के. गालब्रेथ यांचं आमच्यासाठीं भाषण झालं. रात्रीं जेवायलाहि ते आमच्याबरोबर होतेच.

त्या दिवशीं दिवसभर झिम्झिम् पाऊस पडत होता. पण सुदैवानं रात्रीं तो थांबला होता. रात्रीं ८ च्या सुमारास जेवणं आटोपून आम्ही सगळेजण मैदानांत अर्धवर्तुळ करून बसलों. प्रत्येक देशाच्या प्रतिनिधींनीं त्या वेळीं आपापला वैशिष्ट्य-पूर्ण कार्यक्रम सादर केला. थंडगार हवेंत मोकळ्या वातावरणांत जमलेली ती आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक कार्यक्रमांची मैफिल केवळ अविस्मरणीय होती. त्या ठिकाणीं खरंखुरं विश्वबंधुत्वाचं वातावरण निर्माण झालं होतं. अरब राष्ट्रांतून आलेले प्रतिनिधी आपलं पूर्वापार चालत आलेलं वैर विसरून इस्राएलच्या तरुण-तरुणींशीं मोकळेपणानं गप्पा मारीत होते. एखाद्या गाण्याच्या वेळीं एकमेकांच्या पाठीवर किंवा मांडीवर तालहि धरत होते. राजकारणी लोक युद्ध खेळतात, राजकारण करतात. पण सर्वसामान्य माणसांच्या अंत:करणांत माणुसकीचा, मित्रत्वाचा जिव्हाळा अखंड कायमच असतो. " By living together we learn to live together! "— या आमच्या ' एक्स्पेरिमेंट 'च्या बोधवाक्याची मला त्या वेळीं आठवण झाली. त्याचा खरा प्रत्यय मला प्रथम त्या वेळीं आला.

इराक, लेबॅनॉन, सिरिया, जॉर्डन इत्यादि छोटयाछोटया अरब राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं सर्वांनीं मिळून एक कार्यक्रम सादर केला. त्यांत अरबी भाषेंतील एक गाणं होतं. मला तें 'सुरस व चमत्कारिक' वाटलं ! त्यांच्याचपैकीं पांच मुलींनीं नंतर सादर केलेलं एक नृत्य मात्र छान होतं.

अर्जेंटिनाच्या मुलींनींहि एक लोकनृत्य करून दाखवलं. त्यांच्यांत पुरुष-प्रतिनिधींची कमतरता असल्यामुळं दोन मुलींनींच पुरुषांचे पोपाख केले होते.

ग्रीसच्या अठरा सुंदर तरुणींचा ताफा नृत्यकलेंत चांगलाच पारंगत होता· त्यांनीं दोन लोकनृत्यं आणि दोन गाणीं सादर केलीं. त्यांतलं एक तर त्यांचं राष्ट्रीय-गीतच होतं, 'अथीनाऽ अथीनाऽ' ! अथेन्सचं गुणवर्णन त्यांत होतं. दुसरं गाणं फ्रेंच भाषेंतलं होतं. इंग्रजींत त्याचं शीर्षक–'Never On A Sunday' असं कुणीतरी मला समजून सांगितलं ! तेवढंच कळालं !

आमच्या भारतीय प्रतिनिधींच्या तर्फे बंगलोरच्या कु. वैजयंती कुमार या मुलीनं आवश्यक त्या वेशभूषेसह मणिपुरी नृत्य करून दाखवलं. त्याच्याच पाठोपाठ १२ गुजराती व इतर मुलींनीं मिळून 'गर्बा डान्स' केला. त्यानंतर काश्मिर, गुजरात, बंगाल, म्हैसूर आणि पंजाब या प्रदेशांतल्या पोषाखांचीं खास वैशिष्टयें दाखविणारी रंगीबेरंगी 'ड्रेस परेड' झाली.

इराणच्या गाण्यांच्या चाली फार चांगल्या होत्या. त्यांच्यापैकीं १२ तरुणी आणि ३ तरुण यांनीं सादर केलेलं लोकगीत इतकं सुंदर होत, कीं शब्दांचा अर्थ कळत नसतांनाहि केवळ चालीला मोहून सगळ्या प्रेक्षकांनीं त्याला ठेका धरला होता.

इस्राएलच्या मुलांमुलींनीं फक्त गाणीं म्हटलीं. पण तीं इतकीं उत्कृष्ट म्हटली कीं 'Let us be happy' अशा अर्थाच्या दोन मुलींच्या गाण्याच्या वेळीं सगळ्या प्रेक्षकांनींहि त्यांच्या सुरांत सूर मिसळला. सर्वांनीं मिळून एकाच वेळीं, एकाच सुरांत, एकच गाणं म्हणण्याची कल्पनाच किती रोमहर्षक होती !

जपानच्या तीन तरुण आणि तीन तरुणींच्या गटानं त्यांचं अतिनाजुक किण-किणाटासारखं वाटणारं गोड वाद्यसंगीत ध्वनिमुद्रितच करून आणलं होतं. त्या संगीतावर रंगीबेरंगी किमोनो घातलेल्या नाजुक जपानी मुलींचं हळुवार कलात्मक नृत्य सर्वांना फार आवडलं. नाचतांना एका मुलीच्या हातांत त्यांचा जगप्रसिद्ध जपानी कागदी पंखा होता हें सांगायला नकोच. त्याच ग्रुपनं इंग्लिश 'जाझ'च्या धर्तीवर आणखी एक नृत्य करून दाखवलं. आमचे 'एक्स्पेरिमेंट प्रोग्रॅम कोऑर्डिनेटर' जॉर्ज यंग हेसुद्धा उत्साहानं त्यांच्या नृत्यांत सामील झाले.

मेक्सिकोच्या प्रतिनिधींनीं त्यांच्या देशांतील वैशिष्टयपूर्ण पोषाखांत तीन लोकनृत्यं सादर केलीं.

' ऑर्न ' आणि ' टिप् ' या नांवाच्या दोनच मुली थायलंडहून आलेल्या होत्या. त्यांपैकीं ऑर्ननं एक फ्रेंच गाणं म्हटलं. टिप्नं तिच्या थायलंडच्या पोषाखांत, ध्वनिमुद्रित संगीताच्या पार्श्वभूमीवर एक छोटंसं नृत्य करून दाखवलं.

तुर्कस्तानच्या प्रतिनिधींचीं गाणीं प्रेक्षकांना फार आवडलीं. त्यांतल्या १६ तरुणी आणि २ तरुणांनीं म्हटलेल्या एका समूह-गीतावर तर सारे प्रेक्षक बेहद्द खूष झाले होते. त्या गीताला प्रेक्षकांनीं ताल तर धरला होताच, पण त्या गायकांच्यां सुरात आपला सूरहि मिसळला होता. मलासुद्धां तें गाणं फार आवडलं. पण त्याचं कारण थोडं वेगळं होतं. आपल्या हिंदींतल्या ' अंटम् फंटम् कहते बाबू ' या चित्रपटगीतासारखीच त्याची चाल होती ! !

फिलिपाइन्समधून फक्त एकुलती एक मुलगीच आलेली होती. ती एकटी काय कार्यक्रम सादर करणार ? पण म्हणून ती कांहीं मागं हटली नाहीं. परीसारखे पंख असलेल्या बाह्यांचा पांढराशुभ्र पोषाख करून ती नुसतीच प्रेक्षकांतून फिरली. ' नांव काय बाळ तुझं ?'– अशा स्वरांत जॉर्ज यंग यांनीं तिला नांव विचारलं.

" जोसेफिना नापुली ! "–ती सुंदर तरुण मुलगी अधिकच सुंदर दिसण्यासाठीं आपली नाजुक मान वेळावून म्हणाली.

– जॉर्ज यंग यांनीं तिच्या पोषाखाचं आणि सौंदर्याचं कौतुक करीत तिला हाताला धरून पुन्हां एकदां प्रेक्षकांमधून फिरवलं.

. . . हा सारा आनंद-मेळावा संपला तेव्हां रात्र वरीच झाली होती. हवेंतला गारवाहि आतां विशेष जाणवायला लागला होता. आम्ही आपापल्या खोल्यांत परतलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ' एक्स्पेरिमेंटर्स 'चे निरनिराळे ' ग्रुप्स' अमेरिकेंतल्या निरनिराळ्या राज्यांत रहायला जाणार होते. योगायोगानं झाल्या तरच पुन्हां कधीकाळीं आतां एकमेकांच्या भेटीगांठी होणार होत्या ! अवघा दीड-दोन दिवसांचा सहवास ! पण परस्परांचा निरोप घेतांना, एकमेकांचे पत्ते उतरवून घेतांना कांहींशी उदास वाटणारी हुरहूर मनांत तरळत होती.तरीहि हंसून निरोप घेणं अटळ होतं. सकाळीं साडेसहाला आम्ही सगळेजण ब्रेकफास्टसाठीं एकत्र जमलों. त्या वेळीं पुन्हां एकदां अखेरच्या गप्पांची मैफल जमली. छोटयामोठ्या भेटवस्तूंची देवाणघेवाण झाली. ग्रीसच्या रेजिनानं मला स्कॉटिश पोषाखांतली छोटीशी बाहुली भेट दिली.

. . . . ' पीटर पॅन बस लाइन 'च्या बसेस् एकापाठोपाठ येऊन दाखल झाल्या. आम्ही आपापल्या बसेस्मध्यें बसलों. पुन्हा एकदां अखेरचा निरोप घेणं, आरडा-

ओरडा करणं, हातरुमाल हलवणं. जगांतल्या कानाकोपऱ्यांतून, कुठल्याकुठल्या दूरदूरच्या देशांतून आम्ही सगळे किती अद्‌भुत रीतीनं एकत्र आलों होतों. आणि आतां अफाट जगांत कुठल्या कुठं जाणार होतों. कदाचित् पुन्हा कधींच भेटणार नव्हतों..... झिम्‌झिम् पाऊस पडत होता....आणि एक छोटंसं सुंदर स्वप्न पुसून टाकत होता.....

□

# मंतरलेले दिवस मॉंट्क्लेअरचे

न्यूयॉर्कच्या दक्षिणेला बाराचौदा मैलांवर 'न्यू जर्सी' स्टेटमधें एक सुंदर टुमदार गांव आहे. या गांवाचं नांव 'मॉंट्क्लेअर'. हिरण्यागार निसर्गाचा वरदहस्त असलेल्या अमेरिकेंतल्या अनेक गांवांपैकी मॉंट्क्लेअर हें एक गांव. कुठल्या जन्माचे माझे अन् मॉंट्क्लेअरचे ऋणानुबंध होते, देव जाणे! पण प्रथमदर्शनींच मी त्याच्या प्रेमांत पडलों हें मात्र खरं! आमच्या 'एक्स्पेरिमेंट्'नं आखलेल्या कार्यक्रमांत चौदा दिवसांच्या 'युनिव्हर्सिटी कॅंपस् स्टे'साठी या गांवच्या 'मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'ची निवड केलेली होती.

अमेरिकेंतलीं वहुतेक कॉलेजं म्हणजे स्वतःच्या पदव्या देणारीं,स्वतंत्र अभ्यासक्रम असणारीं स्वयंपूर्ण विद्यापीठंच असतात. 'मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'सुद्धां ह्याच प्रकारांत मोडणारं विद्यापीठ आहे. पण आपल्याकडच्या 'बी. टी.' किंवा 'बी. एड्.' कॉलेजांसारखं मुख्यतः त्याचं स्वरूप आहे. असं असलं तरी M.A.चा कोर्सहि तिथं शिकवला जातो. १९०८ सालीं स्थापन झालेल्या ह्या कॉलेजनं आजपर्यंत असंख्य आदर्श प्रशिक्षित शिक्षक तयार केले आहेत. अशा कॉलेजच्या 'कॅंपस्'वर राहून अमेरिकेंतल्या शिक्षणपद्धतींचं निरीक्षण आम्हांला करायचं होतं. आमच्या छापील कार्यक्रमपत्रिकेंत प्रथम जेव्हां मीं 'मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'चं नांव वाचलं तेव्हां खरं सांगायचं म्हणजे मॉंट्क्लेअरचीसुद्धां मला कांहीहि माहिती नव्हती! जाणत्यांकडून एवढंच समजलेलं होतं कीं, मॉंट्क्लेअर हें एक फार सुंदर गांव आहे,

अन् मुख्य म्हणजे जगप्रसिद्ध न्यूयॉर्क शहरापासून कारनं सुमारं पंचवीस मिनिटांच्या अंतरावर तें आहे. एवढ्या माहितीवर आम्ही संतुष्ट होतों. कारण मनांत आकर्षण होतं न्यूयॉर्कचं ! न्यूयॉर्कला आमचा मुक्काम आमच्या दौऱ्याच्या अगदी अखेरीला होणारच होता. पण सुरुवातीलाच न्यूयॉर्कच्या एवढ्या जवळ जाऊन रहायला मिळतंय् हाच एक मोठा आनंद होता.

त्या आनंदांतच १४ जुलै' ६४ ला आम्हीं व्हर्मॉंट् स्टेटमधल्या पट्नी (Putney) गांवाचा सकाळीं सात-पंचवीसला निरोप घेतला, अन् 'पीटर पॅन बस् लाइन'च्या 'एअर कंडिशन्ड चार्टर्ड बस्नं स्प्रिंगफील्ड-ग्रीनविच्-मार्गानं २१० मैलांचा प्रवास करून दुपारीं दोन वाजतां न्यूयॉर्कला पोंचलों. वाटेंत स्प्रिंगफील्डला सकाळीं चहासाठी आम्ही सुमारं वीस मिनिटं थांबलों होतों. अन् पुढं कनेक्टिकटमधल्या 'हायवे'वर दुपारीं पावणेबारा ते पाऊण जेवणासाठी थांबलों होतों. वाटेतल्या सुमारे सव्वा तासाचा हा मुक्कामसुद्धां आम्हांला उगीचच जास्त वाटत होता, एवढे आम्ही न्यूयॉर्कच्या दर्शनासाठीं उतावीळ झालों होतों ! वाटेंत बस्-मध्यें माझ्या शेजारीं बसलेली एक तरुण इस्राइल मुलगी आपल्या 'श्री ४२०' ह्या हिंदी चित्रपटांतलं 'इचक दाना, बिचक दाना' हें गाणं मला म्हणून दाखवीत होती. पण तिचंसुद्धां मीं फारसं कौतुक केलं नाहीं. उगीच कांहींतरी बोलायचं म्हणून मीं तिला म्हटलं, "अरे वाः ! हें एवढं सुंदर गाणं तुला कसं काय म्हणतां येतं ?" त्यावर सहजतेनं ती म्हणाली, "आमच्या भाषेंतसुद्धां अशाच चालीचं एक गाणं आहे !"

– ह्या 'योगायोगा'चं मात्र मला विशेष कौतुक वाटलं !

न्यूयॉर्कच्या 'पोर्ट अॅथॉरिटी बस् टर्मिनल'ला आमचं स्वागत करण्यासाठी डॉ. सी. इ. रुंडेन ( Runden ) ह्या इतर दोन प्रोफेसर्सना घेऊन आल्या होत्या. डॉ. चॅरिटी इव्हा रुंडेन ह्या 'मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेजां'त 'एज्युकेशन' व 'सायकॉलॉजी' या विषयांच्या 'अॅसोसिएट प्रोफेसर' होत्या. शिवाय 'असिस्टंट डिरेक्टर ऑफ् स्टुडंट्स्' म्हणूनहि त्या काम करीत होत्या. आमच्या भारतीय प्राध्यापकांच्या 'ग्रुप'मधील सर्व प्राध्यापकांच्या व त्यांच्या ओळखीचा कार्यक्रम पार पडतांच सव्वादोनला डॉ. रुंडेन यांच्याच गाडीमधून आम्ही निघालों, अन् पावणेतीनला मॉंट्क्लेअरला पोंचलों.

आमची सर्वांची रहाण्याची व्यवस्था 'फ्रीमन हॉल' नांवाच्या विद्यार्थिनींच्या वसतिगृहांत केलेली होती. 'फ्रीमन हॉल'ची इमारत अगदीं अत्याधुनिक पद्धतीनं बांधलेली असून चांगली सातआठ–मजली होती. तळमजल्यावरच्या खोल्या आम्हांला दिलेल्या होत्या, आणि वरच्या मजल्यांवर विद्यार्थिनी रहात होत्या. आम्ही कॉलेजचे पाहुणे असल्यामुळं आमची सर्वच व्यवस्था फार चांगली ठेवलेली होती.

एकाच इमारतींत रहात असल्यामुळं कांहीं अमेरिकन विद्यार्थिनी केव्हांतरी येतां-जातांना आम्हांला वाटेंत भेटत. ओळखदेख नसतांनाहि त्या ओळखीचं हास्य करीत, आणि केव्हांकेव्हां थोडंफार बोलतहि असत. ' फ्रीमन हॉल 'मधील ' वुइमेन्स डॉर्मिटरीं 'तलं असं मोकळं वातावरण पहातांना मला साहजिकच आपल्याकडच्या कॉलेजांतलीं विद्यार्थिनींचीं वसतिगृहं आठवायचीं. तिथला रखवालदारी पद्धतीचा बंदोबस्त आठवायचा. आणि एवढ्या कडक बंदोबस्तातूनहि पळवाट काढून एखाद्या झाडाझुडपाआड चोरून भेटणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींचीं केविलवाणीं चित्रं माझ्या डोळ्यांपुढं दिसायचीं. मनांत यायचं, आमच्याकडच्या विद्यार्थिनींच्या वसति-गृहांत परदेशांतल्या तरुण पाहुण्यांना आम्हीं कधीं रहायला जागा दिली असती का ? पण अमेरिकनांचं सगळंच वेगळं ! आपल्याकडे आलेल्या पूर्णपणं अपरिचित अशा परदेशी पाहुण्यांच्याहि सभ्यतेवर त्यांचा नेहेमींच विश्वास असतो. पुढं कांहीं वेळां कांहीं अमेरिकनांच्या घरांत रहाण्याचा प्रसंग माझ्यावर आला, तिथंहि मला हाच अनुभव आला. सबंध घर पाहुण्याच्या स्वाधीन करून ते लोक खुशाल दिवसभर बाहेर जायचे. कुठंहि कड्याकुलपांचा कडेकोट बंदोबस्त नाहीं. घरांत राहिलेला पाहुणा कुटुंबप्रमुखापेक्षांहि घरांतल्या कर्त्या स्त्रीच्याच सहवासांत अधिक असायचा.

त्या दिवशीं संध्याकाळीं साडेपांचला ' स्टूडंट लाइफ ' नांवाच्या एका फार मोठ्या ' डिनर हॉल 'मधें आम्ही जेवायला गेलों. ' स्टूडंट लाइफ 'ची ही बिल्डिंग आमच्या ' फ्रीमन हॉल 'पासून जवळच होती. भरपूर उजेडासाठीं ह्या इमारतीच्या दोन बाजूंच्या उंच उंच भिंती कांचेच्या केलेल्या होत्या. आवश्यकता वाटली तर सहज सरकवतां येतील असे उंचच उंच पडदे दोन्ही बाजूंच्या कांचांना लावलेले होते. ह्या हॉलमधेंच एका बाजूला विद्यार्थ्यांना लागणाऱ्या नित्योपयोगी लेखनसाहित्याचा अन् पुस्तकाचा एक छोटासा स्टॉलहि होता. जेवायला थोडा अवकाश असला तर कांहीं विद्यार्थी–विद्यार्थिनी तिथंच कुठंतरी पुस्तक घेऊन वाचीत बसत अगर गप्पा मारीत. माँट्क्लेअरला आमचा मुक्काम असेपर्यंत रोज सकाळीं ब्रेकफास्टला आणि दोन्ही वेळां जेवायला आम्ही तिथंच जात होतों.

त्याच दिवशीं रात्रीं ८।। ते १० ह्या वेळांत कॉलेजनं आमच्यासाठीं एक छानदार स्वागत-समारंभ आयोजित केला होता. माँट्क्लेअर गांवांतले कांहीं प्रतिष्ठित लोकहि त्या वेळीं बोलावलेले होते. कॉलेजच्या आणखी कांहीं प्रोफेसर्सच्या व आमच्या त्या निमित्तानं चांगल्या ओळखी झाल्या.

कार्यक्रम संपल्यावर रात्रीं सव्वादहाला फ्रीमन हॉलच्या सातव्या मजल्यावर मी गेलों. तिथंच ' टेलिव्हिजन ' ह्या अद्‌भुत वस्तूचं आयुष्यांतलं पहिलं दर्शन घडलं. थोडा वेळ टेलिव्हिजन पाहिल्यावर आम्ही खिडकीशीं गेलों. तिथून बाहेर पाहिलं तर माँट्क्लेअरच्या भोंवतालचा बराचसा परिसर अंधाराच्या काळ्या

समुद्रांत बुडून गेलेला दिसला. पण दूरवर क्षितिजाकडे नजर टाकली तर हजारों-लाखों दिव्यांच्या रांगांनीं तें सारं उजळून निघालं होतं. रात्रीचा दिवस करणारे न्यूयॉर्क शहरांतले ते दिवे आम्हांला मॉंट्क्लेअरमधून दिसत होते. तें सारं दृश्यच विलक्षण आकर्षक होतं. रात्रीच्या त्या शांत वेळीं कांहीं क्षण तिथून हलावंसंच वाटेना.....

दुसऱ्या दिवसापासून आमचा कॉलेजचा दैनंदिन जीवनक्रम सुरू झाला. सकाळीं ब्रेकफास्ट झाल्यावर साधारणपणं नऊच्या सुमाराला कॉलेजच्या कोणत्याहि वर्गांत आम्ही जाऊन बसत होतों. आमच्या आगमनाची वार्ता सर्व प्रोफेसर्संना व विद्यार्थ्यांना आधीच कळवलेली असल्यामुळं, आणि आमच्या विशिष्ट रंगामुळं आम्हीच ते सुप्रसिद्ध भारतीय पाहुणे, हें अमेरिकनांच्या झटकन् लक्षांत येई. त्यामुळं प्रत्येक वर्गांत आमचं स्वागत होई. अर्थात् आम्ही सर्वजण एकदम एका वर्गांत कधींच जात नव्हतों. आमच्यापैकीं ज्याला ज्या विषयांत 'इंटरेस्ट' वाटत होता तो त्या विषयाच्या तासाला त्या त्या वर्गांत जाऊन बसत होता. अर्थात् एवढ्या थोड्या मुक्कामांत कोणत्याहि विषयाचा पद्धतशीर अभ्यास करणं आम्हांला शक्यच नव्हतं. आमच्याकडून तशी अपेक्षाहि नव्हती. त्यामुळं अमेरिकेंतल्या कॉलेजांमधें प्रोफेसर्स कसे शिकवतात, प्रोफेसर्स व विद्यार्थी यांच्यामधील संबंध वर्गांत कसे असतात, वर्गाबाहेर कसे असतात, वर्गांतलं एकंदर वातावरण कसं असतं, अशा गोष्टींचं निरीक्षण करण्यावरच आमचा विशेष भर होता.

पहिल्या दिवशीं मी प्रो. जी. ओ. हर्टूल ( G. O. Hourtoule ) यांच्या वर्गांत गेलों. बरोबर सकाळीं साडेनऊला त्यांचा तास सुरू झाला. पण तास सुरू होण्याची आपल्याकडच्यासारखी कॉलेजची घंटा मात्र ऐकायला आली नाहीं. बरोबर ठराविक वेळेला विद्यार्थी वर्गांत येत. त्यांच्या पाठोपाठ प्रोफेसर वर्गांत शिरत. त्यांना घंटेची गरज भासत नसावी. कारण प्रत्येक वर्गांत प्रोफेसर्संना दिसेल अशा ठिकाणीं भिंतीवरच मोठं घड्याळ लावलेलं पुढं मला दिसून आलं.

प्रो. डॉ. हर्टूल यांनीं निळसर रंगाचा पूर्ण सूट घातलेला होता. अर्थात् टायहि होताच. पण विद्यार्थ्यांचे पोषाख मात्र मला बरेच अनौपचारिक वाटले. त्या वेळीं त्यांचं 'समर सेशन' चालू असल्यामुळं नेहेमीपेक्षां थोडेसे कमी विद्यार्थी वर्गांत होते. त्या दिवशीं वर्गांत १८ मुली व ७ मुलगे असे एकूण २५ विद्यार्थी होते. प्रोफेसर अधूनमधून विद्यार्थ्यांना प्रश्न विचारीत होते. आणि विद्यार्थी बसूनच त्यांचीं उत्तरं देत होते. स्वतःला उत्तर येत असल्यास विद्यार्थी हात वरती करीत असत. प्रोफेसरना वर्गांतल्या सर्व विद्यार्थ्यांचीं नांवं माहीत होतीं, आणि त्यांना ते त्यांच्या पहिल्या नांवानं ( First Name ) संबोधीत होते. प्रोफेसर हर्टूल यांची व्याख्यान देण्याची पद्धति अनौपचारिकपणे गप्पा मारण्यासारखी होती. मला ती फार आवडली.

अधूनमधून ते हास्यविनोद करीत, आणि भरपूर विषयांतरहि करीत. प्रो. हर्टूल हे 'सोशल स्टडीज्'चे 'अॅसोसिएट प्रोफेसर' होते. त्या वेळीं अमेरिकेंत जॉन्सन आणि बॅरी गोल्डवॉटर यांची निवडणूक–मोहीम जोरांत चालू होती. त्यामुळं साहजिकच प्रोफेसर हर्टूल हे चालू घडीच्या राजकारणावर चुरचुरीत टीका करीत होते.

त्याच दिवशीं सकाळीं साडेअकरा ते साडेबारा मी प्रो. जे. ए. आल्मक्विस्ट ( J. A. Almquist ) यांच्या वर्गांत बसलों. प्रो. आल्मक्विस्ट हे इंग्लिशचे 'अॅसोसिएट प्रोफेसर' होते. 'अमेरिकन लिटरेचर' हा त्यांचा खास विषय होता. मी गेलो तो वर्ग त्यांच्याकडच्या M. A. च्या पहिल्या वर्षाचा होता. प्रोफेसर आल्मक्विस्ट हे पन्नाशीचे, भरदार बांध्याचे, उंच गृहस्थ होते. त्यांच्या अंगांत कोट नव्हता. गडद रंगाची पॅंट, पांढरा शर्ट व टाय् असा त्यांचा पोषाख होता. त्या दिवशीं पहिला अर्धा तास त्यांच्या विद्यार्थ्यांची 'टेस्ट एक्झॅमिनेशन' होती. वर्गांत १४ मुली व ४ मुलगे असे एकूण १८ विद्यार्थी होते. वर्गांत आल्याबरोबर प्रोफेसरांनीं विद्यार्थ्यांना सायक्लोस्टाइल केलेल्या प्रश्नपत्रिका वाटल्या. आणि आपल्याला आश्चर्य वाटेल, पण प्रत्येक प्रश्नाचा 'नेचर'हि त्यांनीं सांगितला. विद्यार्थ्यांनीं स्वतःच्या फाइलमधलेच दोन मोठे 'शीट्स्' घेऊन प्रश्नांचीं उत्तरं लिहायला सुरुवात केली. विद्यार्थ्यांचं लेखन चालू होतांच प्रोफेसर आल्मक्विस्ट माझ्या शेजारीं येऊन बसले आणि अगदीं हलक्या आवाजांत माझ्याशीं गप्पा मारूं लागले. गप्पा मारतां-मारतां त्यांनीं माझी बरीच माहिती विचारून घेतली, आणि कांहीं चांगल्या इंग्रजी पुस्तकांचा मला परिचय करून दिला. त्यांत 'Twelve American Writers' ( संपादक—W. M. Gibson व George Arms ), 'The American Colonial Mind and the Classical Tradition' ( लेखक— Richard M. Gummere ), Henry B. Parkesचं 'The American Experience' इत्यादि पुस्तकं होतीं.

विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू होऊन पंचवीस मिनिटं होतांच प्रो. आल्मक्विस्टनीं 'वेळ थोडा उरलाय्, लवकर आटपा'— अशी सूचना केली. त्याबरोबर विद्यार्थि-विद्यार्थिनींनीं आणखी थोडा वेळ मिळण्यासाठीं आपल्याकडच्या विद्यार्थ्यांसारखाच आरडाओरडा केला. मग साहजिकच प्रोफेसरांनीं दया दाखवून परीक्षेचा वेळ थोडा वाढवून दिला.

परीक्षा संपतांच प्रो. आल्मक्विस्टनीं त्यांच्या विद्यार्थ्यांना माझा परिचय करून दिला. माझ्या नांवाचा उच्चार त्यांना नीट करतां येईना. तेव्हां त्यांनीं खडू देऊन फळ्यावर माझं नांव लिहायला मला सांगितलं, आणि त्याचा योग्य उच्चारहि पुन्हा एकदां मला विचारला. नंतर शिकवायला सुरुवात करण्यापूर्वीं

समुद्रांत बुडून गेलेला दिसला. पण दूरवर क्षितिजाकडे नजर टाकली तर हजारों-लाखों दिव्यांच्या रांगांनीं तें सारं उजळून निघालं होतं. रात्रीचा दिवस करणारे न्यूयॉर्क शहरांतले ते दिवे आम्हांला मॉंट्क्लेअरमधून दिसत होते. तें सारं दृश्यच विलक्षण आकर्षक होतं. रात्रीच्या त्या शांत वेळीं कांहीं क्षण तिथून हलावंसंच वाटेना. . . . .

दुसऱ्या दिवसापासून आमचा कॉलेजचा दैनंदिन जीवनक्रम सुरू झाला. सकाळीं ब्रेकफास्ट झाल्यावर साधारणपणं नऊच्या सुमाराला कॉलेजच्या कोणत्याहि वर्गात आम्ही जाऊन बसत होतों. आमच्या आगमनाची वार्ता सर्व प्रोफेसर्सना व विद्यार्थ्यांना आधीच कळवलेली असल्यामुळं, आणि आमच्या विशिष्ट रंगामुळं आम्हीच ते सुप्रसिद्ध भारतीय पाहुणे, हें अमेरिकनांच्या झटकन् लक्षांत येई. त्यामुळं प्रत्येक वर्गांत आमचं स्वागत होई. अर्थात् आम्ही सर्वजण एकदम एका वर्गांत कधींच जात नव्हतों. आमच्यापैकीं ज्याला ज्या विषयांत ‘ इंटरेस्ट ’ वाटत होता तो त्या विषयाच्या तासाला त्या त्या वर्गांत जाऊन बसत होता. अर्थात् एवढ्या थोड्या मुक्कामांत कोणत्याहि विषयाचा पद्धतशीर अभ्यास करणं आम्हांला शक्यच नव्हतं. आमच्याकडून तशी अपेक्षाहि नव्हती. त्यामुळं अमेरिकेंतल्या कॉलेजांमधें प्रोफेसर्स कसे शिकवतात, प्रोफेसर्स व विद्यार्थी यांच्यामधील संबंध वर्गांत कसे असतात, वर्गाबाहेर कसे असतात, वर्गांतलं एकंदर वातावरण कसं असतं, अशा गोष्टींचं निरीक्षण करण्यावरच आमचा विशेष भर होता.

पहिल्या दिवशीं मी प्रो. जी. ओ. हर्टूल ( G. O. Hourtoule ) यांच्या वर्गांत गेलों. बरोबर सकाळीं साडेनऊला त्यांचा तास सुरू झाला. पण तास सुरू होण्याची आपल्याकडच्यासारखी कॉलेजची घंटा मात्र ऐकायला आली नाहीं. बरोबर ठराविक वेळेला विद्यार्थी वर्गात येत. त्यांच्या पाठोपाठ प्रोफेसर वर्गांत शिरत. त्यांना घंटेची गरज भासत नसावी. कारण प्रत्येक वर्गांत प्रोफेसर्सना दिसेल अशा ठिकाणीं भिंतीवरचं मोठं घड्याळ लावलेलं पुढं मला दिसून आलं.

प्रो. डॉ. हर्टूल यांनीं निळसर रंगाचा पूर्ण सूट घातलेला होता. अर्थात् टायहि होताच. पण विद्यार्थ्यांचे पोषाख मात्र मला बरेच अनौपचारिक वाटले. त्या वेळीं त्यांचं ‘ समर सेशन चालू असल्यामुळं नेहेमीपेक्षां थोडेसे कमी विद्यार्थी वर्गात होते. त्या दिवशीं वर्गांत १८ मुली व ७ मुलगे असे एकूण २५ विद्यार्थी होते. प्रोफेसर अधूनमधून विद्यार्थ्यांना प्रश्न विचारीत होते. आणि विद्यार्थी बसूनच त्यांचीं उत्तरं देत होते. स्वतःला उत्तर येत असल्यास विद्यार्थी हात वरती करीत असत. प्रोफेसरना वर्गांतल्या सर्व विद्यार्थ्यांचीं नांवं माहीत होतीं, आणि त्यांना ते त्यांच्या पहिल्या नांवानं ( First Name ) संबोधीत होते. प्रोफेसर हर्टूल यांची व्याख्यान देण्याची पद्धति अनौपचारिकपणे गप्पा मारण्यासारखी होती. मला ती फार आवडली.

अधूनमधून ते हास्यविनोद करीत, आणि भरपूर विषयांतरहि करीत. प्रो. हर्टूल हे 'सोशल स्टडीज्'चे 'अ‍ॅसोसिएट प्रोफेसर' होते. त्या वेळीं अमेरिकेंत जॉन्सन आणि बॅरी गोल्डवॉटर यांची निवडणूक–मोहीम जोरांत चालू होती. त्यामुळं साहजिकच प्रोफेसर हर्टूल हे चालू घडीच्या राजकारणावर चुरचुरीत टीका करीत होते.


त्याच दिवशीं सकाळीं साडेअकरा ते साडेबारा मी प्रो. जे. ए. आल्मक्विस्ट ( J. A. Almquist ) यांच्या वर्गांत वसलों. प्रो. आल्मक्विस्ट हे इंग्लिशचे 'अ‍ॅसोसिएट प्रोफेसर' होते. 'अमेरिकन लिटरेचर' हा त्यांचा खास विषय होता. मी गेलो तो वर्ग त्यांच्याकडच्या M. A. च्या पहिल्या वर्षाचा होता. प्रोफेसर आल्मक्विस्ट हे पन्नाशीचे, भरदार बांध्याचे, उंच गृहस्थ होते. त्यांच्या अंगांत कोट नव्हता. गडद रंगाची पॅंट, पांढरा शर्ट व टाय् असा त्यांचा पोषाख होता. त्या दिवशीं पहिला अर्धा तास त्यांच्या विद्यार्थ्यांची 'टेस्ट एक्झॅमिनेशन' होती. वर्गांत १४ मुली व ४ मुलगे असे एकूण १८ विद्यार्थी होते. वर्गांत आल्याबरोबर प्रोफेसरांनीं विद्यार्थ्यांना सायक्लोस्टाइल केलेल्या प्रश्नपत्रिका वाटल्या. आणि आपल्याला आश्चर्य वाटेल, पण प्रत्येक प्रश्नाचा 'नेचर'हि त्यांनीं सांगितला. विद्यार्थ्यांनीं स्वतःच्या फाइलमधलेच दोन मोठे 'शीट्स्' घेऊन प्रश्नांचीं उत्तरं लिहायला सुरुवात केली. विद्यार्थ्यांचं लेखन चालू होतांच प्रोफेसर आल्मक्विस्ट माझ्या शेजारीं येऊन बसले आणि अगदीं हलक्या आवाजांत माझ्याशीं गप्पा मारूं लागले. गप्पा मारतां-मारतां त्यांनीं माझी बरीच माहिती विचारून घेतली, आणि कांहीं चांगल्या इंग्रजी पुस्तकांचा मला परिचय करून दिला. त्यांत 'Twelve American Writers' ( संपादक—W. M. Gibson व George Arms ), 'The American Colonial Mind and the Classical Tradition' ( लेखक— Richard M. Gummere ), Henry B. Parkesचं 'The American Experience' इत्यादि पुस्तकं होतीं.

विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू होऊन पंचवीस मिनिटं होतांच प्रो. आल्मक्विस्टनीं 'वेळ थोडा उरलाय्, लवकर आटपा'— अशी सूचना केली. त्याबरोबर विद्यार्थि-विद्यार्थिनींनीं आणखी थोडा वेळ मिळण्यासाठीं आपल्याकडच्या विद्यार्थ्यांसारखाच आरडाओरडा केला. मग साहजिकच प्रोफेसरांनीं दया दाखवून परीक्षेचा वेळ थोडा वाढवून दिला.

परीक्षा संपतांच प्रो. आल्मक्विस्टनीं त्यांच्या विद्यार्थ्यांना माझा परिचय करून दिला. माझ्या नांवाचा उच्चार त्यांना नीट करतां येईना. तेव्हां त्यांनीं खडू देऊन फळ्यावर माझं नांव लिहायला मला सांगितलं, आणि त्याचा योग्य उच्चारहि पुन्हा एकदां मला विचारला. नंतर शिकवायला सुरुवात करण्यापूर्वीं

त्यांनीं विद्यार्थ्यांशी प्रथम वैयक्तिक स्वरुपाच्या गप्पा मारल्या. ह्या गप्पा चालू असतांना वर्गांत सर्वत्र ते फिरत होते. मध्येंच त्यांच्या एका विद्यार्थिनीनं त्यांना एक गमतीदार प्रश्न विचारला. त्यावरोबर त्यांनीं तिच्या डोक्याला हात लावून तिचं डोकं हलवून तसंच गमतीचं उत्तर दिलं. प्रोफेसर आणि विद्यार्थिनी यांच्या नात्यांतला हा अनौपचारिक प्रेमळपणा खास ' अमेरिकन ' होता यांत शंकाच नाहीं ! पण प्रोफेसर आल्मक्विस्ट यांच्या वर्गांतलं तें अनौपचारिक खेळीमेळीचं वातावरण पाहून माझ्या मनांत सहज विचार आला, आपल्याकडच्या एखाद्या प्रोफेसरनं असा खेळकरपणा दाखवला तर त्याचं केवढं मोठं ' लीळाचरित्र ' होईल ! तरुण प्रोफेसरची तर असं कांहीं करण्याची हिंमतच होणार नाहीं. पण रिटायर्ड व्हायला आलेले वयोवृद्ध प्रोफेसरहि आपल्या नातीसारख्या असलेल्या विद्यार्थिनीच्या मस्तकाला (सुद्धां ) स्पर्श करण्यापूर्वीं शंभरदां विचार करतील ! . . . .वास्तविक गुरुशिष्यांचं नातं हें आपण पवित्र मानतों. त्या नात्याच्या संदर्भांत एखादा अनुचित विचार चुकूनहि कुणाच्याच मनांत येतां कामा नये ! पण अखेर ' पूर्व ' ती पूर्वच, आणि ' पश्चिम ' ती पश्चिमच ! मानवी जीवनांतल्या घटनांकडे वघण्याचा दोघांचाहि दृष्टिकोन मूलतःच वेगळा आहे हेंच खरं !

' माँट्क्लेअर स्टेट कॉलेज 'च्या नवीनच बांधलेल्या ' लायब्ररी विल्डिंग '–मधले नि ' म्युझिक विल्डिंग 'मधले सर्व वर्ग एअरकंडिशन्ड होते. वर्गांतले ' ब्लॅक बोर्डस् 'सुद्धां खूपच मोठे म्हणजे सुमारं २० फूट × ५ फूट आकाराचे होते. बऱ्याच वर्गांच्या एका वाजूच्या भिंती कांचेच्या होत्या. वर्ग चालू असतांना सहज बाहेर नजर टाकली तर डोळ्यांना कसा आल्हाद वाटायचा ! कारण अमेरिकनांनीं मोठमोठाल्या इमारती बांधल्या खऱ्या; पण त्यांच्या आसपासच्या परिसरांतल्या निसर्गाच्या सौंदर्याची जोपासना करायला मात्र ते विसरले नाहींत. कारण नसतांना उगीचच मोठमोठे वृक्ष तोडण्याऐवजीं नवनवीन प्रकारच्या वृक्षांची लागवड करणं अमेरिकनांना जास्त आवडतं. घरं बांधतांना अगर कॉलेजांच्या इमारती बांधतांना-सुद्धां जमिनीचे नैसर्गिक चढउतार बहुधा ते आहे तसेच कायम ठेवतात. त्यामुळंच घराची एक बाजू टेकडीसारख्या उंचवटयावर आणि दुसरी रस्त्याच्या सपाट पातळीवर असलेलीं घरंहि तिथं मला पहायला मिळालीं. ' माँट्क्लेअर ' कॉलेजांत एका ठिकाणी जमिनीचा बराच चढउतार होता. तो खणून काढण्याऐवजीं त्या जागी त्यांनीं पायऱ्या बांधल्या. जमिनीच्या मोकळ्या तुकड्यांमधें शक्य तिथं हिरवंगार गवतच लावलेलं आपल्याला आढळतं. वर्गातल्या खिडकींतून अगर कांचेच्या भिंतींतून बाहेर नजर टाकली कीं पलिकडच्या हिरव्यागार गवतावर एकीकडे वह्यापुस्तकं फेंकून पाय लांब करून अगर आडवं लोळून एकमेकांशीं मन-मोकळेपणानं गप्पा मारणारे आरोग्यसंपन्न अमेरिकन तरुण विद्यार्थि–विद्यार्थिनी



**परकीय अपरिचिताला जीव लावणारे हें तें ५७ नंबरचें घर !**

दिसायचे. निसर्गाच्या सान्निध्यांत मोकळ्या हवेंत श्वास घेणाऱ्या अशा तरुणांच्या मनांची निकोप वाढ न झाली तरच नवल !

आपण कोणत्या वातावरणांत काम करतों, कुठं रहातों, कशा पद्धतीनं रहातों यावरसुद्धां माणसाचं मानसिक आरोग्य अवलंबून असतं, हें सत्य अमेरिकनांना पुरेपूर पटलेलं आहे. आणि म्हणूनच कोणत्याहि इमारती, कारखाने, घरं बांधतांना ते सोयींइतकंच वातावरणाच्या सौंदर्याकडेहि लक्ष देतात. मोठमोठ्या गर्दीच्या शहरांमधें या बाबतींत त्यांना कित्येकदां कांहीं अडचणी येतात. पण त्याची सारी कसर लहान गांवांत ते भरून काढतात. आतां ह्या मॉंट्क्लेअर गांवाचंच पहा ना ! न्यूयॉर्कसारख्या शहरापासून अवघे बाराचौदा मैल दूर असलेल्या ह्या गांवचे रस्ते, घरं, फार काय–– तिथलं स्मशानसुद्धां पहाण्यासारखं आहे.

मॉंट्क्लेअरच्या बहुतेक सगळ्या रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना मोठमोठे वृक्ष आपल्या पर्णसंभारानं छाया धरून उभे असलेले मला आढळले. अशा गर्द छायांच्या रस्त्यांमधून पायीं चालण्यांतसुद्धां फार मोठा आनंद असतो. मॉंट्क्लेअरचीं घरं-सुद्धां तितकींच सुंदर ! अनेक ठिकाणीं मुख्य रस्त्यांना लागूनच असलेल्या उंच टेकाडांवर छानदार बंगले बांधलेले मला दिसले. त्या बंगल्यांच्या परिसरांत सुंदर बगीचे आणि त्यांतहि भरपूर वाढलेले डेरेदार वृक्ष असायचेच. कांहीं बंगल्यांची बांधणी तर इतकी आंखीवरेखीव असायची कीं ते बंगले चित्रांतले किंवा चित्रपटांतलेच वाटायचे ! आमच्या 'मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'च्या बाजूनं रेल्वेलाइनीकडे जाणारा रस्ता मला विशेष आवडायचा. कारण त्या रस्त्यावरची घरं एकापेक्षां एक सुंदर होतीं. त्यांतहि ५७ नंबरचं एक टुमदार घर फार सुरेख होतं. येतां जातां मी तें पहात असे. आणि मनांत म्हणत असें : 'ह्या निवान्त जागीं असलेल्या ह्या सुंदर घरांत रहाणारा माणूस किती भाग्यवान् !' शेवटीं एका संध्याकाळीं मीं त्या देखण्या घराचा फोटो घेऊन टाकला तेव्हां कुठं मला समाधान वाटलं ! फोटो

घेतांना मनांत आलं : माणसांवर माणसं प्रेम करतात. पण एका अनोळखी देशांतल्या अनोळखी घरावरसुद्धां माणसाचा जीव जडावा ? कोणते ऋणानुबंध आहेत हे ? . . . .

मॉंट्क्लेअरला आम्ही आल्याच्या दुसऱ्याच दिवशीं प्रो.डॉ. हर्टूल यांनीं आमच्या 'ग्रुप'साठीं गप्पा मारण्याचा अन् प्रश्नोत्तरांचा एक छोटासा कार्यक्रम आयोजित केला होता. आम्हांला काळजी मुख्यत: अमेरिकेंतल्या त्या वेळीं लवकरच होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकांची होती. जॉन्सनसाहेब निवडून आले तर फारशी चिंता नव्हती. पण बॅरी गोल्डवॉटर निवडून आला असता तर त्यानं त्याच्या कडव्या राष्ट्रीय हिताच्या दृष्टिकोनामुळं पहिल्याप्रथम कृतघ्न 'अविकसित' देशांची मदत बंद केली असती. त्याच्या निवडणूक-प्रचाराच्या मोहिमेंत अनेकदां तो तसं म्हणालाहि होता. वरं झालं, बॅरीचा पराभव झाला, आणि जॉन्सनसाहेब त्या वेळीं निवडून आले ! नाहींतर अमेरिकन मदतीचा झरा आटल्यामुळं आपल्यावर उगीचच प्रत्येक बाबतींत 'स्वयंपूर्ण' होण्याची आपत्ति ( ! ) ओढवली असती ! अर्थात् आपल्याला स्वयंपूर्ण होण्यासाठीं कष्ट करायला लावण्याचा बॅरीचा दुष्ट डाव आपण नक्की उधळून लावला असता ! खुशाल मदत बंद करा ! धाक कुणाला दाखवतां ? जगांत काय तुम्ही फक्त एकटेच आम्हांला मदत देणारे आहांत असं समजतां काय ? नाहीं मदत दिलीत तर आमचा रशिया आहेच कीं ! . . . हिंदी–रूसी भाई– भाई !

प्रो. डॉ. हर्टूल यांनीं गोल्डवॉटरच्या धोरणावर भाष्य केल्यावर आमच्यापैकीं एकानं अमेरिकेंतल्या निग्रोंबद्दलचा एक प्रश्न त्यांना विचारला, आणि 'कसं बरोबर पकडलं ! आतां बोला !'— अशा अर्थाचा चेहेरा केला. त्या प्रश्नासंबंधीं बोलतांना प्रोफेसर म्हणाले, "पुरेसं शिक्षण नसतांनाहि प्रत्येक क्षेत्रांत निग्रोज्‌ना नोकऱ्या हव्या असतात.— केवळ ते 'निग्रो' आहेत म्हणून ! व्यक्तिश: मला हें मान्य नाहीं ! I would certainly disapprove of granting them special privileges when they are not qualified. At the most they can fight for the educational opportunities, but they should'nt have any privileges when they are not qualified."

प्रो. डॉ. हर्टूल आपले विचार मोठ्या आत्मविश्वासानं ठांसून मांडीत होते. त्या वेळीं माझ्या मनांत मात्र आपल्याकडच्या विशिष्ट जातीसाठीं ठराविक 'राखीव जागा' राखून ठेवण्याच्या धोरणाचे परिणाम घोळत होते. एखाद्या व्यक्तीचं शिक्षण किती कां कमी असेना, तिची पात्रता कशी कां असेना, त्या व्यक्तीला आपल्याकडे अधिकाराच्या जागा मिळू शकतात.— केवळ ती व्यक्ति विशिष्ट जातीची आहे म्हणून ! सर्व प्रकारच्या शैक्षणिक सवलती देऊनहि जर मागासलेल्या लोकांनी आपली पात्रता वाढवली नाहीं तर तो दोष कुणाचा ? एखाद्या व्यक्तीची जात

किंवा धर्म कोणताहि असो, राज्ययंत्रणेंतील अधिकाराच्या जागा सुशिक्षित, सत्पात्र व्यक्तींनाच द्यायला हव्यात. नेहरूंचं लाडकं ‘ सत्तेचं विकेंद्रीकरण ’ (!) करण्याचं स्वप्न प्रत्यक्षांत आणतांना अडाणी लोकांच्या हातांत कारभाराचीं सूत्रं जाणार नाहींत याची दक्षता घ्यायलाच हवी. नाहींतर एवढ्या मोठ्या अवाढव्य राष्ट्राच्या राज्ययंत्रणेचं रूपांतर एखाद्या ‘ जिल्हापरिषदें ’त न्हायला वेळ लागणार नाहीं ! . . .


निग्रोंच्या प्रश्नावर भाष्य केल्यावर प्रो. हर्टूलनीं, ‘ कश्मीरमधें सार्वमत घेण्याच्या कै. नेहरूंच्या घोषणेचं पुढं काय झालं ’ यावद्दल आपलेपणानं चौकशी केली, आणि ‘ आतां बोला ’ अशा अर्थाचा चेहेरा न करतां निर्विकारपणं ते आमच्या उत्तराची वाट पाहूं लागले ! कश्मीरच्या प्रश्नांत आतां बोलण्यासारखं कांहीं राहिलंय् का ? . . . . पण कांहीं असलं तरी ‘ कश्मीर आमचंच आहे ’ असं आम्हीं त्यांना ठांसून सांगितलं ! आमचा आवेश पाहून प्रो. डॉ. हर्टूल नुसते हंसले.

त्याच दिवशीं रात्रीं मिस्टर अँड मिसेस् रुंडेन यांनीं आम्हांला ‘ सेडर ग्रोव्ह ’ला आपल्या गाडीनं ‘ माय् फेअर लेडी ’ हें नाटक बघायला नेलं. नाटक ‘ मिडोब्रुक डिनर थिएटर ’मधें होतं. आमच्याबरोबर कु. रुंडेन, मिस्टर मॅक्व्हेन, मिस्टर अँड मिसेस् ब्लँटन् हींहि आलीं होतीं. आम्ही रात्रीं आठला माँट्क्लेअरहून निघालों त्या वेळीं संध्याकाळीं सहा वाजण्याच्या सुमारास असावा इतका उजेड सर्वत्र होता. मिसेस् ब्लँटन ह्या तिथल्या संगीतिकांमधें काम करणाऱ्या प्रसिद्ध गायिका होत्या. तेव्हां त्या दिसायला सुंदर होत्या अन् त्यांचा आवाज फार गोड होता हें वेगळं सांगायला नकोच ! त्यांनीं रंगभूमीसाठीं घेतलेलं नांव ‘ Matisse ’ असं होतं. त्याच नांवानं त्या ओळखल्या जात होत्या. ‘ माय् फेअर लेडी ’च्या एका अंकानंतर त्यांनीं त्या नाटकाचे संगीत-दिग्दर्शक फ्रेडरिक लोवे ( Frederick Loewe ) यांची माझ्याशीं ओळख करून दिली. ‘ भारतांतला एक प्रसिद्ध लेखक आज आपल्याला भेटला ’ याबद्दल त्यांनीं त्यांना झालेला फार मोठा आनंद प्रकट केला, तेव्हां मात्र आपणहि त्या प्रसिद्ध लेखकाला भेटावं आणि असाच आनंद मिळवावा या हेतूनं मी शोधक नजरेनं इकडेतिकडे पाहूं लागलों. पण मला असा कुणी मोठा लेखक जवळपास दिसला नाहीं, तेव्हां फ्रेडरिकसाहेबांच्या आनंदाचं मूल-कारण मीच असेन, असा मीं तर्क केला. आपल्याकडे असं कुणीं कुणाला मोठं मानायची आणि तसं बोलून दाखवण्याची फारशी पद्धत नसल्यामुळं माझा गैरसमज झाला होता ! तो दूर होतांच मलाहि त्यांच्या भेटीनं झालेला आनंद मीं प्रकट केला. नंतर थोड्या गप्पा मारून ते मला ‘ विंग ’मधें घेऊन गेले, आणि तिथं असलेल्या नाटकाच्या निर्मात्याची त्यांनीं ओळख करून दिली.

‘ माँट्क्लेअर स्टेट कॉलेज ’च्या नवीनच बांधलेल्या इमारतींमधें त्यांची लायब्ररीची इमारत मला फार आवडली. ‘ हॅरी स्प्रेग लायब्ररी ’ची ही तीनमजली


इमारत १९६३ सालीं बांधली होती. ही लायब्ररी संपूर्ण 'एअर कंडिशन्ड' असून तिच्या बांधकामाला एकूण १२५०००० डॉलर्स खर्च आलेला होता. लायब्ररींत एकूण ८५००० पुस्तकं होतीं, आणि ५५० वर नियतकालिकं तिथं नियमितपणानं येत होतीं.

ता. १६ व १७ जुलैला लागोपाट दोन दिवस रोज पांचसहा तास मी लायब्ररींत जाऊन बसत होतों. लायब्ररींतल्या पुस्तकांची, नियतकालिकांची व तिथल्या एकंदर व्यवस्थेची मला माहिती मिळवायची होती. त्या दोन दिवसांत मला सर्व नियतकालिकांची बरीचशी माहिती हातानं लिहून घेतांना पाहून लायब्रेरियन डॉ. विल्यम ए. विल्यम्सन् स्वत माझ्याजवळ आले, आणि त्यांच्या लायब्ररींतील सर्व नियतकालिकांची एक 'सायक्लोस्टाइल्ड लिस्ट' त्यांनी मला दिली. तिच्या-वरून किती भिन्नभिन्न विषयांचीं शेंकडों नियतकालिकं जगाच्या कानाकोपऱ्यांतून



'हॅरी स्प्रेग लायब्ररी'ची वातानुकूलित इमारत. सर्व सोयींनीं व अद्ययावत् ज्ञानसाधनांनीं युक्त.— फक्त कंदिलाची सोय सोडून !

तिथं येत होतीं याची मला कल्पना आली. 'एज्युकेशन', 'सायकॉलॉजी', 'बिझनेस् एज्युकेशन', 'इंग्लिश', 'फाइन आर्ट्स्', 'जिऑग्रफी', 'होम इकॉनॉमिक्स', 'इंडस्ट्रिअल आर्ट्स्', 'लायब्ररी सायन्स', 'मॅथेमेटिक्स', 'सायन्स', 'हिस्टरी अँड सोशल सायन्सेस्', 'स्पीच अँड ड्रामा', 'फिजिकल एज्युकेशन' इत्यादि विशेष वर्गीकरणांखेरीज 'जनरल पिरिऑडिकल्स्' ह्या शीर्षकाखालीहि अनेक नियतकालिकांची नांवं होती. ती वाचून प्रत्येक विषयांतलं अत्याधुनिक ज्ञान आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत त्वरित पोंचावं ह्यासाठी कॉलेजनं किती पैसा खर्च केला असावा त्याची कल्पना येत होती. विद्यार्थ्यांनीं मोकळेपणानं लायब्ररींत सर्वत्र फिरून आपल्याला हवीं असलेलीं सर्व पुस्तकं-मासिकं शेल्फमधून स्वतः काढून आणायचीं व लायब्ररी-क्लार्कच्या 'डेस्क'पाशीं त्याची नोंद करून तीं न्यायचीं, अशी पद्धत तिथं होती. एखादं पुस्तक झटकन् सांपडलं नाहीं तर मदत करायला



'माँट्क्लेअर' कॉलेजचें ऑडिटोरिअम. आयत्या वेळच्या धांवपळी करून नाट्यप्रयोगाची वेळ मारून नेण्याचे प्रसंग येथेंहि कौशल्यानें पार पडतात !

तिथं लायब्ररीच्या स्टाफपैकीं कुणीतरी असायचंच. कोणत्याहि ज्ञानाच्या शाखेंत पुढं संशोधन करायचं झाल्यास आपल्याला हवे ते संदर्भग्रंथ स्वतः शोधण्याची विद्यार्थ्यांना संवय व्हावी, हा या पद्धतीचा हेतु होता.

ज्यांना ग्रंथ किंवा नियतकालिकं घरीं न्यायचीं नसतील त्यांच्यासाठीं पहिल्या दर्जाच्या 'कुशन चेअर्स' पलिकडच्याच दालनांत ठेवलेल्या होत्या. वातानुकूलित वातावरणांत सुखद सुखासनांवर बसून विद्यार्थि-विद्यार्थिनींनीं खुशाल मनसोक्तपणें ज्ञानसाधना करावी ! अर्थात् अशा ऐषआरामी वातावरणांत खरी 'ज्ञानसाधना' होऊंच शकणार नाहीं असं आपल्याला वाटणं साहजिक आहे ! कारण रस्त्यावरच्या म्युनिसिपालिटीच्या कंदिलाखालीं बसून अभ्यास करणारीं मुलंच पुढं 'मोठीं' होतात, असा आपला समज ! पण जीवनांतले सर्व सुखोपभोग भोगण्याचीं नवीननवीन साधनं ज्यांनीं शोधून काढलीं तेच आतां वैज्ञानिक प्रगतीचं परमोच्च शिखर गांठून चंद्रावर झेंप घेत आहेत, ही गोष्ट विसरतां कामा नये ! गरिबी हा गुन्हा खासच नव्हे ! पण दारिद्र्याला ध्येयवादाचा वेगळा मुलामा चढवून आपल्या सांस्कृतिक श्रेष्ठतेच्या गप्पा मारण्याचा मोह आतां तरी आपण आवरता घ्यायला हवा ! . . .

दुसऱ्या दिवशीं लायब्ररीच्या 'रेफरन्स लायब्रेरियन' मिसेस् मेरी हेल्मन् यांनीं सुमारं तासभर माझ्याबरोबर फिरून लायब्ररीच्या सर्व विभागांची व तिथल्या कार्यपद्धतीची मला माहिती करून दिली. 'मायक्रोफिल्म सेक्शन'मधें अगदीं लहान मायक्रोफिल्मवर घेतलेलीं चित्रं प्रत्यक्ष मुळांतल्या मोठ्या आकारांत कशीं 'प्रोजेक्ट' करता येतात त्याचंहि प्रात्यक्षिक त्यांनीं 'न्यूयॉर्क टाइम्स'ची मायक्रोफिल्म मशिनवर बसवून करून दाखवलं. प्राचीन हस्तलिखितं किंवा महत्त्वाच्या वृत्तपत्रांचे सर्व जुने अंक मूळ स्वरूपांत जतन करून ठेवण्यासाठीं आजकाल तिकडे 'मायक्रोफिल्मिंग'चा फार मोठ्या प्रमाणांत अवलंब करण्यांत येतो.

लायब्ररीमधला आणखीहि एक विभाग विशेष प्रेक्षणीय आहे. न्यूयॉर्कचे डॉ ओ. के. कोस्ला यांनीं सुमारं १०० गाजलेल्या चित्रकृतींचा संग्रह १९६२ सालीं कॉलेजच्या लायब्ररीला भेट म्हणून दिला. कॉलेजच्या विद्यार्थ्यांप्रमाणंच मॉन्ट्क्लेअरच्या नागरिकांनाहि केव्हांहि पहाण्यासाठीं हा कलाकृतींचा संग्रह मोकळा असावा, एवढीच त्यांची अट होती. फ्रॅन्सिस्को बॅसॅनो, मायकेल अँजेलो, कार्लो डॉल्सी, पीटर पॉल, रुबेन्स वगैरे प्रसिद्ध चित्रकारांनीं काढलेलीं बायबलमधील प्रसंगांचीं चित्रं, हें ह्या चित्रसंग्रहाचं खास आकर्षण आहे. 'ओल्ड मास्टर्स अँड द बायबल' असं नांव ह्या चित्रसंग्रहाच्या ह्या विभागाला दिलेलं आहे.

'स्प्रेग लायब्ररीं'त प्रवेश करण्याच्या आंतल्या मुख्य दारांत पोलादी दांड्यांचीं दोन फिरतीं दारं बसवलेलीं आहेत. एक दार आंत जाण्यासाठी व दुसरं बाहेर

येण्यासाठीं. आंत जाण्याच्या दारानं बाहेर येतां येत नाहीं अन् बाहेर जाण्याच्या दारानं आंत येतां येत नाहीं. तसा प्रयत्न केला तर ती पोलादी दारं आपोआप बंद होतात. दारांच्या बाजूच्या उभ्या खांबांमधें एक यंत्र बसवलेलं आहे. त्यामुळं दिवसभरांत किती लोक आंत गेले व किती बाहेर आले याची आपोआप आंकड्यांमधें नोंद होते. आंत गेलेल्या लोकांचा आंकडा बाहेर आलेल्या लोकांच्या आंकड्यांशीं लायब्ररी बंद करतांना जुळलाच पाहिजे. ह्या व्यवस्थेमुळं रात्रीं लायब्ररी बंद करतांना आतमधें कुणी चकून अगर चोरीच्या किंवा अन्य उद्देशानं रहाण्याची शक्यताच नाहींशी होते.

१९६४ सालीं 'माँट्क्लेअर स्टेट कॉलेजां'त २२०० 'अंडर-ग्रॅज्युएट' विभागांतले विद्यार्थी होते; व १५०० 'ग्रॅज्युएट' विभागांतले विद्यार्थी तिथं M.A.चा अभ्यास करीत होते. शिवाय कॉलेजच्या 'डेमॉन्स्ट्रेशन हायस्कूल'मधें असलेले १८० विद्यार्थी वेगळेच. तेव्हां दररोज शेंकडों विद्यार्थी लायब्ररींत जाणार-येणार असल्यानं अशा प्रकारच्या दारांची योजना सुरक्षिततेसाठीं करणं साहजिकच होतं.

कॉलेजच्या 'फाइन आर्ट्स्' विभागांत त्या वेळी सुमारं पावणे-दोनशें विद्यार्थी शिक्षण घेत होते. हे सर्व विद्यार्थी त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर 'न्यू जर्सी' मधल्या कुठल्या ना कुठल्यातरी हायस्कूल्समधून 'फाइन आर्ट्स्'चे शिक्षक म्हणून आतां काम करीत असतील. ह्या 'फाइन आर्ट्स्'च्या विद्यार्थ्यांसाठीं सुसज्ज 'म्युझिक बिल्डिंग' खास पद्धतीनं बांधलेली आहे. 'स्पीच अँड ड्रामा' हे विषय तिथं शिकवले जात असल्यानं नाटकांचे, एकांकिकांचे प्रयोग करून पहाण्यासाठीं एक अत्याधुनिक पद्धतीचं 'एअर कंडिशन्ड' 'ऑडिटोरिअम'हि होतंच. एक दिवशीं हें नाट्यगृह रिकामं असतांना आंतमधें सगळीकडे फिरून मीं त्याची माहिती करून घेतली. एकूण १००८ खुर्च्यांची त्या नाट्यगृहांत सोय करण्यांत आलेली होती. सर्वच खुर्च्या आपल्याकडच्या पहिल्या दर्जाच्या चित्रपटगृहांत असतात तशा आरामशीर होत्या.

स्टेजची लांबी ४० फूट, रुंदी ३९ फूट आणि उंची २० फूट होती. खुद्द रंगमंचाच्या उपयोगासाठी ५० दिवे होते आणि इतर ठिकाणीं प्रेक्षागारांत २५ दिवे होते. ह्याच नाट्यगृहांत वेळप्रसंगी पूर्ण लांबीचे चित्रपटहि दाखवतां येण्याची सोय केलेली होती. 'साउंड कंट्रोल' आणि 'लाइटिंग कंट्रोल' यांच्यासाठीं स्वतंत्र खोल्या होत्या. नाटकांत काम करणाऱ्या नटांसाठीं प्रेक्षागाराखालच्या तळघरांत खोल्या होत्या. ह्या सुंदर नाट्यगृहांत नाट्यप्रयोग पहाण्याचा योग मला लवकरच आला.

चारच दिवसांनी म्हणजे २१ जुलै ६४ ला रात्रीं ८ ते ११।। ह्या वेळांत कॉलेजच्याच 'डेमॉन्स्ट्रेशन हायस्कूल'च्या विद्यार्थिनींनीं सादर केलेल्या चार एकांकिका बघायला आम्ही गेलों.

(i) 'Twelve Angry Women' — लेखक : Reginald Rose

(ii) 'A Young Lady of Property' — लेखक : Horton Foote.

(iii) 'Everyman Today' — लेखक · Walter Sorell.

(iv) 'Arsenic and Old Lace' — लेखक : Joseph Kessering.

— या चारहि एकांकिका विद्यार्थ्यांनीच दि'दर्शित केल्या होत्या; पण त्यांचा दर्जा खूपच वाखाणण्यासारखा होता. ह्या एकांकिका बघतांना एक सांगण्यासारखा प्रसंग घडला.

कोणत्यातरी एका एकांकिकेंत चौदापंधरा वर्षांच्या मुलीचं एक पात्र होतं. ह्या मुलीला वाचनाचं विलक्षण वेड असलेलं नाटककारानं दाखवलं होतं. जेवतांना खातांना, कुणाशींहि बोलतांना ह्या मुलीच्या हातांत आपलं पुस्तक असायचं. अतिवाचनानं लहान वयांतच त्या मुलीला चष्मा लागल्याचं दाखवण्यांत आलं होतं. कांहीं पात्रांच्या बोलण्यांत तिच्या वाचनाच्या वेडासंबंधीची कांहीं वाक्यंहि होतीं. आपली ही भूमिका ती मुलगी खूपच तन्मयतेनं पार पाडीत होती. अखंडपणं पुस्तकांत डोकं खुपसण्याच्या अभिनयाचं 'बेअरिंग' त्या मुलीनं फार सुंदर रीतीनं अखेरपर्यंत संभाळलं होतं. त्या मलीच्या अभिनयाचं मीं माझ्या शेजारच्या एका अमेरिकन मुलीजवळ कौतुक केलं. त्याबरोबर मोकळेपणानं ती खुदकन् हंसली आणि म्हणाली, "ती एकसारखं पुस्तकांत डोकं खुपसेल नाहीं तर काय ? अहो तिला त्या नाटकांतला एक शब्दहि माहीत नाहींय्! त्या मुलीची भूमिका करणाऱ्या नेहेमींच्य मुलीला आज एक छोटासा अपघात झालाय्. त्यामुळं तिच्याऐवजी ऐन वेळीं हिला नाटकांत धरून उभी केलीय्! तिच्या हातांतलं कव्हर घातलेलं पुस्तक त्याच एकांकिकेचं आहे!"

"आणि नाटकांतलीं तिच्या वाचनाच्या वेडासंबंधींचे उल्लेख असलेलीं वाक्यं?"

"अहो कसलं काय! ती वाक्यं अशींच नाटकांत घुसडलेलीं!" ती उद्गारली.

नाटकांतलं एकहि वाक्य माहीत नसतांना नाटकाचं पुस्तक हातांत घेऊन बेधडकपणं रंगभूमीवर फिरणाऱ्या अवघ्या चौदा वर्षांच्या त्या थोर धिटुकल्या अभिनेत्रीला मी मनांतल्या मनांत वंदन केलं! प्रत्यक्ष स्टेजवरच्या सोफासेटमागं प्रॉम्प्टरला बसवून नाटक पार पाडणाऱ्या आमच्याकडच्या सिने-कलावंतांचा ह्या छोकरीनं पराभव केला होता!

□

# ' लेट्स् स्टे ग्रीन ' : कॅंप वॅपालानी

अमेरिकन लोकांच्या ' शिक्षण 'विषयक कल्पना खूपच व्यापक अन् उदार आहेत. चार भिंतीच्या कोंडवाड्यांत विद्यार्थ्यांना कोंडून पुस्तकी ज्ञानाचे धडे देणं अमेरिकनांना मंजूर नाहीं. निसर्गाचा आणि मानवी जीवनांतील एकंदर ज्ञानाचा अतूट संबंध आहे ही गोष्ट अमेरिकनांच्या कधींच लक्षांत आलेली आहे. आपल्याकडे गुरुदेव टागोरांच्या ' शांतिनिकेतन 'सारखा एखाददुसरा अपवाद वजा केला तर कोणत्याहि प्रकारच्या शिक्षणाशीं निसर्गाचा संबंध जोडायचा ' वेडेपणा ' ( ! ) सहसा कुणी करीत नाहीं. ' बायॉलॉजी' सारख्या विषयांत आपला अगदींच नाइलाज होतो म्हणून पाना-फळांचे, फुलांचे नि प्राण्यांचे कांहीं नमुने आपण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वर्गांत दाखवतों. फारच झालं तर ह्या विषयाच्या विद्यार्थ्यांची एखादी छोटीशी ' शैक्षणिक सहल ' काढली कीं आपण कृतकृत्य होतों !

ह्याच्या उलट केवळ वनस्पतिशास्त्र किंवा जीवशास्त्रच नव्हे, तर मानवी ज्ञानाशीं संबंधित असलेला कोणताहि विषय वर्गाच्या बाहेर निसर्गाच्या सान्निध्यांत विद्यार्थी अधिक चांगला शिकतात, असा अमेरिकनांचा विश्वास आहे. आणि निसर्गाच्या सहवासांत विद्यार्थ्याला केवळ त्याच्या अभ्यासाच्या विषयाचंच अधिक चांगलं ज्ञान होतं असं नव्हे, तर मानवी जीवनासंबंधींची त्याची समजूतहि अधिक वाढते, जीवनाकडे अधिक उदार दृष्टीनं तो बघू शकतो, असं अमेरिकनांना वाटतं. निसर्गाच्या सहवासांत विद्यार्थ्यांचं व्यक्तित्व सहजसुंदर रीतीनं फुलतं. माणसांनीं

निर्माण केलेले भाषेचे, वर्णाचे सारे कृत्रिम भेद तिथं विरून जातात असा त्यांचा अनुभव आहे.

मी अमेरिकेंत असतांना अमेरिकनांचं निसर्गाबद्दलचं प्रेम कितीतरी प्रकारांनीं प्रकट झालेलं मीं पाहिलं आहे. त्यांच्या रक्तामधल्या निसर्गप्रेमाचा आणखी एक साक्षात्कार मला माझ्या माँट्क्लेअरच्या मुक्कामांत झाला. २२ जुलै १९६४ ला 'Stokes State Forest' मध्यें असलेल्या 'New Jersey State School of Conservation' ला आम्हीं भेट दिली. न्यू जर्सी राज्याच्या ह्या 'स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन'चा एक मोठा आणि महत्त्वाचा विभाग म्हणजे 'कँप वॅपालानी' (Camp Wapalanne) हा माँट्क्लेअरपासून सुमारं ६०–६५ मैलांवर आहे. 'न्यू जर्सी स्टेट स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन'च्या मालकीची २४० एकर जमीन आहे. आणि संस्थेच्या सभोंवतालच्या परिसरांत २८००० एकर विस्ताराचं 'स्टोक्स् स्टेट फॉरेस्ट' हें संरक्षित जंगल आहे.

१९३० च्या सुमाराला 'सिव्हिलियन कॉन्झर्व्हेशन कोअर'नं 'स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन'च्या कांहीं तात्पुरत्या इमारती बांधल्या होत्या. पण १९४९ पर्यंत त्यांचा फारच थोडा, केवळ प्रासंगिक उपयोग झाला. '४९ सालीं तिथं प्रथमच 'कॉलेज–अंडर ग्रॅज्युएट्स्', 'पब्लिक स्कूल'चे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठीं एक 'उन्हाळी वर्ग' (summer program) घेण्यांत आला. १९५६ पासून एकेक आठवड्याचे कॉलेज-विद्यार्थ्यांचे अभ्यासवर्ग सुरू झाले. आणि आज 'न्यू जर्सी स्टेट स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन' हें 'आउट-डोअर एज्युकेशन' देणारं जगांतलं सर्वांत मोटं केंद्र बनलेलं आहे.

'कॉन्झर्व्हेशन'ची खरीखुरी कल्पना अजूनहि आपल्याकडे आलेली नाहीं जंगलांतल्या लाकूडतोडीसंबंधींचे कांहीं कायदे आणि 'वनमहोत्सव'–प्रसंगीं एखाद्या मंत्र्यानं एखादं रोपटं जमिनींत खोंचणं ह्या पलिकडे आपली 'कॉन्झर्व्हेशन'बद्दलची कल्पना पोहोचत नाहीं ! निसर्गानं अमाप संपत्तीची उधळण ह्या सृष्टींत केलेली आहे. आपण माणसं नैसर्गिक संपत्तीचा मनसोक्त उपभोग घेतों. पण निसर्गा-बद्दलची, नैसर्गिक संपत्तीबद्दलची आपली जबाबदारी आपण योग्य वेळीं पार पाडली नाहीं तर कांहीं शतकांच्या आंतच जगाच्या ह्या सुंदर सृष्टीचं वैराण वाळवंट बनेल, असा विचारहि आपल्या मनांत येत नाहीं.

वास्तविक अमेरिका हा देश अमाप नैसर्गिक साधनसंपत्तीनं भरलेला आहे असं म्हणायला हरकत नाहीं. पण तिथंसुद्धां, 'सरकारनं आपल्या देशांतल्या नैस-र्गिक संपत्तीचा योग्य तो सदुपयोग होण्यासाठीं अधिकाराचा उपयोग करावा,' असा विचार सर्वांत प्रथम गिफोर्ड पिकॉट ह्या पेन्सिल्व्हानिया राज्याच्या गव्हर्नरांनीं मांडला.

अलिकडे प्रे. केनेडींच्या कारकीर्दींत कॉन्झर्व्हेशनचं महत्त्व तर वाढलंच; पण

त्याला एक नवा अर्थहि प्राप्त झाला. नैसर्गिक संपत्तीचं सुयोग्य व्यवस्थापन व्हायलाच हवं; पण त्याच्या जोडीला मानवाच त्याच्या सभोंवतालच्या सर्व प्रकारच्या परिस्थितीशीं असलेलं नातंहि आपण विसरतां कामा नये; ह्या नात्यांत मानवाची मानवासंबंधींची बंधुत्वाची भावना आलीच, हा विचार प्रे. केनेडींच्या कारकीर्दीत अमेरिकेंत प्रबळ झाला. 'न्यू जर्सी स्टेट स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन'चे हल्लींचे डिरेक्टर डॉ. जॉन जे. कर्क (Dr. John J.Kirk)



**'न्यू जर्सी स्टेट स्कूल ऑफ कॉंझर्व्हेशन'चे कल्पक डिरेक्टर डॉ. जॉन जे. कर्क.**

हेसुद्धां ह्याच विचारानं भारलेले जगांतले एक नामवंत शिक्षणशास्त्रज्ञ आहेत. अमेरिकेंतल्य इतर राज्यांतल्या विद्यापीठांतच नव्हे, तर जगांतल्या कांहीं इतर देशांतसुद्धां त्यांचे विचार ऐकण्यासाठीं व्याख्यानं देण्याचीं आमंत्रणं त्यांना येतात. 'आउट-डोअर एज्युकेशन' संबंधींची डॉ. जॉन जे. कर्क यांची व्याख्या अशी आहे,—

"Outdoor Education is the method which utilizes the out-of-doors to cultivate a reverence for life through an ecological exploration of the interdependence of all living things one on the other and to form a land ethic illustrating man's temporary stewardship of the land."

डॉ. जॉन जे. कर्क यांच्या 'स्कूल'मधें शिकवल्या जाणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांचा तात्त्विक पायाच त्यांनीं ह्या व्याख्येंत विशद करून सांगितला आहे. गेलीं चारपांच वर्षं त्यांच्या संस्थेंत इतर देशांतले कांहीं विद्वान् प्राध्यापक 'व्हिजिटिंग टीचर्स' म्हणून येत असतात.

चार जून १९६८ रोजी मला लिहिलेल्या एका पत्रांत डॉ. जॉन कर्क यांनीं त्यांचा ह्याबाबतचा उद्देश स्पष्टपणं लिहिला आहे. ते म्हणतात, "The purpose of this international aspect of our program is to attempt to demonstrate how attitude formation in conservation can actually transcend language barriers and cultural differences and unite all the children of the world."

जीवनाचा खरा अर्थ ज्याला समजला आहे, जीवनांतलं खरं सौंदर्य ज्याला जाणवलं आहे असा माणूस जेव्हां दुसऱ्या माणसाकडे पहातो तेव्हां त्याच्या कातडीचा

रंग, त्याची भाषा, त्याचा धर्म या सर्वांच्या पलिकडे त्याची विशाल दृष्टि पोंचते. निसर्गाच्या सहवासांत माणसाची दृष्टि अशी विशाल होते, असा डॉ. जॉन कर्क यांचा विश्वास आहे. जाति, धर्म, भाषा आणि राजकीय पक्ष यांच्या भिन्नत्वामुळं आपल्या देशांत आज सर्वत्र अविश्वासाचं, द्वेषाचं, मत्सराचं विषारी वातावरण पसरलेलं आहे. संधिसाधू, स्वार्थलोलुप, सत्ताभिलाषी पुढाऱ्यांच्या बोलण्यानं अन् वागण्यानं ह्या वातावरणांत अधिकच विषार फैलावत आहे. ठिकठिकाणीं दंगेधोपे चालू आहेत. राष्ट्राचे भावी आधारस्तंभ समजले जाणारे विद्यार्थी आज कायदा हातांत घेत आहेत. ह्या सर्व गोष्टींमुळं राष्ट्रीय एकात्मकतेला आज तडा गेला आहे. अशा परिस्थितींत विद्यार्थ्यांचीं मनं घडवण्यासाठीं, त्यांच्या मनावर संस्कार करण्यासाठीं, त्यांचा दृष्टि-कोन अधिक व्यापक नि विशाल करण्यासाठीं आज जर खरी गरज कशाची असेल तर ती आजची शिक्षणपद्धति आमूलाग्र बदलण्याची आहे. नव्या भविष्यकालीन शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांचा आणि निसर्गाचा अधिकाधिक निकटचा संबंध येईल अशाच प्रकारचे नवे अभ्यासक्रम आतां आंखायला हवेत. त्यासाठीं 'न्यू जर्सी स्टेट स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन 'सारख्या संस्था आपल्या देशांत निघायला हव्यात. आणि शाळा व कॉलेजांशीं अशा संस्थांचा निकटचा संबंध जोडायला हवा.

कॅंप बॅपालानीत दिल्या जाणाऱ्या 'आउट-डोअर एज्युकेशन'चा आणखी एक हेतु म्हणजे विद्यार्थी आणि त्यांचे शिक्षक– प्राध्यापक यांच्यांतील अंतर कमी करणं. डॉ. जॉन कर्क यांच्या 'स्कूल'मध्यें केवळ 'नॅचरल सायन्सेस्' शिकवलीं जात नाहीत, तर इतरहि महत्त्वाचे सर्व विषय निसर्गाच्या पार्श्वभूमीवर शिकवले जातात. उदाहरणार्थ, कॉलेजांत ज्यांचा 'इंग्रजी वाङ्मय' हा मुख्य विषय आहे अशा विद्यार्थ्यांना त्यांचे इंग्रजीचे प्रोफेसर जंगलांत दूरवर एकान्तांत घेऊन जातात, आणि तिथं 'हेन्री डेव्हिड थोरो'च्या 'वॉल्डन'चा ( Walden ) कांहीं भाग वाचून दाखवून त्यावर भाष्य करून त्याचं मर्म समजावून सांगतात. नंतर विद्यार्थी सुमारं अर्धा मैल पायी चालत जातात. वाटेंत एकमेकांशी बोलण्याची त्यांना परवानगी नसते. वाट चालतांना 'थोरो'च्या निरीक्षणतंत्राचा त्यांनी उपयोग करावा अशी अपेक्षा असते. हें चालणं संपलं की विद्यार्थी कुठंतरी एकेकटे वेगवेगळे बसतात, आणि आपापल्या प्रतिक्रिया लिहून काढतात. ह्या पद्धतींत विद्यार्थी नेहेमीपेक्षां कितीतरी पटींनीं अधिक सुंदर, अधिक अर्थपूर्ण असं लिहून जातात असा अनुभव येतो. हिरव्यागार निसर्गाच्या सहवासांत विद्यार्थ्यांची नैसर्गिक प्रतिभा-शक्ति अशी फुलतांना बघायला मिळणं हासुद्धां एक केवढा मोठा आनंद आहे ! विद्यार्थी आणि शिक्षक एका पातळीवर येऊन विचारांची, भावनांची देवाण-घेवाण करतात त्या वेळीं त्यांच्यामधलं अंतर साहजिकच कमी होतं, आणि परस्परांविषयीची समजूत वाढते यांत शंका नाहीं.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधें मिसळून त्यांना शिक्षण देण्याच्या ह्या पद्धतीचा आणखी एक फायदा असा कीं, वर्गापेक्षां अगदीं वेगळ्या वातावरणांत आणि परिस्थितींत प्रत्येक विद्यार्थ्याचं निरीक्षण करण्याची संधि शिक्षकाला मिळते. विद्यार्थ्याच्या वागणुकीचे, स्वभावाचे कंगोरे त्याला समजतात. विद्यार्थ्यांच्या वर्गातल्या वागणुकींतून निर्माण होणारे अनेक प्रश्न सोडवतांना शिक्षकाला ह्या निरीक्षणाचा फार उपयोग होतो. असल्या प्रश्नांना मग शिक्षक अधिक यशस्वी रीतीनं तोंड देऊं शकतो.

दुसऱ्या दृष्टीनंहि आणखी एक फायदा होतो. अनौपचारिक पोषाखांत, अनौपचारिक वातावरणांत शिक्षकाचं दर्शन घडल्यानं आपले शिक्षक आपल्यासारखेच हाडामांसाचे गृहस्थ आहेत, हा ठसा विद्यार्थ्यांच्या मनावर उमटतो. नंतर



भूगर्भशास्त्राच्या प्रत्यक्ष अभ्यासांत रंगून गेलेले कॉलेजविद्यार्थी.

पुढं विद्यार्थी-शिक्षक यांच्यामधले वर्गातले संबंध सुधारायला ह्याचा फार उपयोग होतो.

त्या दिवशीं सकाळीं सव्वाआठ वाजतां प्रो. डॉ. कोन्‌रॅड आणि मिस्टर मॅक्‌व्हेन यांच्या गाड्यांतून आम्ही कँप वॅपालानीला जायला निघालों. सुमारं तासाभरांत आम्ही तिथं पोंचलों. रस्त्यांच्या दुतर्फा दाट झाडी होती, आणि विशेष म्हणजे जंगल असूनहि तिथले रस्ते फारच चांगले होते. रस्त्याच्या बाजूंना ठिकठिकाणी मार्गदर्शक पाट्या होत्या.

मी जातांना नि येतांनाहि प्रो. डॉ. कोन्‌रॅड यांच्याच गाडींत होतों. प्रो. कोन्‌रॅड यांचं वय ६५ पेक्षां थोडंसं अधिक होतं. 'मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'मधें पूर्वी ते इंग्रजीचे प्रोफेसर होते. वयाच्या ६५ व्या वर्षी ते सेवानिवृत्त झालेले होते. तरी-सुद्धां संस्थेबद्दलचं त्यांचं प्रेम त्यांना घरीं स्वस्थ बसूं देत नव्हतं. आमच्यासारख्या पाहूण्यांना कँप वॅपालानी दाखवून अमेरिकेंतील शिक्षणपद्धतीचा एक वेगळा पैलू आमच्या निदर्शनाला आणण्याची कामगिरी त्यांनीं आनंदानं पत्करली होती. 'कँप वॅपालानी'सारखाच 'स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन'चा आणखी एक विभाग 'कँप सिक्वोया' हा वॅपालानी तळ्याच्या पलिकडच्या बाजूला आहे. डॉ. कोन्‌रॅड हे एकीकडे ड्रायव्हिंग करतांकरतां दोन्ही कँप्स्‌ची माहिती आम्हाला सांगत होते. त्यामुळं प्रत्यक्ष कँप वॅपालानीला पोंहचण्यापूर्वीच डॉ. कोन्‌रॅड यांच्या रसाळ वर्णनशैलीमुळं तिथल्या परिसराचं मोटं लोभसवाणं चित्र आमच्या डोळ्यांपुढं उभं राहिलं होतं. तिथं पोंचल्यावर 'कँप वॅपालानी'च्या भूमीवर आम्ही इकडेतिकडे फिरायला लागल्यावर तिथल्या निसर्गरम्य वातावरणानं तर आम्हांला भारूनच टाकलं. आणि प्रो. कोन्‌रॅड यांच्या वर्णनांत यत्किंचित्‌हि अतिशयोक्ति नव्हती याची साक्ष आमच्या मनाला पटली.

'कँप'च्या परिसरांत जिकडे पहावं तिकडे पाइन, ओक, बर्च अशा उंचउंच वृक्षांची एकच गर्दी उसळली होती. तिथें असलेल्या 'स्कूल'च्या सर्वच इमारती दगड आणि लाकूड यांचा उपयोग करून जुन्याच पद्धतीनं बांधलेल्या होत्या. कँप वॅपालानींतल्या 'अॅडमिनिस्ट्रेशन बिल्डिंग', 'बिग टिंबर्स', ('डायनिंग हॉल आणि किचन'), 'सायन्स बिल्डिंग इत्यादि इमारतींचं मी धांवतं दर्शन घेतलं. शाळा-कॉलेजांचे विद्यार्थी नि विद्यार्थिनी गटागटानं कँप वॅपालानींत पांच दिवसांपासून तों दोन महिन्यांपर्यंत त्यांनी निवडलेल्या अभ्यासक्रमानुसार रहात असतात. तेव्हां मला मुख्य जिज्ञासा होती ती जंगलांतलं त्यांचं वसतिगृह पहाण्याची! पण त्यांच्या वसतिगृहाची एकच एक भलीमोठी इमारत अशी नव्हती. 'डिसेंट्रलाइझ्ड लिव्हिंग' हें कँपचं एक खास वैशिष्ट्य असल्यामुळं सर्व विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय एकाच ठिकाणीं हेतुतः केलेली नव्हती. विद्यार्थ्यांसाठीं बांधलेल्या बारा खास



**स्टीक कुकिंग : वनांतल्या पाकसिद्धीचे धडे घेतांना ही शाळकरी पोर पहा कशी आपल्याला खिजवते आहे !**

केबिन्स जंगलांत वेगवेगळ्या ठिकाणीं होत्या. प्रत्येक केबिनमधें १२ विद्यार्थी अगर विद्यार्थिनी रहात. त्यामुळं एकेका छोट्या गटांत राहिल्यानं विद्यार्थ्यांमधें परस्परांमधें आपलेपणाची भावना निर्माण व्हायला मदत होते. प्रत्येक केबिनमधें स्प्रिंगचे पलंग आणि एअर फोमच्या गाद्या होत्या. बाथरूम्समधें चोवीस तास पाण्याची सोय असून ' हॉट वॉटर शॉवर्स 'हि होते. विद्युत्-उपकरणं वापरण्याच्या सोयी ठिकठिकाणीं होत्याच. कडक हिवाळ्याच्या दिवसांत उपयोगासाठीं ' फायर प्लेसेस् 'सुद्धा अर्थातच होत्या. ह्याशिवाय ' विग्वॅम ' ( Wigwam ) व ' पाइन लॉज ' ( Pine Lodge ) या नांवांच्या इमारतींत रहाण्याच्या सोयी केलेल्या होत्या.

' किट्टॅटिनी हॉल ' ( Kittatinny Hall ) नांवाच्या त्यांच्या सभागृहांतच मागच्या बाजूला ग्रंथालय आहे. ग्रंथालयांत ' फिलॉसॉफी ' ' रिलिजन '

'सोशल सायन्सेस्', 'लँग्वेजेस्', 'लिटरेचर', 'नॅचरल सायन्सेस्' 'नॅचरल हिस्टरी इंटरप्रिटेशन', 'फाइन आर्ट्स्' 'कॉन्झर्व्हेशन', 'ऑर्गनाइझ्ड कॅम्पिंग' इत्यादि विभाग होते. या सर्व विभागांत मिळून सुमारं हजार-दीड हजार पुस्तकं तिथं होतीं.

'अॅड्मिनिस्ट्रेशन बिल्डिंग' मधल्या 'ट्रेडिंग पोस्ट' विभागांत स्टँप्स, पोस्ट-कार्ड्स्, पुस्तकं, चॉकलेट्स् आणि इतर बारीकसारीक वस्तू विकत मिळण्याची सोय होती. कँप वॅपालानीच्या छायाचित्रांची कांहीं रंगीत पोस्टकार्ड्स मीं तिथंच विकत घतलीं.

विद्यार्थ्यांनी कोणताहि अभ्यासक्रम निवडलेला असो, अगर त्यांचा मुक्काम तिथं कितीहि दिवस असो, सर्वांसाठी कँपमधें करमणुकीच्या साधनांची उत्कृष्ट व्यवस्था केलेली मला आढळली. स्विमिंग, स्केटिंग, स्नो-शूइंग, हायकिंग, बोटिंग, रायफल-शूटिंग करायला विद्यार्थ्यांना उत्तेजन दिलं जातं. पण ह्यांपैकीं प्रत्येक प्रसंगीं कुणीतरी तज्ज्ञ शिक्षक तिथं उपस्थित असलाच पाहिजे असा नियम आहे.
कँपमधील वास्तव्यांत विद्यार्थ्यांच्या जिवाला कांहीं घातपात अपघात होऊं नये म्हणून तिथं खूपच खबरदारी घेतली जाते. आवश्यक त्या ठिकाणीं त्यासाठीं कडक नियमहि केलेले आहेत.

स्विमिंग, बोटिंग, रायफल-शूटिंग या तीनहि बाबतींत विद्यार्थ्यांना विशेष जपण्यांत येतं. त्यासाठी खास तयार केलेल्या नियमांच्या नि मार्गदर्शनपर सूचनांच्या छापील प्रतीच प्रत्येक विद्यार्थ्याला देण्यांत येतात. विद्यार्थ्यांना 'बोटिंग' शिकविण्यासाठी फक्त ३ फूट खोली असलेलं एक मोठं तळं कँपमधें राखून ठेवलेलं आहे. तरीसुद्धां 'लाइफ जॅकेट्स्' घालूनच त्यांना बोटिंग करूं देतात. हा नियम अर्थातच प्रामुख्यानं शाळेंतील मुलांसाठी आहे. प्रत्येक पांच विद्यार्थ्यांच्या मागं एक इन्स्ट्रक्टर असतोच. तो त्यांची काळजी घेतो आणि त्यांना मार्गदर्शन करतो. शिवाय तळ्याच्या कांठीं दिवसभर लाइफ गार्ड्स्चा पहारा असतोच.

कँपमधल्या वास्तव्यात विद्यार्थ्यांची प्रकृति चांगली रहावी म्हणून सर्वतोपरीनं काळजी घेतली जाते. चांगल्या दर्जाचं अन्न आणि शुद्ध पाणी त्यांना पुरवण्यांत येतं. एकदां विद्यार्थी कँपमधें आल्यानंतर त्याच्या घरच्या लोकांना त्याला कांहीहि खाद्यपदार्थ पाठवण्याची परवानगी नसते. कधीकाळी अचानकपणं विद्युतपुरवठा बंद पडलाच तरीहि कँपमधें वीज आणि पाणीपुरवठा चालू रहाण्यासाठी दुसरी व्यवस्था करण्यात आलेली आहे. कँपमधें आल्याबरोबर सर्वच विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली जाते. त्यातूनहि नंतरच्या वास्तव्यांत एखादा विद्यार्थी आजारी पडलाच तर त्याच्यावर तावडतोब उपचार व्हावेत ह्यासाठी एक डॉक्टर आणि नर्स तिथं असतातच. शिवाय

प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रकृतीचा विमाहि तिथं आल्याबरोबर उतरवला जातो. ह्या योजनेमुळं, एखादा मुलगा आजारी पडलाच तर त्याच्या आजारीपणाचा सगळा खर्च विमा कंपनीकडून तावडतोब त्याला मिळतो. एखाद्या तातडीच्या प्रसंगीं विद्यार्थ्यांच्या पालकांना तावडतोब भेटतां यावं यासाठी त्याच्या घराकडे जाण्याचा मार्गहि आधीच समजावून घेतला जातो. कॅंपमध्ये टेलिफोनची सोय अर्थातच आहे. पण पालकांना आपल्या मुलाबद्दल फाजिल काळजी वाटून त्यानी त्याला एकसारखा टेलिफोन करूं नये अशा सूचना त्यांना देण्यांत आलेल्या असतात. कारण आई-वडलांचा आवाज फोनवर ऐकला की मुलांना घरची आठवण तीव्रतेनं होऊन तीं फारच अस्वस्थ वनतात.

कॅंपमध्यें आल्यापासून तों परत जाईपर्यंत निरनिराळ्या प्रसंगीं म्हणण्यासाठीं सुमारं ४०–५० गाणी विद्यार्थ्यांना शिकवण्यांत येतात. ह्या गाण्यांतच सकाळ, दुपार आणि रात्रीच्या वेळीं म्हणण्यांत येणाऱ्या सोप्या नि सुंदर प्रार्थनांचाहि अंतर्भाव करण्यांत येतो. त्या दिवशीचं दुपारचं जेवण आम्हीं ' कॅंप 'मधल्या शालेय विद्यार्थ्यां-बरोबरच घेतलं. जेवणाच्या वेळींहि मुलांनी आधी प्रार्थना म्हटली. माझ्या शेजारी जोसेफ यीमन्स् ( Yeamans ) नांवाचा Irvington चा एक विद्यार्थी बसला होता. आणि दुसऱ्या बाजूला कु. लिंडा लिबरमन ( Lieberman ) नांवाची Highstown ची एक मुलगी बसली होती. जेवतांना त्यांच्या गाण्यांबद्दल मीं विशेप उत्सुकता दाखवतांच लिंडानं कॅंप वॅपालानीच्या सर्वच गाण्यांचं एक छापील पत्रक मला दिलं. त्यांतलं कॅम्प वॅपालानीचं गाणं मला फार आवडलं. तें असं होतं :—

**Wapalanne Song**

' We welcome you to our camp so fair,
We'll treat you with, hospitality rare.
We'll walk with you, by a lake serene.
And in our nook, you can sit and dream.
And when it's time for you to depart,
Please take a bit....of Wapalanne in
your heart !... of Wapalanne in your heart.....! '

कॅंपमध्यें विद्यार्थी आल्याबरोबर पहिल्याच दिवशी त्यांचं एक ' ओरिएंटेशन सेशन ' घेण्यांत येतं. ह्या सेशनमध्यें मुलांना कॅंपच्या उद्दिष्टांची नि तिथल्या एकंदर जीवनक्रमाची माहिती देण्यांत येते. एकदोन दिवसांतच ते तिथल्या वातावरणांत रमतात. आणि तिथल्या जीवनक्रमांत रस घेऊं लागतात. हें जीवन त्यांना इतकं आवडतं की त्यांच्या अभ्यासक्रमाची मुदत संपली तरीसुद्धां ते पुन्हा आपापल्या शाळा-कॉलेजांत परत जायला नाखूप असतात.

दर वर्षी सुमारं ११ ते १२ हजार विद्यार्थी 'स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन'च्या निरनिराळ्या अभ्यासक्रमांचा फायदा घेतात. न्यू जर्सी राज्यांतील सर्व सरकारी कॉलिजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांनीं एक आठवडा तरी ह्या स्कूलमधें जाऊन अभ्यास केलाच पाहिजे असा नियमच आहे. सरकारी शाळांमधल्या मुलांनाहि हाच नियम लागू आहे.

ह्याखेरीज 'कॉन्झर्व्हेशन'मधें रस असलेल्या अनेक प्रौढांसाठी B.A. व M.A. पदवीच्या वर्गांतील विद्यार्थ्यांसाठीं आणि शाळा-कॉलेजांतील शिक्षकांसाठींहि फक्त शनिवार-रविवारचे शिक्षण-वर्ग स्कूलमधें आहेत. इतर अनेक विषयांबरोबरच नृत्याचे आणि धनुर्विद्येचेहि वर्ग कँप वॅपालानीत चालवले जातात. हल्ली तिथ आउटडोअर एज्युकेशन'चे असे अभ्यासक्रम आंखण्याची योजना चाललेली आहे. लवकरच 'किंडरगार्टन'पासून तों 'कॉन्झर्व्हेशन' या विषयांतील पीएच्. डी. पर्यंतचं सारं शिक्षण 'स्कूल'मधेंच दिलं जाईल.

डॉ. जॉन जे. कर्क यांच्या नेतृत्वाखाली वेगानं प्रगति करीत असलेल्या 'स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन'चं वार्षिक बजेट् ३ लाख डॉलर्सचं आहे. ही एवढी मोठी सारी रक्कम विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाबद्दल घेतलेल्या फीमधूनच जमा होते हें विशेष ! साधारणपणं एकेका विद्यार्थ्याला महिन्याच्या शिक्षणासाठी सुमारं २०० डॉलर्स फी द्यावी लागते.

संस्थेच्या कायमच्या नोकरवर्गांत एकूण २७ लोक आहेत. त्यांतले तीन प्रोफेसर्स कँपच्या परिसरांतच कायमचे रहातात. त्यांपैकी एकजण 'इंटरप्रेटिव्ह नॅचरॅलिस्ट' असून 'कॉलेज प्रोग्रॅम'चं संपूर्ण संयोजन करण्याची जबाबदारी तेच पार पाडतात. दुसरी प्रोफेसरबाई 'कॉन्झर्व्हेशन एज्युकेशन स्पेशालिस्ट' असून 'पब्लिक स्कूल प्रोग्रॅम'चं संपूर्ण संयोजन तिलाच करावं लागतं. तिसरे प्रोफेसर 'आउटडोअर रिक्रिएशन स्पेशालिस्ट' असून ते कँपमधें धनुर्विद्या, रायफल शूटिंग, स्नो-शूइंग, स्किइंग आणि अमेरिकन फोक डान्सिंगचे वर्ग चालवतात. शाळा-कॉलेजांतील दोन्हीकडच्या विद्यार्थ्यांना हे सर्व विषय तेच शिकवतात. याशिवाय संस्थेचे डिरेक्टर डॉ. जॉन जे. कर्क यांच्या हाताखाली सर्व व्यवहार बघण्यासाठीं एक ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह असिस्टंट, दोन सेक्रेटरी, एक लायब्रेरियन, एक नर्स, चौदा स्वैंपाकी आणि सहा नोकर आहेत. ह्याशिवाय कांहीं शाळांतील आणि कॉलेजांतील नामवंत अध्यापक उन्हाळ्याच्या सुट्टीत तिथं सुमारं ९ आठवडे शिकवायला येतातच.

आज अमेरिकेंत सुमारं १०० विद्यापीठांमधून 'आउटडोअर एज्युकेशन' आणि 'कॉन्झर्व्हेशन' या विषयांत पदव्या दिल्या जातात. आजच्या आधुनिक मानवाच्या जीवनांत 'कॉन्झर्व्हेशन'चं खरोखरच इतकं महत्त्व आहे का ? निदान अमेरिकनांना तरी तें फार वाटतं. त्याचं महत्त्वाचं आणि अगदीं उघड कारण हें

कीं, अमेरिकेंत (नि जगांतल्या सर्व महत्त्वाच्या शहरांमधें) औद्योगीकरणाची कमाल मर्यादा आज गांठली गेलेली आहे. औद्योगीकरणाच्या ह्या अतिरेकामुळं मोठमोठ्या शहरांमधून कारखान्यांतून निर्माण होणाऱ्या धुरामुळं नि इतर वायूंमुळं वातावरण दूषित होण्याचा धोका निर्माण झाला आहे. हें 'Air Pollution' कसं थांबवावं ह्याचा आज तिकडचे विचारवंत. शास्त्रज्ञ अभ्यास करीत आहेत. नैसर्गिक शुद्ध पाणीहि आतां दिवसेंदिवस जगांत दुर्मिळ होत जाणार आहे. कारण कारखान्यांतील अस्वच्छ, अशुद्ध पाणी नद्यांमधें अगर खास बांधलेल्या मोठमोठ्या विहिरींमधें सोडण्यांत येतं. रस्ता-रुंदीसाठीं, घरबांधणीसाठी, कारखान्यांच्या जागांसाठीं किंवा इमारतीच्या लाकडांसाठीं (आणि आपल्यासारख्या देशांत जळणासाठींहि) आज जगांत सर्वत्र प्रचंड प्रमाणांत झाडं तोडलीं जात आहेत. वृक्षांचं संरक्षण नि संवर्धन करण्याची जबाबदारी माणसानं नीट पार न पाडल्यानं आज जगांतली जंगलं झपाट्यानं कमी होत आहेत. त्यामुळं सृष्टीचं नैसर्गिक सौंदर्य तर कमी होतंच आहे; पण पर्जन्यवृष्टीच्या प्रमाणावरहि त्याचा परिणाम व्हायला लागला आहे. जगांतल्या विचारवंतांपुढं ही अशी एक मोठी समस्याच आज निर्माण झाली आहे. आणि तिला तोंड देण्यासाठीच आज, पूर्वीं कधींहि नव्हती इतक्या मोठ्या प्रमाणांत 'कॉन्झर्व्हेशन'ची गरज निर्माण झाली आहे.

परमेश्वरानं निर्माण केलेल्या ह्या सृष्टीचा— जगांतील नैसर्गिक संपत्तीचा— मानव हा स्वामी नाहीं. तो फक्त व्यवस्थापक आहे. परमेश्वरानं निर्माण केलेल्या निसर्गसौंदर्याचा नाश करून सारी सृष्टि उजाड, कुरूप बनवण्याचा त्याला अधिकारच नाहीं. परमेश्वरनिर्मित नैसर्गिक संपत्तीचा तो फक्त चांगल्या रीतीनं उपभोग घेऊं शकतो. तिचं संरक्षण करणं नि संवर्धन करणं हें त्याचं कर्तव्यच आहे. 'कॉन्झर्व्हेशन'मधें आजकाल फक्त 'संरक्षणा'चीच कल्पना नसून 'संवर्धना'च्या कल्पनेलाहि महत्त्वाचं स्थान प्राप्त झालेलं आहे.

प्रे. लिंडन बी. जॉन्सन यांनींहि त्यांच्या राजवटींत प्रे. केनेडींची 'कॉन्झर्व्हेशन'-ची चळवळ उचलून धरली होती ती या विचारसरणीमुळंच. आज जगांत ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, जपान, जर्मनी, ऑस्ट्रिया, डेन्मार्क, नेदरलँड्स् इत्यादि अनेक देशांत 'कॉन्झर्व्हेशन'ची आणि 'आउटडोअर एज्युकेशन'ची चळवळ चांगलीच प्रगति करूं लागली आहे. ह्या सगळ्या चित्रांत आपला खंडप्राय अवाढव्य देश मात्र कुठं दिसत नाही. कदाचित् 'कॉन्झर्व्हेशन' नि 'आउटडोअर एज्युकेशन'ची चळवळ अजूनहि फक्त 'भांडवलशाही' राष्ट्रांतच चालू असल्यामुळं आपलं तिकडे दुर्लक्ष होत असावं! रशिया किंवा चीन यांच्यासारख्या खऱ्याखुऱ्या 'समाजवादी' राष्ट्रांना ज्या अर्थी अजून ह्या कल्पनांचं महत्त्व पटलेलं नाहीं त्या अर्थी त्यांच्यांत कांहींच अर्थ नसावा! रशियाच्या आधीं आपण ही 'चळवळ' आपल्याकडे सुरू केली तर आपलं 'तटस्थ' राष्ट्र अमेरिकेच्या बाजूला झुकलं आहे असं नाहीं का 'तिकडच्यां'ना वाटणार?

अमेरिकेंत मात्र 'कॉन्झर्व्हेशन'चं महत्त्व इतक्या झपाट्यानं वाढत आहे की, 'टेनेसी व्हॅली ॲथॉरिटी'नं ('TVA' नं) १,७५,००० एकर जमिनीवर 'कॉन्झर्व्हेशन' शिक्षणाची सोय करण्याची एक महान् योजना आजच आंखलेली आहे.

'स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन'चाच दुसरा भाग म्हणजे कँप सिक्वोया. त्या ठिकाणी वाणीत दोष असलेल्या मुलांसाठीं निसर्गाच्या वातावरणांत नैसर्गिक गोष्टींचाच उपयोग करून त्यांच्यावर उपचार केले जातात. आणि ह्या 'स्पीच थेरॅपी'चा फार चांगला उपयोग झाल्याचं १९६४ सालीं तिथं आढळून आलं आहे. वेळेच्या अभावीं आम्ही मात्र वंपालानी सोडून कँप सिक्वोयाला जाऊं शकलों नाही.

कॉन्झर्व्हेशनबद्दल आणि त्यासाठीं आवश्यक असणाऱ्या 'आउटडोअर एज्युकेशन'च्या महत्त्वाबद्दल बोलतांना डॉ. जॉन जे. कर्क म्हणतात, "We are trying to point out that the magnificence of the world has been given to us for our pleasure and satisfaction, and with this great gift comes a great responsibility to try to pass on to future generations an even better world than the one we have been privileged to enjoy."

'ज्या या संसारांत मी जन्मलों, त्यांतून मृत्यूच्या दारानं बाहेर पडण्यापूर्वी त्याचं स्वरूप अधिक सुंदर करण्यासाठीं मीं माझ्या सामर्थ्यानुसार सदैव झटलं पाहिजे', असं प्रा. ना. सी. फडके त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन सांगतांना म्हणतात. डॉ. जॉन जे. कर्क हेसुद्धां थोड्या वेगळ्या अर्थानं, पण हेंच तत्त्वज्ञान सांगत नाहींत काय ?

सोपानदेव चौधरीनीं त्यांच्या आईला— बहिणाईना— एकदां सहज विचारलं, 'आई, तूं शेतांत दिवसभर कष्टाची कामं करतेस. तुझी नजर जमिनीकडे. आणि तुला हे सर्व सुंदर विचार सुचतात तरी कसे ?"

त्यावर बहिणाईनीं उत्तर दिलं, "धरत्रीच्या आरशामंदीं मी सरग ( स्वर्ग ) पहातें बापा !"

निसर्गाच्या सहवासांत त्या अडाणी, अशिक्षित स्त्रीलासुद्धां भल्याभल्या कवींना लाजवील असं सुंदर काव्य स्फुरलं. आतां तिला 'अडाणी', 'अशिक्षित' कोण म्हणेल ? निसर्गाची किमयाच तशी महान् आहे. विद्यार्थ्यांच्या मनावर लहानपणापासूनच निसर्गाशीं समरस होण्याचे संस्कार केले तर त्यांचं व्यक्तित्वसुद्धां असंच फुलारल्यावांचून रहाणार नाहीं. त्यासाठींच 'आउटडोअर एज्युकेशन'ची आज फार मोटी गरज आहे.

निसर्गाच्या सान्निध्यांत सर्वसामान्य विद्यार्थ्यांची प्रतिभासुद्धां कशी स्फुरण पावते, त्यांच्या कल्पनाशक्तीची झेंप किती उंच जाऊं शकते, त्यांचे विचार किती प्रगल्भ बनूं शकतात ह्याचं उदाहरण म्हणून डॉ. जॉन कर्क हे त्यांच्या 'स्कूल'च्या

अमेरिकेंत मात्र 'कॉन्झर्व्हेशन'चं महत्त्व इतक्या झपाट्यानं वाढत आहे की, 'टेनेसी व्हॅली अॅथॉरिटी'नं ('TVA' नं) १,७५,००० एकर जमिनीवर 'कॉन्झर्व्हेशन' शिक्षणाची सोय करण्याची एक महान् योजना आजच आंखलेली आहे.

'स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन'चाच दुसरा भाग म्हणजे कँप सिक्वोया. त्या ठिकाणी वाणींत दोष असलेल्या मुलांसाठीं निसर्गाच्या वातावरणांत नैसर्गिक गोष्टी-चाच उपयोग करून त्यांच्यावर उपचार केले जातात. आणि ह्या 'स्पीच थेरॅपी'चा फार चांगला उपयोग झाल्याचं १९६४ सालीं तिथं आढळून आलं आहे. वेळेच्या अभावी आम्ही मात्र वंपालानी सोडून कँप सिक्वोयाला जाऊं शकलों नाही.

कॉन्झर्व्हेशनबद्दल आणि त्यासाठीं आवश्यक असणाऱ्या 'आउटडोअर एज्युकेशन'च्या महत्त्वाबद्दल बोलतांना डॉ. जॉन जे. कर्क म्हणतात, "We are trying to point out that the magnificence of the world has been given to us for our pleasure and satisfaction, and with this great gift comes a great responsibility to try to pass on to future generations an even better world than the one we have been privileged to enjoy."

'ज्या या संसारांत मी जन्मलों, त्यांतून मृत्यूच्या दारानं बाहेर पडण्यापूर्वी त्याचं स्वरूप अधिक सुंदर करण्यासाठीं मीं माझ्या सामर्थ्यानुसार सदैव झटलं पाहिजे', असं प्रा. ना. सी. फडके त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन सांगतांना म्हणतात. डॉ. जॉन जे. कर्क हेसुद्धां थोड्या वेगळ्या अर्थानं, पण हेंच तत्त्वज्ञान सांगत नाहींत काय ?

सोपानदेव चौधरींनीं त्यांच्या आईला– बहिणाईना– एकदां सहज विचारलं, 'आई, तू शेतांत दिवसभर कष्टाची कामं करतेस. तुझी नजर जमिनीकडे. आणि तुला हे सर्व सुंदर विचार सुचतात तरी कसे ?"

त्यावर बहिणाईनीं उत्तर दिलं, "धरत्रीच्या आरशामंदीं मी सरग (स्वर्ग) पहातें बापा !"

निसर्गाच्या सहवासांत त्या अडाणी, अशिक्षित स्त्रीलासुद्धां भल्याभल्या कवींना लाजवील असं सुंदर काव्य स्फुरलं. आतां तिला 'अडाणी', 'अशिक्षित' कोण म्हणेल ? निसर्गाची किमयाच तशी महान् आहे. विद्यार्थ्यांच्या मनावर लहान-पणापासूनच निसर्गाशीं समरस होण्याचे संस्कार केले तर त्यांचं व्यक्तित्वसुद्धां असंच फुलारल्यावांचून रहाणार नाहीं. त्यासाठीच 'आउटडोअर एज्युकेशन'ची आज फार मोठी गरज आहे.

निसर्गाच्या सान्निध्यांत सर्वसामान्य विद्यार्थ्यांची प्रतिभासुद्धां कशी स्फुरण पावते, त्यांच्या कल्पनाशक्तीची झेंप किती उंच जाऊं शकते, त्यांचे विचार किती प्रगल्भ बनूं शकतात ह्याचं उदाहरण म्हणून डॉ. जॉन कर्क हे त्यांच्या 'स्कूल'च्या

सुझान ब्लॅच्फोर्ड या विद्यार्थिनीनं केलेली एक कविता नेहेमीं वाचून दाखवतात. कवितेचं नाव ' Riches ' असं आहे.

कविता अशी आहे :—

'By the rich man's measure,
I have no wealth;
By the famous I am still unknown.
I can't claim the wisdom of age
For as yet, I'm not full grown.
But I can follow a compass
To any place you name,
And I can turn a pile of sticks
Into a flickering, yellow flame.
I can tell by the smell on the breeze
If a summer storm is near.
I can tell you the tales of the stars
On a night when the sky is clear.
I can feel the presence of God
From setting sun to setting sun,
And oft when I am wandering
My spirit, in His, is one.
So by my measure, I've untold wealth
And I'd rather remain unknown,
To be free to search and know
The woods I'm wont to roam.'

— **Suzanne Blatchford.**
Macalester College
St. Paul Minnesota, U. S. A.

परवांच मला 'न्यू जर्सी स्टेट स्कूल ऑफ कॉन्झर्व्हेशन'चे डिरेक्टर डॉ. जॉन जे. कर्क यांचं एक पत्र आलं. पत्रावरचं संस्थेचं नांव हिरव्या शाईत छापलेलं होतं. ' एअर मेल ' हीं अक्षरं नि त्याखालचा माझा पत्ता हिरव्या रंगांत टाइप केलेला होता. आंतील तीनपानी पत्र हिरव्या रंगांत टाइप केलेलं होतं. 'Branchville, N. J.'चा पोस्टाचा शिक्काहि हिरव्या रंगांतच पाकिटावर मारलेला होता. त्याच्या शेजारींच हिरव्या रंगाचा आयतचौकोनी शिक्का होता. त्याच्या चौकटींत डाव्या बाजूला

'न्यू जर्सी स्टेट 'च्या आकारांत N. J. अशीं अक्षरं होतीं.उजव्या बाजूला सूचिपर्णी वृक्षांच्या चार छोटया झाडांचीं चित्रं होती. चौकटींतच वरच्या बाजूला अक्षरं होतीं– 'State School of Conservation.' आणि त्याखालीं शब्द होते, 'Let's Stay Green.' शब्दांच्या खालीं हिरवंगार गवत काढलेलं होतं.

'*Let's Stay Green*' –किती सुंदर आवाहन आहे. मला वाटतं अमेरिकन लोकांच्या जीवनाचा महामंत्रच ह्या शब्दांत प्रकट झालेला आहे. पूर्वी मीं एक इंग्रजी चित्रपट पाहिला होता. त्याचं नांव होतं– 'Green Years'. आयुष्यांतील तारुण्यांतल्या अनमोल वर्षांचा उल्लेख 'Green Years' या शब्दांत केलेला होता. अमेरिकन लोकांच्या चिरतरुण मनांचा उल्लेखहि 'Green' या शब्दानंच करतां येईल. 'Let's Stay Green' 'आपण चिरतरुण राहूं या!' असाहि अर्थ मला त्या शब्दांत दिसतो. 'Conservation' च्या कल्पनेच्या संदर्भांत 'Let's Stay Green' चा अर्थ वेगळा असेल. मला मात्र अमेरिकनांच्या चिरतरुण मनोवृत्तीचं दर्शनच त्या शब्दांत घडलं. 'Let's Stay Green!'

□

# तिथें तयांच्या दफनभूमिवर

अमेरिकेंत पाऊल टाकल्यापासूनच तिथल्या चैतन्यमय जीवनाचा साक्षात्कार पावलोपावली घडत होता. चैतन्यानं, उत्साहानं रसरसलेल्या मनांचे अमेरिकन स्त्रीपुरुष सहवासांत येत होते, जात होते. रस्त्यानं जातांना, ओळखदेख नसतांना आमच्यासारख्या परक्या देशांतल्या माणसांकडे पाहून मित्रत्वाच्या भावनेनं हंसून हात हलवीत होते. त्यांत लहान मुलंहि होतीं, तरुण होते, म्हातारे होते.पण सर्वांचे चेहेरे कसे सदैव आनंदानं फुललेले ! त्यांना पाहून वाटायचं, ह्यांना जीवनांतल्या संकटांचा, काळज्यांचा स्पर्श कधीं होतो कीं नाहीं ? सदा फुललेल्या त्यांच्या हिरव्यागार जीवनांत दारिद्र्य, दुःख,व्याधी,वार्धक्य कधीं पाऊल टाकतात कीं नाहीं? लांबलांब पसरलेल्या मृत्यूच्या संध्याछाया त्यांना कधीं भिववतात कीं नाहीं ? आयुष्यभर जीवनचक्रावर तुफान वेगानं गरगर फिरल्यावर त्यांना अखेरची विश्रांति कुठं लाभत असेल? तें स्थानसुद्धा एकदां आपण जरूर पाहिल पाहिजे, असं मला वाटे.

पण एखाद्या गांवीं पाहुणे म्हणून गेल्यावर तिथल्या लोकांना ‘मला तुमच स्मशान दाखवा’ असं म्हणणंच किती चमत्कारिक होतं ! तसं मीं म्हटलं असतं तरी वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतून विचार करणाऱ्या बुद्धिवादी अमेरिकनांना त्याचं कांहीं विशेष वाटलं नसतं अशी माझी खात्री आहे. पण मलाच तें उचित वाटेना. आणि एकीकडे अमेरिकन जीवनाचं सर्वांगीण दर्शन घेण्याकरितां तर मी तिथं गेलों होतों. तेव्हां त्यांचं स्मशानसुद्धां मला बघायचं होतं.

प्रथम तो योग माँट्क्लेअरला आला. त्या वेळीं 'माँट्क्लेअर स्टेट कॉलेज'मधें आम्ही रहात होतों. दिवसभर कॉलेजांत जाणं, तिथल्या शिक्षणपद्धतीचं निरीक्षण करणं, कॉलेजच्या लायब्ररींतली पुस्तकं चाळणं, कधींमधीं सहलींना जाणं, असे सगळे गडबडीचे कार्यक्रम चालले होते. कॉलेजांतून गावांत जातांना–येतांना बहुधा कुणाच्यातरी गाडींतूनच जाणंयेणं व्हायचं. त्यामुळं पहिले कांहीं दिवस कॉलेजच्या आसपासच्या परिसराकडे माझं फारसं लक्ष गेलं नाहीं. पण एक दिवस – म्हणजे ता. २३ जुलै १९६४ ला दुपारी मी मोकळाच होतों. सहज गांवांत फिरण्यासाठीं म्हणून कॉलेजांतुन बाहेर पडलों, अन् गांवाकडे जाणाऱ्या मोठ्या मुख्य रस्त्यावर आलों.

थोडंसं चालतांच डाव्या बाजूला एक फार मोठं उद्यान दिसलं. उद्यानाच्या प्रवेशद्वारापाशीं येतांच माझ्या लक्षांत आलं कीं तें उद्यान नव्हतं. माँटक्लेअरची 'ती एक दफनभूमी होती. प्रवेशद्वाराच्या दोन्ही खांबांवर एकएक पाटी लावलेली होती. डाव्या बाजूच्या लहानशा पाटीवर कोरलेले शब्द होते . ' 'Mount Hebron Cemetery ' आणि दुसऱ्या पाटीवर लिहिलेलं होतं: 'An Association of Lot Owners Incorporated 1863.' म्हणजे १०१वर्षांची ती जुनी दफनभूमी होती. मी आंत शिरलों. आणि आंतलं वातावरण पाहून थक्कच झालों. आयुष्यांत प्रथमच मी स्मशानभूमीवर पाऊल ठेवलं होतं. पण आपल्या देशांतल्या कांहीं स्मशानांचा मला दुरून परिचय होता. त्यांच्या तुलनेनं इथलं सगळं वातावरणच भिन्न होतं. इथल्या दफनभूमीचा सारा परिसर विस्तीर्ण असूनही खूपच शांत, स्वच्छ आणि कसा अगदी आंखींवरेखींव होता. या दफनभूमींत अनेक ठिकाणीं मोठमोठे वृक्ष होते, आंतमधें सगळीकडे जाण्यासाठीं स्वच्छ डांबरी रस्ते होते. रस्त्यांत दोन्ही बाजूंना हिरवीगार अशी दाट हिरवळ होती. हिरवळीच्या पलिकडे छोटींछोटीं झुडपं लावलेलीं होतीं. ह्या सगळ्या झाडाझुडपांची, हिरवळीची निगाहि फार चांगली राखलेली दिसत होती. हिरव्यागार हिरवळींतून मधूनच आपली डोकीं वर उचलणारीं अनेक लहानमोठीं पांढरींशुभ्र थडगीं दिसत होतीं. कांहीं थडगीं अगदी साधीं होतीं. कांहींचं बांधकाम वैशिष्ट्यपूर्ण होतं. कांहींसाठीं संगमरवरी दगड वापरलेले होते. एखाद्या थडग्यावर उंच असा पांढराशुभ्र ' क्रॉस ' दिसत होता. ' माउंट हेब्रॉन सेमिटरीं'तल्या एकेक थडग्यापाशीं क्षणभर थांबून मी पुढं जात होतों. मला अज्ञात असणाऱ्या कितीतरी व्यक्ती अखेरची विश्रांती घेत तिथं विसांवलेल्या होत्या. बहुतेक सर्व थडग्यांवर त्या त्या व्यक्तींचीं नांवं लिहिलेलीं होतीं. अनेक ठिकाणीं जन्म–मृत्यु–दिनहि लिहिलेले होते. जन्म–मृत्यूंच्या दिनांकांची वजाबाकी करून, त्या त्या व्यक्तीला वयाच्या कितव्या वर्षी ह्या सुंदर जगाचा निरोप घ्यावा लागला त्याचा अंदाज घेण्याचा चाळा माझं मन करीत होतं. पंचाहत्तर......ऐंशी.......ब्याण्णव... ..तेवीस......अरेरे ! अवघ्या तेविसाव्या वर्षी या माणसाला मृत्यु आला ? कधींहि न पाहिलेल्या त्या अज्ञात व्यक्ती-



**एडवर्ड नामक व्यक्तीचें हें वशिष्टयपूर्ण पृथ्वीसदृश स्मारक 'माउंट हेब्रॉन सेमिटरी 'मध्यें या जागीं एडवर्ड चिरनिद्रा घेत विसांवला आहे.**

साठी माझं मन उगीचच हळहळत होतं. सॅम्युएल, व्हर्नर, सीफेस्ट, पॉटर, क्लफ्, मिशेल, प्रास्ट, बार्टन, स्ट्रॅांग, मार्टिन, इव्हॅन्स, स्कॉट, वार्कर.. .आणखी कितीतरी. अक्षरश: असंख्य जीव तिथं चिरनिद्रा घेत होते. मला कुसुमाग्रजांची मातीची दर्पोक्ति' आठवली :

'स्वामित्व जगाचें अखेर अमुच्या हातीं
मातीवर चढणें एक नवा थर अंतीं!'

मातीची ती 'दर्पोक्ति' नव्हती! माती खरंच बोलत होती! जीवनांतल्या आपल्या साऱ्या धडपडीचा, आशाआकांक्षांचा, पराक्रमांचा, उन्नतीचा, अवनतीचा, क्षुद्र मानापमानांचा, हर्ष–विमर्शांचा अखेर शेवट काय असतो? जगांतल्या ज्या साऱ्या सौंदर्याचा अखेरच्या श्वासापर्यंत आपण हव्यास वाळगतों तीं अखेर कुठ जातात?.... 'मातीवर चढणें एक नवा थर अंतीं' . .आणि तरीहि माणसं प्रेम करतात, राग करतात, लोभ करतात. आपल्या प्रिय व्यक्तीचा क्षणभरसुद्धां विरह होऊं नये म्हणून चालू क्षणाला घट्ट धरून ठेवण्याची केविलवाणी धडपड करतात. ते क्षण हातांतून ओघळलेच तर इथं नाही, पण दुसऱ्या कुठल्यातरी जगांत आपल्या प्रिय व्यक्तीची पुन्हा भेट होईल अशी श्रद्धा वाळगतात.

फिरतांफिरतां एका विशिष्ट बांधकाम केलेल्या थडग्यापाशीं माझीं पावलं नकळत थांबलीं. 'माउंट हेब्रॉन सेमिटरीं'तल्या इतर अनेक थडग्यांपेक्षां त्या थडग्यानं माझं लक्ष विशेष वेधून घेतलं होतं. सुमारं दहाबारा फूट लांब आणि सातआठ फूट रुंद अशा सहा इंच उंचीच्या पांढऱ्याशुभ्र ओटयावर मध्यभागीं एक चौथरा होता. चौथऱ्यावर पृथ्वीसारखा दिसणारा ब्राँझच्या पट्टयांचा एक गोल होता. त्याला मधून छदणारा पृथ्वीसारखाच एक आंसहि होता. मध्यभागींचा पट्टा जरा रुंद होता. त्या पट्टयाच्या बाहेरच्या बाजूनं, मला न समजणाऱ्या लिपींत ( मला ती लिपि 'ग्रीक अँड लॅटिन'च होती ! ) कांहींतरी कोरलेलं होतं. बहुधा ते आंकडे असावेत ! कारण त्या पट्टयाच्या आंतल्या बाजूनंहि रोमन लिपींत एकपासून चोवीसपर्यंतचे आंकडे कोरलेले होते. आंकडयांच्या संख्येवरून आणि त्यांच्या मधें असणाऱ्या अगदीं सारख्या अंतरावरून दिवसाच्या चोवीस तासांचे निदर्शक असेच ते वाटले. पण त्याहिपेक्षां चौथऱ्यावर खोदलेला मजकूर मला विशेष लक्षणीय वाटला. दर्शनी भागावर मृताचं नाव होतं, – 'Edward.' त्याच्यापुढं कंसांत मृताच्या जन्ममृत्यूचीं वर्षं होतीं – 1883-1963. त्या चौथऱ्याच्या प्रत्येक बाजूवर एकेक ओळ असा खोदलेला मृत्युलेख ( Epitaph ) मला काव्यमय वाटला. मी लगेच त्या थडग्याचा फोटो घेतला अन् त्याच्यावरच्या मृत्युलेखाची नोंद केली :–

'The Hours part us
Briefly, but They
Bring Us Together
Again in Eternity.'

एडवर्डच्या सर्वांत जवळच्या व्यक्तीचा हा केवढा दुर्दम्य आशावाद ! अशा आशेच्या हिंदोळयांवर तर माणसांचीं मनं झुलतात. कोमेजलेलीं जीवनं पुन्हा फुलतात. एक फूल जळालं तर दुसरी कळी फांदीवर फुलारते. कधींकधीं ऋतुचक्रांत पतझडहि येते. फांद्याफांद्यांनी अंगाखांद्यांवर खेळवलेलीं सारीं हिरवीं पानं गळून पडतात. पण त्या निष्पर्ण अवस्थेंतहि फांदीफांदीच्या मनांत आशेचा हिरवा अंकुर तरारतोच 'If Winter Comes, Can Spring Be Far Behind ?' शतकानुशतकं, युगानुयुगं मातीवर चढणाऱ्या एकेक नव्या थरापेक्षां हा इवलासा अंकुर फार उंच असतो, फार मोठा असतो. युगायुगांच्या मातीच्या थरांतूनहि तो डोकं वर काढतोच !

माँटक्लेअरचं वास्तव्य संपल्यावर आम्ही शिकागोजवळच्या बॅरिंग्टनला गेलों. आणि नंतर सुमारं महिन्याभरानं वॉशिंग्टनला आलों. वॉशिंग्टनला आल्यावर तिथल्या जगप्रसिद्ध दफनभूमीला भेट देणं अटळ होतं.

'अर्लिंग्टन नॅशनल सेमिटरी'! अमेरिकेचे ३५ वे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ्. केनेडी, आणि त्यांच्याचसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या इतर अनेक व्यक्तींची दफनभूमी!

अर्लिग्टनला आम्ही गेलों ती तारीख होती २५ ऑगस्ट १९६४. प्रेसिडेंट केनेडींना जाऊन अवघे नऊ महिनेच झालेले होते. तेव्हां अर्लिंग्टन नॅशनल सेमिटरींत जाऊन आमच्या 'ग्रुप 'तर्फे त्यांना श्रद्धांजलि वहाण्याचा कार्यक्रम 'एक्स्पेरिमेंट्'नं आयोजित करावा हें उचितच होतं.

दर वर्षी 'अर्लिग्टन नॅशनल सेमिटरी'ला सुमारं २० लाखांपेक्षां अधिक लोक भेट देतात. जगांतल्या कानाकोपऱ्यांतून आलेले भिन्नभिन्न देशांतले लाखों लोक वॉशिंग्टनला आल्यावर अर्लिग्टनला गेल्याशिवाय रहात नाहींत. त्यामुळं कोणत्याहि दिवशी आपण तिथं गेलों तरी लोकांची गर्दी असतेच.

त्या दिवशीं सकाळीं अकराच्या थोडंसं आधींच 'चार्टर बस'नं आम्ही अर्लिग्टनला जाऊन पोंचलों. वॉशिंग्टन आणि अर्लिग्टन यांच्या मधून 'पोटोमॅक्' नदी वहाते. नदीच्या पैलतीराला व्हर्जिनिया टेकडयांच्या उतारावर सुमारं सव्वाचारशें एकर जमिनीचा विस्तीर्ण परिसर 'अर्लिग्टन नॅशनल सेमिटरी 'नं व्यापलेला आहे. अमेरिकन यादवी युद्धापासून – म्हणजे सुमारं एक शतकापेक्षां अधिक काळापासून – ज्यांनीं ज्यांनीं राष्ट्रकार्य करीत असतां देह ठेवला अशा झुंजार सैनिकांची ही अखेरची विश्रांतिभूमि आहे. अर्लिग्टनच्या भूमींत दफन करण्याचा राष्ट्रीय सन्मान प्रामुख्यानं सैनिकी पेशांतल्या व्यक्तींसाठीं जरी राखून ठेवलेला असला तरी ज्यांचा सैनिकी जीवनाशीं दुरूनहि संबंध नाहीं अशा कांही व्यक्तींचं दफन अर्लिग्टनला झालेलं आहे. त्यांत अमेरिकन यादवी युद्धांत निष्कारणच बळी पडलेले कांही नागरिक आहेत. यादवी युद्धांत ज्यांची नुकतीच मुक्तता झालेली होती असे सुमारें ३८०० गुलाम त्या वेळीं वॉशिंग्टनला आले आणि एका भयानक सांथीला बळी पडले. त्यांनाहि अर्लिग्टनच्याच मातीनं आपल्या पांघरुणांत घेतलं. त्यांतले बरेचसे लोक तर अमेरिकेचे नागरिकहि नव्हते !

अर्लिग्टनच्या परिसरांत पाऊल टाकतांना जर प्रथम कुठला ठसा मनावर उमटत असेल तर तो तिथल्या घनदाट झाडीचा. अर्थात् इतकी घनदाट झाडी असली तरी 'अर्लिग्टन नॅशनल सेमिटरी'ला एखाद्या वेडयावांकडया वाढलेल्या जंगलाचं स्वरूप आलेलं नाहीं. तिथल्या दफनभूमीवर सर्वत्र हिरवीगार हिरवळ आहे. आणि वाहतुकीसाठी अत्यंत स्वच्छ व सुंदर असे चांगले बांधलेले रस्ते आहेत. सबंध दफनभूमींत पसरलेल्या त्या रस्त्यांची एकूण लांबी १३ मैल आहे. अशा बांधलेल्या रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना उंचउंच वृक्ष वाढलेले आहेत. ह्या रस्त्यांशिवाय तिथं असलेल्या कच्च्या पायवाटांची लांबीच तीन मैल भरेल.

दफनभूमीच्या जुन्या परिसरांत अनेक मोठमोठया व्यक्तींची दगडी स्मारकं आहेत. त्यांत अब्राहम लिंकनचा पुत्र – रॉबर्ट टॉड लिंकन, अमेरिकेंत 'Silver tongued Orator' म्हणून प्रसिद्ध असलेले विल्यम जेनिंग्स् ब्रायन, उत्तर


ध्रुवावर प्रथम पदार्पण करणारे अॅडमिरल रॉबर्ट पिअरी, अमेरिकेचे एके काळचे राष्ट्राध्यक्ष व 'चीफ जस्टिस' विल्यम हॉवर्ड टाफ्ट, 'फायटिंग फिल्' म्हणून एके काळीं ज्यांनीं नांव गाजवलं ते जनरल फिलिप किअर्नी, अॅडमिरल विल्यम टी. सॅम्प्सन्, अमेरिकेचे सेनापति जनरल जॉन जे. पर्शिंग, आणि दुसऱ्या महायुद्धानंतरचे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री जॉन फॉस्टर डल्लेस इत्यादि व्यक्तींचा अंतर्भाव होतो. यांपैकीं प्रत्येकानं अमेरिकेच्या इतिहासांत नमूद केली जाईल अशी राष्ट्रीय मोलाची कामगिरी बजावलेली आहे.

या प्रसिद्ध व्यक्तींशिवाय वॉशिंग्टनच्या क्रांतिसैन्यांतले 'कॉंटिनेंटल् सोल्जर्स', इ. स. १८१२ मधें मरण पावलेले १४ अमेरिकन सैनिक आणि खलाशी, हॅवाना बंदरात झालेल्या स्फोटांत ठार झालेले २२९ अमेरिकन्स, आणि यांच्याशिवाय कितीतरी अज्ञात व्यक्ती तिथं चिरनिद्रा घेत आहेत. अशा शेंकडों लोकांच्या स्मारकांच्या संगमरवरी दगडांच्या असंख्य पांढऱ्याशुभ्र शिस्तबद्ध ओळी अर्लिंग्टनमधें दूरवर पसरलेल्या दिसतात.

'अर्लिंग्टन नॅशनल सेमिटरी' ही जगप्रसिद्ध दफनभूमी अस्तित्वांतच कशी आली यासंबंधीचा इतिहास ऐकण्यासारखा आहे.

अर्लिंग्टनमधें एका उंच टेकाडावर एक पांढरीशुभ्र इमारत आहे – 'कस्टिस–ली–मॅन्शन.' जॉर्ज वॉशिंग्टनचा दत्तक नातू –जॉर्ज वॉशिंग्टन पार्क कस्टिस् यानं ती १८०२ सालीं बांधली. कस्टिस्ला त्याच्या वडिलांकडून ११०० एकर जमिनीचा वारसा मिळालेला होता. या जमिनीवर बांधलेल्या त्या इमारतीत त्याला जॉर्ज वॉशिंग्टनचं स्मारक करायचं होतं. अमेरिकेच्या त्या पहिल्या राष्ट्राध्यक्षाचीं कांहीं स्मृतिचिन्हंहि कांहीं काळ तिथं ठेवलेली होती. पुढं कस्टिस्ची मुलगी मेरी हिनं रॉबर्ट ली नावाच्या एका सेनाधिकाऱ्याशीं विवाह केला. हा रॉबर्ट ली सैन्यांतला एक अत्यंत नांवाजलेला शूर अधिकारी होता. दक्षिणेकडच्या राज्यांच्या फाटाफुटीच्या प्रसगीं प्रसिडेंट लिंकननं त्याला संघराज्याच्या सैन्यांत मोठी जागा देऊं केली. पण त्यानं ती झिडकारली. पुढं संघराज्याच्या सैन्यानं अर्लिंग्टनचा ताबा घेतला त्या वेळीं मिसेस् ली आपले प्राण वांचवण्यासाठी तिथून निसटली.

१८६४ मधें वॉशिंग्टनच्या सर्व दफनभूमींमधें प्रेतांचे खच पडले. त्यांना पुरण्यासाठी कुठंहि जागा सांपडेना. तेव्हां आतां दफनांसाठी एखादी नवीन विस्तीर्ण जागा शोधणं प्राप्त झालं. त्या वेळचे युद्धमंत्री नवीनच उद्भवलेल्या या प्रश्नानं बेचैन झाले. त्यांनी राष्ट्रीय दफनभूमीसाठी एखादी चांगलीशी जागा शोधण्याचा आदेश जनरल मॉंटगॉमेरी मिग्स् याला दिला. वास्तविक जनरल मिग्स् हा रॉबर्ट लीचा एके काळचा जवळचा मित्र होता. पण रॉबर्टनं संघराज्याच्या विरुद्ध घेतलेली भूमिका म्हणजे एक विश्वासघाताचं कृत्य आहे असं जनरल मिग्स् याला वाटत होतं. त्यामुळं



'अर्लिंग्टन नॅशनल सेमिटरी'ची पूर्ण कल्पना देणारें विमानांतून घेतलेलें छायाचित्र. ऐतिहासिक महत्त्वाच्या अगणित अमेरिकन व्यक्ती येथें मरणोत्तरहि शिस्तबद्धता पाळीत असल्याचें दिसत आहे.

—बहुधा सूडबुद्धीनंच — त्यानं स्मशानभूमीसाठीं रॉबर्ट लीच्या इस्टेटीची शिफारस केली.

मिसेस् लीची एवढी अफाट इस्टेट असूनहि, युद्धाच्या धामधुमींत ती पळाल्याने तिच्याकडून येणं असलेल्या अवघ्या ९२ डॉलर्स व ६ सेंट्स्च्या कराच्या वसुलीपोटीं सरकारनं तिची सर्व इस्टेट तेवढ्याच रकमेवर विकत घेऊन टाकली. पुढं लीच्या मुलानं सरकारवर फिर्याद केली. त्यानं दावा जिकला. आणि मग १८८३ मधें सरकारनं ती इस्टेट १५०००० डॉलर्सना पुन्हा विकत घेतली.

विलयम ख्रिस्टमन हा पेन्सिल्व्हानियाच्या ६७ व्या पायदळांतला शिपाई 'अर्लिंग्टन नॅशनल सेमिटरीं'त दफन झालेला पहिला मानकरी !

सैनिकी इतमामानं होणाऱ्या दफनविधीचं दृश्य विशेष गांभीर्यपूर्ण व दरबारी थाटाचं वाटतं. राष्ट्रध्वजान आच्छादलेली शवपेटी एका घोडागाडींत ठेवलेली असते. अगदीं एकसारखे दिसणारे सात काळे किंवा करड्या रंगाचे घोडे त्या गाडीला जोडलेले असतात. ह्या घोडागाडीच्या बरोबर अत्यंत निवडक असे सैनिक चालत असतात

ह्या गांभीर्यपूर्ण मिरवणुकीच्या पुढं मिलिटरी बँड असतो. पण ह्या बँडमधील 'ड्रम' आच्छादित करून त्याचा आवाज कमालीचा मंद केलेला असतो. कर्नल किंवा त्यापेक्षां वरील हुद्याच्या अधिकाऱ्याची शवयात्रा असल्यास, घोडेस्वारावांचून चालणारा खोगीर घातलेला एक घोडा त्या घोडागाडीच्या मागून चालत असतो. त्या घोड्याच्या रिकिबींत दोन उलटे बूट ठेवलेले असतात. हे उलटे बूट नेत्याचं निधन सूचित करतात. शवपेटीच्या घोडागाडीच्या मागून स्वारावांचून घोडा चालवण्याची रूढी अनेक वर्षांची जुनी आहे. फार प्राचीन काळीं योद्ध्याच्या दफनाच्या वेळीं घोड्याचा बळी देण्याची रूढी होती. आधुनिक काळांत शवयात्रेंत घोडागाडीमागून स्वारावांचून चालणारा घोडा हा त्या प्राचीन परंपरेचा अवशेष असावा.

सैन्यांतले 'जनरल' किंवा 'फ्लॅग ऑफिसर्स' किंवा उच्च दर्जाचे सरकारी अधिकारी यांना दफनभूमीवर अकरा ते सतरा तोफांची सलामी दिली जाते. पण मृताचा दर्जा कोणताहि असो, 'अर्लिंग्टन नॅशनल सेमिटरीं'त त्या प्रत्येकाचा दफन-विधि फार मोठ्या दजदार रीतीनं पार पाडला जातो यांत शंका नाहीं. सर्व प्रमुख पंथांचे धर्मगुरू सहज रीतीनं तिथं अंत्यसंस्कारांसाठी उपलब्ध होऊं शकतात. अर्लिंग्टनच्याच परिसरांतल्या 'फोर्ट मायर चॅपेल'चाहि उपयोग कुणाला हवा असल्यास करतां येतो.

अर्लिंग्टनच्या दफनभूमीवर असलेलं एक विशिष्ट स्थान – 'द टुम्ब ऑफ दि अन्नोन सोल्जर' ('The Tomb Of The Unknown Soldier') –सेमिटरीला भेट देणाऱ्या लोकांच्या दृष्टीनं महत्त्वाचं आहे. कारण युध्दांत आणि इतरहि कांहीं प्रसंगीं असे कांही अज्ञात वीर राष्ट्रासाठीं बलिदान करून जातात कीं ज्यांचीं नांवसुद्धां अखेरपर्यंत अज्ञातच रहातात. अशा अज्ञात अमेरिकनांचं हें राष्ट्रीय स्मारक असल्यानं तिथं येऊन त्यांना आपली श्रद्धांजलि वहाणाऱ्या लोकांची नेहमींच गर्दी असते. दररोज सुमारं ४५०० पेक्षां अधिक लोक ह्या ठिकाणाला भेट देतात. ता. ९ एप्रिल १९३२ रोजीं हें स्मारक आजच्या स्वरूपांत बांधून पूर्ण झालं, अन् तेव्हांपासूनच जनतेला दर्शनासाठीं तें खुलं करण्यांत आलं आहे.

ह्या स्मारकाच्या दर्शनी भागावर खोदलेल्या तीन आकृती पहिल्या महायुध्दां-तील मित्रराष्ट्रांमधील भावना सूचित करतात. स्मारकाजवळ एक 'अँफीथिएटर' बांधलेलं आहे. त्या बाजूच्या स्मारकाच्या भिंतीवर पुढील शब्द कोरलेले आहेत:–

'Here Rests In
Honored Glory
An American
Soldier
Known But To God.'

अज्ञात सैनिकाच्या ह्या स्मारकाचं बांधकाम संपूर्णपणं संगमरवरी दगडांत केलेलं आहे. कोलोरॅडो येथील खाणींतून खास आणवलेल्या संगमरवरी दगडाला व्हर्माँटमधें योग्य त्या प्रकारचा प्राथमिक आकार देण्यांत आला. नंतर अर्लिंग्टनमधें सध्याच्या ठिकाणी वसवल्यावर मग त्यावरचं कलाकुसरीचं नक्षीकाम व इतर नाजुक खोदकाम करण्यांत आलं.

त्या ठिकाणीं प्रथम अज्ञात सैनिकाचं दफन करण्यांत आलं त्या वेळीं – म्हणजे युद्धतहकुबीच्या दिवशीं – ता. ११ नोव्हेंबर १९२१ ला प्रेसिडेंट वॉरेन हार्डिंग हे स्वत: उपस्थित होते. अमेरिकेंत आजपर्यंत आलेल्या अनेक राजामहाराजांनीं, राष्ट्राध्यक्षांनीं, राजदूतांनीं त्या जागीं येऊन आपली श्रद्धांजलि वाहिलेली आहे.

पहिलं व दुसरं महायुद्ध आणि कोरियन युद्ध या तीनहि युद्धांतील आत्मार्पण केलेल्या एकेका अज्ञात सैनिकाच्या अवशेषांचं तिथं दफन केलेलं आहे.

अमेरिकन सैन्यामधून ज्यांची खास निवड झालेली आहे असे सैनिक ह्या स्मारकाच्या जागीं आळीपाळीनं चोवीस तास सन्मानदर्शक पहारा देत असतात. जुन्या चालीला अनुसरून मृताला सन्मान देण्यासाठीं, रक्षकाचा जो खांदा स्मारकाच्या विरुद्ध बाजूला असेल त्याच्यावरच नेहेमीं बंदूक टेकली जाईल अशी खबरदारी घेण्यांत येते. इथं 'गार्ड ऑफ ऑनर' देणाऱ्या सैनिकाचा चेहेरा सदैव गंभीर असतो, आणि अगदींच अपवादात्मक परिस्थिति उद्भवली तरच त्याला कुणाशीं बोलतां येतं. आठ तास अशा रीतीनं 'गार्ड ऑफ ऑनर'ची 'ड्यूटी' केल्यावर त्या गार्डला नंतर ४८ तास विश्रांती देण्यांत येते.

एक रक्षक बदलून दुसरा रक्षक त्याची जागा घेतो, हा 'Changing of the Guards' चा कार्यक्रम पहाण्यासाठी ठराविक वेळीं लोक धांवतपळत तिथं येतात. आम्हीसुद्धां अशीच घाईगडबड करून बरोब्बर अकराला कांहीं मिनिटं कमी असतानांच तिथं जाऊन पोंचलों.

खास समारंभासाठींच वापरला जाणारा सैनिकांचा गडद निळ्या रंगाचा गणवेष प्रत्येक गार्डनं घातलेला असतो. त्याच्याजवळ सध्या अमेरिकन 'इन्फन्ट्रीं'त वापरली जाणारी 'M-14' रायफल असते. रायफलीच्या वरच्या बाजूला 'क्रोम –प्लेटेड' चकचकीत 'बायोनेट' लावलेलं असतं. 'गार्डस्'च्या वरच्या अधिकाऱ्यां-जवळ ·45 कॅलिबरचं पिस्तुल असतं. या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं त्यांच्या 'ऑर्डर्स' प्रमाणंच गार्डस्च्या अदलाबदलीचा कार्यक्रम पार पाडला जातो. जगांतल्या निर-निराळ्या देशांतले लोक हा कार्यक्रम पहाण्यासाठीं तिथं येत असतात. त्यामुळं सर्वांच्या मनावर छाप पडेल अशाच उमद्या व्यक्तिमत्त्वाच्या सैनिकांची 'गार्डस्' म्हणून विशेष कसोशीनं निवड करण्यांत येते. प्रत्येक गार्डची उंची ६ फूट ते ६ फूट ३ इंच असली पाहिजे, त्याचं चारित्र्य चांगलं असलं पाहिजे, वगैरे गोष्टी गार्डची निवड

करताना फार कटाक्षानं पाळल्या जातात. अशी निवड झाल्यावरदेखील निवडलेल्या गार्डस्‌ना दोन ते चार आठवड्यांचा खास शिक्षणक्रम पार पाडावा लागतो. प्रत्यक्ष ‘ड्यूटी’वर असतांना गार्ड एका सरळ रेषेंत मॅटवर शिस्तबद्ध पावलं टाकतो. मॅटच्या टोंकाला पोंचतांच तो स्मारकाकडे तोंड वळवतो आणि बरोबर २१ सेकंद स्तब्ध उभा रहातो. हा २१ सेकंदांचा वेळ तो मनांतल्या मनांत आंकडे मोजून निश्चित करतो. ‘ही एकवीसच सेकंदांची मर्यादा कशासाठीं ?’ म्हणून मीं तिथं चौकशी केली तेव्हां मला सांगण्यांत आलं कीं, ‘२१ तोफांची सलामी’ हा सैन्यामधें परमोच्च सन्मान मानला जातो. ‘२१ सेकन्दांची स्तब्धता’ ही त्या २१ तोफांच्या सलामीचं प्रतीक [illegible]

अज्ञात सैनिकाच्या स्मारकापासून अर्ध्या मैलावर प्रेसिडेंट जॉन एफ्. केनेडी यांची दफनभूमि आहे. आम्ही तिथं पोंचलों त्या वेळीं अक्षरशः शेंकडों लोक हातांत फुलं किंवा पुष्पचक्रं घेऊन एका लांबलचक ‘क्यू’मधें उभे होते. जगांतल्या काना-कोपऱ्यांतून अमेरिकेंत आलेले हजारों लोक प्रेसिडेंट केनेडींना श्रद्धांजलि वहाण्यासाठीं ‘अर्लिंग्टन नॅशनल सेमिटरी’ला भेट देतात. सरासरी दररोज १४००० लोक प्रे. केनेडींना तिथं श्रद्धांजलि वहातात असं आढळून आलं आहे. एखाद्या तीर्थयात्रेच्या ठिकाणचं स्वरूप व माहात्म्य प्रे. केनेडींच्या दफनभूमीला यावं अशीच त्यांची थोरवी [illegible]

[illegible] आम्ही गेलो होतो त्या वेळीं प्रे. केनेडींच्या थडग्याचं पक्कं बांधकाम झालेलं नव्हतं. प्रे. केनेडींची दोन लहान अपत्यं – एक मुलगा व एक मुलगी – पूर्वीच गेलेलीं होती. एका हिरवळीच्या जमिनीच्या तुकड्याभोंवती पांढऱ्या रंगाच्या उभ्या फळ्यांचं कंपाउंड घातलेलं होतं. आणि आंतमधें आपल्या दोन चिमुकल्या अपत्यांच्या अवशेषां-मधें प्रे. केनेडींचा मृत देह अखेरची विश्रांती घेत होता. प्रे. केनेडींच्या दफनाच्या जागीं मातीचा छोटासा उंचवटा होता. विशिष्ट प्रकारच्या झाडांच्या बारीक पानांनी तो आच्छादलेला होता. त्याच्या उतरणीवर एका बाजूला प्रे. केनेडींची ‘पी–कॅप’ ठेवलेली होती. मध्यभागीं गॅसची एक ज्योत (Eternal Flame) अखंड जळत होती. ज्यांनाज्यांना फुलं अगर पुष्पचक्रं अर्पण करायचीं होतीं त्यांना-त्यांना तीं कंपाउंडजवळच आंत किंवा बाहेर ठेवण्याची अनुमति होती.


आम्ही अमेरिकेला जाऊन परत आल्यानंतर प्रे. केनेडींच्या थडग्याचं कायमचं पक्कं बांधकाम पूर्ण झाल्याचं समजतं. आतां हल्ली असलेलं प्रे. केनेडींचं थडगं १८ × ३० फुटांचं बांधलेलं आहे. आणि त्याच्या भोंवतालचा ४२ × ६६ फुटांचा गच्चीसारखा भाग पांढऱ्याशुभ्र संगमरवरी दगडांनीं बांधून काढलेला आहे. ह्या उंच ओटयाच्या आजूबाजूला न्यू इंग्लंडमधली कांहीं फुलझाडं लावलेली आहेत. त्याचप्रमाणं प्रे. केनेडी ‘व्हाइट हाउस’मधें रहात होते त्या वेळीं तिथल्या बागेंत लावलेलीं खास जातीच्या

गुलाबांचीं झाडंहि आतां इथं आणून लावलेलीं आहेत. मिसेस् पॉल मेलॉन नांवाच्या बाईंनीं ह्या दफनभूमीच्या परिसरांतल्या बगीच्याची योजना केलेली आहे. गुलाबाच्या झाडांखेरीज, वसंत ऋतूंत फुलणारीं मॅग्नोलिआ, चेरी, हॉथॉर्न वगैरे फुलझाडंहि तिनं लावलेलीं आहेत.

आतां प्रे. केनेडींच्या दफनभूमीकडे जाणारी पायवाट चांगली बांधून काढलेली आहे. पुढं ही वाट वर्तुळाकृति आकार घेते. ह्या वर्तुळांत अर्लिंग्टनचा सर्वांत जुना, १५० वर्षांचा, ९० फूट उंचीचा एक प्रचंड ओकवृक्ष आहे.

प्र. केनेडीच्या दफनभूमीच्या परिसराची संपूर्ण योजना, रचना व प्रत्यक्ष बांधकाम वॉशिंग्टनच्या 'जॉन कार्ल वॉर्नेक अँड असोशिएट्स्' ह्या वास्तुशिल्प-शास्त्रज्ञांच्या कंपनीनं केलेलं आहे. ह्या सर्व बांधकामाच्या योजनेंत केनेडी-कुटुंबानं सल्लामसलतीपासून तों प्रत्यक्ष खर्चाचा कांहीं वांटा उचलण्यापर्यंत फार मोठं साहाय्य

**प्रे. केनेडींच्या पुनर्रचित स्मारकाचें दृश्य. चिरनिद्रा घेत असलेल्या प्रे. केनेडींचा शांतिसंदेश विश्वाला सांगण्याचें कार्य करीत असलेली ज्योत शेजारच्या वर्तुळांत दिसत आहे. बाजूला उभा आहे एक निग्रो गार्ड.**



केलेलं आहे. ' टेरेस ' च्या बांधकामासाठीं केनेडी–कुटुंबानं एकूण ३००००० डॉलर्स दिलेले असून, उरलेल्या १७७०००० डॉलर्सचा खर्च ' अमेरिकन काँग्रेस 'च्या संमतीनं सरकारनं केलेला आहे.

प्रवाशांची फार गर्दी असते त्या वेळीं तिथं तीन ' गार्डस् ' असतात. इतर वेळीं दोन असतात. पण ' द टुम्ब ऑफ द अन्नोन् सोल्जर'जवळ जसा चोवीस तासांचा ' गार्ड ऑफ ऑनर ' असतो तसा मात्र इथं ठेवलेला नाहीं. फार काय, इथले गार्डस् ' अटेन्शन 'मधेंही उभे नसतात. फक्त तिथला ' ट्रॅफिक कंट्रोल ' करणं, लोकांनीं विचारलेल्या लहानसहान प्रश्नांचीं उत्तरं देणं, एवढंच काम ते करतात. चाळीस मिनिटांच्या ' ड्यूटी'नंतर ह्या गार्डस्ना वीस मिनिटं सुटी मिळते. एकेकटी व्यक्ति किंवा गटागटानं जे लोक येतात त्यांना, पुष्पचक्रं अर्पण करण्याच्या वेळीं तिथले गार्डस् मदत करतात. सबंध दिवसभरांत अशीं कितीतरी पुष्पचक्रं प्रे. केनेडींना श्रद्धांजलि म्हणून वाहिलीं जातात. देशविदेशचे नेते, मोठमोठे अधिकारी, जगांतल्या अनेक थोर व्यक्ती तिथं येऊन पुष्पचक्रं अर्पण करतात.

प्रे. केनेडींच्या थडग्याजवळच्या उतरत्या भिंतीवर त्यांच्या भाषणांतले कांहीं छोटे उतारे खोदलेले आहेत. ह्या केनेडी-वचनांमधलं प्रत्येक अक्षर ' कॅपिटल ' असून चार इंच उंचीचं आहे. स्वतः श्रीमती जॅकेलिन केनेडी यांनीं या सात उताऱ्यांची निवड केलेली आहे.

एका ठिकाणी प्रे. केनेडी यांनीं म्हटलं आहे :–

'Let every nation know
whether it wishes us well or ill,
that we shall pay any price,
bear any burden, meet any hardship,
support any friend, oppose any foe
to assure the survival
and success of liberty."

तिथं खोदलेलं प्रे. केनेडीचं दुसरं एक वचन असं आहे :–

'In the long history of the world,
only a few generations have been granted
the role of defending freedom
in its hour of maximum danger.
I do not shrink from this responsibility,
I welcome it.'

आणि अखेरच्या दोन वचनांत प्रे. केनेडी म्हणतात, –

'And so my fellow Americans, ask not what your country can do for you, ask what you can do for your country. My fellow citizens of the world, ask not what America will do for you, but what together we can do for the freedom of man.'

'With good conscience our only sure reward with history the final judge of our deeds, let us go forth to lead the land we love, asking His blessing and His help, but knowing that here on Earth God's work must truly be our own.'

अशी भव्य, उत्तुंग, उदात्त विचारसरणी असलेल्या एका महान् व्यक्तीच्या अखेरच्या विश्रांतिस्थळीं आम्हीं आलों होतों. 'क्यू'मधें उभे राहिलों असतों तर फार वेळ लागला असता. त्या वेळीं आम्हीं अमेरिकेचे पाहुणे होतों. म्हणून आम्हांला रांगेंत उभं न करतां तिथल्या पोलिस-प्रमुखानं एका अधिकाऱ्याबरोबर वेगळचा मार्गानं प्रे. केनेडींच्या दफनभूमीजवळ नेलं. ह्या प्रकारामुळं इतरांचा आमच्यासंबंधीं काय समज झाला कुणास ठाऊक ! पण वेगळ्या गटानं आम्ही तिकडे जात असतांना अनेकांनीं आमचे फोटो घेतले. कांहींनीं चलच्चित्रपटहि घेतला. प्रे. केनेडींच्या स्मृतीला अभिवादन करून आम्ही पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजलि वाहिली.

तिथं कांहीं फोटो घेऊन थोडा वेळ मी तसाच स्तब्ध उभा राहिलों. अखिल मानवतेवर प्रेम करणारा एक थोर अंतरात्मा माझ्यासमोर विसांवला होता. राष्ट्राचं स्वातंत्र्य, व्यक्तींचं स्वातंत्र्य, शांतता, समता, परस्परबंधुभाव ह्या मानवतेच्या मूल्यांसाठीं अखेरपर्यंत अविश्रांत झगडणारा एक देखणा मानवदेह आतां तिथं अखेरची चिरनिद्रा घेत होता. त्यानं माझ्या राष्ट्राला संकटकाळीं किती तत्परतेनं मदतीचा हात दिला होता. चिनी आक्रमणाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं प्रे. केनेडींनीं मदत नाकारली असती तर ?......तर इतिहास कदाचित् वेगळाच लिहिला गेला असता ! ह्याबद्दल कृतज्ञतेची भावना मनात येणं उचितच होतं. पण आमची भावना समजून येण्याच्या पलिकडे आतां प्रे. केनेडी पोंचलेले होते !

मनांत आलं : कशासाठीं केली ही सारी धडपड त्यांनीं ? कोटचाधीशाच्या घरांत जन्म मिळालेला. अफाट श्रीमंतीमुळं आवश्यक त्यापेक्षांहि मोठी सामाजिक प्रतिष्ठा मिळालेली. सुंदर पत्नी, गोंडस गोजिरवाणीं मुलं........जगांतलीं सारीं सुखं पायाशीं लोळण घेत होतीं. अधिक काय हवं होतं त्यांना ?...आणि अखेर काय मिळालं ? .......कशासाठी आपला जीव त्यांनी धोक्यांत घातला ?.....कशासाठीं आपला देखणा देह त्यांनी मातीला मिळवला ?....जीवनांतले, ह्या मानवी जगांतले महत्त्वाचे सारे

मानसन्मान मिळवले त्यांनीं.....अखेर त्यांच्या बरोबर काय आलं ?....पण हा विचारच बरोबर नाहीं ! अखेर ह्या जगाचा निरोप घेऊन मातींत मिसळतांना कुणाबरोवर काय येतं ?

'धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे
भार्या गृहद्वारि जनः श्मशाने ।
देहश्चितायां परलोकमार्गे
कर्मानुगो गच्छति जीव एकः ॥'

— प्रे. केनेडीच्या जीवानं जें बरोबर नेलं तें दुसऱ्या कुणाला मिळवायला सात जन्मांची पुण्याईसुद्धां अपुरीच पडेल !

□

# नव्या जगांतला पहिला श्वास....

आपल्या नेहमींच्या गडबडीच्या नि धांवपळीच्या दैनंदिन जीवनांतून एखाद्या दिवशीं अमेरिकन लोक वेळ काढतात, आणि त्यांच्याच कुणा स्नेह्या-सोबत्याच्या घरी पार्टीसाठीं ते जमतात. असल्या पार्टीला कांहीं निमित्त लागतं का ? असलंच तर एखादं दुसरं क्षुल्लक निमित्त त्यांना पार्टी करायला पुरेसं होतं. नाहींतर कित्येकदां त्याचीहि गरज भासत नाही. थोडेसे पैसे खर्च करायची तयारी, जवळच्या किंवा दूरच्या परिचित स्त्रीपुरुषांबरोबर खाण्यापिण्यांत एक सुंदर संध्याकाळ व्यतीत करण्याची उत्कट इच्छा, एवढ्याच गोष्टी एखाद्याकडे पार्टी व्हायला पुरेशा असतात. बदलत्या ऋतुमानानुसार अशी एखादी संध्याकाळ सुंदर असतेच असं नाहीं. पण ती तशी नसली तरी पार्टीसाठीं जमलेल्या स्त्रीपुरुषांच्या मनमोकळ्या सहवासांत ती सुंदरच होऊन जाते.

अमेरिकेंत हें पार्टी करण्याचं वेड मला फार मोठ्या प्रमाणांत दिसलं. बहुधा शनिवारची संध्याकाळ ही पार्टीसाठीं पसंत केली जाते. इष्ट मित्रांना—मैत्रिणींना पत्रानं अगर फोनवरून आमंत्रणं दिलीं जातात. स्वत: घरीं येऊन ' अक्षत ' दिली नाहीं म्हणून कुणी रागावून रुसून बसत नाहीं ! तरुणांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सर्व वयांच्या स्त्रीपुरुषांना आमंत्रण असतं. लहान मुलं मात्र कटाक्षानं घरीं ठेवलीं जातात किंवा अन्यत्र सोयीच्या ठिकाणीं पोंचवलीं जातात. कित्येकदां ' टीन-एजर्स'नाहि बोलावीत नाहीत. त्यांच्या वयाच्या मुलामुलींबरोबर त्यांच्या वेगळ्या पार्ट्या

होतात. त्या पाटर्यांना वडीलमाणसांना मज्जाव असतो. असली एखादी पार्टी बाहेर कुठं असली तर शहाणीं वडीलमाणसं तिकडे फिरकतसुद्धां नाहींत. आणि घरांतच पार्टी असली तर मोठीं माणसं बाहेर कुठंतरी जाऊन मुलांना मोकळेपण देतात.

पार्टी घरांतच असली तर व्यवस्थेचा फारसा प्रश्न नसतो. पण घराच्या मागच्या किंवा पुढच्या मोकळ्या जागेंतल्या हिरवळीवर असली तर मात्र अमेरिकन कुटुंब-प्रमुखाची धांदल कांहीं विचारूं नका ! अशा वेळीं सकाळपासूनच पार्टीच्या जागीं ठराविक अंतरांवर विजेचे दिवे लावण्यासाठीं खांब पुरण्यापासून तों टेबलांची मांडा-मांड करून त्यांच्यावर चढून सर्वत्र विजेचे दिवे लावण्यापर्यंतचीं सर्व कामं तो स्वतःच करतो. नोकरमाणसं सहसा नसतातच, तेव्हां आरडाओरडा करून हाताखालच्या माणसांकडून काम करून घेण्याचा प्रकार तिकडे फारसा कधीं दिसत नाहीं. फार तर आपला एखादा मुलगा किंवा आमच्यासारखा पाहुणा थोडीशी मदत करायला तो हाताखालीं घेतो. कोणतंहि काम करणं अमेरिकेंत 'हलकं' समजलं जात नाहीं. त्यामुळं फायलींचा मोठा गठ्ठा हातांत घेऊन आपल्या हाताखालच्या एखाद्या कार-कुनाकडे जाण्यांतहि अमेरिकन साहेबाला लाज वाटत नाहीं. आपल्याकडचे 'विभाग प्रमुख' ऑफिसांतच नव्हे, तर घरींसुद्धां बायकोशीं वागतांना आपण 'हेड ऑफ द डिपार्टमेंट' आहोंत हें विसरत नाहींत ! अशाच एका विभागप्रमुखानं आपल्या बायकोला पत्र लिहितांना नेहमींच्या संवयीनं शेवटीं सहीच्या खालीं 'विभागप्रमुख' असं लिहिल्याचं मीं ऐकलंय् ! पण अमेरिकेंत पार्टीसाठीं जमणारे सारे लोक आपण कोण आहोंत हें विसरतात, आणि सर्वांशीं समतेनं, स्नेहभावनेनं वागून जीवनांतला दोन घडींचा आनंद लुटतात.

जीवनाच्या घडीभराच्या वस्तीकडे अशा विशिष्ट आरोग्यपूर्ण दृष्टिकोनांतून बघण्याचा संसर्ग अमेरिकेंत रहाणाऱ्या आपल्या भारतीय लोकांनाहि झालेला आहे. अशाच भारतीय लोकांपैकीं श्री. रवींद्र आग्रवाल व सौ. राजेश आग्रवाल ह्या तरुण नि सदा हंसतमुख जोडप्याचा परिचय माँट्क्लेअरमधें झाला. हे रवींद्र आग्रवाल त्या वेळीं २८–२९ वयाचे होते. 'माँट्क्लेअर स्टेट कॉलेज'मधून ६४ सालीं एम्. ए. झाल्यावर न्यूयॉर्कच्या एका कंपनींत 'अकौंटंट' म्हणून नोकरी करीत एकीकडे ते न्यूयॉर्क युनिव्हर्सिटींत 'मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन'चा अभ्यास करीत होते. सौ. राजेश ह्या 'माँट्क्लेअर स्टेट कॉलेजां'तच एम्. ए. चा अभ्यास करीत होत्या. आमचा भारतीय प्राध्यापकांचा 'ग्रुप' त्यांच्या कॉलेजांत आल्याचं त्यांना कळतांच सर्वांचा चांगला परिचय व्हावा म्हणून त्यांनीं १८ जुलै' ६४ ला संध्याकाळीं ७ वाजतां त्यांच्या घरीं एक पार्टी ठेवली होती.

परदेशांत – विशेषतः अमेरिकेंत – गेलेले कांहीं भारतीय किती मोकळ्या मनाचे बनतात ह्याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आग्रवाल पतिपत्नी ! अमेरिकेंत

गेल्यावर अवघ्या एक वर्षाच्या आंतच त्यांचा मित्रपरिवार खूपच मोठा झालेला होता. आणि विशेष म्हणजे त्या परिवारांत फक्त अमेरिकन लोकच नव्हते; तर इतरहि अनेक देशांतले लोक होते. त्या दिवशींच्या पार्टीला आम्ही सगळे मिळून एकूण २४ लोक उपस्थित होतों. त्यांत अमेरिकेच्या मिस् Elaine Hiller, अमेरिकेचेच Edgar Drechsel, Edmond Bagonzi, जमैकाचे Delvert Towles, त्यांची पत्नी Effie व मुलगी Vivian, कोरियाचे डॉ. Choong Rhee, फिनलँडची मिस् Martha Saija, इंग्लंडच्या मिस् Susan Kemp आणि मिस् Dolores Mandviwalla, ग्रीसची मिस् Kotsogiannis Constantina इत्यादि भिन्नभिन्न राष्ट्रांतल्या व्यक्ती होत्या. त्या दिवशीं एक छोटंसं अनौपचारिक आंतरराष्ट्रीय संमेलनच झालं होतं.

आग्रवाल रहात होते त्या एडमंड बॅगाँझी यांच्या घरांत आम्हीं प्रवेश करतांच आम्हांला एकदम हिंदुस्थानांत आल्याचा भास झाला. कारण आग्रवालांनीं त्यांच्या रेडिओग्रॅमवर आपल्याकडच्या 'नागिन' ह्या हिंदी चित्रपटांतल्या गाण्यांच्या रेकॉर्डस् लावलेल्या होत्या. संध्याकाळच्या त्या सुशांत वातावरणांत हेमंतकुमारचा परिचित गंभीर आवाज कानीं पडतांच आग्रवालांशीं आमचं कुठलंतरी अज्ञात नातं एकदम जोडलं गेलं. त्यांचा-आमचा जणू कांहीं फार पूर्वीचा परिचय आहे, असा मोकळेपणा आमच्यांत निर्माण झाला.

सहज जिज्ञासेनं मीं रेडिओग्रॅमजवळच्या रेकॉर्डस् हातांत घेऊन पाहिल्या. 'Capitol International Recordings' कंपनीच्या त्या रेकॉर्डस् होत्या. त्या रेकॉर्डस्च्या कार्डबोर्ड बॉक्सच्या वरती हेमंतकुमारच्या फोटोखालीं 'लता मंगेशकर' नि लताच्या फोटोखालीं 'हेमंतकुमार' असं छापलेलं पाहून आम्ही भारतीय लोक खूप हंसलों.

आम्हीं घरांत प्रवेश करतांच आमच्या सर्वांच्या अंगावर सुगंधित 'सेंट्'चा फवारा सौ. आग्रवालांच्या एका मैत्रिणीने उडवला होता. लगेच दुसरीनं प्रत्येकाचं नांव आणि त्याच्या देशाचं नांव लिहिलेली चिठ्ठीहि प्रत्येकाच्या कोटाला किंवा शर्टला टांचली होती.

'बफे डिनर पार्टी' असल्यानं डिश्मध्यें हवे ते पदार्थ घेऊन उभ्याउभ्याच गप्पा मारीत आम्ही खात होतों. भात, मटारची चविष्ट उसळ, पुऱ्या, बटाट्याचा रस्सा, सामोसे, सर्व प्रकारच्या केक्स्, सँड्विचेस, बिस्किटं, फळं, फळांचे रस –असा एकदम भरगच्च मेनू होता.

खाणं-पिणं संपल्यावर प्रत्येकानं घरांत कुठंतरी एकीकडे जाऊन पार्टीला जमलेल्या सर्वांचीं नांवं आठवणीनं लिहून काढण्याचा खेळ आम्ही खेळलों. वास्तविक सर्वांची नांवं आधींच मीं माझ्या डायरींत लिहून घेतलेली होतीं. पण चोरून डायरीच

पानं न चाळण्याचा प्रामाणिकपणा मीं दाखवल्यानं, २४ पैकीं जेमतेम ८–१० नांवंच दिलेल्या थोड्या वेळांत आठवणीनं मी लिहूं शकलों. ह्या खेळांत इंग्लंडच्या मिस् डोलोरेस् मांडवीवालाचा पहिला नंबर आला. आपल्याकडच्या मराठी चित्रपटांतल्या रत्ना ह्या नटीसारखा चेहेरा असलेल्या ह्या उंच नि हाडापेरानं थोराड असलेल्या मुलीची आई इंग्लिश होती, असं तिनंच गप्पा मारतांना सांगितलं होतं. तिचे वडील पारशी असावेत. गप्पा, गाणीं नि निरनिराळे खेळ ह्यांच्यांत रात्रीचे ११ केव्हां वाजून गेले तें कळलंसुद्धां नाहीं.

दुसऱ्या दिवशीं रविवार होता. रुथ, मेरी आणि डोरिस ह्या तीन कॉलेज विद्यार्थिनींनीं त्यांच्या गाड्यांमधून सबंध मॉंट्क्लेअर गांवाची धांवती सफर आम्हांला घडवली. 'कॉव्हेंट सिटी' नांवाचं एक मोठ्ठं सुपर मार्केट, 'ईगल रॉक पिकनिक् पार्क', 'मॉंट्क्लेअर कम्युनिटी हॉस्पिटल', 'क्रेन टाउन', 'मॉंट्क्लेअर पब्लिक लायब्ररी', 'Clairidge Theatre' नांवाचं चित्रपटगृह, 'मॉंट्क्लेअर हायस्कूल', 'ब्लूमफील्ड अव्हेन्यू' 'कॅनॉन–बॉलहिल्' इत्यादि मॉंट्क्लेअरमधली प्रसिद्ध ठिकाणं आम्हीं पाहिलीं. आम्हीं गेलों त्या वेळीं 'क्लैरिज् थिएटर'मधें स्पेन्सर ट्रॅसीची भूमिका असलेला स्टॅन्ले क्रॅमरचा 'It's a Mad, Mad, Mad, Mad world' हा चित्रपट चालू होता. थिएटरमधें जाऊन बसण्याचा मोह झाला. पण बरोबर अनेक सहकारी असल्यानं तें जमलं नाहीं.

दुसऱ्या दिवसापासून – म्हणजे २० जुलैपासून आमचं कॉलेजांत जाणं पुन्हा सुरू झालं. सकाळी ८॥ ते ९॥ प्रो. डॉ. बॉन (Bohn) यांच्या वर्गांत मी जाऊन बसलों. सुमारं ५५ वर्षं वयाचे अतिशय स्मार्ट दिसणारे डॉ. बॉन हे इंग्रजीचे प्रोफेसर होते. त्या दिवशीं त्यांचं प्राचीन इंग्रजी वाङमयावर व्याख्यान होतं. 'व्हिक्टोरियन पीरिअड'मधील इंग्रजी वाङमयाचं विवेचन करतांना त्यांनीं त्या काळांतील स्त्रियांच्या पोषाखांचीं कांहीं चित्रं विद्यार्थ्यांना दाखवलीं. पुढं विवेचनाच्या ओघांत त्या काळांतील कलेचे नमुने दाखवण्यासाठीं म्हणून त्यांनीं प्रसिद्ध चित्रकारांनीं काढलेलीं नग्न स्त्रियांचीं कांहीं चित्रंहि विद्यार्थ्यांना दाखवलीं. त्या दिवशीं त्यांच्या वर्गांत आठ मुली नि सहा मुलं होतीं. तीं चित्रं दाखवतांना प्राध्यापकांच्या चेहेऱ्यावर नि पाहतांना विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर संकोचाचं कोणतंहि चिन्ह मला दिसलं नाहीं. आपल्याकडे एखाद्या प्रोफेसरनं कलाकृतीचे नमुने म्हणून कां होईना, पण अशीं चित्रं वर्गांत दाखवलीं तर वर्गांत केवढं संकोचाचं वातावरण निर्माण होईल! आणि शिवाय, 'हा उद्योग तुम्हांला कुणीं सांगितला होता? ह्याची काय गरज आहे?' – असा त्याला जाब विचारण्यांत आला असता तो वेगळाच!

त्यानंतर डॉ. गोर्मन, डॉ. कॉर्डास्को, डॉ. कॉर्निश इत्यादि प्रोफेसरांच्या वर्गांत मीं बसलों. पण प्रत्येक वर्गांत मला कमालीचं मोकळेपणाचं वातावरण दिसून आलं.

डॉ. कॉर्डास्को हे 'एज्युकेशन'चे प्रोफेसर होते. त्यांच्या वर्गांत मी गेलों त्या दिवशं ते 'एज्युकेशनल सोशिऑलॉजी' या विषयावर व्याख्यान देत होते. 'म्युझिक बिल्डिंग, मधला त्यांचा वर्ग एअरकंडिशन्ड होता.आपल्याकडच्या पहिल्या दर्जाच्या थिएटरमधें बाल्कनींत असतात तशा उत्कृष्ट २०० खुर्च्या त्या वर्गांत होत्या.वर्ग मोठा होता, पण त्या मानानं विद्यार्थी कमी होते. ३५ होते. त्यांत १५ विद्यार्थिनी होत्या. प्रो. कॉर्डास्को यांचं त्या दिवशीचं व्याख्यान प्रश्नोत्तरांवर आधारलेलंहोतं. वर्गांतल्या सर्वांत मागच्या रांगेंतल्या खुर्चीवर बसूनच प्रो. कॉर्डास्को हे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरं देत होते. प्राध्यापकांच्या लेक्चरचा कंटाळा आल्यावर विद्यार्थी अधूनमधून हळूच वर्गांतल्या मोठ्या घड्याळाकडे पहात होते.

......त्या दिवशीं 'कॅंप वॅपालानी'हून परत आल्यावर रात्रीं ८॥ ते १०॥ या वेळांत अमेरिकन तरुणतरुणींनीं त्यांचीं कांहीं लोकनृत्यं सादर केलीं. त्यानंतर सर्वांचा मिळून एक 'स्क्वेअर डान्स' चा कार्यक्रम झाला. वास्तविक पहातां पाश्चिमात्यांच्या नृत्यकलेंत मुळांत मला फारसा रस कधीं नव्हता. कारण आमच्या डोळ्यांपुढं तोंपर्यंत इंग्लिश लोकांचे फक्त 'बॉल डान्स'च होते.' बॉल डान्स 'च्या कितीतरी पटींनीं अधिक चैतन्य स्क्वेअर डान्समध्यें असतं हें त्या दिवशीं प्रत्यक्षच अनुभवाला आलं.

२३ जुलैला रात्रीं ८ते ९॥ या वेळांत भारतीय प्राध्यापकांच्या आमच्या ग्रुपनं Indian Nite' ' हा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाला सुमारं १०० विद्वान अमेरिकन प्रोफेसर्स आणि कांहीं विद्यार्थिविद्यार्थिनी उपस्थित होते. अमेरिकनांनीं ह्या कार्यक्रमाची कल्पना प्रथम आमच्यापुढं मांडली तेव्हां आम्हीत्यांना नम्रतेनं सांगितलं कीं, 'आम्ही फक्त प्रोफेसर्स आहोंत! आमच्यापैकीं कुणीहि खरा कलावंत नाहीं! आम्ही सादर केलेले कार्यक्रम पाहून भारतीय कलांच्या स्वरूपा-विषयीं नि दर्जाविषयीं तुमच्या मनांत मोठाच गैरसमज निर्माण होईल!' पण आम्ही विनयशीलतेनं स्वतःकडे कमीपणा घेत आहोंत असं मानून अमेरिकनांनी कार्यक्रम पक्का केलाच. तेव्हां आता आलेल्या प्रसंगाला शौर्यानं तोंड द्यायलाच पाहिजे, ह्या जाणिवेनं आम्हीं स्वतःच्या मनाचं सांत्वन केलं!

आमच्याबरोबरच्या भगिनीवर्गानं भारतांतून आणलेल्या हस्तकौशल्याच्या नमुन्यांचं त्या रात्री आम्ही एक छोटंसं प्रदर्शन भरवलं. आमच्याबरोबर आणलेल्या बिस्मिल्लाखानांच्या शहनाईची 'टेपरेकॉर्ड' आम्हीं सुरवातीला वाजवून अमेरिकन प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. नंतर प्रा. रमेश भट्ट यांनीं एक हिंदी भजन म्हटलं.त्यांच्या-पाठोपाठ प्रा. मजिथिया नि प्रा. अमर डेंब्ला यांनीं एक पंजाबी लोकगीत म्हटलं.त्या लोकगीताचा अर्थ आम्हांलासुद्धां समजत नव्हता. तेव्हां अमेरिकनांचा प्रश्नच नव्हता! ग्रुपमधल्या प्रत्येकानं कांहींतरी कार्यक्रम सादर केलाच पाहिजे या नियमानं पुढचा वेळी माझा घेतला गेला. त्यामुळं अत्यंत नाइलाजानं 'मायक्रोफोन' वर मीं 'ट्रेलर

ऑफ इंडियन फिल्म-साँग्स् ' हा कार्यक्रम सादर केला. हिंदी चित्रपटगीतांचा ' ट्रेलर ' सादर करण्याचं कारण एवढंच कीं कोणत्याहि चित्रपटगीताच्या पहिल्या दोन ओळींच्या पुढच्या ओळी मला माहीत नव्हत्या ! ह्या कार्यक्रमांत ' संगम ', ' बीस साल बाद ', ' शराबी ' ' फिर वोही दिल लाया हूँ ' आणि ' एक धागा सुखाचा ' हे पांच चित्रपट माझ्या साहाय्याला धांवून आले. खरंच सांगतों, मला गातां किंवा नाचतां येत नाहीं याची शरम मला त्या रात्रीइतकी कधींच वाटली नाहीं !

कार्यक्रम संपल्यावर खाण्यापिण्याच्या प्रसंगीं कांहीं अमेरिकनांनीं माझ्या आवाजाची नि गाण्याची स्तुति केली. पण तो त्यांच्या जन्मजात सौजन्याचा भाग असावा असं समजून मीं त्यांचं बोलणं फारसं मनावर घेतलं नाहीं. लहानपणापासून आम्ही सारेजण एक प्रकारच्या संकुचित सामाजिक दडपणाच्याच वातावरणांत वाढतों. त्यामुळं आम्हांला प्रत्येक गोष्टीची लाज वाटते. कुठं समारंभाला, पार्टीला गेलों तर तिथं मोकळेपणानं मनापासून खाण्यापिण्याचीसुद्धां आम्हांला लाज वाटते. नाचण्याचा तर विचारच करायला नको; पण गाण्याचीसुद्धां इतकी लाज वाटते कीं, इतर गाणीं तर राहूं द्याच, पण आमचं राष्ट्रगीतसुद्धां मोठ्यानं म्हणायची आम्हांला लाज वाटते. इतर कोणत्याहि देशात त्यांचं राष्ट्रगीत लहानापासून थोरांपर्यंत सर्वजण खड्या आवाजांत एकसुरांत म्हणतात. आमच्याकडे मात्र आम्ही सर्वजण त्या वेळीं शिस्तीनं शांतपणं नुसतं उभं राहिलों तरी पुष्कळ झालं असं म्हणायची वेळ येते !

सामाजिक प्रतिष्ठेच्या आमच्याकडच्या कल्पनाहि फार चमत्कारिक आहेत. त्यामुळं सहलीच्या प्रसंगींसुद्धां धांवणारी–पळणारी प्रौढ व्यक्ति इतरांच्या दृष्टीनं ' पोरकट ' ठरते ! पाश्चिमात्यांकडे––विशेषतः अमेरिकनांकडे – कुठलंहि सामाजिक दडपण व्यक्तिविकासाच्या आड कधींहि यायचं नाहीं. त्यांच्याकडे लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण असेल तशा आवाजांत गाणीं म्हणतात, देह सांवरून जमेल तसं धांवतात, नृत्य करतात, निरनिराळे खेळ अगदी निःसंकोचपणं खेळतात, पोहतात, पाण्यांतसुद्धां स्त्रीपुरुष परस्परांची चेष्टामस्करी करतात, धांवपळ, पाठलाग करतात. मुक्त मनानं, देहाची जाणीव विसरून जीवनाचा आनंद लुटतात. सर्वचजण असे वागत असल्यानं कुणीं कुणाला हंसण्याचा प्रश्नच तिकडे उद्भवत नाहीं. आमच्याकडे आमच्या संस्कृतीनं विनयशीलतेच्या नांवाखालीं कांहीं बंधनं आमच्या स्त्रियांवर घातलीं; पण कळत–नकळतपणं त्यांचं दडपण आमच्याकडच्या पुरुषवर्गावरहि पडलेलं आढळतं. इंग्रजांच्या दीडशें वर्षांच्या ' कडक कॉलरी 'च्या सहवासाचाहि कांहीं वांटा त्यांत असावा.

माँट्क्लेअरच्या माझ्या वास्तव्यामधले ता. २४, २५ आणि २६ जुलै ' ६४ हे अखेरचे तीन दिवस माझे फार सुखाचे गेले. तेवीस तारखेला मला एक निरोप मिळाला कीं ' माँट्क्लेअर स्टेट कॉलेज 'मधले डॉ. लॉरेन्स केन्यॉन् ( Lawrence

Kenyon ) ह्यांनीं मला नि आमच्याच ग्रुपमधल्या प्रा. अमल रॉय यांना 'वीक-एन्ड 'साठीं त्यांच्या घरीं रहायला येण्याचं आमंत्रण दिलं आहे. वास्तविक प्रा. डॉ. केन्यॉन् यांचा नि माझा तत्पूर्वी मुळींच परिचय नव्हता. सबंध ग्रुपमधून त्यांनीं आमचीच कां निवड केली तें कळलं नाहीं ! पण आमंत्रण आलंच आहे तर चला, एखाद्या अमेरिकन कुटुंबांत रहाण्याचा अनुभव तर मिळेल, ह्या विचारानं मीं आमचा होकार कळवला.

त्या दिवशीं म्हणजे शुक्रवारीं दुपारीं १२॥ ला कॉलेजच्या ' डायनिंग हॉल 'मधें डॉ. लॉरेन्स केन्यॉन् यांनीं आमच्याबरोबर जेवण घेतलं. त्या वेळींच प्रथम त्यांचा परिचय झाला. माँट्क्लेअरपासून तीसचाळीस मैलांवरच्या ' फ्लोरॅम पार्क ' ह्या छोटयाशा सुंदर गांवांत त्यांचं घर होतं. माँट्क्लेअरपासून १६ मैलांवर असलेल्या हॅनॉव्हर गांवच्या 'हॅनॉव्हर पार्क हायस्कूल 'मधें ते कायमचे शिक्षक होते. आणि 'माँट्क्लेअर स्टेट कॉलेज 'च्या ' समर स्कूल ' मधें ते ' एज्युकेशन ' या विषयाचे



**फोर्ड मॅन्शन . येथें जॉर्ज वॉशिंग्टनच्या राहणीचें यथातथ्य दर्शन घडतें. उणीव फक्त जॉर्ज वॉशिंग्टनचीच !**

प्रोफेसर म्हणून काम करीत होते. जेवणानंतर थोडा वेळ गप्पा मारून दुपारीं दीड वाजतां आम्ही डॉ. केन्यॉन् यांच्याच स्टेशनवॅगन्मधून फिरायला बाहेर पडलों.

प्रथम आम्हीं डॉ. केन्यॉन् ह्यांचं ' हॅनॉव्हर पार्क हायस्कूल ' पाहिलं. हायस्कूलचा निसर्गरम्य परिसर खूपच मोठा होता. सुमारं ६० एकर जमीन शाळेच्या ताब्यांत होती. शाळेंत त्या वर्षी एकूण १५५० विद्यार्थी होते. आणि त्यांची ने–आण करण्यासाठीं शाळेच्या मालकीच्या ३० स्कूल–बसेस् होत्या. शाळेला एक सुसज्ज लॅबोरेटरी आणि ऑडिटोरिअमहि होतं. ऑडिटोरिअममधें एकूण ६५० खुर्च्या होत्या. त्याची बांधणी अगदीं अद्ययावत् होती. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठीं चार टेनिसकोर्टहि होतीं. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना इतक्या सुसज्ज सुंदर शाळेंत मोफत शिक्षण मिळत होतं. स्थानिक लोक ( Local Community ) ती शाळा चालवीत होते. हॅनॉव्हरच्या सर्व नागरिकांना त्या शाळेच्या खर्चासाठी दरमहा ठराविक रक्कम कर म्हणून द्यावी लागत होती. डॉ. केन्यॉन् यांच्या या शाळेंत विद्यार्थी नि शिक्षक यांच्यांतील दुवा म्हणून काम करण्यासाठीं ' कौन्सेलर्स ' नेमण्याची पद्धत होती. शाळेच्या लायब्ररींत एका वेळीं २०० विद्यार्थी अभ्यास करूं शकतील अशी व्यवस्था होती. आणि लायब्ररींत १५००० पेक्षां अधिक ग्रंथांचा संग्रह होता.

हायस्कूलला धांवती भेट दिल्यावर तिथून कांहीं मैल दूर असलेल्या ' मॉरिस-टाउनशिप् 'मधली एक अत्यंत प्रसिद्ध नि मोठी अशी ' अलाइड केमिकल लॅबोरेटरी ' बघायला आम्ही गेलों. त्या कारखान्याची इमारत खूपच मोठी असून भोंवतालचं वातावरण फार सुंदर नि स्वच्छ राखण्यांत आलेलं होतं. फॅक्टरीच्या मोठ्या मोकळ्या आवारांत सर्वत्र भरपूर दाट हिरवीगार हिरवळ होती. हिरवळींतून छोटेसे सुंदर रस्ते बांधून काढलेले होते. आणि रस्त्यांच्या दुतर्फा छोटींछोटीं झुडपंहि होतीं. मधूनच एखादं कारंज हिरवळींतून आपली मान उंच करून थंडगार पाण्याच्या भिरभिरत्या तुषारांच्या नजरेनं इकडेतिकडे पहात होतं.

' अलाइड केमिकल लॅबोरेटरी'त सुमारं १६०० लोक काम करीत होते, आणि त्यांच्यासाठी सर्व प्रकारच्या सुखसोयी त्या एकाच मोठ्या इमारतीत केलेल्या होत्या. लॅबोरेटरीत कुठंहि गेलं तरी छतांत बसलेल्या अदृश्य ध्वनिवर्धकांतून अत्यंत सुंदर ' सॉफ्ट् म्युझिक ' पाझरत होतं. तिथं काम करणाऱ्या लोकांसाठीं उत्कृष्ट सोफासेट्म् असलेलीं विश्रांतिगृहं होतीं. प्रशस्त आणि स्वच्छ असे ' डायनिंग हॉल्स ' होते. ठिकठिकाणीं ' लिफ्ट्स् ' आणि फिरते जिनेहि होते. पोस्टऑफिस ( Mail Room ) होतं. प्रत्येक डायनिंग रूमला जोडलेलं स्वतंत्र किचनहि होतं. एक ' जनरल स्टोअर्स ' होतं. एक छोटंसं हॉस्पिटलहि होतं. फार काय, त्याच इमारतींत एक ' बार्बर्स शॉप'हि होतं ! तारा नि केबल्स् स्वीकारण्यासाठीं आणि पाठवण्यासाठीं स्वतंत्र यंत्रसामग्री बसवलेला एक वेगळा विभागच तिथं होता. दररोज शेंकडों तारा



**'फेअर्लो डिकिन्सन' युनिव्हर्सिटीची जुन्या वळणाची पण अद्ययावत् वास्तु. येथें एकदां प्रवेश केल्यावर नंतर पाय काढणें मुष्किल होऊन बसतें!**

त्यांना येत नि जवळजवळ तितक्याच तिथून बाहेर पाठवल्या जात. तेव्हां अशा एखाद्या स्वतंत्र विभागाची तिथं गरज होतीच.

फॅक्टरीच्या लोकांसाठी असलेल्या प्रेक्षागृहांत सिनेमासाठीं पडदा नि प्रोजेक्टरहि बसवलेला होता. एका वेळीं २०० लोक त्या प्रेक्षागृहांत आरामांत बसू शकत असत. एका मोठ्या हॉलमधें त्यांच्या अधिकाऱ्यांच्या कॉन्फरन्ससाठी खास ठेवलेलं एक सुंदर लांबट आकाराचं गुळगुळीत सागवानी टेबल होतं त्या टेबलाचीच किंमत २५००० डॉलर्स होती !

'अलाइड केमिकल लॅबोरेटरी'नंतर 'मॉरिसटाउन नॅशनल हिस्टॉरिकल पार्क'मधल्या 'फोर्ड मॅन्शन'ला आम्ही भेट दिली. अमेरिकेच्या क्रांतियुद्धाच्या काळांत १७७९–८० मधे स्वत जॉर्ज वॉशिंग्टननं हिवाळ्याच्या कडाक्याच्या थंडींत हें फोर्ड मॅन्शन' आपलं मुख्य वसतिस्थान बनवलेलं होतं. त्यामुळं साहजिकच अमेरिकनांना त्याच महत्त्व फार वाटतं. कर्नल जेकॉब फोर्ड ह्या शूर स्वातंत्र्यसैनिकानं इ. स. १७७२–७४ मधे बांधलेलं हें 'फोर्ड मॅन्शन' अजूनहि फार निगा राखून जसंच्या तसं ठेवण्यांत आलेलं आहे. त्यात जॉर्ज वॉशिंग्टनची लिव्हिंग रूम, डायनिंग रूम, त्याचं ऑफिस वगैरे खोल्यांत त्या काळांतील सर्व सामान, फर्निचर, पडदे, पोषाख वगैरेचं दर्शन घडतं.

दुसऱ्या दिवशीं केन्यॉन् कुटुंबाबरोबर पुन्हा एकदां 'नॅशनल हिस्टॉरिकल पार्क'-मधें यायचंच होतं. म्हणून 'फोर्ड मॅन्शन'मधें फार वेळ न घालवतां 'मॅडिसन'मधली

'फेअर्ली डिकिन्सन् युनिव्हर्सिटी' बघायला आम्ही गेलों. याच युनिव्हर्सिटीच्या लायब्ररींत आठवड्यांतून दोन दिवस मिसेस् केन्यॉन् काम करीत होत्या. ह्या युनिव्हर्सिटीची मुख्य बिल्डिंग भव्य असूनहि जुन्या वळणाची वाटली. तसं पाहिलं तर ही युनिव्हर्सिटी फार जुनी नाहीं. १९४१ सालीं तर तिची स्थापना झाली. त्या मानानं युनिव्हर्सिटीची लायब्ररी खूपच नवीन नि अद्ययावत् वाटली. युनिव्हर्सिटीच्या मुख्य इमारतींत प्रवेश केल्याबरोबर समोरच्या भिंतीवर, बाजूनं वरती जाणाऱ्या जिन्यांच्या भिंतीवर आणि वरच्या मजल्यांवरच्या भिंतींवरहि ठिकठिकाणीं अनेक मोठमोठीं 'ऑईल पेंट पेंटिंग्ज्', 'वॉटर कलर पेंटिंग्ज्' नि 'पेन्सिल स्केचेस्' लावलेलीं आढळलीं. या मोठमोठ्या भव्य आकारांच्या चित्रांमधें बरींचशीं चित्रं नग्न नि अर्धनग्न स्त्रियांचीं होतीं. कलेचे सुंदर नमुने म्हणून त्यांनीं तीं लावलीं असावींत. आमच्याकडे कलेचे 'असले' नमुने कुठं लावण्याची सोय नाहीं! आमच्याकडचे विद्यार्थी येतांजातां सहज गंमत म्हणून त्या चित्रांवर त्यांच्या अ-कलेचे नमुने सादर करायचे! आपल्याकडच्या शाळा–कॉलेजांच्या भिंतींवरचे विद्यार्थ्यांच्या कलेचे नमुने ज्यांनी पाहिले असतील त्यांना माझं हें विधान सहज पटेल!

आश्चर्याची गोष्ट अशी कीं तिथं लावलेल्या इतक्या चित्रांपैकीं एका चित्रातहि कांहीं 'सुधारणा' सुचवावी किंवा 'दुरुस्ती' करावी असं कुणालाहि वाटलेलं नव्हतं! तीं सारीं चित्रं जणूं काय नुकतींच लावलेलीं असावीत अशा अवस्थेंत होतीं.

नंतर पुढं त्यांच्या लायब्ररीत गेलों. तिथं वाचनालय विभागाला तीन बाजूंनी कांचेच्या भिंती होत्या. आजूबाजूच्या कपाटांमध्यें शेंकडों मासिकं–पुस्तकं ठेवलेलीं होती. आणि मध्यभागीं 'Poem of peace' या नांवाचा नग्न स्त्री–पुरुषांचा एक मोठा पांढराशुभ्र सुंदर पुतळा ठेवलेला होता. आम्ही तिथं गेलों त्या वेळीं त्या पुतळ्याच्या पलिकडेच एक विद्यार्थिनी कमालीच्या एकाग्रतेनं अभ्यास करीत बसली होती. आमच्या आगमनानंसुद्धां तिची समाधि भंगली नाहीं.

युनिव्हर्सिटी पाहून 'फ्लोरॅम पार्क'मधल्या डॉ. केन्यॉन् यांच्या बंगल्यांत आम्ही पोंचलों तेव्हां संध्याकाळचे ५॥ वाजले होते. घरांत कुणीच नव्हतं. मिसेस् मेरी केन्यॉन् ह्या कांहीं कामासाठीं त्यांची दुसरी मोटरगाडी — 'Volks Wagon' घेऊन बाहेर गेल्या होत्या. जर्मन बनावटीची ही छोटीशी 'व्होक्स वॅगन्' मोटरगाडी सध्या अमेरिकेंतल्या मध्यमवर्गांत खूपच लोकप्रिय झालेली आहे. तिची किंमत त्या वेळी सुमारं ३५०० रुपये होती.

मिसेस् केन्यॉन्ना परत यायला अजून अवकाश होता. आणि डॉ. लॅरी केन्यॉन्ना तर भूक लागली होती. म्हणून मग त्यांनीं घरांत जाऊन बाडगाभर बटाट्याचे वेफर्स नि क्रीम आणलं. एकीकडे टेलिव्हिजन पहात, गप्पा मारीत आम्ही वेफर्सचा समाचार घेऊं लागलों.

थोडयाच वेळांत मिसेस् केन्यॉन् त्यांच्या मुलांसह बाहेरून आल्या. मिसेस् मेरी केन्यॉन् सुमारं ५० वर्षं वयाच्या गृहिणी होत्या. डॉ. लॉरेन्स केन्यॉन् ह्यांचं वय ५१ होतं. पण वयाच्या मानानं ते खूपच तरुण दिसत होते. त्यांना चार मुलं होतीं. सर्वांत मोठी मुलगी लॉरेल ही २१ वर्षांची होती. लग्नानंतर तिच्या नवऱ्याबरोबर ती न्यूयॉर्कला राहात होती. तिच्याहून धाकटा असलेला १६ वर्षांचा मुलगा ब्रूस हा त्या वेळीं सायकलवरच्या सफरीसाठीं परगांवीं गेलेला होता. सध्या केन्यॉन् यांच्या घरांत त्यांची दोनच मुलं होती. ९ वर्षांचा मुलगा बॉबी आणि ८ वर्षांची मुलगी शर्ली. आईबरोबर हीं दोन छोटी मुलं घरांत आलीं. पण घरात पाहुणे आलेले पहातांच आईवडिलांच्या भोंवतीं न घोटाळतां आपापल्या खोल्यांत जाऊन खेळत बसलीं. आमची ओळख करून देण्यासाठीं त्यांना मुद्दाम बोलावून आणावं लागलं. मिसेस् केन्यॉन्‌ची आणि आमची ओळख झाल्यावर त्या स्वैपाकघरांत डिनरच्या तयारीला लागल्या.

थोडयाच वेळांत जेवायला आम्ही टेबलावर बसलों. मक्याचीं कोंवळीं उकडलेलीं कणसं, ब्रेड, अंडी, भात, फ्राइड चिकन, फळांचे रस, जाम्–जेलीज्, असे पदार्थ जेवणांत होते. जेवतांनाहि मिसेस केन्यॉन् ह्या त्यांच्या अर्ध्या चड्डींतच –' शॉर्टस्'मधें – असलेल्या पाहून प्रोफेसर केन्यॉन् अखेर त्यांना सहजतेनं म्हणाले, 'हें काय ? आपल्या ह्या प्रसिद्ध भारतीय मित्रांच्या समोरसुद्धां अजून तूं तुझ्या ' शॉर्टस् 'मधेंच वावरत्येस ?"

पाहुण्यांच्यादेखत नवरा बोलला ! आपल्याकडच्या गृहिणीला हा फार मोठा अपमान वाटला असता. पण मिसेस् केन्यॉन् नुसत्या हंसल्या नि एवढंच उद्‌गारल्या, " कां ? त्यांत काय हरकत आहे ? "

आमच्या भारतीय लोकांच्या 'सनातनीपणा'बद्दलच्या कल्पना जगात सर्वत्र पसरलेल्या आहेत. तेव्हां मिसेस् केन्यॉन् यांचा अपूर्ण पोषाख पाहून आमच्या भावना दुखावूं नयेत म्हणून डॉ. केन्यॉन् तसं म्हणाले होते. प्रत्यक्षांत आता आम्ही किती सनातनी राहिलों आहोंत तें आमचं आम्हांलाच माहीत ! तेव्हां त्यांच्या बोलण्यांत मधेंच आम्ही म्हणालो, " Oh ! It's all right ! आम्हांला अमेरिकन जीवनपद्धतीचा थोडाफार परिचय आहे. त्याचं काय विशेष आम्हांला वाटणार नाहीं. " ( सुमारं पन्नास वर्षांच्या बाईला ' शॉर्टस्'मधें पाहून आम्हांला काय वाटणार म्हणा ! )

प्रा. डॉ. केन्यॉन् यांनी आमची रहाण्याची व्यवस्था फार चांगली ठेवली होती. रात्रीं आम्हांला झोपायला स्वतंत्र खोली दिलेली होती. त्या दिवशीं रात्री १० पर्यंत मी TV सेटवर ' Seven Miles of a Bad Road ' हा चित्रपट पाहिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्ट झाल्यावर केन्यॉन्–कुटुंबाबरोबर आम्हीं फोटो काढले, आणि नंतर सर्वजण त्यांच्या अमेरिकन 'स्टेशनवॅगन् ' मधून सुमारं २५–३० मैल दूर असलेल्या ' चेस्टर टाउन 'मधील 'हॅकल्‌बर्नी स्टेट पार्क ' पहायला

गेलों. हा 'पार्क' म्हणजे उंचच उंच मोठमोठ्या वृक्षांचं छान निगा राखलेलं एक सुंदर जंगलच होतं. पाइन, बर्च, ओक, बीच, मेपल वगैरे वृक्ष त्यांत प्रामुख्यानं दिसत होते. ह्या पार्कमधेंच एक थोडासा उथळ, पण खूप लांबरुंद असा मोठा ओढा खळखळून वहात होता. ओढ्याच्या दोन्ही तीरांवरच्या दगडाधोंड्यांतून वाट काढीत आम्ही खूप भटकलों. त्या पार्कमधें ठिकठिकाणी स्त्रीपुरुषांसाठीं Comfort Stations बांधलेलीं होतीं. सुमारं दीड तास गप्पा मारीत पार्कमधें फिरून आम्ही ११॥ ला तिथून बाहेर पडलों. पार्कमधून परत येतांना वाटेंत 'डेअरी क्वीन' नांवाच्या खास दुग्धपदार्थांच्या एका दुकानापाशीं थांबून आम्ही आइस्क्रीम घेतलं आणि खातांखातां पेलासुद्धां आइस्क्रीमबरोबर खाऊन टाकला ! नंतर पुढं 'मॉरिसटाउन नॅशनल हिस्टॉरिकल पार्क' च्या दुसऱ्या भागांत आम्ही गेलों. तिथं 'Wick House' हें मेरी नि हेन्री विक् ह्या १८ व्या शतकांतल्या प्रसिद्ध क्रांतिकारकांचं निवासस्थान होतं. शत्रूला आपल्या वास्तव्याचा पत्ता लागू नये म्हणून मेरीनं ह्या घरांतल्या बेडरूममधें तिचा घोडा लपविला होता, अशी आख्यायिका आहे. आम्हीं ती बेडरूम पाहिली. तिथं त्या प्राचीन काळांतील पलंग, मच्छरदाणी, बिछाना वगैरे सर्व सामान जसंच्या तसं सुरक्षित जपून ठेवलेलं होतं. मीं इकडेतिकडे पाहिलं. पण फक्त तो प्रसिद्ध घोडा मात्र तिथं कुठं दिसला नाही !

'Wick House'च्या परिसरांत अनेक भाज्या, फुलझाडं, लहान झुडपं, वगैरे नीट निगा राखून लावलेलीं होतीं. प्रत्येक झुडपाजवळ त्याच्या नांवाची छोटीशी पाटी लावलेली होती. Peppermint, Applemint, Gooseberry, Lambs Ears, Meadow Saffron, Bachelor Button वगैरे झाडांचीं नांवं मला दिसली.

'विक् हाऊस'हून परत येतांना वाटेंत जवळच असलेल्या 'Jockey Hollow Burying Ground'ला आम्हीं भेट दिली. वास्तविक तिथं पहाण्यासारखं कांहींच नव्हतं. लाकडाच्या ओंडक्यांनी बांधलेल्या अत्यंत जुन्या अशा लांबरुंद तीनचार झोंपड्या मात्र तिथं होत्या. १७७९–८० सालच्या प्रसिद्ध कडाक्याच्या हिंवाळ्यांत बळी पडलेल्या कांहीं शूर क्रांतिसैनिकांचं तिथं दफन झालं होतं असं म्हणतात. झोंपड्यांपासून जवळच असलेल्या मुख्य रस्त्यावर एक 'बोर्ड' लावला होता. त्यावर लिहिलेलं होतं :–

'**Jockey Hollow Burying Ground**

On this hillside are said to have been buried those soldiers who failed to survive the winter of 1779-1780, whose severity, in General Washington's own words, was the worst in the whole Revolutionery War.'

डॉ. केन्यॉन् यांच्या घरीं आम्ही परत आलों तेव्हां दुपारचा एक वाजला होता. दीड वाजतां आम्हीं जेवायला बसलों. मिसेस् केन्यॉन् यांनीं खास आमच्यासाठीं अनेक भाज्या नि तांदूळ एकत्र शिजवून चविष्ट खिचडी केली होती. शिवाय 'मॅकारूनी' नि इतर पदार्थ होतेच. जेवणानंतर गप्पा मारून तीन वाजतां आम्ही मिसेस् मेरी केन्यॉन् यांचा निरोप घेतला. त्यांनी आमच्यासाठी घेतलेल्या तसदीबद्दल आम्हीं त्यांचे पुन्हा-पुन्हा आभार मानले. डॉ. केन्यॉन् यांनी त्यांच्या गाडींतून आम्हांला 'मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'मधें पुन्हा परत आणून सोडलं. त्यांच घर सोडण्यापूर्वी डॉ. केन्यॉन्नीं आम्हांला कांहीं भेटवस्तू दिल्या. आम्हीहि प्रतिभेटी दिल्या. निघण्यापूर्वी डॉ. केन्यॉन्नीं मला एक कार्ड दिलं, आणि त्यावर माझं नांव नि पत्ता लिहायला सांगून माझ्या भाषेंत कांहींहि मजकूर लिहायला सांगितलं. नांव–पत्ता लिहून पुढं मी मराठीत लिहिलं, –

'प्रिय डॉ. केन्यॉन् ,

कालपासून मी आपल्या घरी राहिलों आहें. आपल्या कुटुंबाच्या सहवासांत माझा वेळ फार आनंदांत गेला. आपल्या अगत्याबद्दल मी आपला फार आभारी आहें.

– प्रभाकर तामणे.'

कार्डाच्या मागच्या बाजूला मीं लिहिलेल्या मजकुराचं इंग्रजी भाषांतरहि मीं लिहिलं. अमेरिकन लोक किती प्रेमळ नि आतिथ्यशील असतात याचा प्रत्यय केन्यॉन्–कुटुंबांत आम्हांला आला होता.

रविवार ता. २६ जुलै '६४ हा मॉंट्क्लेअरमधला आमचा शेवटचा दिवस. त्या दिवशी दुपारी ३॥ वाजतां आम्ही मिसेस् Dallery यांच्या घरीं चहाला गेलों. मिसेस् दलरी ह्या आमच्या 'एक्सपेरिमेंट'च्या मॉंट्क्लेअरच्या स्थानिक प्रतिनिधी होत्या. तिथं त्या वेळीं त्यांनीं डॉ. रुंडेन, डॉ. मिसेस् रुंडेन आणि इतर कांहीं अमेरिकन मित्रमंडळींना बोलावलं होतं. त्याचप्रमाणं त्या वेळीं अमेरिकेंत वास्तव्य करीत असलेले डॉ. श्रीकांत गोखले, डॉ. सौ. गोखले, डॉ. नरेंद्र दीक्षित आणि हरि नारायण (इंजिनिअर) या तरुण हिंदी लोकांनाहि आमच्याबरोबर पार्टीला बोलावलं होतं.

डॉ. गोखले पतिपत्नीचा नि माझा परिचय नव्हता. पण त्यांना पुण्याला मीं अनेकदां पाहिलं होतं. आतां अनपेक्षितपणं त्यांना तिथं पहातांच मला आश्चर्य वाटलं. ओळख होतांच आम्ही सर्वांनी मराठींत बोलायला सुरुवात केली. पुण्याची सदाशिव पेठेंतलीं माणसं अमेरिकेंत अगदीं अनपेक्षितपणं भेटण्यांत जो आनंद होता तो अनुभवायला मिळाला.

बोलतांबोलतां डॉ. गोखल्यांना मीं सहज गमतीनं म्हटलं "डॉक्टर, पुण्यांतलीं

तुमच्यासारखी माणसं इथं अमेरिकेंत अचानकपणं भेटतांच अमेरिकेंत थालिपीठ खायला मिळाल्याचा आनंद मला झालाय् !"

त्यावर डॉ. गोखले झटकन् म्हणाले, "आमच्या घरीं चला ! खरोखरच तुम्हाला अमेरिकेंत थालिपीठ खायला घालतों. परवांच आम्हांला थोडीशी भाजणी मिळालीय् ! "

पार्टी संपल्यावर संध्याकाळी पावणेसहा वाजतां डॉ. नरेंद्र दीक्षितांच्या कारमधून आम्ही डॉ. गोखल्यांच्या माँट्क्लेअरच्या घरी गेलों. डॉ. गोखल्यांनी मोठ्ठा ग्लास भरून बीअर दिली, चिवडा दिला. आणि थोड्याच वेळांत डॉ. सौ. गोखले यांनीं ऑम्लेटच्या फ्राइंग पॅनमधें तयार केलेलीं खमंग थालिपीठं आग्रहानं खायला घातली. सोबत लोणी होतंच. पण त्याहिपेक्षां जास्त आनंद मला झाला तो त्यांनीं लसणाची वाटलेली चटणी आमच्यापुढं आणून ठेवली तेव्हां ! गेल्या कांहीं दिवसांत सतत उकडलेले पदार्थ खाऊन मला कंटाळा आला होता. तेव्हां थालिपीठ आणि लसणाची चटणी पाहून ब्रह्मानंद व्हावा यांत नवल नव्हतं ! ते पदार्थ संपतांच डॉ. गोखल्यांनीं आइस्क्रीमनं गच्च भरलेले मोठाले वाडगे समोर आणून ठेवून अगत्याची परिसीमा गांठली. गप्पा मारण्यांत संध्याकाळचे सात–साडेसात केव्हां वाजले तें कळलंसुद्धां नाही ! डॉ. दीक्षित नि डॉ. गोखले पतिपत्नींनी नंतर आम्हांला आमच्या कॉलेजांत आणून सोडलं.

आतां दुसऱ्या दिवशीं आम्ही माँट्क्लेअर सोडणार म्हणून त्या रात्रीं आमच्या कांहीं अमेरिकन मित्रमैत्रिणींनी आम्हांला भारतीय पद्धतीचं जेवण करायचा आग्रह केला होता. डॉ. गोखल्यांकडून परत आल्यावर मी त्या पार्टीच्या तयारीला लागलों. Robert Mercer, Frederick Montana, Miss Louise Barber, Mrs. Ruth Husk, Miss Mary Orr आणि Mrs. Mac Vane अशीं पांचसहा अमेरिकन तरुणतरुणी आमच्या भारतीय पाकसिद्धीच्या प्रयोगाचे परिणाम अजमावण्यासाठी आम्हीं निवडली होती !

किचन्मधें मी पोंचलों तेव्हां सौ. सेवती मित्रा यांनीं फोडणी करायला भांड नाही म्हणून बटाट्याची भाजी नुसतीच उकडून ठेवली होती. ती अर्थातच बेचव झाली होती. मग एकंदर परिस्थितीचा अंदाज घेऊन मी स्वैपाकघराचीं सूत्रं माझ्या हातांत घेतली आणि भराभर हुकूम सोडूं लागलो. त्या बटाट्याच्या दिव्य भाजीचा पुनरुद्धार करण्यासाठीच माझा अवतार झाल्याचं जाहीर होतांच सर्वजण अ.पुलकीनं माझ्या आज्ञा पाळू लागले. मग दुसरं मोठं भांडं मागवून त्यांत मार्गारिन टाकून, तिखट–मीठ–कांदा टाकून प्रा. कु. श्रीमती शहांच्या मदतीनं मी ती भाजी तळून काढली, तेव्हां ती जरा बरी लागली ! निदान मला तरी तसा भास झाला ! बटाट्याच्या ह्या अद्भुत नि रोमांचकारक भाजीखेरीज जेवायला पुलाव, घट्ट डाळ आणि बदामाचे काप घातलेली कसलीतरी खीर, हे मनोरंजक पदार्थ आम्ही तयार केले होते !



**अमेरिकनांच्या आग्रहावरून भारतीय पद्धतीच्या जेवणाची सिद्धता चालू आहे.--हल्लीं अमेरिकनांकडून भारतीयांना अशा प्रकारचा आग्रह होत नाहीं असें समजतें !**

जेवतांना डाळ नि भाजी हे पदार्थ आम्हांलाहि थोडेसे तिखटच लागले. मग आमच्या अमेरिकन मित्रांचे काय हाल झाले असतील याची कल्पना करता येत नाही ! 'हायहुई' करीत परंतु वरकरणी प्रसन्न मुद्रेनं, 'How nice ! How wonderful !' म्हणत त्यांनी ते पदार्थ कसेबसे घशाखालीं ढकलले. 'पदार्थ चांगले झाले आहेत तर आणखी थोडे घ्या ना' म्हणून मी आग्रह करूं लागलों, तेव्हां एकाहि अमेरिकनाला विशेष भूक नसल्याचं आम्हांला सागण्यांत आलं. पदार्थ बरेच उरले होते. म्हणून चिकाटीनं आम्ही आग्रह करण्याचा पुन्हा प्रयत्न करतांच कांही अमेरिकन्स हातांत डिश् घेऊन पळू लागले ! अमेरिकन लोक जेवतांना कधीं पाणी पीत नाहींत. पण त्या दिवशीं त्यांनीं पाणी मागितलं. जेवतांना मी कु. श्रीमती शहांना हळूच म्हटलं, "आतां पुन्हा आयुष्यांत कधी आम्हांला 'इंडियन डिशेस्' हव्यात असं हे लोक म्हणणार नाहींत ! त्यांना चांगलीच दहशत बसलीय्. आज रात्रीं झोपेंतसुद्धा 'इंडियन डिशेस्' म्हणून हे लोक किचाळून उठतील !"

माझं मॉंट्क्लेअरचं वास्तव्य फार सुखाचं झालं. नव्या जगांतलं तें पहिलंच पाऊल होतं. पण तिथून बाहेर पडतांना पाऊल निघेना. अगदीं थोड्या अवधीत कितीतरी नवे ऋणानुबंध निर्माण झाले होते. अमेरिकनांच्या निकट सहवासांत आल्यावर त्यांच्या स्वभावाचे कितीतरी भिन्नभिन्न पैलू आम्हांला समजले होते. अनोळखी परक्या देशांतल्या माणसांशींसुद्धा मैत्री करण्याची त्यांची उत्कट इच्छा, कुणालाहि मदत करण्याची त्यांची तत्परता, त्यांचा अविरत उद्योग करण्याचा स्वभाव, कष्टाळूपणा – असे कितीतरी त्यांचे स्वभावविशेष आमच्या नजरेंत भरले.

मुक्त मनानं बेबंदपणं जीवनाचा धुंद आनंद लुटतांनाहि अमेरिकन लोक बेसावध कधींच नसतात. ' मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'चंच उदाहरण पहा ना ! तिथल्या प्रत्येक इमारतींत अग्निशामक उपकरणं वसवलेलीं आम्हांला आढळलीं. त्याचप्रमाणं आगीबद्दल नि विमान हल्ल्याबद्दल विशेष सूचना देणारीं रंगीबेरंगीं पोस्टर्सहि ठिक-ठिकाणी लावलेलीं होतीं.

FIRE
Long Bells.
Go To Rear Exit Stairway.
AIR–RAID
Long and short Bells.
Go To WA–2 Hall.

अशा प्रकारच्या सूचनांचीं रंगीत भित्तीपत्रकं प्रत्येक वर्गांत नि इतरहि महत्त्वाच्या ठिकाणीं लावलेलीं होती.

तसं पाहिलं तर अमेरिकेचं लष्करी सामर्थ्य आज एवढं प्रचंड आहे कीं कोणताहि शत्रु त्यांच्यावर हल्ला करण्यापूर्वीं दहादां विचार करील. पण म्हणून आपल्याच सामर्थ्याच्या धुंदींत आपल्या देशाच्या संरक्षणाची योजना करायला ते विसरत नाहींत. चुकून अणुयुद्ध सुरू झालंच तर किरणोत्सर्गापासून आपल्या नागरिकांचा बचाव व्हावा म्हणून अमेरिकेंत ठिकठिकाणी आसरा घेण्यासाठीं विशिष्ट प्रकारच्या खास इमारती बांधण्यांत आल्या आहेत. अशा आसराघरांकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांच्यावर ' Fall out Shelters ' अशा अक्षरांचीं पोस्टर्सहि लावलेली आहेत. ' मॉंट्-क्लेअर स्टेट कॉलेज'मध्येंहि अशी एक इमारत होती.

आणि आपल्याकडे चिनी लोकांशीं प्रत्यक्ष युद्ध सुरू झालेलं असतांनाहि असली कोणतीच खबरदारी घेतलेली दिसून आली नाहीं. देशांत कुठंतरी युद्ध सुरू आहे ह्याची जाणीव फक्त आकाशवाणीवरच्या समरगीतांनी व्हायची ! बाकी सर्व दिशांना आनंद होता !

अशा पार्श्वभूमीवर अमेरिकेचं मला घडलेलं दर्शन कितीतरी स्फूर्तिदायक आणि मनाला अक्षरशः भारून टाकणारं होतं. नव्या जगाच्या त्या मोकळ्या वाता-वरणाचा पहिला श्वास मी घेतला मॉंट्क्लेअरच्या मंतरलेल्या दिवसांत !

□

# सोनेरी दिवस बॅरिंग्टनचे....

२७ जुलै १९६४! न्यू जर्सीच्या 'मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'मधला चौदा दिवसांचा आमचा मुक्काम संपवून भारतांतले आम्ही नऊ प्राध्यापक जीवनांतल्या एका नव्या अनुभवासाठीं बॅरिंग्टनला निघालों. दुपारीं २–४० ला 'डी कँप' बस्‌नं मॉंट्क्लेअर सोडलं आणि अर्ध्या तासांतच आम्ही न्यूयॉर्कला आलों. तिथून शिकागोपर्यंतचा सारा प्रवास आतां आरामशीर 'ग्रे हाउंड' बस्‌नं करायचा होता. न्यूयॉर्कहून तासाभरानं आमची बस् सुटणार होती. पण तो एक तास मला खूपच मोठा वाटला. कारण 'एक्स्पेरिमेंट् इन् इंटरनॅशनल लिव्हिंग'तर्फे निवड झालेले आम्ही प्राध्यापक अमेरिकेंतील एका युनिव्हर्सिटीच्या वातावरणांतून अमेरिकनांच्या घरांत त्यांचे पाहुणे म्हणून– नव्हे, त्यांच्या कुटुंबांतीलच एक व्यक्ति म्हणून– सुमारं महिनाभर रहायला जाणार होतों. 'We learn to live together by living together' हें आमच्या 'एक्स्पेरिमेंट्'चं एक ध्येयवाक्य असल्यानं अमेरिकनांच्या कुटुंबांत रहाणं हा अमेरिकेंतील आमच्या कार्यक्रमाचा सर्वांत महत्त्वाचा भाग होता. एका परक्या देशांतल्या एका अज्ञात, अपरिचित कुटुंबांत राहून माणसांची परस्परांबद्दलची समजूत खरोखरच अधिक वाढते काय? एकमेकांच्या सहवासांत एका घरांत राहून परक्या देशांतलीं माणसं एकमेकांचे आचारविचार, भावभावना, संस्कृति समजावून घेऊं शकतात काय? हाच तर 'प्रयोग' आतां आम्हांला करायचा होता. त्यासाठींच

मुक्त मनानं बेबंदपणं जीवनाचा धुंद आनंद लुटतांनाहि अमेरिकन लोक बेसावध कधीच नसतात. ' मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'चंच उदाहरण पहा ना ! तिथल्या प्रत्येक इमारतींत अग्निशामक उपकरणं बसवलेलीं आम्हांला आढळलीं. त्याचप्रमाणं आगीबद्दल नि विमान हल्ल्याबद्दल विशेष सूचना देणारीं रंगीबेरंगीं पोस्टर्सहि ठिकठिकाणीं लावलेलीं होतीं.

FIRE
Long Bells.
Go To Rear Exit Stairway.
AIR-RAID
Long and short Bells.
Go To WA-2 Hall.

अशा प्रकारच्या सूचनांचीं रंगीत भितीपत्रकं प्रत्येक वर्गांत नि इतरहि महत्त्वाच्या ठिकाणीं लावलेलीं होतीं.

तसं पाहिलं तर अमेरिकेचं लष्करी सामर्थ्य आज एवढं प्रचंड आहे कीं कोणताहि शत्रु त्यांच्यावर हल्ला करण्यापूर्वी दहादां विचार करील. पण म्हणून आपल्याच सामर्थ्याच्या धुंदींत आपल्या देशाच्या संरक्षणाची योजना करायला ते विसरत नाहींत. चुकून अणुयुद्ध सुरू झालंच तर किरणोत्सर्गापासून आपल्या नागरिकांचा बचाव व्हावा म्हणून अमेरिकेंत ठिकठिकाणी आसरा घेण्यासाठीं विशिष्ट प्रकारच्या खास इमारती बांधण्यांत आल्या आहेत. अशा आसराघरांकडे लक्ष वेधण्यासाठीं त्यांच्यावर ' Fall out Shelters ' अशा अक्षरांची पोस्टर्सहि लावलेली आहेत. ' मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'मध्येंहि अशी एक इमारत होती.

आणि आपल्याकडे चिनी लोकांशीं प्रत्यक्ष युद्ध सुरू झालेलं असतांनाहि असली कोणतीच खबरदारी घेतलेली दिसून आली नाहीं. देशांत कुठंतरी युद्ध सुरू आहे ह्याची जाणीव फक्त आकाशवाणीवरच्या समरगीतांनीं व्हायची ! बाकी सर्व दिशांना आनंद होता !

अशा पार्श्वभूमीवर अमेरिकेचं मला घडलेलं दर्शन कितीतरी स्फूर्तिदायक आणि मनाला अक्षरशः भारून टाकणारं होतं. नव्या जगाच्या त्या मोकळ्या वातावरणाचा पहिला श्वास मी घेतला मॉंट्क्लेअरच्या मंतरलेल्या दिवसांत !

□

# सोनेरी दिवस बॅरिंग्टनचे....

२७ जुलै १९६४ ! न्यू जर्सीच्या 'मॉंट्क्लेअर स्टेट कॉलेज'मधला चौदा दिवसांचा आमचा मुक्काम संपवून भारतांतले आम्ही नऊ प्राध्यापक जीवनांतल्या एका नव्या अनुभवासाठीं बॅरिंग्टनला निघालों. दुपारीं २–४० ला 'डी कॅंप' वस्‌नं मॉंट्क्लेअर सोडलं आणि अर्ध्या तासांतच आम्ही न्यूयॉर्कला आलों. तिथून शिकागोपर्यंतचा सारा प्रवास आतां आरामशीर 'ग्रे हाउंड' बस्‌नं करायचा होता. न्यूयॉर्कहून तासाभरानं आमची बस् सुटणार होती. पण तो एक तास मला खूपच मोठा वाटला. कारण 'एक्स्पेरिमेंट् इन् इंटरनॅशनल लिव्हिंग'तर्फे निवड झालेले आम्ही प्राध्यापक अमेरिकेंतील एका युनिव्हर्सिटीच्या वातावरणांतून अमेरिकनांच्या घरांत त्यांचे पाहुणे म्हणून– नव्हे, त्यांच्या कुटुंबांतीलच एक व्यक्ति म्हणून– सुमारं महिनाभर रहायला जाणार होतों. 'We learn to live together by living together' हें आमच्या 'एक्स्पेरिमेंट्'चं एक ध्येयवाक्य असल्यानं अमेरिकनांच्या कुटुंबांत रहाणं हा अमेरिकेंतील आमच्या कार्यक्रमाचा सर्वांत महत्त्वाचा भाग होता. एका परक्या देशांतल्या एका अज्ञात, अपरिचित कुटुंबांत राहून माणसांची परस्परांबद्दलची समजूत खरोखरच अधिक वाढते काय? एकमेकांच्या सहवासांत एका घरांत राहून परक्या देशांतलीं माणसं एकमेकांचे आचारविचार, भावभावना, संस्कृति समजावून घेऊ शकतात काय? हाच तर 'प्रयोग' आतां आम्हांला करायचा होता. त्यासाठींच

आमची सर्वांचीं मन उत्सुक झाली होतीं, उतावीळ झाली होतीं. ज्यांचं कधीं नांवहि ऐकलं नाहीं अशा कुटुंबांत जाऊन रहायचं? चार आठवड्याच्या मुक्कामांत त्यांना आपलं मानायचं? आपण त्यांच्याचपैकीं एक व्हायचं? . गोष्ट कठिण वाटत होती. पण अनुभवांच्या नावीन्यासाठी आसुसलेलं माझं लेखकाचं मन हें आव्हान स्वीकारायला तयार झालं होतं.

माझ्याबरोबर भारतांतले आणखी आठ प्राध्यापक होते. पश्चिम-बंगाल मधले प्रा. अमलचंद्र रॉय, अहमदाबादचे प्रा. रमेश भट्ट, सुरेंद्रनगरचे प्रा. दत्तात्रय पंडित, मुंबईचे प्रा. के. यू. माडा, मुंबईच्याच प्रा. कु. श्रीमती शाह, भावनगरचे प्रा. सुदर्शनसिंग मजिथिया, रोहटकचे प्रा. अमर डेंव्ला, आणि कलकत्त्याच्या प्रा. सौ. सेवती मित्रा. आम्ही सर्वजण इलिनॉय स्टेटमधल्या 'बॅरिंग्टन' या गांवीं निघालों होतों. तिथं आम्ही एकाच गांवांत पण वेगवेगळ्या अमेरिकन कुटुंबांत रहाणार होतों. अधूनमधून आमच्या भेटीगांठी होणार होत्या. कांहीं ठिकाणं बघायला आम्ही एकत्रच जाणार होतों. आणि कांही कार्यक्रम मात्र आमच्या कुटुंबांनीं आमच्यासाठीं स्वतंत्रपणं आंखलेले होते. प्रत्येकाचं कुटुंब वेगळं असल्यानं सर्वांचे अनुभवहि वेगवेगळे असणार होते. ह्या अनुभवांची देवाण-घेवाण आम्ही प्रत्यक्ष भेटींत करणार होतों. फोनवरूनहि परस्परांशीं आम्ही संपर्क ठेवणार होतों. नवीनच परिचित झालेलीं कां होईना, पण आपल्या देशांतली सातआठ माणसं आपल्याच गांवांत असणार आहेत, हा एक विचार मनाला जरासा दिलासा देणारा होता. आमच्यापैकीं प्रत्येकान पहिले दोन आठवडे एका कुटुंबांत आणि दुसरे दोन आठवडे दुसऱ्या कुटुंबांत रहायचं, अशी योजना होती. साधारणपणं एकाच कुटुंबांत महिनाभर रहाण्याची मूळ कल्पना होती. पण आम्ही पाहुणे थोडे, आणि 'आमच्याकडे पाहुण्यांना रहायला पाठवा' असा आग्रह धरणारीं कुटुंबं अनेक होतीं. त्यामुळं अखेर अशी योजना करावी लागली. मला मात्र योगायोगानं तीन अमेरिकन कुटुंबांत रहायला मिळालं. कारण प्रथम मी ज्यांच्याकडे जाणार होतों, त्या श्री. व सौ. फेअरवेदर यांना अचानकपणं कांही कामासाठी न्यूयॉर्कला जावं लागलं. त्यामुळं पहिले तीन दिवस त्यांनीं त्यांचे जवळचे मित्र श्री. व सौ. विथॅम यांच्याकडे माझ्या रहाण्याची सोय केलेली होती. सौ. फेअरवेदरनी तसं पत्रहि मला आधीच पाठवलं होतं. माझ्या वास्त-व्याच्या उत्तरार्धांत मी ज्यांच्याकडे रहायला जाणार होतों त्या सौ. हॉपकिन्स यांचंहि पत्र आलेलं होतं. म्हणजे बॅरिंग्टनच्या आमच्या मुक्कामाची सर्व व्यवस्था अगदी चोख झालेली होती. फक्त आतां आम्ही तिथं पोचण्याचाच काय तो अवकाश होता.

दुपारी बरोबर सव्वाचारला आम्ही 'ग्रे हाउंड' बसनं न्यूयॉर्क सोडलं

आणि फिलाडेल्फिया– हॅरिसबर्ग– क्लिव्हलॅंड– माउथ बेंड–हॅमंड– अशा मार्गानं शिकागोला आलों. शिकागोला बस् बदलून 'युनायटेड बस् लाइन' न आम्ही बॅरिंग्टनला आलों. मॉन्ट्क्लेअरपासून एकूण ९०० मैलांचा आणि साडेचोवीस तासांचा बस्‌चा प्रवास करून आम्ही बॅरिंग्टनला पोंचलों तेव्हां स्थानिक वेळेप्रमाणं दुपारचे सव्वादोन वाजले होते. आमच्या घड्याळांत मात्र सव्वातीन वाजले होते.

बस्‌मधून उतरण्यापूर्वी बॅरिंग्टनच्या बस्-स्टॅंडवर महज नजर टाकली तों काय ! त्या परिसराला एखाद्या जत्रेच स्वरूप आलेलं होतं. आमचं स्वागत करण्यासाठी आणि आम्हांला घरीं घेऊन जाण्यासाठी आमच्या अमेरिकन कुटुंबांतलीं बहुतेक सर्व माणसं तर आलीच होतीं; पण त्यांची सर्वांची मित्रमंडळीहि बहुसंख्येनं उपस्थित होती. त्यामुळं मोटरकार्सचीहि तिथं खूप गर्दी झालेली होती. उपस्थितांमधे बायका-मुलांचाच भरणा अधिक होता. पुरुषमंडळी बहुतेक कामावर गेलेली होती. आणि पुरुष घरीं असते तरी ते आलेच असते असं म्हणतां येत नाही. कारण पाहुण्यांना स्टेशनवरून आणणं, गांवभर फिरवणं व परत पोंचवणं हें काम अमेरिकेंत सामान्यतः गृहिणीच करतात.

आम्ही बस्‌मधून उतरतांच अमेरिकनांनीं आमचे फोटो घेतले, आणि आमचं स्वागत करून आपापल्या पाहुण्यांची वाटणी करून घेतली. आम्ही हिंदुस्थानांत असतांनाच आमचे फोटो आणि आमच्याबद्दलची सर्व माहिती बॅरिंग्टनला पाठवण्यांत आलेली होती. त्या आधारानंच अमेरिकन कुटुंबांनीं आपापल्या पाहुण्यांची निवड केलेली होती. त्यामुळं बस्‌स्टॅंडवर त्यांनी सहज आम्हांला ओळखलं आणि

निसर्गसमृद्ध बॅरिंग्टनच्या एका भागाचें दृश्य





**बॅरिंग्टनची स्वागततत्पर मंडळी ( डावीकडून ) मिसेस् मरिअन गॉडेन, मिसेस् एलन ब्रिघॅम, मिस्टर डब्ल्यू. एच्. बिघॅम व मिसेस् पेनी गॉडेन.**

आमच्या नांवानं हांक मारून ते आमच्याशी बोलायला लागले. एवढ्यात 'प्रभाकर' म्हणून मला हांक मारीत पन्नाशीच्या वयाची एक स्त्री माझ्याकडे आली. 'मिसेस् एलन बिघॅम' म्हणून तिनं आपली ओळख करून दिली. 'एलन' ही माझी अमेरिकेंतली पहिली 'आई'! माझ्या खांद्यावर हात ठेवून मोठ्या प्रेमानं तिनं मला समोरच्या रेस्टॉरंटमध्ये नेलं. म्हणाली, "खूप दूरचा प्रवास करून आला आहेस. दमला असशील. आपण इथं कांहीतरी पेय घेऊं आणि मग आमच्या घरी जाऊं."


खरं म्हणजे अमेरिकेंतल्या बसेस् आणि रस्ते अतिशय सुखकारक असल्या-मुळं १०० मैलांच्या प्रवासानंतरहि मला थकवा असा वाटत नव्हता. पण केवळ एलनचं मन मोडूं नये म्हणून मी तिच्याबरोबर थंड पेय घेतलं. आणि मग लगेच आम्ही तिच्या गाडीनं घरीं निघालो. ड्रायव्हिंग अर्थात् एलन स्वतःच करीत होती. घरी जाईपर्यंत एलनच्या गप्पांतून बिघॅम कुटुंबाची व बॅरिंग्टन गांवाची बरीच माहिती मला मिळाली.

आदल्याच वर्षी– म्हणजे १९६३ साली– बॅरिंग्टन गांवाचा शताब्दि–महोत्सव साजरा झाला होता. पण बॅरिंग्टन गांव १०० वर्षांपेक्षांहि अधिक जुनं होतं. १८३४ पासूनच व्हर्मॉंट आणि मॅसाच्युसेट्स् या राज्यांतले कांहीं लोक या गांवी वसाहत करायला आल्याचे उल्लेख आहेत. बॅरिंग्टनच्या मुक्कामांत 'बॅरिंग्टन कुरिअर रिव्ह्यू' ह्या स्थानिक वृत्तपत्रानं प्रसिद्ध केलेला 'शताब्दि-विशेषांक' मला वाचायला मिळाला. त्यांत बॅरिंग्टनचे पहिले, १८३४ मधें आलेले रहिवासी म्हणून 'जेसे एफ् मिलर' व 'विल्यम व्हान ऑस्डॅल' यांची नांवं आढळली.

नंतर १८५२ मधें स्थायिक व्हायला आलेल्या 'लुइस् गिली' या जर्मनाचा फोटोहि बघायला मिळाला. त्याच अंकांत १८७९ सालीं विवाहबद्ध झालेल्या त्याच्या मुलाचा व सुनेचा फोटोहि छापलेला होता. फोटो बघून गंमत वाटली. कारण मिस्टर अँड मिसेस् हेन्री गिली यांची विवाहोत्तर फोटोंतली पोझ् आपल्याकडच्या कुणाहि जुन्या पिढीतल्या हरिभाऊ आणि लक्ष्मीबाई यांच्या पोझसारखीच होती ! जुन्या काळांतले साता समुद्रापलिकडले हरिभाऊसुद्धां लग्नानंतर फोटो काढतांना आपण स्वत: खुर्चीवर बसत आणि लक्ष्मीबाईना खुर्चीशेजारी उभं करीत ! जगांतल्या नवऱ्यांमधील हें आश्चर्यकारक साम्य मला मनोरंजक वाटलं. १८७९ मधें फोटोंत नवऱ्याशेजारी नम्रपणं उभी रहाणारी ही अमेरिकन स्त्री आज धाडसीपणानं जगांतले सर्व व्यवहार स्वतंत्रपणं पार पाडते आहे, ही गोष्ट मात्र लक्षांत घेण्यासारखी आहे.

मॅसाच्युसेट्स्मधें 'ग्रेट बॅरिंग्टन' या नांवाचं एक गांव होतं. त्या गांवाच्या नांवावरूनच बॅरिंग्टनला 'बॅरिंग्टन' हें नांव मिळालं. १८६३ साली बॅरिंग्टन गांवानं 'स्टेट चार्टर'साठी प्रथम अर्ज केला, म्हणून बॅरिंग्टनची जन्मशताब्दि १९६३ सालीं साजरी झाली.

जगप्रसिद्ध शिकागो शहरापासून सुमारं ४० मैलांवर दक्षिणेकडे बॅरिंग्टन हें गाव आहे. लोकवस्ती जसजशी वाढत गेली तसतशी बॅरिंग्टनभोंवतीं आणखी पांच छोटी गांवं निर्माण झाली. 'बॅरिंग्टन हिल्स', 'डिअर पार्क', 'लेक बॅरिंग्टन,'



**हें बॅरिंग्टनमधलें लुथेरान चर्च आहे, यावर विश्वास बसणें कठिण !**

' नॉर्थ बॅरिंग्टन ' आणि ' साउथ बॅरिंग्टन ' अशी त्यांचीं नांवं आहेत. ही पांच-सहा छोटीं गांवं एकत्र आल्यानं बॅरिंग्टनचा भौगोलिक विस्तार जरी खूप वाढलेला असला तरी त्याची लोकसंख्या मात्र खूपच कमी आहे. पांचसहा हजारांच्या आसपास आहे. लोकवस्ती इतकी विरळ असल्यामुळं बॅरिंग्टन हें गांव अगदी मोकळं मोकळं वाटतं. पांचपांच-सहासहा मैल लांब जाणारे रस्ते, रस्त्यांच्या दुतर्फा असणारी झाडी, पलिकडे असणारी शेतं, अधूनमधून दिसणारे लहानमोठे सुंदर बंगले, कांही भागांत दिसणाऱ्या टेकड्या यांनी तें गांव विलक्षण सुंदर दिसतं.

बॅरिंग्टनमधें एकूण १६ चर्चेस् आहेत. १८५३ सालीं बांधलेलं जुन्या वळणाचं ' मेथॉडिस्ट चर्च ' आहे. तसंच अगदी अलिकडे बांधलेलं – आधुनिक वास्तुशिल्पाचा एक सुंदर नमुना म्हणतां येईल असं– ' लुथेरान चर्च'हि आहे. बॅरिंग्टनमधें आणखीहि एक निसर्गरम्य सौंदर्यस्थळ आहे. तें म्हणजे ' टिंबर-लेक '. ' ओकवुड ड्राइव्ह 'जवळचं हें सुंदर तळं म्हणजे गांवाची शोभा आहे. तळ्याकडे जाणारा रस्ता दाट झाडींतून जातो. पोहण्यासाठीं आवश्यक असणाऱ्या सर्व सुखसोयी तिथं उपलब्ध आहेत. बॅरिंग्टनचे स्त्रीपुरुष, बऱ्याच वेळां एकेकट्या तरुण स्त्रियासुद्धां पोहण्यासाठीं तिथं जातात. बॅरिंग्टनमधल्या माझ्या वास्तव्याच्या उत्तरार्धांत मी ज्यांच्याकडे राहिलों त्या जॅक हॉपकिन्स यांच्या बंगल्यापासून अगदी जवळच हें तळं होतं. त्यामुळं अनेकदां तिथं जाण्याचा योग मला आला. तिथं गेल्यावर बराच काळ तिथं रमावं असं वाटायला लावणारं ' टिंबर लेक ' हें एक सुंदर ठिकाण आहे.

बॅरिंग्टनमधल्या बँकेचाहि मला फार चांगला अनुभव आला. तिथल्या मुक्कामांत कॅनडाहून मला एक चेक आला. चेकच्या मागं सही करतांच अवघ्या दोन मिनिटांत ' द फर्स्ट नॅशनल बँक 'मधून मला पैसे मिळाले. त्याचप्रमाणं गर्दीपासून दूर दूर जाऊं इच्छिणारांसाठी ' लेक फॉरेस्ट ' आणि ' ग्रोव्ह मरिना ' यांच्यासारखी ' पिकनिक सेंटर्स 'हि आहेत.

शेती, छोटे उद्योगधंदे, डिपार्टमेंट स्टोअर्समधें आणि संशोधन-केंद्रांत नोकऱ्या यांवर बॅरिंग्टनचे लोक निर्वाह करतात. बरेचसे लोक शिकागोला नोकरीला जातात. काही डॉक्टर्स व वकील हे शिकागोला प्रॅक्टिस करतात. दररोज सुमारं हजार लोक तरी बॅरिंग्टनहून शिकागोला रेल्वेनं जा–ये करतात. इतर अनेकजण स्वतःच्या कारनं शिकागोला जातात.

बॅरिंग्टनच्या ' व्हिलेज प्रेसिडेंट 'ची दर चार वर्षांनी निवडणूक होते. प्रेसिडेंट हा गांवचा प्रमुख अधिकारी. खऱ्याखुऱ्या अर्थानं लोकनेता. समाजस्वास्थ्याच्या आणि समाजकल्याणाच्या सर्व योजना त्याच्याच सल्ल्यानं पार पाडण्यांत येतात. मी गेलो त्या वेळी जॉन एच्. डी. ब्लेक हे बॅरिंग्टनचे प्रेसिडेंट होते.

बॅरिंग्टनची पाणीपुरवठयाची व्यवस्था फार चागली आहे. गांवाच्या मध्यवस्तीत 'व्हिलेज हॉल'च्या मागं दोन मोठाल्या विहिरीवर पंप बसवलेले आहेत. दर मिनिटाला १५०० गॅलन्स पाणी खेचण्याची त्या पंपांची शक्ति आहे. गांवच्या रिझर्व्हायरमधे दोन लक्ष तीस हजार गॅलन्स पाणी सांठवण्याची व्यवस्था केलेली आहे. शिवाय 'साउथ हिल'वरच्या दोन स्टँडपाइप्समुळं अनुक्रमें ९ लक्ष व ५ लक्ष गॅलन्स पाणी साठवलं जातं. उन्हाळयांत दररोज नऊ लक्ष गॅलन्स आणि हिवाळयांत दररोज पांच लक्ष गॅलन्स पाणी वापरलं जातं. बॅरिंग्टनची लोकसंख्या लक्षांत घेतां हे आंकडे मला सुरस व चमत्कारिक वाटले. आणि बॅरिंग्टन गांवच्या नसानसांतून खळाळून वाहणार हें पाणी मीं प्रत्यक्ष जेव्हा पाहिलं तेव्हां 'उदंड जालें पाणी, स्नानसंध्या करावया' हें रामदासांचं स्वप्न अखेर बॅरिंग्टनमधें साकार झाल्याचा मला भास झाला!

१९२५ मधें स्थापन झालेल्या 'द बॅरिंग्टन पब्लिक लायब्ररी'त आज सुमारे सोळा हजारपेक्षां अधिक पुस्तकं आहेत. ह्याशिवाय हवीं तीं पुस्तकं 'इलिनॉय



**गर्द वृक्षराजींच्या सान्निध्यानें टिंबर लेकचें सौंदर्य चांगलें खुललें आहे. या तळयाच्या पार्श्वभूमीवर मिसेस् लुइस हॉपकिन्स.**

स्टेट लायब्ररीकडून उसनीं मागवून सभासदांना दिलीं जातात. वॅरिंग्टनची ही लायब्ररी आणि तेथील शाळा यांच्यांतहि उत्तम परस्परसहकार्य आहे. शाळेंतल्या विद्यार्थ्यांना वर्षाला फक्त तीन डॉलर्स फी आहे. वॅरिंग्टनच्या नागरिकांना वाचनालयाचा उपयोग मोफत करतां येतो.

वॅरिंग्टनच्या हायस्कूलची बिल्डिंग १९४८ सालीं बांधलेली आहे. आज त्या हायस्कूलमध्ये ४८ वर्गाच्या खोल्या, कॅफेटरिआ, लायब्ररी, दोन व्यायामशाळा, तीन म्युझिक–रूम्स आणि एक सुसज्ज असं नाटचगृह आहे. आपल्या मालकीच्या ७३ एकर जमिनीवर शाळेनं तीन टेनिस-कोर्टस् आणि फुटबॉल–बेसबॉल या मैदानी खेळांसाठी विस्तृत पटांगणं यांची सोय केलेली आहे. शाळेच्या लायब्ररीत ५००० पेक्षां अधिक पुस्तकं आहेत. आणि विद्यार्थ्यांना नेण्या-आणण्यासाठीं अकरा स्कूल-बसेस् आहेत. शिक्षकांसाठीं सर्वसामान्य सुखसोयी तर आहेतच, पण त्याशिवाय गुणी शिक्षकांना विशेष पगारवाढ दिली जाते. शाळांचे अभ्यासक्रम स्कूलबोर्ड आणि शिक्षक यांच्या परस्परांच्या सल्लामसलतीनं ठरवले जातात. शाळेंत नेहेमीच्या विषयांखेरीज इलेक्ट्रॉनिक्स, होम इकॉनॉमिक्स, ड्रायव्हर ट्रेनिंग, शॉर्ट-हॅंड व टाइपरायटिंग, ऑर्केस्ट्रा इत्यादि जादा विषय शिकवण्याची व्यवस्था केलेली आहे. शिक्षक आणि पालक 'पेरेंट–टीचर कौन्सिल'च्या विद्यमानं वर्षांतून अनेकदां एकत्र येतात, आणि विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीनं चर्चा करून कांहीं योजना आंखतात.

वॅरिंग्टनचं माझं सारंच वास्तव्य फार सुखाचं झालं. तिथं माझ्या सह-वासांत आलेली प्रत्येक व्यक्ति माझ्याशीं निरपेक्ष स्नेहाचे कांहीं धागे जोडून गेली. आणि ज्या तीन अमेरिकन कुटुंबांत मी एक महिना राहिलों, त्यांनीं तर त्यांच्या कुटुंबांतील मुलाप्रमाणंच मला वागवलं. त्यांनीं सर्वांनींच माझ्यावर प्रेमाचा अक्षरशः वर्षाव केला. त्या वर्षावाची पहिली सुखद सर मी अनुभवली ती बिघॅम कुटुंबांत.

बिल आणि एलन बिघॅम ह्या पतिपत्नीचा सुंदर बंगला गांवापासून सहासात मैलांवर एका टेकडीवर होता. वॅरिंग्टनमधला तो एक उत्कृष्ट बांधलेला आणि सजवलेला बंगला तर होताच पण त्याच्या बांधणीची कीर्ति शिकागोलासुद्धां पोंचलेली होती. 'शिकागो डेली न्यूज' या वृत्तपत्राच्या १४–३–१९५६च्या अंकांत या बंगल्याचा फोटोसह परिचय प्रसिद्ध झालेला होता. शिकागोचे प्रसिद्ध पारितोषिक–विजेते वास्तुशिल्पकार श्री. एड् डार्ट यानी त्याचं डिझाइन बनवलं होतं. जवळजवळ प्रत्येक खोलींतून बसल्या जागीं बाहेरच्या हिरव्यागार निसर्गाचं दर्शन घडावं यासाठी बंगल्याच्या कांहीं भिंती कांचेच्या केलेल्या होत्या. बंगल्यांत पांच मोठाल्या खोल्या, दोन बेडरूम्स, तीन बाथरूम्स् आणि एक छोटासा स्विमिंग-

पूलहि होता. लिव्हिंग–रूममधून आणि बेडरूममधूनहि स्विमिंग–पूलकडे जायला दारं होतीं. साडेपांच हजार गॅलन्स पाण्याचा हा स्विमिंग–पूल चार फूट खोल होता; आणि आंतल्या तळाला व सर्व बाजूंनीहि त्याला निळसर रंग दिलेला होता. त्यामुळं त्यांतील पाणीहि निळसर रंगाचं दिसायचं. मिसेस इंग्लिश वॅलिंग या गृहसजावटशास्त्रनिपुण बाईनीं सबंध बंगल्याची अंतर्गत सजावट केलेली होती. बंगल्याच्या जवळच एक मोठा बगीचा होता, आणि खूप मोठमोठे वृक्षहि आपली थंडगार छाया आसमंतांत पसरीत होते. बंगल्याच्या परिसरांतलं सारं वातावरण कसं गूढरम्य, काव्यमय आणि स्वप्नाळू होतं. कुणाच्याहि मनाला भुरळ पाडणारं होतं. गांवाकडून बंगल्याकडे येणारा रस्तासुद्धां कसा मंतरलेला वाटत होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दाट झाडी होती. आणि रस्त्याच्या उंचसखलपणा-मुळं कारमधून जातांना पाळण्यासारखे हळुवार हेलकावे बसायचे. रस्ता कुठंहि खडबडीत नसल्यामुळं मोटरकारच्या गतिमान प्रवासांतील हेलकावेसुद्धां सुखद वाटायचे.

बंगल्याच्या गॅरेजपाशीं गाडी थांबतांच आम्ही खाली उतरलों आणि बंगल्यांत प्रवेश केला. दाराला कुलूप लावलेलं नव्हतं. तें नुसतंच ओढून घेतलेलं होतं. अमेरिकेंत हा अनुभव पुढं मला फार वेळां आला. चारसहा तासांसाठीं कुठं बाहेर जायचं असलं तर लहान गांवांतले अमेरिकन्स सहसा दारांना कुलूप लावीत नाहींत.

घरांत कुणीच नव्हतं ! श्री. विल् बिघॅम हे कांही कामासाठीं दोन दिवस न्यूयॉर्कला गेलेले होते. रात्रीं ते परत येणार होते. बिघॅम पतिपत्नींना मूलबाळ नव्हतं. दोघंहि पतिपत्नी सुशिक्षित होतीं. श्री. विल्यम ( विल ) बिघॅम यांनी 'मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन' ही हार्वर्ड युनिव्हर्सिटीची पदवी घेतलेली होती आणि शिकागोच्या एका कारखान्यांत ते मोठ्या हुद्द्यावर होते. त्यांचं वय सुमारं अठ्ठावन्न वर्षांचं होतं. एलनचं वय सुमारं त्रेपन्न वर्षांचं होतं. मिसेस् मरिअन गॉर्डन, मिसेस् पेनी गॉर्डन आणि मिसेस् सुसान ओ'लॉक्लिम या बिघॅम पतिपत्नींच्या जवळच्या मैत्रिणी होत्या. यांपैकीं मरिअन आणि पेनी ह्या दोघी सख्ख्या बहिणी होत्या. त्यांनीं दोघींनीं दोन सख्ख्या भावांशी विवाह केले होते. दोघीहि विधवा म्हाताऱ्या बिघॅम–कुटुंबाच्या शेजारींच रहात होत्या. 'शेजारी' म्हणजे त्यांतल्या त्यांत जवळच्या असलेल्या स्वतःच्या बंगल्यांत. लहान गांवांत अमेरिकनांना आपल्यासारखा शेजार नसतो. सामान्यतः प्रत्येकाचं घर स्वतंत्र असतं नि घराभोंवतीं फार मोठी जागा मोकळी असते. विल् बिघॅमच्या मालकीची सहा एकर जमीन होती. मरिअन आणि पेनी यांचा बंगला संपूर्ण 'एअर कंडिशन्ड' होता. त्यांची 'गॅलॅक्झी' फोर्ड–कारसुद्धां 'एअर कंडिशन्ड' होती.

एलनबरोबर तिच्या बंगल्यांत मीं प्रवेश करतांच 'टिका' धावत आली आणि एलनच्या नि माझ्या अंगावर उड्या मारायला लागली. अमेरिकनांचं

कुत्र्यांचं वेड मला ऐकून माहीत होतं. पण ज्या बंगल्यांत मला रहाण्याचा योग येईल त्या बंगल्यांत तरी एखादं कुत्रं असूं नये म्हणून मीं केलेली देवाची प्रार्थना वायां गेली होती. कदाचित् श्रीगुरुदेवदत्तामुळं अखिल श्वानजातीला जी प्रतिष्ठा लाभलेली होती तिच्याशीं माझी प्रार्थना विसंगत वाटल्यामुळं परमेश्वरानं तिच्याकडे दुर्लक्ष केलं असावं ! त्यांतल्या त्यांत माझ्या दृष्टीनं समाधानाची गोष्ट एवढीच होती की एलनची केंसाळ 'टिंका' कुत्री थोडीशी बहिरी होती आणि तिला दिसतहि कमीच होतं ! त्यामुळं टिंकाचा डोळा चुकवून घरांत वावरणं मला जरासं सोपं गेलं.

एलननं माझी स्वतंत्र खोली माझ्या ताब्यांत दिली आणि म्हटलं, "प्रभाकर, हें घर तुझं आहे. घरांतली कोणतीहि वस्तु तूं वापरूं शकतोस, खाद्यपदार्थ हातानं घेऊन खाऊं शकतोस, पेयं पिऊं शकतोस. केव्हांहि आम्हांला विचारण्याची आवश्यकता नाहीं. अगदीं स्वतःच्या घरच्यासारखा मोकळेपणानं इथं वावर."

आतां ज्या घरांत टिंका मोकळेपणानं सर्वत्र संचार करते त्या घरांत मोकळे-पणानं वावरणं मला कसं शक्य होतं ? माझी ही अडचण नम्रपणं मी एलनला सांगतांच ती हंसली आणि म्हणाली, "काळजी करूं नकोस. टिंका तुला चावणार नाही. तिला तूं आवडला आहेस म्हणून थोडासा लडिवाळपणा ती करते एवढंच !"

एलनच्या बोलण्यावर मी वरवर कृत्रिम हंसलों तरी टिंकाची धास्ती माझ्या मनांत कायम होतीच. नंतरचे तीनहि दिवस टिंकाला माझी जाणीव होऊं नये म्हणून मी चोरपावलानं घरांत वावरत होतों. टिंका इकडून आली की मी तिकडे जात होतों. संधि सापडली की टिंकाचा अधू डोळा चुकवून माझ्या खोलीचं दार घट्ट लावून घेऊन मी सुरक्षितपणाचं सौख्य कांहीं काळ तरी अनुभवीत होतों. एलनच्या भावना न दुखवतां तिच्या लाडक्या टिंकाशी लपंडाव खेळणं— खरं म्हणजे 'आंधळी कोशिंबीर' खेळणं ( कारण टिंका जवळजवळ आंधळी होती ) एवढंच मला शक्य होतं. नंतरच्या माझ्या दोन्ही अमेरिकन घरांत कुत्रं पाळलेलं नसल्या-मुळं एलनचं घर सोडतां व सबंध अमेरिकेंत मी मोठ्या आत्मविश्वासानं फिरूं लागलों.

माझी खोली लावण्यासाठी एलननं विशेष वेळ खर्च केल्याचं स्पष्ट दिसत होतं. मला माझ्या खोलींत सोडून एलन किचनकडे जातांच मी प्रवासांतले कपडे बदलले आणि माझ्या खोलींतल्या टेबलाकडे नजर टाकली. पहातों तों स्वागतपत्रिकांचा आणि निमंत्रण-पत्रिकांचा ढीग तिथं पडलेला होता. पहिली स्वागतपत्रिका बॅरिंग्टनच्या प्रेसिडेंटची होती. जाड पांढऱ्याशुभ्र कागदावर छापलेल्या लेटरहेडवर ती टाइप केलेली होती :—

'Being President of the Village of Barrington, Cook and Lake Counties, State of Illinois, United States of America, for the term

of 1961 to 1965, it has become my profound pleasure to welcome you to the Barrington community and I wish for you a most pleasant stay.

Sincerely,
John H. D. Blanke.
'President,
Village of Barrington, Illinois.

ह्याशिवाय 'बॅरिंग्टन पार्क डिस्ट्रिक्ट', 'बॅरिंग्टन पब्लिक लायब्ररी', 'बॅरिंग्टन चेंबर ऑफ कॉमर्स', 'बॅरिंग्टन मेथॉडिस्ट चर्च' इत्यादि संस्थांचीं अत्यंत अगत्याचीं निमंत्रणं होतीं.

अंघोळ करून माझ्या बॅगमधें वरतीच असलेला निळा नाइट पायजमा आणि शर्ट मीं घातला. म्हटलं अमेरिकनांच्या घरांतल्या पोषाखाच्या एटिकेट्स्मधें ह्या पोषाख बसतो कीं नाहीं ? म्हणून एलनला मीं तसं विचारतांच ती सहजपणानं म्हणाली, "असल्या एटिकेट्स् सगळ्या इंग्लंडमधें. आम्ही सर्वच बाबतींत 'इन्फॉर्मल' आहोंत. माझ्याकडे पहा ना ! यापेक्षां पुष्कळच अधिक कपडे तुझ्या अंगावर आहेत."


मीं एलनकडे पाहिलं. तिनं शॉर्टस् आणि स्लीव्हलेस् ब्लाउज घातला होता ! अमेरिकेंतल्या मोकळ्या वाऱ्याची ही पहिली झुळूक !

संध्याकाळीं सहाच्या सुमाराला एलननं मला 'संडे इन् न्यूयॉर्क' हें नाटक दाखवायला जवळच असलेल्या 'सेंट चार्ल्स' या गांवीं नेलं. म्हणजे तें गांव तसं बॅरिंग्टनपासून ३५ मैल लांब होतं; पण एलन ताशीं पासष्ट मैल वेगानं तिची कार चालवीत असल्यानं मला तें जवळ वाटलं. सेंट चार्ल्समधलं 'फीझंट रन प्लेहाउस' हें एक 'डिनर थिएटर' आहे. त्याच थिएटरमधें आम्ही संध्याकाळचे जेवायला अन् नाटक पहायला गेलों होतों. जातांना वाटेंत एके ठिकाणीं थांबून एलननं तिची मैत्रीण मिसेस् बेटी पार्किन्स हिलाहि आमच्याबरोबर घेतलं.

'डिनर थिएटर'मधें मध्यभागीं स्टेज असतं आणि त्याच्या चारहि बाजूंनीं हॉटेलांतल्याप्रमाणं टेबल-खुर्च्या मांडलेल्या असतात. थिएटरच्या आंत वरच्या बाजूला गॅलरीहि असते. तिथंहि प्रेक्षकांची बसण्याची अन् जेवण्याची व्यवस्था केलेली असते. न्यू जर्सीत मॉंट्क्लेअरला असतांना 'सेडर ग्रोव्ह'ला जाऊन तिथल्या 'मिडोब्रुक डिनर थिएटर'मधें मीं 'माय फेअर लेडी' हें नाटक १५ जुलै १९६४ ला पाहिलं होतं. तेव्हां डिनर थिएटरमधें जाण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग नव्हता. अवघ्या तेरा दिवसांत दुसऱ्यांदा तो योग आला. 'फीझंट रन प्लेहाउस'ची रचना 'मिडोब्रुक'सारखीच होती. फक्त स्टेज मध्यभागीं नसून

थोडं एका बाजूला होतं. 'डिनर' आणि 'नाटक' मिळून सुमारं सहा ते आठ डॉलर माणशीं तिकिट असतं. बहुधा अशी थिएटर्स 'एअर कंडिशन्ड' असतात. फोनवरून आगाऊ रिझर्व्हेशन करतां येतं. संध्याकाळी सुमारं सहाच्या जवळपास लोक थिएटरमध्यें येतात. नाजुक आणि मादक अशा मंद संगीताच्या सुरावटीनं भारलेल्या वातावरणांत गप्पा मारीत आपल्याला हवं तें जेवण मागवून सावकाश जेवतात. रात्री साडेआठच्या सुमाराला थिएटरचा मॅनेजर जातीनं प्रेक्षागृहांत फिरतो आणि सर्व प्रेक्षकांचं जेवण व्यवस्थितपणं झालेलं आहे ना, याची चौकशी करतो. जेवणं संपतांच कुणाला कोणत्या प्रकारचं किती मद्य हवं याची 'ऑर्डर' घेत वेटर फिरतात. लगेच तत्परतेनं कांचेच्या नाजुक व कलात्मक आकाराच्या चषकांत बर्फाच्या खड्यानं किणकिणणारं लालभर-गुलाबी मद्य आणून टेबलावर ठेवतात. पुढ्यांत आलेल्या मद्याचा ओठांना स्पर्श होतो न होतो तोंच घड्याळांत रात्रीचे पावणेनऊ वाजतात, आणि थिएटरमधले दिवे एकाएकी मंद होऊन विझतात. ध्वनिमुद्रित संगीत बंद होतं अन् जिवंत ऑर्केस्ट्राची जोषपूर्ण उन्मादक लय सुरू होते. नाटकांतलीं पात्रं प्रेक्षकांमधून मध्यभागीं असलेल्या रंगमंचावर केव्हां जातात तें कळतसुद्धां नाहीं. रंगमंचावरील वस्तूंची मांडणी एका क्षणांत केली जाते. दुसऱ्याच क्षणी रंगमंचावर झगझगीत प्रकाशझोत पडतात, आणि नाटक सुरू होतं. सावकाशपणं मद्याचे घोट घेत एकमेकांच्या कानांत हळूच कुजबुजत, क्वचित्प्रसंगीं परस्परांना कोपरखळ्या देत तरुण स्त्रीपुरुष प्रेक्षक नाटक पहातात. पहातांपहातां रंगमंचावरच्या पात्रांच्या सुखदुःखांशी एकरूप होऊन जातात.– होय ! 'तरुण स्त्री-पुरुष' प्रेक्षक असं मी मुद्दामच म्हटलं आहे. कारण तें सारं वातावरणच असं यौवनाच्या संजीवनीमंत्रानं भारलेलं असतं कीं तिथं आलेले वृद्धसुद्धां तरुण होतात ! तरुण मनानं, तरुण डोळ्यांनी रंगमंचावरील जीवनाच्या प्रतिबिंबाचा धुंदपणं आस्वाद घेतात.

नाटकाचा एक सीन संपला की रंगमंचावर संपूर्ण अंधार होतो. एका क्षणांत रंगमंचावरच्या वस्तू बदलल्या जातात. अंधारातच पात्रांची ये–जा होते. आणि दुसऱ्याच क्षणीं प्रकाश पडून दुसऱ्या प्रवेशाला सुरुवात होते. प्रेक्षकांना चारहि बाजूनीं नाटक दिसणं आवश्यक असल्यामुळं रंगमंचावर फ्लॅट्स् अर्थातच उभे केले जात नाहीत. अगदींच आवश्यक तेवढ्या वस्तूंच्या साहाय्यानं प्रतीकात्मक रीतीनं प्रत्येक प्रवेशाची पार्श्वभूमी सूचित केली जाते. उदाहरणार्थ, एक उंच असा 'स्ट्रीट लँप' आणून उभा केला कीं, 'हा रस्ता आहे' असं आपण समजायचं. दाराच्या नुसत्या चौकटी उभ्या केल्या की, 'आतां हें घर आहे' असं आपण समजायचं. पात्रांनी रांगेंत उभं राहून एक हात उंच करून कशाचातरी आधार घेतल्याचा अभिनय केला कीं, 'हे लोक चालत्या बस्मध्यें उभे आहेत' असं आपण



**अमेरिकन सुखानंदाचा अगदीं आधुनिक प्रकार 'डिनर थिएटर'. अगोदर मनसोक्त जेवण आणि मग नाटक. या नाटकांतलीं अगदीं चुंबनालिंगनांचीं दृश्येंहि निर्विघ्नपणें पार पडलीं जातात.**

मानायचं. याच पद्धतीनं एखादा बांक, एखादी खुर्ची, एखादं झाड इत्यादि वस्तूंच्या साहाय्यानं रंगमंचावर अगदीं कांही क्षणांतच हवं तें दृश्य उभं करता येतं.

हिंदुस्थानांतला एक तरुण लेखक आपलं नाटक बघायला आला आहे असं एलनकडून कळतांच 'संडे इन् न्यूयॉर्क' नाटकाचा प्रोड्युसर मला भेटायला प्रेक्षागृहांत आला. 'संडे इन् न्यूयॉर्क' नाटकाचा तो पहिलाच प्रयोग होता असं त्यानं बोलतांना सांगितलं. जरा गप्पा मारून तो परत आंत गेला. आमचं जेवण होतांच पावणेनऊला नाटक सुरू झालं. 'संडे इन् न्यूयॉर्क' हें नाटक तुफान विनोदी होतं. त्यांतले संवाद खूपच खटकेबाज, बरेचसे विनोदी आणि थोडेसे चावटहि होते. रंगभूमीवर दाखविली गेलेली चुंबनाचीं व आलिंगनाचीं प्रत्यक्ष दृश्यं प्रेक्षकांनीं खूपच संयमानं पाहिलीं. 'एऽ! सोड! . . अरे एऽ! काय करतुस?'—— असा आरडाओरडा कुणी केला नाही. या विशिष्ट दृश्यांबद्दल माझा अभिप्राय एलनच्या मैत्रिणीनं मला विचारला. 'यापूर्वीं मीं अनेक अमेरिकन चित्रपट पाहिलेले असल्यामुळं आतां माझी नजर मेली आहे.' असं मी तिला सांगितलं. पण आमच्याकडचे कांहीं प्रेक्षक अजूनहि पडद्यावरच्या निर्जीव पात्रांना उद्देशून कांही मौलिक सूचना करतात, हें मात्र सांगण्याचं मीं टाळलं! अशा प्रेक्षकांपुढं 'संडे इन् न्यूयॉर्क' हें नाटक सादर केलं गेलं तर आमचे पिटांतले प्रेक्षक रंगमंचावरच धांव घेतील, हा विचार मात्र माझ्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं.

गतिमान विनोदी घटना, गतिमान संवाद, आणि जॉनी डेस्मंड व ख्रिस्तिना क्रॉफर्ड ( सुप्रसिद्ध चित्रतारका जोन क्रॉफर्डची मुलगी ) यांचा सहजसुंदर अभिनय, यांमुळं नाटकाचा प्रयोग खूपच रंगला. बस्मधील उतारू, चित्रगृहांत अंधार झाल्यावर उशीरां येणारे प्रेक्षक वगैरे दृश्यं केवळ दोन बांकांच्या साहाय्यानं फार चांगलीं दाखवलीं गेलीं.

नाटकाचा प्रयोग संपतांच सर्व नटनटींनीं स्टेजवर येऊन प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या गजरांत त्यांच्या कौतुकाचा स्वीकार केला. जॉनी डेस्मंड हा सुप्रसिद्ध गायक नट नाटकाचा नायक होता. नाटक संपतांच स्टेजवर येऊन त्यानं एक छोटंसं विनोदी भाषण केलं. सदर नाटक अवघ्या सहा दिवसांत बसवल्याचं त्यानं सांगितलं. "तुम्हांला नाटकाचा हा प्रयोग खरोखर आवडला असेल तर मला तसं सांगा" असं त्यानं प्रेक्षकांना उद्देशून म्हणतांच प्रेक्षकांनीं टाळ्यांचा कडकडाट करून त्याला तसं सांगितलं. त्यानंतर खास लोकाग्रहास्तव जॉनी डेस्मंडनं एक गाणं म्हणून दाखवलं. जॉनी हा चांगला प्रसिद्ध गायक असूनहि नाटकांत एकहि गाणं नसल्यानं त्याची फार कुचंबणा झाली असावी. नाटक संपतांच गाणं म्हणून टाकल्यावर त्याला जरा बरं वाटलं असावं.

रात्रीं पावणेबारापर्यंत नाटकाचा प्रयोग चालला होता. घरीं परत जाण्यापूर्वीं जॉनी डेस्मंड याला मी 'विंग'मधें जाऊन भेटलों, आणि उत्कृष्ट अभिनयाबद्दल त्याचं मनःपूर्वक अभिनंदन केलं. त्यानं माझा परिचय करून घेतला आणि माझ्या भेटीनं त्याला झालेला आनंद पुन्हापुन्हा व्यक्त केला. नायकानंतर माझ्या भेटीचा आनंद मी नायिकेलाहि देणार होतों. पण तेवढ्यांत तिनं कपडे बदलायला सुरुवात केल्याचं कळलं. अशा प्रसंगीं माझ्या भेटीनं तिला तितकासा आनंद झाला नसता. त्यामुळं तो बेत मीं रद्द केला.

रात्रीं घरीं परतायला एक वाजून गेला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मरिअन आणि पेनी गॉर्डेन या एलनच्या मैत्रिणींनीं चहाला बोलावलं म्हणून त्यांच्याकडे गेलों. त्यांचाहि बंगला फार सुरेख होता. विशेषतः त्यांच्या घरांतली चारपांचशें पुस्तकांची लायब्ररी पाहून मला फार आनंद झाला. बहुतेक अमेरिकन घरांमधें पुस्तकं विकत घेऊन स्वतःच्या संग्रहीं ठेवण्याची पद्धत मला आढळून आली. सुमारं शंभर-दोनशें पुस्तकं तर प्रत्येक घरांत सहज असत. एलननं मरिअनची 'गॅलॅक्झी' कार थोड्या वेळापुरती उसनी घेतली आणि तिच्यांतून गांवांत जाऊन आम्ही थोडीफार खरेदी करून आलों.

दुपारीं एलनची दुसरी मैत्रीण सुसान ही मला भेटायला आली. मध्यम वयाची सुसान खूपच उंच असून सुदृढ होती. बोलायला चांगली अन् दिसायला आकर्षक होती. या बाईला १६–१७ वर्षांचा एक मुलगा व १५ वर्षांची एक

मुलगी आहे हें कुणाला सांगूनहि खरं वाटलं नसतं ! हिंदु विवाहसमारंभ, अंत्य-संस्कार व राजकारण या विषयांवर तिनं माझ्याशी गप्पा मारल्या. राजकारण सोडलं तर बाकीच्या दोन विषयांतल्या तपशिलांची मला फारच थोडी माहिती होती. आपल्या देवतांबद्दलहि तिनं मला विचारलं. त्यांतल्या त्यांत सुप्रसिद्ध व लोकप्रिय देवांचा परिचय मीं तिला करून दिला. सिनेमा–नाटक व टेलिव्हिजन यांना वाहिलेल्या एका मासिकाचा नवा अंक तिनं मला भेट दिला.

त्याच दिवशीं संध्याकाळीं आमच्या स्वागताप्रीत्यर्थ बॅरिंग्टनवासीयांनीं एक फार मोठी 'वेल्कम् पार्टी' दिली. ब्रिकर रोडला रहाणाऱ्या श्री. जॉन वेस्टकोट यांच्या भव्य बंगल्यांत ही पार्टी होती. पार्टीचा हेतु 'swim, eat, get acquainted, fun!' असा जाहीर केलेला होता. आम्ही नऊ प्राध्यापक आणि आमच्या 'होस्ट फॅमिलीज्' व इतर कांहीं प्रतिष्ठित नागरिक या पार्टीला उपस्थित होते. प्रत्येक महत्त्वाच्या नागरिकानं आपल्या घरून एकेक पदार्थ भरपूर प्रमाणांत तयार करून आणून पार्टीची तयारी केली होती. भात, पुलाव, केक्स, चिकन, उकडलेल्या भाज्या, सॅलड्स, जाम, जेलीज्, आइस्क्रीम, चहा–कॉफी, आणि ज्यांचीं नांवं मी विसरलों असे अनेक पदार्थ 'डिनर'साठीं होते. 'बफे'-पद्धतीचं डिनर होतं. प्रत्येकानं रांगेंत उभं रहायचं, ट्रे–चमचे उचलायचे आणि टेबलावर मांडून ठेवलेल्या भांड्यांतून आपल्याला हवे ते पदार्थ हवे तेवढे घ्यायचे, नंतर गप्पा मारीत उभ्या-उभ्या अगर एखाद्या टेबलावर बसून ते खायचे, अशी पद्धत होती. अमेरिकेंत बहुतेक सर्व ठिकाणीं मला हीच पद्धत आढळली.

जेवणखाण, फोटो वगैरे आटोपल्यावर आम्ही सर्व दिवाणखान्यांत कांहीं पेय घेत गप्पा मारीत बसलों. श्री. मॅकरे नांवाच्या गृहस्थांनीं मला आग्रहानं त्यांच्या टेबलावर जेवायला बोलावलं होतं. त्यांनीं नेहरूंचा मृत्यु, नंतरची परिस्थिति, शास्त्रींचा आजार, काश्मीर-प्रश्न, चीनची भारतावरची स्वारी वगैरे विषयांवर मला बरेच मार्मिक प्रश्न विचारले. आमच्या गप्पा चांगल्याच रंगल्या आहेत असं दिसतांच पार्टींतले अनेक अमेरिकन स्त्रीपुरुष आपापल्या जागा सोडून आमच्या-भोंवती घोळका करून जमले. त्यांतल्या अनेकांनीं मला शास्त्रींच्या आजाराच्या स्वरूपाबद्दल प्रश्न विचारले. शास्त्रींची कारकीर्द, त्यांच्या आजारामुळं, निश्चित-पणं फारच थोडी ठरणार आहे असं तिथल्या प्रत्येकाला ठामपणं वाटत होतं. त्यामुळं प्रत्येकजण शास्त्रींच्या आजाराबद्दल काळजी व्यक्त करून 'त्यांच्यानंतर कोण' असा प्रश्न विचारीत होता.

आमच्या बॅरिंग्टनच्या 'होम-स्टे'च्या प्रमुख मिसेस् ग्लॅडिस् डिकल्मन या बाई होत्या. पाहुण्यांची वांटणी आणि बॅरिंग्टनच्या वास्तव्यांतील त्यांचे सर्व कार्यक्रम मिसेस डिकल्मन यांनीच ठरवले होते. जेवणानंतर थोडा वेळ गप्पा

झाल्यावर मिसेस् डिकल्मननीं एक छोटंसं प्रास्ताविक भाषण करून प्रा. मजिथियांनी काढलेला हिंदुस्थानचा मोठा नकाशा आणला. त्यावर कलकत्ता, मुंबई, पुणें, अहमदाबाद, रोहटक, भावनगर, सुरेंद्रनगर ही गावं आणि त्याच जागीं त्या गांवांहून येणाऱ्या प्राध्यापकांचीं नांवं लिहिलेलीं होतीं. प्रा. मजिथियांनी तो नकाशा दाखवून आमचा सर्वांचा परिचय करून दिला. मिसेस् डिकल्मन त्यांच्या व इतर कांही अमेरिकनांच्या आग्रहावरून मी मराठींत एक भाषण केलं. त्यांना भारतांतली एक प्रादेशिक भाषा ऐकायची होती. माझं भाषण संपतांच प्रा. पंडितांनीं त्याचा इंग्रजी अनुवाद लोकांना सांगितला. माझ्या भाषणांत बॅरिंग्टनच्या नागरिकांनीं केलेल्या आमच्या फार मोठ्या व प्रेमळ स्वागताबद्दल त्यांचे आभार मानून, त्यांच्या गांवांत त्यांच्या सहवासांत मी किती सुखी आहे तें मीं सांगितलं. मराठी भाषा आयुष्यांत प्रथमच ऐकतांना त्यांना गंमत वाटली. माझ्या भाषणांत सहजगत्या चारसहा इंग्रजी शब्द आले होते तेवढेच त्यांना कळले. प्रा. रॉय यांनीं त्यांचे आभार मानल्यावर रात्री अकराला हा एक आनंद-समारंभ संपला. या पार्टीनं सर्वांच्या चांगल्या ओळखी झाल्या, आणि आम्ही एकमेकांच्या अधिक जवळ आलों यांत शंका नाहीं. इतके जवळ कीं, बॅरिंग्टनमधलं प्रत्येक घर आम्हांला आमचं स्वतःचंच वाटायला लागलं. आमच्या बोलण्याचालण्यांतला, वागण्यांतला सारा संकोच, सारा औपचारिकपणा या एका 'वेल्कम् पार्टी'नंच नाहींसा झाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळी बिल् बिंघॅमची ओळख झाली. ब्रेकफास्टच्या वेळीं बऱ्याच गप्पाहि झाल्या. श्री. बिल् बिंघॅम यांचं व्यक्तिमत्त्व प्रसन्न आणि प्रेमळ होतं. सहा-साडेसहा फूट उंच आणि भरपूर स्थूल असलेल्या या माणसाचा स्वभाव कमालीचा मिस्किल होता. गप्पा मारतांना माझ्या आवडीनिवडी त्यांनीं सहजगत्या विचारून घेतल्या, आणि 'आज रात्रीं तुझ्याकरतां मी खास जेवण बनवतों' असं मला आश्वासन दिलं.

दुपारा एक वाजतां आम्ही शिकागोला जाऊन 'शिकागो म्युझिअम ऑफ नॅचरल हिस्टरी' या जगप्रसिद्ध भव्य म्युझिअमला भेट दिली. या म्युझिअममधें कॅफेटरिआसारख्या सर्वसामान्य सोयी तर आहेतच, पण 'जेम्स सिम्प्सन थिएटर' या नांवाचं सुमारं एक हजार प्रेक्षकांसाठी असलेलं चित्रपटगृहहि आहे. सिनेमाची वेळ झाली होती म्हणून आधी आम्ही थिएटरमधे जाऊन वॉल्ट डिस्नेनं तयार केलेले दोन छोटे चित्रपट पाहिले. 'ग्रँड कॅन्यन सूट' व 'जॅक अँड द बीन्स्टॉक' हे दोन चित्रपट होते. दोन्हीहि टेक्निकलर होते.

नंतर तिथल्याच कॅफेटरिआंत जेवण घेऊन म्युझिअम पाहिलं. हजारों वर्षांपूर्वीच्या भव्य प्राण्यांचे सांगाडे, निरनिराळ्या संस्कृतीचे पुरातन अवशेष आणि इजिप्तमधून आणून तिथं ठेवलेल्या खरोखरच्या 'ममीज्' इत्यादि गोष्टी विशेष

प्रेक्षणीय होत्या. स्त्रिया आणि पुरुषांबरोबरच ठेवलेल्या लहान मुलांच्या ' ममीज् ' पहातांना काळजांत कुठंतरी हलल्यासारखं झालं.

संध्याकाळीं विल् विघॅम यांचा स्वैंपाकघरांतला अवतार पहाण्यासारखा होता. अर्धी पँट घालून एका हातांत जगप्रसिद्ध पाककृतींचं पुस्तक घेऊन त्यांची इकडून तिकडे धांवपळ चालली होती. मी तिथं जाताच मला ते म्हणाले, " आज बघ तुला कसं मस्त जेवण करून जेवायला घालतों ! स्वीडिश, इटालियन आणि चायनीज् डिशेस्‌चे नमुने आज तुला खायला घालतों ! "

खरोखरच स्पॅघेटी, व्हिजिटेबल चौ-मेन यांच्यासारखे आंतरराष्ट्रीय लोकप्रियतेचे खाद्यपदार्थ त्यांनीं तयार केले होते. त्यांच्याशिवाय इतर पदार्थ होतेच. मी सहज त्यांच्या पाककौशल्याबद्दल थोडासा संशय प्रकट करतांच ते हलक्या आवाजांत म्हणाले, " माझ्या बायकोपेक्षांहि अधिक चांगला स्वैंपाक मीच करतों. मात्र तिला सांगूं नकोस बरं का ! "

विल्‌नीं तयार केलेले सर्व पदार्थ अत्यंत चविष्ट झाले होते याचा प्रत्यय मला रात्रीच्या जेवणाच्या वेळीं आला. माझ्याबरोबर जेवायला त्यांनीं मरिअन आणि पेनी गॉर्डन या दोघी बहिणींनाहि बोलावलं होतं. त्यामुळं जेवतांना गप्पा चांगल्याच रंगल्या. या चारहि वयस्कर अमेरिकनांच्या सहवासांत क्षणभरहि मला त्यांच्या वयाची जाणीव झाली नाहीं. त्यांचा उत्साह, रसिकता आणि मिस्किलपणा तरुणांनाहि लाजवणारा होता.

मरिअन आणि पेनी ह्या दोन वयस्कर बहिणींची विघॅम पतिपत्नींशीं खूपच जवळची मैत्री असावी असं मला वाटलं. कारण शेजारीं बसलेल्या मरिअनला गप्पा मारतांमारतां मधूनच बिल् विनोदानं जवळ घेत, एखाद्या वेळीं कोपरखळी मारीत. एकदां तर जेवणाच्या मधेंच त्यांनी तिचं झटकन् चुंबनहि घेतलं. अर्थात् ह्या साऱ्या प्रकाराचं स्वरूप थट्टामस्करीचंच होतं आणि त्याच टेबलावर जेवायला बसलेल्या एलनदेखतच हें सारं चाललं होतं. आणि तीसुद्धां अधूनमधून त्यांच्या ह्या चेष्टेंत सहभागी होत होती.

मधेंच एकदां बिल्‌नी मला विचारलं, " हा आमच्यांतला मोकळेपणा पाहून तुला धक्का तर बसला नाहीं ना ? "

मीं म्हटलं " जिला धक्का बसायचा त्या तुमच्या बायकोला जर कांहीं वाटत नाही, तर मला काय वाटणार आहे ? शिवाय तसा मी पुष्कळच उदारमतवादी आहें ! "

कोणत्याहि प्रकारच्या शारीरिक आकर्षणाच्या पलिकडे त्या चौघांचीहि वयं गेलेलीं होती. त्यांच्या सलगीकडे ह्यापेक्षां दुसऱ्या कोणत्या दृष्टीनं मी पाहाणार ?....

विल् आणि एलन यांच्या सहवासांतला हा माझा शेवटचा दिवस होता. दुसऱ्या दिवसापासून– म्हणजे ३१ जुलैपासून– मी श्री. ओवेन फेअरवेदर यांच्या कुटुंबांत रहायला जाणार होतों. एकाच गांवांत असल्यानं विघॅम पतिपत्नींच्या आणि माझ्या अधूनमधून भेटीगांठी होणार असल्या, तरी त्यांच्या घरांतलं माझं वास्तव्य आतां संपलं होतं. ह्या जाणिवेची कांहींशी रुखरुख मनांत घेऊनच जेवण झाल्यावर रात्रीं मी माझ्या खोलींत प्रवेश केला.

दुपारीं अकरा वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत त्या दिवशीं मी घराबाहेरच होतों. त्यामुळं रात्रींच माझ्या सामानाची आंवराआंवर करायला मला सवड मिळाली. पण मला कांहींच काम करण्याची जरूर भासली नाहीं. कारण आतां दुसऱ्या दिवशीं माझा मुक्काम हलणार म्हणून खोलीत इकडेतिकडे पडलेलं माझं सामान एलननं नीट आंवरून ठेवलं होतं. आणि गेल्या कांही दिवसांत मीं साचव-लेले माझे प्रवासांतले मळलेले कपडेहि तिनं धुऊन इस्त्री करून घड्या घालून ठेवले होते. माझ्यासाठीं माझ्या नकळत तिनं घेतलेल्या या कष्टांच्या जाणिवेनं माझं मन भारावलं. तिला याबद्दल कांहीं विचारायला जाणार, एवढ्यांत तीच माझ्या खोलींत आली अन् थट्टेनं म्हणाली " आज तुझ्या खोलीत शिरून मीं चोरी केलीय !"

" माझ्यासाठी एवढी तसदी कां घेतलीस ?" असं मीं तिला विचारतांच ती सहजतेनं म्हणाली, " त्यांत तसदी कसली ? मशिनमधें कपडे धुतले, अन् माझ्याकडे इलेक्ट्रिक इस्त्री आहे तिनं इस्त्री करून टाकली ! आतां उद्यां तूं नव्या घरीं जाणार. तुला चांगले कपडे नकोत का ?"

मला अधिक कांहींच बोलवेना. एलनला मीं एवढंच म्हटलं, " तुझा फार फार आभारी आहें मी. माझ्यासाठीं तूं घेतलेली ही तसदी कधीं विसरणार नाहीं मी !"

साता समुद्रापलिकडची ही कुठली कोण अनोळखी स्त्री ! अवघ्या तीन दिवसांच्या माझ्या सहवासांत काळाला आणि अंतरालाहि न तोडतां येणारं असं अतूट नातं माझ्याशी जोडून गेली !

□

# निसर्गाशीं अद्वैत

दुसऱ्या दिवशीं– म्हणजे ३१ जुलै १९६४ ला दुपारीं बाराच्या सुमाराला अमेरिकेंतली माझी दुसरी 'आई' मला तिच्या घरीं न्यायला आली. आतां मी श्री. ओवेन फेअरवेदर आणि सौ. सॅली फेअरवेदर यांच्या कुटुंबांत हॉथॉर्न रोड-वरील त्यांच्या बंगल्यांत रहायला जाणार होतों. सॅलीचं वय असेल सुमारं ४५ किंवा ४६. पण इतर अमेरिकन स्त्रियांप्रमाणं ती पुष्कळच तरुण वाटत होती. एलनच्या मानानं ती खूपच बोलकी होती. 'बडबडी' म्हटलं तरी चालेल! त्याचं कारण कदाचित् असं असावं कीं एलन ही फक्त एक 'गृहिणी' होती. आणि सॅलीच्या मालकीची एक 'आर्ट–गॅलरी' शिकागोसारख्या जगप्रसिद्ध शहरांत होती. श्री. हार्डिन हे तिच्या ह्या व्यवसायांत पार्टनर होते. १९४४ सालापासून सॅली शिकागोला जवळजवळ दररोज जाऊन 'फेअरवेदर–हार्डिन गॅलरी'चं काम पहात होती. गॅलरीच्या कामाच्या निमित्तानं अनेक लोकांशीं नित्य संबंध येत असल्यानं ती बोलकी बनली असावी. सकाळीं साडेआठला ती शिकागोला जायला निघायची आणि संध्याकाळीं परत यायची. आठवड्यांतून दोन दिवस ती शिकागोलाच मुक्काम करायची. शुक्रवार, शनिवार आणि रविवार या दिवशीं मात्र शिकागोला न जातां ती घरीच राहून घरगुती गोष्टींकडे लक्ष द्यायची. माझ्या वास्तव्याच्या निमित्तानं तिनं आणखीहि कांहीं दिवस सुट्टी घेतली.

सॅलीला एक मुलगा आणि मुलगी होती. पंधरा वर्षांचा मुलगा पीटर

ह्रा मॅसाच्युसेट्स् स्टेटमधील ' डिअर फील्ड अॅकॅडमी 'तलं पहिलं वर्ष संपवून् नुकताच जूनमधें घरीं आलेला होता. पीटरला वाचनाचं फार वेड होतं. डॉक्टर होण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. असं असूनहि यंत्रांचंहि त्याला फार आकर्षण होतं. मित्र-मंडळी खेळायला नसतील तेव्हां आपल्या खोलींत तो एखाद्या रेडिओचे किंवा ट्रँझिस्टरचे सुटे भाग जोडण्याची खटपट करायचा. पीटर स्वभावानं फारसा बोलका नव्हता; पण मला मदत करायला फार तत्पर होता. फेअरवेदर यांच्या बंगल्यांत त्याची खोली माझ्या खोलीपासून जवळच होती. पण मुद्दाम बोलावल्या-वांचून माझ्या खोलींत तो कधींहि आला नाहीं. अमेरिकन मुलांना लहानपणा-पासून घरांतल्या पाहुण्यांशी कसं वागावं याचं निश्चित शिक्षण दिलं जात असावं. कारण पुढं हॉपकिन्स यांच्या कुटुंबांत मी रहायला गेलों, तेव्हां जोनाथन नांवाच्या त्यांच्या नऊ वर्षांच्या छोटया मुलालाहि असंच वळण लावलेलं मला आढळलं.

सॅलीच्या मुलीचं नांव एलन होतं. तिचं वय वीस होतं. मी गेलों त्या वेळीं ही एलन उन्हाळ्याच्या सुटीसाठीं म्हणून स्वित्झर्लंडला गेलेली होती. कोलो-रॅडो विद्यापीठांत ती शेवटच्या वर्षाला होती. तिचीच खोली मला देण्यांत आलेली होती. मी बॅरिंग्टनला असेपर्यंत ती घरीं येऊं शकली नाहीं. माझी अन् तिची ओळख फक्त पत्रानंच आणि फोटोंवरून झाली. तिच्या घरीं मी रहायला आलों आणि ती मात्र दुसऱ्या देशांत गेलेली म्हणून पत्रांतून ती फार रुखरुख व्यक्त करायची. स्वित्झर्लंडच्या गमती ती मला लिहायची आणि भारतांतल्या गमती विचारायची. अशा वेळीं मात्र माझी फार पंचाईत व्हायची ! इकडे आमच्याकडे सगळी गंमतच आहे हें कसं काय कळवणार तिला ?

स्वतः श्री. ओवेन फेअरवेदर यांची शिकागोला ' लॉ फर्म ' होती. फर्ममधें त्यांचे तीन पार्टनर होते. सुमारं ४० वकील त्यांच्याकडे नोकरीला होते. ओवेन यांना शिकागो युनिव्हर्सिटीची ' जे. डी. ' ही ' डॉक्टर ऑफ लॉज् 'ची पदवी होती. शिवाय ' डार्टमाउथ 'ची ' ए. बी. ' ही पदवी होतीच. १९३८ सालापासून शिकागोला ते वकिली करीत होते. ' लेबर लॉ ' या विषयावर त्यांचं प्रभुत्व होतं. १९४० सालीं सॅलीशीं त्यांचा विवाह झाला होता. त्यांचं वय एकावन्न असूनहि त्यांच्या सव्वासहा फूट उंचीच्या भरदार आणि चैतन्ययुक्त व्यक्तिमत्त्वामुळं ते खूपच तरुण दिसत. सॅलीच्या मानानं दिसायलाहि ते फार छान होते. दोघांचा स्वभाव मात्र अगदी सारखाच प्रेमळ, खेळकर अन् मिस्किल विनोदी होता.

फेअरवेदर यांच्या घरांत आणखीहि एक व्यक्ति होती. तिचं नांव लॉटी शर्ले. ही पंचविशीतली तरुण आणि कष्टाळू जर्मन मुलगी होती. फेअरवेदर यांच्याकडे ' हाउसकीपर ' म्हणून ती काम करायची अन् आपला कॉलेजशिक्षणाचा

खर्च भागवायची. अर्थात् त्यांचं मालक-नोकराचं नातं असं कधीं मला दिसलंच नाहीं. लॉटी ही त्यांच्याच कुटुंबापैकीं एक बनून गेली होती. घरांत स्वैंपाक करणं किंवा सॅलीला स्वैंपाकांत मदत करणं, बाजारहाट करणं आणि घरांतली इतर सर्व व्यवस्था पहाणं, हीं कामं ती करायची.

फेअरवेदर यांची अमेरिकेंतल्या थोड्याशा श्रीमंत म्हणून समजल्या जाणाऱ्या वर्गांतच गणना होत असावी असं त्यांचा बंगला पाहून मला वाटलं. त्यांचा बंगला खूपच प्रशस्त होता. आणि फार चांगल्या रीतीनं तो सुशोभित केलेला होता. सॅलीची स्वतःची आर्टगॅलरी असल्यानं, बंगल्यांत ठिकठिकाणीं भिंतींवर नाना प्रकारचीं मोठमोठीं चित्रं लावलेलीं होतीं. तीं चित्रं लावण्यांतसुद्धां ओवेन आणि सॅली यांची उच्च अभिरुचि जशी दिसत होती तशीच विनोदबुद्धीहि दिसून येत होती. सॅलीच्या साम्राज्यांत— खुद्द तिच्याच स्वैंपाकघरांत तिचींच कांहीं गमतीदारपणे काढलेलीं रंगीत व्यंगचित्रं भिंतीला लावलेलीं होतीं. प्रत्येक विनोदी व्यंगचित्रांत सॅलीचं कांहीं ना कांहींतरी वर्णन केलेलं होतं. उदाहरणार्थ, एका उंच शिडीवर चढून कांहीं काम करीत असलेल्या सॅलीच्या चित्रावर लिहिलेलं होतं,— ‘ Sally is a work girl. ’ दुसऱ्या एका चित्रांत एका मुलानं सॅलीवर दोन हातांतलीं दोन पिस्तुलं रोखलेलीं असून, सॅलीनं ‘ समजुतदारपणं ’ हात वरती केलेले दाखवले होते. चित्रावर लिहिलेलं होतं,— ‘Sally is an understanding mother,’ याप्रमाणं इतरहि कांहीं चित्रांत सॅलीचं असंच ‘ गुणवर्णन ’ केलेलं होतं ! एका व्यंगचित्रांत मात्र चित्रविचित्र पोषाख केलेला एक माणूस कॅमेरा डोळ्यांपुढं धरून फोटो काढतोय् असं दाखवलं होतं. कॅमेरा एवढा मोठा होता कीं फोटो काढणाऱ्याचा सबंध चेहेराच त्यानं झांकला होता. ह्या चित्रावर लिहिलेलं होतं,— ‘ Sally has a handsome husband ! ’

ओवेन आणि सॅली यांच्या बंगल्यांतलं सारं फर्निचर उंची होतं. घरांत पुष्कळ पुस्तकं होतीं, एक पियानो होता, दोन टेलिव्हिजन-सेट्स होते, एक रेडिओ आणि एकदोन ट्रॅन्झिस्टर्सहि होते. २ ‘ टीव्हीं ’पैकीं एक मोठा सेट होता आणि दुसरा छोटासा ‘ ट्रॅन्झिस्टर बेबी-टीव्ही ’ होता. हा छोटासा जपानी ‘ डेल्मॉनिको ’ बेबी–टीव्ही सॅलीनं मी त्यांच्याकडे जातांच माझ्या खोलींत मला वापरायला म्हणून देऊन टाकला. हा ट्रॅन्झिस्टर टीव्ही इतका लहान होता कीं, आपल्याकडच्या एखाद्या मासिकाच्या कव्हरच्या एक–चतुर्थांश एवढ्या आकाराचा त्याचा कांचेचा पडदा होता. पण त्यावरचीं चित्रं मात्र कमालीचीं सुस्पष्ट दिसायचीं, आणि त्याचा आवाजहि फार चांगला होता.

फेअरवेदर यांच्या घरापासून जवळच एक लहानसा ओढा होता. आणि ओढ्याच्या पलिकडेच सॅलीचं माहेर होतं. सॅलीच्या आईवडलांचा मोठा बंगला

होता. बंगल्याच्या आवारांतच एक स्विमिंग पूलहि होता. तिच्या वडिलांचं नांव होतं गस् हॉलबर्ग. आणि आईचं नांव होतं इव्हा. सॅलीचं माहेर इतक्या जवळ तर होतंच, पण लग्न झालेला तिचा भाऊसुद्धां गांवांतच वेगळा रहात होता. त्यामुळं मलाहि त्यांच्याकडे अनेकदा जाण्याचा योग आला.

सॅलीनं तिच्या घरीं मला आणतांच प्रथम सारा बंगला दाखवला. माझी खोली माझ्या ताब्यांत दिली. आणि पीटरशीं नि लॉटीशीं माझा परिचय करून दिला. ओवेनना घरीं यायला अजून पुष्कळच अवकाश होता. दुपारीं दोनच्या सुमाराला आम्हीं 'लंच' घेतलं, आणि त्याच टेबलावर मी, लॉटी आणि सॅली संध्याकाळी पांचपर्यंत गप्पा मारीत बसलों. लॉटीला नि सॅलीला मराठी भाषेबद्दल, वाङमयाबद्दल बरीच जिज्ञासा दिसली. गप्पा मारतांमारतां त्यांनीं माझ्याकडून कांहीं मराठी शब्द शिकून घेतले. मराठीच्या ह्या तुटपुंज्या ज्ञानाचा त्यांनीं पुढं फार गमतीदारपणं उपयोग केला. इंग्रजी बोलतांना मधेंच एखादा मराठी शब्द त्या वापरूं लागल्या. देवनागरी लिपींत त्यांचीं सर्वांचीं नांवं कशीं लिहायचीं तेंहि त्यांनीं शिकून घेतलं, आणि तीं अक्षरं गिरवायला सुरुवात केली.

एकमेकांना अभिवादन करतांना आम्ही 'नमस्कार' असं म्हणतों, हें माझ्याकडून कळतांच सॅली झटकन् उठली आणि 'रेकॉर्ड-प्लेअर'-वर एका प्रसिद्ध गायिकेची एक रेकॉर्ड तिनं वाजवली. त्या गाण्यांत 'नमस्कार-नमस्कार' असे शब्द होते. अर्थात् तेवढेच मला कळले! नंतर मग सॅलीकडून मीं त्या गाण्याची अधिक माहिती मिळवली. 'द अन्सिंकेबल मॉली ब्राउन' ह्या 'म्युझिकल प्ले'मधलं तें गाणं होतं. टॅमी ग्रिमेस् नांवाच्या 'ब्रॉडवे'वरच्या एका प्रसिद्ध गायिका–नटीनं तें म्हटलेलं होतं. गाण्याचं नांव होतं,– 'Bon Jour.' (The Language Song). या गाण्यांत त्या गायिकेनं प्रत्येकाला त्याच्या त्याच्या राष्ट्रीय भाषेंत अभिवादन केलेलं होतं. त्यांत अनेक भाषा होत्या. ग्रीक, जर्मन, फ्रेंच, इटालिअन, स्पॅनिश, रशियन, जॅपनिज्, चायनिज् आणि इंडियन– 'नमस्कार, नमस्कार'!

त्याच दिवशीं संध्याकाळीं सात वाजतां ओवेन घरीं येतांच मी आणि सॅली ओवेनबरोबर वॅरिंग्टनपासून सुमारं पंधरा मैल असलेल्या 'डंडी' या गांवीं एस्टेस् नांवाच्या त्यांच्या एका मित्राकडे 'कॉक्टेल् पार्टी'ला गेलो. श्री. व सौ. एस्टेस् यांनीं प्रथम माझा परिचय करून घेतला आणि नंतर माझ्याबरोबर फिरून मला त्यांचा बंगला दाखवला. ओवेनचा तर प्रथमभेटीपासूनच माझ्यावर एवढा लोभ जडलेला होता की, एस्टेस्-दांपत्याला माझा परिचय करून देतांना ते सहजपणं म्हणाले, "मीट माय् सन् प्रभाकर फेअरवेदर!" नंतर मग एस्टेस्ना अधिक गोंधळांत न पाडतां त्यांनीं माझा पूर्ण परिचय करून दिला. त्यांची माझ्याबद्दलची

ही भावना इतकी पक्की होती कीं, त्यानंतर प्रत्येक वेळी कुठंहि माझा परिचय करून द्यायचा असला तरी माझा उल्लेख ते ‘My son Prabhakar Fairweather’ असाच करीत. त्यांच्या ह्या भावनेचा आदर करण्यासाठीं अजूनहि ज्या ज्या वेळीं मी त्यांना पत्र पाठवतों त्या त्या वेळीं पत्राखालीं माझी सही मी ‘प्रभाकर फेअरवेदर’ अशीच करतों!

एस्टेस् यांचं घर जुन्या इंग्रजी पद्धतीचं असल्यानं सर्वांनीं त्या घराच्या बांधणीचं फार कौतुक केलं. अमेरिकेंत अलिकडे बांधलेलीं सर्वांचींच घरं अगदीं अत्याधुनिक असल्यानं, एखाद्यानं जुन्या इंग्रजी पद्धतीचं घर बांधलं तर त्याचं वरंच कौतुक होतं.

एस्टेस् यांचे मित्र श्री. जॉन बेनेट् व सौ. सिल्व्हिया बेनेट् हीं कॅलिफोर्नियाला कायमचीं रहायला जात असल्यानं त्यांना निरोपादाखल ही मद्यपान–मेजवानी ठेवलेली होती. प्रथम बंगल्याबाहेरच्या हिरव्यागार गालिच्यासारख्या हिरवळीवर उभ्याउभ्याच गप्पा मारीत सर्व उपस्थितांनीं आपल्याला हवं तें पेय घेतलं. नंतर मग आंतमधें बंगल्यांत येऊन ‘बफे’–पद्धतीच्या डिनरला सुरुवात झाली. प्रत्येकानं पाहिजे ते पदार्थ डिश्मधें वाढून घेतले आणि हव्या त्या नवपरिचितांजवळ जाऊन जेवायला सुरुवात केली.

जेवण चालू असतांनाच मधेंच एकजण उभा राहून डिश्वरती चमचा आपटून सर्वांचं लक्ष वेधून घेई, आणि एखादा विनोदी चुटका अत्यंत गंभीरपणं सांगे. तो ऐकतांच एकदम हास्याचा कल्लोळ उठे. कांहींजण तर लहान मुलांप्रमाणं खुर्च्या–टेबलं–बश्या वाजवून खूपच गोंधळ करीत. पुन्हा थोडा वेळ परस्परांच्या गप्पांत शांतपणं जातांच मधेंच एखादा उठे आणि राजकारणावर आधारलेला कोड्यासारखा विनोदी प्रश्न उपस्थितांना विचारी. ज्याला त्या प्रश्नाचं उत्तर येत असे तो उभा राहून उत्तर देई. उत्तर ऐकतांच सर्वजण टाळ्या वाजवून त्या हास्यविनोदांत सामील होत.


जेवतांना माझ्या जवळ मिसेस् जिजी मोसली आणि टॉम हेवर्ड नांवाचे एक वृद्ध गृहस्थ बसले होते. श्री. हेवर्ड यांचं वय सुमारं साठ वर्षांचं होतं. ‘Ryerson Steel Co.’ या एका मोठ्या कंपनीचे ते व्हाइस-प्रेसिडेंट होते. त्यांचं व्यक्तिमत्त्व आकर्षक अन् मिस्किल होतं. जेवतांना गप्पा मारतांमारतां त्यांनीं अधूनमधून चावट विनोदी चुटके सांगितले, आणि सिगरेटच्या पेटीच्या कागदावर थोडीं वाह्यात विनोदी चित्रंहि काढून दाखवलीं. जिजीसारख्या परस्त्रीच्या सान्निध्यांत तीं वाह्यात विनोदी चित्रं पहातांना प्रथम मला जरा संकोच वाटला. पण जेव्हा जिजीनंहि त्या विनोदाचा आस्वाद घेऊन खोटच्या रागानं ‘यूऽ नॉटी बॉय!’ म्हणून

टॉमच्या खांद्यावर चापट मारली तेव्हां माझा जीव भांड्यांत पडला ! अमेरिकन लोक जेव्हां पार्टीसाठी एकत्र जमतात तेव्हां आपण कोण आहोंत, आपला दर्जा काय आहे हें सारं विसरून सर्व स्त्री-पुरुष एका पातळीवर येऊन हास्यविनोद करतात असं मला आढळून आलं. अत्यंत धांवपळीच्या गतिमान आयुष्यातून बाजूला जाऊन दोन घटका तरी स्वतःला विसरण्याचा त्यांचा तो प्रयत्न असावा हें तर खरंच. पण कामाच्या वेळीं भरपूर काम आणि पार्टीसारख्या हौसे-मौजेच्या प्रसंगीं हंसतखेळत जीवनाचा मनमुराद उपभोग घेण्याची अमेरिकनांची मनोवृत्ति हेंसुद्धां कदाचित् त्याचं एक कारण असूं शकेल.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळीं पांच वाजतां फेअरवेदर कुटुंबाबरोबर गस् हॉलबर्ग यांच्याकडे गेलों. सॅलीचे आईवडील खूपच वयोवृद्ध वाटले, तरी दोघांचाहि उत्साह वाखाणण्यासारखा होता. त्यांच्याकडे खाणंपिणं झाल्यावर त्यांनीं मला कांहीं फोटोंच्या स्लाइड्स् दाखवल्या. पंचवीसतीस वर्षांपूर्वी ते एकदां हिंदुस्थानांत आले होते, त्या वेळीं दिल्ली–आग्र्याला त्यांनीं घेतलेले ते रंगीत फोटो होते. नंतर त्यांच्या ' स्विमिंग पूल 'वर सर्वांचा पोहण्याचा कार्यक्रम झाला. त्या प्रसंगीं ओवेनच्या आग्रहाला न जुमानतां मीं प्रेक्षकाची आणि छायाचित्रकाराची तटस्थ भूमिका आनंदानं स्वीकारली. पण माझी ही ' अलिप्ततावादी ' भूमिका भारताप्रमाणंच मला फार दिवस संभाळतां आली नाहीं. पुढं एक दिवस आम्ही एका ठिकाणीं ट्रिपला गेलों असतांना ओवेननीं मला पाण्यांत खेंचलंच !

पोहण्याचा कार्यक्रम झाल्यावर ओवेन आणि मी ' बोटिंग 'ला गेलों. ओवेनच्या बंगल्याच्या पलिकडेच ' कीन्स लेक ' नांवाचं एक मोठं तळं होतं. तिथं आम्ही ' बोटिंग ' केलं. आयुष्यांत प्रथमच मी तिथं होडी वल्हवायला शिकलों. ओवेननी मद्यपानाचा अतिरेक कधीच केला नाहीं. पण ' ड्रायव्हिंग ', ' स्विमिंग ', ' बोटिंग ' करतांना इतर बऱ्याच अमेरिकनांप्रमाणं त्यांना त्याची गरज भासे. अशा वेळीं मी त्यांच्याबरोबर असलों तर ग्लास संभाळण्याची दुहेरी जबाबदारी माझ्यावर पडायची ! आमचं ' बोटिंग ' चालू असतांना त्या दिवशी पावसाचे थोडेसे शितोडे आले. पण तशाहि परिस्थितींत होडींतच आम्हीं एकमेकांचे फोटो घेतले.

त्याच दिवशीं संध्याकाळीं बॅरिंग्टनच्या ' मेथॉडिस्ट चर्च 'मधे एका विवाह-समारंभाला जाऊन आलों. विवाहप्रसंगींचं सौंदर्य, मांगल्य आणि गांभीर्य चर्च-मधल्या वातावरणांत पुरेपूर मनाला जाणवलं. कुठंहि गडबड नाहीं, गोंधळ नाही. आरडाओरडा नाहीं किंवा घाणेरडा गबाळेपणा नाहीं ! सारा कसा आंखींव-रेखींव कार्यक्रम. एवढ्या मोठ्या लग्नसमारंभांत कुणाचींच भांडणं नाहीत, मानाप-मानावरून रुसणी–फुगणीं नाहींत, हें पाहून माझ्या भारतीय मनाला जरा चुकल्या-



**मनसोक्त पोहून आल्यानंतर न्याहारी करीत असतांना— ( डावीकडून ) मिस् सुसान हॉलबर्ग, मिसेस् नॉर्मा हॉलबर्ग आणि मिसेस् सॅली फेअरवेदर.**

चुकल्यासारखं वाटलं. निदान कोरं लुगडं नेसून, नाकांत नथ घालून, अखिल जगत् ( म्हणजे मुलीकडची माणसं ) तृणवत् मानून घसा बसेपर्यंत ओरडून बोलणारी 'मुलाची आई' कुठं दिसते का म्हणून मीं बारकाईनं पाहिलं. पण त्याहि बाबतींत माझी निराशा झाली ! हॅट् ! हें काय लग्न झालं ? .. नंतरच्या पार्टीतल्या केक्स मला गोड लागेनात !

वॅरिग्टनचे सर्वच दिवसांचे कार्यक्रम इतके भरगच्च होते की विचारतां सोय नाहीं ! त्या दिवशीं लग्नाहून आल्यानंतर 'स्पॅघेटी' आणि 'टोमॅटो-मटन-रस्सा' यांचं मस्त जेवण झाल्यावर ओवेननी मला रात्री पुन्हा सिनेमासाठीं बाहेर काढलंच ! जॅक लेमन आणि डोरोथी प्रॉव्हिनचा 'गुड नेबर सॅम' हा विनोदी चित्रपट आम्ही 'The Catalow' या थिएटरमधें पाहिला. प्रथम मला तिकिटांसाठीं रांगेंत उभं करून ओवेननीं 'डबल आइस्क्रीम कोन्स' आणले. आमच्या-प्रमाणंच इतर अनेक स्त्रीपुरुष आइस्क्रीम खात रांगेंत उभे होते. अमेरिकन लोकांना दुसरं कांहींच करतां येत नाही तेव्हां ते कांहींतरी खातात अगर पितात असं मला दिसून आलं. ते आइस्क्रीमचे कोन्स संपतां संपेनात ! थिएटरमधे आइस्क्रीम खाऊं देत नाहींत. तेव्हां उरलेलं आइस्क्रीम दाराजवळच्या डब्यांत टाकून आम्ही थिएटरमधें शिरलों. आंतमधें अनेक अमेरिकन स्त्रीपुरुष 'शॉर्टस्'

मधें आणि अन्य अनौपचारिक पोषाखांत आलेले दिसले. रात्रीं बाराच्या सुमाराला आम्ही घरीं परत आलों.

अमेरिकन माणसांच्या बरोबरीनं खायला किंवा प्यायला फार मोठी मानसिक व शारीरिक तयारी लागत असली पाहिजे यांत शंका नाहीं ! कारण दिवसभर एवढं खाणंपिणं झाल्यावर पुन्हा रात्रीं झोंपण्यापूर्वीं ओवेननीं बीअरचा आग्रह केलाच !

दुसऱ्या दिवशी रविवार असल्यानं ओवेननीं 'लेक फॉरेस्ट' या गांवीं ट्रिप ठरवली होती. 'लेक फॉरेस्ट'च्या मिसेस् ग्लोअर या वयोवृद्ध बाईनीं दिलेलं पार्टीचं आमंत्रण हेंहि एक निमित्त होतंच. 'लेक फॉरेस्ट' हें शिकागोचंच एक सुंदर उपनगर असून बॅरिंग्टनपासून तें सुमारं पस्तीस मैलांवर आहे. गांवाची वस्ती सुमारं दहा हजार असून तिथले बहुतेक सर्व लोक श्रीमंत आहेत असं मला सांगण्यांत आलं. 'लेक फॉरेस्ट' हें एक दाट झाडीचं आणि सुंदर रस्त्यांचं अत्यंत निसर्गरम्य ठिकाण असून 'लेक मिशिगन'च्या काठीं तें वसलेलं आहे.

मिसेस् ग्लोअर यांच्याकडे आम्ही पोंचतांच प्रथम परस्परांच्या ओळखीचा कार्यक्रम होऊन बंगल्याबाहेरच्या बागेंतच कॉकटेल–पार्टी झाली. या पार्टीला मिसेस् ग्लोअरचा मध्यमवयीन मुलगा रॉबर्ट, त्याची बायको लिझ्, आणि त्यांची मुलगी मॉड, ग्लोअरबाईंची दुसरी एक नात मिस् एलन बिच्, सॅलीचे आईवडील इव्हा आणि गस् हॉलबर्ग, संपूर्ण फेअरवेदर कुटुंब आणि ग्लोअर कुटुंबाचे दोन मित्र श्री. रट्लेज् बर्मिंगहॅम व रिचर्ड अहेर्न– एवढे लोक उपस्थित होते. नंतर बागेंतच उन्हाळी रंगीबेरंगी छत्र्यांखालीं, झाडांखालीं आम्ही सर्वजण टेबलावर जेवायला बसलों. इतरांसाठीं 'रोस्टेड बीफ' हा खास पदार्थ होता. पण मला त्याची विशेष गोडी नसल्यानं ब्रेड-बटर, अंड्यांचे पदार्थ, मक्याचीं उकडलेलीं कणसं, असा 'सात्त्विक' आहार मीं घेतला.


जेवण झाल्यावर बाहेर उन्हाच्या झळा लागायला लागल्या, म्हणून आम्ही बाईंच्या 'एअर-कंडिशन्ड' बंगल्यांत गेलों आणि गप्पा मारीत बसलों. एवढ्यांत रॉबर्टची सोळासतरा वर्षांची मुलगी कु. मॉड माझ्याकडे आली. तिचा हात बघून मीं तिचं भविष्य सांगावं अशी तिची इच्छा होती. मला 'पामिस्ट्री' येत नाही म्हणून मीं वारंवार सांगूनहि तिचा विश्वास बसला नाहीं. बहुतेक सर्व इंडियन माणसांना भविष्य सांगतां येतंच अशी तिची ठाम श्रद्धा दिसली ! आम्ही अमेरिकेंत जाऊन पोंचण्यापूर्वी घाईघाईनं अमेरिकेला जाऊन आलेल्या इंडियन माणसांनीं काय गैरसमज पसरवून ठेवला होता पहा ! मग शेवटीं केवळ तिच्या समाधानाकरतां मी तिचं भविष्य सांगितलं. अर्थात् 'चारचौघांत मोठ्यानं माझं भविष्य सांगू नका' असं ती म्हणाली, तेव्हांच तिचं खरं 'भविष्य' मी ओळखलेलं

होतं! प्रेमांत पडण्याचं तिचं वय झालेलंच होतं. तेव्हां थोडीशी लेखकीय कल्पनाशक्ती चालवून तिचा 'रम्य भविष्यकाळ' रंगवणं मला फारसं कठिण गेलं नाहीं!

आपल्या सुंदर भविष्यांत कांहीं क्षण रंगून गेल्यावर आपल्या स्वप्नाळू डोळयांची किंचित् उघडझांप करून हलक्या स्वरांत मॉड मला म्हणाली, "I love you' हें वाक्य मला मराठी भाषेंत लिहून देतां का?"

अरेच्या! म्हणजे माझं 'भविष्य' खरोखरच खरं ठरलं होतं कीं! तिला तिच्या प्रियकराला तें वाक्य म्हणून दाखवायचं होतं! मग मराठी शब्दांचं इंग्रजींत स्पेलिंग करून मॉडला मीं तें वाक्य म्हणायला शिकवलं. खरं म्हणजे प्रेम प्रकट करायला इंग्रजी काय किंवा मराठी काय– भाषेची गरजच कुठं असते? पण कदाचित् मॉडनं तिचं प्रेम आधींच प्रकट केलेलं असावं! आणि आतां प्रीतीच्या प्रकटीकरणांतली गोडीच केवळ तिला पुन्हापुन्हा चाखायची असावी. म्हणून हा भिन्न भाषेतलं एक वाक्य शिकण्याचा सारा खटाटोप! दोन दिवसांपूर्वीं ओवेननींहि नेमकं हेंच वाक्य मराठींत कसं म्हणायचं तें मला विचारलं होतं आणि माझ्याकडून तें लिहून घेतलं होतं! एकूण जगांत कुठंहि गेलं तरी माणसाच्या आयुष्यांतलं सर्वांत महत्त्वाचं वाक्य हें एकच दिसतं!

ग्लोअर कुटुंब खरोखरच सधन असावं. कारण त्यांच्याकडच्या दोनतीन मोटरकार्सपैकीं एक 'एअर कंडिशन्ड' होती. थोडया वेळानं रॉबर्ट ग्लोअरच्या-



**रॉबर्ट ग्लोअरचें भुरळ घालणारें तीनचाकी वाहन–– 'मेसरस्मिथ'**

बरोबर त्यांच्या बंगल्याच्या परिसरांत फिरून मीं त्यांच्या मोटरकार्सचा परिचय करून घेतला. त्यांची एक अगदी छोटीशी मोटारगाडी मला फार आवडली. खेळण्यांतल्या मोटारीसारखा तिचा आकार होता. १९५५ चं तें जर्मन 'मेसर-स्मिथ' ( Messerschmidt ) मॉडेल होतं. मला ती छोटीशी कार फार आवडल्याचं पाहून तिच्या शेजारीं मला उभं करून रॉबर्टनं माझा एक फोटो काढला.

फोटोनंतर रॉबर्टच्या मोठ्या कारमधून लिझ्, सॅली आणि मी 'लेक फॉरेस्ट कॉलेज' बघायला गेलों. ड्रायव्हिंग अर्थातच रॉबर्ट करीत होता. जगप्रसिद्ध 'लेक मिशिगन'पासून जवळच असलेल्या या कॉलेजांत सुमारं ८०० विद्यार्थी शिक्षण घेतात. हिंदुस्थानांतलेहि कांहीं विद्यार्थी त्यांत आहेत असं कळलं.

कॉलेज बघितल्यावर आम्ही मिशिगन तळ्याच्या किनाऱ्यावर गेलों. खरं म्हणजे 'लेक मिशिगन'ला 'तळं' म्हणणं बरोबर नाहीं. अमेरिकेंतलीं जग-प्रसिद्ध पांच गोड्या पाण्याचीं जीं प्रचंड सरोवरं आहेत त्यांतच 'लेक मिशिगन'चा अंतर्भाव होतो. समुद्रासारखाच महाप्रचंड असा त्यांचा विस्तार आहे. मोठ-मोठ्या आगबोटीहि त्यातून सहज जातात. केवळ समुद्रासारखं या सरोवराचं पाणी खारं नाहीं, म्हणूनच त्यांना सरोवर म्हणायचं !

'लेक मिशिगन'च्या किनाऱ्यावरचं सारं वातावरणहि कुठल्याहि सुंदर सागरतीराला शोभेल असंच प्रसन्न होतं, धुंद होतं. आम्ही तिथं पोंचलों तेव्हां दुपारचे अडीच वाजून गेले होते. पण सरोवराचा सारा किनारा सूर्यस्नान करीत असलेल्या तरुण स्त्रीपुरुषांनीं नुसता फुलून गेला होता. किनाऱ्यावरच्या वाळूंत टॉवेल अगर तत्सम अशीं कांहीं वस्त्रं अथरून त्यांवर शेकडों तरुण स्त्रीपुरुष अगदीं कमींत कमी वस्त्र अंगावर ठेवून पहुडले होते. त्यांच्याबरोबरची कांहीं लहान मुलंहि तशाच अवस्थेंत सूर्यकिरणांत न्हात होतीं. दुपारचे अडीच वाजून गेले होते तरी सूर्याचीं किरणं सकाळसारखीं कोवळीं होतीं. त्या कोवळ्या किरणांचा लुसलुशीत रेशमी स्पर्श सर्वांगाला कितीतरी सुखद वाटत असला पाहिजे. त्या किरणांच्या कोमल स्पर्शाची सुखद भावना तिथं पहुडलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या मुखावर पसरली होती. आपल्या अंगावरच्या अपुऱ्या वस्त्राची लाज किंवा खंत कुणाच्याहि चेहेऱ्यावर दिसत नव्हती. कोवळ्या किरणांचे सहस्र बाहू पसरून नवचैतन्याचं आवाहन करणाऱ्या निसर्गाला सर्वांगानं आलिंगन देऊन त्या दैवी स्पर्शांत धुंद होऊन जाण्यांत कसली आली आहे लाज ? निसर्गाशी अद्वैताचं नातं जोडून स्वतःला विसरून जाण्यांत कसला आला आहे ओंगळेपणा ? असल्या क्षुद्र, संकुचित जाणिवांचा अंशहि तिथल्या कुणाच्या मुखावर आढळला नाहीं. त्या निसर्गरम्य सागरसदृश सरोवरांत जलक्रीडेचा आनंद लुटणाऱ्या स्त्री-पुरुषांचे कांहीं फोटो मीं घेतले तेव्हांसुद्धां कुणाच्याहि हालचालींत संकोचाची भावना मला दिसली


नाहीं. कित्येक अनोळखी स्त्री-पुरुषांनीं तर माझ्याकडे पाहून आनंदानं हंसून हात हलवून माझं स्वागत केलं.

त्याच दिवशीं– म्हणजे २ ऑगस्टलाच आणखी एक सुंदर आनंद-पर्यटन माझ्या भाग्यांत होतं. संध्याकाळीं पांचच्या सुमाराला आम्ही 'लेक मिशिगन'हून परत आलों. थोडा वेळ विश्रांति घेतली आणि लगेच साडेपांच वाजतां सॅली आणि ओवेन यांच्याबरोबर मी श्री. स्पेन्सर मोसली आणि सौ. जिजी मोसली यांच्या घरीं कॉकटेल–पार्टीसाठीं गेलों. श्री. एस्टेस् यांच्या घरच्या पार्टीच्या वेळीं मोसली पतिपत्नींचा नि माझा परिचय झालेलाच होता. त्यांचा बंगला इतर अमेरिकनांपेक्षां खूपच वेगळा, वैशिष्टयपूर्ण होता. श्री. स्पेन्सर मोसली हे 'द जनरल अमेरिकन ट्रॅन्स्पोर्टेशन कंपनी' या शिकागोच्या एका विमान कंपनीचे प्रेसिडेंट होते. त्यांच्या या मोठेपणाच्या खुणा त्यांच्या बंगल्याच्या वास्तुरचनेपासून गृहसजावटीपर्यंत सर्वत्र दिसून येत होत्या. श्री. मोसली यांचा बंगला फेअरवेदर यांच्या घरापासून सुमारं पांच मैल दूर होता. आम्ही तिथं पोंचलों तेव्हां पार्टीसाठीं बोलावलेले जवळजवळ सर्व निमंत्रित तिथं आलेले होते. सुमारं चाळीस-पंचेचाळीस स्त्रीपुरुष पार्टीला आले होते. या पार्टीच्या वेळीं 'ग्रे हाउंड बस् कंपनी'चे एक प्रमुख वयस्कर अधिकारी श्री. कैसर यांची ओळख झाली. 'ग्रे हाउंड'च्या मूळ संस्थापकांपैकीं ते एक आहेत.

श्री. मोसली यांच्या बंगल्यांतील कॉकटेल–पार्टी आटोपल्यावर संध्याकाळीं साडेसातला पार्टीसाठीं जमलेलीं आम्ही सर्वजणं 'ग्रोव्ह मरिना'ला गेलों. मोसली यांच्या घरापासून सुमारं दहा मैलांवर 'फॉक्स' नांवाची नदी आहे. 'ग्रोव्ह मरिना' हें फॉक्स नदीवरचं 'पिकनिक् सेंटर'. अवघ्या दहा मिनिटांत आपापल्या गाड्यांतून आम्ही सर्व तिथं जाऊन पोंचलों. 'ग्रोव्ह मरिना'ला मुंबईच्या चौपाटीचं स्वरूप आलेलं होतं. कारण 'वीक-एंड-ट्रिप'साठीं तिथं आलेले असंख्य स्त्रीपुरुष खाद्यपदार्थ खात, पोहत किंवा बोटिंग करीत होते. अर्थात् चौपाटीची बेशिस्त गर्दी आणि तिचा कोलाहल मात्र तिथं नव्हता.

फॉक्स नदीवरच्या आमच्या सहलीसाठीं श्री. मोसली यांनीं 'Grove Belle Show Boat' ही बोट रिझर्व्ह केलेली होती. कारण त्यांनींच ही 'ग्रोव्ह मरिना'ची सहल आयोजित केली होती. दर वर्षी उन्हाळ्यांत ते एकदां तरी अशी बोटीवरची पार्टी बॅरिंग्टनमधल्या आपल्या मित्रमंडळींना देतात.

फॉक्स नदीचं पात्र खूपच मोठं आहे. एकाच वेळी अनेक मोटर-लाँचेस् नदींत फिरत होत्या. रात्रीं आठला आमची बोट संथपणं सुरू झाली. बोट सुरू होतांच गप्पागोष्टी, फोटो काढणं, खाणंपिणं, 'कॉक्टेल्' वगैरे कार्यक्रम सुरू झाले. सुमार अर्ध्यापाऊण तासानं अंधार पडला. तोंपर्यंतच्या प्रवासांत नदीच्या दोन्ही



**लेक मिशिगनच्या चैतन्यमय समुद्रकिनाऱ्याचें विहंगम दृश्य. निसर्गाशीं अद्वैताचें नातें जोडून येथे समुद्रस्नानाचा आणि सूर्यस्नानाचा आनंद मुक्तपणें लुटला जातो.**

बाजूचा हिरवागार परिसर स्पष्ट दिसत होता. अमेरिकेंत उन्हाळ्यांत दिवस खूपच मोठा असतो. रात्रीं साडेआठ-पावणेनऊपर्यंत अंधार पडत नाहीं. त्यामुळं फॉक्स नदीच्या तीरावरची दुतर्फा पसरलेली दाट झाडी व मधूनच आढळणाऱ्या लहान बंगलीवजा झोंपड्या बराच वेळपर्यंत दिसत होत्या. अंधार पडल्यावर तीरावरच्या झाडींतून लुकलुकणारे दिवे दिसायला लागले. आकाश निरभ्र होतं, त्यामुळं चमचमणारे तारेहि दिसत होते. मधूनच आकाशांत संथपणं तरंगत जाणारा एखादा विमानाचा लाल दिवा दिसायचा.

बोटीवर मेणबत्त्यांचे दिवे होते. वाऱ्यान मेणबत्त्या विझूं नयेत म्हणून त्यांच्याभोंवतीं कांचेच्या लांबट आकाराच्या चिमण्या बसवलेल्या होत्या. बोटीला फक्त सर्व बाजूंनीं नक्षीदार खांबांचा पांढरा कठडा होता, आणि वरती तसंच नक्षीदार लाकडाचं छत होतं. त्यामुळं नदीवरचा थंडगार मोकळा वारा सर्वत्र खेळत होता. बोटीवर एकूण आम्ही ४५ लोक होतों. त्यांत २५ स्त्रिया होत्या.


आमच्या बोटीचा कर्णधार मॅक्डोनल्ड नांवाचा एक वयस्कर आयरिश गृहस्थ होता. बोटीवर खाण्यापिण्याचा, नाचगाण्याचा जल्लोष चालू होता. पण बिचाऱ्या मॅक्डोनल्डकडे कुणाचच लक्ष नव्हतं. मी त्याला कांहीं खाद्यपदार्थ आणि बीअरचा एक 'कॅन' फोडून नेऊन देतांच त्याला फार धन्यता वाटली. माझे पुन्हापुन्हा आभार मानून तो माझ्याशीं मोकळेपणानं गप्पा मारायला लागला.

आमच्या बोटीचं भाडं तासाला ४० डॉलर्स होतं, हें त्याच्याच तोलण्यांतून मला समजलं. त्यानं भारतांतल्या राजकारणाबद्दल मला बरेच प्रश्न विचारले. परदेशांत आपल्या देशाबद्दलच्या सगळ्याच प्रश्नांचीं खरीं उत्तरं देतां येत नाहींत. त्यामुळं कित्येकदां फार पंचाईत होते !

कांहीं वेळानंतर सौ. जिजी मोसली माझ्याजवळ येऊन बसल्या. त्यांच्या हातांत ‘ Glockenspiel ’ या जर्मन नांवाचं, धातूच्या पट्टया असलेलं जलतरंगासारखं वाजवायचं वाद्य होतं. तें वाजवून पहाण्याचा त्या मला आग्रह करूं लागल्या. माझ्या दिव्य वाद्यवादनानं संगीतशास्त्रांत बहुधा एखादा नवा ‘ राग ’ निर्माण झाला असावा ! नंतर माझ्या आग्रहावरून जिजीनं तें ‘ सुरस व चमत्कारिक ’ वाद्य वाजवून ‘ Red River Valley ’ हें लोकगीत गाऊन दाखवलं. आमचं उभयतांचं गाणं–बजावणं ( खरं म्हणजे ‘ गाणं ’–‘ बजावणं ’ हें जिजींचंच होतं. माझं फक्त ‘ ऐकणं ’ चाललं होतं ! ) रंगांत येतांच जिजीचे यजमान श्री. स्पेन्सर मोसली हे तिथं धावून आले. नंतर त्या दोघांनीं मिळून मला आणखी कांहीं लोकगीतं गाऊन दाखवली. त्यांना जवळपासच्या इतर कांहीं उपस्थितांनी चांगलीच साथ दिली, आणि सुरुवातीच्या द्वंद्वगीतांचं रूपांतर लवकरच ‘ कोरस ’मधें झालं.

एकंदर सहलीला खूपच मजा आली. रात्रीं आठ ते साडेदहापर्यंत आम्हीं बोटीचा प्रवास केला. रात्री साडेदहाला किनाऱ्यावर परत आलों तोंपर्यंत किनाऱ्यावर खाणंपिणं करणारे, नदींत पोहणारे वगैरे सर्व लोक घरीं परत गेले होते.

किनाऱ्यावर येतांच पार्टीसाठी जमलेल्या आम्हीं सर्वांनीं एकमेकांचा निरोप घेतला. आतां ‘ ग्रोव्ह मरिनां ’त फक्त आमचे आम्हीच राहिलों होतों. रस्त्यावर-



वालुकाशय्येवर पडून सूर्यस्नानांत बुडून गेलेला एक तरुण जीव

सुद्धां परके लोक कुणीच नव्हते. त्यामुळं मुख्य रस्त्यावर येतांच रात्रीं साडेदहा-पावणेअकराला हातांत हात घालून धांवणं, हातांची सांखळी करून एखाद्या मित्राची मोटर अडवणं वगैरे पोरकट प्रकार आम्ही केले.

बोटीवरच मिसेस् रुथ फुलरची नि माझी चांगली ओळख झाली होती. नंतर मला त्यांच्याकडे जायला वेळ मिळणार नाहीं म्हणून त्याच रात्रीं घरीं जाण्यापूर्वीं मीं त्यांच्या घरीं यावं असं आग्रहाचं आमंत्रण त्यांनीं मला दिलं होतं. त्याप्रमाणं ' ग्रोव्ह मरिना 'हून आम्ही बरोबरच श्री. डग्लस फुलर आणि सौ. रुथ फुलर यांच्या घरीं रात्रीं साडेअकराला गेलों. फुलर यांच्या आठनऊ वर्षांच्या मुलाला माझी ओळख करून घ्यायची होती. सहलीहून परत येतांना मला बरोबर आणण्याचं आश्वासन मिसेस् फुलरनीं त्याला दिलेलं होतं. पण आमची वाट पाहून कंटाळून अखेर तो झोपीं गेला होता. पण मी त्याच्या घरीं येऊन गेल्याचं दुसऱ्या दिवशीं त्याला कळलं तर तो रागवेल म्हणून मिसेस् फुलरनीं वरच्या मजल्यावर जाऊन त्याला तसंच झोंपेंतून उठवून खालीं आणलं. त्याच्याशीं माझी ओळख करून दिली त्या वेळीं त्याच्या निळ्यानिळ्या डोळ्यांतून झोंप अक्षरशः बाहेर ओसंडत होती. त्याला माझ्याशीं खूप गप्पा मारायच्या होत्या. पण झोंपेनं सर्व बाजूंनीं घेरल्यानं त्याला बोलतांच येईना. मग ओळख होतांच तो बिचारा डोळ्यांतली झोंप जिन्यांत सांडू नये म्हणून डोळे मिटूनच झोंकांड्या खात जिना चढून त्याच्या खोलींत गेला.

— आणि जिना उतरून फुलर यांची अठराएकोणीस वर्षांची तरुण व सुंदर मुलगी खालीं आम्ही बसलों होतों तिथं दिवाणखान्यांत आली. ' आज फार उकडतंय् ' म्हणून ' स्विमिंग सूट ' घालून खांद्यावर टॉवेल टाकून रात्रीं साडेअकराला ती तिच्या मैत्रिणीच्या ' स्विमिंग पूल 'वर पोहायला चालली होती. माझी ओळख झाल्यावर तिची गाडी घेऊन ती निघून गेली. रात्रीं सव्वाबाराला ती पोहून परत आली, आणि तशीच उभी राहून आमच्याशीं थोडा वेळ गप्पा मारून तिच्या खोलींत निघून गेली. पोषाखाच्या बाबतींतला हा अमेरिकन अनौपचारिकपणा मला विलक्षण वाटला !

नंतर अनेकदां अनेक लोकांच्या घरीं मी गेलों असतांना कांहीं स्त्रीपुरुष आपल्या पोहण्याच्या पोषाखांतच घरांत वावरून आमच्याशीं निःसंकोचपणं गप्पा मारतांना मला आढळले, तेव्हां मला त्याचं विशेष आश्चर्य वाटलं नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं लॉटीबरोबर गांवांतल्या ' ज्युएल मार्केट 'मधें जाऊन कांहीं खरेदी करून आलों. ' ज्युएल ' हें दुकानाच्या कंपनीचं फक्त नांव आहे. त्यामुळं मीं खरेदी केली ती वाण्याच्या सामानाचीच केली ! ' ज्युएल मार्केट ' हें एक मोठं ' डिपार्टमेंट स्टोअर ' आहे. तिथं भाजीपासून वृत्तपत्रांपर्यंत सर्व कांहीं विकत मिळतं. चार दिवसांनीं आम्ही भारतीय पद्धतीचं जेवण तयार करणार होतों. त्यासाठीं लागणारे मसाल्याचे नि इतर प्रकारचे जिन्नस आम्हीं घेतले, आणि बँकेंत गेलों.

'द फर्स्ट नॅशनल बँक' ही 'एअर–कंडिशन्ड' होती. बँकेंत काम करणाऱ्या कर्मचारी बहुसंख्य स्त्रियाच होत्या. बँकेंत एका ठिकाणीं आगपेट्या ठेवलेल्या होत्या. कार्डबोर्डच्या छोट्या घडी घातलेल्या तुकड्याला आंतमधें काड्या चिकटवलेल्या असतात. कव्हरवर जाहिरातीसाठीं बँकेचीं किंवा इतर दुकानांचीं नांवं छापलेलीं असतात. ज्यांच्याजवळ आगपेटी नसेल ( अगर असूनही तिथली घ्यावीशी वाटेल ) अशा लोकांसाठीं एका बॉक्समधें अशा आगपेट्या ठेवलेल्या होत्या. बॉक्सच्या वरती लावलेल्या बोर्डावर लिहिलेलं होतं, – 'For Our 'Matchless' Friends', 'Have a light.'

दुपारीं बारा वाजतां 'लेक मिशिगन' जवळ असलेली 'नॉर्थ–वेस्टर्न युनिव्हर्सिटी' बघायला गेलों. बॅरिंग्टनपासून सुमारं वीस मैलांवर शिकागोच्या उत्तरेकडे असलेल्या 'इव्हॅन्स्टन' या गांवीं ही युनिव्हर्सिटी आहे. तिथं डॉ. जेम्स एलिस ('प्रोफेसर ऑफ स्पीच') यांच्याशीं बराच वेळ गप्पा मारल्या. ते त्या युनिव्हर्सिटीचे चित्र-नाट्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम–प्रमुख आहेत.

संध्याकाळीं साडेपांचला मिस्टर अँड मिसेस् बिअर्ड यांनीं हॉलबर्ग यांच्या 'स्विमिंग पूल'वरती ठेवलेल्या कॉकटेल–पार्टीला गेलों. पार्टीनंतर त्यांनीं जवळच असलेल्या त्यांच्या सुंदर बंगल्यांत मला आग्रहानं नेलं. श्री. बिअर्ड हे एक उत्कृष्ट पियानोवादक असून पियानो विकण्याचा व्यवसाय करतात. मिसेस बिअर्ड या तिकडच्या प्रसिद्ध गायिका आहेत. श्री. बिअर्ड यांनीं त्यांचा खास वैशिष्ट्यपूर्ण पियानो मला वाजवून दाखवला. घरांत एका बाजूला पियानो वाजवला कीं कांहीं अंतरावरचीं छोटीं अरुंद लाकडी दारं आपोआप मिटतात–उघडतात, आणि त्या दारांजवळच्या लहानमोठ्या 'पाइप्स'मधून मोठ्या आवाजांत पियानोचं संगीत ऐकूं येतं. अशा प्रकारचा पियानो मीं प्रथमच पाहिला.

दुसऱ्या दिवशीं शिकागोला जाऊन 'Wilding Motion Pictures Producers'चे स्टुडिओ पाहिले. एकूण अडीच एकर जागेंत त्यांचे सगळे स्टुडिओ आहेत. स्टुडिओंतलं सर्व वातावरण आपल्याकडच्या चित्रपट– स्टुडिओंतल्या वातावरणासारखंच वाटलं. जॉन डेव्हपोर्ट या त्यांच्या कंपनीच्या प्रमुख लेखकाशीं कांहीं वेळ चर्चा करून नंतर मग दुपारीं लंच होतांच 'WIND' रेडिओ–स्टेशन पहायला गेलों. 'WIND'चे जनरल मॅनेजर श्री. एडवर्ड वॅलिम यांनी माझ्याशीं बऱ्याच गप्पा मारल्या, माहिती दिली आणि आमचे दोघांचे कांहीं फोटो काढून घेतले. त्यांतला एक फोटो तिथल्या वृत्तपत्रांत नतर प्रसिद्ध झाला.

संध्याकाळीं सहाला 'Ravinia' नांवाच्या शिकागोच्या एका उपनगरांत असलेल्या 'रॅव्हिनिआ पार्क'मधें 'न्यूयॉर्क सिटी बॅले' या प्रसिद्ध संस्थेचा 'बॅले' पहायला आम्ही गेलों. नुसत्या पार्कमधें प्रवेश करण्याची फी माणशीं दोन डॉलर्स


आहे. तरीसुद्धां कितीतरी हौशी स्त्रीपुरुष पार्कमधें हिरवळीवर पिकनिकसाठीं येतात. पार्कच्या आंत असलेल्या एका मोठ्या अर्धवर्तुळाकार थिएटरमधें असलेल्या बॅलेच्या कार्यक्रमाचं वेगळं तिकिटहि माणशीं दोन डॉलर्स होतं. मी गेलों त्या वेळीं १६ जूनपासून २७ सप्टेंबरपर्यंत 'रॅव्हिनिआ फेस्टिव्हल' चालू होतं. त्यामुळं दररोज तिथं नृत्य, नाट्य, गायन वगैरे कार्यक्रमांचा जल्लोष चालू होता. थिएटरच्या प्रेक्षागारांत एकूण ३००० प्रेक्षक बसतात. आम्हीं 'बॅले' पाहिला त्या दिवशीं थिएटर 'हाउसफुल्' होतं. प्रथम हिरवळीवर 'कॉकटेल' आणि 'डिनर' घेतलं, आणि नंतर ओवेन व सॅली यांच्याबरोबर 'बॅले' पाहिला.

रात्रीं बरोबर साडेआठला 'बॅले' सुरू झाला आणि साडेदहाला संपला. सबंध 'बॅलें'त एकूण सुमारं शंभराच्या जवळपास नर्तकनर्तिकांनीं भाग घेतला असावा. 'बॅले'च्या स्वप्नभूमींतील कलासौंदर्याची देहोषी मात्र 'बॅले' संपला तरी लवकर उतरली नाहीं. 'बॅले' संपल्यानंतर सुमारं पंधरा मिनिटं प्रेक्षक त्या कलाकारांचं टाळ्या वाजवून कौतुक करीत होते, अभिनंदन करीत होते. प्रेक्षकांनीं टाळ्यांचा कडकडाट केला कीं 'बॅलें'तील कलाकार रंगमंचावर येत आणि पुन्हापुन्हा कलात्मकतेनं लवून प्रेक्षकांना अभिवादन करीत.

तारीख ५ ऑगस्टला शिकागोला जाऊन 'शिकागो पोलिस डिपार्टमेंट' पाहिलं. नंतर दुपारीं 'WBBM–TV' आणि 'CBS–Television' हीं शिकागोचीं दोन सुप्रसिद्ध टेलिव्हिजन–स्टेशन्स पाहिलीं.

त्याच दिवशीं संध्याकाळीं फेअरवेदरनीं श्री. व. सौ. हॉपकिन्स यांना 'कॉकटेल–डिनर पार्टी' साठीं बोलावलेलं होतं. फेअरवेदर यांच्याकडचा मुक्काम संपल्यावर मी हॉपकिन्स यांच्या कुटुंबांत दोन आठवडे रहायला जाणार होतों. तेव्हां त्यांच्या घरीं जाण्यापूर्वीं माझा नि त्यांचा चांगला परिचय झाला तर बरं, ह्या विचारानं फेअरवेदरनीं ही पार्टी आयोजित केली होती. गप्पा, खाणं–पिणं, फोटो– अशा कार्यक्रमांत संध्याकाळचा वेळ फार छान गेला.

गुरुवारीं म्हणजे ता. ६ ला सॅलीनं मला सकाळीं डॉक्टर मॅकार्थी यांच्याकडे नेलं. आमच्या ग्रुपमधल्या प्रा. सौ. सेवती मित्रा यांना काविळीचा विकार झाल्यानं त्या हॉस्पिटलमधें होत्या. त्यांना भेटायला आम्ही अनेकदां जाऊन आलों होतों. तेव्हां आगाऊच रोगप्रतिबंधक उपाय योजावेत म्हणून मला एक इंजेक्शन देण्यासाठीं सॅलीनं स्थानिक डॉक्टरकडे आणलं होतं. दवाखाना दोनचार खोल्यांचा असा लहानसाच होता. पण प्रत्येक खोली कमालीची स्वच्छ होती. मला एकट्याला दवाखान्यांत सोडून 'मार्केटिंग' करायला सॅली निघून गेली. एवढ्यांत एका तरुण नर्सनं मला मोठ्या प्रेमळपणं विनंती करून शेजारच्या खोलींत नेलं आणि वजनाच्या कांट्यावर



**'WIND' रेडिओचे जनरल मॅनेजर एडवर्ड वॅलिस हे प्रा. प्रभाकर तामणे यांच्याशी गप्पा मारीत आपल्या रेडिओस्टेशनची माहिती देत आहेत.**

उभं करून माझं वजन केलं. मला त्याचं कारण कळेना. "बाई, माझं वजन कशाला केलंस ?" म्हणून अखेर न राहवून मी नर्सला विचारलंच !

त्यावर ती निर्विकारपणं म्हणाली, "किती CC टोंचायचं तें वजनावर अवलबून आहे !"

एवढं बोलून मला आणखी एका दुसऱ्या खोलींत नेऊन ठेवून दार वंद करून ती निघून गेली. जातांना दार वंद करायचं कारण मला समजेना.कदाचित् इंजेक्शनच्या भीतीनं मी पळून जाऊं नये म्हणून तिनं तसा वंदोबस्त केला असावा ! 'मला किती कुप्या द्रव्य टोंचलं जाईल' ह्याचा मी मनांतल्या मनांत हिशेब करूं लागलों. माझा वजनाचा आंकडा आठवतांच मीं घाबरलों. एवढ्यांत डॉ. मॅकार्थी यांनी दार उघडून सुहास्यमुद्रेनं प्रवेश केला. त्यांच्या चेहऱ्यावरचं हास्य मला 'आसुरी हास्य' वाटलं ! कारण वेदना मला होणार होत्या, आणि त्याचं त्यांना हंसू येत होतं ! माझ्या चेहेऱ्यावरचे केविलवाणे भाव पाहून त्यांनीं मला धीर दिला. आणि फौंटनपेनची शाई झटकतांना आपण जसं तें उभं धरून झटकतों, तशी इंजेक्शनची सुई त्यांनी माझ्या कमरेंत खुपसली. नंतर विशेष कांहींच झालं नाहीं अशा आविर्भावांत खांदे उडवून माझ्याकडे हंसून पहात ते निघून गेले.

जाण्यापूर्वी नर्सकडे मीं मुद्दाम चौकशी केली, तेव्हां मला 4cc टोंचण्यांत आल्याचं कळलं! खरंखोटं डॉक्टर मॅकार्थीच जाणे! या कारणानं कां होईना, पण अमेरिकेंतला दवाखाना आणि डॉक्टर मला पहायला मिळाले, व इंजेक्शन देण्याच्या अमेरिकन 'अत्याधुनिक' पद्धतीचा 'तीक्ष्ण अनभव' मिळाला! घरीं आल्यावर माझ्या उरलेल्या सर्व भारतीय प्राध्यापक सहकाऱ्यांना तांतडीनं फोन करून मीं विचारल. त्यांनाहि सर्वांना त्यांच्यात्यांच्या कुटुंबप्रमुखांनीं असंच टोंचून आणल्याचं जेव्हां समजलं तेव्हां मला फार वरं वाटलं!

□

# फोन नं. PO-5-1313

पुष्कळसा प्रवास केल्यानंतर आणि वेगवेगळ्या देशांतील निरनिराळीं शहरं पाहिल्यानंतर, कां कुणास ठाऊक पण असं वाटायला लागतं, की प्रत्येक शहराला स्वतःचं असं व्यक्तिमत्व असावं. नगररचनेमुळं म्हणा, व्यवसाय-धंद्यांमुळं म्हणा अथवा लोकांमुळं म्हणा प्रत्येक शहराचीं कांहीं खास अशीं वेगळीं वैशिष्टचं निर्माण होतात. आणि मग अितर शहरांहून त्याचं व्यक्तिमत्व भिन्न आहे असं जाणवायला लागतं. शिकागोला प्रत्यक्ष जाण्यापूर्वी त्या शहराबद्दल मीं जें अैकलं होतं, वाचलं होतं त्यावरून त्या शहराचं एक विशिष्ट चित्र माझ्या मनांत निर्माण झालं होतं. वॅरिंग्टनला असतांना आठवड्यांतून कमींत कमी दोनतीन वेळां शिकागोला माझ्या खेपा व्हायच्या. प्रत्येक वेळीं शहराच्या भिन्नभिन्न भागांचं दर्शन मला घडायचं, आणि मग वाटायचं, शिकागोविषयीं अुगीचच आपलं मत कलुषित झालं होतं. उगीचच एखाद्याचं नांव 'कानफाटचा' पडावं किंवा एखाद्या तरुण, देखण्या स्त्रीची 'उठवळ' म्हणून निष्कारण बदनामी व्हावी असंच कांहींतरी शिकागोच्या बाबतींत घडलं असावं अशी माझी प्रामाणिक समजूत होती.

ओवेन फेअरवेदरना एकदा मीं माझी ही प्रामाणिक समजूत बोलून दाखवली. माझं बोलणं अैकून ते किंचित् हसले आणि म्हणाले, " शिकागोच्या गुन्हेगारीचं खरं दर्शन अजून तुला घडलंच नाही म्हणून तुला असं वाटतंय् ! तें दर्शन घेण्याचे मार्ग दोन! -अेक प्रत्यक्ष आणि दुसरा अप्रत्यक्ष. प्रत्यक्ष दर्शन घ्यायचं असेल तर रात्रींबेरात्रीं

शिकागोच्या गलिच्छ वस्त्यांतून फिरलं पाहिजे. एरव्ही एखाद्या वेळीं ती गोष्ट शक्य झाली असती, पण सध्या ठिकठिकाणीं होणाऱ्या निग्रोंच्या दंग्यांमुळं अशा वस्तींत दिवसांसुद्धां फिरणं गोऱ्यांना धोक्याचं वाटतं. तेव्हां तुला मार्गदर्शन करायला आमच्यापैकीं कोणीहि येणं कठीण आहे. पण आपल्याला एक गोष्ट करतां येईल. शिकागोमधील गुन्हेगारी आटोक्यांत ठेवण्यासाठीं रात्रंदिवस झगडणाऱ्या 'शिकागो पोलिस हेडक्वार्टर्स'ला तुला भेट देतां येईल. शिकागोच्या गुन्हेगारांइतकेच शिकागोचे पोलिसहि जगप्रसिद्ध आहेत ! "

शिकागो-पोलिसांची ही कीर्ति मीहि ऐकलेली होती. आणि म्हणूनच मिळालेल्या पहिल्या संधीचा फायदा घेऊन एक दिवस दुपारीं मीं ' ११२१ साउथ स्टेट स्ट्रीट ' या जागीं असलेल्या शिकागो पोलिस हेडक्वार्टर्सला मोठ्या उत्सुकतेनं भेट दिली.


मि. नॉर्मन व्हाइट नांवाच्या अधिकाऱ्यांशीं माझी ' अपॉइंटमेंट ' ठरली होती. ' व्हाअिट ' या नांवावरून वाटलं की ते कुणी गोरे अधिकारी असावेत. पण त्यांची प्रत्यक्ष भेट झाली तेव्हां कळून चुकलं कीं मि. व्हाअिट हे 'काळे ' आहेत. शिकागोच्या पोलिस–खात्यांत अनेक जबाबदारीच्या जागांवर निग्रो स्त्री–पुरुष नेमलेले आहेत. मि. व्हाअिट यांचं व इतरहि सर्व अधिकाऱ्यांचं वोलणं–चालणं कमालीचं सौजन्याचं व शिष्टाचारपूर्ण होतं. ' सझमा ' नांवाचा सुमारे १८–२० वर्षांचा एक ' पोलिस–कॅडेट ' त्यांनी मार्गदर्शनासाठीं माझ्याबरोबर दिला.

शिकागो पोलिस–हेडक्वार्टर्सची नवीन मुख्य इमारत एकूण १५ मजली आहे. त्यांपैकी तेरा मजले जमिनीच्या वरती आणि दोन जमिनीखालीं आहेत. या मुख्य इमारतीला जोडूनच उत्तरेच्या बाजूला आणखी एक इमारत आहे, ती सहा मजली आहे. सुमारे तीन वर्षांपूर्वी लक्षावधी डॉलर्स खर्च करून बांधलेली शिकागोच्या पोलिस खात्याची ही पंधरा मजली भव्य इमारत शिकागोमधील एक प्रेक्षणीय वास्तु बनली आहे. या इमारतींत बसवलेल्या नुसत्या ' ऑटोमॅटिक इलेव्हेटर्स 'साठींच ४,८८,८१० डॉलर्स खर्च करण्यांत आले आहेत, त्यावरून बाकीच्या इमारतीच्या एकूण खर्चाची कल्पना करतां येईल.

या जोड–इमारतीच्या निरनिराळ्या मजल्यांवर ' K–9 ' या नांवानं ओळखला जाणारा शिकागो–पोलिसांचा ' श्वान–विभाग ', पोलिस–सुपरिंटेंडंट ओ. डब्ल्यू. विल्सन यांचं ऑफिस, कम्युनिकेशन्स सेंटर, क्राइम ॲनॅलिसिस सेक्शन, क्राइम डिटेक्शन लॅबोरेटरी, डिटेक्टिव्ह डिव्हिजन, अिंटेलिजन्स डिव्हिजन, प्रेस रूम, प्रॉस्टिटयूशन सेक्शन, पब्लिक इन्फर्मेशन डिव्हिजन, मेन्स लॉकप्, विमेन्स लॉकप् इत्यादि एकूण ७० विभाग आहेत. त्यांतले कम्युनिकेशन्स सेंटर, डाटा प्रोसेसिंग सेक्शन, रेकॉर्डिंग ॲंड ट्रॅन्सक्रिबिंग सेक्शन व क्राइम डिटेक्शन लॅबोरेटरी हे विभाग विशेष पाहण्यासारखे आहेत.

सबंध इमारतींत कमालीची स्वच्छता आढळून येते.कुठंहि कागदाचा एक तुकडा पडलेला दिसायचा नाहीं. बहुसंख्य विभागांना कांचेच्या भिंती आहेत. पण एवढ्या मोठ्या प्रमाणावर कांचेचा उपयोग केलेला असूनहि कुठंहि काचेवर धूळ साचलेली दिसायची नाहीं, अगर एखादा डागहि दिसायचा नाही. इमारतींत काम करणाऱ्या सगळ्या कर्मचाऱ्यांच्या वागण्यात,बोलण्याचालण्यांत कुठहि गडबड–गोंधळ दिसायचा नाहीं, अगर आरडाओरड ऐकूं यायची नाहीं. सगळ्यांचं काम कसं शिस्तीनं आंखून दिल्यासारखं दिसायचं. केवळ गणवेषांतल्या आणि साध्या पोषाखांतल्या पोलिसांचा वावर मोठ्या प्रमाणांत दिसायचा म्हणूनच ही पोलिस–खात्याची इमारत आहे असं जाणवायचं. एरवी अमेरिकेंतल्या एखाद्या रेडिओ किंवा टेलिव्हिजन–स्टेशनच्या इमारतींतच आपण वावरत आहोंत असं वाटावं असंच वातावरण सर्वत्र होतं.

शिकागोसारख्या साडेपस्तीस लाख लोकवस्तीच्या अवाढव्य शहरांत वाहतूकनियंत्रण, शांतता आणि सुव्यवस्था ठेवायची म्हणजे एरवीसुद्धां फार मोठं जिकिरीचं काम झालं असतं. त्यांतून शिकागो हें तर चोरी, दरोडेखोरी



हें दृश्य अमेरिकेंतील कुणा रेडिओ वा टेलिव्हिजनस्टेशनच्या इमारतींतील नव्हे! शिकागो पोलिस-खात्याच्या कम्युनिकेशन्स सेंटरमधील हे कर्मचारी जागरुकतापूर्वक आपल्या कामाशीं इमान राखून आहेत.

वेश्याव्यवसाय, जुगार, आंतरराष्ट्रीय स्वरूपाची गुन्हेगारी इत्यादि गोष्टीं-करितां प्रसिद्ध असणारं शहर! अशा प्रकारच्या शहरांतील गुन्हेगारीला आळा घालायचा म्हणजे पोलिसांना सतत चोवीस तास डोळ्यांत तेल घालून काम करायला हवं. म्हणूनच शिकागोच्या एकूण १८हजार ब्लॉक्समधें पोलिसांच्या मोटारी सतत गस्त घालीत फिरत असतात. गुन्हा घडल्यानंतर गुन्हेगाराला पकडण्यापेक्षा संशयित इसमांवर पाळत ठेवून त्यांना गुन्हा करण्याची संधीच मिळूं न देण्यावर शिकागोच्या पोलिसांचा विशेष भर असतो.

शिकागो पोलिस हेडक्वार्टर्सच्या 'कम्युनिकेशन सेंटर'मधें बसवण्यांत आलेल्या नवीन टेलिफोन–यंत्रणेमुळं चोवीस तासांतील कोणत्याहि क्षणीं,शहराच्या कोणत्याहि विभागांत पोलिसांची मदत अवघ्या कांहीं क्षणांत मिळूं शकते ! ही टेलिफोन–यंत्रणा सुरू केल्याच्या पहिल्याच वर्षांत पोलिसांना तांतडीच्या मदतीसाठीं सुमारें पंधरा लाख 'कॉल्स' आले. शिकागोच्या पोलिसांना अभिमान वाटावा असंच त्यांचं कम्युनिकेशन्स सेंटर आहे. १९६१मधें नवीन यंत्रसामुग्रीनं सुसज्ज करून सुरू केलेल्या या विभागांत टेलिफोन, टेलिटाइपरायटर, बिनतारी तारायंत्रं ( रेडिओज् ) यांच्या साहाय्यानं जरूरीच्या ठिकाणीं तांतडीच्या मदतीसाठीं पोलिस गाड्या त्वरित पाठवणं, गुन्ह्याची त्वरित माहिती देणं, पोलिसांना 'हव्या' असलेल्या गुन्हेगारांची वर्णनं ध्वनिक्षेपित करणं आणि शहरांत फिरणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनीं विचारलेली निरनिराळ्या प्रकारची माहिती त्यांना तांतडीनं पुरवणं इत्यादि कामं केलीं जातात. शिकागो–पोलिसांनीं शहरभर पसरलेल्या बिनतारी तारायंत्रांच्या जाळ्यामुळं कमींत कमी माणसांच्या साह्यानं जास्तींत जास्त तांतडीनं जरुरीच्या ठिकाणीं पोलिस–मदत पाठवतां येते. शिकागो–पोलिसांची ही 'कम्युनिकेशन्स सिस्टिम' जगांत पहिल्या दर्जाची समजली जाते. शिकागो पोलिसांची ही खास यंत्रणा दोनशेंचोवीस चौरस मैलांच्या परिसरांत सचार करणाऱ्या चौदाशेंपेक्षां अधिक पोलिसगाड्यांचं नियंत्रण करते.

शिकागोच्या साडेपस्तीस लाख नागरिकांची तत्परतेन सेवा करण्यासाठीं हें कम्युनिकेशन्स सेंटर एकूण सत्तावीस रेडिओलहरींचा उपयोग करत. या केंद्रांत तांतडीची पोलिस–मदत मागणारे संदेश स्वीकारण्यासाठी ५६ टेलिफोन–ट्रंकलाइन्स आहेत. शिवाय उपग्रहांवरील संदेश स्वीकारणारीं यंत्रंहि या केंद्रांत तीन ठिकाणीं बसवली आहेत. त्याखेरीज तातडीचे संदेश प्रक्षेपित करण्यासाठी नऊ ट्रान्समीटर्संहि या केंद्रांत बसवले आहेत.ही एवढी मोठी सुसज्ज यंत्रणा रात्रंदिवस चालू ठेवण्यासाठीं सुमारे तीनशें माणसं खपत असतात. शिकागो पोलिस-हेडक्वार्टर्सच्या दुसऱ्या मजल्यावर हें 'सेंटर' आहे. या सेंटरच्या कार्यालयाच्या जमिनीखालीं सुमारे २५ मैल लांबीचं तारांचं व केबल्सचं जाळंच पसरलं आहे. खास प्रकारें बनवलेल्या या जमिनीच्या

फरशा केव्हांहि सहज काढतांघालतां येतात. त्यामुळ विशेष खर्च न करतां जमिनी-खालच्या तारांची–केबल्सची रचना केव्हांहि सहज बदलतां येते.

शिकागो शहराचे आठ ' कम्युनिकेशन विभाग ' पाडलेले आहेत. टेलिफोन-एक्स्चेंजच्या सीमारेषा निश्चित केलेल्या आहेत. दोन किंवा अधिक टेलिफोन–एक्स्चें-जच्या कक्षेंत एक कम्युनिकेशन विभाग समाविष्ट होईल अशी खबरदारी घेण्यांत आली आहे.

शहरांतील कोणत्याहि विभागांतून कुणीहि तांतडीच्या पोलिस–मदतीसाठीं ' पीओ– ५ – १३१३ ' या नंबराला टेलिफोन कॉल केला कीं कम्युनिकेशन्स सेंटरमधें त्या विभागाचें नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्याच्या फोनशीं तो आपोआप जोडला जाईल अशी व्यवस्था करणारीं खास यंत्रं ' इलिनॉय बेल टेलिफोन कंपनी'नं बनवून दिलीं आहेत. त्या विशिष्ट विभागाच नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे हा संदेश पोंचतांच त्याच्यासमोर बसवलेल्या त्याच्या विभागाच्या नकाशाकडे तो नजर टाकतो.

त्या नकाशावर निरनिराळ्या ठिकाणीं छोटेछोटे दिवे लागलेले असतात. त्या विभागांत गस्त घालणाऱ्या प्रत्येक पोलिस–गाडीचा निदर्शक असा हा एकेक दिवा असतो. कोणती मोटरगाडी त्या ठिकाणीं लवकरांत लवकर पोचूं शकेल याचा निर्णय एका क्षणांत तो अधिकारी घेतो. आणि ज्या गाडीला तांतडीच्या मदतीसाठीं जाण्याचा रेडिओ–संदेश तो देतो तिचा नंबर असलेल्या यंत्रावरील खाचेंत तो ' रेडिओ कॉल स्लिप ' टाकतो त्याबरोबर त्या गाडीचा निदर्शक असणारा नकाशावरील दिवा विझतो. या पद्धतीचा असा फायदा आहे, की समोर नुसती नजर टाकतांच नकाशावर दिसणाऱ्या दिव्यांची संख्या बघून अजून किती पोलिस–गाड्या मदतीसाठीं पाठवतां येतील याचा अंदाज एका क्षणांत अधिकाऱ्याला येतो. मदतीसाठीं त्वरित जाण्याचा आदेश कोणत्या गाडीला अथवा गाड्यांना द्यायचा हें एकदा निश्चित झालें की तो अधिकारी त्याच्या पायाशीं असलेलं एक विशिष्ट बटन दाबतो आणि संबंधित गाडीला रेडिओ-संदेश पाठवतो. अशा प्रकारें नागरिकानं पोलिसांची मदत मागतांच अवघ्या कांहीं सेकंदांतच पोलिसांच्या गाड्या गुन्ह्याच्या जागीं हजर होतात.

गुन्ह्याच्या ठिकाणीं पोचतांच संबंधित पोलिस–अधिकारी घडलेल्या प्रकाराची चौकशी करतो आणि गुन्ह्याचा प्रकार लक्षांत घेऊन आवश्यक त्या प्रकारचा रिपोर्ट तयार करतो.चौकशीचं हें काम पूर्ण होतांच तो अधिकारी जवळचा कोणताहि टेलिफोन उचलतो, आणि एक विशिष्ट नंबर फिरवतो. त्याबरोबर शिकागो पोलिस हेडक्वार्टर्स-मधील ' रेकॉर्डिंग व ट्रॅन्सक्रिबिंग ' विभागाशी त्याचा संबंध प्रस्थापित होतो. थोड्याच वेळांत फोनमधून त्याला एक विशिष्ट आवाज ऐकायला येतो. त्याचा अर्थ असा की आता त्यानं त्याचा रिपोर्ट सांगण्याचं काम सुरू करायला हरकत नाहीं. त्याबरोबर आपल्या हातांतील टिपणांच्या आधारें गुन्ह्याची माहिती सांगायला तो सुरुवात करतो.

त्याचा हा रिपोर्ट ' हेडक्वार्टर्स'मध्ये एका प्लॅस्टिकच्या पट्टीवर ध्वनिमुद्रित केला जातो. ही प्लॅस्टिकची पट्टी एका वेळेस जास्तींत जास्त अर्ध्या तासाचं संभाषण ध्वनिमुद्रित करूं शकते.

अशा रीतीनं ध्वनिमुद्रित झालेल्या रिपोर्टची हस्तलिखित नक्कल तयार करण्यासाठीं ' रेकॉर्डिंग अँड ट्रॅन्सक्रिबिंग सेक्शन 'मध्यें विशिष्ट शिक्षण दिलेल्या स्त्रिया नेमलेल्या आहेत. या विभागाला मी भेट दिली तेव्हा या स्त्रियांपैकीं बहुसंख्य स्त्रिया निग्रो आहेत, असं मला आढळून आलं. या स्त्रिया प्लॅस्टिकच्या पट्टीवर मुद्रित केलेला हा रिपोर्ट ऐकतात. आणि त्यासाठीं जो फॉर्म आवश्यक असेल त्यावर तो लिहून काढतात. या रिपोर्टला एक विशिष्ट नंबर दिला जातो. मधल्या काळांत कम्युनिकेशन्स सेंटरकडून या विभागाकडे ' रेडिओ–कॉल–कार्ड ' आलेलं असतं. त्यालाहि तोच नंबर दिला जातो. असे सर्व रिपोर्टस् नंतर पलिकडच्या विभागांत पाठवले जातात. त्या ठिकाणीं ' मल्टिलिथ ऑफसेट ' पद्धतीनं या रिपोर्टच्या आवश्यक तितक्या प्रती काढल्या जातात. नंतर या रिपोर्टची एकेक प्रत सर्व संबंधित खात्यांकडे व व्यक्तींकडे पाठवितात.

यानंतर होणाऱ्या गुप्त पोलिसांच्या चौकशीचे रिपोर्टही याच पद्धतीनं तयार केले जातात. याहि सर्व रिपोर्टांना, मूळ रिपोर्टला दिलेला नंबरच देण्यांत येतो. त्यामुळे त्या गुन्ह्यासंबंधीं अंतिम निर्णय लागेपर्यंतच्या केल्या जाणाऱ्या चौकशींत एक प्रकारचं अनुसंधान राखतां येतं. फक्त चोरीला जाणाऱ्या मोटारींसंबंधींचे रिपोर्टस् मात्र या पद्धतीनं रेकॉर्ड न करतां ते वाहतूक विभागाकडे पाठवण्यांत येतात.

' Tactical Undercover Force ' हा नवीन विभाग शिकागोच्या पोलिस खात्यांत नुकताच म्हणजे १९६१ सालींच सुरू झाला. ' TUF ' या नांवानं ओळखल्या जाणाऱ्या विभागांतील स्त्री-पुरुष-पोलिस अधिकारी हे वेश्या, प्रवासी, टॅक्सी-ड्रायव्हर किंवा अट्टल दारुडे यांच्या वेषांत रात्रीं-अपरात्रीं मुद्दाम वावरतात, आणि संशयित गुन्हेगारांवर आपलं जाळं पसरतात. गुन्हेगारानं त्यांच्यावर हल्ला करतांच कांहीं क्षणांतच इतर पोलिस बिनतारी संदेश ऐकून त्यांच्या मदतीला धावतात आणि गुन्हेगाराला पकडतात. पोलिसांच्या या युक्तीमुळं सराईत गुन्हेगारांनासुद्धा एक प्रकारची भीतीच वाटत असते. न जाणों आपण ज्याला लुटायला निघालोंय् तो एखादा पोलिस-अधिकारीच निघायचा !

निरनिराळ्या प्रकारचे गाजलेले मोठेमोठे गुन्हेगार पकडण्यासाठी 'TUF' प्रमाणंच शिकागो पोलिसांचं ' गुप्तहेर खातं ' जिवाचं रान करतं. मोठ्या अट्टल गुन्हेगारांप्रमाणंच शहरांतल्या कोवळ्या वयाच्या तरुण पोरांची गुन्हेगारी म्हणजे शिकागोच्या पोलिसांची एक कायमची डोकेंदुखी असते. दरवर्षीं तीस हजार-पेक्षा अधिक अल्पवयीन गुन्हेगारांवर खटले भरावे लागतात.

गुन्हेगार-संशोधनांत शिकागो-पोलिसांच्या ‘ क्राअिम डिटेक्शन लॅबोरेटरी ’-चाहि फार मोठा उपयोग होतो. निरनिराळ्या प्रकारच्या आधुनिक शास्त्रीय उपकरणांनीं सुसज्ज अशा या प्रयोगशाळेंत गुन्ह्याच्या ठिकाणीं सांपडलेल्या पुराव्याचं पृथक्करण व संशोधन करतात.

वेळेची व मनुष्यबळाची जास्तींत जास्त बचत करणं हें तर शिकागो-पोलिसांच्या कार्यपद्धतीचं प्रमुख सूत्र आहे. त्यासाठीं ते नेहमींच नवीन नवीन यांत्रिक साधनांचा अुपयोग करीत असतात. गुन्हेगारांना त्यांचे फोटो काढण्यासाठीं पूर्वी मध्यवर्ती कार्यालयाकडे न्यावं लागे. या नेण्या-आणण्यांत पोलिसांचा बराच वेळ वांया जात असे. आतां शहराच्या निरनिराळ्या प्रमुख विभागांच्या कार्यालयांत ठेवण्यांत आलेल्या ‘ पोलरॉअिड ’ कॅमेऱ्यांमुळं, पकडलेल्या गुन्हेगारांचे फोटो अवघ्या कांही सेकंदांत डेव्हलपिंग-प्रिंटिंग होऊन हातांत पडतात. त्यामुळं आतां गुन्हेगारांना फोटो घेण्यासाठीं प्रत्येक वेळीं हेडक्वार्टर्सकडे पाठवण्याची आवश्यकता राहिलेली नाहीं.

आतां नुकतीच १९६२ मध्यें शिकागो-पोलिसांच्या नौ-दलांत तिप्पट वाढ करण्यांत आली आहे. पूर्वीच्या दोन जुन्या मोटर-बोटींऐवजीं आतां शिकागो पोलिसांसाठीं सहा नव्या मोटार-बोटी घेण्यांत आल्या आहेत. सागरी वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याप्रमाणंच समुद्रावरच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठींहि ह्या खास दलाचा फार मोठा उपयोग होतो. कित्येकदां जलमार्गानं पळून जाणाऱ्या गुन्हेगारांचा पाठलाग करण्यासाठींहि या बोटी उपयोगी पडतात.

शिकवलेल्या कुत्र्यांचं अेक दलहि गुन्हेगार-संशोधनांत मदत करीत आहे. ‘ K-9 ’ या नांवानं हा ‘ श्वान-विभाग ’ ओळखला जातो. शहराच्या ज्या भागांत वारंवार गुन्हे घडतात अशा ठिकाणी या सुशिक्षित कुत्र्यांच्या मदतीनं पोलिसांना फार महत्त्वाची कामगिरी सहज रीतीनं पार पाडतां येते. अेखाद्या इमारतीला गराडा घातल्यावर तिच्यांत लपून बसलेल्या गुन्हेगाराला पकडण्यासाठीं पूर्वी पोलिसांना असंख्य माणसांची मदत घ्यावी लागे. आतां श्वानदलांतील या पोलिसी कुत्र्यांच्या मदतीनं अगदीं कमींत कमी माणसं घेऊन हें काम करतां येतं. त्याचप्रमाणं बेकायदेशीर जमाव पांगवण्यासाठींहि पोलिसदलांतील ह्या ‘ K-9 ’– कुत्र्यांचा फार अुपयोग होतो.


शिकागोच्या पोलिस खात्यानं जुलै १९६१ मध्यें हा ‘ के – नाअिन पेट्रोल सेक्शन ’ सुरू केला. या विभागासाठीं अुमेदवार अधिकारी म्हणून शिक्षण-क्रमासाठीं ज्याची निवड करण्यांत येते असा अुमेदवार चाळीसपेक्षा कमी वयाचा असला पाहिज, पोलिस-खात्यांतील आवश्यक तें शिक्षण त्याचं झालेलं असलं पाहिजे. आर्थिक अडचणींमुळं त्याला आपली जागा सोडून दुसरीकडे राहायला जावं लागूं

नये म्हणून शक्यतों त्याच्या मालकीचं घर असावं, निदान एखाद्या नातेवाअिकाच्या घरांत तरी तो भाड्यानं राहात असावा, त्यानं या श्वान-विभागांत काम करायला त्याच्या घराच्या शेजाऱ्यांची व त्याच्या वायकोचीहि परवानगी हवी, त्याच्या घराच्या जवळपास इतर कुत्रीं असू नयेत– या सर्व अपेक्षा पूर्ण करणाऱ्या माणसाचीच या विभागांत उमेदवार अधिकारी म्हणून निवड करण्यांत येते.

कुत्र्यावरोवर गुन्हेगार-संशोधनाचं कार्य करणाऱ्या माणसाची निवड जर इतकी विचारपूर्वक केली जाते तर खुद्द पोलिसी-कुत्र्याची निवड किती कसोशीनं केली जात असेल याची आपल्याला कल्पना करतां येते. 'ब्लड हाअुंड', 'लॅब्रॅडॉर' 'डॉबरमन', 'जर्मन शेपर्ड' अित्यादि कुत्र्यांच्या तपासणींत प्रत्येक जातींत कांही ना कांहीतरी महत्त्वाचे दोष आहेत असं लक्षांत आलं आहे. उदाहरणार्थ, 'ब्लड हाअुंड' जातीच्या कुत्र्याला गुन्हेगाराचा माग अेकदा चुकला कीं पुन्हा त्या मूळ मागावर येणं स्वभावत:च जमत नाहीं. 'लॅब्रॅडॉर' जातीचा कुत्रा खेळाडू असल्यानं मुळांतच स्वभावानं सौम्य असतो. 'डॉबरमन' जातीचा कुत्रा हा माग काढण्यांत पटाअीत असतो, पण त्याची बुद्धि प्रगल्भ व्हायला फार वेळ लागतो. आणि शिवाय लंडन-पोलिसांचा अनुभव असा आहे, की भीतीच्या किंवा चिंतेच्या आहारी गेला तर ह्या जातीच्या कुत्र्याचा मन:क्षोभ लवकर होतो आणि तो कुणालाहि चावतो. इतर जातीच्या कुत्र्यांचे असे अनेक अवगुण लक्षांत घेता सर्व प्रकारच्या पोलिसांच्या कामासाठी 'जर्मन शेपर्ड' जातीचा कुत्राच उपयुक्त ठरतो, असा शिकागो-पोलिसांचा अनुभव आहे. या जातीच्या कुत्र्यालाच 'पोलिसी कुत्रा' असंहि म्हटलं



**गुन्हेगाराचा माग काढण्याच्या कामगिरीवर निघालेला पोलिस आणि 'K–9' श्वानविभागांतील त्याचा मदतनीस.**



**जलमार्गानें पलायन करणाऱ्या गुन्हेगारांच्या पारिपत्यासाठीं सिद्ध झालेली गुन्हेगारांची एक वैरीण !**

जात. गुन्हेगाराचा माग काढण्याचं शिक्षण 'जर्मन शेपर्ड' मोठ्या उत्सुकतेनं घेतो. गुन्हेगाराला चावणं आवश्यक आहे की केवळ जोरदार भुंकण्यानं त्याची वाट अडवून त्याला रोखून धरतां येईल हें या जातीच्या कुत्र्याला चांगलं समजतं.

एकदा या विशिष्ट जातीच्या कुत्र्यांची निवड केली की त्यांना 'इलिनॉय' राज्यांतील 'देस प्लेन्स' या ठिकाणच्या श्वान-शिक्षणकेंद्रांत पाठवण्यांत येतं. साधारणत: नऊ महिन्यांपासून दोन वर्ष वयापर्यंतचे कुत्रे शिक्षणासाठी निवडतात. त्या ठिकाणीं त्यांना आज्ञापालन करणं, गुन्हेगाराचा माग काढणं, गस्त घालणं वगैरे विषयांचं शिक्षण दिलं जातं. अशा रीतीनं विशिष्ट शिक्षणक्रम पार पाडून सुशिक्षित झालेल्या कुत्र्याचं 'K-9' दल हा शिकागो पोलिस खात्याचा एक महत्त्वाचा भाग समजला जातो.


शहराच्या एखाद्या विभागांत गुन्हेगारी वाढत्या प्रमाणांत आहे, हें शिकागो पोलिसांना कसं समजतं? एका स्टँडवर शिकागो शहराचा एक मोठा नकाशा लावलेला आहे. शहरांतले अगदी बारीकसारीक रस्तेसुद्धां त्यावर दाखवलेले आहेत. शहरांत कुठंहि घडलेल्या गुन्ह्याची वर्दी आली कीं ज्या जागीं तो गुन्हा घडला असेल त्या जागी नकाशावर लाल, पिवळी, हिरवी, निळी किंवा पांढरी टांचणी गुन्ह्याचं स्वरूप आणि प्रकार लक्षांत घेऊन त्याप्रमाणं लावली जाते. त्यामुळे नकाशावर नुसती उभ्या-उभ्या नजर टाकली तरी शहराच्या कोणत्या भागांत गुन्हे-गार धुमाकूळ घालीत आहेत तें टाचण्यांच्या गर्दीवरून झट्कन् लक्षांत येतं; आणि त्या त्या विभागांत जरुरीप्रमाणं जादा पोलिस बंदोबस्तासाठीं पाठवतां येतात. महिना

संपला कीं नवीन नकाशा स्टँडवर लावण्यांत येतो, आणि गेल्या महिन्याचा नकाशा स्टँडच्या मागच्या बाजूस लावण्यांत येतो. त्यामुळं गेल्या महिन्याच्या व चालू महिन्याच्या गुन्हेगारीचा तुलनात्मक अभ्यास करून कांही निर्णय घेणं सोपं जातं.

जनतेच्या सहकार्याशिवाय कोणत्याहि प्रकारच्या गुन्हेगारीला आळा घालणं कधींच शक्य होणार नाहीं हें शिकागो-पोलिसांना चांगलंच माहीत आहे. त्यामुळंच जनतेला विश्वासांत घेऊन आपल्या कार्याची माहिती देण्यासाठीं त्यांनीं एक स्वतंत्र 'जनता संपर्क विभाग' सुरू केलेला आहे. या विभागातर्फे शिकागो-पोलिस टेलिव्हिजनवर साप्ताहिक व मासिक कार्यक्रम सादर करतात. चोरीला गेलेल्या मोटारीविषयींची माहिती-पत्रकंहि आठवड्यांतून दोनदा शिकागोंतील सुमारे २६०० पेट्रोल-पंपांकडे पाठवलीं जातात. आतांपर्यंत अनेक पोलिस-अधिकाऱ्यांनीं ठिकठिकाणीं लहानमोठ्या जनसमूहापुढं स्वयंस्फूर्तीनं भाषणं केलीं आहेत, मुलाखती दिल्या आहेत. त्याचप्रमाणं या विभागानं "Help The Police Help You" या शीर्षकाची माहितीपत्रकांची अेक मालिकाच छापून लोकांना वांटली आहे. 'PO-5-1313' हा शिकागो-पोलिसांचा 'इमर्जन्सी' टेलिफोन नंबर रेडिओ-र, टेलिव्हिजनवर, वृत्तपत्रांत आणि भिंतीवरच्या जाहिरातींतहि वारंवार प्रसारित ला गेला आहे.

सर्वसामान्य नागरिकांच्या मनांत पोलिसांबद्दल भीति व तिरस्कार या भावनां-एवजी प्रेम, आदर व विश्वास या भावना निर्माण व्हाव्यात म्हणून शिकागोचं पोलिस खातं आटोकाट प्रयत्न करतं. त्यासाठींच आपलं संरक्षण करणाऱ्या पोलिस खात्याचं काम कसं चालतं तें बघायला कुणाहि नागरिकाला मुक्तद्वार असतं. शाळा, कॉलेज, निरनिराळ्या व्यावसायिक संस्था, पोलिसांचे कुटुंबीय आणि देशो-देशींचे प्रवासी यांच्यासाठीं शिकागो-पोलिस खात्याची संपूर्ण कार्यपद्धति दाखवणाऱ्या छोट्या सहली आंखल्या जातात. एकट्या-दुकट्या व्यक्तीलासुद्धा कुणाहि अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनावांचून संपूर्ण कार्यपद्धतीचं दर्शन घडावं व पूर्ण माहिती मिळावी म्हणून बहुतेक सर्व विभागांच्या भिंती कांचेच्या तर केलेल्या आहेतच, पण शिवाय प्रत्येक विभागाच्या बाहेरच्या बाजूस टेलिफोन्स बसवले आहेत. कुणीहि तिथं यावं, फोन अुचलून कानाला लावावा, आणि बटन दाबावं, की लगेच ध्वनिमुद्रित केलेला संदेश अैकायला येतो, "This is——, Chief Chemist of the Crime Detection Laboratory of Chicago Police Headquarters. You are now standing before the Crime Detection Laboratory ..... ..."

मग आपण ज्या विभागापुढं उभे राहिलेलों असूं त्या विभागाच्या कार्य-पद्धतीची संपूर्ण माहिती आपल्याला कानांनीं अैकतां येते, आणि त्याच वेळीं कांचेच्या भिंतींतून त्या विभागाचं कार्य डोळ्यांनीं पाहातां येतं.



शिकागो पोलिस-खात्याला आव्हान देण्यासाठीं तर या गृहस्थानें हें घरफोडीचें कृत्य आरंभलेलें नाहीं ?

अशा प्रकारें ठिकठिकाणीं 'रेकॉर्डेड मेसेज्' ऐकण्याची सोय शिकागो-पोलिसांनीं केलेली आहे. जनता संपर्कासाठीं ते अफाट पैसा खर्च करतात. वृत्तपत्रं व मासिकं यांच्यासारखं जनतासंपर्काचं दुसरं माध्यम नाहीं, त्यामुळं अमेरिकेंतील वृत्तपत्रांत आणि मासिकांत पोलिसांच्या कार्यासंबंधीं निरनिराळ्या प्रकारचे लहान मोठे लेख नेहमी येत असतात. या लेखांमध्यें त्यांची कार्यपद्धति स्पष्ट करणारे मोठेमोठे फोटोसुद्धां छापलेले असतात. अशा प्रकारच्या लेखांची मीं विशेष चौकशी केली तेव्हा मि. नॉर्मन व्हाअिट या अधिकाऱ्यांनी दोनतीन मासिकांचे अंकच मला दिले. त्यांतल्या 'इलिनॉय बेल न्यूज' या प्रसिद्ध टेलिफोन कंपनीच्या जुलै-ऑगस्ट १९६३ च्या जोड अंकांत 'डिपेंडेबल पोलिस सर्व्हिस' या शीर्षकाचा एक विस्तृत लेख सुरुवातीलाच छापलेला होता. विशेष म्हणजे या खास लेखाचं महत्त्व ओळखून मासिकाच्या संपादकांनीं कव्हरवरती दिलेला अनेकरंगी फोटोसुद्धां शिकागो-पोलिसांच्या कार्यपद्धतीचा निदर्शक असाच होता.

–शिकागोच्या 'Talman Federal Savings and Loan Association' तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या Talmanac नांवाच्या त्रैमासिकानं तर शिकागो-पोलिसांच्या कार्याची माहिती देण्यासाठीं एक विशेषांकच प्रसिद्ध केला होता. या विशेषांकासाठीं खात्यांतल्या कोणत्याहि अधिकाऱ्याची मुलाखत घेण्याची, वाटेल त्या विभागांचीं छायाचित्रं घेण्याची व गुन्हेगारांच्या मागावर असलेल्या पोलिसांबरोबर जाण्याची व अितर कोणत्याहि मार्गानं शिकागो पोलिसांसंबंधीची सर्व माहिती मिळवण्याची या त्रैमासिकाच्या संपादकांना व त्यांच्या प्रतिनिधींना पूर्ण मुभा देण्यांत आली होती. पोलिस खात्यानं कोणतीहि माहिती दडवून ठेवण्याचा, अगर अन्य स्वरूपांत ती सादर करावी म्हणून दडपण आणण्याचा प्रयत्न कधींहि केला नाहीं, हें संपादकांनीं अगत्यानं नमूद केलं आहे.

शिकागोच्या पोलिस खात्यातर्फे 'शिकागो-पोलिस स्टार' या नांवाचं एक मासिकहि दरमहा प्रसिद्ध होत असतं. हें मासिक खात्यांतील सध्यां असलेल्या व सेवानिवृत्त झालेल्या सर्व पोलिसांना व अधिकाऱ्यांना मोफत पाठवलं जातं. त्याचप्रमाणं 'कायदा व सुव्यवस्था' यांच्याशीं संबंधित असणाऱ्या अितर खात्यांना व व्यक्तींनाहि हें मासिक विनामूल्य पाठवलं जातं. सामान्यतः पोलिस खातं हें हडेलहप्पी करणारं रुक्ष खातं समजलं जातं. त्यामुळं या खात्यातर्फे निघणारं मासिकहि तसंच नीरस, रुक्ष असं असेल अशी आपली कल्पना होते. परंतु हें मासिक मुखपृष्ठापासून ते अखेरच्या पानापर्यंत चित्तवेधक आहे असं मला आढळून आलं. पहिल्या दर्जाचा अुत्कृष्ट कागद, सुंदर छपाअी आणि निरनिराळ्या प्रसंगांचीं व व्यक्तींचीं भरपूर छायाचित्रं हें या मासिकाचं प्रमुख वैशिष्टय आहे. या मासिकांत चोरी, घरफोडी, खून, दंगेधोपे अित्यादि पोलिसांच्या नित्य जीवनाशीं संबंधित असलेल्या विषयांवरचे लेख, वैशिष्टयपूर्ण कामगिरी करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांचे परिचय-लेख, पोलिस खात्यांतील बदल्या, सत्कार वगैरेंसारख्या घडामोडी, शौर्य-पदकं मिळवणाऱ्या पोलिसांची सचित्र कहाणी वगैरे मजकूर प्रसिद्ध होत असतो. वास्तविक पोलिसी जीवनांत हास्यविनोदाला फारसा वाव नाहीं तरीसुद्धां पोलिसांच्या कार्याशीं संबंधित असलेलीं, प्रसंगीं त्यांची चेष्टा करणारीं विनोदी व्यंगचित्रंहि या मासिकांत प्रसिद्ध होतात.

शिकागोच्या पोलिस-खात्यातर्फे फक्त पोलिसांच्याच उपयोगासाठी गुप्त स्वरूपाचं असं एक दैनिक दोन-पानी वार्तापत्र 'डेली बुलेटिन' नांवानं छापून प्रसिद्ध केलं जातं. या वार्तापत्रामुळं पोलिसांना आदल्या दिवशीं घडलेल्या महत्त्वाच्या सर्व गुन्ह्यांची, गुन्हेगारांची, हरवलेल्या व्यक्तींची, चोरीला गेलेल्या मोटार-गाडयांची माहिती मिळते. अर्थात् या पत्रकांत प्रत्येक गोष्टीची तपशीलवार माहिती तर असतेच, पण शिवाय या सर्वांची छायाचित्रंहि त्यांत छापलेलीं असतात. या वार्तापत्रकाच्या मागील बाजूस ''Weekly Hot Sheet' या सदरांत गेल्या आठवडयांत चोरीला गेलेल्या सर्व मोटारींचे लायसेन्स नंबर्स छापलेले असतात.

शिकागोचं पोलिस-खातं जनतासंपर्कासाठीं किती धडपडतं याचं आणखी एकच अुदाहरण सांगतों. दरवर्षी सामान्यतः मे महिन्यांत खात्यातर्फे 'पोलिस रेकग्निशन सेरिमनी' नांवाचा एक सार्वजनिक समारंभ साजरा केला जातो. या समारंभाचा उद्देश अगदीं अुघड आहे. पोलिस व जनता याच्यामधील स्नेहभाव वाढावा, पोलिसांबद्दल भीति अगर तिरस्कार न वाटतां ते आपले रक्षणकर्ते मित्र आहेत, असा विश्वास जनतेच्या मनांत निर्माण व्हावा, यासाठी हा समारंभ असतो. या समारंभांतील कार्यक्रमांबाबत नित्य नवीन नवीन कल्पनांचा अुपयोग करून पोलिस हा उद्देश साधतात. १९६४ सालीं या समारंभासाठीं "Mr. Policeman : My Friend" या नांवाची चित्रांची स्पर्धा शिकागोंतील प्राथमिक शाळेच्या

विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली होती. लहान मुलं या स्पर्धेत पाठवायच्या पोलिस-दादाच्या चित्रावर अखेरचा हात फिरवीत आहेत, असा फोटो 'शिकागो पोलिस स्टार'मध्ये व अन्यत्र छापून बालकांच्या या स्पर्धेची भरपूर जाहिरातहि करण्यांत आली होती. पोलिसांबद्दल बालकांनासुद्धां लहानपणापासूनच आपलेपणा वाटावा यासाठीं खात्यातर्फे करण्यांत येणाऱ्या अशा प्रकारच्या कल्पक धडपडीचं खरोखर कौतुक वाटतं !

अमेरिकेंतील एकंदर गुन्हेगारीचा विचार करतां शिकागो हें अमेरिकेंतील सर्वांत सुरक्षित शहर मानलं जाईल. शहरांतल्या प्रचंड गुन्हेगारीला आळा घालण्याचं सारं श्रेय शिकागो-पोलिसांना व त्यांचे प्रमुख मि. ओ. डब्ल्यू. विल्सन यांना आहे. तीनच वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या या पोलिस-अधिकाऱ्यांनी सुपरिटेंडंट या नात्यानं शिकागोच्या पोलिस-खात्याच्या प्रमुखपदाचीं सूत्रं आपल्या हातांत घेतलीं आणि अवघ्या तीनच वर्षांत आपल्या हाताखालील १३,४०० लोकांच्या साह्यानं शिकागोमधील गुन्हेगारीला आळा घालण्यांत विलक्षण यश मिळवलं.

शिकागोचे नागरिकहि पोलिसखात्याच्या कार्यक्षमतेचं मनापासून कौतुक करतात. दरवर्षी सुमारे तीन हजारपेक्षां अधिक पत्रं नागरिकांकडून पोलिस खात्याकडे येतात. त्यांत निरनिराळ्या प्रसंगीं पोलिसांनी केलेल्या कामगिरीबद्दल गौरवपूर्ण अुल्लेख करून सुपरिटेंडंट विल्सन यांना त्यांच्या यशस्वी नेतृत्वाबद्दल धन्यवाद दिले जातात. अशा पत्रांपैकीं कांही महत्त्वाचीं पत्रं 'शिकागो पोलिस स्टार' या मासिकांत 'शिकागोअन्स थँक यू' या सदरांत प्रसिद्ध केलीं जातात. नागरिकांनीं अशा पत्रांत पोलिसांच्या केलेल्या गुणगौरवामुळं, पोलिसांना अुत्तेजन मिळतं. गुन्हेगार-संशोधनांत अेखाद्या नागरिकानं पोलिसांना विशेष मदत केली असेल तर त्या नागरिकालाहि 'स्पेशल सिटिझन्स अॅवॉर्ड' दिलं जातं.

अशा प्रकारें शिकागोचे पोलिस व जनता यांच्यामध्यें परस्पर स्नेहभावाचं नातं निर्माण झालं आहे. आणि मनापासून जनतेचं सहकार्य लाभत असल्यामुळंच गुन्हेगारीला आळा घालून नागरिकांचं जीवित सुरक्षित ठेवण्यांत शिकागोचे पोलिस यशस्वी झाले आहेत.

□

# ‘ डेंजर : मेन कूकिंग ! ’

एक दिवस दुपारीं अमेरिकेंतल्या दोनतीन वृत्तपत्रांचे अक सॅलीनं मला दाखवले. ‘शिकागो ट्रिब्यून’, ‘बॅरिंग्टन कुरिअर रिव्ह्यू’ यांसारख्या लहानमोठ्या वृत्तपत्रांनीं आमच्या अमेरिकेंतील आगमनाची दखल घेतलेली होती. एकदोन ठिकाणीं आमचे फोटोहि छापलेले आढळले. ‘9 Indian Professors Try Life in U. S.’, ‘Indian Guests Impressed by U. S. Scenery’ अशीं शीर्षकं अमेरिकन वृत्तपत्रांत छापलेलीं पाहून चक्षू धन्य जाहले ! आतां मात्र प्रेसिडेंट जॉन्सन यांना आमच्या आगमनाची वार्ता नक्कीच समजलेली असणार, ह्या विचारानं मन जरा सुखावलं.

संध्याकाळीं सात वाजल्यापासून रात्रीं अकरापर्यंत सॅलीच्या आओवडलां-कडेच आम्ही सर्वजण होतों. निमित्त ‘कॉक्टेल्’ आणि ‘डिनर पार्टी’चं होतं. लॉटी शर्लेसह संपूर्ण फेअरवेदर कुटुंब, आणि गांवांतच रहात असलेलीं सॅलीचीं भाअू-भावजय पार्टीला अुपस्थित होती.

पार्टी झाल्यावर गप्पा मारतांमारतां सहज गंमत म्हणून सर्वांनी आपापलं वजन केलं. माझं वजन ( त्या वेळीं ) १६१ पौंड असल्याचं आढळलं. सॅलीची भावजय सौ. नॉर्मा हॉलब्रर्ग ही चांगली सहा फूट अुंच अन् सणसणीत दणकट होती. तिचं वजन १८० पौंड भरलं. नॉर्माच्या नवऱ्यानं आणि अितरांनीं तिच्या वजना-वरून तिची खूप चेष्टा केली. पण ती चिडली नाहीं. मला म्हणाली, “ ह्यांच्या

चेष्टेकडे लक्ष देऊं नकोस ! नुसतंच नाहीं माझं वजन वाढलेलं ! मी किती दणकट आहें तें पहा ना ! माझे दंड दाबून पहा म्हणजे तुला कळेल !"

आतां मात्र माझ्यापुढं पेंचप्रसंग अुभा राहिला. परस्त्रीचे– त्यांतूनहि विवाहित स्त्रीचे– दंड चारचौघांत दाबून बघायचे म्हणजे काय ! अजूनहि भारतीय विशेषतः मराठी– संस्कारांचा एक थर मनावर शिल्लक होता. त्याच्या– खालीं दडपलेलं माझं मराठी मन अस्वस्थ होअून कुरकुरलं, 'This is मात्र too much हं !'

साहजिकच संकोच वाटला. पण नॉर्मानं पुन्हापुन्हा केलेल्या आग्रहापुढं नाइलाज झाला. नॉर्मा खरोखरच चांगलीच दणकट होती. तशी साक्ष मीं देतांच सॅली म्हणाली, "नॉर्माच्या 'भीतीनं' हा खोटी साक्ष देतोय् !"

नॉर्मासह सर्वजण ह्या विनोदांत सहभागी झालीं. नंतर वाटलं, देशकाल-परिस्थितीनुसार मानवी संस्कारांच्या, नीति–अनीतीच्या कल्पना किती वेग-वेगळ्या असतात ! आपल्याकडे असं कांहीं घडलं असतं तर अेखाद्या 'पुरोगामी' नवऱ्यानंसुद्धां पार्टी संपायची वाट न पहातां बायकोचा 'दंड धरून' तिला बाहेरची वाट दाखवली असती !

नॉर्माची आणि माझी पहिली भेट तिच्या सासऱ्याच्या– म्हणजे गस् हॉलबर्ग यांच्या– 'स्विमिंग पूल'वर झाली होती. आतां झालेल्या ह्या दुसऱ्या भेटींत तिनं खूपच गप्पा मारल्या. 'टेक्सस्'मधल्या 'डल्लास' गांवचं तिचं माहेर होतं. प्रेसिडेंट केनेडींबद्दल बोलतांना ती म्हणाली, "ज्या गांवांत मी जन्मलें, वाढलें, त्याच गांवांत प्रेसिडेंट केनेडींचा खून व्हावा, याची लाज वाटते !" गेल्या आठ वर्षांत ती अेकदांहि माहेरीं गेली नव्हती. पण ही गोष्टसुद्धां तिनं अगदीं सहजपणं सांगितली. तक्रारीचा स्वर न काढतां. आपल्याकडच्या गृहिणी माहेराबद्दलचा असा उल्लेख इतक्या सहजतेनं करूं शकतील का ? . . कुठल्याहि एका भावनेनं वहावत जायचं हें अमेरिकनांच्या रक्तांतच नाहीं. प्रत्येक गोष्टीचा शक्यतों वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतूनच विचार करायचं त्यांच्या अंगवळणी पडलेलं असतं.

दुसऱ्या दिवशी सकाळीं आठच्या सुमाराला नॉर्मा पुन्हा आमच्याकडे आली. त्या दिवशीं तिला बराच वेळ मोकळा होता. म्हणून बॅरिंग्टनमधल्या आणखी कांही ठिकाणीं मला फिरवून आणण्याच्या हेतूनं ती आली होती. तिच्या घरी मीं यावं असाहि तिचा आग्रह होताच. प्रथम नॉर्मानं तिच्या गाडीतून मला 'बॅरिंग्टन हायस्कूल' दाखवायला नेलं. तिथं श्री. कॅम्पबेल नांवाच्या एम्. ए. झालेल्या अेका तरुण शिक्षकाचा अन् माझा विशेष परिचय झाला. हा बारीकसा तरुण शिक्षक खूपच अुत्साही होता. आधुनिक शिक्षणशास्त्रांतील दोन नव्या पद्धतींचा त्यानं मला त्याच्या वर्गात नेऊन परिचय करून दिला. अलिकडे अमे-

# ' डेंजर : मेन कूकिंग ! '

एक दिवस दुपारीं अमेरिकेंतल्या दोनतीन वृत्तपत्रांचे अक सॅलीनं मला दाखवले. ' शिकागो ट्रिब्यून ', ' बॅरिंग्टन कुरिअर रिव्ह्यू ' यांसारख्या लहानमोठ्या वृत्तपत्रांनीं आमच्या अमेरिकेंतील आगमनाची दखल घेतलेली होती. एकदोन ठिकाणीं आमचे फोटोहि छापलेले आढळले. ' 9 Indian Professors Try Life in U. S.', 'Indian Guests Impressed by U. S. Scenery' अशीं शीर्षकं अमेरिकन वृत्तपत्रांत छापलेलीं पाहून चक्षू धन्य जाहले ! आतां मात्र प्रेसिडेंट जॉन्सन यांना आमच्या आगमनाची वार्ता नक्कीच समजलेली असणार, ह्या विचारानं मन जरा सुखावलं.

संध्याकाळीं सात वाजल्यापासून रात्रीं अकरापर्यंत सॅलीच्या आअीवडलां-कडेच आम्ही सर्वजण होतों. निमित्त ' कॉक्टेल् ' आणि ' डिनर पार्टी 'चं होतं. लॉटी शर्लेसह संपूर्ण फेअरवेदर कुटुंब, आणि गांवांतच रहात असलेलीं सॅलीचीं भाअू-भावजय पार्टीला अुपस्थित होती.

पार्टी झाल्यावर गप्पा मारतांमारतां सहज गंमत म्हणून सर्वांनीं आपापलं वजन केलं. माझं वजन ( त्या वेळीं ) १६१ पौंड असल्याचं आढळलं. सॅलीची भावजय सौ. नॉर्मा हॉलबर्ग ही चांगली सहा फूट अुंच अन् सणसणीत दणकट होती. तिचं वजन १८० पौंड भरलं. नॉर्माच्या नवऱ्यानं आणि अितरांनीं तिच्या वजना-वरून तिची खूप चेष्टा केली. पण ती चिडली नाहीं. मला म्हणाली, " ह्यांच्या

चेप्टेकडे लक्ष देऊं नकोस ! नुसतंच नाहीं माझं वजन वाढलेलं ! मी किती दणकट आहें तें पहा ना ! माझे दंड दाबून पहा म्हणजे तुला कळेल !”

आतां मात्र माझ्यापुढं पेंचप्रसंग अुभा राहिला. परस्त्रीचे– त्यांतूनहि विवाहित स्त्रीचे– दंड चारचौघांत दाबून बघायचे म्हणजे काय ! अजूनहि भारतीय विशेषतः मराठी– संस्कारांचा एक थर मनावर शिल्लक होता. त्याच्या– खालीं दडपलेलं माझं मराठी मन अस्वस्थ होअून कुरकुरलं, ‘ This is मात्र too much हं !’

साहजिकच संकोच वाटला. पण नॉर्मानं पुन्हापुन्हा केलेल्या आग्रहापुढं नाइलाज झाला. नॉर्मा खरोखरच चांगलीच दणकट होती. तशी साक्ष मीं देतांच सॅली म्हणाली, “नॉर्माच्या ‘भीतीनं’ हा खोटी साक्ष देतोय् !”

नॉर्मासह सर्वजण ह्या विनोदांत सहभागी झालीं. नंतर वाटलं, देशकाल-परिस्थितीनुसार मानवी संस्कारांच्या, नीति–अनीतीच्या कल्पना किती वेग-वेगळ्या असतात ! आपल्याकडे असं कांहीं घडलं असतं तर अेखाद्या ‘पुरोगामी’ नवऱ्यानंसुद्धां पार्टी संपायची वाट न पहातां बायकोचा ‘दंड धरून’ तिला बाहेरची वाट दाखवली असती !

नॉर्माची आणि माझी पहिली भेट तिच्या सासऱ्याच्या– म्हणजे गस् हॉलबर्ग यांच्या– ‘स्विमिंग पूल’वर झाली होती. आतां झालेल्या ह्या दुसऱ्या भेटीत तिनं खूपच गप्पा मारल्या. ‘टेक्सस्’मधल्या ‘डल्लास’ गांवचं तिचं माहेर होतं. प्रेसिडेंट केनेडींबद्दल बोलतांना ती म्हणाली, “ज्या गांवांत मी जन्मलें, वाढलें, त्याच गांवांत प्रेसिडेंट केनेडींचा खून व्हावा, याची लाज वाटते !” गेल्या आठ वर्षांत ती अेकदांहि माहेरीं गेली नव्हती. पण ही गोष्टसुद्धां तिनं अगदी सहजपणं सांगितली. तक्रारीचा स्वर न काढतां. आपल्याकडच्या गृहिणी माहेराबद्दलचा असा उल्लेख इतक्या सहजतेन करूं शकतील का ? . . . कुठल्याहि एका भावनेनं वहावत जायचं हें अमेरिकनांच्या रक्तांतच नाहीं. प्रत्येक गोष्टीचा शक्यतों वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतूनच विचार करायचं त्यांच्या अंगवळणीं पडलेलं असतं.

दुसऱ्या दिवशी सकाळीं आठच्या सुमाराला नॉर्मा पुन्हा आमच्याकडे आली. त्या दिवशीं तिला बराच वेळ मोकळा होता. म्हणून बॅरिंग्टनमधल्या आणखी कांही ठिकाणी मला फिरवून आणण्याच्या हेतूनं ती आली होती. तिच्या घरीं मी यावं असाहि तिचा आग्रह होताच. प्रथम नॉर्मानं तिच्या गाडीतून मला ‘बॅरिंग्टन हायस्कूल’ दाखवायला नेलं. तिथं श्री. कॅम्पबेल नांवाच्या एम्. ए. झालेल्या अेका तरुण शिक्षकाचा अन् माझा विशेष परिचय झाला. हा बारीकसा तरुण शिक्षक खूपच अुत्साही होता. आधुनिक शिक्षणशास्त्रांतील दोन नव्या पद्धतीचा त्यानं मला त्याच्या वर्गात नेऊन परिचय करून दिला. अलिकडे अमे-

रिकेंत ' किंडरगार्टन '– विद्यार्थ्यांना एका नवीनच प्रकारचीं मुळाक्षरं शिकवण्याचा प्रयोग चालू आहे. ह्या पद्धतीनं लहानपणापासूनच मुलं ' शॉर्टहँड 'प्रमाणं वेगान लिहायला शिकतात. त्याचप्रमाणं विद्यार्थ्यांना कमींत कमी वेळांत जास्तीत जास्त मजकूर वाचतां यावा यासाठीं ' फास्ट रीडिंग ' शिकवणारीं 'Shadowscope' आणि 'Craig Reader' हीं दोन यंत्रंहि श्री. कॅम्पवेलनीं मला दाखवलीं. आणि या पद्धती बारकाओीनं समजून घेण्याची जिज्ञासा मीं दाखवल्यानं त्यांनीं त्या यंत्रांचीं प्रात्यक्षिकंहि करून दाखवली. अितकंच नव्हे, तर परत जातांना या दोन्ही पद्धतींविषयींचं छापील साहित्यहि त्यांनी मला भेट म्हणून दिलं. आधुनिक शिक्षण-शास्त्रांतील ह्या नव्या पद्धतींविषयीं सविस्तर लिहिण्यासारखं खूपच आहे. पण त्याचा एक स्वतंत्र लेखच होओील.

वॅरिंग्टनमधें येतांना, कीं केव्हांतरी गाडीतून फिरतांना, मी एक फार सुंदर चर्च कुठंतरी पाहिलं होतं. त्याचा फोटो घेण्याची फार अिच्छा होती. पण त्या वेळी कॅमेरा जवळ नसल्यानं तें जमलं नव्हतं. माझी ही रुखरुख मी नॉर्माजवळ सहज व्यक्त करतांच ती गांवापासून कांहीं मैल दूर असलेल्या त्या चर्चकडे केवळ फोटो काढण्यासाठी मला घेऊन गेली. त्यामुळंच वॅरिंग्टन गांवाचं भूषण असलेल्या त्या सुंदर ' लुथेरान चर्च 'चा मला फोटो घेतां आला. नंतर अेका दुकानांत नेऊन तिनं सहा फिल्म–रोल्स् विकत घेऊन मला भेट म्हणून दिले. त्यानंतर नॉर्मा-बरोबर मी तिच्या घरीं गेलों.

' साऊथ हाँ स्ट्रीट ' वर अेका फार मोठ्या प्लॉटमधें नॉर्माचा बंगला होता. बंगलाहि अर्थात् खूपच मोठा होता. बंगल्याभोंवतीं बागबगीचा होता, आणि बऱ्याच मोठ्या जागेंत हिरवळ होती. बंगल्याच्या पूर्वेच्या कांहीं खोल्यांच्या भिंती कांचेच्या होत्या. त्यामुळं सकाळच्या कोवळ्या सूर्याचा भरपूर प्रकाश बंगल्यांत येत असे. शिवाय खोलींतून बसल्या जागेवरून बाहेरची वृक्षसृष्टि दिसत असे तें वेगळंच ! नॉर्माच्या बंगल्यांत आणि आसमंतांत कमालीची स्वच्छता आणि टापटीप दिसत होती. बंगल्याच्या एवढ्या मोठ्या परिसरांत मला कुठं वाळलेली पानं सांचलेली दिसली नाहींत कीं कुठं कागदाचे कपटे पडलेले आढळले नाहींत. अमेरिकनांचं स्वच्छतेचं वेड मला इथंहि दिसून आलं.

भारतीय पाकशास्त्राचं माझं ज्ञान फार बेताचं होतं. परंतु त्या विषयाची परीक्षा देण्याचा प्रसंग मात्र अमेरिकेंत माझ्यावर आला. त्या दिवशी नॉर्मानं दुपारच्या जेवणाच्या वेळीं मला फेअरवेदर यांच्या घरीं आणून सोडलं, आणि ती गेली. जेवतांना लॉटी शर्ले मला म्हणाली, "आज संध्याकाळीं ओवेन आणि सॅली त्यांच्या मित्राकडे जेवायला जायचींय्‌त. घरीं फक्त पीटर, तूं आणि मीच आहोंत. तेव्हां तुला अन् मला आज संध्याकाळीं स्वैपाकघराची प्रयोगशाळा

बनवायला कांहींच हरकत नाहीं. आज आपण अिंडियन पदार्थ जेवायला करूं.”

उसन्या अवसानानं मीं लॉटीला होकार दिला खरा. पण संध्याकाळीं प्रत्यक्ष पाकनिर्मितीचा प्रयोग सुरू झाला तेव्हां कुठून हें घोंगडं आपण गळ्यांत घेतलं असं मला झालं ! स्वैपाकाचा प्रत्यक्ष अनुभव भारतांत मला जवळजवळ नव्हताच. पूर्वीं कधींतरी केलेल्या निरीक्षणाच्या जोरावर मी लॉटीला भराभर ‘ दिग्दर्शन ’ करूं लागलों. दोनचार दिवसांपूर्वीं भारतीय जेवणासाठीं आवश्यक ते पदार्थ आम्हीं खरेदी केलेलेच होते. आतां फक्त त्यांचं अेकत्रीकरण करायचं होतं. माझ्या कल्पनेप्रमाणं थोड्याच वेळांत मीं पुलाव, मसुराची डाळ आणि बटाट्याची सुकी भाजी तयार केली. मुंबईहून अमेरिकेंत नेलेल्या पापड्याहि तळल्या. आपल्याकडच्या सुप्रसिद्ध ‘ डाल्डा ’सारखाच ‘ क्रिस्को ’ ( Crisco ) नांवाचा एक पदार्थ अमेरिकेंत मिळतो. त्या ‘क्रिस्कों’त पापड्या तळल्या आणि बटाट्याची भाजी तयार करतांना गोड्या तेलाएवजी मक्याचं तेल वापरलं. जेवतांना, भारतीय जेवणांतला प्रत्येक पदार्थ तयार करायला किती कठिण असतो याबद्दलचं विवेचन मी करूं लागलों. त्यावर लॉटी मिस्किलपणं म्हणाली, “ तें सांगायला नकोच ! एवढा वेळ प्रत्यक्षच मीं तें सारं पाहिलं.” जेवतांना पीटर फारसा जेवला अगर बोलला नाहीं. पण शेवटी एकदां ‘ सगळे पदार्थ अुत्तम झाले आहेत ’ असं तो म्हणाला. पीटर एवढा सौजन्यशील असेल याची तोंपर्यंत मला कल्पना नव्हती !

जेवण झाल्यावर पीटर त्याच्या खोलींत गेला, आणि लॉटी माझ्याशीं स्वैपाक-घरांतच गप्पा मारीत बसली. तिच्याशीं बोलतांबोलतां तिच्याबद्दलची बरीच माहिती मला मिळाली. लॉटीचं वय असेल पंचवीससव्वीस. १९६० च्या अुन्हाळ्यांत पश्चिम-जर्मनीहून ती अमेरिकेला आली. त्यानंतर गेलीं साडेतीन वर्षं फेअरवेदर कुटुंबांतच ‘ हाअुस-कीपर ’ म्हणून राहून ती बी. अे.चा अभ्यास करीत होती. मॅथेमॅटिक्स, अिंग्लिश, सायकॉलॉजी, फिजिऑलॉजी आणि हिस्टरी हे विषय तिनं बी. अे.ला घेतले होते. गप्पांच्या ओघांत मीं लॉटीला हिटलरबद्दल मुद्दाम विचारलं.

लॉटी म्हणाली, “ आजच्या तरुण पिढीला हिटलरबद्दल मुळींच आदर नाहीं. गेल्या पिढीतले कांहीं थोडे लोक मात्र त्याच्याबद्दल आदरानं बोलतात. हिटलर देशभक्त असला तरी वैयक्तिक मोठेपणाला नि सर्वकष सत्तेला हपापलेला होता. आपल्या कृतीचे काय भयानक परिणाम होतील याची त्याची त्यालाच संपूर्ण कल्पना नव्हती. त्यामुळं तो पिसाटासारखा वागत गेला. जर्मनीचं त्याच्यामुळं फार नुकसान झालं. आमच्या देशाची फाळणी हिटलरमुळंच झाली ! सध्या रशियानं व्यापलेल्या कम्युनिस्ट पूर्व-जर्मनीत फार धोक्याची परिस्थिती आहे. त्या भागां-

तल्या जर्मन नागरिकांवर त्यांच्याच देशांत असंख्य कडक बंधनं आहेत. कांहीं विशिष्ट गोष्टी पालकांना आपल्या मुलांजवळसुद्धां बोलतां येत नाहींत. समजा तसं ते बोललेच नि मुलांनीं सहज कुठं त्याचा उच्चार केला, तर पालकांना कडक शासन होतं. प्रसंगीं प्राणालाहि मुकावं लागतं. असं दहशतीचं वातावरण पूर्व-जर्मनींत सर्वत्र आहे. आम्ही पश्चिम-जर्मनींतले लोक त्या मानानं पुष्कळच स्वतंत्र आणि सुखी आहोंत."

दुसरं महायुद्ध संपलं तेव्हां लॉटी शर्ले सातआठ वर्षांची होती. पण माझ्याशीं बोलतांना युद्धाच्या आठवणींनीं अजूनहि तिचं चित्त थरारून जात होतं. बॉंब-वर्षावाच्या आठवणी सांगतांना ती म्हणाली, " एकेक बॉंब असा वेगानं छपरांतून घरांत घुसायचा, कीं छप्पर, खोलींतला पलंग आणि जमीन यांच्यांतून आरपार जाऊन तो खालच्या मजल्यावर जायचा !"

युद्धासंबंधीं बोलतांना लॉटी खूपच गंभीर झाली होती. लहानपणींच युद्धामुळं होणारा विनाश प्रत्यक्ष पाहिल्यामुळं तिला 'युद्ध' या कल्पनेबद्दलच एक प्रकारचा तिटकारा वाटत होता. त्या वेळीं तिनं अनुभवलेली भीतीची भावना, विनाशाची वेदना तिच्या चेहेऱ्यावर पुन्हा उमटली होती. लॉटीच्या आठवणींशीं समरस झाल्यानं क्षणभर माझ्यासमोर बसलेली जर्मन तरुणी मला दिसेनाशी झाली, आणि तिच्याऐवजीं जर्मनींतल्या एका गांवीं एका लहानशा घराच्या पायरीवर बसलेली सातआठ वर्षांची एक गोड जर्मन मुलगी मला दिसली. हनुवटीला आपल्या चिमुकल्या हातांचा आधार देऊन तिनं आपले निळेनिळे डोळे आकाशांत दूरवर कुठंतरी स्वच्छंदपणं उडणाऱ्या पांढ्याशुभ्र कबुतरावर रोंखले होते. आकाशांत पक्ष्यांप्रमाणं विमानांचे थवे येत होते, जात होते. त्याची तिला दखलहि नव्हती. त्यांचा कानठळ्या बसवणारा आवाज तिच्या कानांना ऐकूं येत नव्हता. रस्त्यावरून बुटांचा खाड्खाड् आवाज करीत, दंडाला स्वस्तिक चिन्ह बांधलेली जर्मन सैनिकांची गणवेषधारी पलटण चालली होती. त्यांच्या बुटांचा आवाज तेवढा तिच्या कानांत आणि मनांत भरून राहिला होता. . . खाड् खाड् खाड् खाड्. . अशाच एका उदास संध्याकाळीं, असाच गणवेष घालून बुटांचा आवाज करीत रस्त्यावरून गेलेल्या सैनिकांतले कांहीं चेहेरे तिला परिचित होते, फार जवळचे होते. तिच्याकडे नजर जातांच त्यांचे डोळे हंसले होते. तिनं आपला चिमुकला हात हलवून हंसून त्यांना निरोप दिला होता. पण. . . पण पुन्हा ते चेहेरे, ते हंसरे डोळे तिला कधींच दिसले नव्हते ! . . कधींच दिसणारहि नव्हते ! . . . पुन्हा जन्मांत कधीच दिसणार नव्हते ! . . . अखेर 'युद्ध' म्हणजे हंसऱ्या डोळ्यांच्या पाकळ्या खुडणारं एक पिसाट वादळ असतं तर ! . . .

ता. ८ ऑगस्ट १९६४ हा दिवस आणि नंतरची रात्र दीर्घकाळ माझ्या स्मरणांत



युद्धाविषयीं गंभीरपणें बोलणारी लॉटी शर्ले

राहील. त्या दिवशी फेअरवेदर कुटुंबा-बरोबर मी 'व्हिलेज प्लेनो' अिथं सह-लीला गेलों होतों. बॅरिंग्टनपासून सुमारं ५० मैलांवर 'प्लेनो' हें एक छोटंसं गांव आहे. गांवाची लोकसंख्या असेल सुमारं आठ हजार सॅलोच्या आर्ट-गॅलरीचे पार्टनर श्री. लुअिस हार्डिन व सौ.शर्ले हार्डिन यांच्या मालकीची सुमारं ७०० एकर जमीन 'व्हिलेज प्लेनो'ला होती.श्री.व सौ. हार्डिन जरी शिकागोला रहात असलीं, तरी केव्हांतरी शनिवार-रविवारीं शहराच्या गर्दीपासून दूर, निवान्त ठिकाणी रहातां यावं म्हणून त्यांनीं 'प्लेनो'मधल्या त्यांच्या 'इस्टेट' वर एक वैशिष्टयपूर्ण बंगला बांधलेला होता. 'त्या बंगल्यांत आपल्याला ट्रिपला जायचंय्. उद्यां सकाळीं आपण परत येअू.'– असं ओवेननीं मला सांगितलं होतं. केवळ चोवीस तासांच्या सहलीसाठीं उगीच फार कपडे बरोबर कशाला घ्या, या विचारानं मीं अगदीं मोजकेच कपडे माझ्यावरोबर घेतले होते.

या सहलीला श्री. व सौ. हार्डिन हीं तर अर्थात्च आमच्या बरोबर होतीं. पण शिवाय श्री. बिल् बिघॅम व सौ. एलन बिघॅम हें जोडपं, नॉर्मा हॉलबर्गचा मुलगा कर्ट आणि कु. पॅट्रिशिआ शिथ् ही सॅलीच्या आर्टगॅलरीची सेक्रेटरी असलेली तरुण जर्मन मुलगी– हेहि लोक होते. प्रत्येक कुटुंबानं आपापली गाडी बरोबर घेतली होती. आम्ही सर्वजण सकाळीं साडेदहाच्या सुमाराला 'व्हिलेज प्लेनो'ला पोंचलों.

हार्डिन यांचा बंगला गांवापासून दूर– जवळजवळ जंगलांतच बांधलेला– होता. परंतु आधुनिक अमेरिकन जीवनांतील सर्व सुखसोयींची व्यवस्था त्यांनीं तिथं केलेली होती. गांवापासून हार्डिन यांच्या इस्टेटकडे जाणारा रस्ता बऱ्या-पैकी बांधलेला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठमोठ्या वृक्षांच्या रांगा होत्या आणि प्रत्यक्ष बंगल्याच्या परिसरांत मुद्दाम वांधून काढलेला कांहीं भाग सोडला, तर सर्वत्र उंचउंच वृक्षांची गर्दी झालेली होती.

आम्ही तिथं पोंचलों तेव्हां सूर्य बराच वरती आलेला होता. पण गर्द झाडीं-तील पाना-फांद्यांच्या दाटीवाटींतून मार्ग काढून जमिनीला स्पर्श करण्यांत फारच

थोड्या किरणांना यश लाभलं होतं. त्यामुळं छायाप्रकाशाच्या चित्रविचित्र आकृतींनीं चित्रांकित केलेल्या त्या भूमीवर मीं पहिलं पाऊल टाकलं तेव्हां एखाद्या स्वप्ननगरींत तर मी आलों नाही ना, असा क्षणभर मला भास झाला. बंगल्यापासून सुमारं पस्तीसचाळीस फुटांवर अेक मोठा 'स्विमिंग पूल' बांधलेला होता. स्विमिंग पुलाचं पाणी अर्थातच निळंनिळं होतं. त्यांत 'टेंपरेचर कंट्रोल' ची व्यवस्था असल्यानं पाण्याचं तपमान पाहिजे त्या वेळीं पाहिजे तितकं ठेवतां येत होतं. तलावाच्या पलिकडच्या अर्ध्या भागांत जरा खोल पाणी होतं, आणि बंगल्याच्या बाजूकडचा तलावाचा भाग अधिकाधिक उथळ होत गेला होता. बंगल्याच्या बाजूला अगदीं कडेला तर कमरेइतकंच पाणी होतं. तलावाच्या चारी बाजूंनीं गुळगुळीत फरशी होती, आणि फरशीच्या पलिकडे सर्व दिशांना दाट झाडी होती.

हार्डिन यांचा बंगला अगदींच जगावेगळा होता. त्यांनीं जेव्हां ती जमीन विकत घेतली, तेव्हां त्यांना त्या जमिनींत पक्का बसवलेला एक आगगाडीचा डबा आढळला. अर्थात् त्या 'पुलमन कॉन्स्टिटयूशन कार'सह त्यांनीं ती जमीन विकत घेतली, आणि त्या डब्याला जोडूनच आणखी तीन मोठ्या खोल्या त्यांनीं बांधल्या. असा तो आगगाडीचा डबा आणि त्याला जोडलेल्या खोल्या यांचा मिळून तो बंगला तयार झाला होता. हार्डिन यांच्या बंगल्याच्या 'पुलमन कार'मधें चार संपूर्ण स्वतंत्र व स्वयंपूर्ण 'कंपार्टमेंट्स्' होते. ह्या आगगाडीच्या डब्याचा इतिहासहि ऐकण्यासारखा आहे.

शिकागोच्या जगप्रसिद्ध 'Pullman Standard Carbuilding Company'-नं हा बादशाही सुखसोयीचा आगगाडीचा डबा ता. ३१ऑगस्ट १९०९रोजीं बांधला. (योगायोग असा कीं ५९ वर्षांनंतर ऑगस्ट महिन्यांतच मला त्या डब्यांत रहाण्याचा योग आला !) ह्या डब्याविषयी अधिक चौकशी मीं केली, तेव्हां मला समजलं की १९२०–२४ मधें अमेरिकेचे अध्यक्ष असलेल्या प्रेसिडेंट वॉरेन हार्डिंज (Warren Harding) यांच्याकडे हा डबा होता. आणि पत्नीखेरीज आपल्या अितर मैत्रिणींना घेअून रहाण्यासाठी त्यांनी तो उपयोगांत आणला होता. पुढें १९३६ सालीं एका गृहस्थानं तो विकत घेअून त्याच्या या शेतजमिनीवर आणून ठेवला होता. डब्याच्या किंमतीपेक्षाहि जास्त खर्च तो अिकडे आणायलाच पडला. १९५५ मधें अितर सर्व इस्टेटीबरोबर श्री. लुअिस् हार्डिन यांनी तो डबाहि विकत घेतला होता.

रात्री त्या डब्यांतील माझ्या 'कंपार्टमेंट'मधील परांच्या लुसलुशीत बिछान्यावर झोंपताना मनांत विचार आला 'ज्या बिछान्यावर अमेरिकेचा अेक प्रेसिडेंट आपल्या सख्यांसह झोंपला होता, त्याच बिछान्यावर हिंदुस्थानांतला अेक तरुण लेखक आज (एकटाच) झोंपत आहे ! कालाय तस्मै नमः ! दुसरं काय ?'

आम्ही तिथं पोंचल्याबरोबर मोटारींतलं आमचं सामान बाहेर काढून ठेवलं

आणि दुपारच्या जेवणाला अजून अवकाश असल्यानं लगेच 'कॉकटल' घेणं, पोहणं, फोटो काढणं अित्यादि कार्यक्रमांना सुरुवात झाली. बरेचसे खाद्यपदार्थ आम्हीं आमच्याबरोबरच आणलेले होते. आणि कांहीं गरमागरम पदार्थ मात्र आम्हीं तिथं गेल्यावर तयार केले. दगडी कोळशांसारख्या कोळशांची स्टँडसारखी अेक चूल होती. तिच्या वरच्या गोल चाळणीसारख्या आकाराच्या लोखंडी जाळीवर आम्ही मोठाले बटाटे भाजले. बटाटे भाजण्याची ही पद्धतहि मोठी गमतीदार होती. आपल्या सिगरेटच्या पाकिटांत जसा चकचकीत चांदीचा कागद असतो, तसाच मोठा चांदीचा कागद प्रथम त्या शेगडीच्या जाळीवर पसरायचा. नंतर अेकेका बटाटयालासुद्धां स्वतंत्र चांदीचा कागद गुंडाळून तो त्यावर ठेवायचा. अशा रीतीनं जाळीवर ठेवलेले बटाटे शेगडीच्या अुष्णतेनं भाजले जातात. अधूनमधून चिमटयानं ते अुलथेपालथे केले म्हणजे झालं. हें बटाटे भाजण्याचं 'कलाकुसरीचं' काम सॅलीनं केलं, आणि तिला मीं मदत केली.

तोंपर्यंत बाकीचे लोक तलावांत मनसोक्त पोहत होते. मला पोहतां येत नसल्यानं पाण्यांत अुतरायचा धीर होअीना. म्हणून लांबूनच सुरक्षित अंतरावरून मी ती मौज पहात होतों. पण पाण्यापासून अलिप्त रहाण्याचं हें सुख मला फार वेळ लाभलं नाहीं. थोडयाच वेळांत ओवेनचं आणि अितरांचं माझ्याकडे



**पोहतां न येणाऱ्यांसाठीं खास सोय ! या प्लॅस्टिकच्या खुर्च्यांत बसून पोहतां येत असल्याचा आव आणायचा !**

लक्ष गेलं, आणि त्यांनीं पाण्यावाहेर येऊन आग्रह करून मला पोहण्याचा पोषाख घालायला लावला. जवळजवळ हात धरूनच त्यांनीं मला पाण्यांत ओढलं. अमेरिकनांचं एक वैशिष्ट्य मला अनेकदां जाणवलं तें हें, कीं ते स्वतः तर जीवनाचा आनंद लुटतीलच, पण इतरांनाहि त्यांत ते सहभागी करून घेतील ! खातांना, पितांना, गातांना, नाचतांना– सर्वच प्रसंगीं मला त्यांची ही मनोवृत्ति दिसून आली. एखादी गोष्ट तुम्हांला येत नसली तर ते तुमचा उपहास करणार नाहींत, तर ती करायला ते शिकवतील. शिकतांना परक्या देशांतल्या माणसाच्या हातून चुका झाल्या तर न हंसतां त्याला संभाळून घेतील. त्यानं एवढीशी गोष्ट जरी बरोबर केली तरी त्याचं भरपूर कौतुक करतील, त्याला उत्तेजन देतील, आणि त्याचा संकोच अजिबात नाहींसा करून टाकतील. कमालीचा आपलेपणा, मोकळेपणा आणि खेळकरपणा, हीं तर अमेरिकनांचीं खास स्वभाववैशिष्ट्यं आहेत. त्यामुळंच इतर कोणत्याहि देशांतल्या माणसांपेक्षां अमेरिकनांच्या सहवासांत आपल्याला कधींहि बुजल्यासारखं होत नाहीं. आपण त्यांच्यांत मिसळायचाच अवकाश, पहातांपहातां ते एखाद्याला आपलासा करून टाकतात !

जरा वेळ किनाऱ्याजवळच्या पाण्यांत डुंबल्यावर हार्डिन यांनीं त्यांच्याकडच्या एका विशिष्ट प्रकारच्या प्लॅस्टिकच्या तरंगत्या आराम-खुर्च्या पाण्यांत सोडल्या. या खुर्च्या कमालीच्या हलक्या असतात. त्यांना प्लॅस्टिकच्या पट्ट्यांची नवारीसारखी विणलेली पाठ असते, आणि पाय लांब करून ठेवायला तशीच सोय केलेली असते. पाण्याच्या पातळीपेक्षां चार बोटं अुंच रहाणारे प्लॅस्टिकचे रुंद हातहि या खुर्च्यांना असतात. हातांच्या मध्यभागीं ग्लास ठेवण्यासाठीं गोल खळगे केलेले असतात. त्यामुळं पोहून दमल्यावर खुर्चीवर आरामांत पडून पाण्यावर तरंगतांतरंगतां हातांत ग्लास घेअून अेखादं अुत्तेजक पेयहि पितां येतं. अेखाद्या ठिकाणीं तरंगण्याचा कंटाळा आला की नुसत्या हातांनींहि या तरंगत्या आराम-खुर्च्या होडीसारख्या वल्हवतां येतात, आणि पाण्यांत हवं तिकडे जातां येतं. सुमारं दोनअडीच तास खाणंपिणं करीत आम्ही त्या तरंगत्या खुर्च्यांवर आरामांत गप्पा मारीत पडून राहिलों होतों.

पोहणं झाल्यावर तलावाभोंवतालच्या फरशीवर खुर्च्या टाकून मक्याचीं उकडलेली कणसं खातांखातां आम्हीं पुन्हा कांहीं फोटो घेतले. मला त्या सर्वांचा अेक ‘ग्रुप फोटो’ घ्यायचा होता. म्हणून मीं त्यांना खुर्च्यांवरून उठवून तलावाच्या कडेला उभं केलं. पण विल् बिघॅम यांच्या स्वभावांतल्या खोडकरपणानं तेवढ्यांत उचल खाल्ली. फोटोसाठी उभ्या राहिलेल्या इतर लोकांच्या समोरून आपल्या चड्डीची टोंकं हातांत धरून ते नाचत नाचत आडव्या फेऱ्या मारूं लागले. आतां बिल् बिघॅम कॅमेऱ्यापुढून सतत आडवे जात असतांना फोटो कसा घ्यायचा ? पुन्हा

नाचत आडवे जातांना मला चिडवीत ते म्हणतात कसे,–" सगळी शांत अुभीं असतांना फोटो घेण्यांत कसलं आलंय् कौशल्य ! माझ्या अशा फेऱ्या चालू असतांनाच सर्वांचा फोटो घेअून दाखवलास, तरच तूं खरा फोटोग्राफर ! " त्यांचं आव्हान मीं स्वीकारलं, आणि त्यांच्या अेका नव्या नाचऱ्या फेरीची सुरुवात होण्याच्या क्षणालाच त्यांचा फोटो घेअून टाकला. बिल्च्या ह्या चावटपणानं सर्वांना हंसतांहंसतां पुरेवाट झाली.

दुपारच्या जेवणाच्या वेळीं, ते भाजलेले मोठे बटाटे कसे खायचे असतात त्याचं 'टेक्निक्' शिकून घेतलं. बटाटयांच्या अंगाभोंवतीं चांदीचा कागद गुंडाळलेला असल्यामुळं ते बराच वेळ गरम राहूं शकतात. सॅलीनं कागद काढून ते बटाटे आमच्या 'प्लेट'मधें वाढले. त्यांच्या वरची साल काटयाचमच्यानं काढतांच आंतून गरम वाफ आली. बटाटयांच्या वरच्या पृष्ठभागावरचं सालीचं आवरण दूर करून त्यांवर मीठ, मिरपूड, थोडंसं लोणी टाकायचं, आणि मग त्या बटाटयाला शेवटीं होडीचा आकार येअील अशा पद्धतीनं त्याचा मधलामधला भाग पोखरून खायचा, असं तें तंत्र होतं ! ह्या पदार्थाची चव, मसाल्याच्या तळलेल्या पदार्थांना चटावलेल्या आपल्या भारतीय जिभेला अळणी वाटते. पण अशा तऱ्हेनं बटाटयाचे लाड करीत अुंदराप्रमाणं तो कुरतडून खाण्यांत गंमत वाटते ही गोष्ट मात्र खरी !



**'कुशल' फोटोग्राफरनें घेतलेला एक फोटो : (डावीकडून) बिल् बिंघॅम, पॅट्रिशिआ शिथ्, ओवेन फेअरवेदर, सॅली फेअरवेदर, एलन बिंघॅम, लुइस हार्डिन आणि शर्ले हार्डिन.**


दुपारीं जेवण झाल्यावर आम्ही दोनअडीच तास चक्क झोंप काढली. नंतर संध्याकाळीं साडेपांचला हार्डिन यांनीं आम्हांला त्यांच्या गाडीतून फिरवून त्यांचीं सर्व शेतं दाखवून आणलीं. शेतावरचीं खास वैशिष्ट्यपूर्ण रीतीनं बांधलेलीं धान्याचीं कोठारं तर पहाण्यासारखीं होतींच, पण त्यांच्या 'पोल्ट्री फार्म'मधील कोंवड्यांची बादशाही व्यवस्थाहि आपल्याकडच्या कोंवड्यांनीं हेवा करण्यासारखी होती ! वरच्या कप्प्यांतील कोंवडीनं अंडं टाकलं कीं तें खालच्या कप्प्यांतील गवतावर जाऊन पडायचं. "या पद्धतीचा विशेष फायदा काय ?" असं मीं मुद्दाम हार्डिन यांना विचारलं. तेव्हां हंसतहंसत त्यांनीं अेक प्रसिद्ध विनोद सांगितला. ते म्हणाले, "अंडं घातल्यावर कोंबडी अिकडेतिकडे पहाते तर तिला अंडं दिसत नाहीं. ती गोंधळून जाते अन् स्वतःशींच पुटपुटते, 'अरेच्या ! आपलं अंडं कुठं गेलं ? . . . कीं आपण अंडं घातलंच नाहीं ?'– आणि मग गोंधळून गेलेली ती कोंबडी, आपण अंडं घातलंच नाहीं अशा कल्पनेनं पुन्हा अेक अंडं घालते !"

हार्डिननीं सांगितलेल्या विनोदावर आम्ही सगळीं खूप हंसलों. खुराड्यांतल्या कोंबड्यांनींहि हा विनोद अर्थात् अैकलाच ! आणि 'अितके दिवस आपण कसा बावळटपणा करीत होतों' या विचारानं खजिल होऊन त्यांनीं लाजेनं चोंची खालीं केल्या.

रात्रीं साडेसात वाजतां बंगल्याच्या अन् 'स्विमिंग पूल'च्या मधल्या मोकळ्या जागेंत खुर्च्याटेबलं मांडून आम्हीं रात्रीच्या जेवणाची तयारी केली. मी व पॅट्रिशिआनं जेवणासाठीं आणखी कांहीं बटाटे अन् मक्याचीं कणसं भाजायचं ठरवलं. आतां सकाळच्या अनुभवानं मी अमेरिकन पाकशास्त्रांत– निदान बटाटे भाजण्यांत तरी– प्रवीण झालों होतों. म्हणून मीहि तिच्याबरोबर कामाला लागलों. मला स्वैंपाकांत मदत करतांना पाहून लुअिस् हार्डिन धांवतधांवत त्यांच्या बंगल्या-समोरच्या 'मोटरगॅरेज'मधें गेले आणि लाकडी स्टँडवर लावलेला अेक रंगीत बोर्ड घाअीघाअीनं माझ्यापुढं मांडून त्यांनी अितरांना धोक्याची सूचना दिली. बोर्डावर ठळक अक्षरांत रंगवलेले शब्द होते : 'Danger! Men Cooking!'

ओवेन फेअरवेदर यांच्या हातांत कॅमेरा होताच. त्यांनीं झटकन् 'पॅट'चा, माझा अन् लुअिस्‌चा रंगीत फोटो घेऊन टाकला. लुअिस् हार्डिन यांनीं तो बोर्ड पूर्वींच तयार करून ठेवलेला होता. पण समयसूचकतेनं अगदीं अचूक प्रसंगी त्याचा अुपयोग करण्यांत, सहलीच्या वातावरणांत खेळकरपणा निर्माण करण्याची त्यांची धडपड व विनोदबुद्धि दिसून आली.

जेवण चालू असतांनाच मला बंगल्याबाहेरच्या मोकळ्या वातावरणांतली थंडी जाणवायला लागली होती. आजूबाजूचा सर्व प्रदेश जवळजवळ जंगला-सारखाच असल्यानं रात्रीं तर कडाक्याची थंडी पडली. पण आमच्याबरोबरच्या




**पाकशास्त्रांत निपुण असल्याची एखाद्यानें कितीहि ग्वाही दिलेली असली, तरी पाकसिद्धींत सावधानता राखणें केव्हाहि श्रेयस्कर !**

कुणाहि अमेरिकनाला त्या थंडीचं विशेष कांहीं वाटलं नाहीं. कारण शून्याच्या खालीं टेंपरेचर जाण्याचाहि अनुभव त्यांना होता. त्यामुळं जेवण होतांच त्यांचा खाणं-पिणं-नाचणं आणि गाणं यांचा जल्लोष त्या कडाक्याच्या थंडींतहि सुरू झाला. मला वाटलं, आतां थोड्याच वेळांत हे लोक बंगल्यांत जातील. पण कसलं काय ! अर्धी रात्र बाहेर काढण्याच्या त्यांच्या कल्पनेनंच मला हुडहुडी भरली ! आधीं नीट चौकशी न करतां, ट्रिपला येतांना अपुरे कपडे बरोबर आणल्याचा मला आतां पश्चात्ताप झाला. कमालीची थंडी वाजत असल्यानं त्यांच्या नाच-गाण्यांत मला मनापासून भाग घेतां येईना. माझी ही अवस्था सौ. शर्ले हार्डिन यांच्या लक्षांत येतांच त्यांनीं बंगल्यांत जाऊन त्यांचा अेक स्वेटर आणून मला घालायला लावला. तरीसुद्धां थंडी राहीना. तेव्हां बिल् बिघॅम यांनी स्वत:च्या अंगांतलं कातड्याचं जॅकेट काढून मला सक्तीनं घालायला लावलं. जॅकेट देतांना ते म्हणाले, "आधीं हें अंगांत घाल पाहूं ! आम्हांला अशा कडाक्याच्या थंडीची संवय आहे. पण तूं अुष्ण देशांतून आला आहेस. तुला ही थंडी सहन होणार नाहीं."

अमेरिकेंत जवळजवळ सर्व कामं आतां यंत्रांनीं केली जातात. पण अमेरिकन माणसाचं मन मात्र अजूनहि यंत्रासारखं रुक्ष आणि निर्जीव बनलेलं नाहीं. त्यांच्याहि अंत:करणांत माणुसकीचा झरा अखंड वहातो आहे. माणुसकीच्या ह्या झऱ्याचं दर्शन अमेरिकेंत अशाच अनेक बारीकसारीक प्रसंगांतूनहि मला घडलं. बिघॅम यांचे आभार कसे मानावेत हें मला समजेना. त्यांच्याजवळ तशा आशयाचे मीं कांहीं अुद्गार काढतांच ते म्हणाले, "त्याची कांहीं आवश्यकता नाहीं ! आपण माणसं अेकमेकांसाठीं यापेक्षां अधिक काय करूं शकतों ? फरगेट् अिट् ! चल. ती पॅट् तुझ्यासाठीं नाचायला थांबलीय्."

असं म्हणून त्यांनीं हात धरून मला त्यांच्या नाचगाण्याच्या जल्लोषांत ओढलं. शर्लेनं माझ्या डोक्यावर गवताची हॅट ठेवली, अन् टेबलावरचा ग्लास मला देऊन एलननं त्यांत बर्फाचे खडे टाकले.

मध्यरात्रीनंतर आम्ही प्रेसिडेंट हार्डिंजच्या 'पुलमन कार'मध्यें झोंपायला गेलों. सकाळीं अुठून बंगल्याच्या बाहेरच 'ब्रेकफास्ट' घेतला, आणि अकराच्या सुमाराला आम्ही त्या 'स्वप्नभूमी'चा निरोप घेअून बॅरिंग्टनला परत आलों.

संध्याकाळीं साडेपांच वाजल्यापासून रात्रीं अकरापर्यंत श्री. ली व्हान्स् (Lee Vance) यांच्याकडे मी डिनर-कॉक्टेल्-पार्टीला गेलों होतों. श्री. व्हान्स् हे शिकागोच्या धार्मिक वाङमय प्रसिद्ध करणाऱ्या 'Cook Company'चे अेक प्रकाशक होते. मी लेखक अन् ते प्रकाशक असल्यानं त्यांना साहजिकच माझ्याबद्दल अेक प्रकारची जवळीक वाटत होती. श्री. व सौ. व्हान्स् हीं दोघंहि नवराबायको कमालीचीं प्रेमळ अन् आतिथ्यशील होतीं. मला जेवायला बोलावण्याच्या आधीं सॅलीला फोन करून त्यांनीं माझ्या आवडीनिवडी विचारून घेतल्या होत्या, आणि त्याप्रमाणं खास माझ्यासाठीं कांहीं पदार्थ केले होते. अमेरिकन लोक जेवतांना सहसा कधीं आग्रह करीत नाहींत. प्रत्येकानं नि:संकोचपणं पोटभर जेवावं अशी त्यांची अपेक्षा असते. पण व्हान्स्-कुटुंबानं मात्र मला कमालीचा आग्रह करून खायलाप्यायला घातलं. श्री. व्हान्स् यांची पॅट्रिशिआ नांवाची कॉलेजांत जाणारी तरुण मुलगीहि ह्या आग्रहांत सामील झालेली होती. सुमारं अेकोणीस वर्षांची ही 'पॅटी' दिसायला सुंदर असून खूप बोलकी होती. नाचायचीहि फार चांगली. जेवणानंतर थोडा वेळ गप्पा झाल्यावर त्यांच्या हॉलमध्यें नाचाचा कार्यक्रम झाला. आतापर्यंत असे नाचण्याचे प्रसंग अनेकदां आलेले असल्यामुळं अेखाद्या वेळी माझ्या 'स्टेप्स्' चुकून बरोबर पडत! अशा वेळीं मी जणू काय "नृत्यविशारद' आहें अशा थाटांत अमेरिकन लोक माझं कौतुक करीत. हा अनुभव मला व्हान्स् यांच्या कुटुंबांतहि आला. ह्या क्षेत्रांत माझी खरोखरच खूप प्रगति व्हावी या भावनेनं मी बॅरिंग्टनला असेपर्यंत सवड सांपडतांच फोन करून नृत्यासाठी यावं असं पॅटीनं मला आग्रहाचं आमंत्रण दिलं. परंतु माझ्या ह्या कलेंतील प्रगतीचा भारतांतील माझ्या व्यवसायांत अुपयोग होण्याची शक्यता नसल्यानं पुन्हा पॅट्रिशिआकडे जायला मला शेवटपर्यंत सवड झाली नाहीं.

सौ. व्हान्स् ह्या चित्रकार होत्या. नृत्यानंतर त्यांनीं मला त्यांचा स्टुडिओ दाखवला. सगळीं चित्रं दाखवली. त्या चित्रांतलीं अनेक चित्रं 'Abstract style'चीं होतीं. मला अर्थातच तीं समजलीं नाहींत. आपल्याकडच्या अेखाद्या खऱ्या गोष्टींच्या मासिकाच्या मुखपृष्ठावर छापण्याअितकीं तीं चित्रं मला मौजेचीं वाटलीं. तरीसुद्धां तें कलाप्रदर्शन पहातांना 'How nice!...Wonderful!' वगैरे

शब्द वारंवार अुच्चारून अमेरिकन पद्धतीनं मीं बाईच्या ' अमूर्त ' कलाकौशल्याचं वारेमाप कौतुक केलं !

रात्रीं व्हान्स्-कुटुंबानं त्यांच्या गाडींतून मला फेअरवेदर यांच्या घरीं आणून सोडलं. दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. १० ऑगस्ट १९६४ ला श्री. जॅक हॉप्किन्स यांच्या कुटुंबांत मी रहायला जाणार होतों. परंतु अगदीं सकाळींच ओवेन विमानानं न्यूयॉर्कला व सॅली शिकागोला जाणार होती. त्यामुळं त्याच रात्रीं माझा निरोप घेण्यासाठीं दोघंहि माझी वाट पहात जागत बसलीं होतीं. दोघांनींहि मला मिठी मारून माझ्या गालाचं चुंबन घेअून अमेरिकन पद्धतीनं माझा निरोप घेतला. सॅलीचा निरोप घेअून जातांना मान वर अुचलून मीं तिच्याकडे पाहिलं. तिचे डोळे पाण्यानं भरून आले होते. माझ्या डोळ्यांनींहि मला दगा दिला होता ! सहसा कधीं भावनावश न होणाऱ्या अमेरिकनांच्या डोळ्यांत पाणी पाहून मला आश्चर्य वाटलं. अखेर चारआठ दिवसांच्या परस्परांच्या सहवासांत बारा हजार मैलांचं अंतर त्या खाऱ्या पाण्याच्या दोन थेंबांनीं वाहून गेलं होतं !

□

# पश्चिमेचे वाङ्मयीन वारे

अमेरिकेंतल्या वाङ्मयीन वाऱ्यांचा फारच थोडा स्पर्श मला झाला. अधिक व्हावा असा मीं जाणीवपूर्वक प्रयत्नच केला नाहीं. त्याला कारणं दोन होतीं; अेक म्हणजे आमच्या संस्थेनं अमेरिकेंतला आमचा हिंडण्या-फिरण्याचा कार्यक्रम अगदीं कांटेकोरपणं आंखलेला होता. त्यामुळं आपापल्या छंदाप्रमाणं वाटेल तिकडे भरकटत जाणं आम्हांला शक्य नव्हतं. अर्थात् आमच्या दौऱ्याचा शेवटचा आठवडा त्यांनीं पूर्णपणं आम्हांला आमच्यासाठीं मोकळा असा ठेवलेला होता. पण तो मीं माझ्या कॅनडाच्या दौऱ्यासाठीं राखून ठेवलेला होता. दुसरं कारण असं कीं, मासिकांच्या आणि पुस्तकांच्या साहाय्यानं अमेरिकेंतील वाङ्मयीन प्रवाह मी अिथं भारतांतसुद्धां केव्हांहि समजून घेअू शकलों असतों. पण तिथलं कुटुंबजीवन, समाजकारण, राजकारण आणि टेलिव्हिजन–चित्रपट–नृत्य–नाट्य अशांसारख्या माध्यमांतून प्रकट होणारं चैतन्यपूर्ण कलाजीवन मात्र तिथं प्रत्यक्षच अनुभवायला हवं होतं.

वाङ्मयाला जीवनांत महत्त्वाचं स्थान आहे ही गोष्ट खरी. पण वाङ्मया-खेरीज मानवी जीवनाचे कितीतरी अधिक विलोभनीय पैलू आहेत. कांठावर अुभं राहून बोटानं त्यांची चव चाखून पहाण्यापेक्षां खळखळत्या जीवनप्रवाहांत स्वत:ला पार झोंकून देअून जीवनानुभूतीनं भिजून चिंब होण्याचा आनंद मग कुणी लुटायचा ? नेमक्या ह्याच विचारानं स्वत:च्या मनाशीं मीं असं ठरवलं होतं कीं, अमेरिकेंतल्या

अेखाद्या लेखकाला भेटण्यासाठीं अुगीचच मुद्दाम जिवाचा आटापिटा करायचा नाहीं. अर्थात् सहजासहजीं कुणाची भेट झाली तर परस्परविचारविनिमयाची अशी संधी मात्र दवडायची नाहीं.

अेखाद्या अमेरिकन लेखकाची प्रत्यक्ष भेट होवो अथवा न होवो, फावल्या वेळांत तिथलीं निरनिराळीं वृत्तपत्रं, मासिकं वगैरे मी अगत्यानं पहात असे, आणि त्यांच्या द्वारें होणाऱ्या वाङ्मयाच्या ओझरत्या स्पर्शावर समाधान मानीत असें.

अमेरिकेंतलं कोणतंहि वृत्तपत्र दिवसभरांतहि संपूर्ण वाचणं ही खरोखरच अशक्य गोष्ट आहे. विशेषतः त्यांच्या रविवारच्या आवृत्ती पहाण्यासारख्या ( किंवा वजन करण्यासारख्या ) असतात ! आपल्याकडच्या मोठ्या वृत्त-पत्रांच्या आकाराचीं १००–२०० पानं सहज अेकेका रविवारच्या अंकांत असतात. 'शिकागो ट्रिब्यून' ( Chicago Tribune ) या प्रसिद्ध वर्तमानपत्राचा अेका रविवारचा अंक मी पाहिला. अक्षरशः १५० पानं होतीं ! किंमत मात्र अवघी २० सेंट्स्. म्हणजे अमेरिकन माणसाच्या दृष्टिकोनांतून फक्त २० नवे पैसे. बातम्यांखेरीज अनेक सदरं त्यांत होतीं. प्रत्येकानं आपापल्या आवडीचा मजकूर शोधून वाचावा. अन् अंक रद्दीत टाकावा. विकत घेतलेल्या वर्तमानपत्राला जिवा-पाड जपून घरीं आणण्याची पद्धत अमेरिकेंत फारशी कुठं मला आढळली नाहीं. अेवढं ओझं जवळ बाळगतो कोण ? हॉटेलांत, आगगाडींत, बसमधें जाणीवपूर्वक वर्तमानपत्राचा अंक 'विसरणारे' अमेरिकन लोक कितीतरी आढळतात. वर्त-मानपत्राचा लहानसा फाटका तुकडासुद्धां जपून ठेवून महिन्याच्या अखेरीच्या आर्थिक टंचाअीच्या काळांत अेक दिवस रद्दीचा गठ्ठा विकण्याचा चित्तचक्षुचमत्कारिक कार्यक्रम अर्थातच अमेरिकेंत होत नाहीं ! कारण रद्दीला तिकडे किंमत नाहीं.

मासिकांची किंवा अितर नियतकालिकांचीसुद्धां तीच अवस्था. प्रत्येक नियतकालिकाला पानं भरपूर. 'शेक्सपिअर क्वार्टर्ली' नांवाचं न्यूयॉर्कचं अेक नियतकालिक मीं पाहिलं. ३१५ पानं ! वार्षिक वर्गणी मात्र फक्त ८ डॉलर्स. न्यूयॉर्कचंच 'नेचर' ( 'Nature') नांवाचं अेक साप्ताहिक १५० पानांचं होतं. नुसती पानांची संख्याच जास्त असते असं नव्हे, तर प्रत्येक नियतकालिकांत समाविष्ट होणाऱ्या भिन्नभिन्न विषयांची संख्यासुद्धां तिकडे खूप असते. भरपूर अत्याधुनिक ज्ञान, विषयांचं वैविध्य आणि नावीन्य, अत्यंत आकर्षक अशी सजावट, अभिमाना-स्पद निर्दोष असं सुबक आणि कलात्मक मुद्रण, हीं अमेरिकन नियतकालिकांचीं खास वैशिष्टचं आपल्याला जवळजवळ प्रत्येक नियतकालिकांत दिसून येतात.

'सायन्स' नांवाचं अेक साप्ताहिक वॉशिंग्टनहून निघतं. त्याची वार्षिक वर्गणी परदेशांसाठीं १० डॉलर्स आहे. ह्या साप्ताहिकांत फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथेमेटिक्स, अॅस्ट्रॉनॉमी, सायकॉलॉजी, अँथ्रॉपॉलॉजी, अॅग्रिकल्चर, अेज्युकेशन,

अिंजिनियरिंग, अिंडस्ट्रियल सायन्स अित्यादि वीसपेक्षां अधिक निरनिराळ्या शास्त्रांवरचे लेख प्रसिद्ध होतात.

हल्लींचं युग हें ' स्पेशलायझेशन 'चं युग असल्यानं प्रत्येक शास्त्राला, प्रत्येक तांत्रिक विषयाला, प्रत्येक व्यवसायाला वाहिलेली अशीं मासिकं अमेरिकेंत असंख्य आहेत. अशा नियतकालिकांमध्यें ' टेक्निकल अेज्युकेशन न्यूज ' ( ' TEN ' ) ' सायकिकल रिसर्च 'ला वाहिलेलं ' टुमॉरो ' ( ' Tomorrow'), ' वर्ल्ड पॉलिटिक्स ', ' वर्ल्ड स्पोर्टस् ' ' जर्नल ऑफ मॅरेज अँड द फॅमिली ', गृहसजावटीला वाहिलेलं ' अिंटीरिअर्स ', ' जर्नल ऑफ अॅब्नॉर्मल अँड सोशल सायकॉलॉजी ', ' अिंप्रुव्हिंग कॉलिज अँड युनिव्हर्सिटी टीचिंग ', साहित्याला वाहिलेलीं ' द रिफ्लेक्टर ', ' ट्वेन्टिअेथ् सेंचरी लिटरेचर ', साहित्यांतसुद्धां खास काव्याला वाहिलेलीं ' अिपॉस ' ( ' EPOS ' ), ' पोअेट्री ' आणि ' द लिरिक ' अित्यादि नियतकालिकं मला खास वैशिष्टचपूर्ण वाटलीं. ' टाअिम ', ' लाअिफ ' वगैरे जगप्रसिद्ध नियतकालिकांचा मीं ह्यांत मुद्दामच अुल्लेख केलेला नाहीं. कारण भारतांत सर्वांना तीं खूपच परिचित आहेत.

' लिसन ' ( Listen ) ह्या नांवाचं अेक द्वैमासिक कॅलिफोर्नियाहून निघतं. तें पाहून मला आपल्या मोरारजीभाअी देसाअींची तीव्र आठवण झाली ! मोरारजीभाअींना तें मासिक पाहून जेवढा आनंद झाला असता, त्याच्या साडेतीन टक्के आनंद महाराष्ट्राचे मुख्य मंत्री वसंतराव नाअीक यांना झाला असता ! ' कारण त्याच्या पहिल्याच पानावर छापलेलं होत कीं, ' This journal is published in the interests of scientific education for the prevention of Alcoholism and narcotics addiction.'

परदेशांसाठीं ह्या द्वैमासिकाची वार्षिक वर्गणी फक्त पावणेतीन डॉलर्स आहे. त्याची अेक प्रत अिकडे येतांना आणावी आणि हळूच गुप्तपणं महाराष्ट्र-सरकारकडे पाठवावी, असा विचार मनांत आला. अिथली दारूबंदी अधिक ' यशस्वी ' करायला तेवढाच आपलाहि हातभार !

' रिक्रिअेशन ' ( ' Recreation ' ) नांवाच्या न्यूयॉर्कच्या अेका मासिकाचं जून १९६४ च्या अंकाचं कव्हर खूपच वैशिष्टचपूर्ण होतं. कव्हरच्या चित्रकल्पनेंतून संपादकांची सामाजिक जाणीव प्रकट होत होती. हल्लीं मोठमोठ्या शहरांची वाढ होत असतांना मुलांना खेळण्यासाठी कांहीं मैदानवजा जागा राखून ठेवण्याचा मोठ्या माणसांना कित्येकदां विसर पडतो. पण ज्यांचं बाल्य क्रीडेंतच जायचं त्यांना आपल्या हक्काच्या क्रीडांगणाचा कसा विसर पडणार ? १९६२ सालीं कॅलिफोर्नियांतला स्कॉट नांवाचा सात वर्षांचा अेक छोटासा मुलगा अेक दिवस त्याच्या नेहेमींच्या खेळण्याच्या मैदानावर गेला. आणि त्याला धक्काच बसला !

कारण तिथं मोठमोठ्या अिमारतींच्या बांधकामाला सुरुवात झालेली होती. आपल्या हक्कावर झालेलं हें 'अतिक्रमण' छोटया स्कॉटला सहन झालं नाहीं. त्यानं तावडतोब अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनाच ह्या प्रकारांत हस्तक्षेप करण्याची विनंती करणारं पत्र पाठवलं. "मी काय करणार? 'स्टेट अफेअर' आहे."– असं म्हणून राष्ट्राध्यक्षांना स्वस्थ बसतां आलं असतं. पण ते राष्ट्राध्यक्ष दुसऱ्या कोणत्या देशाचे नसून अमेरिकेचे होते! त्यांनीं स्कॉटबाळाला धीर देणारं पत्र तर पाठवलंच; पण त्या प्रकरणांत हस्तक्षेपहि केला. बालक स्कॉट याच्या आणि अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या झालेल्या पत्रव्यवहाराला सबंध अमेरिकेंतल्या वृत्तपत्रांनीं पहिल्या पानावर ठळक प्रसिद्धि दिली. अशा गुणी बाळाचं अेवढं गाजलेलं तें अितिहासप्रसिद्ध पत्र होतं तरी कसं? त्यासाठीं 'रिक्रिअेशन'च्या त्या अंकाचं तें कव्हर प्रत्यक्षच बघायला हवं. त्या कव्हरवर कॅलिफोर्नियाचं विमानांतून घेतलेलं छायाचित्र पार्श्वभूमीदाखल छापलेलं होतं. आणि त्या पार्श्वभूमीवर स्कॉटच्या हस्ताक्षरांतल्या मूळ पत्राचा ब्लॉक (त्यांतल्या मुळांतल्या चुका आहेत तशाच ठेवून) त्या फोटोवर पत्र चिकटवल्यासारखा छापला होता. स्कॉटचं पत्र असं होतं :—

'Dear Mr. President,

we Have no Place to go when we want to go out in the canyon. Because there ar going to Build houses So could you Set aside Some land where we could play? thank you four listening.

love,
Scott.

पूर्णपणं काव्याला वाहिलेलीं मासिकं कशीं चालू शकतात याचं मला नेहेमींच आश्चर्य वाटत आलेलं आहे. अमेरिकेंतलं शिकागोचं 'पोअेट्री' नांवाचं मासिक मीं पाहिलं तेव्हां मला असंच आश्चर्य वाटलं. आणि १९१२ सालीं तें सुरू झालेलं आहे हें वाचून तर धक्काच बसला. म्हणजे पन्नाशी अुलटून गेली तरी हें काव्याचं मासिक अजून चालू आहे! Harriet Monroe नं संस्थापित केलेल्या त्या 'पोअेट्री'चं मला फार कौतुक वाटलं! कारण आपल्याकडे अशा मासिकांच्या कपाळीं सटवाअीनं 'बालमृत्यु' लिहिलेला असतो! 'पोअेट्री'चे सध्याचे संपादक Henry Rago हे आहेत. मासिकाच्या मीं पाहिलेल्या अंकाच्या पहिल्या पानावरच Robert Creeley यांच्या कवितेचं दर्शन घडलं. 'The Book' या कथासंग्रहाचे नि 'The Island' या कादंबरीचे लेखक असलेले हे Robert Creeley न्यू मेक्सिको युनिव्हर्सिटींत प्रोफेसर होते. त्यांच्या 'The Woman' नांवाच्या

त्या काव्यांत त्यांनीं कायकाय भरकटलं होतं देव जाणे ! वहुधा तें तिकडलं ‘नवकाव्य’ असावं ! कवितेच्या सुरुवातीच्या कांहीं ओळी पहा :—

‘I have never
clearly given to you
the associations
you have for me, you
with such
divided presence my dream
does not show
you. I do not dream
I have compounded
these sensations, the
accumulations of the things
left me by you.
Always your
tits, not breasts, but
harsh sudden rises
of impatient flesh
on the chest — is it
mine — which flower
against the vagueness

of the air you move in ’—वगैरे वगैरे. अजून पुढं काव्य आहे ! पण पुढं लिहून घ्यायचा मलाच कंटाळा आला. शिवाय संपूर्ण कविता देण्यांत अेक धोका आहेच. अुद्यां हीच कविता अेक अुत्कृष्ट नवकाव्य म्हणून कुणातरी मराठी कवीच्या नांवावर मराठी मासिकांत छापून यायची ! रॉबर्ट क्रीलीसाहेबांना जोंपर्यंत मराठी वाचतां येत नाहीं तोंपर्यंत कांहीं धास्ती नाहीं. आणि मराठी वाचक तरी कशाला मुळांतली अिंग्रजी कविता वाचायला जाताहेत ?

रॉवर्ट क्रीली यांच्या दुसऱ्या नवकाव्याचा नमुना मात्र लहान असल्यानं संपूर्ण देतों. कवितेचं नांव– ‘Walls.’

‘Walls are
relief in lifting
themselves. Let
you also
lift yourself
selves, shelves.’

संपली कविता ! कमींत कमी शब्दांत जास्तींत जास्त आशय आणण्याचं महान् सामर्थ्य या काव्यात जाणवावं ! आपल्याकडच्या कांहीं कवींचा हाच प्रयत्न असावा. त्यांच्याहि काव्यांतील तिरकस आशय नि हळव्या प्रतिमा आपल्याला जाणवाव्या. अशा काव्यांतील अर्थाचा ओलावा संपादकांच्या मेंदूपर्यंत पाझरला नाहीं तरी चालावा. नाहींतरी हें सालं भंकस जीवनच निरर्थक आहे ! मग अशा स्थितींत काव्याला मात्र अर्थ असावा असा आग्रह धरणं हा वेडेपणा ठरावा !

व्हर्जिनिआंतून प्रसिद्ध होणारं ‘ The Lyric ’ या नांवाचं अेक त्रैमासिक असंच कवितांना वाहिलेलं होतं. Ruby Altizer Roberts आणि John Nixon (Jr.) हे त्याचे संपादक होते. आंतल्या पानावर अेक सूचना होती : ‘ No payment is made, but prizes are Offered ’ – अेवढं अर्धवट वाक्य वाचतांच मला अेकदम आठवलं कीं, अरेच्या ! आपल्याकडेहि अशींच ‘ अुच्च ’ दर्जाच्या साहित्याला वाहिलेलीं मासिकं ( अजून ) चालू आहेत. तीं मासिकं-सुद्धां आपल्या लेखक– कवींना मोबदला देण्याअैवजीं ( सरकारच्या खर्चानं ) अशींच बक्षिसं देतात ! मोबदल्याचा हट्ट त्यांच्याकडे कुणी धरीत नाहींच, पण बक्षिस मिळेपर्यंत अेखाद्याला धीर निघालाच नाहीं तर साडेतीन, सव्वाचार, पावणेसात वगैरे ज्याच्यात्याच्या पात्रतेनुसार तीं मोबदला देतात ! अेखाद्याला गमतीची, मौजेची वाटली तरी ही खरोखरच अेक सत्यकथा आहे, यांत कुणीं शंका बाळगूं नये. कार्य सिद्धीस नेण्यास श्रीसमर्थ असतातच. फक्त तत्पूर्वी भक्तिभावानं श्रींची आरती करावी लागते ! . . . हे सारे विचार मनांत अेका क्षणांत चमकून गेले, आणि मग पुढचं अुरलेलं वाक्य मीं वाचलं : ‘ an announcement of which is carried in each issue. Following our custom, winners of the annual awards will be chosen from the issues of the magazine from Spring 1964 to winter 1965, inclusive, and will be announced in the Spring, 1965 issue. ’

या योजनेनुसार देण्यांत येणारीं पहिलीं दोन बक्षिसं प्रत्येकीं १०० डॉलर्संचीं होतीं. शिवाय प्रत्येकीं ५० डॉलर्सची पांच नि प्रत्येकीं २५ डॉलर्सचीं दोन बक्षिसं होतींच. जगाच्या पाठीवर कुठं कां असेना, पण काव्यासारख्या जनदृष्टीनं फारशा अुपयोगी नसलेल्या वस्तूला अेवढी किंमत मिळते आहे हें पाहून मला फार बरं वाटलं.

मी वॅरिंग्टनला असतांना हॉपकिन्स पति–पत्नींनीं अेक पार्टी १४ ऑगस्ट १९६४ या दिवशीं दिली. त्या पार्टीला अमेरिकेंतल्या निरनिराळ्या क्षेत्रांतले सुमारं १५–१६ स्त्रीपुरुष अुपस्थित होते. त्यांतल्या Marvin Bradley या व्यंग-चित्रकाराशीं व Mrs. Denise Brookman या कादंबरीकार बाओशी माझी विशेष ओळख झाली. त्या दिवशी रात्री दोन वाजेपर्यंतसुद्धां आमच्या अनौपचारिक



वॅरिंग्टनमध्यें वास्तव्य करून असलेली
एक लेखिका : डेनिस ब्रुकमन

गप्पा संपल्या नाहींत. अजून वाङमयाबद्दल पुष्कळ गप्पा व्हायच्याच होत्या. म्हणून मग मिसेस् ब्रुकमननीं २० ऑगस्टला त्यांच्या घरीं मला चहाला बोलावलं. "काळजी करूं नकोस. मी अिथं हॉपकिन्सकडे येअून तुला माझ्या घरीं घेअून जाअीन," असं त्या म्हणाल्या. आणि खरोखरच २० तारखेला सकाळीं त्या मला त्यांच्या घरीं घेअून गेल्या.

मिसेस् डेनिस ब्रुकमनबाअींचं वय त्या वेळीं साधारणत: ४३–४४ होतं. १९५० सालीं वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांची पहिली लघुकथा 'Seventeen' नांवाच्या सुप्रसिद्ध नियतकालिकांत प्रसिद्ध झाली. त्यानंतर लघुकथांबरोबर त्यांच्या तीन कादंबऱ्याहि अेकापाठोपाठ अेक प्रसिद्ध झाल्या :— (१) 'Tender Time.' (२) 'Look of Love.' (३) 'Young In Love.' त्यांच्या या तीनहि कादंबऱ्या मी त्या वेळीं वाचलेल्या नव्हत्या. पण कादंबऱ्यांच्या नांवांवरून कांहीं तर्कच करायचा झाला तर तरुणतरुणींच्या मनांतल्या नाजुक भावभावनांचं विश्लेषण करणाऱ्या ह्या कादंबऱ्या असाव्यात, असं मला वाटलं. प्रत्यक्ष गप्पा मारतांना याबद्दल मीं विचारलं, तेव्हां माझा अंदाज खरा असल्याचं त्यांनीं सांगितलं. 'Seventeen' मधें प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या पहिल्या लघुकथेचं नांवहि ' 'The best time of your life' असं होतं !

आपला पति नि दोन मुलं यांच्यासह मिसेस् ब्रुकमन वॅरिंग्टनमधेंच, पण गांवापासून बऱ्याच दूर अंतरावर बंगला बांधून रहात होत्या. संपूर्ण लाकडाचं बांधकाम असलेला त्यांचा तो बंगला फार सुंदर होता. आसपास भरपूर दाट झाडी होती. आणि तिथला मंत्रभारला अेकान्त तर दृष्ट लागण्यासारखा होता. कुणाहि लेखकाला अगदी हवाहवासा वाटणारा होता. मला तो फार आवडला.

आम्हीं बंगल्यांत प्रवेश करतांच पांचदहा मिनिटांतच मिसेस् ब्रुकमननीं चहा-फराळाची सारी व्यवस्था केली. चहा झाल्यावर त्यांनी मला त्यांचा सारा बंगला दाखवला. नंतर बंगल्याच्या तळघरांत असलेल्या त्यांच्या लायब्ररीमधें आम्ही दोनतीन तास गप्पा मारीत बसलों.

अमेरिकन लेखकांच्या लोकप्रियतेबद्दलचे अंदाज आपण त्यांचं वाङ्मय अिथं वाचून आपापल्या आवडीनुसार ठरवूं शकतों. पण प्रत्यक्ष अमेरिकेंतल्याच अेका लेखिकेच्या दृष्टिकोनांतून त्या वेळीं कोणते लेखक लोकप्रिय होते तें समजून घेण्याची मला अुत्सुकता होती.

मिसेस् डेनिस ब्रुकमन यांच्या मतें त्या वेळचे सर्वांत लोकप्रिय अमेरिकन लेखक म्हणजे कादंबरीकारांपैकीं—

(i) John O' Hara.

(ii) James Gould Cozzens. ('Guard of Honour' या कादंबरीचा लेखक.)

(iii) John Cheever. ('The Wapshot Chronicle' कादंबरीचा लेखक.)

मिसेस् डेनिस ब्रुकमनच्या एका पुस्तकाचें हें मुखपृष्ठ.



(iv) William Saroyan. ('My Name is Aram'चा लेखक.)

(v) James Agee. ('A Death in the Family' या कादंबरीचा लेखक. )

(vi) Norman Mailer. ('The Naked and the Dead'चा लेखक. )

(vii) Irwin Shaw. ( ' The Young Lions 'चा लेखक. )

लघुकथाकारांपैकीं लोकप्रिय कथाकार आणि त्यांचे गाजलेले कथासंग्रह मिसेस् ब्रुकमननीं असे सांगितले :—

( i ) J. D. Salinger ('Franny in Zooey')
( ii ) William Faulkner ('Collected Stories.')
( iii ) Shirley Jackson ('The Lottery.')
( iv ) John Collier ('The Fancies and Good Nights')
( v ) Roald Dahl ('Some One Like You.')

त्याचप्रमाणें नाटककारांपैकीं सर्वांत लोकप्रिय नाटककार म्हणजे—

(i) Tennessee Williams. ( Cat on a Hot Tin Roof )

(ii) Arthur Miller. ('View from the Bridge' व ' The Death of a Salesman ' चा लेखक. )

(iii) Edward Albee ('The Zoo Story' आणि ' The American Dream ' या नाटकांचा लेखक. )

(iv) Frank Gilroy ('The Subject was Roses' चा लेखक. )

' ६४ सालीं आपल्याकडे वाङ्मयांतील श्लील-अश्लीलवाद नुकताच गाजून गेला होता. तेव्हां त्या संदर्भांत अमेरिकन वाङमयाबद्दल मिसेस् ब्रुकमन यांची प्रतिक्रिया मीं त्यांना विचारली. तेव्हां त्या म्हणाल्या, "वाङ्मय हें शिव आणि सुंदर असंच असावं, असं व्यक्तिशः मला वाटतं. जीवनांतील सत्याचा आविष्कार-सुद्धां या मूल्यांना अनुसरूनच असावा. पण आमचं अैकतं कोण ! दुसऱ्या महा-युद्धानंतर अमेरिकेचं समाजजीवन आणि कुटुंबजीवनच सारं ढवळून निघालंय्. युद्धाची प्रत्यक्ष झळ लागलेल्या युरोपियन देशांची परिस्थिति तर पूर्ण पालटून गेली आहे. साहजिकच लेखकांच्या अभिव्यक्तींत अेक प्रकारचा अुन्मत्त बेदरकारपणा आला. त्यामुळं अमेरिकेंतहि दुसऱ्या महायुद्धानंतर अश्लील किंवा अर्वाच्य लिखाणाची प्रवृत्ति वाढलेली दिसून येते."



मिसेस् ब्रुकमन यांच्या हिमस्नानांत बुडून गेलेल्या घराचें हें दर्शन

'Tobacco Road' चा लेखक Erskine Caldwell याचा मिसेस् डेनिस ब्रुकमननीं ह्या प्रवृत्तीचा 'Pioneer' म्हणून अुल्लेख केला. त्याच्या जोडीला त्यांनीं Norman Mailer, Tennessee Williams, J. D. Salinger, Shirley Jackson यांचींहि नांवं या संदर्भांत घेतलीं. मुक्त आणि निर्भय आविष्काराबद्दल हे लेखक विशेष प्रसिद्ध आहेत असं त्या म्हणाल्या. पण अगदी अलिकडे अर्वाच्य शब्दांच्या नि कल्पनांच्या आविष्कारासाठीं प्रसिद्ध असलेली अेक नवीन तरुण पिढीच अमेरिकेंत उदयाला येते आहे, अशी त्यांना भीति वाटत होती. आपल्या ह्या विचाराला पुष्टि देण्यासाठी जवळच्याच शेल्फमधून 'Stories for the sixties' हा नव्या लेखकांचा प्रातिनिधिक कथासंग्रह काढून त्यांनीं मला दाखवला. "हें एकच पुस्तक वाचलं तरी अमेरिकन वाङ्मयांतल्या ह्या नव्या प्रवृत्तीचं दर्शन घडेल." असं मिसेस् ब्रुकमन म्हणाल्या. त्यांनीं तें पुस्तक सप्रेम भेट म्हणूनच मला देऊन टाकलं. पण माझं नांव लिहून त्यावर पुढं सही करतांना त्यांनीं खालीं कंसांत लिहिलं, 'Comments are my father's, not necessarily mine!'

मीं सव्वातीनशे पानांचं तें पुस्तक सहज चाळलं, तर त्यावर पानोपान पेन्सिलीनं ठिकठिकाणीं डेनिसच्या वडिलांनीं 'कॉमेंट्स्' लिहून ठेवलेल्या होत्या. बहुतेक सर्वच अर्वाच्य शब्दांखालीं नि वाक्यांखालीं खुणा केलेल्या होत्या. अनुक्रमणिकेंत नि अितरत्र प्रत्येक कथेबद्दलचे प्रामाणिक शेरे मारलेले दिसत होते. 'Pointless, Illogical, Foul language, Tedious, Waste of words' असे शेरे जागोजाग मारून डेनिसच्या वडिलांनीं अुद्वेगानं शेवटीं लिहिलं होतं, 'God help

American literature if these specimens are to be accepted as forecasting its character.'

डेनिसच्या वडिलांचं हें प्रामाणिक मत वाचून मी हंसलों. ज्या नव-वाङ्मयाचं आमच्याकडे केविलवाणं अंधानुकरण केलं जातं त्या वाङ्मयाबद्दल खुद्द अमेरिकेंत अशी प्रतिक्रिया आहे! त्या पुस्तकांत खऱ्या अर्थानं दर्जेदार अशा अेकाहि लेखकाची कथा नव्हती. Samuel Reifler, George Cumo, Albert Waller, Len Carter, Alan Brody वगैरे नांवांच्या नवोदित लेखकांच्या कथा त्यांत होत्या.

" मासिकांपैकीं 'Playboy' हें मासिक अशा प्रवृत्तींना खतपाणी घालतं."- मिसेस् ब्रुकमन पुढं म्हणाल्या, " अर्थात् ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, ह्या सगळ्या लिखाणाला इकडे प्रतिष्ठा आहे. लेखक त्यांना हवं तें लिहितात. पण अशा लिखाणाला समाजांत प्रतिष्ठा नाहीं."

" मग तुमच्याकडे अशा लिखाणाचा बंदोबस्त कसा करतात ?" मीं विचारलं, " अशा लेखकांवर खटले भरून पुस्तकांवर बंदी घालतात ?"

" अमेरिकेंत हा प्रश्न फार कठिण होअून बसलाय्. कारण अिकडे व्यक्ति-स्वातंत्र्याची कल्पना पराकोटीला पोंचलीय्. आतां 'व्यक्तिस्वातंत्र्य' म्हटलं की बोलण्याचं, लिहिण्याचं आणि मोकळेपणानं विचार करण्याचं स्वातंत्र्य आलंच. अर्थात् अनिष्ट वाङ्मयावर बंदी घालण्याचं स्वातंत्र्यहि प्रत्येक शहराच्या मेयरला असतं. मॅसाच्युसेट्स् राज्यांतल्या बॉस्टन शहराच्या मेयरनीं James Branch Cabell ह्या लेखकाच्या 'Jurgen' नांवाच्या कादंबरीला बॉस्टनमध्यें बंदी घातली असल्याची घटना नुकतीच घडली आहे."

" मग लेखकांच्या हक्कांचं काय ? ते ओरड करीत नाहींत का ?"

" करतात तर! बंदी अुठवावी म्हणून कोर्टात झगडतातसुद्धां. पण एकेकट्या लेखकाला अशी 'केस्' लढवणं खर्चाच्या दृष्टीनं परवडण्यासारखं नसतं. अिकडे अमेरिकेंत लेखकांची अेक मोठी प्रसिद्ध संघटना आहे. 'Authors' League of America' हें तिचं नांव ! सगळे लेखक ह्या संघटनेला फार मानतात. लेखकांच्या रॉयल्टीसंबंधीं किंवा पुस्तकाला बंदी घालण्यासंबंधी कांहीहि प्रश्न उद्भवल्यास ही संस्था लेखकांना कायद्याची नि अितर प्रकारची मदत सर्वतोपरी करते. अमेरिकेंतले प्रसिद्ध वकील अगदीं नाममात्र फी लेखकाकडून घेतात आणि ह्या संस्थेसाठीं लेखकांच्या बाजूनं खटले लढवतात. न्यूयॉर्कची 'The Authors' Guild' ही साहित्यिकांची संस्था 'ऑथर्स लीग'चीच शाखा म्हणून काम करते. श्रीमती पर्ल बक, जॉन गंथर, जॉन स्टाअिनबेक यांच्यासारखे जगप्रसिद्ध असे वीस लेखक ह्या संस्थेच्या 'मेंबरशिप कमिटी'मध्यें आहेत."

ब्रुकमनवाईशीं गप्पा मारण्यांत बराच वेळ गेला होता. शेवटी जातां-जातां लेखकांना अमेरिकेंत मिळणाऱ्या मानधनाची मीं चौकशी केली. त्यावर मिसेस् ब्रुकमन म्हणाल्या, "प्रत्येक लेखकाच्या प्रसिद्धीवर आणि त्याच्या पुस्तकाच्या खपावर त्याला मिळणारा मोबदला अवलंबून असतो. तरी पण सामान्यतः एका कथेला ८५० पासून १५०० डॉलर्सपर्यंतसुद्धां मोबदला मिळू शकतो. १५ टक्के रॉयल्टी लेखकाला त्याच्या पुस्तकाबद्दल देण्याची अिकडे पद्धत आहे. पण प्रसिद्धीसाठीं प्रकाशकानं पुस्तक स्वीकारतांच लेखकाला कमींत कमी ५०० डॉलर्स प्रकाशन-पूर्व रॉयल्टी म्हणून दिली जाते. वर्षाच्या अखेरीला लेखकाला देण्यांत येणाऱ्या रॉयल्टीच्या रकमेंतून ही रक्कम अर्थातच पुढं वजा केली जाते."

"एक वैयक्तिक प्रश्न विचारूं का?" मीं म्हटलं, "तुमच्या तीन कादंबऱ्यांनीं आतांपर्यंत तुम्हांला किती पैसे मिळवून दिले?"

"मी कांहीं फार मोठी लेखिका नाही. पण आतांपर्यंत माझ्या तीन पुस्तकांनीं मला अेकूण १०००० डॉलर्स मिळवून दिलेयत. अजूनहि जसजशी विक्री होअील तसतसे पैसे येत असतातच."

मुद्दाम भेटीचा प्रयत्न करायचा नाहीं असं ठरवूनसुद्धां वॅरिंग्टनसारख्या लहानशा गांवांत अखेर अेक अमेरिकन लेखिका मला भेटलीच होती! मिसेस् डेनिस ब्रुकमन याच्याशीं बराच वेळ गप्पा मारल्यानंतर त्यांचा निरोप घेतांना त्यांनीं मला 'The Look of Love' ही त्यांची स्वतःची कादंबरी सप्रेम भेट म्हणून दिली. Shirley Jackson या लेखिकेची 'Hangsaman' नांवाची कादंबरीहि त्यांनीं भेट दिली. 'Stories for the sixties' हें पुस्तक आधींच दिलेलं होतं. परतभेटीदाखल मींहि माझी अेक कादंबरी आणि 'Facts about India' अशी दोन पुस्तकं त्यांना दिलीं.

अमेरिकेंतला पुस्तकप्रकाशनाचा व्यवसाय फार मोठ्या प्रमाणांत चालतो. '६४ सालचे कांहीं आंकडे सांगतों. अमेरिकेंत दर वर्षी १५००० पुस्तकं प्रसिद्ध होतात. सामान्यतः 'पेपरबॅक बुक्स'च्यासारखी स्वस्त पुस्तकं दररोज १० लाख विकली जातात. सबंध वर्षांत क्रमिक पुस्तकं धरून अेकूण ९५०,०००,००० पुस्तकांच्या प्रती विकल्या जातात. पुस्तकांच्या अेवढ्या प्रचंड खपाचीं दोन कारणं आहेत. अेक म्हणजे अमेरिकेंत अक्षरशः हजारों ग्रंथालयं आहेत. '६४ साली अमेरिकेंत १२८०० ग्रंथालयं होती. त्यांपैकीं १०००० सार्वजनिक मोफत ग्रंथालयं होतीं. अमेरिकेंत युनिव्हर्सिटीज्च्या अेकूण १४०० लायब्ररीज् आहेत. हार्वर्ड युनिव्हर्सिटीची लायब्ररी ही त्यांतली सर्वांत मोठी लायब्ररी आहे. ग्रंथालय-चळवळीच्या अेवढ्या मोठ्या विकासाचा परिणाम पुस्तकांच्या विक्रीवर होणारच. दुसरं कारण म्हणजे सबंध राष्ट्रांत ग्रंथालयांचं अेवढं जाळं पसरलेलं असूनहि जवळ-

जवळ प्रत्येकाच्या घरीं त्याची स्वत:ची अशी खासगी लायब्ररी मला आढळली. पुस्तकं विकत घेऊन वाचण्याची अेकंदर प्रवृत्तीच तिथं जास्त आहे. आर्थिक संपन्नता हें अेक कारण असलं तरी अमेरिकन लोकांच्या अेकंदर मनोवृत्तीलाच कांहीं श्रेय द्यायला हवं !

अमेरिकन साहित्य नुसतं संख्येनंच विपुल नाहीं, तर गुणांनींसुद्धां तें समृद्ध आहे, ह्याची साक्ष सिंक्लेअर लुअिस, युजिन ओ'नील, पर्ल बक, विल्यम फॉकनेर आणि अर्नेस्ट हेमिंग्वे ह्या पांच 'नोबेल प्राअिझ'– विजेत्यांनीं दिलेलीच आहे.

अशी फार थोर परंपरा असलेल्या अमेरिकन वाङ्मयाची अेक छोटी प्रतिनिधि मला भेटली होती. मिसेस् डेनिस ब्रुकमन यांचा निरोप घेऊन त्यांच्याच गाडींतून मी बाहेर पडलों, तेव्हां त्यांनीं त्यांची कादंबरी मला भेट देतांना त्यावर लिहिलेले शब्द माझ्या मनांत रेंगाळत होते :—

'......May our common interests which make us more alike than different promote a firm friendship.

— Denise Cass Brookman.
August 20, 1964.

अखेर वाङ्मयप्रेमाच्या अेकाच धाग्यानं तर जगांतले सारे साहित्यिक बांधलेले असतात !

□

# अमेरिकेंतले बालमित्र

वॉरिंग्टनला असतांना अेक दिवस श्री. गिल्बर्ट यांच्या गाडींतून मी शिकागोला चाललों होतों; अेक मोठा कारखाना पाहण्यासाठीं! आमच्याबरोबर श्री. गिल्बर्ट यांची तीन मुलंहि होतीं. सर्वांत मोठ्या मुलाचं नांव होतं केन आणि त्याचं वय होतं तेरा. ज्युनियर हायस्कूलमधें आठव्या अियत्तेंत तो शिकत होता. त्याची धाकटी बहीण होती आठ वर्षांची आणि तिचं नांव होतं हॉली! तिच्याहून धाकट्या भावाचं नांव होतं पीटर आणि त्याचं वय असेल चार किंवा पांच. तिकडच्या मुलांच्या शाळांविषयीं, खेळांविषयीं मी त्यांच्याशीं गप्पा मारीत होतों.

जातांना वाटेंत आम्हांला अेक स्मशान दिसलं, त्याबरोबर हॉलीनं 'ब्लर्प' (blurp) म्हटलं आणि नाकावर हात ठेवून श्वास रोखून धरला. स्मशान-भूमीची हद्द संपल्यावर तिनं श्वास सोडला. मला मोठी गंमत वाटली. "तिनं असं कां केलं?" म्हणून मीं केनला विचारल्यावर तो म्हणाला, "अमेरिकेंत लहान मुलांची ही एक गमतीची समजूत आहे. कुठल्याहि स्मशानाच्या जवळून मोटारगाडी जायला लागली की गाडींतलीं लहान मुलं 'ब्लर्प' म्हणतात अन् श्वास रोखून धरतात. आपल्या श्वासाच्या वाऱ्यानं स्मशानांत 'झोपलेल्या' माणसांना जाग येऊं नये म्हणून तीं असं करतात."

अशाच तऱ्हेच्या लहान मुलांच्या आणखी कांही समजुती असल्या तर त्यांची माहिती करून घ्यावी म्हणून केनशीं मी मुद्दाम त्याच विषयावर बोलायला लागलों.

गप्पा मारतांमारतां केननं आणि हॉलीनंहि मला अशाच कांही गमती सांगितल्या. एखादी गोप्ट सांगायला केन विसरला तर मधेंच बोलून हॉली त्याला आठवण करून द्यायची. धाकटा पीटर मात्र फार लाजरा होता. मीं त्याला कांही विचारलं की दोन हातांनीं त्याचा चेहरा झाकून तो खालीं मान घालायचा.

त्याचा लाजरेपणा पाहून केन मला म्हणाला, "तो असाच लाजरा आहे आणि अगदी भित्रा आहे. पावसाळ्यांत आकाशांत ढगांचा गडगडाट अन् विजांचा कडकडाट होऊन वादळ सुरू झालं की तो खूप घाबरतो. तोच कशाला? साधारणत: तीन ते सहा वयाचीं बहुतेक सगळीं मुलं अशींच घाबरतात. अन् त्यांची समजूत घालण्यासाठीं मग डॅड अन् मॉम त्यांना सांगतात, की आकाशांतले राक्षस आतां लढाओ खेळताहेत आणि आरडाओरडा करीत अेकमेकांच्या अंगावर विजा फेकताहेत."

अमेरिकन लोक सुटीमधे खूप दूरदूरचा प्रवास करतात आणि बहुधा हा सगळा प्रवास ते स्वत:च्या मोटारनंच करतात. डोंगराळ प्रदेशांतून प्रवास करतांना त्यांना बोगद्यांतून जावं लागतं. असा अेखादा मोठा बोगदा जवळ आला म्हणजे, तीन ते पांचसहा वर्षांची मुलं असतात त्यांना खूप गंमत वाटते. बोगद्यांतला अंधार म्हणजे जणू काय रात्र आहे असं ती मानतात आणि बोगदा जवळ आला कीं आता रात्र होणार असं मानून झोंपायला जायची तीं तयारी करतात. घाईघाईनं तीं नाअिट-ड्रेस घालतात, खोटेखोटे दात घासतात आणि डोळे मिटून प्रार्थनासुद्धां करतात. बोगद्यांत गाडी शिरण्यापूर्वी हें सगळं आटोपलं पाहिजे म्हणून त्यांची घाओ चाललेली असते. गाडी बोगद्यांत शिरली कीं तीं मुलं खोटींखोटी झोंपीं जातात आणि बोगद्यांतून गाडी बाहेर आली कीं आता सकाळ झाली असं मानतात.

शाळेंत जाणाऱ्या पांच ते दहा वर्षांच्या मुलांची– विशेषत: लहान मुलींची अशी अेक समजूत असते, की रस्त्यानं चालतांना फूटपाथवरच्या अेखाद्या भेगेवर पाय पडला तर आपल्या आईची पाठ मोडते. म्हणून असा चुकून पाय पडला की कांहीं कांही लहान मुली सरळ घराकडे वळतात. ज्यांना शाळा चुकवावीशी वाटते अशा मुलींना ही अेक छान सबब सापडते.

ज्या वयांत लहान मुलांचे पहिले दांत पडतात त्या वयांतल्या मुलांची अशीच एक गमतीदार समजूत असते. दात पडला कीं ती मुलं रात्रीं झोंपतांना तो अुशीखालीं ठेवून देतात. रात्रीं अेक छानदार परी तिथं येते अन् तो दांत घेअून जाऊन त्याच्या बदली कांहीं पैसे अुशीखालीं ठेवते असं त्यांना वाटतं. साधारणत: दहा सेंट तें पंचवीस सेंट अेवढे पैसे त्यांना दुसऱ्या दिवशीं सकाळी अुशीखालीं सापडतात. खरं म्हणजे त्या मुलांचे आईवडीलच तिथं ते पैसे ठेवीत असतात !

– मोटारींतून जात असतांना आपल्या पुढं जाणाऱ्या मोटारच्या लायसन्स-



बॅरिंग्टनच्या ' स्विमिंग पूल ' वर जलक्रीडेंत रमलेले दोन बालमित्र

प्लेटच्या रंगावरून ती मोटार कोणत्या राज्यांतली आहे तें ओळखण्याचा खेळ सात-आठ वर्षांचीं मुलं नेहमीं खेळतात. त्याचप्रमाणं समोरच्या मोटारच्या नंबरमधील आकड्यांची बेरीज झट्कन् सांगणं हा खेळसुद्धा आठदहा वर्षांची मुलं खेळतात.

— ऑक्टोबर महिन्यांत येणारी ' हालोविन 'ची सुट्टी तीन ते चौदा वर्षांच्या मुलांना फार आवडते. या दिवसांत मुलं चित्रविचित्र, कांहींतरी चमत्कारिक असे कपडे घालतात आणि निरनिराळी सोंगं सजवतात. अंतराळ-प्रवासी, मंगळा-वरचा माणूस, राक्षस, चेटकीण, विदूषक, फ्रॅकेन्स्टीन असले काय वाटेल ते पोषाख ते करतात आणि असले पोषाख घालून, मुखवटे चढवून ती मुलं घरोघर फिरून खाऊ मागतात किंवा ' युनिसेफ 'सारख्या मुलांना मदत करणाऱ्या जागतिक संस्थां-साठीं मदत मागतात. दारावरची घंटा वाजल्यावर दार उघडायला जो माणूस येईल त्याला ते विचारतात, " ट्रिक ऑर ट्रीट ? " ज्यांना वेळ असतो अशीं कांहीं माणसं त्यांना मदत देण्यापूर्वी कांहींतरी गंमत करून दाखवायला सांगतात. मग कांहीं मुलं गाणं म्हणून दाखवतात, नाचून दाखवतात आणि असं कांहीं ज्यांना येत नाही तीं मुलं डोक्यावर उभं राहून दाखवतात किंवा कोलांटी उडी मारून दाखवतात. ज्या मुलांना यांपैकीं कांहींच करतां येत नाही त्यांनासुद्धा प्रत्येकाला खाऊ मिळतो हा भाग वेगळा ! आपल्याकडे होळीसाठीं लांकडं मागायला आलेल्या मुलांना कांहीतरी देऊन आपण वाटेला लावतों तसंच अमेरिकेंतहि घडतं.

— आपल्या भारतांतली मुलं जशीं ' देवाची शपथ ' घेतात तशींच अमेरिकेंतली मुलंहि शपथ घेतात— पण ती शपथ असते त्यांच्या पवित्र धर्मग्रंथाची— बायबलची ! जो मुलगा गंभीरपणें शपथ घेतो तो छातीवर ' क्रॉस 'ची खूण हातांनीं करून म्हणतो,



लेखकाला निरोप देण्यासाठीं बस-स्टॉपवर जमा झालेला शिस्तबद्ध अमेरिकन बालचमू.

" Cross my heart and hope to die !" नतर पुढं बायबलच्या अनेक पुस्तकांच्या ढिगाची अुंची दोन हातांनी दाखवून तो म्हणतो, " "Stick a needle in my eye, plus a stack of Bibles this high !" – याप्रमाणं अेकापेक्षां अनेक बायबल्सची शपथ घेअून ती मोडल्यास आपली काय अवस्था होअील हें तो सांगतो. अर्थात् आपल्याकडची लहान मुलं अेकमेकांना कांही गुप्त गोष्टी सांगण्यासाठीं दिवसांतून दहादा शपथा घेतात अन् त्या मोडतात तसाच प्रकार अमेरिकेंतली मुलसुद्धा करतातच.

नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशीं आपण ज्या गोष्टी करूं त्याच गोष्टी आपल्याला वर्षभर कराव्या लागतात, अशी अमेरिकेंतल्या मुलांची अेक कल्पना असते. त्या दिवशी रस्त्यांत एखादा पैसा सांपडला तर वर्षभर आपल्याला खूप पैसा मिळणार असं ती मानतात. शकुन-अपशकुनांच्या कल्पनांवर तिकडच्या लहान मुलांचा बराच विश्वास असतो. रस्त्यांत घोड्याचा नाल सांपडणं हा अेक फार चांगला शकुन आहे असं ती मानतात. असा रस्त्यांत सापडलेला नाल कांही जुन्या घरांच्या दारांवर किंवा अुंबरठा असल्यास अुंबरठ्यावर ठोकलेला आढळतो 'ससाचा पाय' सांपडणं हासुद्धां एक शुभशकुन मानला जातो.

आपल्या हातून आरसा फुटला तर त्यानंतरचीं सात वर्षं आपल्याला फार वाईट जाणार असं तीं मानतात. ( असं कांही ऐकलं म्हणजे आपल्याकडच्या ‘साडेसाती’ची आठवण होते ! ) पण तो आरसा आपण नावडतोब दुरुस्त करूं शकलों तर मात्र तो सात वर्षांचा शाप आपल्याला बाधणार नाहीं अशी त्यांची कल्पना असते. ‘रस्त्यांतून काळं मांजर आडवं जाणं’ हें आपल्याप्रमाणंच अमेरिकेंतहि अशुभ समजलं जातं. ‘मीठ सांडणं’ ही गोष्टमुद्धां अशुभ मानली जाते. असं कुणाच्या हातून मीठ सांडलंच तर लगेच त्यांतलं चिमूटभर मीठ त्या माणसानं आपल्या डाव्या खांद्यावरून मागं फेकलं म्हणजे त्या अपशकुनाचा कांहीं वाईट परिणाम होत नाहीं असं तीं मानतात.

तीन अमेरिकन कुटुंबांत महिनाभर राहण्याची संधि मला मिळाल्यानं अमेरिकेंतल्या लहान मुलांची वागणूक मला पुष्कळच जवळून बघायला मिळाली. समाजांत अगर सार्वजनिक ठिकाणीं कसं वागावं याची शिकवणूक त्या मुलांना लहानपणापासूनच देण्यांत आलेली असते. सार्वजनिक शांतता आणि सार्वजनिक स्वच्छता या दोन्ही गोष्टींचं महत्त्व त्यांना लहानपणींच शिकवलेलं असतं. त्यामुळंच तीं मुलं कधीं सार्वजनिक ठिकाणीं आरडाओरडा, दंगा करीत नाहींत. विशेषत: चर्चमधल्या वातावरणाचं गांभीर्य आणि पावित्र्य अगदीं लहान मुलंसुद्धां सांभाळूं शकतात याचं कौतुक वाटतं. आईवडील घरांत नसतांना कुणी घरांत आलं तर त्याच्याशीं कसं वागावं, कसं बोलावं, याचं पद्धतशीर शिक्षण तिकडच्या मुलांना दिलेलं आढळतं.

५१८३
५४१

# अनामिक बंध

वॅरिंग्टनचा मुक्काम संपत आला तशी मनाला हुरहुर लागली. अजून दहाबारा दिवस बाकी होते. पण आतांपर्यंतच्या सोनेरी पंखांच्या दिवसांप्रमाणं तेसुद्धां असेच भुर्रकन् अुडून जाणार होते. वॅरिंग्टनच्या आतांपर्यंतच्या मुक्कामांत आम्ही पक्के वॅरिंग्टनवासी बनलों होतों. अनेक ठिकाणी पार्टीला गेल्यामुळं आमच्या ओळखीहि खूपच वाढल्या होत्या. आमच्या सर्वांच्या 'होस्ट फॅमिलीज्' आतां परस्परांच्या चांगल्याच परिचयाच्या झाल्या होत्या. वॅरिंग्टनसारख्या लहानशा गांवांत त्या वेळीं परदेशी पाहुणे फक्त आम्हीच होतों. वृत्तपत्रांनीं आम्हांला प्रसिद्धीहि चांगली दिली होती. त्यामुळं गांवांत कुठंहि फिरतांना रस्त्यावरचे अज्ञात वाटसरूसुद्धां आम्हांला ओळखायला लागले होते. वॅरिंग्टनचा दैनंदिन जीवनक्रमहि आतां आमच्या चांगलाच अंगवळणीं पडलेला होता. एखाद्या वेळीं आमच्या कुटुंबांतल्या अमेरिकन गृहिणीला कांहीं काम असलं तर ती दुसऱ्या कुटुंबाला फोन करायची, आणि मग त्या कुटुंबांतलं कुणीतरी गाडी घेऊन यायचं नि आम्हांला बाहेर घेऊन जायचं. वॅरिंग्टनमधल्या भिन्नभिन्न कुटुंबांमधला आपपरभाव आतां आमच्यापुरता तरी पूर्णपणं नाहीसा झालेला होता. आमच्या वास्तव्यामुळं आमच्या 'होस्ट फॅमिलीज्'हि आता अेकमेकांच्या अधिक जवळ आल्या होत्या. पुढं अेकदा बोलतांबोलतां लोअेस मला म्हणालीसुद्धां की, "तुझ्या निमित्तानं वॅरिंग्टनमधल्या अितर कुटुंबांशीं आमची अधिक मैत्री झाली आहे!

अेरव्हीं आमची घरं परस्परांपासून अितकीं लांब आहेत कीं, महिन्यांतून दोन वेळां-सुद्धा आमची कधी गांठभेट व्हायची नाहीं ! कधीं ' पार्टी ' किंवा ' पिकनिक् 'च्या निमित्तानं आम्ही अेकत्र येणार ! पण हल्लीं जवळजवळ रोज आम्ही अेकमेकांना भेटतो.'

दहा तारखेला सकाळीं नअू वाजतांच आम्ही शिकागोला गेलों. त्या दिवशीं तिथली ' द आर्ट अिन्स्टिटयूट ऑफ् शिकागो ' ही प्रसिद्ध कलासंस्था पहाणं हा प्रधान हेतु होता. शिकागो शहराच्या सांस्कृतिक आणि कलाक्षेत्रांतील प्रगतीचा महत्त्वाचा वांटा या संस्थेनं १८६६ सालापासून अुचललेला होता. अमेरिकेंतल्या पहिल्या दर्जाच्या कलासंस्थांत तिचा अंतर्भाव होत होता. जगांतील मोठमोठ्या कलावंतांच्या कलेचे दुर्मिळ नमुने ह्या संस्थेनं संग्रहांत ठेवलेले होते. युरोपिअन पेंटिंग व शिल्पकला, अमेरिकन पेंटिंग व शिल्पकला, अतिपूर्वेकडील कलाकृती, प्राचीन काळांतील कलाकृती, आधुनिक काळांतील छायाचित्रकला अित्यादि प्रकारच्या कलाकृतींचे शेकडों नमुने ह्या ' आर्ट अिन्स्टिटयूट 'मधें जतन करून ठवलेले होते. ' आर्ट अिन्स्टिटयूट 'ची अिमारत तीनच मजली होती तरी कमालीची भव्य होती. अिमारतींतला प्रत्येक हॉल खूपच लांबरुंद असा होता. सर्वत्र



एकोणिसाव्या शतकांतला ' इंप्रेशनिस्ट ' पंथांतला चित्रकार रेनॉय् याचें एक चित्र : ' ऑन द टेरेस '

स्वच्छता तर अितकी होती कीं, ' अिन्स्टिटयूट 'च्या गुळगुळीत–चकचकीत फरशीलाच आपल्या बुटांची धूळ लागून ती मळणार तर नाहीं ना, असा विचार मनांत यायचा.

ह्या कलासंस्थेंत अेक ' म्युझिअम ' होतं, ललित व औद्योगिक कलाचं व्यावसायिक दृष्टिकोनांतून शिक्षण देणारं केंद्र होतं, आणि ' गुडमन थिअेटर ' होतं. वर्षभर नाटय व अितर कलाच्या क्षेत्रांत संस्थेच्या विद्यमानं अखंड कार्यक्रम होत असत. संस्थेच्या ' डिपार्टमेंट ऑफ् म्युझिअम अेज्युकेशन 'ला फोन अगर पत्र पाठवलं की शाळा–कॉलेजांतील विद्यार्थ्यांना किंवा गटागटानं येणाऱ्या कुणालाहि संस्थेचे मार्गदर्शक संपूर्ण संस्था दाखवीत व कांही शैक्षणिक चित्रपटहि दाखवीत. आणि हें सर्व पूर्णपणं मोफत केलं जात असे हें विशेष ! थोडक्यांत म्हणजे लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्या अभिरुचीची जोपासना करण्याचं कार्य करणारी ही संस्था म्हणजे शिकागोचं अेक महत्त्वाचं सांस्कृतिक केंद्रच होतं. संस्थेच्या या सांस्कृतिक कार्याला हातभार लावूं अिच्छिणाऱ्या सभासदांसाठीं वार्षिक वर्गणी फक्त साडेबारा डॉलर्स होती. आजीव सभासदत्वाची वर्गणी दोनशें डॉलर्स होती.

ह्या कलासंस्थेंतले ' चित्रकला ' व ' शिल्पकला ' हे दोन्ही विभागहि खूप भव्य आणि संपन्न होते. चित्रकला– विभागांत रुबेन्स, व्हान डाक्, रेम्ब्रां, यांसारख्या सोळाव्या–सतराव्या शतकांतल्या चित्रकारांचीं चित्रं होतीं, तसंच अेकोणिसाव्या शतकांतल्या रेनॉय्, मॉनेत् यांसारख्या ' अिंप्रेशनिस्ट ' पंथांतल्या चित्रकारांनाहि मानाचं स्थान होतं. विसाव्या शतकांतल्या पिकासो व हेन्री मूर यांच्यासारख्या जगप्रसिद्ध चित्रकारांचीं चित्रंहि अर्थात् होतीच. हा सगळा अफाट चित्रसंग्रह पहात मी ह्या दालनांतून त्या दालनांत फिरत होतों, त्या वेळीं देशोदेशीचे किती तरी तरुण नवोदित अभ्यासू चित्रकार अेकेका चित्रासमोर जागा सांपडेल तिथं बसून किंवा अुभं राहून त्या चित्रांच्या नकला करण्यांत मग्न झालेले मला दिसले. असंख्य लोक त्यांच्या जवळून येत होते, जात होते. पण त्यांच्या कलासमाधीचा भंग मात्र होत नव्हता.

अेकामागून अेक जगप्रसिद्ध चित्रकारांच्या महान् कलाकृती पहात मी चाललों होतों. त्या वेळी मनात विचार आला ' थोडक्यांत हुकलं ! नाहीतर माझं-मुद्धां अेखादं चित्र ह्या थोर कलाकृतीच्या शेजारी लागलेलं मला आज दिसलं असतं ! ' . कारण अेके काळी जगांतला महान् चित्रकार होण्याचं माझं ध्येय होत ! आणि त्यासाठी शाळेचा अभ्यास बंद करून रात्रंदिवस चित्रं काढायला मी सुरुवातहि केली होती. शाळेतल्या नावडत्या शिक्षकांच्या तासाला, त्यांचीच चित्रं काढून मी जवळपासच्या विद्यार्थी-मित्रांचं मनोरंजन करीत असें. पण माझी ही कलासाधना माझ्या वडिलांना तितकीशी पसंत पडली नाहीं. आपल्या भारतांत केवळ कलेवर जगण्याचा हट्ट धरणाऱ्या सर्वसामान्य कलावंताच्या दोन जेवणांच्या



**हें तें चित्र ! —' East River'. केलीसाहेब, जरा 'रिव्हर' कुठं बघायची तें कळेल का ?**

मधें बऱ्याच वेळां जरुरीपेक्षां जास्त अंतर पडतं, हें त्यांनीं मोठ्या कष्टानं मला समजावून दिलं. म्हणजे समजावलं त्यांनीं, पण त्याचे कष्ट झाले मला ! परिणामीं जगांतल्या अेका महान् चित्रकाराचा अुदय होण्यापूर्वीच अस्त झाला !

'आर्ट अिन्स्टिटयूट'मधलीं 'मॉडर्न आर्ट'चीं आणि 'ॲब्स्ट्रॅक्ट आर्ट'चीं कांहीं चित्रं पहातांना मात्र खरोखरच मला वाटायला लागलं की, अरे ! आपलंहि अेखादं चित्र अिथं सहज खपून गेलं असतं ! त्या विभागांतलीं बहुतेक चित्रं आडवीं, अुभीं, अुलटींसुलटीं— कशींहि लावली तरी चालण्यासारखं होतं, हें त्यांचं खास वैशिष्टच होतं ! आर्ट-गॅलरींत चित्रं टांगणाऱ्यांच्या दृष्टीनं ही सोय महत्त्वाची होती !

अेल्सवर्थ केली ( जन्म– १९२३ ) या अमेरिकन चित्रकाराचं 'East River' नांवाचं अेक चित्र तर भलतंच साधं ( परंतु कदाचित् 'महान् आशय' असलेलं ) होतं. स्वत:लासुद्धां न समजणाऱ्या कविता आवर्जून आपल्या मासिकांत छापणाऱ्या संपादकाप्रमाणं, 'अिन्स्टिटयूट'च्या चालकांनीं तें चित्र आपल्या अभिरुचीचा अुच्च दर्जा सिद्ध करण्याकरतां तिथं टांगलेलं असावं, असा माझा समज झाला. ती अनाकलनीय कलाकृति ज्या थोर पतिपत्नींच्या कृपेनं अुपलब्ध झालेली होती त्यांचीहि नांवं तिथं लिहिलेली होती : 'Lent by—Mr. and Mrs. Albert L. Arenberg' माझ्यासारख्या अनभिज्ञ माणसानंदेखील त्या चित्राची हुबेहुब नक्कल सहज करून आणली आहे, यावरून त्यांतील 'सखोल आशया'ची झेंप किती 'अुंच' होती हें लक्षांत येअील !

आतां या महान् कलाकृतीवर काय भाष्य करणार ? असल्या तऱ्हेचीं अनेक चित्रं व अशाच वळणाचे शिल्पकलेचे नमुने मला तिथं आढळले.

'अिन्स्टिटयूट'मधला अेक विभाग मात्र मला खरोखरच फार आवडला. 'Thorne Rooms In Miniature' हें त्या विभागाचं नांव होतं. या विभागांत सोळाव्या शतकापासून विसाव्या शतकांतील १९४० पर्यंतच्या काळांतील युरो-

पिअन व अमेरिकन घरांतील खोल्यांचीं अेकूण ६७ लहानलहान ' मॉडेल्स् ' करून ठेवलेलीं होतीं. मिसेस् जेम्स वॉर्ड थॉर्न या बाअींनी त्या सर्व खोल्यांची ' डिझाअिन्स् ' स्वतः करून स्वतःच्या देखरेखीखाली कुशल कारागिरांकडून त्या तयार करून घेतल्या होत्या. त्या छोटया खोल्यांतील खिडक्यांचे व दारांचे कापडाचे पडदे, पलंगपोस, सतरज्या—गालिचे वगैरे मात्र मिसेस् थॉर्ननी स्वतःच्या हातांनीं तयार केले होते. या खोल्यांच्या दारांतून पलिकडच्या खोल्यांतील दिसणारा भाग नि खिडक्यांतून दिसणारीं बाहेरचीं निसर्गदृश्येंहि अगदीं हुबेहुब व प्रेक्षणीय होतीं. अेका फुटाला अेक अिंच या प्रमाणांत त्या सगळ्या खोल्या तयार केलेल्या होत्या. मिसेस् थॉर्नच्या या खोल्यांतून सोळाव्या शतकापासून विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतच्या अमेरिकन व युरोपिअन घरांची अंतर्गत सजावट, वास्तुशिल्प, अितिहास आणि संस्कृति यांचं दर्शन घडत होतं. या खोल्यांचीं ' मॉडेल्स् ' तयार करण्यापूर्वी मिसेस् थॉर्न यांनीं जगाचा पुष्कळसा प्रवास करून अैतिहासिक काळांतील घरं, म्युझिअम्स्, ग्रंथसंग्रहालयं यांना भेटी देअून अितिहासकालीन जीवनाचा व संस्कृतीचा फार मोठा अभ्यास केला होता. आणि त्यांच्या सूक्ष्म अभ्यासाची साक्ष ' थॉर्न—रूम्स् ' पाहिल्यानंतर कुणालाहि पटली असती. या लहानशा खोल्यांमुळं माणसांच्या रहाणींत कालानुसार कसकसा बदल होत गेला हें दिसून येत होतं. लहान मुलींची बाहुलीचीं घरं असावींत तशा त्या सगळ्या छोटयाछोटया खोल्या विलक्षण सुबक व अत्यंत आकर्षक दिसत होत्या. खोलीतली प्रत्येक वस्तु— फर्निचर, दारा-खिडक्यांचे पडदे, टेबलक्लॉथसुद्धां— अगदीं हुबेहुब पण लहान आकारांत तिथं दिसत होती. असं वाटायचं कीं, आतां त्या खोल्यांत तत्कालीन माणसांचीच काय ती कमतरता आहे ! कुठल्याहि क्षणी अितिहासकाळांतला अेखादा चिमुकला माणूस तिथं दिसेल, आणि तें सारंच दृश्य अेकदम सजीव होअील ! . . लहान मुलांचा पाय तर त्या विभागांतून निघतां निघत नव्हता. निरनिराळ्या प्रांतांच्या वैशिष्टयपूर्ण पोषाखांतल्या बाहुल्या अगदीं हुबेहुब करणारे अनेक चांगले कलाकार आपल्याकडेहि आहेत. त्यांनी भिन्नभिन्न राजवटीनुसार, कालानुसार भारतीयांच्या रहाणींत क्रमक्रमा बदल होत गेला तें दाखवण्याचा अशा प्रकारचा प्रयोग करायला हरकत नाही.

दुपारचं जेवण आम्ही ' आर्ट अिन्स्टिटयूट 'मधेंच घेतलं, आणि दीड वाजतां शिकागोच्या जगप्रसिद्ध ' 'International Business Machines' चं ' IBM—Data Centre ' पहायला गेलों. 'IBM'च्या ' गेस्ट सर्व्हिस डिपार्टमेंट 'चे अधिकारी डॉन मॅक्स्वेल् यांनी आमच्याबरोबर सगळीकडे फिरून आम्हांला सर्व माहिती दिली व मशिन्सच्या कामांचं प्रात्यक्षिक करून दाखवलं. त्यांतल्या ' Management by Exception' या पद्धतीनं माझं विशेष लक्ष वेधून घेतलं.. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे कारखान्यांतल्या ' प्रॉडक्शन 'चे ' रिपोर्टस् ' जेव्हां जातात,

तेव्हां जिथं त्यांनीं लक्ष देऊन चौकशी करायला पाहिजे अशा 'कॉलम्स्'च्या पुढं मशिननं आपोआप '*' अशी खूण केली जाते. अुदाहरणार्थ, ज्या विभागाचं प्रॉडक्शन अपेक्षेपेक्षां कमी झालेलं असेल तिथं ही खूण केली जाते. त्यामुळ बाकीचे सर्व आंकडे वाचण्यांत व कुठं काय कमी आहे तें शोधण्यांत वेळ न घालवतां, फक्त जरुरीच्या ठिकाणीच लक्ष केंद्रित करून चौकशी करतां येते. त्यामुळं खूप वेळ वांचतो; परिश्रमहि वांचतात.

या मशिन्स्चा अुपयोग कसा करायचा याचं शिक्षण याच ठिकाणीं दर वर्षी सुमारं बारा हजार लोकांना दिलं जातं. केवळ यंत्रांशीं संबंधित असलेला हा सगळाच विषय माझ्यासारख्या यंत्रांशीं व गणिताशीं फटकून वागणाऱ्या माणसाला क्लिष्ट वाटला असला, तरी तिथं गेल्यानं जगांतील आधुनिक यंत्रशास्त्राची थक्क करणारी प्रगति प्रत्यक्ष पहायला मिळाली.

सध्याकाळीं वॅरिंग्टनला परतल्यावर श्री. जॅक हॉपकिन्स त्यांच्या कारमधून मला त्यांच्या घरी रहायला घेऊन गेले.

हॉपकिन्स कुटुंब फेअरवेदर कुटुंबापेक्षांहि लहान होतं. श्री. जॅक हॉपकिन्स हे ४२ वर्षांचे होते. शिकागोच्या प्रसिद्ध ''Kendall Co.' मध्ये ते 'डिव्हिजनल डिरेक्टर ऑफ पर्सोनेल अँड लेबर रिलेशन्स' अशा मोठ्या हुद्द्यावर होते. १९६२ सालापर्यंत ते न्यूयॉर्कला 'BOAC' च्या ऑफिसांत काम करीत होते. त्या वेळी न्यूयॉर्कजवळच्या वेस्टफील्ड गांवीं ते रहात असत. त्यांची पत्नी सौ. लोअेस हॉपकिन्स ही ३९ वर्षांची होती. लग्नापूर्वी वर्षभर ती 'मॉडेल' म्हणून काम



**या खोलीची ही शान–सजावट खरी नव्हे! थॉर्न रूम्सपैकीं ही एक ऐतिहासिक खोली.— माणसें नसूनहि अत्यंत सजीव झालेली!**

करीत होती. पण लग्नानंतर आतां ती फक्त 'गृहिणी'च होती. त्यांचा मुलगा जोनाथन हा ९ वर्षांचा होता.

गावापासून सुमारं सात मैल असलेल्या 'टिवरलेक' विभागांत 'टिवरलेक' तळ्यापासून जवळच 'ओकवुड ड्राअिव्ह'ला त्यांचा स्वतःचा बंगला होता. बंगल्या-भोंवती मोजकींच झाडं होती, आणि मागच्या बाजूला छोटासा बगीचा होता. ओवेन फेअरवेदरच्या मानानं जॅक हॉपकिन्स जरा कमी बोलणारे होते. पण लोअेस मात्र खूपच बोलकी होती. मी त्यांच्याकडे गेल्याच्या पहिल्याच दिवसापासून मला त्यांचं घर आपलंसं वाटाव अितकी ती दोघंहि नवराबायको प्रेमळ, शांत आणि सुस्वभावी वाटलीं.

अमेरिकन कुटुंबांतला माझा जास्तीत जास्त मुक्काम लोअेस्च्याच घरी झाला. त्यामुळं त्या अमेरिकन स्त्रीच्या गृहजीवनाचा मला अधिक जवळून परिचय झाला. अमेरिकन स्त्री-पुरुषांना आपल्या घराची. संसाराची ओढ नसते असं म्हणणाऱ्यांना अुत्तरादाखल या हॉपकिन्स-जोडप्याचा घरसंसार दाखवता आला असता. जॅक हॉपकिन्स हे सकाळीं सातच्या सुमाराला शिकागोला नोकरीसाठी जायला निघायचे, आणि संध्याकाळीं साडेपांचच्या सुमाराला घरीं परत यायचे. नोकरीनिमित्त बहुसंख्य अमेरिकन स्त्री-पुरुषांना घरापासून बरंच दूर जावं लागतं. केवळ जेवणासाठी दुपारच्या वेळीं घरी येअून परत जाणं अशक्य असतं. मधल्या सुट्टीत जेवणासाठी डबा नेण्याची पद्धत तिथं जवळजवळ मुळीच नाही असं म्हटलं तरी चालेल. कारण अमेरिकेंत कुठंहि वेताच्या योग्य किमतींत चांगल्यापैकी जेवण मिळू शकतं. फारच थोडे लोक नोकरीवर जातांना आपल्या-बरोबर अेखाद्या 'कार्डबोर्ड बॉक्स'मधे 'सँडविचेस्'सारखे कोरडे पदार्थ नेतात. जॅक हॉपकिन्स मात्र बरोबर कांहीं न नेतां बाहेरच जेवण घेत. त्यामुळे अेकदा सकाळीं नवरा 'ब्रेकफास्ट' करून नोकरीला गेला कीं तिथपासून संध्याकाळपर्यंतचा सगळा वेळ लोअेसला घरकामासाठी मोकळा मिळे.

सकाळीं अुठल्याबरोबर केर काढण्याची आपल्यासारखी तिकडे पद्धत नाहीं. अमेरिकेंन बायका 'व्हॅक्यूम क्लिनर' ह्या यंत्राच्या सहाय्यानं अुभ्या अुभ्या घरांतला केर काढतात. खरं म्हणजे अमेरिकनांच्या घरांत केरकचरा असा फारसा नसतोच, त्यांची घरं खूपच स्वच्छ ठवलेलीं असतात, परंतु 'मॅट'वर साचलेली धूळ केव्हांतरी यंत्रानं शोषून घेणं आवश्यक असतं. आणि हा कार्यक्रम दोन-तीन दिवसांनी सवडीनं केव्हांतरी केला तरी चालण्यासारखा असतो. कारण बहुतेक सर्व अमेरिकन घरं हीं तिथल्या विशिष्ट शीत हवामानामुळं बरोंचशी बंदिस्त अशीं असतात.

सकाळी सर्वांचा ब्रेकफास्ट झाल्यानंतर टेबलावरच्या 'डिशेस्'ची आवरा-

आवर करून त्या धुण्यासाठीं म्हणून 'डिश्-वॉशर'मध्यें लोअेस ठेवायची. 'डिश-वॉशर'चं दार बंद करून बटण दावलं की कपबशा, डिशेस् आणि अितर भांडीं धुण्याचं काम चालू व्हायचं. ठराविक वेळानंतर डिशेस् धुतल्या गेल्या कीं यंत्रा-मधला पाण्याचा प्रवाह बंद व्हायचा. आणि गरम हवेच्या झोतानं यंत्रांतील सर्व भांडीं कोरडीं केली जायचीं. त्यामुळे भांडी घासण्यासाठी वेगळा असा वेळ लोअेस्ला कधीं खर्च करावा लागत नसे. अेकीकडे 'डिश् वॉशिंग' चालू अस-तानांच ती घरांतली अितर कामं अुरकायची किंवा तेवढ्यांत आंघोळ वगैरे करायची.

त्यानंतर स्वैंपाकघरांतच अुभ्या अुभ्या ती स्वैंपाकाला लागायची. अमेरिकेंत स्त्रियांना 'स्वैंपाक' असा फारसा करावा लागतच नाहीं. कारण रोजच्या जेवणांतले बरेचसे पदार्थ पॅकबंद डब्यांतून फार चांगल्या अवस्थेंत टिकवलेले असे बाजारांत तयार मिळतात. आपण फक्त ते घरीं आणून फ्रीजमध्यें ठेवून द्यायचे. पाहिजे त्यावेळीं ते 'ओव्हन'मध्ये ठेवून गरम केले किंवा शिजवले कीं झालें ! तिकडे अमेरिकेंत जवळजवळ प्रत्येक घरांत 'फ्रीज' असल्यामुळे दुपारच्या जेवणा-साठीं तयार केलेले पदार्थ रात्रींच्या जेवणासाठींच काय पण नंतरहि दोनतीन दिवसां-साठीं चांगल्या रीतीनं सुरक्षित ठेवतां येतात.

अिकडे स्वैंपाकपाण्याची तयारी होईपर्यंत छोटचा जोनाथनची शाळेत जाण्याची वेळ व्हायची. त्याचे कपडे करून त्याला पोचवण्यासाठी लोअेस्नं गाडी बाहेर काढावी तर तेवढ्यांत पोस्टमनची गाडी यायची. पोस्टमनकडून पत्रं घेअून घाअीघाअीनं तीं तशीच गाडींत ठेवून लोअेस् जोनाथनला आधीं शाळेंत पोचवायची.

जोनाथनला शाळेंत सोडून परत येतां येतां लोअेस् बाजारांतून फेरफटका मारायची. 'सुपर मार्केट'मधून आवश्यक ती खरेदी करून घरीं परत आल्यावर कपडे धुणं किंवा कपड्यांना इस्त्री करणं वगैरे घरगुती कामं लोअेस् करायची. अर्थात् हीं कामं करतांनासुद्धा 'वॉशिंग मशिन' आणि 'अिलेक्ट्रिक अिस्त्री' हीं यंत्रं हाताशीं असल्यामुळे असल्या कामांचे फारसे परिश्रम तिला वाटत नसत. आणि शिवाय हीं कामंसुद्धां अेकदोन दिवसाआड केलीं तरी चालण्यासारखीं असत.

दुपारचं जेवण झाल्यावर लोअेस् जगांतल्या कोणत्याहि 'गृहिणी'प्रमाणं पलंगावर अगर सोफावर पडून आराम करायची. त्यावेळी तिच्या हातांत अेखादं दैनिक वृत्तपत्र किंवा मासिक असायचं. समोर रेडिओ किंवा टेलिव्हिजन एकीकडे चालू असायचाच !

कधीं लहर लागली तर दुपारच्या कॉफीच्या वेळीं लोअेस् तिच्या एखाद्या मैत्रिणीला फोन करून बोलावून घ्यायची. मग कॉफीची केटली मध्यें ठेवून कॉफी

घेतां घेतां दोघींच्या मनसोक्त गप्पा व्हायच्या. माझ्यासारखा एखादा पाहुणा घरांत असला तर त्यालाहि आपल्या गप्पांच्या मैफलींत त्या ओढायच्या. संध्याकाळीं जॅकना अजून अवकाश असला तर तेवढ्यांत गाडी बाहेर काढून जवळच्या तळ्याकडे जाऊन लोअस् पोहून यायची.

अर्थात् पोहण्याचा हा कार्यक्रम सवड मिळण्यावरतीच अवलंबून असायचा. संध्याकाळी जोनाथनला शाळेंतून घेऊन लोअेस् घरीं परत यायची. अेवढ्यांत जॅक ऑफिसमधून यायचे.

कपडे वदलून आरामांत सोफावर पडून विश्रांति घेत जॅक हॉपकिन्स शांतपणें अेखाद्या 'ड्रिंक'चा आस्वाद घेत. तेवढ्यांत लोअेस् रात्रीच्या जेवणाची तयारी करी. रात्रीचं जेवण संध्याकाळीं होतांच कांहीं वेळां जॅक आणि लोअेस् गार्डीतून फिरायला जात. फिरायला जातांना जोनाथन प्रत्येक वेळीं त्यांच्याबरोबर असेच असं नाहीं. बहुतेक वेळां तो घरीच खेळत बसे.

दिवसभरात केव्हांतरी सवडीनं अगर सुट्टीच्या दिवशीं सकाळी लोअेस् वंगल्याच्या मागच्या बागेंत बागकामसुद्धां करायची. छोटीं छोटीं फुलझाडं लावण्याची तिला फार आवड होती. सुट्टीचा दिवस असला तर तिच्या ह्या श्रमदानांत जॅक आणि जोनाथन हेहि सहभागी होत.

सुट्टीचा दिवस रविवार असला तर सकाळींच कपडे करून हॉपकिन्स कुटुंब चर्चला जायला निघे. चर्चला जातांना जोनाथनचे कपडेसुद्धां फार व्यवस्थितपणे केलेले असत. हॉपकिन्स कुटुंब कॅथॉलिक पंथाचं होतं. देवधर्मावर त्यांची श्रद्धा होती. त्यामुळे दर रविवारीं नियमितपणें ते चर्चला जात असत.

'न्यू जर्सी'मध्यें रहाणारी लोअेस्ची आअी श्रीमती रूथ हर्बर्ट रीस ही कधी कधीं आपल्या मुलीकडे बॅरिंग्टनला रहायला येई. अशा वेळीं तिला किंवा अितर पाहुण्यांना शिकागोजवळच्या विमानतळावर जाऊन आणण्याचं किंवा पोचवण्याचं काम लोअेस्च करायची. जोनाथनच्या अभ्यासाकडे लक्ष देणं, त्याला स्वच्छतेचे धडे देणं, त्याला शिस्त लावणं, टेलिव्हिजनवरचे ठराविकच कार्यक्रम त्याला दाखवणं अित्यादि कामं लोअेस्च करायची.

'दूरदृष्टि' असलेल्या आपल्याकडच्या अनेक शहाण्या नवऱ्यांप्रमाणं जॅक् हॉपकिन्स हेसुद्धां आपली महिन्याची कमाअी बॅंकबुकाच्या रूपानं लोअेस्च्या पदरांत टाकीत, आणि संसाराची जबाबदारी झटकून मोकळे होत. "अिंग्लंडच्या राज्यकारभारांतलं राणीच्या नवऱ्याचं स्थान आणि आमच्या संसारांतलं माझं स्थान यांच्यांत फारसा फरक नाहीं."– असं ते गमतीनं म्हणायचे. आणि तें खरंहि होतं.

– त्यांनीं असं म्हटल्यावर मला मात्र भारताच्या राष्ट्रपतींची अगीचच आठवण यायची !

अेक दिवस रात्रीच्या जेवणापूर्वी मी आणि जॅक गप्पा मारीत वसलों असतांना लोअेस्‌नं 'स्पॅघेटी 'बरोबर खायला केलेल्या 'सॉस 'चे दोन नमुने मला चव घ्यायला आणून दिले. अेकांत फक्त टोमॅटो होते अन् दुसऱ्यांत 'बीफ् 'चे अगदीं छोटे तुकडे होते. "ह्यांतलं ज्या पद्धतीचं 'सॉस ' तुला आवडेल तें मी करतें,"– असं लोअेस् म्हणाली. दुसऱ्या प्रकारचं 'सॉस ' मला आवडल्याचं मीं सांगतांच तिला समाधान वाटलं. कारण अेक तर माझ्याकरतां खास वेगळं अस कांहीं करायला नको; आणि दुसरं म्हणजे त्या पद्धतीचं 'मटन-सॉस ' तिचंहि फार आवडतं होतं !

तिची पाठ वळतांच जॅक म्हणाले, "तुझ्यासारखा सोवळंओवळं न पाळणारा परदेशी पाहुणा असला म्हणजे आमची गृहिणी खूष असते ! 'बीफ् ' खाणं तुमच्या धर्माला मान्य नाहीं हें समजल्यावर प्रथम ती जरा विचकलीच होती ! आतां पहा ती तुझ्या खाण्यापिण्याचे कसे लाड करते तें !"

रात्रीं जेवतांना साखरेच्या भांड्यांत चमचा ठेवायला लोअेस् विसरली होती. तेव्हां जॅकनीं साखरेचा अेकेक कण मोठ्यानं मोजून हातानं आपल्या कपांत टाकायला सुरुवात केली. लोअेस्‌च्या तें लक्षांत येतांच तिनं झट्‌कन् अुठून चमचा आणून दिला. जॅकचा स्वभाव आणि खिलाडू मनोवृत्ति यांचं दर्शन मला असं घडलं !

जेवतांना छोट्या जोनाथननं अेकदोन पोरकट चुटके सांगितले. आधी जोनाथनची अिंग्रजी भाषा आणि नंतर मग चुटक्यांतला विनोद समजावून घेण्याच्या प्रयत्नांत मी असतांनाच लोअेस् हंसून म्हणाली, "तुला त्यांतले विनोद समजले नाहींत तरी रुखरुख वाटूं देअूं नकोस. कारण आम्हांलाहि अनेकदां ते समजत नाहींत !"

दुसऱ्या दिवशी सकाळीं लवकर अुठून शिकागोला ऑफिसला जायचं असल्या-मुळं रात्रीं ९ वाजतांच आमच्या गप्पांतून अुठून जॅक माझी क्षमा मागून झोंपायला गेले. आपल्याकडे 'कुटुंवप्रमुख ' असा अुठून गेला तर पाहुण्यांचा गैरसमज होअील ! लोअेस् मात्र माझ्याशीं मोठ्या अुत्साहानं रात्रीं साडेबारापर्यंत गप्पा मारीत बसली.

अमेरिकन महिलांबद्दल अेक सर्वसामान्य आक्षेप नेहमीं घेण्यांत येतो तो हा की, त्या फार 'पुढे गेलेल्या ' असल्यामुळे अमेरिकेंत खऱ्या अर्थानं कुटुंबजीवन असं मुळीच राहिलेलं नाही. हा आक्षेप मात्र माझ्या मनाला तितकासा पटत नाहीं. कारण अखेर कुटुंब-जीवनासंबंधींच्या आपल्या भारतीयांच्या कल्पना आणि अमे-रिकनांच्या कल्पना यांच्यांत मुळांतच फार मोठं अंतर आहे. आपल्या कल्पनांच्या फूटपट्ट्या लावून त्यांच्या कौटुंबिक जीवनांतील सुखदुःखाचं मोजमाप करणं योग्य होणार नाहीं. सुखी संसारासंबंधींच्या आपल्या कल्पना आणि त्यांच्या कल्पना या

निश्चितपणे वेगळ्या आहेत. आता आपल्याकडचंहि आर्थिक जीवन झपाट्यानं बदलत चाललं आहे. त्यामुळं आपली अिच्छा असो किंवा नसो, आपल्याला आपल्या सुखी संसाराच्या कल्पना हळूहळू का होअीना पण बदलाव्या लागत आहेत; त्यांच्या आधींच बदललेल्या आहेत. अेवढंच फार तर म्हणतां येअील !

— असं असलं तरीहि माणसाच्या मूलभूत भावना ह्या सामान्यतः सर्वत्र सारख्याच असतात ! मला भेटलेल्या अमेरिकन महिलांत कांहीं नोकऱ्या करणाऱ्या होत्या, कांहीं लेखन किंवा अितर व्यवसाय करणाऱ्या होत्या, तर कांहीं फक्त 'चूल आणि मूल' अेवढंच बघणाऱ्याहि होत्या. तरी पण 'घरा'संबंधींची आस्था आणि ओढ मात्र सर्वांची सारखीच होती ! सर्वजणी आपापल्या नवऱ्यावर, मुलाबाळांवर प्रेम करीत होत्या, आणि फावल्या वेळांत आपलं घरकुल सजवण्यांत आनंद मानीत होत्या.

— त्या दिवशीं लोअेस् आणि मी कितीतरी वेगवेगळ्या विषयांवर बोलत बसलो होतों. 'अमेरिकनांचं गृहजीवन' मला अेका अमेरिकन गृहिणीकडूनच समजावून घ्यायचं असल्यामुळं त्या विषयावर अर्थात् आम्ही अधिक वेळ बोलत होतों.

लोअेस्च्या विचार करण्याच्या पद्धतींतला आणि बोलण्यांतला मोकळेपणा आपल्याकडच्या स्त्रियांमध्यें सहसा कधीं आढळला नसता. 'डेटिंग', 'गोअिंग स्टेडी', 'मॅरेज', 'हनीमून', 'बर्थ कंट्रोल', 'डिव्होर्स' अशा प्रकारच्या थोड्याशा नाजुक विषयांवर बोलतांना आपण अेका प्रगत देशांतल्या बुद्धिमान तरुण स्त्रीशीं बोलत आहोंत याची मला जाणीव होत होती.

— अमेरिकेंतील कुटुंब-संस्थेबद्दल चर्चा करतांना तिकडल्या लोकांच्या घटस्फोटाचा विषय निघणं अटळ होतं.

"अमेरिकेंत घटस्फोटांचं प्रमाण फार आहे. अेवढ्या प्रगत समाजांत विवाह–संस्थेच्या मुळावर घाव घालणारी ही घटस्फोटासारखी घटना अेवढ्या मोठ्या प्रमाणांत कशी काय घडते ?" —असं मी विचारलं.

तेव्हां लोअेस् म्हणाली, "प्रमाणाबद्दलच बोलायचं झालं तर मी म्हणेन की आमच्याकडे प्रसिद्धीची साधनं विपुल असल्यामुळे घटस्फोटासारख्या घटनेला प्रसिद्धीहि फार मोठ्या प्रमाणांत दिली जाते. त्यामुळे घटस्फोटांच्या घटनांचा गवगवा फार मोठ्या प्रमाणांत केला जातो. सर्वसामान्य मध्यमवर्गीयांपेक्षां चित्रपट किंवा नाट्यसृष्टीशीं संबंधित असलेल्या लोकांमध्येंच घटस्फोटाचं प्रमाण अधिक आहे. सदैव चंदेरी प्रकाशांत वावरणाऱ्या लोकांच्या जीवनांतील लहान-महान घटनांनासुद्धां मोठी प्रसिद्धी दिली जाते. त्यांच्या घटस्फोटाच्या घटनांचं तर प्रसिद्धीसाठीं फार मोठं भांडवल करण्यांत येतं. श्रीमंत लोकांना अति श्रीमंती


मुळे त्याच त्याच जीवनाचा फार लवकर कंटाळा येतो. आणि मग असे लोक विवाहबाह्य जीवनांत 'Excitement' शोधतात. साहजिकच त्याचा परिणाम त्यांच्या गृहजीवनांत गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होण्यांत होतो. बऱ्याच वेळां अशा प्रश्नांचा शेवट घटस्फोटांत होतो. आणखीहि अेक सर्वसामान्य कारण आहे. कुणाला तें पटेल अथवा पटणार नाहीं. पण आजच्या जगात सर्वसंहारक, भीषण अशा अणुयुद्धाची टांगती तलवार सतत सर्वांच्या डोक्यावर आहे. त्याहि भीतीचाहि मनावर फार मोठा परिणाम होतो व मानवी मनांतली असुरक्षिततेची भावना बळावते. जीवनांतला "अुद्यां"वरचा विश्वासच उडतो. आणि माणसाला वाटायला लागतं की "आज" आहे तोंवरच जीवनाचा अुपभोग घेअू या. कारण कदाचित् आपल्या जीवनांत 'अुद्यां' कधीं अुजाडणारच नाहीं !"

— लोअेस्‌चं हें विवेचन मला बरंचसं पटलं. अमेरिकनांच्या सामान्यत: नि:संशयपणे सुखी असणाऱ्या गृहजीवनाला लागलेलं तें अेक गालबोटच होतं. पण तेवढ्यावरून अमेरिकेंत घराघरांत आज तोच प्रश्न निर्माण झालेला आहे असं मानणं मात्र चुकीचं ठरेल. अमेरिकन लोक त्यांच्या घरगुती आणि सामाजिक जीवनांत आपल्या पत्नीवर प्रेमाचा वर्षाव करतात ही गोष्टसुद्धां तितकीच खरी आहे ! अशा परिस्थितींत जीवनाचा प्याला सुखाच्या अमृतानं अर्धा भरलेला आहे म्हणून सुख मानायचं, का तो अर्धा रिकामा आहे म्हणून माणसानं दुःख करायचं ? . . .

— सकाळीं आम्ही बॅरिंग्टनपासून दहा मैलांवर असलेल्या एल्जिन नांवाच्या गांवीं गेलों. तिथली 'लुड्‌विग् मिल्क कंपनी' बघायला येण्याचं आम्हांला आमंत्रण होतंच. आणि शिवाय अेल्जिनच्याच 'शेर्मन हॉस्पिटल'मध्यें आजारी असलेल्या आमच्या ग्रुपमधील प्रा. सौ. सेवती मित्रा यांनाहि आम्हांला भेटायचं होतं.

प्रथम सकाळीं साडेनअूच्या सुमाराला आम्ही 'लुड्‌विग् मिल्क कंपनी'त गेलों. कंपनीच्या अिमारतीचा विस्तार फारसा मोठा नव्हता. पण दूध आणि दुधाचे पदार्थ तयार करणारी अेक चांगली फॅक्टरी कशी असावी याचा अेक छोटासा नमुना आम्हांला तिथं बघायला मिळाला. सर्व प्रकारच्या लहानमोठ्या यंत्रांचा अुपयोग करून हस्तस्पर्शविरहित निर्जंतुक केलेलं दूध प्रामुख्यानं कार्डबोर्डाच्या व क्वचित् टिन्‌च्या डब्यांत कसं सीलबंद केलं जात होतं तें पहातांना गंमत वाटली. फॅक्टरी पहातांना आम्हांला देण्यांत आलेली 'Milk and You' नांवाची रंगीत पुस्तिका विशेष अुपयुक्त आणि मनोरंजक वाटली. त्या छोट्या पुस्तिकेंत अनेक गमतीदार व्यंगचित्रांच्या साहाय्यानं दुधाचं मानवी जीवनांतलं महत्त्व फार चांगल्या रीतीनं मनावर ठसवलं होतं. पहिल्याच पानावरच्या व्यंगचित्रांत

नुकतंच किनाऱ्याला लागलेलं अेक जहाज होतं. त्यांतली जहाजाच्या आकाराच्या तुलनेनं जराशी मोठी असलेली गाय किनाऱ्यावर लावलेला अेक बोर्ड वाचते आहे : " Columbus was here. " त्या चित्राखालीं लिहिलेलं होतं. " The First Cow Discovered America In 1611. " त्याच्याखालच्या चित्रांत अेका गाअीच्या डोक्याच्या दोन्ही बाजूंना चारचार माणसांचीं डोकीं काढलेलीं होतीं. खालीं लिहिलेलं होतं " and Today...there's about ONE COW for every 8 Americans. " –हें वाचून अमेरिकेंत दुधाचा व दुधाच्या पदार्थांचा वापर आपल्या ' गोमाताप्रधान संस्कृती 'च्या तुलनेनं किती प्रचंड प्रमाणांत केला जात आहे याची कल्पना येते. पुढच्या पानावर अेक गाय अेका माणसाच्या पुढ




दुग्धमाहात्म्य वर्णन करणाऱ्या ' मिल्क अँड यू ' या पुस्तिकेंतलें व्यंगचित्र

दुधाचा ग्लास ठेवलेला 'ब्रेकफास्ट-ट्रे' घेऊन अुभी राहिलेली दाखवली होती; आणि पुढं लिहिलेलं होतं : " The COW is America's Chief Source of Food today...in fact, the COW is Nature's most efficient 'Food Factory' producing a delightful product known as MILK. " ... अशा रीतीनं सुरुवातीला 'गोरस-प्रशंसास्तोत्र' गाअून पुस्तिकेच्या पुढल्या पानांत आणखी कांहीं विनोदी व्यंगचित्रांच्या साहाय्यानं दुधांतील निरनिराळ्या घटकांची आणि त्यांच्या शेंकडा प्रमाणांची तांत्रिक माहिती दिलेली होती. फॅक्टरींतून बाहेर पडण्यापूर्वी आम्हांला शुद्ध दुधाचे पॅकेट्स् व आईस्क्रीम वगैरे पदार्थ देण्यांत आले. आपल्या देशांत आज अत्यंत दुर्मिळ झालेल्या 'शुद्ध दूध' नांवाच्या त्या पदार्थाचा आस्वाद आम्ही अत्यंत संतोषपूर्वक घेतला, हें सांगायला नकोच !

'लुड्विग् मिल्क कंपनी'ला भेट दिल्यानंतर आम्ही 'जेर्मन हॉस्पिटल'मधें गेलों. अमेरिकेंतल्या अेका लहान गांवांतल्या हॉस्पिटलमधें असलेल्या सुखसोयी आणि तेथील कर्मचाऱ्यांचं सौजन्य पाहून आम्ही थक्क झालों. त्या वेळीं त्या हॉस्पिटलच्या पांचमजली इमारतींत फक्त ४०० 'बेड्स्'ची सोय होती. आणि पलिकडेच ४००००० डॉलर्स खर्चाच्या हॉस्पिटलच्या विकासयोजनेंत अेक नवीन सुसज्ज अिमारत बांधली जात होती. ही नवीन अिमारत १९६५ च्या उन्हाळ्यांत पूर्ण झाल्यावर तिच्यांत आणखी ३२८ 'बेड्स्'ची सोय होणार होती. त्याच-प्रमाणं नव्या अिमारतींत नवजात अर्भकांसाठीं आणखी ५१ 'बेसिनेट्स्'ची व्यवस्था करण्यांत येणार होती. याशिवाय नवीन 'अिमर्जन्सी डिपार्टमेंट', पांच 'ट्रीट-मेंट रूम्स्', अेक सुसज्ज अशी नवीन 'लॅबोरेटरी', नवे 'अेक्स-रे' व 'फिजिकल थेरॅपी डिपार्टमेंट्स्', आणखी अेक नवा 'स्नॅक बार', गार्डन कोर्ट्स् वगैरे कितीतरी नव्या विभागांची भर या अिमारतीमुळं होणार होती.

या हॉस्पिटलमधे 'पेशंट'ला दाखल करून घेतांच त्याच्या मनगटावर प्लॅस्टिकची अेक पट्टी बांधली जाते. या पारदर्शक पट्टीच्या आंतमधे 'पेशंट'चं संपूर्ण नांव, त्याच्या डॉक्टरचं नांव आणि हॉस्पिटलचा रेकॉर्ड-नंबर ही माहिती टाइप केलेली कागदाची अरुंद पट्टी असते. बाळंतपणासाठीं आलेल्या स्त्रीच्या मनगटावर 'डिलिव्हरी रूम'मधेंच एक प्लॅस्टिकची पारदर्शक पट्टी बांधण्यांत येते. तिच्यावर इतर 'पेशंट'सारखी माहिती तर असतेच, पण त्याशिवाय तिला झालेला मुलगा कीं मुलगी, प्रसूतीची तारीख व वेळ, हेंहि टाअिप केलेलं असतं. हीच सर्व माहिती त्या स्त्रीच्या नवजात अर्भकाच्या अेका मनगटावर व अेका पायावर प्लॅस्टिकच्या पट्टीनं लावली जाते. हॉस्पिटलमधे सगळीच लहान मुलं एकत्र ठेवलीं जातात. त्यांना अेकत्रच अंघोळी घातल्या जातात. अशा प्रसंगी मुलांची अदलाबदल होऊं नये, अगर तशी शंकासुद्धां येअूं नये, म्हणून अेवढी खबरदारी घेतली जाते.

पेशंटचा जो धर्मपंथ असेल- त्या पंथाचा धर्मगुरु त्याला केव्हांहि भेटूं शकतो. अगर पेशंटनं दाखल होतेवेळींच आपला पंथ सांगितला तर हॉस्पिटलमार्फत त्या पंथाचा धर्मगुरु पेशंटकडे केव्हांहि पाठवण्यांत येतो. डॉक्टरच्या परवानगीनं 'ज्युईश् फेथ्'चा पेशंट आपल्यासाठीं बाहेरून हवं तें अन्न आणण्याची व्यवस्था करूं शकतो. दुसऱ्या मजल्यावरच्या 'ऑल फेथ्स् चॅपेल'चा प्रार्थनेसाठीं किंवा चिंतनासाठीं अुपयोग करायला कुठल्याहि पेशंटला व त्याच्या मित्रांना परवानगी असते. पेशंटच्या धर्मभावनेची अेवढी काळजी अमेरिकेंतल्या अेका हॉस्पिटलमधेसुद्धां घेतली जाते हें पाहून 'निधर्मी' देशांतून आलेल्या माझ्यासारख्या माणसाला धक्काच बसला! इतके दिवस अमेरिकेला आम्ही अुगाचच 'सुधारलेला' देश समजत होतों! त्यापेक्षां आमचा 'निधर्मी' देश खरा 'सुधारलेला'! 'निधर्मी'-पणाच्या नांवाखाली वाटेल तो भोंगळपणा अिकडे चालतो! पण कुणाची कांहीं तक्रार आहे का?

चंद्रावर स्वारी करण्याइतकी भौतिक प्रगति ज्यांनीं साधली ते अमेरिकन लोक मानवी जीवनांतलं धर्मभावनेचं स्थान अजूनहि विसरलेले नाहींत! अमेरिकेंत अशीं कितीतरी 'धार्मिक' मनोवृत्तीचीं माणसं मला आढळलीं. दर रविवारीं नित्यनेमानं चर्चला जाणारे अमेरिकन्स् मला भेटले. त्याचप्रमाणं त्यांच्यात्यांच्या कल्पनेप्रमाणं 'अुपवास' करणारे- म्हणजे शुक्रवारीं मांस न खाणारे लोकहि मला आढळले. माणूस आजारी पडतो, शारीरिक व मानसिक दृष्ट्याहि जेव्हां विकल होतो, तेव्हांच त्याला कुठल्यातरी आधाराची खरीखुरी गरज असते. बऱ्याच वेळां त्याच्या मनांत सुप्तावस्थेंत असलेली धर्मभावना त्याला असा आधार देते, हें लक्षांत घेअून हॉस्पिटलमधें माणसाच्या शरीराबरोबरच त्याच्या मनाचीहि शुश्रूषा केली जावी, ही अमेरिकन लोकांची कल्पनाच किती चांगली आहे! आपल्याकडच्या हॉस्पिटलमधल्या कमालीच्या रुक्ष वातावरणांत धर्मभावनेचा असा 'ओलावा' आणायला काय हरकत आहे?

'शेर्मन हॉस्पिटल'मधें सर्वत्र नर्स आणि पेशंट यांच्यांत 'डायरेक्ट इंटर-कम्युनिकेशन सिस्टीम' असल्यामुळं पेशंट आपल्या अुशीजवळचं बटन दाबून कोण-त्याहि क्षणी नर्सशीं बोलून आपल्याला काय हवं-नको तें सांगूं शकतो. पेशंटनं बटन दाबतांच हॉस्पिटलमधल्या 'नर्सेस् स्टेशन'मधें ड्यूटीवर असलेल्या नर्सच्या पुढ्यांतील 'रिसीव्हिंग पॅनेल'वरचा पेशंटच्या खोलीचा नंबर प्रकाशित होतो. आणि ड्यूटीवरची नर्स 'अिंटरकॉम रिसीव्हर' अुचलून त्या पेशंटच्या खोलीशीं संपर्क साधूं शकते. पेशंटच्या अुशाजवळच भिंतींत बसवलेल्या 'स्पीकर'मधून नर्सचं बोलणं पेशंटला अैकायला येतं आणि पेशंटचं बोलणं नर्सला अैकूं जातं.

पेशंट हॉस्पिटलमधें दाखल झाल्याबरोबर पहिल्या अेकदोन दिवसांतच हॉस्पिटलची 'होस्टेस' त्याला भेटायला येते. त्याच्याशीं खेळीमेळीच्या

वातावरणांत गप्पा मारून ती त्याच्या सर्व सोयी– गैरसोयी, तक्रारी वगैरे समजून घेते, आणि त्वरित त्यांचा ' रिपोर्ट ' हॉस्पिटलच्या 'अॅडमिनिस्ट्रेटर 'कडे करते. एखादी गैरसोय असलीच तर ती अर्थात् ताबडतोब दूर केली जाते.

तिथं आजारी माणसाला स्वत:लासुद्धां सहज रीतीनं बटनं दाबून स्वत:च्या बिछान्याची अुंची कमीजास्त करतां येते, अगर फक्त उशाकडचा किंवा फक्त पाया-कडचा बिछान्याचा भाग वरती– खालीं करतां येतो.

हॉस्पिटलमधल्या पेशंटला सकाळीं सात वाजतां अुठवण्यांत येतं. आठ वाजतां त्याला ' ब्रेकफास्ट ' दिला जातो. दुपारीं बाराच्या सुमाराला ' डिनर ' आणि संध्याकाळीं पांच वाजतां ' सपर ' दिलं जातं. सकाळीं दहा ते अकराच्या दरम्यान पेशंटला मोफत कॉफी दिली जाते.

पेशंटच्या जवणासंबंधी त्याच्या डॉक्टरचीं कांहीं विशेष बंधनं नसलीं तर दुसऱ्या दिवशी सकाळीं व संध्याकाळीं आपल्याला कोणते पदार्थ जेवायला हवेत त्याची यादी आदल्या दिवशी ' मेनूकार्ड 'वर खुणा करून पेशंट देअूं शकतो.

आपल्या खोलींतलं अुष्णतामान पेशंटच्या इच्छेप्रमाणं कमीजास्त करण्याची सोय प्रत्येक खोलीत केलेली असते. त्याचप्रमाणं पेशंटला आवश्यकता वाटल्यास त्याच्या करमणुकीसाठी एखादा ' टीव्ही–सेट 'हि त्याच्या खोलींत ठेवण्यांत येतो. सौदर्यप्रसाधनं, सिगरेट्स्, ग्रीटिंग कार्ड्स्, मासिकं, चॉकलेट्स् वगैरे वस्तू पेशंटला विकत घेतां याव्यात म्हणून शनिवार-रविवार सोडून दररोज एकदां प्रत्येक खोलीत ' गिफ्टकार्ट ' येऊन जाते. तशीच हॉस्पिटलच्या मोफत वाचनालयाची ' बुक-कार्ट 'हि आठवड्यांतून दोनदां खोलींत येअून जाते. निरनिराळ्या प्रकारची ५० मासिकं आणि अनेक लोकप्रिय पुस्तकं त्या ढकलगाडीवर ठेवलेलीं असतात. आपल्या आवडीप्रमाणं पेशंट त्यांतून हव्या त्या मासिकांची व पुस्तकांची निवड करूं शकतो.

अचानक कधीं हॉस्पिटलला आग लागलीच तर ती त्वरित विझवतां यावी यासाठीं आवश्यक तें शिक्षण ' शेर्मन हॉस्पिटल 'मधील नर्सेस्ना व अितर कर्म-चाऱ्यांनाहि दिलेलं असतं.

हॉस्पिटलच्या मागच्या बाजूला सव्वाशें किलोवॅटचं अेक ' इमर्जन्सी पॉवर युनिट ' बसवलेलं होतं. कधी योगायोगानं हॉस्पिटलचा विद्युत्-पुरवठा अचानक बंद पडला तर त्याच क्षणीं हें ' इमर्जन्सी पॉवर युनिट ' आपोआप चालू होतं, आणि सर्व हॉस्पिटलला पुरेसा विद्युत्-पुरवठा करतं.

पेशंटच्या आणखीहि कांहीं लहानसहान सुखसोयींकडे ' शेर्मन हॉस्पिटल '-मधें लक्ष दिलं जातं असं मला आढळून आलं. पेशंटनं कोणत्याहि नर्सजवळ पत्रं दिलीं तर तीं वेळेत पोस्टाच्या पेटींत टाकलीं जातात. ' इन्फर्मेशन डेस्क 'जवळ

'स्टँप मशिन' बसवलेलं आहे. त्या मशिनमधून हवे ते 'स्टँप्स्' पेशंट घेऊं शकतो, अगर हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांपैकीं कुणालाहि विनंती केल्यास पेशंटच्या खोलींत ते आणून दिले जातात.

हॉस्पिटलच्या दुसऱ्या मजल्यावर 'बार्बर सर्व्हिस'ची सोय केलेली आहे. एखाद्या पेशंटला तिथं जाणं शक्य नसलं तर हेड नर्सला विनंती करून नापिताला आपल्या खोलींत बोलावून घेतां येतं. अमेरिकन स्त्रिया आपल्या सौंदर्यप्रसाधना-बाबत नेहेमींच विशेष जागरूक असतात. आजारी असतांनासुद्धां आपण आजाऱ्या-सारखं दिसूं नये, आपलं सौंदर्यप्रसाधन नीट व्हावं म्हणून त्यांची धडपड असते. अशा स्त्रियांसाठीं 'शेर्मन हॉस्पिटल'नं 'ब्यूटिशियन'ची खास व्यवस्था केलेली आहे.

आजारी माणसाला अेकसारखं बिछान्यावर पडून रहाण्याचा कंटाळा आलेला असतो. प्रत्यक्ष भेटायला कुणी आलं तर अुत्तमच! पण असे लोक कितीसे येणार? आणि किती वेळां येणार? अशा वेळीं आपल्या खोलींतल्या फोनवर पेशंट गांवांतल्या कुणाशींहि बोलूं शकतो. फोनचे सर्व स्थानिक 'कॉल्स्' त्याला फुकट असतात. फक्त 'ट्रंक-कॉल'चे – म्हणजेच अमेरिकनांच्या भाषेत 'लाँग डिस्टन्स कॉल'चे – पैसे पेशंटाच्या बिलांत मांडले जातात.

'शेर्मन हॉस्पिटल'च्या तळमजल्यावर अेक भेटवस्तूंचं दुकान आहे. तिथं मुलांचीं खेळणीं, चामड्याच्या वस्तू, सौंदर्यप्रसाधनं, नेकटाईज, पुस्तकं–मासिकं वगैरे कितीतरी प्रकारच्या निरनिराळ्या वस्तू विकत मिळतात.

हॉस्पिटलमधे पेशंटला भेटायला येणाऱ्या त्याच्या नातेवाइकांसाठीं अगर मित्रांसाठीं अेक 'स्नॅक-बार'सुद्धां आहे. त्या एअर कंडिशन्ड 'स्नॅक-बार'मधे लोकांचं खाणंपिणं चालू असतांना त्यांना नाजुक ध्वनिमुद्रित संगीतहि अैकवण्याची व्यवस्था केलेली आहे.

याशिवाय 'शेर्मन हॉस्पिटल'मधें इतरहि पुष्कळ विभाग आहेत. ४५०००० डॉलर्स खर्च करून अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज केलेली हॉस्पिटलची 'लॅबोरेटरी'हि पहाण्यासारखी आहे. त्याचप्रमाणं तिथली 'ब्लड बँक'ची केलेली सोय कितीतरी पेशंट्स्चे प्राण वांचवते. 'शेर्मन हॉस्पिटल'चं 'ऑपरेशन थिअेटर'हि कमालीचं सुसज्ज आहे. पेशंटशीं प्रत्यक्ष संबंधित असलेल्या ह्या महत्त्वाच्या विभागांखेरीज, 'हाअुसकीपिंग', 'मेंटेनन्स', 'लॉन्ड्री अँड लिनन' 'अकाअुंटिंग', 'पर्चेसिंग' वगैरे आणखी कितीतरी विभाग आहेत. हॉस्पिटलच्या एकूण कर्मचाऱ्यांची संख्या लक्षांत घेतली तर 'एका पेशंटला दोन नोकर' असं सरासरी प्रमाण पडतं.

हॉस्पिटलमधे पेशंटला भेटायला येणाऱ्या 'व्हिजिटर्स'ना केलेल्या सूचनांपैकीं एक सूचना मला विशेष आवडली : 'Come with smile and carry good news only.'

'शेर्मन हॉस्पिटल'मधली एकंदर सुव्यवस्था, पेशंटबद्दलची आस्था व माणुसकीचं गोड वातावरण पहात असतांना आपल्याकडचीं कांहीं हॉस्पिटल्स् माझ्या डोळ्यांपुढं अुभी राहिलीं. वेदनांमुळं विव्हळणाऱ्या पेशंट्स्च्या अंगावर वसावसा ओरडणाऱ्या 'नर्सेस्' मला आठवल्या. केवळ पैसे कमावण्यासाठीं एकाच गांवांत चारचार ठिकाणीं दवाखाने काढून बसल्यामुळं आपल्या हॉस्पिटलमधल्या पेशंट्स्च्या वॉर्डांना अक्षरश: 'धांवती' भेट देणारे डॉक्टर्स मला आठवले! रोग्याच्या घरच्या कुटुंबियांनीं कर्ज काढून, प्रसंगीं अर्धपोटीं राहून दिलेला भरपूर पैसा घेअून सुद्धां, 'अिथं राहून जगण्यापेक्षां मेलेलं बरं' असं रोग्याला वाटायला लावणारी आपल्याकडच्या कांहीं हॉस्पिटल्स्मधली 'व्यवस्था' मला आठवली!

– आणि वाटलं, साधी स्वच्छता, सेवावृत्ति, सभ्यता, सौजन्य, माणुसकी या गोष्टींना तर पैसा लागत नाही ना? मग साऱ्या जगांत 'सर्वश्रेष्ठ संस्कृति आमची' म्हणून डांगोरा पिटणाऱ्या लोकांच्या देशांत एवढा 'सुसंस्कृतपणा' कां आढळू नये? . . .

'शेर्मन हॉस्पिटल'च्या या भेटीच्या निमित्तानं हॉस्पिटलचे प्रमुख 'अॅड्-मिनिस्ट्रेटर' डॉक्टर सालमन आणि त्यांचे 'असिस्टंट' जपानी डॉक्टर कोबेयाशी यांचा चांगला परिचय झाला. दुपारचं जेवण आम्ही ह्या डॉक्टरांबरोबर आणि त्यांच्या अितर सहकाऱ्यांबरोबर हॉस्पिटलमधेच घेतलं.

तेरा ऑगस्टला सकाळीं शिकागोला जाऊन जगप्रसिद्ध 'GEC'चा 'Hotpoint' हा 'वॉशिंग मशिन्स', 'रेफ्रिजरेटर्स', 'डिश्-वॉशर्स' वगैरे तयार करण्याचा प्रचंड कारखाना पाहिला. त्या ठिकाणीं कांहीं काळासाठीं आलेले एंजिनिअर श्री. दाते व दुसरे एक एंजिनिअर श्री. बिलिमोरिया यांनीं आम्हांला सर्व कारखाना दाखवला. कारखान्याचे 'कस्टमर रिलेशन्स स्पेशॅलिस्ट' श्री. डिच् हेहि आमच्याबरोबर होतेच. आम्ही कारखाना पहात फिरत असतांना 'Polaroid' कॅमेरानं आमचे दोन फोटो घेतले गेले. एका क्षणातच त्याचे 'प्रिंट्स्' आम्हांला बघायला मिळाले.

आम्हीं पाहिलेल्या 'Plant No. 1'मधें सुमारं ३०० कामगार व ७५ अधिकारी काम करीत होते. कांहीं स्त्री-कामगारसुद्धां मोठमोठ्या यंत्रांवर काम करीत होत्या. पंधरा-पौंडी 'हॉटपॉअिंट ऑटोमॅटिक अिलेक्ट्रिक वॉशर' व 'ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक ड्रायर' या यंत्रांचे सुटे भाग तयार होतांच ते 'conveyors'–च्या साहाय्यानं आपोआप योग्य त्या ठिकाणीं नेले जातात. अशा 'conveyors'चं

एकावर एक अशा पांच थरांचं जाळं कारखान्यांत वरती उभारलेलं आहे. 'conveyors'च्या या सर्व पांचहि मार्गांची एकूण लांबी साडेपांच मैल आहे. यावरून या कारखान्याच्या व्यापाची कल्पना येईल.

कामगारांच्या डोळ्यांसमोर सतत कांहीं चांगले विचार रहावेत ह्या हेतूनं कारखान्यांत ठिकठिकाणी कांहीं बोर्ड्‌स् आकर्षक स्वरूपांत रंगवून लावलेले होते. अुदाहरणार्थ :

'Judge your work as the customer would.'
'More teamwork , less waste.'
'Aim for quality.'

कामगारांना आपल्या कामावावत कांहीं नवीन पद्धती, नवीन कल्पना सुचवाव्याशा वाटाव्यात यासाठीं अेका बोर्डावर अेक सुंदर व्यंगचित्र काढलेलं होतं. निरनिराळ्या प्रकारच्या कल्पनांचे आगगाडीचे डबे काढलेले होते, आणि अशा कल्पनांच्या डब्यांची आगगाडी ज्या दिशेला जातांना दाखवली होती, तिकडे यशाचं, समृद्धीचं प्रतीक काढलेलं होतं. खालीं लिहिलेलं होतं, – ' Ideas lead the way to better quality. — Suggest now !'

– त्याच दिवशी संध्याकाळी साडेसहा वाजतां ओवेन फेअरवेदरनीं अेक मोठी कॉकटेल-डिनर-पार्टी दिली. खाणं-पिणं-गाणं-नाचणं, अेकमेकांना विनोद सांगणं, गमतीदार भाषणं करून सर्वांना हंसवणं वगैरे प्रकारचं पार्टीचं नेहेमींचंच अुत्साहाचं वातावरण होतं. मध्यरात्रीनंतर सर्वजण आपापल्या घरीं गेलीं.

दुसऱ्या दिवशी सकाळपासून ' शिकागो युनिव्हर्सिटी 'मधें मी होतों. दुपारचं जेवणहि आम्हीं तिथंच घेतलं. जेवणाच्या वेळीं तिथल्या ' साअुथ अेशिया रेफरन्स सेंटर 'च्या अधिकारी कु. मॉरिन पॅटर्सन यांची चांगली ओळख झाली. त्या तासभर माझ्याशीं गप्पा मारीत बसल्या होत्या. भारतांत दोनतीनदां अभ्यासाच्या निमित्तानं त्या आलेल्या असल्यानं त्यांना मराठी भाषा चांगली येत होती.

रात्रीं आठ वाजतां जॅक हॉपकिन्सच्या– म्हणजे आतां माझ्याच– घरीं अेक मोठी पार्टी होती. त्या पार्टीला बॅरिंग्टनचे वरच्या वर्तुळांतले बरेच प्रतिष्ठित नागरिक आले होते. त्यांत व्हॉन केंड्रिकसारखे शिल्पकार, मार्व्हिन ब्रॅडलेसारखे व्यंगचित्रकार, मिसेस् डेनिस ब्रुकमन यांच्यासारख्या कादंबरीकार बाअी, जॉन फोर्ब्‌स् नांवाचे कमर्शिअल आर्टिस्ट वगैरे कलाक्षेत्रांतील कलाकार अुपस्थित होते. रात्री अेक-दीड वाजेपर्यंत ही ' पार्टी ' दंगा करीत होती !

ता. १५ ऑगस्ट १९६४ हा भारतीय स्वातंत्र्यदिन आम्ही बॅरिंग्टनचे श्री. वेस्टकॉट यांच्या बंगल्यांत साजरा केला. अमेरिकेसारख्या देशांत आपल्या

देशाचा स्वातंत्र्यदिन साजरा करायचा म्हणून अेक वेगळीच जबाबदारी वाटत होती. त्या दिवसाच्या कार्यक्रमाचा तपशील आदल्याच दिवशीं अेका ठिकाणीं अेकत्र जमून आमच्या ' अिंडियन ग्रुप 'नं ठरवला होता.

सकाळी साडेनअूला मोठ्या अुत्साहानं आम्ही वेस्टकॉट यांच्या बंगल्याच्या विस्तीर्ण आवारात भारतीय राष्ट्रध्वज अुभारून त्याला वंदन केलं. या कार्यक्रमांत सर्व अमेरिकन्सहि सहभागी झाले होते. फोटो तर असंख्य घेतले गेलेच; पण कांहीं जणांनी ह्या सर्व कार्यक्रमाचा चलच्चित्रपटहि घेतला. आमच्या ग्रुपमधल्या प्रा. रॉय यांनीं अुपस्थितांचे आभार मानले. नंतर 'वॅरिंग्टन चर्च 'चे मिनिस्टर रेव्ह. डोनाल्ड ओल्सन यांचं आशीर्वादपर भाषण झालं. नंतर सर्व अुपस्थितांना आमच्या ग्रुपतर्फे भारतीय पदार्थांची छोटीशी पार्टी आम्हीं दिली. पार्टीला शिरा, पकोडे व चहा-कॉफी हे पदार्थ होते. आपला भारतीय शिरा अधिक आकर्षक दिसावा म्हणून आम्हीं त्याच्यावर बेदाणे व बदामाचे काप तर टाकलेच होते, पण शिवाय गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्याहि टाकल्या होत्या. अशा पाकळ्या भारतीय लोक नेहेमीच टाकीत असतील, अशा समजुतीनं अमेरिकनांनीं शिऱ्याबरोबर त्या गुलाबाच्या पाकळ्याहि खाअून टाकल्या. त्या पाकळ्यांची चव त्यांना कशी लागली देव जाणे ! पण 'शिरा फार वंडरफुल झालाय् !'– असं निदान वरकरणीं तरी ते म्हणत होते !

पार्टीच्या वेळी फेअरवेदर, बिंघॅम व हॉपकिन्स ह्या माझ्या तिन्हीहि 'होस्ट फॅमिलीज्' अुपस्थित होत्या. पार्टीनंतर श्री. व सौ. बिंघॅम मला त्यांच्या घरीं घेअून गेलीं. नंतर आम्ही फेअरवेदर यांच्याकडे आलों, अन् तिथंच गप्पा मारीत जेवलों.

संध्याकाळीं 'शिकागो युनिव्हर्सिटी 'मधें तिथल्या ' India Association of Chicago 'तर्फे साजरा केला जाणारा भारतीय स्वातंत्र्यदिनाचा खास कार्यक्रम बघायला सौ. ग्लॅडिस डिकल्मन् यांच्याबरोबर गेलों. प्रा. सौ. सेवती मित्रा ह्या डिकल्मन् यांच्याच घरी रहात होत्या. त्याहि आमच्याबरोबर आल्या. सौ. डिकल्मन् त्या दिवशीं साडी नेसल्या होत्या. त्यांच्या साडी नेसण्यामुळं आम्हांला कार्यक्रमाच्या ठिकाणीं पोंचायला चांगला अर्धापाअूण तास अुशीर झाला. पण तिकडे तो कार्यक्रमहि अुशीरांच सुरू झाल्यानं आम्ही पुन्हा वेळेवरच पोंचलों ! कार्यक्रमाला सुमारं ६०० प्रेक्षक अुपस्थित होते. त्यांत अमेरिकन्स् व अितर परदेशी लोकहि खूप होते. स्टेजच्या अेका बाजूला अमेरिकन राष्ट्रध्वज व दुसऱ्या बाजूला भारतीय राष्ट्रध्वज लावलेला होता. पण भारतीय ध्वज प्रेक्षकांना नीटसा दिसतच नव्हता अशा जागीं होता. मायक्रोफोनहि नीट चालत नव्हता. त्यामुळं कांहीं अैकायलाच येत नव्हतं. आणि 'अैकायला येत नाहीं तेंच बरं आहे' असं

वाटण्याअितके सामान्य दर्जाचे कार्यक्रम चाललेले दिसत होते. कांहीं कार्यक्रम तर हास्यास्पद झाले. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशींहि परदेशांतल्या भारतीयांनीं आपली अशी बेअब्रू कां करून घ्यावी तें कळत नाहीं.

सतरा तारखेला श्री. अेम्. अे. मिलर व सौ. मोनिका मिलर यांनीं संध्याकाळी सहाला त्यांच्या घरी मला डिनर-पार्टीला नेलं. श्री. मिलर यांना मायकेल व हार्लेन नांवाचे दोन मुलगे होते, आणि निना नांवाची कॉलेजांत दुसऱ्या वर्षाला असलेली मुलगी होती. या मुलीला लिहिणं, वाचणं आणि पोहणं यांची फार आवड होती. माझ्यावरोबर जेवायला म्हणून श्री. मिलरनीं श्री. व सौ. कूंझ (Koonz) व त्यांची चार मुलं यांनाहि बोलावलं होतं. सौ. मोनिका मिलर ह्या अेके काळीं रंगभूमीवर काम करणाऱ्या नटी होत्या. त्यामुळं गप्पांच्या ओघांत त्यांनीं राजकारणाबरोबरच आपल्या देशांतील चित्रपट-नाट्यसृष्टीची चौकशी केली. रात्रीं दहाच्या सुमाराला कूंझ-कुटुंब घरीं गेलं. श्री. मिलर हे दुसऱ्या दिवशीं लवकर उठून कामाला जायचं म्हणून माझी क्षमा मागून त्याच वेळीं झोंपायला गेले. सौ. मिलर व निना यांनीं मात्र माझ्याशीं गप्पा मारीत मला रात्रीं साडेबारापर्यंत बसवून ठेवलं. नंतर त्या दोघी मला हॉपकिन्स यांच्या घरीं पोंचवायला गाडी घेअून निघाल्या. त्यांच्या घरापासून हॉपकिन्स यांचा बंगला सुमारं दहा मैल लांब होता. वाटेंत जंगलासारखी दाट झाडी होती. वेळ रात्रीची होती. रस्त्यावरच्या पाट्या नीट न दिसल्यामुळं आम्ही रस्ता चुकलों. अर्धा तास त्या जंगलवजा झाडींत रस्ता शोधीत आम्ही फिरत होतों. पण मोनिका व निना या दोघीही मुळीच घाबरल्या नाहीत. उलट शांतपणं मलाच धीर देत त्यांनी अर्ध्या तासानं योग्य रस्ता शोधून काढला, अन् मला माझ्या घरी पोंचवलं. कोणत्याहि प्रसंगीं घाबरून जाअून हातपाय गाळायचे नाहींत, तर प्राप्त परिस्थितींतून विचारपूर्वक मार्ग काढायचा, ही अमेरिकनांची मनोवृत्ति तिथल्या स्त्रियांच्याहि रक्तांत भिनली आहे हें ह्या प्रसंगानं मला दिसून आलं.

दुसऱ्या दिवशीं 'शिकागो बोर्ड ऑफ ट्रेड' हा अमेरिकन धान्याचा वायदेबाजार पाहिला. त्यांच्या ५० सीट्स्च्या छोट्या थिअेटरमधे त्यांनीं आम्हांला वायदेबाजारांसंबंधीं अधिक माहिती देणारी रंगीत फिल्म दाखवली. दुपारीं 'WGN'—TV' हें अमेरिकेंतलं सर्वांत मोठं TV- स्टेशन पाहिलं. सुमारं ४०० माणसं त्या TV– स्टेशनमधे काम करतात. संध्याकाळीं ''Hotel Shangri-la' या शिकागोच्या जगप्रसिद्ध चिनी हॉटेलांत प्रा. अमर डेब्ला, कु. नंदिनी जैन व कु. अंबिका तोलानी यांच्याबरोबर 'डिनर' घेतलं. चौघांचं जेवणाचं बिल १४ डॉलर्स झालं ! 'फ्राअिड राअिस', 'व्हिजिटेबल चौ-मेन', 'चिकन' वगैरे पदार्थ खूपच चविष्ट होते. दिवसभर 'शांग्रिलां'त मुद्दाम रात्रीचं अंधाराचं स्वप्नाळू वातावरण तयार केलेलं असतं. आम्ही बाल्कनींत जेवायला बसलों

होतों. आणि खालच्या बाजूला अेकीकडे सागरतीरावरची रेती टाकून त्यांत दोनतीन नारळाची झाडं अुभीं केलेलीं होतीं. पलिकडच्या आकाशाच्या पडद्यावर चंद्र-चांदण्या वगैरे दिसत होत्या. त्या भारलेल्या काव्यमय वातावरणांतून बाहेर आल्यावर क्षणभर आपण कुठं आहोंत तेंच समजेना !

एकोणीस तारखेला संध्याकाळीं नॉर्मन विट् यांच्या बंगल्यांत आम्हांला 'फेअरवेल पार्टी' होती. कारण बॅरिंग्टनचा आमचा मुक्काम आतां संपत आला होता. जेवणाचा बेत आमच्या ग्रुपमधल्या स्त्रियांनीं केला होता. पुऱ्या, फ्लॉवरची भाजी, पुलाव, चिकन-करी, मक्याचीं भाजलेलीं कणसं, कॉफी, बिअर वगैरे पदार्थ होते. जेवणानंतर आमच्या लोकांचे व अमेरिकनांचे करमणुकीचे कार्यक्रम झाले. कांहीं लोकांनी या सगळ्या कार्यक्रमाचे फोटो घेतले व कांहींनीं चलच्चित्रपट घेतला. सुमारं ७५ अमेरिकन स्त्री-पुरुष कार्यक्रमाला अुपस्थित होते. शेवटीं भारताच व अमेरिकेचं राष्ट्रगीत झालं. मिसेस् ग्लॅडिस डिकल्मन् यांचं भाषण व आमच्या ग्रुपचं आभारप्रदर्शनहि झालं. नंतर पार्टीसाठीं जमलेले लोक परस्परांशीं गप्पा मारीत त्या परिसरांत फिरत असतांना, या 'फेअरवेल पार्टी'साठीं खास निवडलेली अिंग्रजी गाणीं म्हणण्यांत आलीं. रात्रीं बारा– साडेबारापर्यंत हा कार्यक्रम चालला होता.

वीस तारखेला बिघॅम कुटुंबानं आमच्या ग्रुपला त्यांच्या बंगल्यांत बोलावून 'फेअरवेल पार्टी' दिली. खाणं-पिणं-गाणं-नाचणं वगैरे पार्टीचा ठराविक कार्यक्रम झाल्यावर 'स्त्री श्रेष्ठ कीं पुरुष श्रेष्ठ' या विषयावर विनोदी वादविवाद झाला. पार्टीनंतर रात्रीं बारा वाजतां ओवेन व सॅली यांनी मला पुन्हा अेकदां त्यांच्या घरीं नेलं, ड्रिंक दिलं, आणि अखेरचा निरोप देअून हॉपकिन्स यांच्या घरीं आणून पोंचवलं. आतां मात्र खरोखरच पुन्हा आमची भेट होणं कठिण होतं. आणि या भावनेन आमचीं मनं भारावली होती.

– बावीस ऑगस्ट १९६४ला दुपारीं पावणेबारा वाजतां आम्हीं बॅरिंग्टन सोडलं. आम्हांला निरोप द्यायला बस्-स्टॉपवर सुमारं १०० अमेरिकन्स आले होते. त्यांत वीसअेक लहान मुलंहि होतीं.

ज्या गांवाचं, ज्या लोकाचं पूर्वी आम्हीं कधीं नांवहि ऐकलेलं नव्हतं, तें गांव सोडतांना – त्या लोकांचा अखेरचा निरोप घेतांना आम्हांला सर्वांनाच वाअीट वाटत होतं. गेले चार आठवडे आम्ही अनेक लोकांबरोबर हिंडलों, फिरलों, त्यांच्याशीं बोललों, त्यांचे विचार समजून घेतले. शक्य तेवढं त्यांचं जीवनच आम्ही जगलों. गेल्या कांहीं दिवसांत आमच्यांत कुठलेतरी अनामिक बंध निर्माण झाले होते. अेकाच कुटुंबांतल्या माणसांप्रमाणं आमच्यांत जवळचं नातं निर्माण झालं होतं. पुन्हा आतां आयुष्यांत आमची भेट कधीं होणार होती कीं नाहीं कुणास

ठाऊक ! पण बॅरिंग्टनमधल्या अनेक स्त्रीपुरुषांनीं आम्हांला जो स्नेह दिला, जे प्रेम दिलं, त्याच्या सोनेरी आठवणी मात्र आमच्या अंतःकरणांतल्या खोल मखमाली कप्प्यांत अखेरपर्यंत रहाणार होत्या. कधींकाळीं पुन्हां अमेरिकेंत जायचं झालं तर आत्मविश्वासानं आतां आम्हांला असं म्हणतां येईल की : सातासमुद्रापलिकडे एक सुंदर हिमफुलांचा देश आहे. . तिथल्या 'अिलिनॉय' नांवाच्या राज्यांत 'बॅरिंग्टन' नांवाचं एक चिमुकलं हिरवंगार गांव आहे. . . त्या गांवातलं प्रत्येक घर माझं आहे; प्रत्येक माणूस माझं आहे. . . काळाच्या प्रवाहांत कितीहि वर्षं वाहून गेलीं तरी मी त्यांना विसरणार नाहीं. तेहि माझी आठवण ठेवतील. . .

– अखेर बस् हलली. रुमाल हलवून आम्हीं परस्परांचा निरोप घेतला. बॅरिंग्टनपासून कितीतरी दूर येईपर्यंत 'फेअरवेल पार्टी'तल्या अेका गाण्याच्या ओळी माझ्या मनांत रेंगाळत होत्या —


' NOW IS THE HOUR for us to say goodbye
Soon you'll be winging far across the sea.
While you're away , please remember us.
When you'll return you'll find us waiting here....
When you'll return you'll find us waiting here....'

□

# ‘FBI’: अमेरिकेचे डोळे

अमेरिकेसारख्या अेका महान् राष्ट्राची राजधानी असूनहि वॉशिंग्टनबद्दल फारसं आकर्षण मला कधींच वाटलं नाही. वॉशिंग्टन पहाण्यापूर्वी तर माझा हा पूर्वग्रह होताच, पण तें पाहिल्यानंतरदेखील माझ्या मनांत बदल झाला नाहीं. न्यूयॉर्क-शिकागोच्या तुलनेनं वॉशिंग्टन खूपच शांत, संथ असं वाटलं. न्यूयॉर्कचं सळसळणारं तारुण्य, चैतन्य, आणि शिकागोची बेबंद, धुंद जीवनासक्ति वॉशिंग्टन-मधें मला आढळली नाहीं. भूतकाळाबद्दल, इतिहासाबद्दल कांहींकांहीं माणसांना फार ओढ असते. वेड असतं म्हटलं तरी चालेल. मी मात्र त्याला अपवाद असल्यानं, एक जगप्रसिद्ध ऐतिहासिक महत्त्व असलेलं शहर म्हणूनहि वॉशिंग्टन-बद्दल मला प्रेम वाटलं नाहीं. कसं वाटावं? वॉशिंग्टनमधें कुठंहि गेलं तरी ऐतिहासिक व्यक्तींचे पुतळे आणि लहानमोठीं ऐतिहासिक स्मारकं आपला पाठ-पुरावा करतात. फार मोठी परंपरा असलेल्या जुन्या सनातनी घराण्यांत वाढलेल्या अेखाद्या तरुण, सुंदर मुलीला अकाली प्रौढपणा यावा, तसा भास वॉशिंग्टनच्या प्रथम-दर्शनानं मला झाला. असं असलं तरीसुद्धां वॉशिंग्टनमधें मला आकर्षण वाटण्या-सारखी अेक गोष्ट होती. आणि ती म्हणजे ‘फेडरल ब्यूरो ऑफ अिन्व्हेस्टिगेशन’! —‘FBI’

बॅरिंग्टनहून २३ ऑगस्ट १९६४ ला आम्ही वॉशिंग्टनला पोंचलों. पहिले अेकदोन दिवस आमच्या ‘एक्स्पेरिमेंट’ नं नियोजित केलेल्या भरगच्च कार्यक्रमा-



**' FBI ' या जगांतल्या बुद्धिमान संघटनेचें कार्य जिथें चालतें ती ' जस्टिस ' बिल्डिंग.**

नुसार सवध शहर पाहून टाकल. पंचवीस तारखेला दुपारी आम्हांला कुठंहि भटकायच स्वातंत्र्य मिळालं. त्याचा फायदा घेऊन मी ' FBI.'ला भेट दिली. इंग्लंडची ' स्कॉटलंड यार्ड ' आणि अमेरिकेची ' FBI ' या जगप्रसिद्ध गुप्त पोलिस-संघटनांबद्दल मला पूर्वीपासून जिज्ञासा होती. त्यामुळं त्या दिवशीं संधि मिळतांच आम्ही ' FBI 'च्या वॉशिंग्टनमधल्या मुख्य कार्यालयाकडे धांव घेतली- माझ्यावरोबर त्या वेळीं अहमदाबादचे श्री. पारीख आणि कु. वर्षा सेठ, पुण्याच्या कु. अर्मायटी मास्टर व संगमनेरच्या कु शकुंतला देशमुख, ही मंडळी होती.

' द युनायटेड स्टेट्स् डिपार्टमेंट ऑफ जस्टिस 'च्या अतिभव्य अिमारतींत ' FBI 'नं आपला संसार थाटला आहे. ब्रिटिश अमदानीत बांधलेल्या हिंदुस्थानांतल्या कुठल्याहि शहरांतल्या हायकोर्टाच्या इमारतीची आठवण करून देणारी ही विशाल इमारत जगातल्या साऱ्या प्रवाशांचं एक मोठंच आकर्षण बनली आहे. वॉशिंग्टनला आलेला कुणीहि प्रवासी ' FBI 'ला निदान धांवती तरी भेट दिल्याशिवाय रहात नाही. सोमवारपासून शुक्रवारपर्यंत– रोज सकाळी सव्वानऊ वाजल्यापासून दुपारी सव्वाचारपर्यंत तिथे ' गाअिडेड टूर 'साठीं (Guided Tour ) लोकांच्या रांगा अिमारतीच्या आंत कॉरिडॉरमध्ये लागलेल्या असतात. दर दहाबारा मिनिटांनी ' FBI ' चे खास शिक्षण दिलेले अधिकारी ' क्यू 'जवळ येतात, आणि क्यू 'मधल्या पहिल्या दहापंधरा लोकांचा अेकेक गट बनवून 'FBI'चे कार्यालय दाखवण्यासाठी त्याला आपल्याबरोबर घेऊन जातात. ह्या प्रकारच्या ' गाअिडेड टूर 'साठी कांहीहि फी द्यावी लागत नाहीं, किंवा कोणत्याहि प्रकारें

'FBI' ला आधीं कळवावें लागत नाहीं.

आमच्या 'ग्रुप'चा मार्गदर्शक अेक फार उमद्या व्यक्तिमत्त्वाचा तरुण अमेरिकन अधिकारी होता. सहा फुटांपेक्षां अधिक उंचीच्या त्या देखण्या तरुणानं कमालीचा व्यवस्थित पोषाख केलेला होता. आमच्यासारख्या भावड्या प्रेक्षकांच्या अजाण शंकाकुशंकांना न कंटाळतां तो प्रत्येक वेळीं हंसतमुखानं उत्तर देत होता. कार्यालयांतले एकेक विभाग दाखवतांना गप्पा मारतांमारतां मधेंच एखादवेळीं तो मिस्किलपणं कांही विनोद करून सर्वांना हंसवीत होता. त्याच्यासारख्या बहुश्रुत आणि मिस्किल तरुणाच्या सहवासांत 'FBI' च्या कार्यालयांत फिरून अमेरिकेच्या गुन्हेगारी जगाचा धांवता परिचय करून घेणं हासुद्धां अेक सुखद अनुभव होता. खरं म्हणजे प्रथमदर्शनींच त्यानं आमच्या मनावर चांगलीच छाप पाडली होती. दर वर्षी सुमारं पांच लाख लोक 'FBI' च्या ह्या मध्यवर्ती कार्यालयाला भेट देतात; तेव्हां 'FBI' विषयीं जगांतल्या लोकांचं मत चांगलं व्हायचं असेल तर तिथले अधिकारी असेच असायला हवेत, असं मीं मनाशीं म्हटलं !



'FBI'चे सन्मान्य डिरेक्टर जे. एड्गर हूवर

१९०८ साली अमेरिकेचे त्या वेळचे अॅटर्नी जनरल चार्ल्स बोनापार्ट यांच्या सूचनेनुसार 'FBI' ची स्थापना झाली. 'ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन' हें ह्या सघटनेचं नांव मात्र पुढल्या वर्षी देण्यांत आलं. पहिल्या जागतिक महायुद्धांत परकीय राष्ट्रांच्या अमेरिकेंतील हेरगिरीबाबत फार महत्त्वाची आणि मोठी कामगिरी करावी लागल्यामुळं 'FBI' चा व्याप वाढला. आणि साहजिकच राष्ट्राच्या दृष्टीनं तिचं महत्त्वहि वाढलं.

'FBI' चे सध्याचे डिरेक्टर जॉन अेड्गर हूवर यांची १९२४ सालीं डिरेक्टर म्हणून नेमणूक झाली. त्या वेळी ते अवघे २९ वर्षांचे होते. 'FBI' ला आज सर्वांत मोठ्या महत्त्वाच्या राष्ट्रव्यापी संघटनेचा दर्जा मिळवून देण्याला जे. अेड्गर हूवर यांचं अत्यंत कुशल असं नेतृत्वच कारणीभूत झालेलं आहे यांत शंका नाहीं. श्री. हूवर यांचा जन्म कोलंबियामध्यें १ जानेवारी १८९५ रोजीं झाला. 'जॉर्ज वॉशिंग्टन युनिव्हर्सिटी'ची 'मास्टर ऑफ लॉज्' ही पदवी त्यांनीं घेतलेली आहे. त्याशिवाय अमेरिकेंतल्या अेकूण १८ विद्यापीठांनीं त्यांना अनेक सन्माननीय पदव्या दिलेल्या आहेत. त्यांनीं लिहिलेलीं तीन पुस्तकं प्रसिद्ध आहेत– (i) 'Persons In Hiding.' (ii) 'Masters of Deceit' (iii) 'A Study of Communism.' 'FBI'च्या आपल्या आजपर्यंतच्या प्रमुखपदाच्या कारकीर्दीत अमेरिकेंतील फार मोठमोठीं सन्मानपदकं हूवरनीं मिळवलेलीं आहेत. अत्यंत प्रभावी आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेल्या जे. अेड्गर हूवर यांचा, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांप्रमाणंच शांततापूर्ण सुरक्षित जीवन जगू इच्छिणाऱ्या सर्वसामान्य नागरिकालाहि आधार वाटतो.

अमेरिकेंतल्या व्हर्जिनिया स्टेटमधील 'क्वांटिको' येथे 'FBI'– अॅकॅडमींत 'FBI'चे एजंट्स् आणि पोलिस-ऑफिसर्स यांना खास पद्धतीचं प्रशिक्षण दिलं जातं. या अॅकॅडमीत शिक्षण घेऊन तयार झालेले 'FBI' चे अधिकारी नंतर मग वॉशिंग्टनच्या 'FBI'च्या मध्यवर्ती कार्यालयांत अगर अमेरिकेंत दूरवर पसरलेल्या अेकूण ५५ फील्ड ऑफिसेस्‌पैकी एखाद्या ठिकाणी काम करायला लागतात.

राष्ट्राच्या दृष्टीनं फार मोलाची असलेलीं मोठमोठी कामं अंगावर घेऊन ती अत्यंत तत्परतेनं पार पाडण्याबद्दल 'FBI' ची ख्याति आहे. दुसऱ्या महायुद्धांतहि 'FBI'नं राष्ट्रसंरक्षणाचं काम फार चांगल्या रीतीनं पार पाडलं आहे.

रविवार ता. ७ डिसेंबर १९४१ हवाओी बेटांत सकाळचे सात वाजून पंचावन्न मिनिटं झालेलीं होती. 'FBI'च्या होनोलुलु येथील ऑफिसनं वॉशिंग्टनच्या मध्यवर्ती कार्यालयाला फोन केला आणि घाईघाईनं एक धक्कादायक बातमी कळवली. जपानच्या बाँबर विमानांनी 'पर्ल हार्बर'वरनी अचानकपणं बाँबहल्ला केला होता. युद्धांत कोणत्याहि क्षणी कांहींहि घडू शकतं. त्या दृष्टीनं

' FBI 'चे प्रमुख अधिकारी सावध होतेच. अमेरिकेच्या भूमीपर्यंत युद्ध पोंचलंच तर काय करायचं त्याची योजना त्यांनीं आधींच आंखून ठेवलेली होती. पर्ल हार्बरवरती अजून बॉंब्स् पडतच होते. तेवढ्या वेळांत इकडे अमेरिकेंतल्या ' FBI ' च्या एकूणएक कार्यालयांना सावधगिरीच्या सूचना देण्यांत आल्या. अवघ्या एका तासाच्या आंतच सबंध राष्ट्रभर पसरलेल्या ' FBI 'च्या जाळ्यांत काम करणारा प्रत्येक लहानमोठा नोकर आपापल्या जागीं हजर झाला. असा प्रसग आलाच तर पुढं काय करायचं हें प्रत्येकाला आधीच माहीत होतं. ' FBI 'चं सारं बुद्धिमान् मनुष्यबळ आणि अमेरिकेच्या पोलिस-खात्यांतील १५०००० पेक्षां अधिक लोक यांनीं कांहीं क्षणांत हातमिळवणी केली आणि अशा प्रसंगीं हमखास घडणाऱ्या पंचमस्तंभीयांच्या घातपाताच्या हालचाली मुळांतच मोडून काढल्या. ' FBI 'ची दहशत शत्रुराष्ट्रांतील हेरखात्यालासुद्धा इतकी बसलेली होती कीं, अमेरिकेंत पाठवण्यांत येणाऱ्या प्रत्येक हेराला स्पष्ट शब्दांत आज्ञाच असे की : ' कोणत्याहि परिस्थितींत ' FBI 'चं लक्ष स्वत:कडे वेधून घेऊं नका.'

१९४२ चा जून महिना उजाडला. रात्रीच्या अंधारांत दोन जर्मन यू-बोटी कसलाहि आवाज न करतां अगदीं गुप्तपणं अमेरिकेच्या किनाऱ्याला लागल्या. आणि प्रत्येक बोटींतून घातपात करण्यांत अत्यंत तरबेज असे चारचार जर्मन्स खालीं उतरले. त्यांतल्या चौघांच्या एका गटानं ' लॉंग आयलंड 'वर पाऊल टाकलं. आणि दुसरा गट ' फ्लॉरिडा 'जवळच्या एका निर्जन समुद्रकिनाऱ्यावर उतरला. त्यांच्याजवळ अमेरिकन चलनाच्या १७४५८८ डॉलर्सच्या नोटा होत्या. आणि दोन वर्षं पुरेल एवढा घातपाती दारूगोळ्याचा सांठा होता. किनाऱ्याला पाय लागतांच ते आपली दहशतवादी विध्वंसक कृत्यांची योजना पार पाडण्यासाठीं तांतडीनं न्यूयॉर्कला आणि शिकागोला निघून गेले. नाझी अधिकाऱ्यांनीं त्यांना दिलेल्या आज्ञा अगदीं स्पष्ट होत्या :— ' न्यूयॉर्कमधला ' हेल गेट ब्रिज ' डायनामाइटनं उडवून द्या. युद्ध साहित्यासाठी उपयोगी पडणारी ' ॲल्युमिनिअम प्लँट्स् ' नष्ट करा. रेल्वे स्टेशन्समधे असलेल्या ' लॉकर्स 'मधें ' टाअिम बॉंब्स् ' ठेवा. मोठमोठ्या डिपार्टमेंट स्टोअर्समधें पिसाटासारखा गोळीबार करा. अमेरिकेंत सगळीकडे दहशतीचं वातावरण पसरवा. आणि घातपाती हेरांचं एक सैन्यच अमेरिकेवर चालून आलय् असा आभास निर्माण करा.'

त्या आठ जणांची कमालीच्या कसोशीनं निवड करण्यांत आलेली होती. पण अमेरिकेच्या भूमीवर पाय ठेवल्यापासून दोन आठवड्यांच्या आंतच ते आठहि जर्मन्स ' FBI 'च्या कोठडीत डांबले गेले. राष्ट्राध्यक्षांच्या खास हुकमानुसार मिलिटरी कमिशनपुढं त्यांच्यावर खटला भरण्यांत आला. आणि ८ ऑगस्ट १९४२ रोजीं त्यांच्यापैकीं सहा जणांना देहान्ताची शिक्षा झाली. एकाला जन्मठेप झाली आणि अकाला तीस वर्षं सक्तमजुरीची शिक्षा झाली.

वास्तविक दुसऱ्या महायुद्धानंतर ' FBI 'वरची कामाची जबाबदारी वेगानं कमी व्हायला पाहिजे होती. पण अमेरिकन लोकशाहीच्या मूळ अस्तित्वालाच धोक्यांत आणण्याचा उद्योग कम्युनिस्ट पक्षानं सुरू केला. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत अमेरिकेंत कम्युनिस्ट पक्षाचे अेकूण ७४००० सभासद होते. त्यांची निष्ठा अर्थातच ' वॉशिंग्टन 'कडे नसून ' मॉस्को 'कडे होती. नंतरच्या काळांत कम्युनिस्टपार्टीच्या सभासदांची संख्या हळूहळू कमी होत गेलेली असली, तरी कम्युनिस्टांची जात अत्यंत चिवट व कडवी असल्यामुळं त्यांच्यावर सतत लक्ष ठेवणं ' FBI ' ला भागच होतं. ' FBI 'नं आजपर्यंत जमा केलेल्या पुराव्याच्या आधारानं कितीतरी कम्युनिस्टांना राष्ट्राची अंतर्गत सुरक्षितता धोक्यांत आणल्यावरून लहानमोठ्या शिक्षा झालेल्या आहेत. कम्युनिस्टांचीं गुप्तपणं कार्य करण्याचीं क्षेत्रंसुद्धां आतां सर्वांना माहीत झालेलीं आहेत. ते शाळा-कॉलेजांत घुसतात, कामगार-युनियन्समधें असतातच, शिवाय निरनिराळ्या सामाजिक संस्थांत आणि चर्चेस्‌मधेंहि घुसतात. त्यांच्या या सर्वसंचारीपणामुळंच ' FBI 'ला कम्युनिझम्‌विरुद्ध एक प्रभावी मोहीमच सुरू करावी लागली आहे.

कम्युनिस्टांनीं अमेरिकेचं सर्वांत मोठं नुकसान केलं असेल तर तें १९५०–५१ सालीं. सोव्हिएट रशियासाठीं हेरगिरी करून अमेरिकेचं अण्वस्त्रांचं गुपित रशियाला पुरवल्याबद्दल ज्युलिअस आणि एथेल रोझेन्बर्ग या पतिपत्नींना देहान्ताची सजा झालेली आहे.

गंमत अशी कीं, दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत दोस्तराष्ट्र म्हणून अमेरिकेच्या गळ्यांत गळा घालणारा रशिया, त्या युद्धाच्या काळांतहि अमेरिकेंत हेरगिरी करून अमेरिकन अण्वस्त्रांचीं व इतर संरक्षणअस्त्रांची गुपितं पळवण्याचा प्रयत्न करीतच होता. एखाद्या राष्ट्रानं ' भाई-भाई 'चा काळ चालू असतांनाहि डोकं ठिकाणावर ठेवायचं असतं तें एवढ्यासाठींच !

'FBI'चे डिरेक्टर जे. अेड्गर हूवर यांनीं १९६० सालीं लिहिलेल्या अेका लेखांतला कांहीं भाग ' FBI 'नें एका पत्रिकेंत पुनर्मुद्रित केला आहे. कम्युनिस्टांचं ध्यय व धोरण त्या लेखांतील एका परिच्छेदांत अगदीं स्पष्टपणं प्रकट झालेलं आहे. ' गस् हॉल ' ( (Gus Hall) ) नांवाच्या एका कडव्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यावर त्याच्या राष्ट्रद्रोही कृत्यांबद्दल १९३४ सालीं मिनेसोटांत खटला चालू होता. त्या वेळीं त्याला विचारलेल्या प्रश्नांचीं त्यानं दिलेलीं उत्तरं अितकीं बोलकीं आहेत की त्यावर अधिक कांहीं भाष्य करायलाच नको ! जे. अेड्गर हूवर यांनीं तीं शब्दशः दिलेलीं आहेत :

प्रश्न :— But you would prefer the Russian— you would prefer to be in Russia?

उत्तर :—I prefer America with a Soviet government.

प्रश्न :—And you are willing to fight and overthrow this government?

उत्तर :—Absolutely.

प्रश्न :—And you are willing to take up arms and overthorw the constituted authorities?

उत्तर :—When the time comes , yes!

अमेरिकेसारख्या अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असलेल्या प्रगत राष्ट्रालाहि जो धोक्याचा 'लाल' कंदील दिसला, त्याच्या प्रकाशाचे चार विषारी किरण जरी आपल्या दृष्टिपथांत आले तरी पुरेत! गस् हॉलचे ऐतिहासिक महत्त्वाचे ते पांच शब्द आपणहि लक्षांत ठेवायला हवेत :– 'When the time comes, yes!'......

'कम्युनिझम्'शी झुंज घेणं हा 'FBI'च्या अनेक कार्यांपैकीं एका कार्याचा भाग झाला. ह्या कामाशिवाय 'FBI'ला अितर अनेक प्रकारचीं कामं करावीं लागतात. आणि त्यासाठी 'FBI'च्या मुख्य कार्यालयानं अनेक स्वतंत्र विभाग चालवले आहेत. 'FBI'च्या अनेकविध कामांची व्याप्ति अेका वाक्यांत सांगायची झाली तर असं म्हणतां येईल कीं, फेडरल गव्हर्न्मेंटच्या अेकूण १७० पेक्षां अधिक कायद्यांचा भंग 'FBI'च्या चौकशीच्या कक्षेमधें येतो. चोऱ्या, खून, दरोडे, बलात्कार, परक्या राष्ट्राच्या हेरांची हेरगिरी, बनावट चलनी नोटा, बनावट कागदपत्रं– इत्यादि अनेक प्रकारच्या गुन्ह्यांची चौकशी 'FBI'ला करावी लागते. आणि 'FBI'नं एकदा एखाद्या गुन्हेगाराच्या चौकशीचं काम हातांत घेतलं की शिक्षेवांचून त्याची सुटका नाही! या बाबतींतली 'FBI'ची कार्यक्षमता विलक्षण आश्चर्यकारक आहे. १९४५ सालापासून आजपर्यंत 'FBI'नं ज्या केसेस् हातांत घेतल्या त्यांपैकीं शेंकडा ९५ टक्क्यांपेक्षां अधिक 'केसेस्'मधें गुन्हेगारांना शिक्षा झाल्या. 'FBI'चा आर्थिक क्षेत्रांतला पराक्रमहि वाखाणण्यासारखा आहे. एकट्या १९६२ सालांत दंड, वचत आणि वसुलीच्या रूपानं 'FBI'नं अेकूण १७४५६१३४१ डॉलर्सची भर सरकारी तिजोरींत टाकली. हें सारं काम 'FBI'च्या 'जनरल अिन्व्हेस्टिगेटिव्ह डिव्हिजन'नं केलं.

'FBI'च्या 'स्पेशल अिन्व्हेस्टिगेटिव्ह डिव्हिजन'चं काम अितर कोणत्याहि विभागापेक्षां अधिक कष्टाचं, जोखमीचं आणि प्रसंगीं 'FBI'च्या एजंट्स्च्या जिवावर बेतणारंसुद्धां असतं. चोरी, खून, बलात्कार किंवा त्यासारखा एखादा मोठा गुन्हा करून पळालेले गुन्हेगार, तुरुंगांतून पळालेले कैदी, अमेरिकेच्या एका

वास्तविक दुसऱ्या महायुद्धानंतर ' FBI 'वरची कामाची जबाबदारी वेगानं कमी व्हायला पाहिजे होती. पण अमेरिकन लोकशाहीच्या मूळ अस्तित्वालाच धोक्यांत आणण्याचा उद्योग कम्युनिस्ट पक्षानं सुरू केला. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत अमेरिकेंत कम्युनिस्ट पक्षाचे अेकूण ७४००० सभासद होते. त्यांची निष्ठा अर्थातच ' वॉशिंग्टन 'कडे नसून ' मॉस्को 'कडे होती. नंतरच्या काळांत कम्यु-निस्टपार्टीच्या सभासदांची संख्या हळूहळू कमी होत गेलेली असली, तरी कम्यु-निस्टांची जात अत्यंत चिवट व कडवी असल्यामुळं त्यांच्यावर सतत लक्ष ठेवणं ' FBI ' ला भागच होतं. ' FBI 'नं आजपर्यंत जमा केलेल्या पुराव्याच्या आधारानं कितीतरी कम्युनिस्टांना राष्ट्राची अंतर्गत सुरक्षितता धोक्यांत आणल्या-वरून लहानमोठ्या शिक्षा झालेल्या आहेत. कम्युनिस्टांचीं गुप्तपणं कार्य कर-ण्याची क्षेत्रंसुद्धां आतां सर्वांना माहीत झालेलीं आहेत. ते शाळा-कॉलेजांत घुसतात, कामगार-युनियन्समधें असतातच, शिवाय निरनिराळ्या सामाजिक संस्थांत आणि चर्चेस्‌मधेंहि घुसतात. त्यांच्या या सर्वसंचारीपणामुळंच ' FBI 'ला कम्युनिझम्‌विरुद्ध एक प्रभावी मोहीमच सुरू करावी लागली आहे.

कम्युनिस्टांनीं अमेरिकेचं सर्वांत मोठं नुकसान केलं असेल तर तें १९५०–५१ सालीं. सोव्हिएट रशियासाठीं हेरगिरी करून अमेरिकेचं अण्वस्त्रांचं गुपित रशियाला पुरवल्याबद्दल ज्युलिअस आणि एथेल रोझेन्बर्ग या पतिपत्नींना देहान्ताची सजा झालेली आहे.

गंमत अशी कीं, दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत दोस्तराष्ट्र म्हणून अमेरिकेच्या गळ्यांत गळा घालणारा रशिया, त्या युद्धाच्या काळांतहि अमेरिकेंत हेरगिरी करून अमेरिकन अण्वस्त्रांचीं व इतर संरक्षणअस्त्रांची गुपितं पळवण्याचा प्रयत्न करीतच होता. एखाद्या राष्ट्रानं ' भाई-भाई 'चा काळ चालू असतांनाहि डोकं ठिकाणा-वर ठेवायचं असतं तें एवढ्यासाठींच !

'FBI'चे डिरेक्टर जे. अेड्‌गर हूवर यांनीं १९६० सालीं लिहिलेल्या अेका लेखांतला कांहीं भाग ' FBI 'नें एका पत्रिकेंत पुनर्मुद्रित केला आहे. कम्यु-निस्टांचं ध्यय व धोरण त्या लेखांतील एका परिच्छेदांत अगदीं स्पष्टपणं प्रकट झालेलं आहे. ' गस् हॉल ' ( (Gus Hall) ) नांवाच्या एका कडव्या कम्युनिस्ट कार्य-कर्त्यावर त्याच्या राष्ट्रद्रोही कृत्यांबद्दल १९३४ सालीं मिनेसोटांत खटला चालू होता. त्या वेळीं त्याला विचारलेल्या प्रश्नांचीं त्यानं दिलेलीं उत्तरं अितकीं बोलकीं आहेत कीं त्यावर अधिक कांहीं भाष्य करायलाच नको ! जे. अेड्‌गर हूवर यांनीं ती शब्दश: दिलेलीं आहेत :

प्रश्न :— But you would prefer the Russian— you would prefer to be in Russia?

उत्तर :—I prefer America with a Soviet government.

प्रश्न :—And you are willing to fight and overthrow this government?

उत्तर :—Absolutely.

प्रश्न :—And you are willing to take up arms and overthorw the constituted authorities?

उत्तर :—When the time comes , yes!

अमेरिकेसारख्या अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असलेल्या प्रगत राष्ट्रालाहि जो धोक्याचा ‘ लाल ’ कंदील दिसला, त्याच्या प्रकाशाचे चार विषारी किरण जरी आपल्या दृष्टिपथांत आले तरी पुरेत ! गस् हॉलचे अैतिहासिक महत्त्वाचे ते पांच शब्द आपणहि लक्षांत ठेवायला हवेत :– ‘ When the time comes, yes !’......

‘ कम्युनिझम् ’शीं झुंज घेणं हा ‘FBI’च्या अनेक कार्यांपैकीं एका कार्याचा भाग झाला. ह्या कामाशिवाय ‘FBI’ला अितर अनेक प्रकारचीं कामं करावीं लागतात. आणि त्यासाठीं ‘FBI’च्या मुख्य कार्यालयानं अनेक स्वतंत्र विभाग चालवले आहेत. ‘FBI’च्या अनेकविध कामांची व्याप्ति अेका वाक्यांत सांगायची झाली तर असं म्हणतां येईल कीं, फेडरल गव्हर्न्मेंटच्या अेकूण १७० पेक्षां अधिक कायद्यांचा भंग ‘FBI’च्या चौकशीच्या कक्षेमध्यें येतो. चोऱ्या, खून, दरोडे, बलात्कार, परक्या राष्ट्राच्या हेरांची हेरगिरी, बनावट चलनी नोटा, बनावट कागदपत्रं– इत्यादि अनेक प्रकारच्या गुन्ह्यांची चौकशी ‘ FBI ’ला करावी लागते. आणि ‘ FBI ’नं एकदा एखाद्या गुन्हेगाराच्या चौकशीचं काम हातांत घेतलं कीं शिक्षेवांचून त्याची सुटका नाहीं ! या बाबतींतली ‘ FBI ’ची कार्यक्षमता विलक्षण आश्चर्यकारक आहे. १९४५ सालापासून आजपर्यंत ‘ FBI ’नं ज्या केसेस् हातांत घेतल्या त्यांपैकीं शेंकडा ९५ टक्क्यांपेक्षा अधिक ‘ केसेस् ’मध्यें गुन्हेगारांना शिक्षा झाल्या. ‘ FBI ’चा आर्थिक क्षेत्रांतला पराक्रमहि वाखाणण्यासारखा आहे. एकट्या १९६२ सालांत दंड, बचत आणि वसुलीच्या रूपानं ‘ FBI ’नं अेकूण १७४५६१३४१ डॉलर्सची भर सरकारी तिजोरींत टाकली. हें सारं काम ‘ FBI ’च्या ‘ जनरल अिन्व्हेस्टिगेटिव्ह डिव्हिजन ’नं केलं.

‘ FBI ’च्या ‘ स्पेशल अिन्व्हेस्टिगेटिव्ह डिव्हिजन ’चं काम अितर कोणत्याहि विभागापेक्षां अधिक कष्टाचं, जोखमीचं आणि प्रसंगीं ‘ FBI ’च्या एजंट्स्च्या जिवावर बेतणारंसुद्धां असतं. चोरी, खून, बलात्कार किंवा त्यासारखा एखादा मोठा गुन्हा करून पळालेले गुन्हेगार, तुरुंगांतून पळालेले कैदी, अमेरिकेच्या एका

राज्यांत गुन्हा करून अटक चुकवण्यासाठीं दुसऱ्या राज्यांत पळालेले गुन्हेगार, दरोडेखोरांनीं पैशासाठी पळवून नेलेल्या व्यक्ती, अचानक बेपत्ता झालेल्या व्यक्ती इत्यादिकांना शोधून काढणं, शस्त्रसज्ज गुन्हेगारांशीं सामना देऊन त्यांना पकडणं वगैरे प्रकारचीं कामं प्रामुख्यानं ह्या विभागाच्या कक्षेंत येतात. १९३४ सालापासून या सर्व प्रकारच्या कामांसाठीं व स्वसंरक्षणासाठीं 'FBI' एजंट्स्ना पिस्तुलं, बंदुका वगैरे शस्त्रं वापरण्याचा अधिकार देण्यांत आलेला आहे. तेव्हांपासून अक्षरशः हजारों पळालेल्या किंवा पळवलेल्या व्यक्तींचा शोध 'FBI'नं लावलेला आहे. हें काम करतांना 'FBI' एजंट्स्ना नेहेमींच आपला जीव धोक्यांत घालून गुन्हेगारांशीं शस्त्रास्त्रांनीं सामना द्यावा लागतो. अशा प्रकारच्या जीवघेण्या चित्तथरारक सामन्यांत आजपर्यंत फक्त ३७ गुन्हेगारांना गोळ्या घालाव्या लागलेल्या आहेत. आणि गुन्हेगारांनीं १४ 'FBI' एजंट्स्चा बळी घेतलेला आहे.

गुन्हेगारांना अटक करतांना कोणत्या प्रकारच्या योजना यशस्वी होऊं शकतात, कोणत्या चुका घडूं शकतात, याबद्दलचं शिक्षण प्रात्यक्षिकांसह 'FBI' अेजंट्स्ना नित्य देण्यांत येतं. आपल्याला अटक होऊं नये म्हणून चलाख गुन्हेगार कोणकोणत्या युक्त्या करतात तें समजून घेणं मनोरंजक आहे. जॉन डिलिंजर नांवाच्या साऱ्या अमेरिकेंत प्रसिद्ध असलेल्या कुविख्यात बदमाषानं 'प्लॅस्टिक सर्जरी' करून घेतली होती. त्यापेक्षां जरा कमी हुषार गुन्हेगार स्वतःचं वजन वाढवणं अगर कमी करणं, डोक्यावरच्या केंसांचा व मिश्यांचा रंग बदलणं, स्त्रीचा वेष घेणं वगैरे युक्त्यांचा अवलंब करतात. 'FBI'ला अत्यंत हव्या असलेल्या दहा फरारी अिसमांपैकीं अेक– डॅनिअेल विल्यम ओ'कॉन्नर ह्यानं तर आपलं संपूर्ण व्यक्तिमत्त्वच पार बदलून टाकलं! शेजारींशेजारीं छापलेले त्याचे दोन फोटो पाहूनहि दोन्ही फोटोंतला अिसम अेकच आहे यावर आपला विश्वास बसणं कठिण! 'FBI'ला चकवण्यासाठीं डॅनिअेलनं आपल्या केंसांचं वळण बदललं, मिश्या ठेवल्या, केंसांना व मिश्यांना रंग देऊन घेतला, हातावरती गोंदवून घेतलं, आणि आपलं वजन ५० पौंडांनी वाढवून तो चांगला गलेलठ्ठ बनला. फक्त अेक गोष्ट मात्र त्याला बदलतां आली नाहीं! – आणि ती म्हणजे त्याच्या तळहातावरच्या रेषा. त्याच्या बोटांच्या ठशांमुळंच अखेरीस तो खरा कोण आहे हें उघडकीस आलं.

नुसतं वेषांतर करूनच गुन्हेगार थांबत नाहींत, तर 'FBI' च्या पोलादी पंज्यांतून निसटण्यासाठीं शंकासुद्धां येणार नाहीं अशा ठिकाणीं ते लपून रहातात. कुणी जंगलांत लपतात, कुणी जमिनींत भुयार खणून त्यांत रहातात, कुणी डोंगरांच्य गुहेंत आश्रय घेतात, तर कुणी अिमारतीच्या भिंतींत गुप्त 'कंपार्टमेंट' तयार करून तिथं वास्तव्य करतात. अशा नाना प्रकारच्या ठिकाणीं लपणाऱ्या गुन्हे-

गारांना हुडकून काढून त्यांच्याशी दोन हात करून त्यांना अटक करणं म्हणजे खरो-खरच अेक दिव्य आहे ! पण 'FBI' अेजंट्स्च्या तें अंगवळणीं पडलेलं आहे.

अमेरिकेसारख्या खंडप्राय राष्ट्राच्या अंतर्गत सुरक्षिततेच्या बाबतींत FBI 'च्या 'डोमेस्टिक अिंटेलिजन्स डिव्हिजन 'नं आजपर्यंत फार मोठी कामगिरी बजावली आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी, युद्ध सुरू झालंच तर युद्धकाळांत कोणकोणत्या गोष्टी सुरक्षिततेसाठी कराव्या लागतील, याबद्दलची अेक योजना आंखून 'FBI 'नं सुमार १९००० पोलिस-अेजन्सीज्ना स्पष्ट सूचना दिल्या होत्या. आगाअू घेतलेल्या या खबरदारीचा अुपयोग लौकरच दिसून आला. ७ डिसेंबर १९४१ रोजीं सकाळीं जपाननं अमेरिकेच्या पर्ल हार्बरवर अगदी अनपेक्षितपणं बाँबहल्ला केला. आणि ८ डिसेंबरची रात्र अुजाडायच्या आंतच ज्यांची निष्ठा शत्रूच्या राष्ट्राकडे असण्याची शक्यता होती, अशा ११०० पेक्षां अधिक अिसमांना 'FBI 'नं अटक करून तुरुंगाच्या कोठडींत त्यांची रवानगी केली. त्यानंतर वर्षभरांतच चाळीसपेक्षां अधिक परकीय हेर 'FBI 'नं पकडले. 'FBI 'नं घेतलेल्या ह्या खबरदारीमुळंच सबंध युद्धकाळांत शत्रुराष्ट्राच्या प्रेरणेनं एकहि घातपाती कृत्य घडलं नाहीं. पुढं जून १९५७ मधे 'FBI 'नं पकडलेल्या कर्नल रुडॉल्फ अिव्हॅनोविच् अबेल या रशियन हेराचं प्रकरण खूप गाजलं. ह्या रुडॉल्फ अिव्हॅनोविच् अबलच्या हेरगिरीची 'FBI 'नं प्रत्यक्ष घेतलेल्या फोटोंवरून तयार



**सांगून विश्वास बसणें कठिण; पण या दोन्ही व्यक्ती एकच आहेत ! 'टेन मोस्ट वाँटेड फ्युजिटि व्हज्' पैकी एक 'मेंबर' डॅनिएल विल्यम ओ'कॉन्नर. गुन्हा दडवण्यासाठीं डॅनिएलचा हा रूपांतराचा खटाटोप !**

केलेली चित्रकथा वॉशिंग्टनच्या मध्यवर्ती कार्यालयांत मीं पाहिली. अमेरिकेंतील नागरिकांना असलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा भरपूर फायदा घेणारा हा रशियन हेर अनेक खोटीं नांवं धारण करून अमेरिकेंत सर्वत्र मुक्त संचार करीत होता.

'FBI 'चं कार्य किती शिस्तीनं आणि पद्धतशीर रीतीनं चालतं हें बघायचं असेल तर 'FBI 'च्या 'फाअिल्स अँड कम्युनिकेशन्स डिव्हिजन 'ला भेट द्यावी. या विभागांत निरनिराळ्या कामासाठीं निरनिराळ्या खोल्या आहेत. 'ऑपरेटिंग रूम', 'ट्रान्समीटर रूम', 'मेल ( Mail ) रूम' ह्या तर अखंड गडबडींत असणाऱ्या खोल्या आहेत. ह्याशिवाय लाखों 'अिंडेक्स कार्डस्' संग्रहित करण्या-साठीं व त्यांच्या त्वरित संदर्भासाठीं शेंकडों लोखंडी छोटया 'फाअिल कॅबिनेट्स्' आहेत. ३"×५" या आकाराचीं अेकूण ४८००००००० अिंडेक्स कार्डस् मी गेलों होतों त्या वेळेपर्यंत 'FBI 'च्या संग्रहीं तयार होअून पडलेलीं होतीं. हीं 'कार्डस्' अेकावर अेक ठेवली असती तर त्यांचा ६·३ मैल अुंचीचा अेक प्रचंड ढीग तयार झाला असता. 'FBI 'च्या 'टेलिटाअिप 'च्या जाळ्यामुळं 'FBI 'चं मध्यवर्ती कार्यालय आणि 'FBI ' चीं देशांतलीं सर्व फील्ड ऑफिसेस्' यांच्यांत अक्षरशः चोवीस तास सतत संपर्क ठेवला जातो.

'FBI 'च्या मालकीचीं आणि 'FBI ' मार्फतच चालवलीं जाणारीं रेडिओ-स्टेशन्स वॉशिंग्टन व सॅन डिगो ( कॅलिफोर्निया ) येथें आहेत. शिवाय प्रत्येक फील्ड ऑफिसमधें रेडिओ-संदेश घेण्याची व पाठवण्याची यंत्रसामग्री आहेच. दर वर्षी 'FBI ' ला सुमारं २०००००० पत्रं येतात.


'FBI ' च्या 'आयडेंटिफिकेशन डिव्हिजन 'मधें बोटांच्या ठशांचा जगांतील सर्वात मोठा संग्रह आहे. मी 'FBI 'च्या हेड-ऑफिसमधें गेलों त्या दिवसापर्यंत १७१९९८२२३ फिगर प्रिंट् कार्डस् 'FBI'च्या फाइलींमध्ये संग्रहित केलेली होती. फिंगर प्रिंट् कार्डस् संग्रहित करण्याची ही योजना, 'FBI 'चे डिरेक्टर जे. एड्गर हूवर यांनीं कामाचीं सूत्रं हातांत घेतांच अवघ्या कांहीं महिन्यांतच– १९२४ साली– सुरू केली. सुरुवातीला त्या काळीं या विभा-गांत फक्त २५ माणसं कामाला होतीं. सध्या या 'आयडेंटिफिकेशन डिव्हिजन'-मधें सुमारं २००० माणसं काम करतात. कोणत्याहि दोन माणसांच्या बोटाच्या ठशांत कधीहि साम्य आढळत नाहीं. म्हणूनच गुन्हेगाराची ओळख पटण्यासाठी बोटांच्या ठशांना एवढं महत्त्व दिलं जातं. याशिवाय त्यांचा आणखीहि एखाद-दुसरा उपयोग होण्यासारखा असतो. . अमेरिकेंतल्या एका शहरांतल्या पोलिस हेडक्वार्टर्सला मदतीसाठीं एकदां एक फोन आला. फोन करणाऱ्या माणसानं तो कोणत्या ठिकाणच्या 'टेलिफोन-बूथ 'मधून बोलतो आहे तें सांगितलं होतं. पोलिस-अधिकारी जेव्हां त्या ठिकाणीं पोंचले तेव्हां त्याना असं दिसून आलं कीं

खांद्यावर बंदुक टाकलेला पिंगट केंसांचा एक तरुण त्यांची वाट पहातोय्. पोलिस-अधिकाऱ्यांनीं त्याची चौकशी केली, तेव्हां त्याला कांहीच माहिती सांगतां येईना. आपण स्वत: कोण आहोंत, आपलं नांव काय, आपण ह्या ठिकाणी कुठून आलों आहोंत हेंहि त्याला आठवेना. अचानकपणं त्याला स्मृतिभ्रंश झालेला होता. पोलिसांनीं त्याच्या बोटांचे ठसे 'FBI 'कडे पाठवले. सुमारं अकरा वर्षांपूर्वी ह्या माणसानं आरमारांत प्रवेश केला होता. त्या वेळीं घेतल्या गेलेल्या त्याच्या बोटांच्या ठशांशीं, पोलिसांनीं पाठवलेले ठसे अगदीं तंतोतंत जुळले. आणि तो माणूस कोण होता त्याचं गूढ उकललं.

गुन्हेगार-संशोधनांत आधुनिक शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीची मदत व्हावी ह्या हेतूनं १९३२ साली 'FBI 'ची 'लॅबोरेटरी डिव्हिजन' स्थापन झाली. ह्या लॅबोरेटरींत शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ, गुन्ह्याशीं संबंधित असलेल्या निरनिराळ्या गोष्टींची शास्त्रशुद्ध तपासणी करतात. हृया तपासणींतून निघालेले निष्कर्ष कोर्टांत पुरावा म्हणून ग्राहृय समजले जातात. निरनिराळ्या प्रकारच्या हस्ताक्षरांचे नमुने, बंदुकीच्या अगर पिस्तुलाच्या गोळीवरील खुणा, स्फोटक द्रव्यं, केंस, कापडाचे धागे, रक्ताचे डाग, मोटारींच्या रंगांचे कण, संशयिताच्या बुटांच्या तळाला चिकटून आलेले मातीचे कण– इत्यादि हजारों गोष्टींची 'FBI 'च्या लॅबोरेटरींत परीक्षा होते.

लॅबोरेटरीच्या 'हेअर्स अँड फायबर्स' विभागांत मनुष्याच्या एका केंसाचं १०००० पट मोठं केलेलं नारिंगी रंगांतलं छायाचित्र भिंतीवर लावलेलं आपल्याला दिसतं. अशा नमुन्यांवरूनच गुन्ह्याच्या ठिकाणी, अगर मयताच्या किंवा गुन्हेगाराच्या अंगावर सांपडलेला केंस माणसाचा आहे की जनावराचा तें सांगतां येतं. जनावराचा असल्यास कोणत्या जातीच्या जनावराचा, त्याचंहि वर्गीकरण करतां येतं. माणसाचा असल्यास त्या केंसाला पूर्वी कधीं रंग दिला होता का, तो मूळचाच कुरळा आहे कीं कृत्रिम रीतीनं कुरळा केलेला आहे, हें ठरवतां येतं. इतकंच नव्हे तर त्या लहानशा केंसावरून ती व्यक्ति स्त्री होती कीं पुरुष, तिचं वय काय असावं इत्यादि गोष्टीसुद्धां शास्त्रज्ञ सांगू शकतात. अशा प्रकारच्या सूक्ष्म तपशीलवार माहितीमुळंच बऱ्याच वेळां गुन्ह्याचा व गुन्हेगाराचा तपास लागतो.

लॅबोरेटरीच्या 'फायर आर्म्स' विभागांत गुन्ह्याच्या ठिकाणी सांपडलेल्या अगर संशयित गुन्हेगाराच्या ताब्यांत असलेल्या बंदुकांतून किंवा पिस्तुलांतून चांचणीसाठी झाडलेल्या गोळ्यांची बारकाईनं तपासणी केली जाते. खून झालेल्या व्यक्तीच्या शरीरांत सांपडलेली गोळी आणि संशयिताच्या शस्त्रांतून झाडलेली गोळी, ह्या दोन्हींवर सारख्याच खुणा आढळल्या तर तो खून संशयितानंच केला हे सिद्ध करणं सोपं जातं.



**' FBI ' लॅबोरेटरींतलें एक दृश्य : गुन्हेगारांच्या पादत्राणांना लागलेली माती ' डिफरेन्शिअल थर्मॉल ॲनालायझर ' मधून तपासली जात आहे.**

हस्ताक्षराच्या वळणावरून व टाइपरायटर्सच्या विशिष्ट अक्षरांवरूनहि विशिष्ट व्यक्ती ओळखतां येतात. त्यामुळंच लॅबोरेटरीच्या ' डॉक्युमेंट सेक्शन '-मधें पुरावा म्हणून मिळालेल्या कागदपत्रांची तज्ज्ञांकडून कसून तपासणी केली जाते. कागदपत्रांतील अगदी सूक्ष्म अशी खाडाखोडहि तज्ज्ञांच्या तीक्ष्ण नजरें-तून निसटत नाहीं.

' FBI 'च्या लॅबोरेटरीच्या सहकार्यामुळं आजपर्यंत हजारों गुन्हेगार पकडले गेलेले आहेत आणि त्यांना शिक्षाहि झालेल्या आहेत. ' FBI 'नं शोधून काढलेल्या प्रत्येक गुन्ह्यामागं असलेली कहाणी बऱ्याच वेळां जितकी चित्तथरारक असते तितकीच ती रंजकहि असते. ' FBI 'नं दाखवलेल्या बुद्धिचातुर्याच्या कितीतरी कथा प्रसिद्ध असल्या, तरी कित्येकदां ॲखाद्या गुन्ह्याच्या बाबतींत ' FBI 'चे अधिकारीदेखील संभ्रमांत पडतात.

डोरोथी मिल्ड्रड हॅन्ले ह्या हायस्कूलमधें जाणाऱ्या एका मुलीचं हार्वे थॉमस लँड या तिच्या मित्रावरोबर भांडण झालेलं होतं. भांडणाच्या दुसऱ्याच दिवशी दुपारी ४ वाजतां हार्वेचा फोटो परत करून टाकण्यासाठी डोरोथी त्याच्या घरी गेली. तिथं प्रत्यक्ष काय घडलं हें डोळयांनी पहाणारा कुणीच साक्षीदार नव्हता. पण डोरोथी तिच्या कारमधें मात्र मरून पडलेली होती. हार्वेनं तिचा खून केला होता कीं निराशेच्या भरांत तिनंच स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली होती ? त्या घटनेबाबत केलेल्या निवेदनांत हार्वे म्हणाला की, डोरोथीकडून स्वत:चा फोटो परत मिळाल्यानंतर तो स्वत:च्या घरांत गेला. थोडा वेळ त्यानं झोंप काढली. आणि संध्याकाळीं सात वाजतां तो जागा झाला. आपल्या खोलीच्या पुढच्या बाजूच्या खिडकींतून त्यानं बाहेर पाहिलं. तेव्हां त्याच्या घरासमोर डोरोथीची

मोटरकार उभी असलेली त्याला दिसली. कारमधें स्टिअरिंग व्हीलजवळ ताठ बसलेली डोरोथी त्याला दिसली. तिच्यापासून जवळच, पुढच्याच सीटवर .२२ कॅलिबरचं एक रिव्हॉल्व्हर पडलेलं होतं. तिचा प्राण गेलेला होता. बहुधा तिनं आत्महत्याच केली असावी. तिच्या जवळच पडलेलं रिव्हॉल्व्हर तिच्या वडिलांनीच तिला भेट म्हणून दिलेलं होतं, हें हार्वेला माहीत होतं. त्यानं तावड-तोब पोलिसांना बोलावलं आणि घडलेल्या दुर्घटनेचा रिपोर्ट केला.




डॉक्युमेंट सेक्शनमधील एक हस्ताक्षरतज्ज्ञ हस्ताक्षराच्या एन्लार्जमेंट्स् तयार करीत आहे. हें काम अत्यंत काळजीपूर्वक करावें लागतें.

डोरोथीवर एकच गोळी झाडण्यांत आलेली होती. तिच्या उजव्या छातीं-तून आंत जाऊन ती गोळी तिच्या हृदयाजवळ रुतून बसली होती. तिला मृत्यु मात्र तावडतोब आलेला नसावा, असा डॉक्टरांचा तर्क होता. सरळ बसलेल्या अवस्थेंत तिचं डोकं मात्र किंचित् मागं कललेलं होतं. तिचा उजवा हात स्टिअरिंग व्हीलच्या वरच्या बाजूवर होता आणि तिचा डावा हात निर्जीव होऊन डावीकडे खालीं लोंबकळत होता. पोलिसांनीं हार्वेला असंख्य बारीकसारीक प्रश्न विचारून त्याची अगदीं कसून जबानी घेतली. परंतु डोरोथी कशी मेली याबाबत आपल्याला यत्किंचित्हि माहिती नाहीं असंच तो वारंवार म्हणत राहिला.

डोरोथीचे कपडे, तिच्या शरीरांत सांपडलेली गोळी आणि तिच्या जवळच सांपडलेलं तें रिव्हॉल्व्हर– सारं तपासणीसाठीं 'FBI'च्या लॅबोरेटरीकडे पाठवण्यांत आलं. 'FBI'च्या तज्ज्ञांनी तिच्या ब्लाउझची सूक्ष्म तपासणी केली. पण गोळी घुसल्यामुळं जिथं ब्लाउझ् फाटला होता त्या जागेच्या जवळ-पास कुठंहि त्यांना बंदुकीच्या दारूचे कण सांपडले नाहींत. तिनं स्वतःच जर स्वतः-वर गोळी झाडली असती तर असे दारूचे कण त्या जागी सामान्यतः सांपडायलाच हवे होते. तिच्या शरीरांत सांपडलेली गोळी तिच्या जवळ पडलेल्या रिव्हॉल्व्हर-मधूनच झाडली गेलेली होती, असंहि तपासणींत सिद्ध झालं.

'FBI'च्या लॅबोरेटरींतील तज्ज्ञांची या प्रकरणांत पुढं जेव्हां साक्ष झाली, तेव्हां त्यांनीं सांगितलं कीं ज्या गोळीनं डोरोथीचा प्राण घेतला होता, ती गोळी कमीत कमी ३६ इंच अंतरावरून झाडली गेली असावी. स्वतःपासून इतक्या लांब पिस्तुल धरून आत्महत्या करणं डोरोथीला केवळ अशक्य होतं. तज्ज्ञांची साक्ष पुरावा म्हणून ग्राह्य मानून हार्वेवर खुनाचा आरोप ठेवला गेला. आपण निर्दोषी असल्याचं हार्वेनं पुन्हा पुन्हा सांगितलं. परंतु पुढं त्यानं अचानक आपल बचावाचं धोरण बदललं, आणि आपण स्वतःच डोरोथीजवळच्या रिव्हॉल्व्हरनं तिचा खून केल्याचा कबुलीजबाब दिला. आधीं दोघांचं कडाक्याचं भांडण झाल्यामुळं कोणताहि विचार न करतां आपण संतापाच्या भरांत माथेफिरूपणानं तिला ठार केलं, ही गोष्ट हार्वनं मान्य केली.

–हार्वेला २० वर्ष सक्तमजुरीची शिक्षा झाली.

'FBI' चे एजंट्स् बंदुकांच्या किंवा पिस्तुलांच्या नेमबाजीमध्यें किती निष्णात असतात याचं प्रात्यक्षिकच मला बघायला मिळालं. 'FBI'च्या 'अिन्-डोअर रेंज' विभागांत एका पांढऱ्या पडद्यावर एक काळी मनुष्याकृति काढलेली होती. त्या ठिकाणीं असलेल्या एका 'FBI' एजंटनं आम्हां प्रेक्षकांना आधीं सांगून पडद्यावरच्या काळ्या मनुष्याकृतीच्या हृदयावर व डोळ्यांवर गोळ्या झाडून दाखवल्या. पडद्याच्या मागं विजेचे दिवे बसवलेले असल्यामुळं काळ्या

मनुष्याकृतीला, सांगितलेल्याच ठिकाणीं गोळ्या लागून भोकं पडलेली आहेत हें आम्ही प्रत्यक्षच पाहूं शकलों.

'FBI'मध्यें अनावश्यक माणसांची अुगीचच भरती होअून 'FBI'चा खर्च निष्कारण वाढणार नाही, याबावत डिरेक्टर हूवर हे नेहेमींच फार काळजी घेतात. त्यामुळं 'FBI'मध्यें कामाला असणारा प्रत्येक माणूस हा अत्यंत आवश्यक असाच असतो. 'FBI' च्या 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डिव्हिजन'च्या हातांत संस्थेच्या आर्थिक व्यवहारांचीं सर्व सूत्रं असतात. नवीन माणसांची निवड करणं आणि 'FBI' च्या कामासाठीं योग्य तीं माणसं पाठवणं हेंहि काम या विभागातर्फे संभाळलं जातं. आज सुमारं ६००० 'स्पेशल एजंट्स्' 'FBI'-मध्यें काम करतात. त्यांच्याशिवाय क्लार्क्स, स्टेनोग्राफर्स, टेक्निशियन्स वगैरे मिळून आणखी सुमारं ८००० व्यक्ती 'FBI' चा प्रचंड व्याप संभाळायला हात-भार लावतात.

हातीं घेतलेल्या प्रकरणाचा तपास लावण्यासाठीं 'FBI' चे अधिकारी किती चिकाटीनं काम करतात, याबद्दलच्या कितीतरी गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. विशेषतः एखाद्या परकीय हेराच्या प्रकरणाचा तपास करतांना त्यांची ही चिकाटी अगदीं पराकोटीला पोंचते. २२ जून १९५३ रोजीं ब्रुकलिनमधला वृत्तपत्रं विकणारा एक पोरगा आपल्या हातांतलीं चिल्लर नाणीं खुळखुळवीत रस्त्यानं चालला होता. मधेंच एकाएकीं त्याला जाणवलं की आपल्या हातांतलं एक नाणं त्याच किमतीच्या दुसऱ्या नाण्यापेक्षां विशेष हलकं लागतं आहे. त्यानं तें जमिनीवर आपटलं. त्याबरोबर त्या नाण्याचे अुभ्या बाजूनं दोन तुकडे झाले आणि त्यांतून एक छोटंसं छायाचित्र बाहेर पडलं. एका 'FBI' एजंटच्या कानावर या चमत्कारिक नाण्याची आणि त्यांतल्या फोटोग्राफची वार्ता गेली. त्या फोटोग्राफमध्यें कुणा व्यक्तीचं चित्र नव्हतं. तर अनेक पांचआंकडी संख्या एका-खालीं एक अशा टाईप केलेल्या होत्या. कुणातरी परकीय हेराचा हा गुप्त संदेश असला पाहिजे असं वाटून त्यानं तें नाणं आणि त्यांतला संदेश 'FBI' च्या लॅबोरेटरीकडे पाठविला. 'FBI' च्या तज्ज्ञांनीं आपलं सारं बुद्धिचातुर्य पणाला लावून त्या 'मायक्रोफोटोग्राफ'मधील गुप्त संदेशाचा अर्थ लावण्याचा आणि त्या पोकळ नाण्याचं रहस्य अुलगडण्याचा सतत चार वर्षं प्रयत्न केला. मे १९५७ मधें कर्नल रीनो हेहॅनेन या नांवाचा एक रशियन हेर मॉस्कोच्या आज्ञेवरून रशियाला परत जायला निघाला. १९४९ ते १९५२ या काळांत तो फिन्लंडमध्यें राहिला होता. आणि तो स्वतःला एका फिनिश इसमाचा अमेरिकेंत जन्माला आलेला मुलगा म्हणवीत होता. हेलसिंकीला आलेल्या एका अमेरिकन शिष्टमंडळाला तो स्वतः जाऊन भेटला. आणि आपण अमेरिकन नागरिक असल्याचं त्यानं

त्यांना सांगितलं. आवश्यक तीं सारीं कागदपत्रं दाखवल्यावर त्याला पासपोर्ट देण्यांत आला. २१ ऑक्टोबर १९५२ रोजीं तो अमेरिकेंत आला. १९५२ पासून १९५७पर्यंतच्या काळांत अमेरिकेंत राहून त्यानं सोव्हिएट रशियासाठी हेरगिरी केली. या हेरगिरीसाठी अत्यंत आवश्यक तीं साधनं म्हणून त्याला खास तयार केलेल्या पोकळ पेन्सिली, पोकळ फौंटनपेन्स, पोकळ स्क्रू आणि पोकळ नाणीं रशियनांनीं पुरवलीं होतीं. हेहॅनेनला पकडल्यानंतर त्याच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारानं मार्क नांवाच्या आणखी एका रशियन गुप्त हेराचा पत्ता समजला. हा मार्क १९२७ सालापासून रशियाच्या हेरखात्यांत नोकरी करीत होता. ' FBI 'नं अधिक तपास केला तेव्हां त्यांना समजलं कीं मार्क हा ' एमिल आर्. गोल्डफस् ' हें नांव धारण करून ब्रुकलिनला फोटोग्राफर म्हणून व्यवसाय करीत होता. मार्कनं कॅनडाच्या मार्गानं अमेरिकेंत चोरून बेकायदा प्रवेश केलेला होता. बेकायदा प्रवेश केल्याबद्दल मार्कला अटक झाली तेव्हां त्यानं कबूल केलं कीं आपण रशियन नागरिक असून आपलं नांव ' रुडॉल्फ ईव्हॅनोविच् अबेल ' असं आहे. परंतु ह्यापेक्षां एक अक्षरहि अधिक कांहीं सांगण्याचं त्यानं नाकारलं. त्याचा फोटोग्राफीचा स्टुडिओ आणि तो जिथ रहात होता त्या हॉटेलांतली त्याची खोली म्हणजे आधुनिक हेरगिरीच्या साधनांचं एक वस्तुसंग्रहालयच होतं. त्या ठिकाणीं शॉर्ट-वेव्ह रेडिओज्, सांकेतिक लिपींत लिहिलेल्या मजकुराच्या वह्या, छोटे कॅमेरे, फिल्म्स्, आणि आंतून पोकळ बनवलेल्या खास बनावटीच्या शेव्हिंग ब्रशपासून तों लहानशा खिळ्यापर्यंतच्या असंख्य वस्तू सांपडल्या. कर्नल अबेलवर हेरगिरीबद्दलचा खटला भरण्यांत येऊन त्यांत त्याला शिक्षा झाली हें सांगायला नकोच.

' FBI 'मधें मी बराच वेळ होतों. ' FBI 'चे जवळजवळ सर्वच विभाग आणि त्यांची कार्यपद्धति मला बघायला मिळाली. तें सारं पहात असतांनाच मला अेक गोष्ट जाणवली. ती म्हणजे दिवसभर असंख्य प्रेक्षक येत होते, जात होते, निरनिराळ्या विभागांचं कार्य समजावून घेत होते, पण तिथं काम करणाऱ्या माणसांची एकतानता मात्र मुळींच भंग पावत नव्हती. त्यांचे नित्याचे सारे व्यवहार नेहेमीप्रमाणंच चाललेले होते. कदाचित् हें सारं आतां त्यांच्या अंगवळणी पडलेलं असावं. ' FBI 'मधे मला सर्वत्र शांततेचं, गांभीर्याचं आणि आपल्या कार्याबद्दलच्या निष्ठेचं वातावरण आढळलं.

' FBI ' मधून बाहेर पडेपर्यंत आमचा गाअिड व्हर्नॉन् थॉर्नटन् याचा आणि आमचा चांगलाच परिचय झालेला होता. ' FBI ' ला आम्ही भेट दिल्याची आठवण म्हणून त्यानं बंदुकीच्या गोळ्यांचीं रिकामीं ' शेल्स् ' आम्हांला भेट म्हणून दिलीं. हिंदुस्थानांत परत गेल्यावर केव्हांतरी ' FBI 'बद्दल मी कांहीतरी लिहिणारच होतों. ' FBI 'मधे प्रत्यक्ष फिरतांना मी टिपणं करीत होतों.

तरीसुद्धां सर्वच गोष्टी लिहून घेणं मला शक्य नव्हतं. त्यासाठीं अधिकृत माहितीची मला गरज लागणार होती. अनायासं ' FBI 'च्या अेका अधिकाऱ्याची चांगली ओळख झालेलीच आहे, तेव्हां आपल्याला लागणारी कांहीं माहिती आणि फोटोज् त्यांच्याकडून मागवणं सोपं जाईल, ह्या विचारानं मी थॉर्नटन्‌ला माझा उद्देश सांगून त्याचं पूर्ण नांव आणि पत्ता विचारला. माझी मागणी ऐकतांच तो किंचित् गोंधळला. पण नंतर हंसून त्यानं मला त्याचं नांव आणि पत्ता दिला. " ' FBI '-च्याच पत्त्यावर पत्न पाठवा. मला तें मिळेल." असं तो म्हणाला.

त्याच्या दयाळूपणावद्दल पुन्हापुन्हा त्याचे आभार मानून मी त्याला आणखी एक विनंती केली की, माझ्या लेखांत छापण्यासाठी मला तुमचा एक फोटोहि हवा आहे. या वेळीं मात्न फारसे आढेवेढे न घेता थॉर्नटन् तत्परतेनं म्हणाला, " ठीक." आम्ही ' FBI 'च्या इमारतीच्या आंतमधे होतो. माझ्याजवळ त्यावेळीं ' फ्लॅश् लाअिट ' नसल्यामुळं, ' इमारतीच्या आंत मला फोटो घेतां येणार नाहीं. त्यासाठीं तुम्हांला मधल्या चौकांत यावं लागेल.', असं मी त्याला सांगितलं. त्याला थोडीशी तसदी देणारी माझी ही विनंतीसुद्धां त्यानं मान्य केली. ' FBI 'च्या इमारतीच्या



·FBI'च्या चाणाक्ष व सावध कामकाजाची ' चुणूक ' दाखविणारा अधिकारी : व्हर्नॉन् आर्. थॉर्नटन् (?)

मधल्या चौकांतल्या एका मोठ्या कारंज्याच्या पार्श्वभूमीवर थॉर्नटन्‌ला अुभं करून मीं त्याचा फोटो घेतला. थॉर्नटन्‌नं दिलेल्या सहकार्याबद्दल पुन्हा एकदां त्याचे आभार मानून मीं त्याचा निरोप घेतला.

हिंदुस्थानांत आल्यावर कांहीं महिन्यांनीं थॉर्नटन्‌ला त्याच्या ' FBI 'च्या पत्त्यावर मीं पत्र पाठवलं.

—सुमारं महिन्याभरानं थॉर्नटन्‌ला पाठवलेलं पत्र माझ्या नांवावर परत आलं. त्या पत्त्यावर ' FBI 'चा शिक्का होता. पत्रावर लिहिलेलं होतं की, ' ह्या नांवाच्या माणसाचा पत्ता लागत नाहीं !'

□

# स्वप्ननगरी : न्यूयॉर्क वर्ल्ड्स् फेअर

पृथ्वीच्या पाठीवर असं एखादं नगर असावं– जिथं जगांतल्या साऱ्या भिन्न-भिन्न राष्ट्रांतले लोक एकत्र यावेत. आपापसांतले हेवेदावे, मत्सर, मतभेद, भांडणं विसरून प्रत्येक देशानं आपल्या वांटचाला आलेल्या जमिनीच्या तुकड्यावर आपल्या देशाचीं, आपल्या संस्कृतीचीं, आपल्या लोकजीवनाचीं सारीं ठळक वैशिष्टचं प्रतिबिंबित होतील अशी वास्तु उभारावी. लहान मुलांनीं एखाद्या दिवशीं अंगतपंगत करावी तसं जगांतल्या वेगवेगळ्या देशांतल्या लोकांनीं परस्परांच्या वास्तूंत जाऊन खावं, प्यावं, परस्परांच्या जीवनाचा अनुभव घ्यावा, आपल्याला अपरिचित असलेल्या कलाकृतींचा आस्वाद घ्यावा, आनंद लुटावा. तिथून बाहेर पडतांना संस्कृति–संगमाच्या धुंद सुगंधानं भारलेल्या मनानं आपल्या शेजाऱ्याच्या पाठीवर स्नेहभावानं शाबासकीची थाप मारावी. परस्परांच्या विचारांची आणि भावनांची देवाणघेवाण करावी आणि अखिल मानवजातीच्या एकात्मतेच्या जाणिवेनं प्रभावित होऊन मानवाच्या भविष्यकालीन प्रगतीचीं स्वप्नं पहावींत. परस्परां-बद्दल प्रेम, आदर, विश्वास, अशा सद्‌भावना मूकपणानं प्रकट कराव्यात. हें सारं कसं अगदीं अद्‌भुतरम्य, एखाद्या स्वप्नासारखं वाटतं, नाहीं ? एवढ्या मोठ्या अफाट पृथ्वीतलावर असेल का अशी एखादी स्वप्ननगरी ?

अमेरिकेंतल्या न्यूयॉर्क शहरीं १९६४ च्या एप्रिल महिन्यांत २२ तारखेला खरोखरच अशी एक अद्‌भुतरम्य, विशाल स्वप्ननगरी प्रत्यक्षांत अवतरली होती.

वॉशिंग्टनहून आम्ही न्यूयॉर्कला गेलों तेव्हां त्याच स्वप्ननगरीचं दर्शन घेण्यासाठीं आमचीं मनं उत्सुक झालीं होतीं. वॉशिंग्टनला असतांनाहि आम्हांला स्वप्नं पडत होतीं तीं न्यूयॉर्कच्या 'वर्ल्ड्स् फेअर' चीं ! अमेरिकेंतल्या आमच्या प्रवासाचं तें एक फार मोठं आकर्षण होतं. अशीच एक जागतिक यात्रा पूर्वी १९३९ सालीं अमेरिकेंत भरली होती. आणि त्यानंतर आतां पुन्हा १९६४ सालीं ! तीच ही साऱ्या जगाचं आकर्षण बनलेली, अद्भुतरम्य स्वप्नरंगीं रंगलेली 'न्यूयॉर्क वर्ल्ड्स् फेअर, १९६४–१९६५.'

अमेरिकेंतील वाहतुकीच्या सर्व अुपलब्ध साधनांचा अुपयोग करून २२ एप्रिल १९६४ पासून दररोज अक्षरशः हजारों लोक 'वर्ल्डस् फेअर'कडे धांव घेत होते. लोकगंगेचा हा पूर १८ ऑक्टोबर १९६४ पर्यंत असाच दुथडी भरून वहाणार होता. नंतर मग कांही काळ विराम पावणार होता. आणि पुन्हा पुढल्या वर्षी २१ एप्रिल १९६५ पासून १७ ऑक्टोबर १९६५ पर्यंत विश्वयात्रेंतल्या लोकसागराला अशीच भरती येणार होती. ६५ सालच्या १७ ऑक्टोबरला त्या मानवनिर्मित प्रचंड, अद्भुतरम्य प्रतिसृष्टीवर पडदा पडणार होता. त्यामुळंच आपापल्या जीवन-क्रमांतून सवड सांपडतांच जो तो न्यूयॉर्कच्या त्या अद्भुत मायावी नगरीकडे मिळेल तें वाहन करून धांव घेत होता. बरेचसे लोक आपापल्या स्वतःच्या मोटारगाड्यांतून जात होते. विश्वयात्रेंत जमणाऱ्या हजारों मोटारगाड्यांच्या चक्रव्यूहांत आपली गाडी अडकून पडू नये असं ज्यांना वाटत होतं, त्यांनी आग-गाडीचा आश्रय केला होता. कांहींना जमिनीखालची 'सब-वे' सोयीची वाटत होती. कांहीजण बसनं जात होते, कांहीं टॅक्सीनं, तर कांहीं हेलिकॉप्टरनंसुद्धां ! एवढंच काय, पण बोटीनं जायचीसुद्धा सोय होती. मी मात्र २८ ऑगस्टला IRT 'सब-वे'च्या 'फ्लशिंग लाअिन'नं 'वर्ल्डस् फेअर'ला गेलों. 'टाइम्स स्क्वेअर'पासून 'वर्ल्डस् फेअर'पर्यंतचं 'सब-वे'चं भाडं फक्त १५ सेंट्स् पडलं. 'वर्ल्डस् फेअर'मधील प्रवेशासाठीं प्रौढांना प्रत्येकी दोन डॉलर्सचं तिकिट होतं आणि १२ वर्षाखालच्या मुलांना एक डॉलर पडत होता. आमचीं सर्वांची तिकिटं 'अेक्स्पेरिमेंट'न पूर्वीच काढून आणलेलीं असल्यामुळं आतां आमचा मार्ग अगदीं मोकळा होता. अवघ्या वीस मिनिटांत आम्ही 'विलेट्स् पॉअिंट बुलेव्हार्ड' ( Willet's Point Boulevard ) या स्टेशनला आलों. 'वर्ल्डस् फेअर'साठीं अुतरायचं 'सब-वे'चं हेंच अखेरचं स्टेशन होतं.

स्टेशनपासून 'फेअर' फक्त तीनचार मिनिटांच्या अंतरावर होती. नुकतेच सकाळचे दहा वाजून गेले होते. हवा फार छान होती त्या दिवशीं. अगदीं कोवळ्या लुसलुशीत कणसांच्या फिकट पिवळसर दाण्यांसारखं कोवळं लुसलुशीत उन्ह सगळीकडे पसरलं होतं. 'वर्ल्डस् फेअर'च्या मुख्य प्रवेशद्वारांतून इतर

लोकांबरोबर मी आंत गेलों तेव्हां वातावरणांतल्या उत्साहाचा पेला अगदीं कांठोकांठ भरून सर्व बाजूंनीं वहात होता. देशविदेशचे नाना प्रकारचे असंख्य स्त्री-पुरुष एका अभूतपूर्व जत्रेचा आनंद लुटण्यासाठीं उत्सुकलेल्या मनांनीं सगळीकडे फिरतांना दिसत होते. त्यांत काळे लोक होते, गोरे लोक होते, पिवळेहि होते. 'वर्णभेद' म्हणून कशाला म्हणतात तें त्यांना माहीतसुद्धां नव्हतं. खांद्याला खांदा लावून, हातांत हात धरून ते फिरत होते, एकाच ठिकाणीं खात होते, पीत होते, परस्परांचा परिचय नसतांनाहि हंसऱ्या चेहेऱ्यानं बंधुभावाच्या स्मिताची देवाणघेवाण करीत होते. त्यांत स्त्रिया होत्या, पुरुष होते, लहान मुलंहि कितीतरी होतीं. आफ्रिका, अमेरिका, ऑस्ट्रिया, बेल्जियम, स्पेन, स्वीडन, स्वित्झर्लंड, थायलंड, डेन्मार्क, फ्रान्स, ग्रीस, जॉर्डन, लेबॅनॉन, इजिप्त, मेक्सिको, चीन, आयर्लंड, इंडोनेशिया, इंडिया, पाकिस्तान, फिलिपाइन्स, पश्चिम-जर्मनी — रशिया सोडून जगांतल्या महत्त्वाच्या सुमारं ८० राष्ट्रांनीं ह्या विश्वयात्रेंत भाग घेतला होता.


एवढ्या मोठ्या अफाट यात्रेचे, व्यवस्थेच्या सोयीच्या दृष्टीनं पांच भाग पाडलेले होते.— इंडस्ट्रियल एरिया, इंटरनॅशनल एरिया, फेडरल अँड स्टेट एरिया, ट्रॅन्स्पोर्टेशन एरिया, आणि लेक अॅम्युझमेंट एरिया. डोळ्यांपुढं निश्चित असा 'प्लॅन' कांहींच नव्हता. ज्या राष्ट्राचा पॅव्हिलियन लक्ष वेधून घेत होता तिथं मी जात होतों, मन रमेल तितका वेळ त्या पॅव्हिलियनमधें फिरत होतों. त्यामुळे कोणता भाग कुठं संपतो आणि दुसरा विभाग कुठं सुरू होतो हेंसुद्धां लक्षांत येत नव्हतं. आणि खरं सांगायचं म्हणजे त्याची गरजहि नव्हती. शेकडों पक्वान्नांनी भरलेली सुवर्णाचीं ताटं मांडून ठेवलेलीं असावीत आणि त्यांतल्या हव्या त्या पदार्थाचा आस्वाद घ्यायला एखाद्याला सांगावं, त्या वेळीं त्याच्या मनाची जशी अवस्था होईल तशी माझी झाली होती. सगळींच पक्वान्नं खाणं अशक्य होतं. म्हणून मग अधूनमधून सहज हाताला येईल त्या पदार्थाची चव घेत मी फिरत होतों.

'वर्ल्डस् फेअर'मधली सर्वात प्रेक्षणीय गोष्ट म्हणजे 'युनिस्फिअर'! १४० फूट उंचीचा पृथ्वीचा हा गोल म्हणजे जगांतलं एक आश्चर्यच होतं. 'वर्ल्ड्स् फेअर'च्या प्रत्येक जाहिरातींत आणि 'वर्ल्ड्स् फेअर'मधें मिळणाऱ्या अनेक वस्तूंवर 'वर्ल्ड्स् फेअर'चं प्रतीक–चिन्ह म्हणून त्याचा उपयोग करण्यात आलेला होता. अमेरिकेंतल्या 'युनायटेड स्टेट्स् स्टील कॉर्पोरेशन'नं संपूर्णपणं स्टेनलेस स्टीलच्या बनवलेल्या पृथ्वीच्या ह्या गोलाचं वजन ९४०००० पौंड होतं. आणि त्याचा व्यास १२० फूट होता. ४००० फूट उंचीवरून आकाशांतून त्याच्याकडे पाहिलं तर चंद्रावरून पृथ्वीकडे पाहिल्यावर ती जशी दिसेल तसा तो गोल दिसत होता. त्याच्या भोंवतालीं सर्व बाजूंनीं उंचउंच कारंजी होतीं. पृथ्वीचा हा गोल बांधतांना 'यू. एस्. स्टील कॉर्पोरेशन'ला बांधकामाचं अगदीं नवीनच तंत्र प्रयोगानं

शोधून काढावं लागलं. कारण अशा प्रकारच्या बांधकामाची माहिती जगांतल्या कोणत्याच अिजिनियरिंगच्या पुस्तकांत छापलेली नव्हती. पृथ्वीच्या ह्या गोलावर अक्षांश–रेखांश तर दाखवलेले होतेच; परंतु जगांतल्या सर्व देशांचे आकारहि अगदीं हुबेहुब दाखवले होते. इतकंच काय, पण रात्रीच्या वेळीं जगांतल्या प्रत्येक देशाच्या राजधानीच्या जागीं दिवासुद्धां लागत असे. ह्या गोलावरच्या देशांच्या आकृतींमुळं वाऱ्याचा एवढा मोठा प्रचंड दाब त्याच्यावर येण्याची शक्यता होती कीं, तो आहे त्या स्थितींत उभा रहाणंच कठिण होतं. त्याच्यांतला हा धोका काढून टाकण्यासाठी गणितशास्त्रामधले अनेक कूट प्रश्न इंजिनिअर्सना हाय स्पीड कॉम्प्युटरच्या साहाय्यानं सोडवावे लागले. आणि म्हणूनच तो अवघ्या १६० दिवसांत बांधून तयार झाला. कॉम्प्युटरचं साहाय्य घेतलं नसतं तर तो तयार करायला १० वर्षं लागलीं असतीं असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. न्यूयॉर्कची ही जागतिक यात्रा संपली तरीसुद्धां पृथ्वीचा हा अद्‌भुत गोल त्याच जागी कायमच ठेवण्यांत येणार होता. 'यू. एस्. स्टील कॉर्पोरेशन'नं 'वर्ल्ड्‌स् फेअर'ची आठवण म्हणून न्यूयॉर्क शहराला तो भेट म्हणून देऊन टाकला होता.

'इंडस्ट्रिअल एरियां'तले कांहींकांहीं स्टॉल्स खूपच पहाण्यासारखे होते. 'द बेल् टेलिफोन पॅव्हिलियन'मधें अमेरिकेंत कांहीं ठिकाणीं सध्या प्रत्यक्ष वापरांत असलेल्या 'टच् टोन' ( Touch-Tone ) फोन्सचं प्रात्यक्षिक दाखवलेलं होतं. सध्याच्या टेलिफोनच्या 'डायल'एवजीं त्यांत 'पुश् बटन्स'चा उपयोग केलेला होता. त्याचबरोबर उद्यांच्या जगांत प्रचारांत येणारा 'पिक्चर फोन'हि बेल् कंपनीनं तिथं ठेवलेला होता. टेलिफोनवरती बोलणाऱ्या व्यक्तीचे चेहेरे प्रत्यक्ष दिसण्याची नवीन सोय त्यांत केलेली होती. आतां बोलणाऱ्या व्यक्तीचा चेहेराहि दिसत असल्यामुळं कांही मिस्किल खोडकर प्रेक्षक फोनवर बोलतांना मुद्दाम गमतीदार अभिनय तर करीतच, पण क्वचित्प्रसंगीं आपल्या मित्राला किंवा मैत्रिणीला फोनवरून वेडावूनहि दाखवीत ! आणि या गमतींत तिथं उपस्थित असलेले सर्वजण खदखदून हंसून सहभागी होत. 'बेल् सिस्टिम'च्या १४० फूट उंचीच्या 'मायक्रोवेव्ह टॉवर'वरून 'वर्ल्ड्‌स् फेअर'मधले टेलिव्हिजनचे सर्व कार्यक्रम प्रक्षेपित करण्याची व्यवस्था केलेली होती.

'पार्कर पेन'च्या पॅव्हिलियनचं उद्दिष्ट 'वर्ल्डस् फेअर'च्या ध्येयाला केवळ सुसंगतच नव्हे, तर पोषकहि होतं. 'Peace through Understanding'– हें 'वर्ल्डस् फेअर'चं ध्येयवाक्य होतं. राष्ट्राराष्ट्रामधें परस्पर अधिकाधिक समजूत निर्माण व्हावी, परस्परांबद्दलचा बंधुभाव वाढावा हें तर 'वर्ल्ड्‌स् फेअर'चं मुख्य उद्दिष्ट होतं. ह्या उद्दिष्टाला आपलाहि हातभार लावण्यासाठीं 'पार्कर पेन'नं एक अभिनव योजना आंखली होती, आणि त्यासाठीं ह्या 'पॅव्हिलियन'मधें फार



' युनायटेड स्टेट्स् स्टील कॉर्पोरेशन'ची किमया ! —' युनिस्फिअर '

मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय पत्रमैत्री वाढवण्याचा प्रयत्न केलेला होता. ' कॉम्प्युटर 'मधें तुम्ही स्वत:बद्दलची आवश्यक ती माहिती भरतांच तिचं आपोआप ( Electronically ) वर्गीकरण होऊन तुमच्या आवडीनिवडीशीं आणि एकंदर परिस्थितीशीं मिळत्याजुळत्या आवडीनिवडी असलेल्या, जगांतल्या कुठल्यातरी देशांतल्या व्यक्तीची माहिती नांवपत्त्यासह कांहीं सेकंदांतच तुमच्या पुढं येते. त्या व्यक्तीशीं तुम्ही पत्रमैत्री करूं शकतां. ह्याच पॅव्हिलियनमधे एकूण ९० रायटिंग डेस्क्स् ठेवलेले होते. त्या ठिकाणीं ठेवलेल्या पार्कर पेन्सनं तिथल्याच सुंदर कागदांवर तुम्ही जगांत कुणालाहि पत्र लिहूं शकतां. आपल्या मालाची– पार्कर पेनची– जगभर जाहिरात करण्याची आणि त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय पत्रमैत्रीला उत्तेजन देण्याची ' पार्कर पेन 'च्या उत्पादकांची योजकता खरोखरच वाखाणण्यासारखी होती.

जगांतील सर्वोत्कृष्ट छायाचित्रं हें अर्थात् ' ईस्टमन कोडॅक ' कंपनीच्याच पॅव्हिलियनचं खास आकर्षण होतं. ८० फूट उंचीच्या एका चौकोनी मनोऱ्यावर चार बाजूंनी ३० फूट गुणिले ३६ फूट ह्या आकाराची जगांतली उत्कृष्ट छाया-चित्रं लावलेली होती. अत्यंत निष्णात् व तज्ज्ञ छायाचित्रकारांनीं जगातल्या कानाकोपऱ्यांत फिरून टिपलेल्या अक्षरश: हजारों छायाचित्रातून या भव्य चित्रांची निवड करण्यांत आलेली होती. दर चार आठवड्यांनीं ही छायाचित्रं बदललीं जात, आणि दुसरीं छायाचित्रं त्यांची जागा घेत. हीं सगळी चित्रं रंगीत होतीं, आणि त्यांच्या मागच्या बाजूंनी प्रकाश टाकण्याची योजना केल्यामुळं छायाचित्रां-मधील दृश्यं कमालीचीं सजीव वाटत. केवळ कॅमेराच टिपूं शकेल अशा प्रकारचीं

जगांतलीं अद्‌भुत अलौकिक आश्चर्यं दाखवणारी 'The Searching Eye' नांवाची एक वीस मिनिटांची फिल्महि अिथं दाखवली जात होती. याशिवाय छायाचित्रकारांना छायाचित्रं काढण्यासाठीं अुद्यानं, कारंजीं, पायवाटा असलेली नैसर्गिक पार्श्वभूमीहि तिथं निर्माण करण्यांत आलेली होती.

'जनरल सिगार' कंपनीचा पॅव्हिलियन इतरांच्या मानानं लहानसाच होता. पण एका यांत्रिक करामतीमुळं तो सर्वांचं लक्ष वेधून घेत होता. दर वीस सेकंदांनी ह्या ठिकाणावरून बारा फूट व्यासाचीं प्रचंड धूम्रवलयं १५० फूट अुंचीपर्यंत सोडलीं जात. ह्याच पॅव्हिलियनमधें एका थिएटरांत प्रत्येकीं दहा मिनिटांचा एक असे प्रत्येक तासांत एकूण तीन असे जादूचे प्रयोगसुद्धां सादर केले जात होते. अचानकपणं हवेंतून कांही मानवी व्यक्ती किंवा कांहीं पदार्थ निर्माण करणं, त्यांना कांहीं काळ तरंगत ठेवणं आणि नंतर प्रेक्षकांच्या समोरच त्यांना अदृश्य करणं, हा त्यांतील जादूचा एक खास खेळ होता. ह्याशिवाय 'मूव्ही इन द राउंड' हा ३६० अंश पडद्यावरचा, प्रेक्षकाच्या सर्व बाजूंनीं दाखवला जाणारा एक छोटासा चित्रपटहि तिथं दाखवला जात होता. ह्या चित्रपटांतलं पॅराशूटच्या उडीचं अखेरचं दृश्य पहातांना तर प्रेक्षकांना आपण स्वतःच पॅराशूटच्या साहाय्यानं विमानांतून उडी मारुन खालीखालीं जमिनीकडे जात आहोंत असा भास होई.

इंडस्ट्रियल एरियांतला आणखी एक महत्त्वाचा पॅव्हिलियन म्हणजे 'RCA'चा. ह्या पॅव्हिलियनमधें 'वर्ल्ड्‌स् फेअर'चा अधिकृत रंगीत टेलिव्हिजन स्टुडिओ होता. 'वर्ल्ड्‌स् फेअर'मधल्या २५० टेलिव्हिजन सेट्‌स्‌वरती रंगीत कार्यक्रम ह्याच ठिकाणाहून सादर केले जायचे. यासाठीं रंगीत TV कॅमेऱ्याचं एक फिरतं पथक सगळीकडे फिरत असे. या ठिकाणच्या कार्यक्रमांत जगांतल्या महत्त्वाच्या बातम्या आणि महत्त्वाच्या घटना सादर केल्या जात. त्याचप्रमाणं 'वर्ल्ड्‌स् फेअर'मध्ये चुकलेल्या, हरवलेल्या बालकांनाहि अिथल्या स्टुडिओंत आणून टेलिव्हिजनवर त्यांचं दर्शन घडवण्यांत येत असे. त्यामुळं 'फेअर'मधल्या २५० टीव्ही-सेट्‌सवर आपल्या हरवलेल्या दिव्य रत्नाचं विलोभनीय दर्शन चिताग्रस्त आअीबापांना कुठंहि गेलं तरी घडत असे! ह्या पॅव्हिलियनमधें प्रवेश करणारे प्रेक्षक टलिव्हिजन कॅमेऱ्याच्या जवळून जाऊ शकत आणि समोरच्या टेलिव्हिजनसेटवर स्वतःला रंगीत चित्राच्या स्वरूपांत पाहूं शकत.

इंडस्ट्रियल एरियामधल्या ह्या महत्त्वाच्या पॅव्हिलियनखेरीज 'अमेरिकन एक्स्प्रेस', 'कोका कोला', 'फॉर्मायका', 'IBM', 'पॅन अमेरिकन', 'पेप्सी-कोला', 'सेव्हन-अप्', 'मेस्ट्रो पिझ्झा' इत्यादि पॅव्हिलियन्सहि प्रेक्षणीय होते. यांतला पिझ्झाचा पॅव्हिलियन मला विशेष 'चटकदार' वाटला. या

पॅव्हिलियनमध्यें चीझ, टोमॅटो आणि पिझ्झामधील इतर घटक पदार्थ यांच्या साह्यानं अिटालियन पद्धतीनं पिझ्झा हा लोकप्रिय खाद्यपदार्थ कसा तयार करतात ह्याचं प्रात्यक्षिक दाखवण्यांत येत होतं. थालिपिठासारख्या पिझ्झाच्या मोठाल्या चकत्या स्वत: 'अिटरेस्ट' घेअून आपल्या हातानं भाजून वघण्याचीहि प्रेक्षकांना परवानगी होती. अेवढा गरमागरम पिझ्झा तयार करण्याचा प्रचंड कार्यक्रम डोळ्यांपुढं चाललेला असतांना तसंच पुढं जाणं शक्य नव्हतं. 'वर्ल्ड्स् फेअर'मधे पायीं फिरून आम्हांला थोडसं दमल्यासारखंहि वाटत होतं. म्हणून मी आणि माझे एक मित्र प्राध्यापक अमलचंद्र रॉय यांनीं त्या ठिकाणीं शांतपणं बसून पिझ्झाचा आस्वाद घेतला, आणि पाण्याची तहान बियरनं भागवली !

'इंटरनॅशनल अेरिया'मध्यें जपानचा पॅव्हिलियन मी प्रथम पाहिला. गेल्या १०० वर्षांत औद्योगिक आणि अितर क्षेत्रांत जपाननं केलेल्या अफाट प्रगतीचं दर्शन मला तिथं घडलं. स्पेस रॉकेट्स्, मायक्रोस्कोप्स्, कॅमेरे, मोटरगाड्या, आणि इतर औद्योगिक यंत्रं ह्यांचं एक थक्क करणारं संमेलनच त्या पॅव्हिलियनमध्यें भरलेलं होतं. जगांतल्या सर्वांत वेगवान् म्हणजे ताशीं १६० मैल जाणाऱ्या जपानी एक्स्प्रेस आगगाडीचं प्रमाणबद्ध मॉडेल तिथं मांडलेलं होतं. जपानी लोकांची पुष्परचनेची कला आणि त्यांची चहा घेण्याची वैशिष्टचपूर्ण पद्धति यांचीं प्रात्यक्षिकंहि तिथं दाखवण्यांत येत होतीं. जपाननिर्मित रॉकेटच्या मॉडेलमध्यें पाअूल टाकतांच अवकाशप्रवासाच्या अनुभवाची पूर्ण कल्पना मनाला येई. तेथील एक बटन दाबतांच अिलेक्ट्रॉनिक कॉम्प्युटर जगांतल्या जवळजवळ कुठल्याहि ठिकाणीं कसं जायचं त्याची माहिती देत असे. पलिकडच्याच एका स्टॉलवर ट्रॅन्झिस्टरपासून टीव्हीपर्यंतच्या सर्व जपानी वस्तू विक्रीसाठीं आकर्षकपणं मांडून ठेवलेल्या होत्या. जपानच्या पॅव्हिलियनच्या रेस्टॉरंटमध्यें पाश्चिमात्य पद्धतीनं खुर्च्या–टेबलांवर, किंवा खास जपानी पद्धतीनं बुटक्या टेबलांजवळ जमिनीवर चटअीवर बसून 'सुकीयाकी' व 'टेम्पुरा' हे अस्सल जपानी खाद्यपदार्थ खाण्याची सोय केलेली होती.

स्वित्झर्लंडचा पॅव्हिलियन अगदी लहानांत लहान घड्याळांपासून तों भिंतीवरच्या मोठ्या घड्याळांपर्यंत घड्याळांनीच व्यापून टाकलेला होता असं म्हणायला हरकत नाही. एकूण २० लाख डॉलर्स किंमतीचीं घड्याळं तिथं मांडलेलीं होती. पॅव्हिलियनच्या प्रवेशद्वाराशीच 'टाअिम सेंटर' होतं. तिथं अगदीं पाव सेकंदापर्यंत दाखवली जाणारी अधिकृत वेळ समजत असे. तिथल्या 'मास्टर क्लॉक'मध्यें वर्ष, दिवस, तास, मिनिटं, सेकंद, अेकादशांश सेकंद आणि अेकशतांश सेकंद दाखवले जात होते. या घड्याळापुढं अुभं राहून प्रेक्षकांना फोटो काढायला उत्तेजन दिलं जात असे. अशा फोटोंत प्रेक्षकानं नक्की कोणत्या सालीं, कोणत्या

दिवशी, किती वाजतां ‘ वर्ल्ड्स् फेअर ’ला भेट दिली तें आपोआपच छायाचित्रित केलं जात असे. स्वित्झर्लंडच्या प्रसिद्ध चॉकोलेट्स्ची आणि चीझची तडाखेबंद विक्रीहि तिथंच एका ठिकाणी होत होती.

स्विस् पॅव्हिलियनपासून कोरियन पॅव्हिलियनपर्यंतच्या १८७५ फूट अंतरावर ११३ फूट उंचीवर केबल्स टाकलेल्या होत्या. त्या केबल्सवरून लोंबकळत, घसरत जाणाऱ्या धांवत्या केबिन्स् ‘ स्विस् स्काय राअिड ’चं खास आकर्षण होत्या. ‘ स्विस् स्काय राअिड ’च्या ह्या एकेरी प्रवासाला चार मिनिटं वेळ लागायचा आणि ७५ सेंट्स् तिकिट पडायचं. एका केबिनमधें चार उतारूंना बसण्याची सोय केलेली होती, आणि दर १२ सेकंदांनी केबिन्स सुटत होत्या. ह्या केबिन्समधून प्रवास करतांना ‘ वर्ल्डस् फेअर ’चं विलोभनीय विहंगम दृश्य दिसत असे.

‘ रिपब्लिक ऑफ चायना ’च्या पॅव्हिलियनमधें प्राचीन चिनी संस्कृतीचं ठळक दर्शन पावलोपावलीं घडत होतं. पॅव्हिलियनच्या इमारतीचं वास्तुशिल्प-सुद्धां अस्सल चिनी पद्धतीचं होतं. पॅव्हिलियनच्या तळमजल्यावर चिनी वेषभूषेचे प्राचीन आणि आधुनिक नमुने, प्राचीन काळच्या आकृती असलेल्या आधुनिक काळांतील हस्तव्यवसायाच्या वस्तू इत्यादि गोष्टी मांडलेल्या होत्या. त्याच-प्रमाणं चीनमधील जमीन-सुधारणेचा इतिहास आणि आर्थिक प्रगति यांचाहि परिचय करून दिलेला होता. दुसऱ्या मजल्यावर एका वैशिष्टयपूर्ण चिनी घराच्या दृश्याच्या साहाय्यानं चिनी लोकांची जीवनपद्धति दाखवलेली होती. तिसऱ्या मजल्यावर अतिप्राचीन, पुरातन, उत्खननांत सांपडलेल्या वस्तूंच्यां प्रद-र्शनाच्या द्वारें चीनचा ५००० वर्षांचा इतिहास प्रेक्षकांपुढं साकार केलेला होता. ‘ शांग ’ राजवंशांतील ( 1766—1111 B. C. ) दगडाचा वाघ हा ‘ फेअर ’ मधला सर्वांत प्राचीन शिल्पकलेचा नमुना होता.

पाकिस्तानचा पॅव्हिलियन इस्लामी पद्धतीच्या वास्तुशिल्पकलेनं बांधलेला होता. आंतमधे निरनिराळे पुतळे, रंगीत चित्रं, मातीचीं व इतर धातूंची भांडीं, जडजवाहीर आणि कांहीं प्राचीन हस्तलिखितं यांच्या साहाय्यानं इस्लामी संस्कृतीचं दर्शन घडवलेलं होतं. खिस्ती शकापूर्वी अडीच हजार वर्षांपासून तों आजच्या काळापर्यंतच्या इस्लामी सस्कृतीमधील व इतिहासामधील स्थित्यंतरं तीन टप्प्यांत पाकिस्ताननं दाखवली होतीं. त्याचप्रमाणं मांगला व तारबेला या पाकिस्तानां-तील धरणांच्या प्रतिकृती मांडून पाकिस्ताननं आपल्या भविष्यकालीन प्रगतीचीहि ग्वाही दिलेली होती. तिथल्याच एका स्टॉलवर पाकिस्तानांत तयार झालेल्या खेळण्यांपासून रगापर्यंतच्या अनेक वस्तू विक्रीसाठीं मांडून ठेवलेल्या होत्या. पाकि-स्तानच्या रेस्टॉरंटमधें मिळणाऱ्या ‘ कबाब ’ व ‘ मुर्ग कूर्मा ’ या डिशेस्ची चव घेण्यासाठीं अनेक लोक गर्दी करीत होते.

 ५११८३ ५४१ मू-४५१K१ २५।८।७१

इंडिया पॅव्हिलियनमधें मीं प्रवेश करतांच मला एकदम हिंदुस्थानांत आल्याचा भास झाला. आपल्या पॅव्हिलियनमधील वातावरण शक्यतों भारतीय राखण्याचा प्रयत्न केलेला होता. 'दो आँखें बारह हाथ', 'तेरे घरके सामने', 'मेरे मेहेबूब', 'नवरंग' इत्यादि हिंदी चित्रपटांतील गाणी आणि सैगलचीं कांहीं गाणीं तिथं ऐकवण्यांत येत होती. अितर पॅव्हिलियनमधें दिसून आल्या, तशा यांत्रिक करामती मला आपल्या पॅव्हिलियनमधें फारशा कुठं दिसल्या नाहीत. त्या बाबतीत खरोखरच कल्पकतेचा अभाव मला जाणवला. फक्त भारतांतील निर-निराळ्या प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू, आपल्या औद्योगिक प्रगतीचं दर्शन घडवणारीं कांहीं यंत्रं, पुरातन मूर्ती, खादी व अितर भरजरी रेशमी कापडांचे नमुने, हातमागाचं कापड, चामड्याच्या हस्तकौशल्याच्या वस्तू वगैरे माल व्यवस्थितपणं मांडलेला होता. ह्या मालाची विक्री करण्यासाठी प्रत्येक विभागांत त्यांतल्या त्यांत चांगल्या दिसणाऱ्या हिंदी स्त्रियांची योजना करण्यांत आलेली होती. माझ्या माहितीप्रमाणं एकूण चोवीस हिंदी स्त्रिया तिथं आळीपाळीनं 'गाअिड' म्हणून काम करीत होत्या. त्यांत विमला वैद्य नांवाच्या दिल्लीच्या एक हसतमुख बाईहि होत्या. अेका ठिकाणी पंडित नेहरूंच्या फोटोशेजारीं, त्यांनी १४ ऑगस्ट १९४७ ला मध्यरात्री केलेल्या भाषणातला सात ओळीचा उतारा लिहिलेला होता. एका स्टँडवर रेकॉर्डस्च्या बाहेरच्या कव्हर्सचं प्रदर्शन मांडलेलं दिसत होतं. त्यांत पन्नालाल घोष, रविशंकर, एम्. एस्. सुब्बलक्ष्मी, यांच्या जोडीला 'जंगली', 'आशिक', 'गंगाजमना', यांचींहि छायाचित्रं होतीं. हें पाहून मला आपल्या पॅव्हिलियन-कर्त्यांच्या योजकतेचं विशेष कौतुक वाटलं !



'इंडिया पॅव्हिलियन' : कल्पकतेचा अभाव. एअर कंडिशनिंगची चुणूक


आपल्या लोकांची यांत्रिक करामत नाहीं म्हणायला एका ठिकाणीं मला दिसली. आणि ती फार चांगली होती. त्यामुळं तिचा अुल्लेख करायला हवा. 'The Changing Face of India' या नांवाचा एक छोटा विभाग होता. त्यांत निरनिराळ्या स्त्रीपुरुषांच्या दहाबारा बाहुल्या होत्या. प्रथम त्या बाहुल्यांचे पोषाख, त्यांच्या हातांतील वस्तू– शेतीची अवजारं वगैरे– जुन्या पद्धतीच्या दिसत. पण एका क्षणांत आपल्या डोळ्यांदेखत त्या बाहुल्यांचे पोषाख व चेहेरेहि बदलत. उदाहरणार्थ :– एखाद्या जुन्या पद्धतीचा पोषाख केलेल्या मराठमोळ्या स्त्रीच्या जागी एखादी अद्ययावत् पोषाख केलेली नर्स दिसे. इतर बाहुल्यांमधेंहि असाच बदल होअून, त्यांतून भारताच्या आजच्या प्रगतीचं दर्शन होअी. पुन्हा दुसऱ्या क्षणाला तीं जुनीं चित्रं दिसूं लागत.

इंडिया पॅव्हिलियनच्या वरच्या मजल्यावर 'एअर कंडिशनिंग' बहुधा नसावं. अगर असलं तरी तें एअर कंडिशनिंगचं यंत्र भारतांतच बनवलेलं असावं ! त्यामुळं आपल्या पॅव्हिलियनचे संचालक, पॅव्हिलियनच्या वरच्या मजल्यावर, भारतांतील एकंदर हवामान कसं असतं तें दाखवण्याच्या प्रयत्नांत यशस्वी झाले होते !

आपल्या 'पॅव्हिलियन'मधून बाहेर पडण्यापूर्वी तिथं ठेवलेल्या 'व्हिजिटर्स बुक'मधें अनेक थोर असामींच्या सह्यांखालीं मीहि अेक छानशी सही केली, आणि 'Excellent' असा शेरा दिला ! नंतर हळूच घाईघाईनं त्या पानावरचे इतरांचेहि शेरे पाहिले. पण शेरे देण्याच्या बाबतीत माझ्यासारखा उदारात्मा अन्य आढळला नाही !

'वर्ल्ड्‌स् फेअर'च्या 'फेडरल अँड स्टेट एरिया'मधें 'युनिस्फिअर' तर होताच. पण त्याशिवाय युनायटेड स्टेट्‌स्‌चा एक मोठा पॅव्हिलियन आणि अिलिनॉय, लुइझाना, मिनेसोटा, न्यू जर्सी, मिसूरी, न्यू अिंग्लंड, न्यूयॉर्क स्टेट, न्यूयॉर्क सिटी, हॉलिवुड इत्यादींचे वीस पॅव्हिलियन्स होते.

युनायटेड स्टेट्‌स्‌च्या पॅव्हिलियनमधें प्रवेशद्वाराजवळच्याच एका थिएटर-मधें नअू मिनिटांची एक फिल्म अखंडपणं दाखवली जात होती. तीत अगदीं सुरुवातीच्या काळापासून आजपर्यंत अमेरिकेचं आधुनिकीकरण कसं झपाट्यानं होत आहे तें दाखवलेलं होतं. पॅव्हिलियनच्या दोन मोठ्या हॉल्समधें अमेरिकेनं चालवलेला शांततेचा आणि स्वातंत्र्याचा पाठपुरावा सचित्र मजकुराच्या साहाय्यानं दाखवलेला होता. 'चॅलेंज ऑफ फ्रीडम' या विभागांत अमेरिकेनं केलेल्या प्रगतीचे अमेरिकन जीवनावर झालेले परिणाम चित्रित करण्यांत आलेले होते. ह्याच ठिकाणीं कॉम्प्युटरच्या साहाय्यानं चालवलेलं आधुनिक संशोधन-ग्रंथालय होतं. पलिकडेच मुलांच्यासाठीं असलेल्या एका खास खोलींत २००० अमेरिकन



'न्यूयॉर्क स्टेट पॅव्हिलियन'चे ऑब्झर्व्हेशन टॉवर्स, आणि वर जाण्यासाठीं उपयोगांत आणला जाणारा कॅप्सूल इलेव्हेटर

आणि ५०० परदेशी पुस्तकं ठेवण्यांत आलेलीं होतीं. याच खोलींत मुलांना ठराविक वेळला मनोरंजक गोष्टी सांगितल्या जात आणि त्यांना आवडेल असा चित्रपटहि दाखवला जात होता.

अमेरिकेंतल्या 'इलिनॉय स्टेट'नं आपले सोळावे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांच्यासंबंधीच्या वस्तूंचं अभूतपूर्व प्रदर्शन मांडलं होतं. प्रेसिडेंट लिंकन यांच्या आजपर्यंतच्या सर्व उपलब्ध छायाचित्रांची एकेक प्रत तिथं होती. त्यांच्या इतिहासप्रसिद्ध 'गेटिस्‌बर्ग 'भाषणाचं मूळ हस्तलिखितहि तिथं ठेवलेलं होतं. आणि सर्वांत विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रेसिडेंट अब्राहम लिंकन यांचं साक्षात् दर्शनहि तिथं प्रेक्षकांना घडत होतं. अशक्य वाटतं ना? पण ही अगदी अशक्य वाटणारी गोष्ट 'वॉल्ट डिस्ने' या जगांतल्या पहिल्या दर्जाच्या किमयाकारानं प्रत्यक्षांत आणून दाखवली होती. प्रे. लिंकन यांची एक अगदीं तंतोतंत हुबेहूब देहाकृति वॉल्ट डिस्नेनं तयार केली होती. ह्या कृत्रिम देहाकृतीमध्यें वॉल्ट डिस्ने यांनीं अक्षरश: प्राण ओतला होता! त्यामुळं प्रेसिडेंट लिंकनची ही 'animated figure' दिसण्यांत, बोलण्यांत, चालण्यांत, विशिष्ट हालचाली करण्यांत हुबेहुब प्रेसिडेंट लिंकनचं प्रत्यक्ष दर्शनच घडवीत होती. प्रेसिडेंट लिंकनची ही कृत्रिम आकृति किती प्रकारच्या हालचाली करूं शकत होती?— हंसणं, कपाळाला आंठ्या घालून नापसंती दाखवणं, अितर कांहीं हावभाव करणं, अंगविक्षेप करणं इत्यादि प्रकारच्या एकूण २५०००० हालचाली करण्याची योजना प्रेसिडेंट लिंकनच्या त्या आकृतींत केलेली होती. 'Great Moments With Mr. Lincoln'

या नांवाचा, प्रेसिडेंट लिंकनच्या साक्षात् दर्शनाचा हा कार्यक्रम ' इलिनॉय पॅव्हि-लियन 'च्या ५०० सीट्स्च्या ' लिंकन थिएटर 'मधें दाखवला जात असे. केवळ ही एकच गोष्ट पहाण्यासाठीं देशोदेशींचे मोठमोठे नेते, राजकीय मुत्सद्दी ' इलिनॉय पॅव्हिलियन 'ला भेट देत होते.

हॉलिवुड पॅव्हिलियनमधें हॉलिवुडच्या इतिहासांतील महत्त्वाच्या चित्रपट-विषयक गोष्टींचं प्रदर्शन होतं. या प्रदर्शनांत गाजलेल्या चित्रपटांमधें नटनटींनीं वापर-लेले पोषाख, जडजवाहीर, इतकंच काय, पण ' The greatest show on Earth ' या गाजलेल्या चित्रपटांतली एक छोटी आगगाडीसुद्धां ठेवलेली होती. जगप्रसिद्ध दिग्दर्शक सेसिल बी. डि 'मिल यांच्या रुपेरी जीवनांतील कर्तृत्वाचा आलेख रेखाटणारा एक वेगळा विभागहि तिथं होता. हॉलिवुडच्या पॅव्हिलियनचं आणखी एक खास आकर्षण म्हणजे हॉलिवुडच्या जगप्रसिद्ध नटनटींची तिथं असलेली अुपस्थिति ! प्रत्येक आठवड्याला, क्लॉडेट कोल्बर्ट, जोन क्रॉफर्ड, जोन फॉन्टेन्, मॉरिन ओ'-सुलिव्हां, चार्ल्स बॉयर आणि कर्क डग्लस यांच्यासारख्या जगप्रसिद्ध नटनटींपैकीं कोणीतरी अेकजण आळीपाळीनं पॅव्हिलियनचा ' होस्ट ' ( host ) म्हणून अुपस्थित रहात असे. याशिवाय अितरहि कांहीं नटनटया पॅव्हिलियनला धांवती भेट देत आणि आपल्या चाहत्यांना स्वाक्षऱ्या देत. अर्थात् अेकाच वेळी शेकडों चाहत्यांना स्वाक्षरी देणं कसं शक्य होणार ? आणि दिवसभर स्वाक्षऱ्या तरी किती करणार ? म्हणून ते कलावंत ' मल्टिपल रायटिंग मशिन 'च्या साहाय्यानं स्वाक्षऱ्या करीत. ह्या योजनेनं त्यांना अेकाच वेळीं १०० स्वाक्षऱ्या करतां येत. इतर बहुतेक सर्व पॅव्हिलियन्सप्रमाणं इथंहि अेक ' बार ', रेस्टॉरंट आणि वस्तूंच्या विक्रीसाठीं काहीं दुकानंहि होतीं.

न्यूयॉर्क सिटी पॅव्हिलियनमधें ' आअिस थिअेटर ' होतं. या थिएटरमधें सुमारं १५० नामवंत खेळाडू आपल बर्फावरचं स्केटिंगचं कौशल्य दाखवीत. जवळ-जवळ संपूर्ण दिवसभर हा कार्यक्रम सादर केला जात असे. १९६४ सालींच न्यूयॉर्क शहराचा ३०० वा वाढदिवस होता. त्या निमित्तानं १६६४ साली न्यूयॉर्क शहर कसं होतं त्याचं हुबेहुब दर्शन एका मॉडेलच्या साहाय्यानं घडवलेलं होतं. त्याच-प्रमाणं १९६४ मधल्या न्यूयॉर्कचंहि मॉडेल उभं केलेलं होतं. ह्या मॉडेलमधें तर सध्याच्या न्यूयॉर्क शहरांतल्या एकूण ८३५०० इमारतींपैकी प्रत्येक इमारत, रस्ते, पूल, विमानतळ इत्यादि सर्व गोष्टी अगदी बारकाईनं दाखवण्यांत आलेल्या होत्या.

न्यूयॉर्क सिटीच्या ह्या पॅव्हिलियनशिवाय न्यूयॉर्क स्टेटचा असा एक वेगळा पॅव्हिलियनहि होताच. तीन उंचच्या उंच ' ऑब्झर्वेशन टॉवर्स ', आणि त्यांच्या सर्वांत वरच्या मजल्यावर जाण्यासाठीं ठेवलेले अतिवेगवान् ' sky streak ' ' कॅप्सूल-अिलेव्हेटर्स ' हे न्यूयॉर्क स्टेटच्या ह्या पॅव्हिलियनचं मोठंच आकर्षण होतं.

ट्रॅन्स्पोर्टेशन एरियामधें जास्तींत जास्त प्रेक्षकांना आकृष्ट करून घेणारे पॅव्हिलियन्स म्हणजे 'जनरल मोटर्स' आणि 'ऑटो थ्रिल शो'. जनरल मोटर्सच्या पॅव्हिलियनमधें 'फ्यूचरमा' ( Futurama ) हा एक मानवाच्या भविष्यकालीन जीवनाचं दर्शन घडवणारा कार्यक्रम, अजूनहि प्रायोगिक अवस्थेंत असलेल्या तीन वेगळ्या प्रकारच्या मोटारगाड्या आणि पांच 'ड्रीम किचन्स्' या गोष्टी विशेष बघण्यासारख्या होत्या. 'फ्यूचरमा' बघणारे प्रेक्षक अतिशय सुखद अशा आराम-दायक खुर्च्यांवर बसलेले असतात. 'शो' सुरू होतांच अेका विशिष्ट मार्गावरून त्या यांत्रिक खुर्च्या प्रेक्षकांसह भविष्यकालीन जीवनाचा प्रवास करूं लागतात. या प्रवासांत चंद्रावरची सहल, बर्फाखालचं जीवन, पाण्याखालचीं कांहीं दृश्यं, जंगलाचं व वाळवंटाचं दर्शन आणि भविष्यांतली अेक स्वप्ननगरी यांचं दर्शन प्रेक्षकांना घडतं. भविष्यांतल्या ह्या स्वप्ननगरींत नगराच्या मध्यवस्तींत असलेले विमानतळ, अतिवेगवान् बसेस् व आगगाड्या, न्यूयॉर्कच्या स्कायस्क्रेपर्सना लाजवतील अशा अुंचीच्या 'सुपर स्कायस्क्रेपर्स' अिमारती, सरकणारे 'साअिड वॉक्स' वगैरे अनेक अद्‌भुतरम्य गोष्टी बघायला मिळत.

'ऑटो थ्रिल शो'च्या पॅव्हिलियनमधें प्रेक्षकांसाठीं एक खास 'स्टेडिअम' बांधण्यांत आलेला होता. त्या स्टेडिअममधें एकाच वेळीं हजारों प्रेक्षकांची बसण्याची सोय केलेली होती. या प्रेक्षकांच्या उपस्थितींत 'Hell Drivers' या संज्ञेला खरोखरच पात्र असलेले तीस मोटरकार–ड्रायव्हर्स क्षणोक्षणीं आपला जीव धोक्यांत घालून तुफान वेगानं मोटारींच्या कसरतींचे प्रयोग करून दाखवीत. दोन मोटारींची टक्कर, भयानक वेगांत एकदम वळण घेतल्यानं अवघ्या एकाच बाजूच्या दोन चाकांवर धांवणारी मोटरकार, तुफान वेगानं उड्डाण करून सत्तर फूट लांबीचं अंतर हवेंत कापणारी मोटरकार वगैरे श्वास रोखायला लावणारे मोटारींच्या कसरतींचे प्रयोग तिथं पहायला मिळत.

'लेक ॲम्युझ्मेंट एरियां'तील मुद्दाम बघण्यासारख्या दोन गोष्टी म्हणजे 'मोनोरेल' ( Monorail ) आणि 'डान्सिग वॉटर्स'! अुद्यांच्या जगांत आतां अेका रुळावर चालणारी आणि जमिनीपासून ४० फूट अुंचीवर हवेंत लोंबकळत वेगाने जाणारी आगगाडी अस्तित्वांत येणार आहे. 'फेअर'मधली ही आगगाडी अवघ्या दोन डब्यांची होती. डबे अर्थातच एअरकंडिशन्ड होते. ह्या गाडीचं 'स्टेशन' ८० फूट उंचीवर होतं. आणि तिचा एकेरी मार्ग ४००० फूट लांबीचा होता. अवघ्या आठ मिनिटांच्या ह्या आगगाडीच्या सहलींत उतारूंना 'वर्ल्डस् फेअर'चीं अनेक मनोरम दृश्यं दिसत. गाडीच्या खिडक्यांतून वेगवेगळ्या अँगलसनीं 'वर्ल्ड्स् फेअर'चीं सुंदर छायाचित्रं घेण्याची संधीहि त्यांना मिळे. सकाळीं नऊ वाजल्यापासून तों रात्रीचे दोन वाजेपर्यंत 'मोनोरेल' चालू असे. प्रवासाचं तिकिट फक्त ८० सेंट्सूचं होतं.

'डान्सिंग वॉटर्स' म्हणजे ४००० तोटयांचं एक महाप्रचंड, यांत्रिक करामतीचा कळस असलेलं कारंजंच ! कारंज्याच्या पाण्याच्या धारांची उंची, अनेक धारा भिन्नभिन्न दिशांनीं एकत्र येऊन निर्माण होणाऱ्या चित्रविचित्र आकृती, बाजूच्या व पाण्यांतील दिव्यांनी त्यांच्यावर फेंकले जाणारे रंगीबेरंगी प्रकाशझोत– या साऱ्या गोष्टी यांत्रिक करामतींनीं नियंत्रित केलेल्या आढळल्या. आणि सर्वांत अद्‌भुतरम्य गोष्ट म्हणजे वॉल्ट्झ्, टँगो बॅले, जाझ आणि बीट्‌ल् या नृत्यसंगीत प्रकारांच्या तालावर कारंज्याच्या जलधारा नाचतांना दिसायच्या. जलधारांच्या नृत्यसंगीतासाठीं ६० वाद्यांचा 'ऑर्केस्ट्रा' उपयोगांत आणलेला होता. या संगीताच्यातालावर कांहीं जलधारा १५० फूट अुंच हवेंत झेप घ्यायच्या. जलधारांवर प्रक्षेपित करण्यांत येणाऱ्या रंगीबेरंगी प्रकाशझोतांची एकूण शक्ति १५ कोटी कँडल् पॉवरची होती ! कारंज्याच्या जलाचा परिसर २५००० स्क्वेअर फूट होता ! सारंच प्रचंड ! सारंच अद्‌भुत ! एखाद्या स्वप्नांतल्या स्वर्गीय दृश्यासारखं भासणारं !

'टॉवर ऑफ लाअिट'मधून सोडण्यांत येणारा प्रकाशझोतहि असाच प्रखर होता. न्यूयॉर्कच्या आसपासच्या १०० मैलांच्या परिसरांत कुठूनहि तो आकाशांत उंच गेलेला दिसून येत असे.

साऱ्या जगाचं लक्ष वेधून घेणाऱ्या या महाप्रचंड जागतिक यात्रेची तयारीहि चार वर्षं आधीपासून चालू झाली होती. 'वर्ल्ड्‌स् फेअर'च्या प्रत्यक्ष उद्‌घाटनाच्या दिवसाच्या आधींच 'फेअर'ची ३ कोटी तिकिटं खपलेली होतीं. इतकीं कोटयावधि माणसं 'वर्ल्ड्स् फेअर' बघायला येणार, तेव्हां त्यांच्या सुखसोयींसाठी न्यूयॉर्ककडे जाणारे सारे रस्ते जवळजवळ पुन्हा नव्यानं बांधून काढले. त्यासाठी अमेरिकेनं १२०००००००० डॉलर्स खर्च केले. 'वर्ल्ड्‌स् फेअर'चा विस्तारसुद्धां एवढा प्रचंड होता की, 'फेअर'मधल्या रस्त्यांचीच एकूण लांबी चौदा मैल भरली असती ! 'फेअर'मधल्या सर्व राष्ट्रांच्या प्रदर्शकांच्या अिमारती बांधण्यासाठीं अेकूण २५०००० टन पोलादाचा अुपयोग करण्यांत आला. आतां एवढ्या महाप्रचंड अद्‌भुत जागतिक यात्रेंत पायीं फिरून सगळे स्टॉल्स पहाणं जवळजवळ अशक्य होतं. म्हणून अमेरिकेच्या 'Grey hound' ('ग्रे हाअुंड') कंपनीनं बसेस् आणि छोटया आकर्षक गाड्या मिळून अेकूण ३०० वाहनांची सोय केलेली होती. इतकंहि करून दमलेल्या प्रेक्षकांच्या विश्रांतीची, झोंपेची फार सुंदर सोय 'सीमन्स पॅव्हिलियन'नं केलेली होती. त्या ठिकाणीं सुखदायक बिछान्यांवर पडून आराम करण्याचं अगर झोंपण्याचं भाडं अर्ध्या तासाला फक्त एक डॉलर होतं. बांधकामाच्या सोयीसाठीं जत्रेच्या मैदानांतले पन्नास मोठमोठे वृक्ष उपटून पुन्हा दुसऱ्या जागीं लावण्यांत आले होते. त्याशिवाय ५३०० नवीन वृक्ष खास जत्रेसाठीं

लावण्यांत आलेले होते. 'फेअर'मधें सर्वत्र हिरवंगार वातावरण रहावं ह्यासाठीं एकूण १०००० पौंड गवताचं बीं पेरण्यांत आलं होतं. कुठं कांही गडबड झाली तर पोलिसांना बोलावण्यासाठीं १६५ 'इमर्जन्सी टेलिफोन्स' मोक्याच्या ठिकाणीं वसवलेले होते. प्रेक्षकांचं सामान संभाळण्यासाठीं २५०० 'पब्लिक लॉकर्स'ची व्यवस्था करण्यांत आली होती. प्रत्येक लॉकरचं भाडं फक्त २५ सेंट्स् होतं.

केवढा प्रचंड उद्योग ! केवढी जिद्द ! केवढी धडपड ! . . . आणि ही सारी प्रतिसृष्टि उभी करायची ती फक्त एका वर्षासाठीं ! त्यानंतर एवढ्या कष्टानं जें उभं केलं तें सारं आपल्या हातानं मोडायचं ! ज्या गोष्टी आपल्या-बरोबर परत नेतां येण्यासारख्या असतील त्या परत आपल्या देशाला न्यायच्या. पण फक्त पार्थिव जड वस्तूच आपल्यावरोबर न्यायच्या असं कसं म्हणतां येईल ? त्याहिपेक्षां लाखमोलाच्या अशा परस्परांबद्दलच्या सद्भावना, सदिच्छा, बंधुभाव, अखिल मानवतेबद्दलचं प्रेम– या साऱ्या भावनांनीं भारावलेलीं मनंसुद्धां सर्वांच्या बरोबर येणार नव्हतीं का ?

आपापले मतभेद, आपसांतल्या गैरसमजुती, राष्ट्राराष्ट्रांतले हेवेदावे– या साऱ्या गोष्टी विसरून जगांतल्या कानाकोपऱ्यांतलीं कोट्यवधि माणसं एका विराट् स्वरूपाच्या मेळाव्यांत सामील होतात, एकत्र हिंडतात, फिरतात, खातात-पितात, जीवनांतली मौजमजा लुटतात, आनंद लुटतात, दुसऱ्याला लुटूं देतात, त्याच्याहि आनंदांत आपण सहभागी होतात, ह्यापेक्षां आणखी दुसऱ्या कोणत्या गोष्टींनीं या विराट यात्रेचा जमाखर्च लिहायचा ? 'वर्ल्ड्स फेअर'मधे भाग घेतल्यामुळं एखाद्या राष्ट्राला परकीय चलन किती मिळालं, नंतरच्या वर्षांत त्याचा परराष्ट्रांशीं व्यापार किती टक्के वाढला, यावर का या विश्वयात्रेचं यश मोजायचं ? मेळा-व्याची भावना आपल्या श्वासाश्वासांत मिसळायची, नसानसांत भिनायची, डोळ्यां-तून दिसायची, हास्यांतून फुलायची. कांहीतरी घडवण्याचा आनंद देऊन जायची. घडवलेलं आपल्याच हातानं मोडायची वेळ आली तरी त्याबद्दल विषादाची छटाहि मनावर अुमटूं द्यायची नाहीं. जीवनाचा असा अर्थ उलगडून दाखवणाऱ्या 'वर्ल्ड्स फेअर'सारख्या मेळाव्याकडून अधिक अपेक्षा कसली करायची ? अखेर जगाचा हा सारा पसारा हाच एक न संपणारा मेळावा नाही का ?

□

# चाकांवरची फिरती दुनिया

न्यूयॉर्कच्या 'हेन्री हडसन हॉटेल'मधला माझा मुक्काम संपला होता. आतां त्यानंतरचा एक आठवडा आम्हांला मोकळा होता. ता. २८ ऑगस्ट १९६४ च्या रात्रीं १२ च्या 'ग्रेहाअुंड बस्'नें मला बॉस्टनला जायचं होतं. न्यूयॉर्क-हून बॉस्टनला जाऊन तिथून पुढं मग मी कॅनडाला जाणार होतों. एवढ्या मोठ्या प्रवासांत अमेरिकेंतलं माझं सगळंच सामान बरोबर नेणं कठिण होतं. आणि त्याची जरूरहि नव्हती. अगदीं जरूरीपुरतं सामान बरोबर घेअून मी पुढचा प्रवास करणार होतों. पण हॉटेलची खोली सोडायची असल्यानं उरलेलं सामान कुठं ठेवायचं हा माझ्यापुढं प्रश्न होता.

न्यूयॉर्कच्या 'पोर्ट अॅथॉरिटी बस् टर्मिनल'मधें सामान ठेवायची कांहीं व्यवस्था असल्यास त्याची चौकशी करण्यासाठीं हॉटेलमधल्या माझ्या खोलींतून मीं 'ग्रेहाउंड'ला रात्रीं ९ वाजतां फोन केला. पण त्या वेळी त्यांच्या 'माहिती विभागां'तले सर्व ऑपरेटर्स अितरांना माहिती देण्यांत कार्यमग्न होते. म्हणून फोनवर मला कुणा स्त्रीच्या मंजुळ आवाजांत 'रेकॉर्डेड मेसेज्' ऐकायला यायला लागला : "This is the Greyhound Information Department. At the present time, all of our Greyhound Information Operators are busy. Please wait. Your call will be answered very shortly. Thank you for waiting."

दर दहा सेकंदांनीं हाच 'ध्वनिमुद्रित संदेश' मला अैकायला येत होता. हा संदेश एकूण १० सेकंदांचा होता, आणि दर १० सेकंदांनंतर तो पुन्हापुन्हा ऐकवण्यांत येत होता. असं सुमारं १० मिनिटं चाललं. नंतर त्यांच्या 'Information Dept.'कडून मला हवी असलेली सर्व माहिती मिळाली.

दर दहा सेकंदांनीं मंजुळ, आर्जवी स्वरांत पुन्हापुन्हा ऐकायला येणारा तो संदेश मला फार सुखद वाटला. कारण हा अनुभव मला नवीनच होता! आपल्याकडे कुठलीहि माहिती विचारण्याचा गुन्हा करणाऱ्या इसमाच्या अंगावर ओरडण्याची पद्धत आहे. त्यांतूनहि मिळालेल्या अर्धवट माहितीनं समाधान न होऊन एखाद्यानं चिकाटीनं पुन्हा कांहीं प्रश्न विचारलेच तर, 'मानसं च्या प्यायला गेलीयन! .. जरा दम धरा कीं! .. इथं आमी काय हजामती करतू का? आँ? ..' असलीं मुक्ताफळं त्याच्या कानावर आदळायचीं! ह्या पार्श्वभूमीवर मला ग्रेहाउंडचा तो संदेश पुन्हापुन्हा ऐकत रहावासा वाटल्यास नवल नाहीं! संदेशांतला तो स्त्रीचा आवाज आणि तिची बोलण्याची पद्धत इतकी गोड होती कीं दहा मिनिटंच काय, जगाच्या अंतापर्यंतहि एखादा (तरुण) माणूस थांबायला तयार झाला असता! अमेरिकेंतल्या बस्-कंपन्यांचं समाजवादी फॅशनमुळं 'एस्टी-'करण झालेलं नसल्यामुळं अजूनहि तिकडच्या प्रवाशांच्या सुखसोयींकडे नम्रतापूर्वक लक्ष दिलं जातं.

त्या दिवशी रात्री साडेदहा वाजतां टॅक्सी करून मी 'पोर्ट ॲथॉरिटी बस् टर्मिनल'ला गेलों. तिथं 'स्टोअर'मधें माझी सामानाची मोठी बॅग सात दिवसांसाठीं ठेवायला दिली. सामान ठेवण्याचं भाडं दिवसाला ३५ सेंट्स् असं होतं. सामान तिथं ठेवून निष्काळजी मनानं मी तिकिट काढलं आणि बस् सुटण्याची वाट पाहूं लागलों. माझे सारे सहप्रवासी आपापल्या बायकामुलांसह शांतपणं 'क्यू' मधें उभे होते. कुठंहि गडबड, गोंधळ किंवा आरडाओरड यांचा मागमूसहि दिसत नव्हता. बसेस् सुटण्याची जागा जमिनीच्या खालीं असल्यामुळे हवेंतला गारवाहि तिथं अजिबात जाणवत नव्हता. फिरत्या जिन्यांवरून माणसं खालीं-वर जात-येत होतीं. भरपूर दिव्यांमुळे सर्वत्र दिवसाच्या प्रकाशाएवढा प्रकाश होता. बरोबर रात्री १२ला पाच मिनिटं कमी असतांना 'गेट' अुघडलं, आणि आम्ही बस्मधें बसलों. बारा वाजतां बस् सुटली.

अमेरिकेंत सर्वांत स्वस्त आणि त्या मानानं खरोखरच खूप सुखाचा प्रवास म्हणजे बस्चा. न्यूयॉर्क ते बॉस्टन हें अंतर २५० मैल आहे. २५० मैलांचा हा सारा प्रवास मी सुखानं झोंपून केला. अवघ्या साडेचार तासांत मी बॉस्टनला पोंचलों. बस्चं भाडं फक्त सात डॉलर्स आणि पंचेचाळीस सेंट्स् एवढंच पडलं. गंमत अशी कीं बॉस्टनला उतरल्यावर तिथून केंब्रिजला जाण्यासाठीं मीं टॅक्सी

केली. तिचं एवढ्याशा अंतराचं भाडं तीन डॉलर्स पडलं !

अमेरिकेंत दूरच्या प्रवासासाठीं बरेचसे प्रवासी बसेस्चाच उपयोग करतात. कारण तिकडच्या बसेसचा प्रवास खूपच सुखकर असतो आणि आगगाडी किंवा विमान यांच्या मानानं बराच स्वस्तहि असतो. आगगाडीच्या आणि बस्च्या प्रवासाला साधारणपणं सारखाच वेळ लागतो. उदाहरणच द्यायचं झालं तर तें न्यूयॉर्क-शिकागो-प्रवासाचं देतां येईल. न्यूयॉर्क ते शिकागो हें अंतर ८४१ मैलांचं आहे. या प्रवासाला बस्नं अवघे १७ तास लागतात, आणि भाडं फक्त २८ डॉलर्स पडतं. आगगाडीनं आपण फक्त २ तास आधीं पोंचतों आणि भाडं मात्र ४० डॉलर्स द्यावं लागतं. हें आगगाडींतल्या सर्वसामान्य 'कोच'चं भाडं झालं. आगगाडींतल्या 'फर्स्ट क्लास रूम्मेट'नं प्रवास केला तर एवढ्याच अंतराला ८२ डॉलर्स भाडं द्यावं लागतं. आगगाडीच्या फर्स्ट क्लासच्या प्रवासापेक्षां जेट विमानाचा प्रवास अधिक स्वस्त आहे. न्यूयॉर्क ते शिकागो जेट विमानानं फर्स्ट क्लासनं जायला सव्वादोन तास लागतात आणि ५६ डॉलर्स भाडं पडतं. जेट विमानानंच टूरिस्ट क्लासनं प्रवास केला तर ४३ डॉलर्स पडतात. इतर विमानांनीं सव्वातीन तास वेळ लागतो आणि त्यांचं टूरिस्ट क्लासचं भाडं ४० डॉलर्स पडतं.

सबंध अमेरिकेंत 'नॅशनल हायवेज्'चं जाळं इतक्या दूरवर पसरलेलं आहे कीं, आपण कोणत्याहि गांवीं आरामशीरपणं बस्नं जाऊं शकतों. अमेरिकेंतले रस्तेहि फार सुंदर आहेत. ६३ साली अमेरिकेंत २०००००० किलोमीटर्स लांबीचे सुंदर, गुळगुळीत, स्वच्छ रस्ते होते. आणि १० लाख किलोमीटर्सपेक्षां अधिक लांबीचे अितर रस्ते होते. आतां त्यानंतरच्या काळांत ह्या आंकड्यांमध्यें कितीतरी प्रचंड प्रमाणांत वाढ झालेली असणार. एकदां बस् सुरू झाली म्हणजे कित्येक तास वाटेंत थांबण्याची तिला गरज भासत नाहीं. कारण दूरच्या अंतरासाठीं वापरण्यांत येणाऱ्या जवळजवळ सगळ्याच बसेस्मध्यें 'रेस्ट रूम्स्' असतात. आणि कांहीं बसेस्मध्यें तर जेवणाचीहि सोय केलेली असते.

प्रवास अधिकाधिक सुखकर व्हावा म्हणून बऱ्याचशा बसेस् 'अेअर कंडिशन्ड' केलेल्या असतात. आपल्याकडच्या बसेस्प्रमाणं उतारूंचं सामान ठेवण्याची जागा बसेस्च्या टॉपवरती नसून बाहेरच्या बाजूनं बस्च्या एका बाजूला पोटांत असते. बस्च्या खिडक्यांच्या कांचा फिक्या हिरव्या रंगाच्या असतात. त्यामुळं उन्हाचा त्रास होत नाहीं. 'ग्रेहाउंड' ही अमेरिकेंतली सर्वांत प्रसिद्ध बस्-कंपनी. 'ग्रेहाअुंड'च्या प्रत्येक बस्मध्यें प्राथमिक अुपचारांचं साहित्य ठेवलेलं असतं. ड्रायव्हरच्या समोर, वरती सर्वांना दिसेल अशा ठिकाणीं ड्रायव्हरच्या नावाची पाटी लावलेली असते,–

'Your operator — Mr. X X X X

Safe — Reliable — courteous.'

बस्मधें इतरहि कांहीं सूचना देणाऱ्या पाट्या लावलेल्या असतात. **उदाहरणार्थ** :— 'Drinking intoxicants on coach prohibited.'

ड्रायव्हरच्या जवळ खास त्याच्यासाठीं लावलेला एक छोटा पंखा असतो. त्याच्या जवळच 'मायक्रोफोन' असतो, आणि त्याला उतारूंना कांहीं सूचना द्यायच्या असतात, तेव्हां तो 'मायक्रोफोन'मधून त्यांच्याशीं बोलतो. रात्रीच्या वेळीं ज्या उतारूंना झोंपायची अिच्छा असेल, त्यांना बस्-स्टेशनवर प्रत्येकीं ३५ सेंट्स् भाडं घेऊन तात्पुरत्या उश्या दिल्या जातात. उश्या देणारा कर्मचारी हंसतमुखानं प्रत्येकाला विचारून उश्या आणून देतो आणि आपलं काम झालं कीं उतरतांना 'Goodbye & have a nice trip' असं म्हणून निरोप देतो.

अमेरिकेंत एकमेकांना छेदून जाणारे रस्ते 'फ्लायओव्हर' पुलासारखे ठराविक अुंचीवरून क्रॉस करून जातात. त्यामुळं बसेस्ना वेग कमी करण्याची आवश्यकता भासत नाहीं नि अपघातांची शक्यताहि कमी होते.

अमेरिकेंतल्या वाहतुकीसाठीं रस्त्यांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणांत केला जात असल्यामुळं तिथले रस्ते नेहेमींच फार चांगल्या स्थितींत ठेवले जातात. 'हाय-वेज्'वरती जाण्यासाठी आणि येण्यासाठीं रस्त्याचे दोन स्वतंत्र भाग केलेले असतात. या दोन भागांच्या मधला सुरक्षित पट्टा साधारणपणं आपल्याकडच्या फूटपाथएवढा रुंद असतो, आणि तेवढाच उंच असतो. जाण्याच्या आणि येण्याच्या प्रत्येक भागांत दोन ते चार 'रोड चॅनेल्स्' असतात. हे 'रोड चॅनेल्स्' पांढऱ्या किंवा पिवळ्या रंगाच्या मैलच्या मैल लांबीच्या पट्ट्यांनीं निर्दशित केलेले असतात. याशिवाय बाणांच्या खुणाहि रस्त्यांवर केलेल्या असतातच. सामान्यत: समान वेगानं जाणारीं वाहनं एकापाठोपाठ एक ठराविक आंखीव मार्गामधून जातात. त्यामुळं एखाद्या वाहनाला कमी वेगानं जायचं असलं तर त्याच्या पाठीमागच्या वाहनांची पंचाईत होत नाहीं.

अमेरिकेंत रस्त्याच्या अुजव्या बाजूनं जाणं हाच नियम असल्यामुळं तिकडच्या मोटारी 'लेफ्ट हॅंड ड्राइव्ह' असतात. त्यामुळं एखाद्या वाहनाला मार्ग टाकून पुढं जायचं असल्यास त्याच्या डाव्या बाजूनं जावं लागतं. रस्त्यांमधें रद्दी कागद, केरकचरा वगैरे टाकायला मनाअी असते. हा नियम मोडणाऱ्यांना दंड केला जातो. No Litter. $ 50 Fine' अशा पाट्याव अनेक रस्त्यांवर दिसतात. त्यामुळं रस्ते नेहेमींच स्वच्छ ठेवले जातात. प्रवास करतांना कागदाचे तुकडे किंवा फळांच्या साली वगैरे रस्त्यावर न फेंकतां मोटारींतच आंतल्या बाजूला लाव-लेल्या पिशवींत टाकण्याची शिकवण अमेरिकेंतल्या मुलांना लहानपणापासून दिली जाते. ह्याच संदर्भांतली अेक आठवण सांगण्यासारखी आहे. अेकदां अमेरिकेंतल्या अेका दूरच्या प्रवासांत आमची बस् वाटेंतल्या एका गांवांत थांबली

होती. बस् सुटण्याची वेळ होतांच आमच्या ड्रायव्हरनं घाईघाईनं हातांतलं पेय संपवलं आणि बस् चालू केली. थोड्याच अंतरावर कचऱ्याची पेटी होती. ड्रायव्हरनं बस् पेटीजवळ आणली आणि जातांजातां पेयाचा रिकामा कागदी पेला पेटींत फेंकला. पण त्याचा नेम चुकला आणि तो पेला पेटीच्या बाहेर पडला. त्याबरोबर त्यानं बस् थांबवली. आपल्या जागेवरून खाली उतरून त्यानं तो पेला उचलून नीट पेटींत टाकला. आणि शांतपणं पुन्हा बस् चालू केली. एका बस्-ड्रायव्हरवरतीसुद्धां झालेला हा संस्कार मला विशेष लक्षणीय वाटला.

बसेस्च्या किंवा मोटरकार्सच्या ड्रायव्हर्सच्या मार्गदर्शनासाठीं अमेरिकेंत रस्त्यांवर ठिकठिकाणीं पाट्या लावलेल्या असतात.

'Slow. Dangerous Intersection.'

'Traffic Merges.'

'Railway Crossing. Stop.'

'Speeders Lose Licence.'

'Bridge may be Slippery.'

'Watch Children.'

' Food-Fuel 10 Miles.'

— अशा कितीतरी प्रकारच्या पाट्या रस्त्यांच्या बाजूना दिसतात. कांहीं ठिकाणीं वाऱ्यासारख्या वेगानं जाणाऱ्या वाहनांना 'Speed checked by Radar' अशी 'धमकी' देणारी पाटीहि आढळते. वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठीं 'रडार'च्या जोडीला पोलिसांच्या गस्त घालणाऱ्या 'पेट्रोल कार्स' असतातच. कांहीं ठिकाणीं तर 'हेलिकॉप्टर्स'मधून वाहनांवर 'नजर' ठेवण्यांत येते.

अमेरिकेंतलं सर्वांत लोकप्रिय वाहन म्हणजे मोटरकार. '६३ सालीं ६०००००००० पेक्षां अधिक मोटरकार्स अमेरिकेंतल्या रस्त्यांवरून धांवत होत्या. जवळजवळ प्रत्येक घरी एक मोटरकार असते, असं म्हणायला हरकत नाहीं. आपल्याकडे एखाद्या घरी दोनतीन सायकली असाव्यात, तशा तिकडे कांहीं घरांतून दोनतीन मोटरकार्स सहज आढळतात. तिथला पोस्टमनसुद्धां टपाल वांटण्यासाठी पोस्टाच्या मोटरगाडीचा उपयोग करतो. घरकाम करायला येणारे तिथले गडी-मोलकरीणहि बहुतेक ठिकाणीं स्वतःच्या मोटरगाडींतून येतात.

अशा अक्षरशः कोट्यवधि मोटरगाड्यांमुळं अमेरिकेंत पेट्रोलचा खप फार प्रचंड होतो. तिकडे पेट्रोलला 'गॅस' किंवा 'गॅसोलिन' म्हणतात. दर वर्षी अमेरिकेंत साधारणपणं दोन हजार दोनशें कोटी लिटर्स 'गॅसोलिन'चा खप होतो.

मोटरगाड्यांच्या अफाट उपयोगामुळं अमेरिकन जीवनाला प्रचंड 'गति'

तर आलीच आहे; पण त्याशिवाय आणखीहि एक मोठा परिणाम तिथल्या जीवनावर झालेला आहे. सहज उपलब्ध असणाऱ्या ह्या लोकप्रिय वाहनामुळं अमेरिकेंतल्या शहरांत नोकरीधंदा करणारे लाखों लोक शहरांतल्या गर्दींत रहाण्याऐवजीं शहराजवळच्या एखाद्या उपनगरांत राहूं लागले आहेत. त्यामुळं गेल्या पाव शतकांत अमेरिकेंतल्या शहरांजवळ नवीननवीन उपनगरांची वाढ फार मोठ्या प्रमाणांत झाली आहे.

मोटरगाड्यांनीं प्रवास करणाऱ्यांची सख्या अफाट प्रमाणांत वाढल्यामुळं तदनुषंगिक नवीन उद्योगधंद्यांचाहि विकास तिथं झाला आहे. मोठाल्या रस्त्यांपासून जवळच एका बाजूला मोकळ्या मैदानांत 'आउट डोअर मुव्ही थिअेटर्स' ठिकठिकाणीं उभारण्यांत आलेलीं आहेत. असल्या उघड्या चित्रपटगृहांमधें भरपूर उंचीवर एक खूप मोठा सिनेमाचा पडदा लावलेला असतो. सिनेमाला येणारे प्रेक्षक ह्या उघड्या थिएटरच्या मैदानांत मोटरगाड्या घेऊन येतात, आणि आपापल्या मोटरगाड्यांमधेंच बसून चित्रपट पहातात. अशा थिएटर्सना 'ड्राइव्ह इन् थिएटर्स' म्हणतात.

मोटरगाड्यांमुळं नवीनच सुरू होऊन झपाट्यानं वाढलेला दुसरा उद्योगधंदा म्हणजे 'मोटेल्स्'चा. समुद्रकिनाऱ्याजवळ आणि मुख्य रस्त्यांजवळ प्रवाशांच्या सोयीसाठीं मोटेल्स् निघालेलीं आहेत. दूरचा प्रवास असला म्हणजे



अमेरिकेंतला पोस्टमनहि टपालवांटण्यासाठीं अशी भव्य गाडी वापरतो. जनतेला टपाल व्यवस्थित मिळण्याचें कारण हेंच असावें काय ?

रात्रीं किंवा विश्रांतीसाठीं एखाददुसरा दिवसहि प्रवासी मोटेलमधें मुक्काम करतात. मोटेलचा प्रत्येक ब्लॉक हा स्वतंत्र बेडरूम-बाथरूम यांनीं स्वयंपूर्ण बनवलेला असतो. बऱ्याच मोटेल्स्मधल्या खोल्या 'एअर कंडिशन्ड' असतात, आणि बहुतेक खोल्यांतून 'टेलिव्हिजन सेट्स्' ठेवलेले असतात. प्रत्येक प्रवाशाला आपल्या रहाण्याच्या खोलीपुढं आपली मोटरकार 'पार्क' करण्याची तिथं सोय असते. मोठ्या मोटेल्स्मधें रेस्टॉरंट्स् आणि स्विमिंग पूलसहि असतात. अमेरिकेंतल्या हॉटेल्सपेक्षां अशा प्रकारच्या मोटेल्स्चं वार्षिक उत्पन्न अधिक असतं. इतकीं हीं मोटेल्स तिथं आतां लोकप्रिय झालेलीं आहेत.

मोटेल्समधें उतरण्यापेक्षां अलिकडे कांहीं अमेरिकन्सना प्रवासांत आपल्याबरोबर चाकांवरचं फिरतं घरच घेऊन जाणं आवडतं! हीं 'मोबाअिल होम्स्' प्रवासांत आपल्या मोटरच्या मागं जोडायचीं असतात. सामान्यतः कोणत्याहि बऱ्यापैकी अमेरिकन घरामधें असणाऱ्या जवळजवळ सर्व सुखसोयी ह्या चाकांवरच्या फिरत्या घरामधें असतात. 'ट्रॅव्हल ट्रेलर'चा आकार जसा लहानमोठा असेल, त्याप्रमाणं आणि त्याच्या किंमतीप्रमाणं सुखसोयी कमीजास्त प्रमाणांत आढळतात. 'ट्रेलर'च्या कमींत कमी जागेमधें किचन, बेडरूम, बाथरूमसकट दैनंदिन जीवनाला आवश्यक त्या सर्व सोयी केलेल्या असतात. पाण्याची टांकी, तिला बसवलेला पंप, सिंक, डायनिंग टेबल, खुर्च्या, तीन बर्नर्सची गॅसची शेगडी, बर्फाची पेटी किंवा छोटासा फ्रीज, बॅटरीवर चालणारे दिवे, पाणी तापवण्याचा अिलेक्ट्रिक हीटर, उबदार वातावरणासाठीं गॅस–हीटर, फोम कुशन्स्, फोल्ड् अवे बेड्स् इत्यादि गोष्टी बहुतेक सर्व ट्रेलर्समधें आढळतात.

कॅनडांत असतांना ऑन्टेरिओ स्टेटमधल्या फिरत्या घरांच्या एका विक्रीकेंद्राला मी भेट दिली होती. म्हटलं, ह्या फिरत्या घरांतून प्रवास करण्याचं, त्यांत रहाण्याचं आपलं भाग्य नसलं तरी निदान त्या घरांत माणसाला कसं काय वाटतं तें अनुभवायला काय हरकत आहे? ट्रेलरमधे पाऊल टाकतांच आपण एका अत्यंत आधुनिक सुसज्ज अमेरिकन घरांत प्रवेश केल्याची जाणीव मनाला होते. कमींत कमी जागेचा सुखसोयीसाठीं जास्तीत जास्त सदुपयोग प्रत्येक ट्रेलरमधें केलेला मला आढळला. आणि सोयीकडे लक्ष देतांना रंगसंगतीकडे मात्र कुठंहि दुर्लक्ष केल्याचं मला आढळलं नाही! खिडक्या–दारांच्या पडद्यांच्या डिझाइनपासून मॅटच्या रंगापर्यंत सगळीकडे निर्मात्यांची सौंदर्यदृष्टि दिसून येत होती. कोणतीहि गोष्ट अधिकाधिक अुपयुक्त तर असलीच पाहिजे, पण ती कमालीची आकर्षकहि झाली पाहिजे, यावर एकूण पाश्चिमात्यांचाच कटाक्ष असतो. त्याची मला तिथं जाणीव झाली.

आतां तिथं गेलोंच होतों तर किंमतीचीहि चौकशी करावी म्हणून जण् काय

मला स्वतःलाच एखादा 'ट्रेलर' घ्यायचाय्, अशा थाटांत मी विक्रेत्याला प्रश्न विचारूं लागलों. त्याबरोबर 'ह्या' ट्रेलरपेक्षां 'त्या' ट्रेलरमधें मला अधिक सुख कसं लाभेल, शिवाय किंमतीच्या दृष्टीनं विचार करतां ती वस्तु मला आमरण कशी उपयोगी पडणार आहे, वगैरे गोष्टी तो मनापासून समजावून देऊं लागला. मग मात्र त्याला आवरावं कसं हें मला समजेना! अखेर त्यानं दिलेल्या माहितीपत्रकांवर निरनिराळ्या मॉडेल्स्च्या किंमती लिहून घेऊन मीं तिथून काढता पाय घेतला. सर्वांत कमींत कमी किंमतीचं फिरतं घर ८०० डॉलर्सला होतं. आणि तिथपासून पुढं पंधराशें, दोन हजार, बावीसशें डॉलर्स अशा किंमती होत्या. तिथला सर्वांत महाग ट्रेलर तीन हजार सातशें डॉलर्स किंमतीचा होता. त्याच्या-बद्दल बोलतांना मीं त्याच्या किंमतीबद्दल जरा कुरकुर केली. तेव्हां 'This is specially constructed for year round living!' – अशी त्यानं माझी समजूत घातली! 'अच्छा! म्हणजे ह्याच्यांत वर्षभरसुद्धां रहातां येईल होय? मग हरकत नाहीं! मग तशी ही किंमत कांहीं फार नाहीं!'– असं म्हणून अगदीं सहजतेनं मी त्या श्रीमंत ट्रेलरमधून अलगद बाहेर पडलों!

नंतर घरी आल्यावर माहितीपत्रकांतल्या इतर कांहीं मॉडेल्स्च्या किंमतींवर मी धावती नजर टाकली. तेव्हां एकाची किंमत आठ हजार दोनशें डॉलर्स लिहि-लेली आढळली. म्हणजे ह्या मानानं मघांचा तो ट्रेलर कांहीं विशेष महाग नव्हता!

अमेरिकेंत लाखों लोकांच्या स्वतःच्या मालकीच्या खासगी मोटरकार्स असतांनाहि तिथं टॅक्सीवाल्यांचा धंदा चांगला चालतो. तिथं एखाददुसरा टॅक्सीवाला स्वतंत्र धंदा करतांना सहसा दिसत नाहीं. न्यूयॉर्क, शिकागो वगैरेंसारख्या मोठमोठ्या शहरांत टॅक्सीचा धंदा करणाऱ्या मोठ्या कंपन्या असतात. प्रत्येक कंपनीच्या मालकीच्या अनेक गाड्या असतात. वेगवेगळ्या कंपन्यांच्या गाड्यांना वेगवेगळे रंग दिलेले असतात. एकदां थोडीशी माहिती झाली कीं गाडीच्या रंगावरूनदेखील कंपनीचं नांव ओळखता येतं. टॅक्सी चालू असतांना प्रत्येक टॅक्सींत बिनतारी संदेश एकसारखा चालूच असतो. ज्यांना टॅक्सी हवी असते असे लोक ठराविक नंबर्सना फोन करतात आणि आपण कुठं आहोंत तें सांगतात. ती माहिती ड्रायव्हर्सना बिनतारी संदेशानं कळवली जाते. जी टॅक्सी जवळची आणि रिकामी असेल ती त्या ठिकाणीं जाते.

अमेरिकेंत सार्वजनिक टेलिफोन्स रस्तोरस्ती सर्वत्र असतात. अगदीं गांवापासून दूरच्या एखाद्या ओसाड रस्त्यावरसुद्धां सार्वजनिक टेलिफोन्स बसवलेले असतात. त्यामुळं कुणालाहि कुठूनहि सहज रीतीनं टॅक्सी मिळू शकते. तिथला टॅक्सीचा प्रवास मात्र एकंदर महागांतच पडतो. साधारणपणं एका माणसासाठीं पहिल्या पाव अगर त्याहिपेक्षां कमी मैलाला ४० सेंट्स् पडतात. त्यानंतरच्या पुढच्या प्रत्येक $\frac{२}{५}$ मैलाला अगर त्याच्या भागाला १० सेंट्स् पडतात. त्याच टॅक्सींत बारा वर्षांपेक्षां अधिक

वयाची कोणतीहि व्यक्ति बसली कीं प्रत्येक व्यक्तीमागं २० सेंट्स् जादा द्यावे लागतात. दर दोन मिनिटांना १० सेंट्स् असे ' वेटिंग चार्जेस ' द्यावे लागतात. हँडबॅग्स सोडून इतर बॅग्स् किंवा ट्रंकांचे प्रत्येकीं २५ सेंट्स् वेगळे पडतात. शिवाय प्रवास संपल्यावर टॅक्सींतून उतरतांना टॅक्सीवाल्याचेच आभार मानून बिलाखेरीज त्याच्या हातावर ' टिप् ' ठेवण्याची पद्धत तिथं आहेच !

आपल्याकडे सायकली जशा भाड्यानं मिळतात , तशा तिकडे मोटरकार्स भाड्यानं मिळतात. ' हर्ट्झ् ' नांवाची एक फार मोठी जगप्रसिद्ध कंपनीच हा धंदा करते. ' HERTZ RENT A CAR ' अशा जाहिराती तिकडे सर्वत्र दिसतात. टेलिव्हिजनवरसुद्धां ' HERTZ 'ची जाहिरात असतेच. आणि ती गमतीची असते ! विमानांतून उडी मारलेला एक हसतमुख, उत्साही तरुण ' हर्ट्झ् 'च्या गाडींत ड्रायव्हरच्या जागी अलगद येऊन बसतो, असं त्या जाहिरातीत दाखवण्यांत येतं.

विमानतळ, रेल्वेस्टेशन आणि शहरांतल्या महत्त्वाच्या जागा – अशा ठिकाणीं हवी ती ' हर्ट्झ् 'ची गाडी भाड्यानं घ्यावी, आपल्याला पाहिजे तितका वेळ तिचा उपयोग करावा आणि मग खुशाल गांवांतल्याच ' हर्ट्झ'च्या एखाद्या दुकानांत सोडून द्यावी. गांवांतून घेतलेली गाडी अशीच विमानतळावर किंवा रेल्वेस्टेशनवर सोडतां येते.

' हर्ट्झ् 'च्या गाड्या अतिशय भारी आणि फार चांगल्या दर्जाच्या असतात. कोन्याकरकरीत, नवीन शेव्हरोलेट्, पाँटिॲक, ब्यूक, कॅडिलॅक, अशा एकीपेक्षां एक सुंदर गाड्या गिऱ्हाइकांच्या सेवेसाठीं कुठंहि सज्ज असतात. ' शेव्हरोलेट ' अगर तशाच प्रकारच्या ' सेडन ' गाड्या ताशीं दीड डॉलर भाड्यानं मिळतात. कमींत कमी पाच डॉलर्स भाडं द्यावंच लागतं. शिवाय मोटरकार जितके मैल वापरली जाईल तितक्या मैलांबद्दल प्रत्येक मैलाला दहा सेंट्स्प्रमाणं चार्जेस द्यावे लागतात. गाड्यांच्या इतर प्रकारांप्रमाणं त्यांची भाडींहि थोडीफार कमीजास्त असतात.

' हर्ट्झ् ' कंपनीच्या ह्या उद्योगाचं जाळं अमेरिकेंत तर सर्वत्र पसरलेलं आहेच; पण अल्जेरिया, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, बेल्जियम, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, ग्रीस, हाँगकाँग इस्राईल. जॉर्डन, इटली, जपान, पाकिस्तान, थायलंड, वगैरे जगांतल्या ७१ देशांमधल्या एकूण ३५० शहरांमधें ' हर्ट्झ् 'च्या शाखा आहेत.

अमेरिकेंत जवळजवळ प्रत्येक कुटुंबच मोटरकार वापरीत असल्यानं एवढ्या लाखो मोटरकार्सच्या 'पार्किंग'चा अवघड प्रश्न कसा सोडवावा,याची तिथल्या लोकांना नेहेमींच चिंता पडलेली असते. शहरांत कुठंहि खरेदीला गेलं तरी मोटरकार उभी करायला जागा मिळेपर्यंत कित्येकदां अर्धा ताससुद्धां नुसत्याच चकरा मारीत फिरावं लागतं. त्यानंतरहि गाडी उभी करायला जागा मिळाली तरी बहुधा वेळेप्रमाणं त्या जागेचं भाडं द्यावं लागतंच. मोटरगाड्या उभ्या करण्यासाठीं जमिनीवरची जागा

आतां अपुरी पडायला लागलेली असल्यानं केवळ गाड्या 'पार्क' करण्यासाठीं अनेक मजली इमारती बांधण्यांत आलेल्या आहेत. शिवाय अनेक ठिकाणीं जमिनीखालींसुद्धां 'पार्किंग'ची व्यवस्था करण्यांत आली आहे.

एकदां शिकागोला आम्ही 'आर्ट इन्स्टिटयूट' बघायला गेलों असतांना तिथल्या जवळच्याच एका जमिनीखालच्या ठिकाणीं आम्ही आमची गाडी ठेवली होती. त्या वेळीं ती तिथं ठेवण्याबद्दल ताशी ५० सेंट्स्प्रमाणं भाडं द्यावं लागलं. कांहीं ठिकाणीं रस्त्यांच्या कडेला 'पार्क–ओ–मीटर' बसवलेलीं असतात. त्या यंत्रापाशीं गाडी उभी करून त्याच्यांत नाणं टाकतांच तिथपासून पुढं गाडी उभी करण्याचा वेळ आपोआप मीटरमध्यें दाखवायला सुरुवात होते.

अमेरिकेंत सर्वांत स्वस्त प्रवासाचं साधन म्हणजे जमिनीखालची आगगाडी. अशा भुयारी रेल्वेला इंग्लंडमध्यें 'टयूब रेल्वे' अन् फ्रान्समध्यें 'मेट्रो' म्हणतात. अमेरिकेंत ह्या गाडीला वेगळाच शब्द आहे. तिथं तिला 'सब्-वे' असं म्हणतात. अमेरिकेंत असतांना 'सब्-वे'चा प्रवास मीं खूप वेळां केला. कारण दूरच्या अंतरासाठीं टॅक्सीचा उपयोग करणं आमच्यासारख्यांना झेंपणारं नव्हतं. हें एक खरं कारण तर आहेच; पण शिवाय आपल्याकडे अजूनहि भुयारी रेल्वे न आल्यानं इतर कोणत्याहि वाहनापेक्षां मला 'सब्-वे'चं आकर्षण फार वाटत होतं.


रस्त्याच्या कडेला फूटपाथच्या पलिकडे 'IRT-subway' किंवा दुसऱ्या 'सब्-वे'च्या पाट्या लावलेल्या असतात. त्यावरून तिथं 'सब्-वे'चं स्टेशन जमिनीखालीं आहे असं आपण समजायचं. शेजारीच खाली जाण्यासाठी जिना असतो. त्यानं खालीं गेल्यावर तिथं आपल्याकडच्या 'तिकिट ऑफिस' सारखं ऑफिस असतं. तिथं फक्त १५ सेंट्स् देऊन तांब्याचं एक छोटं 'टोकन' आपण घ्यायचं. हें 'टोकन' आपल्याकडच्या पूर्वीच्या नव्या पैशापेक्षां आकारानं थोडंसं अधिक मोठं असतं. तें टोकन फाटकाच्या बाजूच्या 'स्लिट'मध्यें टाकल्याशिवाय स्टेशनांत प्रवेश देणारं फाटक उघडतच नाही. एका वेळीं एकच माणूस जाऊं शकेल असं तें फिरतं फाटक असतं. एक माणूस पलिकडे जातांच तें पुन्हा आपोआप बंद होतं. त्यानंतर पुन्हा दुसऱ्यानं 'टोकन' आंत टाकल्याशिवाय तें उघडत नाहीं. त्यामुळं फुकट प्रवास करूं इच्छिणाऱ्यांची मोठी पंचाईत होते ! स्टेशन फार खोल असलं तर खाली जाण्यासाठीं फिरते जिने किंवा मोठाले 'लिफ्ट'सुद्धां असतात. एकदां जिन्यावरून खाली प्लॅटफॉर्मवरती गेल्यावर आपण कितीहि वेळ कुठंहि प्रवास करूं शकतों. तिकिटं, तिकिटांचं चेकिंग, बाहेर पडतांना तिकिटं घेणं– वगैरे प्रकार अर्थातच 'सब-वे' मध्यें नाहींत. त्यामुळं गडबडींत, धांदलींत जाणाऱ्या माणसांच्या वेळेची खूप बचत होते. आणि 'टोकन' टाकल्याशिवाय स्टेशनांत प्रवेशच मिळत नसल्यामुळं अप्रामाणिकपणालाहि अर्थात् तिथं वाव नसतो !

'सब्-वे' च्या गाड्यांचा वेग खूपच मोठा असतो, आणि त्यांतसुद्धां अतिशय वेगांत जाणाऱ्या आणि फक्त ठराविक स्टेशनांनाच थांबणाऱ्या 'एक्स्प्रेस ट्रेन्स'हि असतात. दर चारपाच मिनिटांनीं गाड्या येत-जात असल्यामुळं प्लॅटफॉर्मवर गर्दी सहसा नसतेच. आणि आपण जिना उतरत असतांना डोळ्यादेखत एखादी गाडी निघून गेली तरी हळहळ वाटत नाहीं.

'सब्-वे'ची गाडी स्टेशनांत येतांच, ज्या बाजूला प्लॅटफॉर्म असेल त्या बाजूचे दरवाजे आपोआप उघडतात, नि एका मिनिटांत पुन्हा आपोआप बंद होऊन गाडी चालू होते. तेवढ्या वेळांत माणसं शिस्तीनं झट्कन् उतरतात नि चढतात. 'सब्-वे' गाड्यांना कांहीं ठराविक वेळीं थोडीशी गर्दी असते. कारण या गाड्या वेगानं जातात नि प्रवासाच्या खर्चाच्या दृष्टीनं स्वस्तहि असतात. अर्थात् मुंबईच्या लोकलगाड्यांच्या गर्दीची सर या गाड्यांना येणार नाहीं! गाड्यांचे दरवाजे आपोआप लागणारे असल्यानं गाडीला बाहेरून लोंबकळून प्रवास करण्याची मौज तिथल्या उतारूंना लुटतां येत नाहीं. तें भाग्य फक्त आपल्याकडच्याच उतारूंच्या नशिबीं आहे! गाडीच्या डब्यांचीं दारं आपोआप उघडणारीं अन् बंद होणारीं असल्यामुळं दारांवर 'Keep your hands off the doors'– अशा पाट्या आमच्यासारख्या अजाण प्रवाशांसाठीं असतात!

भुयारी 'सब्-वे'चा प्रवास अनेकदां घडला. पण अजूनहि जमिनीच्या वरून जाणाऱ्या अमेरिकन आगगाडीच्या प्रवासाचा अनुभव मला घ्यायचा होताच! तोहि योग एक दिवस आला. एक दिवस ओवेन फेअरवेदरनी मला त्यांच्या शिकागोच्या ऑफिसमधें बोलावलं होतं. त्या दिवशीं मीं बॅरिंग्टन ते शिकागो हा प्रवास मुद्दाम एकट्यानं आगगाडीनं केला. 'शिकागो नॉर्थवेस्टर्न रेल्वे'ची ती आगगाडी होती. अमेरिकेंतल्या इतर आगगाड्यांच्या मानानं ती गाडी अगदींच साधी होती. पण अमेरिकेंतल्या आगगाडीच्या प्रवासाची पूर्ण कल्पना आणून देणारी होती.

अमेरिकेंतील आगगाडीच्या प्रत्येक डब्यांत एकेक तिकिट कलेक्टर' असतो. डार्क निळा सूट, निळा टाय, निळीच 'पी–कॅप'–असा त्याचा रुबाबदार पोशाख असतो. त्याच्या कॅपवर Collector अशीं अक्षरं लावलेली असतात. स्टेशनवर उतारू चढतांच तो त्यांची तिकिटं 'पंच' करतो. नि त्यांच्या पुढच्या सीटच्या पाठीवर अडकवून ठेवतो. म्हणजे पुन्हा त्या उतारूला तिकिटाबद्दल विचारायला नको! अर्थात् अशा उघडपणं खोंचून ठेवलेल्या तिकिटांना दुसरं कुणी हात लावीत नाहीं, म्हणून त्यांची ही योजना यशस्वी होते! माझं तिकिटहि अशाच रीतीनं कलेक्टरनं ताब्यांत घेऊन पच् करून, माझ्या पुढच्या सीटच्या पाठीवर खोंचून ठेवतांच मला संवयीमुळं त्या तिकिटाच्या सुरक्षिततेबद्दल काळजी वाटायला लागली. कारण आपल्याकडे बस्चीं किंवा रेल्वेचीं तिकिटं प्राणापलिकडे जतन करून ठेवावीं लागतात. आणि



**अमेरिकन आगगाडीच्या एका डब्यांतलें दृश्य. तिकिटाच्या सुरक्षिततेसंबंधांत येथें प्राण तळमळत रहायला नको! ती जबाबदारी या कलेक्टरची.**

त्या वेळी अमेरिकेंतल्या आगगाडीच्या प्रवासाचा माझा तो पहिलाच प्रसंग असल्यामुळं शिकागो स्टेशन येईपर्यंत सबंध प्रवासभर मी माझ्या ताब्यांतून निसटलेल्या माझ्या रेल्वेच्या तिकिटाकडे अधूनमधून चोरट्या नजरेनं पहात होतों!

तिथल्या आगगाड्यांचे सर्वच डबे 'एअर कंडिशन्ड्' असतात. वाटेल त्या डब्यांत बसून धूम्रपान करतां येत नाही. धूम्रपान करणाऱ्यांसाठीं वेगळे डबे असतात. प्रत्येक डब्याच्या दोन्ही बाजूना वरती जाऊन बसण्यासाठीं एकेक सीट असलेले सुंदर बर्थ्स असतात. त्याहि ठिकाणी प्रत्येक सीटच्या पुढं तिकिट अडकवायला जागा केलेली असते. 'कलेक्टर' डब्यांत खाली उभा राहूनच वर्थवरच्या उतारूंची तिकिटं 'चेक' करतो, आणि योग्य जागीं खोंचून ठेवतो. त्याच्या उंचीमुळं हें काम त्याला सहज रीतीनं करतां येतं.

दूरच्या प्रवासासाठी असणाऱ्या आगगाड्यांमध्यें त्यांतल्या त्यांत स्वस्ताचा प्रवास 'कोच'नं करतां येतो. त्यालाच 'Day–Coach' असंहि म्हणतात. ह्या 'डे–कोच'मधून रात्रीच्या वेळी प्रवास करायचा झाला तर प्रत्येकी ३५ सेंटला एक याप्रमाणं भाड्यानं तात्पुरत्या उश्या मिळतात. दूरच्या प्रवासासाठी तिकडे सीटचं रिझर्वेशन करण्याचीहि पद्धत आहे. प्रत्येक उतारूला आपल्या बसण्याच्या सीटच्या पाठीचा कोन पाहिजे तसा बदलून सुखदायक करून घेतां येतो.

प्रत्येक डब्यांत स्त्रियांसाठीं 'वॉश–रूम्स्' असतात. शिवाय सामान ठेवण्यासाठीहि चांगली व्यवस्था केलेली असते. रात्रीच्या वेळीं आरामांत झोंपून प्रवास करूं इच्छिणाऱ्यांसाठीं 'स्लीपिंग कार्स' असतात. त्यांनाच 'पुल्मन कार्स' असेंहि म्हणतात. ह्या 'पुल्मन कार्स'मधली झोंपण्याची व्यवस्था खरोखर हेवा करण्यासारखी असते.


ह्याहिपेक्षां अधिक पैसे खर्च करून बादशहासारखा प्रवास करायचा झाला तर तशाहि सुखसोयी असणारे डबे असतात. दूरचा प्रवास करणाऱ्या आगगाड्यांमधें 'डायनिंग कार्स'ची सोय केलेली असते.

त्या दिवशींच्या माझ्या शिकागोच्या आगगाडीच्या प्रवासांत एक गोष्ट विशेष लक्षांत आली ती अशी की, तिथली रेल्वेलाइन गांवांच्या मधून इतर रस्त्यांप्रमाणेंच जाते. पण कुठंहि तिला संरक्षक कंपाउंड नव्हतं. कांहीं ठिकाणचे कांहीं रस्ते रेल्वेलाइनला छेदून जातात. तिथं लाल दिवा आणि 'इलेक्ट्रिक बेल्' असते. कांही ठिकाणीं तर इलेक्ट्रिक बेल नसून नुसताच लाल दिवा असतो. लाल दिवा असला आणि बेल वाजत असली की रेल्वेलाइन ओलांडायची नाहीं असा आपल्याकडच्यासारखा नियम आहे. आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं तिथं रक्षक नसतांना किंवा कंपाउंड–फाटक वगैरे नसतांना सर्व लोक हा नियम पाळतात !

आपल्याकडे पुण्यातला बस् कंडक्टर जसा, 'ए ऽ ! जंगली महाराज कोण आहे ?', 'अलका आहे का ?' – वगैरे बस्स्टॉपचीं नांवं घेऊन उतारूंची चौकशी करतो, तसाच तिकडच्या रेल्वेच्या डब्यांतील कलेक्टर एखादं स्टेशन जवळ आलं म्हणजे, 'एडिसन पार्क', 'अर्लिंग्टन हाइट्स्', 'पार्क रीज' इत्यादि त्या त्या स्टेशनांचीं नांवं सांगतो. – ओरडत नाही !

एकंदर प्रवासांत सामान्यत: नेहेमींच शांतता असते. लोक आपापसांत गप्पा मारतात, पण हळूहळू. बरेच लोक वृत्तपत्र वाचीत असतात. कारण इतर वेळीं वृत्तपत्र वाचायला एवढा निवांत वेळ त्यांना क्वचितच मिळतो. अनेक लोक स्वत:च्या मोटर-कारनं शहरांत जातातयेतात. त्यामुळं डब्यांत गर्दी मुळींच नसते. शिकागो स्टेशन जवळ येतांच कलेक्टरनं आमच्या सीट्स्च्या पुढं लावलेलीं आमचीं सर्वांचीं तिकिटं गोळा केलीं, आणि तीं घेऊन स्टेशन येतांच तो उतरून गेला. पुढं स्टेशनांतून बाहेर पडतांना तिकिटाचं चेकिंग वगैरे करण्याची पद्धत कुठं आढळली नाहीं.

अमेरिकेंतली चाकांवरची ही फिरती दुनिया मीं पाहिली. त्या चक्रांनी अमेरिकन जीवनाला दिलेली विलक्षण गति मी अनुभवली. अमेरिकनांचं उद्योगधंद्यांत मग्न असतांनाचं सतत घाईगर्दीचं, धांवपळीचं, गडबडीचं जीवनहि मी पाहिलं. तें पाहून मनांत विचार आला ह्या अमेरिकनांना तुफान वेगानं धांवणाऱ्या ह्या चाकांच्या दुनियेचं केवढं मोठं आकर्षण आहे ! जीवनाचा एवढा वेग यांना सोसतो तरी कसा ! न्यूयॉर्क, शिकागो, वॉशिंग्टन वगैरे मोठमोठ्या शहरांमधील रस्त्यांवरून लाखों



अमेरिकेच्या जलदगति जीवनांतहि या संस्थेचा दिमाख न्याराच दिसतो !

वाहनं पिसाट वेगानं धांवत असतात. एखाद्या शांत, सथ, डौलदार गतीनं जाणाऱ्या वाहनांची नांवनिशाणीसुद्धां असल्या अफाट गर्दीच्या शहरांतून दिसायची नाही. पण एक दिवशीं म्हणजे २७ ऑगस्ट १९६४ रोजीं प्रोफेसर आणि मिसेस् शेपिरो यांच्याबरोबर न्यूयॉर्कच्या रस्त्यांतून पायीं फिरत असतांना मला धक्काच बसला. न्यूयॉर्कच्या ५९व्या रस्त्यावरून ५व्या ॲव्हेन्यूमधें डौलदारपणं रुबाबांत पावलं टाकणाऱ्या घोड्याची एक व्हिक्टोरिया मला दिसली. त्या व्हिक्टोरियाचं छत रेशमी कापडासारख्या चांगल्या कापडाचं होतं आणि चारहि बाजूंनीं त्याला झालर लावलेली होती. ती चालवणाऱ्या मोतद्दाराचा पोशाखहि स्वच्छ आणि कडक इस्त्रीचा होता. फुल् पँट, शर्ट आणि वरती मोठी हॅट ! ज्या रुबाबांत ताठपणं उभा राहून एवढ्या गर्दींतूनहि तो व्हिक्टोरिया चालवीत होता, तो खरोखर लक्षवेधी होता.आणि न्यूयॉर्क-सारख्या ठिकाणीं आढळलेल्या त्या व्हिक्टोरियाचा मला फोटोहि घ्यायचा होता. म्हणून त्याला फूटपाथच्या एका बाजूला थांवण्याची मी विनंती केली आणि त्याचा त्याच्या वाहनासह फोटो घेतला. त्याच्या वाहनावर भाड्याचे दर लिहिलेले होते. पहिल्या अर्ध्या तासासाठीं ५ डॉलर्स, आणि त्यानंतरच्या पुढच्या प्रत्येक तासामाठी २ डॉलर्स.

'श्रीमंत लोक सहज केव्हांतरी गमतीनं व्हिक्टोरियांतून फिरतात'– असं मिसेस् शेपिरो नंतर माझ्याशीं बोलतांना म्हणाल्या. श्रीमंत कां असेनात, पण अमे-रिकेंतले कांहीं लोक तरी अफाट वेगानं फिरणाऱ्या चाकांच्या गतींतून निसटून कधींतरी शांतपणं, मोठ्या डौलदारपणं, चवीनं जीवनाचा आस्वाद घेतात तर !

# यंत्र : अमेरिकन जीवनाचं तंत्र

सर्वसामान्य लोकांना परदेशप्रवासाची–विशेषत: अमेरिकेसारख्या प्रगत देशाच्या प्रवासाची – अनेक कारणांनी अपूर्वाई वाटत असते. त्यांतलं एक कारण म्हणजे आपल्याला कल्पनाहि करतां येणार नाहीं इतक्या मोठ्या प्रमाणांत तिथल्या लोकांच्या दैनंदिन जीवनांत लहानसहान यंत्रांचा, यांत्रिक उपकरणांचा किंवा कांहीं तरी यांत्रिक युक्त्यांचा उपयोग केला जातो. असलीं दैनंदिन उपयोगाचीं कांहीं यंत्रं आतां हळूहळू आपल्याकडेहि येत चाललीं आहेत. पण भारतांतल्या सर्वसामान्य माणसा-पर्यंत मात्र अजूनहि तीं निश्चितपणं पोंचलेलीं नाहींत. त्यामुळं अमेरिकेंत पाऊल टाकल्याबरोबर आपल्याकडच्या सर्वसामान्य माणसाला तिथल्या वेगवान् यंत्रप्रधान जीवनांत यंत्रांकडून करून घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीचंमुद्धा कौतुक वाटतं. आणि नावीन्यामुळं सुरुवातीला तरी तशा यंत्रांचं खूप आकर्षण वाटतं.

आपल्याकडे जवळजवळ प्रत्येक काम आपल्याला माणसाकडून करून घ्यायची सवय लागलेली असते. परमेश्वरकृपेनं भारतांत भरपूर मनुष्यबळ असल्यानं यंत्रापेक्षां आपल्याकडे माणसंच स्वस्त पडतात. शिवाय ' यंत्रांमुळं बेकारी वाढते ' वगैरेसारख्या आपल्या कांहीं चमत्कारिक कल्पना असल्यामुळं 'कॉम्प्युटर्स 'सारख्या बहुगुणी यंत्रांचा उपयोग करायचा म्हटला तर त्यालासुद्धां प्राणपणानं विरोध करणारे दलितांचे अनेक राजकारणी कैवारी आपल्याकडे आहेत. अशी परिस्थिति आपल्याकडे असल्यामुळंच तिकडच्या लोकांच्या जीवनाशीं एकरूप झालेल्या अगदीं लहानसहान

यंत्रांचीसुद्धां आपल्याला गंमत वाटते.

अमेरिकेंत १२ जुलै १९६४ ला मीं प्रथम पाऊल टाकल्यावरोबर अशाच एका छोटया यंत्रानं मला आपली किमया दाखवली. न्यूयॉर्कच्या 'केनेडी इंटरनॅशनल एअरपोर्ट'ला आम्ही उतरलों त्या वेळीं तिथं रात्र झालेली होती. तिथून आम्हांला दुसऱ्या विमानानं ब्रॅडलेफील्डला जायचं होतं. पण त्या विमानाला तास–सव्वा तास अवकाश असल्यानं विमानतळावरच्याच हॉटेलांत आम्हीं जेवण घेतलं. जेवणापूर्वी हाततोंड वगैरे धुण्यासाठीं मी तिथल्या स्वच्छतागृहांत गेलों. बाहेर थंडी जरी बरीच होती तरी तोंडावर भरपूर गार पाणी मारण्याचा मोह मला आवरला नाहीं. नेहेमीच्या संवयीप्रमाणं खिशांतला रुमाल काढून मीं तोंड पुसणार, तोंच जवळच्याच भिंतीवर लावलेल्या चकचकीत धातूच्या एका चौकोनी पेटीवजा यंत्राकडे माझं लक्ष गेलं. 'इलेक्ट्रॉनिक टॉवेल' ( Electronic Towel ) असं त्याच्यावर लिहिलेलं होतं. यंत्राच्या वरच्या बाजूला खिडकीसारखी एक तारांची जाळी होती. 'For Face' अशीं अक्षरं तिथं लिहिलेलीं होतीं. जाळीच्या खालीं डाव्या बाजूला एक बटन होतं. त्याच्यावर लिहिलेलं होतं : 'To Dry Face.' यंत्राच्या खालच्या बाजूला उजव्या कोपऱ्यांत रेडिओच्या नॉबसारखं दुसरं बटन होतं. त्यावर 'push' असं लिहिलेलं होतं. तें बटन दाबतांच यंत्राच्या खालच्या बाजूच्या जाळींतून गरम हवेचा एक झोत आला. त्या हवेंत एका क्षणांत माझे हात कोरडे झाले. चेहेऱ्यासाठीं असलेलं बटन दाबतांच वरच्या जाळींतून गरम हवेचा झोत आला. बरोबर चेहऱ्यावर पडलेल्या गरम हवेच्या त्या झोतानं चेहेरा कोरडा झाला. त्या यंत्राची अधिक माहिती देणारं गुणवर्णनहि मीं तिथंच वाचलं : 'Sanitizes ( by Ultra Violet ) as it dries.' ह्या यंत्राचा आगखी एक विशेष म्हणजे साधारणत:, हात–तोंड कोरडीं होण्यास जेवढा वेळ लागतो तेवढ्या वेळानंतर तें आपोआप बंद होतं. गरम हवेच्या झोतानं हाततोंड कोरडीं करणारं हें इलेक्ट्रॉनिक टॉवेल–मशिन नंतर पुढं अमेरिकेंत मला अनेक ठिकाणी आढळलं.

अमेरिकेसारख्या थंड देशांत माणसाला गरम पाण्याची गरज नेहेमींच भासते. झटकन् पाणी गरम करणाऱ्या विजेच्या शेगड्या, हीटर्स वगैरेसारखीं यंत्रं तिथं सर्वांच्याच वापरांत असलीं, तरी त्यांच्या साहाय्यानं पाणी गरम करण्यासाठीं दोनतीन मिनिटं तरी कोण वायां घालवणार ? त्यामुळं वॉश्बेसिनमधला नळ सोडतांच अगदीं उकळतं पाणी मिळण्याचीहि सोय बहुतेक ठिकाणीं मला आढळली. उजव्या बाजूचा नळ सोडला तर गरम पाणी मिळतं आणि डाव्या बाजूचा सोडला तर नळाच्या त्याच तोटीतून थंडगार पाणी येतं. दोन्ही बाजूंचे नळ थोडेथोडे सोडून आपल्याला हवं तेवढं गरम किंवा कोमट पाणी घेतां येतं.

आपल्या आवडत्या माणसाच्या बाबतींत अमेरिकन्स उष्टयाबिष्टयाचा

विशेष विधिनिषेध पाळत नाहीत हें जरी खरं असलं, तरी सार्वजनिक ठिकाणीं सामान्यतः स्वच्छतेच्या नि आरोग्याच्या दृष्टीनं विशेष काळजी घेतलेली असते. त्यातच माणसाची सोय बघण्याचासुद्धां आणखी एक हेतू असतोच. आपल्या दोन्ही हातांत सामान असलं आणि आपल्याला पाणी प्यायचं असलं, तर तें सामान कुठं ठेवावं अशी आपली पंचाईत होते. पण अमेरिकेंत साडेतीन फूट उंचीचीं पाणी पिण्याचीं कारंजीं असतात. त्यांच्या तळाशीं एक बटन असतं. कारंज्यापाशी उभं राहून पायानं बटन दावलं की पाण्याची धार जी उडते, ती थेट आपल्या तोंडांत ! अर्थात त्या क्षणाला आपण तोंड उघडून तयार असायला हवं ! नाहींतर कुठंहि नाकातोंडावर पाणी उडून आपण भिजणार ! कारंज्याच्या उडणाऱ्या धारेचं हें पाणी कसं प्यायचं ह्याचंसुद्धां एक खास तंत्र आहे. सुरुवातीला थोडीशी फजिती झाली तरी संवयीनं पुढं तें सहज जमतं. ह्या प्रकारच्या सोयीनं त्या ठिकाणीं पेला ठेवण्याचा, तो उष्टा तसाच ठेवला जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं.

अशाच प्रकारची आणखी एक चांगली सोय '६५ सालीं पुन्हा मी अमेरिकेला गेलों तेव्हां मला अनुभवायला मिळाली. आमच्या तिथल्या 'डायनिंग हॉल'मधें एका बाजूला चहा–कॉफीसाठीं गरम पाण्याचीं नि अतिथंड दुधाचीं मोठमोठीं स्टेनलेस स्टीलचीं कॅन्स् भरून ठेवलेलीं असत. बर्फापेक्षांहि थंडगार असं निर्जंतुक केलेलं तें दूध असायचं. कुणीहि तिथं यावं अन् दिवसांतून कितीहि वेळां कितीहि ग्लास दूध घ्यावं, अगर चहा–कॉफींत तें वापरावं.त्या दुधाचे आणि गरम पाण्याच्या कॅन्सचे नळ विशिष्ट प्रकारचे होते. नळाखाली ग्लास धरून नळाला ग्लासाच्या कडांचा स्पर्श झाला कीं ग्लासांत दूध ( अगर पाणी) पडायचं. ग्लास भरला कीं आपण फक्त तो किंचित् खाली करून सरळ घेऊन जायचा. नळ आपोआप बंद होत असे !

निर्जंतुक केलेलं थंडगार दूध पॅकबंद कार्डबोर्ड–बॉक्सेसमधून विकण्याची सोयसुद्धां इंग्लंड–अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशांत रस्तोरस्तीं केलेली असते. आपल्याकडे वजन करायचीं यंत्रं असतात ना, तशींच हीं यंत्रं असतात. यंत्रांत चोवीस तास दिवे लावलेले असतात. त्यामुळं त्याच्यावर लिहिलेल्या सूचना केव्हांहि वाचतां येतात. त्याप्रमाणं यंत्रांत योग्य किंमतीचीं नाणी टाकली कीं दुधाचे पॅकबंद बॉक्सेस् दिवसरात्र केव्हांहि मिळू शकतात. ह्याच पद्धतीच्या यंत्रांतून कोल्ड्रिंकच्या बाटल्या, सिगारेट्स्, आगपेटया, पोस्टाचीं तिकिटं, आइस्क्रीम, कँडी, सँडविचेस्, लहान-सहान औषधं, कंगवा, तेलाच्या किंवा सेंट्च्या छोटया बाटल्या, दाढीचं सामान, पॉपकॉर्न –काय वाटेल त्या गोष्टी रस्तोरस्ती रात्रंदिवस कुठंहि मिळू शकतात.

एखाद्या नाण्याच्या विशिष्ट वजनानं यंत्राच्या आंत कांहीं हालचाल होऊन एखादी वस्तु यंत्रांतून बाहेर पडणं मी समजू शकलों.पण नोटेसारखा केवळ कागदाचा एक तुकडा मशिनमधें सरकवून खटका दाबला कीं बरोबर त्या नोटेच्या किंमती-

एवढ्याच सुटया नाण्यांची मोड खळकन् आपल्याला तिथं मिळूं शकते, याचं मात्र मला नवल वाटलं !

'सुपर मार्केट्स्'च्या मोठमोठ्या इमारतींमधें एका विभागांतून वरच्या मजल्यांवरच्या इतर विभागांत येण्याजाण्यासाठीं फिरते जिने असतात. भूमिगत रेल्वेंतसुद्धां जमिनीखालीं प्लॅटफॉर्मवर जाण्यायेण्यासाठीं फिरत्या पायऱ्यांचे जिने तिकडे आहेत. आपण फक्त एका पायरीवर उभं रहायचं आणि उतरायची जागा येतांच सफाईनं झटकन् जमिनीवर पाय ठेवून उतरायचं. अनेक लोक येतातजातात. जिने आपले अखंड फिरतच असतात. पुढंपुढं या फिरत्या जिन्यांची इतकी संवय होते, कीं जिना फिरत असतांनासुद्धां अधिक लवकर पोंचण्यासाठीं त्याच्या फिरत्या पायऱ्या आपण चढून जाऊं शकतों.


एखाद्या ठिकाणी आपल्या स्वागतासाठीं कुणीहि नसावं, पण आपण तिथं पाऊल टाकतांच भलामोठा कांचेचा दरवाजा मात्र आपोआप उघडला जावा, आणि आपण आंत प्रवेश करतांच पुन्हा तो आपोआप बंद व्हावा, असं कांहीं घडलं तर आपल्याला किती आश्चर्य वाटेल ! पण अमेरिकेंत न्यूयॉर्क–शिकागोसारख्या मोठमोठ्या शहरांतल्या आर्टम्युझियम्स्पासून तों अगदीं खेड्यांतल्या सुपर मार्केट्स्पर्यंत अनेक ठिकाणीं असे आपोआप उघडणारे नि बंद होणारे दरवाजे आहेत. ह्या जादूच्या दारांचं 'रहस्य' मला बरेच दिवस समजत नव्हतं. दारापासून चारपांच फूट अंतरावर कुणीहि माणूस आला कीं दार आपोआप कसं उघडतं याची चौकशी अखेर मीं एकदां एका अमेरिकनाकडे केली. त्यानं केलेला खुलासा मला बराचसा पटला. बंद दारापासून ठराविक अंतरावर नि ठराविक उंचीवर एक अदृश्य किरणांची शलाका असते. माणूस त्या किरणशलाकेंतून पलिकडे गेला कीं ती शलाका तुटते, विजेचं सर्किट तुटतं आणि दरवाजा उघडतो. माणूस गेल्यावर किरणशलाका पुन्हा जुळते, विजेचं सर्किट पुन्हा पूर्ण होतं, आणि दरवाजा बंद होतो. सहज गंमत म्हणून आम्हीं अनेकदां वेगवेगळ्या बाजूंनीं जाऊन किरणशलाका तुटूं नये असा प्रयत्न केला. पण प्रत्येक वेळीं कसेहि आलों तरी दरवाजा उघडायचाच.

ह्या आपोआप दार उघडण्यावरून आठवण झाली. अमेरिकेंत – कॅनडांत फेरीवाल्यांचा आणि नको असलेल्या माणसांचा त्रास चुकवण्यासाठीं कांहीं इमारतींत एक खास योजना केलेली असते. इमारतीचा मुख्य दरवाजा नेहेमींच बंद असतो. पण दाराच्या जवळच भिंतींमधें एक यंत्र बसवलेलं असतं. त्या यंत्राला वरच्या बाजूला 'ऐकण्यासाठीं' भोकाभोकांचीं वर्तुळाकृति वलयं असतात. त्याच्याच थोडंसं खालीं 'बोलण्यासाठीं' भोकं असतात. उजव्या बाजूला त्या बिल्डिंगमधल्या सर्व रहिवाशांचीं नांवं एकाखालीं एक अशा तीनचार रांगांत लिहिलेलीं असतात. प्रत्येक ब्लॉकच्या रहिवाश्याच्या नांवापुढं एकेक बटन असतं. आपल्याला ज्यांच्याकडे जायचं असेल

त्यांच्या नावाचं बटन दाबलं कीं त्यांच्या ब्लॉकशीं आपला संपर्क प्रस्थापित होतो. त्यांच्याशीं आपण बोलून आपली ओळख सांगूं शकतों. मग त्या व्यक्तीला वाटलं तर वरतूनच एक बटन दाबून ती खालचा मुख्य दरवाजा उघडते, नि मगच आपल्याला आंत इमारतींत प्रवेश मिळतो. इमारतींतल्या तळमजल्यावरच्या लोकांशींसुद्धां अशाच पद्धतीनं संपर्क साधतां येतो.

अमेरिकेंत ट्रॅन्झिस्टर आणि कॅमेरा ह्या दोन वस्तू लहान मुलांच्या खेळण्यांप्रमाणं घरोघर आढळतात, इतका त्यांचा प्रसार झालेला आहे. अगदीं पांचसात वर्षांचीं मुलंसुद्धां चांगल्या प्रकारचे कॅमेरे खेळण्यांसारखे वापरून फोटो काढतात. कॅमेऱ्यांचा एवढा जरी अफाट प्रसार तिथं झालेला असला, तरीसुद्धां कांहीं हॉटेलांत, रस्त्यांच्या बाजूला किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणीं यंत्रांच्या साहाय्यानं फोटो काढून घेण्याच्या सोयी केलेल्या आहेतच. फोटो काढून घेण्याच्या अशा जागा टेलिफोनच्या बूथसारख्याच, पण थोड्या अधिक मोठ्या असतात. केंस नि कपडे नीट करण्यासाठीं तिथं आरसा-कंगवाहि असतो. केंस नि कपडे, टायची ' नॉट ' वगैरे नीट करून आपण आपल्या कल्पनेप्रमाणं अधिक चांगले दिसायला लागलों कीं आरशावरतीं पडदा टाकायचा आणि यंत्रांत नाणं टाकून बटन दाबायचाच अवकाश, एका मिनिटांत आपल्या फोटोच्या तीन प्रती डेव्हलपिंग- प्रिंटिंग होऊन आपल्या हातांत पडतात. पोलरॉइड् (Polaroid) कॅमेरा आपल्याकडे असला तर इतक्या झटपट फोटो काढण्यासाठीं असल्या सार्वजनिक ठिकाणींसुद्धां जायला नको. घरींदारीं, पार्टीच्या प्रसंगीं अगर कुठंहि ' फ्लॅशच्या' साहाय्यानं आपण साधे अगर रंगीत फोटो काढूं शकतों. ब्लॅक अँड व्हाइट फिल्म असली तर पोलरॉइड कॅमेराला ती डेव्हलप् आणि प्रिंट करून द्यायला फक्त १० सेकंद लागतात. आणि रंगीत फिल्म असली तर तिचा डेव्हलपिंग टाइम फक्त ५० सेकंद असतो. त्यामुळं अक्षरशः एका मिनिटाच्या आंत रंगीत फोटो आपल्या हातांत पडतो.

न्यूयॉर्कसारख्या जगप्रसिद्ध शहरांत जगांतले लाखों परदेशी लोक नेहमीं येत-जात असतात. निरनिराळ्या हॉटेलांची किंवा करमणुकीच्या केंद्रांची माहिती त्यांना हवी असते. एरवीं एवढ्या मोठ्या अवाढव्य शहरांत कुठं काय आहे त्याचा पत्ता लागणं कठिण ! वृत्तपत्रं किंवा मासिकांसारखीं इतर नियतकालिकं तरी अशा ठिकाणांची माहिती एकाच अंकांत कशी देणार ? आणि मासिकं किंवा वृत्तपत्रं वाचायला परदेशी प्रवाशांना वेळ असतो कुठं ? अशा लोकांच्या सोयीसाठीं बहुतेक महत्त्वाच्या मोठमोठ्या हॉटेलांमधें, बहुधा तळमजल्यावरच, पूर्णतः यांत्रिक माहिती-केंद्रं ठेवलेलीं असतात. सुमारं सहासात फूट उंच नि आठदहा फूट लांब आणि एकदीड फूट रुंद अशीं भव्य कांचेच्या पेटीसारखीं हीं माहिती-केंद्रं असतात. त्यांना ' फॅक्सफाइंडर (Faxfinder) मशिन्स ' असं म्हणतात.




टायपिस्टची व्यवस्था नसूनहि चित्रपट, नाइट क्लब इ.संबंधी अचूक व 'टाइप्ड्' माहिती देणारें हें 'फॅक्सफाइंडर'

न्यूयॉर्कच्या ज्या 'हेन्री हडसन हॉटेल 'मधें आम्ही राहिलों होतों, तिथं असं एक फॅक्सफाइंडर माहिती–केंद्र होतं. त्या मशिनच्या वरच्या बाजूला मध्यभागीं ठळक अक्षरांत '**Cue to New York**' असं लिहिलेलं होतं. त्याच्या खालीं बारीक अक्षरांत 'Information Center 24 Hour Guest Service—FREE' असं लिहिलेलं होतं. ह्या अक्षरांच्या खालीं न्यूयॉर्कमधल्या सुमारं दीडशें महत्वाच्या ठिकाणांचीं सहा कॉलम्समधें नांवं दिलेलीं होतीं. Theatre, Films, Religious Services, Night Clubs, Sports अशा निरनिराळ्या शीर्षकांखालीं त्यांचं वर्गीकरण केलेलं होतं. नांवांच्या पुढं नंबर्स होते. त्यांच्या खालीं त्या नंबर्सचीं बटनं होतीं. नांवांच्या दोन्ही बाजूंना कांहीं महत्त्वाच्या ठिकाणांच्या चित्रमय जाहिराती होत्या. यंत्राच्या आंत चोवीस तास भरपूर दिव्यांचा प्रकाश असल्यामुळं त्या यंत्राचा दर्शनी भाग मोठा सुंदर दिसायचा.आपल्याला ज्या ठिकाणची माहिती हवी असेल त्या ठिकाणच्या नंबरचं बटन दाबलं कीं मशिन चालू होतं. आंतल्या यंत्रांचा टाइपरायटर-सारखा आवाज येतो. आणि आपण क्षणभर तिथं उभे आहोंत तेवढ्यांतच त्या मशिन-मधून ३"×३॥" आकाराचा कागदाचा छोटा तुकडा आपल्या हातांत पडतो. आपल्याला हवी असलेली सर्व माहिती त्या क्यू–स्लिपवरती टाइप केलेली असते. त्या दिवशीं मीं सहज जिज्ञासा म्हणून एका नाइट–क्लबचं बटन दाबलं. त्याबरोबर माझ्या हातांत पडलेल्या स्लिपवरती पुढील मजकूर टाइप होऊन आला :–

'Bill's Gay Nineties. 57 E. 54th St. EL 5—8231. Everyone sings melodies of yesteryear. Opens 7 pm. Pianist from 7 : 30. continuous entertainment from 9 pm. D a la carte, entrees $ 2.50 up. Bar.'

'स्लिप'च्या मागच्या बाजूला छापलेलं होतं, –


'This is your FAXFINDER Cue Slip. The FAXFINDER is a pushbutton electronic, printing and dispensing machine. It performs a new kind of public service , free of charge, thanks to cooperating advertisers. It provides instant information in the form of handy pocket-size Cue slips, printed while you wait.'

अमेरिकन माणसाच्या दैनंदिन जीवनांत तो किती लहानसहान यंत्रांचा किंवा यांत्रिक उपकरणांचा उपयोग करतो याची तर खरोखर गणतीच करतां येणार नाहीं. पुन्हा अशा उपकरणांतसुद्धा कांहींतरी नवीन कल्पना वापरून ती वस्तु अधिकाधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न केलेला असतोच. एका ठिकाणीं मीं टेबलावर ठेवलेलं एक छोटंसं लोकरीचं कुत्रं पाहिलं. मला वाटलं शोभेची वस्तु म्हणून तें तिथं ठेवलेलं असावं, किंवा लहान मुलांचं तें एक खेळणं असावं. पण थोड्या वेळानं त्याच्यांतून

स्वर ऐकायला यायला लागल्यावर मी थक्कच झालों. त्या कुत्र्याच्या गळयांतली दोरी एका छोटया ट्रँन्झिस्टरला जोडलेली होती. ती साधी दोरी नसून इलेक्ट्रिक वायर होती. ट्रँन्झिस्टर सुरू करतांच त्या कुत्र्याच्या पोटांत लपवलेल्या स्पीकरमधून संगीताचे स्वर बाहेर यायला लागले होते. ह्या 'डॉगी रेडिओ–स्पीकर'ची किंमत अवघी चार डॉलर्स होती.

घरांत वापरल्या जाणाऱ्या अनेक लहानमोठया यंत्रांनी तर अमेरिकन गृहिणीचं जीवन कमालीचं सुखकारक बनवलं आहे.झाडण्याचं काम करण्यासाठीं व्हॅक्युम क्लीनर हें विजेवर चालणारं यंत्र उभ्याउभ्या जमिनीवरून फिरवलं कीं सारी धूळ तें आपोआप शोषून घेतं. कपडे धुण्यासाठीं ऑटोमॅटिक वॉशिंग मशिन असतंच, पण त्याच्या जोडीला धुतलेले कपडे वाळवण्यासाठीं ड्रायरसुद्धां असतो.अशा रीतीनं धुतलेल्या आणि वाळलेल्या कपडयांना इस्त्री करण्यासाठीं आपल्याकडच्यासारखी विजेची इस्त्री घरोघर असतेच. पण कांहीं ठिकाणीं रोलरच्या साहाय्यानं कपडयांना इस्त्री करणारं एक मोठं विजेचं यंत्रहि असतं.

ज्यांच्या घरीं वॉशिंग मशिन्स नसतील अशांसाठीं 'सेल्फ सर्व्हिस लाँड्री' असते. अशा ठिकाणीं एका मोठया हॉलमध्यें कपडे धुण्याची नि वाळवण्याचीं अनेक यंत्रं ठेवलेलीं असतात. त्या यंत्रांची व्यवस्था बघायला क्वचितप्रसंगीं एखादा माणूस ठेवलेला असतो. पण त्याचा कांहीं फारसा उपयोग नसतो. कारण यंत्रांचा उपयोग कसा करायचा याच्यासंबंधीच्या सर्व सूचना त्या त्या यंत्रांवर लिहिलेल्या असतात. त्या सूचनांप्रमाणं यंत्रांत कपडे टाकून, ठराविक जागीं साबणाची पावडर किंवा इतर 'डिटरजंट्स्' टाकून यंत्रांत नाणीं टाकलीं कीं यंत्र सुरू होतं. कपडे कसे धुतले जातात हें यंत्राच्या तोंडाला असलेल्या कांचेच्या दारांतून आपण सहज बघू शकतों. कपडे धुतले गेल्यावर अगर वाळवले गेल्यावर यंत्र आपोआप बंद होतं. अशा ठिकाणीं आपण घरून साब-



संगीतस्वरवर्धक लोंकरीचा कुत्रा

णाची पावडर न नेल्यास ती तिथल्या तिथं विकत देणारीं दुसरीं यंत्रं असतातच. कपडे धुऊन होईपर्यंत गिऱ्हाइकांना बसण्यासाठीं छानदार खुर्च्या ठेवलेल्या असतात. शिवाय त्यांना नुसतं बसण्याचा कंटाळा येऊ नये म्हणून पॉपकॉर्न विकत देणारीं यंत्रंहि तिथं असतात. अशा लॉंड्रींत कपडे धुण्यासाठीं एका वेळचे फक्त २५ सेंट्स् पडतात. आणि ते वाळवण्यासाठीं १० सेंट्स् पडतात.

गृहिणीनं स्वैपाकघरांत तयार केलेलं अन्न ओव्हनमधें ठेवलं तर तें गरम रहातंच. पण कित्येकदां मोठ्या बंगल्यांमधें स्वैपाकघरांतून दुसऱ्या खोल्यांत अन्न नेतांना नि नंतरहि कांहीं वेळ तें गरम रहावं यासाठीं वॉर्म ट्रे ट्रॉली असतेच. स्वैपाकघरांत सर्रास वापरलीं जाणारीं ग्राइंडर, मिक्सर, ऑटोमॅटिक टोस्टर वगैरे यंत्रं आतां आपल्या-कडेहि आलेलीं आहेत. पण एखाद्या पार्टीच्या सजावटींत अधिक गंमत आणणारं, ' ड्रिंक 'मधें टाकण्यासाठीं बर्फाचीं इंग्रजी अक्षरं तयार करणारं यंत्र मात्र मला अजून इकडे कुठं बघायला मिळालेलं नाहीं.

बॅरिंग्टनला असतांना मी जॉन हॉपकिन्स यांच्या कुटुंबांतलाच एक म्हणून त्यांच्याकडे रहात होतों, त्या वेळचा एक प्रसंग मला आठवतो. एक दिवस सकाळीं जरा लवकरच आम्हांला शिकागोला जायचं होतं. म्हणून आदल्या दिवशीं रात्रीच्या जेवणाच्या वेळीं मी सौ. लोएस हॉपकिन्सला दुसऱ्या दिवशीं पहांटे मला लवकरच उठवायला सांगितलं. आणि मला लवकर उठवण्याची जबाबदारी लोएसनं स्वीकारल्यानं त्या रात्रीं मी निर्धास्तपणं गाढ झोपीं गेलों.

दुसऱ्या दिवशीं पहांटे साडेपांच वाजतां अतिशय सुमधुर अशा संगीताच्या आवाजानं मी जागा झालों. पहातों तों माझ्या खोलींतला रेडिओ चालू झाला आहे! मीं एकदम खोलीच्या दाराकडे पाहिलं. रात्री झोंपण्यापूर्वीं मीं आंतून बंद केलेलं दार अजूनहि बंदच होतं. मग हा काय चमत्कार घडला होता ? नंतर सकाळीं ब्रेक-फास्टच्या वेळीं मीं लोएसजवळ चौकशी केली. तेव्हां खुलासा झाला कीं, माझ्या खोलींतल्या रेडिओला घड्याळाची ॲरेंजमेंट जोडलेली होती. रात्रीं झोंपतांना आपण गजर लावतों ना, तसंच ठराविक ठिकाणीं त्या घड्याळाचे कांटे आणून ठेवले कीं त्या वेळीं आपोआप रेडिओ सुरू होतो, अन् त्याच्या मधुर संगीतानं आपल्याला जाग येते. झोंपीं गेलेल्याला जागं करायची ही यांत्रिक युक्ति मला फार आवडली. वाटलं, हें छोटंसं यंत्र कांहीं फार महाग नसणार. अशीं हजारों–लाखों यंत्रं आपल्या भारतांत घेऊन जावींत, आणि घरोघर फुकट वांटून टाकावींत. सगळ्यांना तीं खूप आवडतील. निदान बांगड्यांच्या नाजुक किणकिणाटानं जाग येण्याचं भाग्य ज्यांच्या नशिबीं नाहीं, त्यांना तरी संगीताच्या नाजुक लहरींच्या कोमल स्पर्शानं जाग येण्याचा हा अनुभव खात्रीनं सुखद वाटेल. आतां नळावरच्या भांडणांनीं किंवा संतप्त दूधवाल्या भय्याच्या दारावर बसणाऱ्या लाथांच्या आवाजानं जाग येण्याची संवय असलेल्या आपल्या



वॉशिंग मशिनचा वापर करीत असतांना लोएस हॉपकिन्स

लोकांना सुरुवातीला कांही दिवस हें चमत्कारिक वाटेल. पण त्याला आपला नाइलाज आहे

अमेरिकन माणसाच्या सिगारेटच्या डबींतली सिगारेट सहसा झांकण उघडून काढावी लागत नाहीं. त्यांतसुद्धां त्यानं कांहींतरी यांत्रिक गंमत केलेलीच असते. बोलतांबोलतां सहज खटका दाबला कीं सिगारेटकेस्‌मधली सिगरेट टुणकन् उडी मारून वरती येते. सिगारेट–लायटरचीसुद्धां अशीच गंमत ! कधीं फौंटनपेनच्या आकाराचा, तर कधीं कॅमेराच्या आकाराचा लायटर आपलं लक्ष वेधून घेतो. सहज गप्पा मारतांमारतां एखाद्या अमेरिकनानं खिशांतून पिस्तुल काढलं म्हणून आपण दचकावं, तर तो त्याचा सिगारेट–लायटर असतो. रेडिओ, ट्रॅन्झिस्टर्स, टेलिव्हिजन वगैरे मंडळीसुद्धां केव्हां कोणत्या आकारांत अन् स्वरूपांत 'दर्शन' देतील त्याचा नेम नाहीं. म्हणजे नुसतीं यंत्रं शोधून काढूनसुद्धां अमेरिकनांच्या मनाचं समाधान होत नाहीं. दर वेळीं त्यांच्यातहि कांहींतरी नावीन्यपूर्ण सुधारणा करून त्यांचं आणि त्यांच्या द्वारें जीवनाचंच आकर्षण वाढवण्याची त्यांची धडपड एकसारखी चालू असते.

झोपेंतून उठल्यापासून तों रात्रीं झोंपेपर्यंत पावलापावला यंत्राचा उपयोग करणाऱ्या अमेरिकनांनीं झोंपेतसुद्धां माणसाला गोडगोड स्वप्नं पाडणारीं यंत्रं उद्यां शोधून काढलीं तर मला नवल वाटणार नाहीं. खरं सांगायचं म्हणजे आजसुद्धां माणसाला झोंपेंत विशिष्ट स्वप्नं पाडणारीं यंत्रं निघालीं आहेत असं म्हणतात. मात्र तीं स्वप्नं

आपलीं तुम्हांआम्हांला पडतात तशीं साधींसुधीं, निरुपद्रवी स्वप्नंच असतात कीं गोड स्वप्नं असतात तें मला अजून समजलेलं नाहीं.

'यंत्र' हेंच आज अमेरिकन जीवनपद्धतीचं एक 'तंत्र' बनलं आहे. आणि त्यांत वावगं काय आहे? 'स्वर्ग' किंवा 'मोक्ष' म्हणतात तो कुठं असेल तिथं (सुखरूप) असो! पण मानवाचं इहलोकांतलं क्षणभंगुर दैनंदिन जीवन अधिकाधिक सुखकारक कसं होईल, आणि पृथ्वीवरच स्वर्ग कसा निर्माण होईल, याचीच काळजी अमेरिकनांना असते. त्यासाठींच शेंकडों–हजारों यंत्रं शोधून काढण्यांत आणि त्यांच्यांत क्षणाक्षणाला अद्ययावतपणा आणण्यांत आपल्या बुद्धीची खरी कसोटी आहे असं ते मानतात. म्हणूनच लाखों मैल दूर असलेल्या चंद्रावर आपलीं पदचिन्हं उमटवून आधींच सांगितलेल्या ठराविक क्षणाला ते पुन्हा पृथ्वीवर सुखरूप परत येऊं शकतात.

अमेरिकनांच्या आणि एकंदर पाश्चिमात्य लोकांच्याच यंत्रप्रधान जीवन-पद्धतीची, संस्कृतीची बऱ्याच वेळां आपण हेटाळणी करतों. यंत्रांमुळं त्यांचं जीवन यांत्रिक नि रसशून्य झालं आहे असं म्हणतों. पण आध्यात्मिक जीवनाचं आणि थोर उदात्त संस्कृतीचं केंद्र असलेलं, साऱ्या जगाचं आशास्थान म्हणून ज्या भारतदेशाची आम्ही प्रौढी मिरवतों, त्या देशांत तरी सर्वसामान्यांचं जीवन सुखी आहे काय? तृप्त आहे काय? यंत्राचा उपयोग तुम्ही करा अथवा करूं नका, अखेर मानवी जीवनांतील सुखाचा मूलमंत्र वेगळाच असतो. ज्यांना तो गवसतो ते भाग्यवान्!

□

# सिंदबादची दुसरी सफर

पूर्वी सिंदबादच्या स्वभावाची मला नेहेमीं गंमत वाटायची. एका सफरीवरून तो सुखरूप परत आला कीं, आतां पुन्हां दुसऱ्या सफरीवर जायचं नाहीं असा तो निश्चय करी. कांहीं दिवस असेच जात. आणि मग तो इतका अस्वस्थ होई कीं, एक दिवस आपलं गलबत घेऊन तो पुन्हा दुसऱ्या सफरीसाठीं देशाबाहेर पडायचा. एकदां परदेशीं जाऊन आल्यानंतर पुन्हा परदेशीं जायची माणसाला ओढ कां लागते तें एकदां तरी परदेशगमन केल्याशिवाय माणसाला कळायचं नाहीं !

'६४ सालीं मी प्रथम अमेरिकेला गेलों, तेव्हां तिथले माझे अमेरिकन मित्र-मैत्रिणी मला नेहेमी म्हणायचे, " तूं आमच्या देशांत पुन्हा नक्की एकदां तरी येणार ! "

मी आपला त्यांना नेहेमीं खरं सांगायचा. मी म्हणत असें, " बाबांनों ! हिंदुस्थानांतून बाहेर पडणं किती कठिण आहे हें आमचं आम्हांला माहीत ! आमच्या देशाची आर्थिक परिस्थिति आणि राज्यकर्त्यांचं एकंदर धोरण लक्षांत घेतां या जन्मांत तरी पुन्हा या भूमीला माझे पाय कधीं लागतील असं मला वाटत नाहीं. आतां जॉन्सन-साहेबालाच कधीं माझ्या सल्ल्याची गरज भासली, आणि त्यानं आपलं खास विमान पाठवून मला इकडे आणलं तर गोष्ट वेगळी ! "

" तशीच वेळ आली तर खात्रीनं बोलावून घेतील ते ! नाहींतरी अमेरिकेंत हल्लीं तुझ्यासारख्या हुशार माणसांची जराशी टंचाईच आहे ! " – असं ते म्हणत – आणि मग आम्ही सगळींजणं खूप हंसायचों.

यांतला चेप्टेचा भाग जरी सोडला, तरी अमेरिकेला आपण पुन्हा एकदां जरूर गेलंच पाहिजे, असं मला फार उत्कटपणं वाटायचं. त्याचबरोबर ती घटना पुन्हा घडणं अशक्य आहे, हाहि विचार मनांत यायचा. सिंदबादला जशा प्रत्येक सफरींत अनंत अडचणी यायच्या, संकटं यायचीं, तशा अडचणी किंवा संकटं अमेरिकेच्या माझ्या पहिल्या सफरींत माझ्या वाट्याला आलीं नाहींत. तुफान वादळांत सांपडून माझं गलबत कधीं खडकावर आदळून फुटलं नाहीं, किंवा कधीं चांचेलोकांनीं माझ्या गलबतावर हल्ला करून गुलाम म्हणून मला पकडून नेलं नाहीं! कदाचित् मीं गलबतानं प्रवासच केला नसल्यानं माझ्यावर हीं संकटं आलीं नसावींत. असं असूनसुद्धां सिंदबादप्रमाणंच पहिल्या सफरीवरून परत आल्यानंतर पुन्हा लवकरच दुसऱ्या सफरीवर जाण्यासाठीं मी कमालीचा अस्वस्थ बनलों.

— आणि एक दिवस खरोखरच तो चमत्कार घडला! वर्षाच्या आंतच — म्हणजे ७ ऑगस्ट १९६५ ला कॉलेजांतून घरीं आलों तों 'एक्स्पेरिमेंट'चं पत्र माझी वाटच पहात होतं! 'अमेरिकेंतल्या 'व्हरमाँट स्टेट 'मधल्या 'ब्राटलबरो' या गांवीं असलेल्या 'द स्कूल फॉर इंटरनॅशनल ट्रेनिंग' या संस्थेनं 'मराठी लिंग्विस्ट' म्हणून काम करायला जातां का', असं मला विचारलेलं होतं. महाराष्ट्रांत काम करायला येऊं इच्छिणाऱ्या 'युनायटेड स्टेट्स् पीस कोअर'च्या व्हॉलंटिअर्सना मराठी शिकवायचं होतं. पंचवीस ऑगस्टला अमेरिकेंत हजर राहावं लागणार होतं. जाण्यायेण्याचा सगळा खर्च अमेरिकनांचाच होता, आणि शिवाय मला ते कांहीं पगारहि देणार होते. पत्रामधें त्यांनीं, " All we want is a young person like you..... enthusiastic to work... वगैरे भाषा वापरल्यामुळें मनांतल्या मनांत मी फारच सुखावलों, आणि त्यांच्या इच्छेप्रमाणं तारेनं त्यांना तावडतोब माझा होकार कळवला!

'प्रीतीची आणि भक्तीची वाट कांटेरी असते,' हें मीं वाचलेलं होतं. पण परदेशगमनाचा मार्गसुद्धां कंटकमय असतो हें मला माहीत नव्हतं. या दुसऱ्या सफरीच्या वेळीं मात्र मला त्याचा पुरेपूर अनुभव आला. पंचवीस ऑगस्टला मला अमेरिकेंत कामावर हजर व्हायचं होतं. आणि वीस तारखेपर्यंत रजा मिळेना म्हणून मी पुण्यांतच होतों. रजा मिळतांच लगेच मी मुंबईला गेलों. पण आदल्या वर्षीचा पासपोर्ट माझ्याजवळ असूनहि मला त्याचं नूतनीकरण करून मिळेना! 'परराष्ट्र-मंत्रालयाकडून तुमचं नाव आमच्याकडे आल्याशिवाय तुमचा पासपोर्ट आम्हांला 'रिन्यू' करून देतां येणार नाहीं' असं पासपोर्ट अधिकाऱ्यांनीं मला सांगितलं. आणि मंत्रालयाच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धतीमुळं, माझी निवड झालेली असूनहि कांहीं केल्या माझं नांव मुंबईला येईना!

दिवसांमागून दिवस जात होते. माझी अस्वस्थता वाढत होती. तारीख २५

ऑगस्टहि मुंबईतच उजाडली आणि मुंबईतच मावळली. दिल्लीहून माझं नांव पासपोर्ट ऑफिसकडे लवकर यावं म्हणून अनेक थोर व्यक्तींनीं माझ्यासाठीं फार प्रयत्न केले. दिल्लीला तारा केल्या, ट्रंककॉल्स् केले, 'टेलेक्स्'वरून 'मेसेजेस्'सुद्धां पाठवले. केवळ माझ्यासाठीं एवढी तसदी घेणाऱ्यांमधें पोलिसखात्यांतले फार मोठे अधिकारी होते, हायकोर्टाचे एक न्यायमूर्ती होते, आणि एका मोठ्या दैनिकाचे संपादकहि होते. पण परराष्ट्र–मंत्रालयाला जाग येण्याचं कांही चिन्ह दिसेना ! अखेरीस २ सप्टेंबरला दिल्लीहून मला 'एक्स्पेरिमेंट'ची तार आली : 'Proceed Delhi immediately for passport, visa, clearance and departure.'

तीन सप्टेंबरला मुंबई सोडली आणि पांच तारखेला सकाळीं दिल्लीला पोंचलों. तारीख सातला रात्रीं 'पॅन अमेरिकन'च्या विमानानं जाण्याची माझी व्यवस्था झालेली होती. तारीख सहा व सात या दोन दिवसांत मला माझा 'पासपोर्ट' आणि 'व्हिसा' मिळणार होता. "आतां काळजी करण्याचं कांहीं कारण नाहीं. सात तारखेच्या रात्रीं 'पॅन ॲम'च्या विमानानं तुम्ही नक्की अमेरिकेला जाणार," असं भारतांतल्या 'एक्स्पेरिमेंटचे' प्रमुख श्री. अमरीश त्रिवेदी यांनी मला मी दिल्लींत पोंचतांच सांगितलं. त्यामुळं पांच सप्टेंबरच्या संध्याकाळीं हलक्या अंतःकरणानं सौ. मीना मराठे यांच्याकडे मी गप्पा मारायला गेलों. योगायोगानं थोड्या वेळानं तिथं आपली पुण्याची 'नाटचद्वयी' – श्री. अरुण जोगळेकर आणि सई परांजपे – भेटली. गप्पा साहजिकच अधिक रंगल्या. एवढ्यांत आकाशवाणीवरच्या बातम्या सुरू झाल्या. पाकिस्तानानं आपल्याशीं युद्ध जाहीर केलं होतं. आणि राजधानीवर होणाऱ्या हवाई–हल्ल्याची शक्यता गृहीत धरून लगेच दिल्लींत 'ब्लॅक आउट' सुरू झाला होता. अंधार पडायच्या आंत जोगळेकरांना आणि मला आपापल्या निवासस्थानीं पोंचायचं असल्यानं आम्ही ताबडतोब तिथून परत निघालों. मी 'बृहन्महाराष्ट्र भवनां'त रहात होतों. तिथं जायला मला रिक्षा, टॅक्सी वगैरे कांहीं वाहन मिळेना. खूप अंतर चालल्यावर एक वाहन मिळालं. तोंपर्यंत अंधार बराच पडला होता. रस्त्यांत कुठंहि दिवे नव्हते. सर्वांनाच एक प्रकारचा मानसिक धक्का बसल्यानं वातावरण बदलून गेलं होतं. अंधुक दिवे लावून वाहनांची धांवाधांव चालू होती. कसाबसा 'महाराष्ट्र भवनां'त आलों. रात्रीच्या आकाशवाणीवरच्या बातम्यांत कळलं कीं, पालम विमानतळावरच्या विमानांच्या रात्रीच्या सर्व 'फ्लाइट्स्' रद्द करण्यांत आलेल्या आहेत ! आतां माझं सात तारखेच्या रात्रीचं उड्डाणहि रद्द झाल्याचं उघड होतं ! गणपतीचे दिवस होते. 'भवनां'त मोठा गणपति बसवलेला होता. हॉलमधें गेलों अन् त्या विघ्नहर्त्याला नमस्कार केला !

नंतरच्या कांही दिवसांत परदेशी विमान – कंपन्यांनीं पालमवरचीं आपलीं विमानं भराभर काढून घ्यायला सुरुवात केली. दिवसांतून अगदीं थोड्याच आणि

अत्यंत आवश्यक अशाच 'फ्लाइट्स्' चालू राहिल्या. त्यांतहि दिल्ली सोडून जाणाऱ्या परदेशी लोकांची एकच गर्दी झाली होती. त्यांना प्राधान्य देणं साहजिकच होतं. त्यामुळं त्यांच्यांत माझा नंबर लवकर लागेना. एवढ्यांत सरकारनं एक तांतडीचा वटहुकूम काढून, अत्यंत गरज असलेल्या इसमांखेरीज इतर सर्व भारतीय लोकांचं परदेशीं जाणं रद्द केलं. ह्या हुकुमामुळं परदेशी जाणाऱ्या सर्व शिष्टमंडळांचं जाणंहि अर्थातच रद्द झालं. त्यानंतरच्या वीस दिवसांच्या माझ्या दिल्लीच्या वास्तव्यांत, परराष्ट्र – मंत्रालयाच्या अनेक अधिकाऱ्यांना भेटून मी त्यांना परोपरीनं सांगू लागलों कीं, "शिष्टमंडळांत समावेश होण्याइतका कांहीं मी 'शिष्ट' नाहीं! तेव्हां मला कां उगीच अडवतां?"

त्या वेळचा एक किस्सा सांगण्यासारखा आहे. यशवंतराव चव्हाण युद्धाच्या काळजींत असल्यामुळं त्यांना भेटणं मला शक्य नव्हतं. तेव्हां मग परराष्ट्रखात्यांतल्या एखाद्या मराठी अधिकाऱ्याला भेटून भारतांतून माझी सुटका झाली तर पहावं, या हेतूनं मीं टेलिफोनची डिरेक्टरी उघडली. आणि तींत आढळलेल्या एका अनोळखी मराठी अधिकाऱ्याला मीं फोन केला. फोनवरून त्यांनी दिलेल्या वेळेला मी त्यांना भेटायला गेलों. त्यांनीं चहा देऊन माझं स्वागत केलं. निर्विकारपणं माझी कहाणी ऐकून घेतली. आणि मग एकाएकीं ते भडकले. "तुमचे परदेशी जाण्यासंबंधीचे कागद माझ्याकडे आहेत हें तुम्हांला कळलंच कसं?" – असं ते मला चिडून विचारूं लागले. मी त्यांना पुन्हापुन्हा सांगितलं कीं, "केवळ डिरेक्टरींत तुमचं नांव पाहिलं. नांवावरून तुम्ही मराठी वाटलांत. एका मराठी माणसाला त्याच्या अडचणीच्या काळांत तुम्ही खात्रीनं कांहींतरी मदत कराल, मार्गदर्शन कराल, अशा कल्पनेनं मीं तुम्हांला फोन केला. माझे कागद तुमच्याकडे आहेत हें मला खरोखरच माहीत नव्हतं!"

पण त्यांचा कांहीं केल्या विश्वास बसेना. नंतर मग ते विचारूं लागले, "एवढं हिंदुस्थानचं–पाकिस्तानचं युद्ध सुरू झालंय्, अन् तुम्हांला परदेशी जाणं सुचतं तरी कसं? तुमची कांहीं जबाबदारी आहे कीं नाहीं?"

आतां तें युद्ध कांही मीं सुरूं केलेलं नव्हतं. आणि तें संपवणंहि माझ्या हातांत नव्हतं! अशा परिस्थितींत रोज रात्रीं अचानक झोपेंतून उठवून हवाई–हल्ल्याचा इशारा देणारे भोंगे ऐकण्यापलिकडे माझ्यासारखा सामान्य माणूस काय करूं शकत होता? तसं त्यांना मी नम्रपणानं सांगितलंहि! त्यावर ते अधिकच भडकले. मग मात्र त्या मराठी अधिकाऱ्यांना अधिक न चिडवतां मीं त्यांचा निरोप घेतला.

२२ सप्टेंबर '६५ ला युद्ध संपलं. आणि चोवीस सप्टेंबरच्या विमानानं माझं जाणं ठरलं. त्या दिवशी सकाळीं सगळी तयारी केली. आणि जवळचे उरलेले पैसे घरीं पाठवून देण्यासाठी मनिऑर्डर करायला म्हणून मी बाहेर पडलों. पण कां कुणास ठाऊक, पुन्हा मन साशंक झालं. आणि मनिऑर्डर न करतां नुसता फॉर्म घेऊनच मीं

'भवनां'त परत आलों. परत येतांच वार्ता कळली कीं, त्या दिवसाची फ्लाइट रद्द झाली आहे असा 'पॅन ॲम'चा फोन माझ्या गैरहजेरींत आला होता. पुन्हा संध्याकाळीं फोन आला कीं ती फ्लाइट रद्द झालेली नसून, फक्त २४ तास पुढं ढकलली गेली आहे. आतां २५ सप्टेंबरला दुपारी २॥ वाजतां माझं विमान उड्डाण करणार होतं.

मॉस्कोला जाण्यासाठीं दिल्लींला आलेला, पण माझ्यासारखाच दिल्लींत अडकून पडलेला माझा 'महाराष्ट्र भवनां'तला तरुण रूमपार्टनर प्रभाकर सटवे ह्याला घेऊन त्या दिवशीं संध्याकाळीं मी दिल्लींत खूप फिरलों. अखेर दुसऱ्या दिवशीं मला अमेरिकेला जायला मिळण्याच्या आनंदाप्रीत्यर्थ एका मस्त हॉटेलांत पोटभर सामोसेसुद्धां खाल्ले.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं २॥ ला विमान सुटणार असल्यानं खूप अवकाश होता. म्हणून सकाळीं मी बाहेर गेलों. नऊसाडेनऊला परत आलों. तोंच 'पॅन ॲम'चा फोन आला कीं, 'ताबडतोब पालमवर या. तुमचं विमान पावणेबाराला सुटणार आहे.' मग एकच घाई, धांदल, धांवपळ झाली. कसंतरी जेवून सामान आंवरून टॅक्सीनं विमानतळावर आलों. आणि थोड्याच वेळांत 'पॅन अमेरिकन'च्या 'फ्लाइट नंबर 2001नं अखेर आकाशांत झेंप घेतली!

जातांना लेबॅनॉनची राजधानी बैरुत ( Beirut ) इथं आम्हीं पहिला मुक्काम केला. विमानतळावरून बसनं शहरांत गेलों त्या वेळीं त्यांच्या स्थानिक वेळेप्रमाणं नुकतेच दुपारचे साडेतीन वाजून गेले होते. आमच्या उतरण्याची व्यवस्था 'बैरुत कमोदोर' ( (Beirut Commodore ) ह्या हॉटेलांत केलेली होती. सर्व खर्च अर्थातच 'पॅन ॲम'चा !

'बैरुत कमोदोर' हॉटेलांत प्रत्येकाला स्वतंत्र खोली होती. प्रत्येक खोलीत सोफा, लिहिण्याचीं टबलं, कपाटं, 'डनलॉपिलो'चे मऊ बिछाने, तीनचार मोठमोठे आरसे, फोन, गरम नि गार पाण्याची सोय, 'ॲटॅच्ड् बाथ'– अशा अनेक सोयी होत्या. सर्व खोल्या अर्थातच एअर–कंडिशन्ड होत्या. सहज चौकशी केली तेव्हां समजलं कीं, प्रत्येक सिंगल खोलीचं फक्त रहाण्याचं भाडं 30.75 लेबॅनिज पौंड ( म्हणजे सुमारं १० डॉलर्स ) होतं. चहाचा व जेवणाखाण्याचा खर्च वेगळा ! हॉटेलांत इतरहि सुखसोयी पुष्कळच होत्या. रूम–सर्व्हिस, फोन, टपालसर्व्हिस, ब्यूटी पार्लर, बार्बर शॉप, लाँड्री, पुस्तकाचं दुकान, गिफ्ट शॉप, स्विमिंग पूल, बार, नाइट–क्लब ( Casabah ) – अशा कितीतरी सोयी तिथं होत्या.

माझ्याबरोबर अमेरिकेला 'पीस कोअर'च्या लोकांना कानडी शिकवायला येत असलेले डॉ. हिरेमठ आणि त्यांचे पांच स्त्रीपुरुष सहकारी आमच्याच हॉटेलांत उतरले होते. त्या दिवशी रात्रीं जेवण झाल्यावर बैरुतच्या उंचसखल, अरुंद नि वळणा-वळणाच्या रस्त्यांवरून आम्ही सर्वजण मजेंत पायीं फिरलों. वाटेंत टपोरीं, फळांसारखीं

चावावीं लागणारीं, पण खूप गोड अशीं द्राक्षं आम्ही विकत घेतलीं. आणि तीं खातखात सावकाश गांवांत फिरलों.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं भारतीय वेळेप्रमाणं पावणेदोनला आणि त्यांच्या स्थानिक वेळेप्रमाणं सकाळीं १०।ला आमच्या विमानानं बैरुत सोडलं. बैरुतनंतर इस्तंबूल – व्हिएन्ना – फ्रँकफुर्ट – लंडन अशा मार्गानं आम्ही न्यूयॉर्ककडे निघालों. लंडन ते न्यूयॉर्क हा ३९०० मैलांचा अटलांटिक महासागरावरचा ७।। तासांचा प्रवास सुरू झाला. वेळ रात्रीची होती. विमानांत आणि विमानतळावर प्रत्येक वेळीं भरपूर खाणंपिणं झाल्यामुळं आणि जेट विमानाच्या सुसाट गतीमुळं एक प्रकारची गुंगी आली होती. विमानाच्या आंतले नेहेमीचे मोठे दिवे बंद करून रात्रीचे मंद दिवे लावलेले होते. हात जरा उंच करून मीं माझ्यापुरता थंडगार वाऱ्याचा बारीकसा झोत सुरू केला होता आणि डोळे मिटून स्वस्थ पडून राहिलों होतों. अशा गुंगींत किती वेळ गेला कुणास ठाऊक ! बहुधा तीनचार तास झाले असावेत.

अचानक मी सावध झालो ! आमचं जेट विमान असूनसुद्धां तें एखाद्या यशस्वी पुढाऱ्यासारखं 'डाव्या-उजव्या' बाजूला डळमळायला लागलं ! मधेंच एकदम गचके खायला लागलं. वास्तविक 'जेट' विमान आकाशांत झेंप घेतल्यावर सरळ रेषेंत एकदा का अंतर कापायला लागलं कीं अफाट गतीनं त्याला एक प्रकारची स्थिरता प्राप्त झाल्यासारखी वाटते. आपल्या 'सीट'पुढं असलेल्या टेबलावर आपण एखादा भरलेला ग्लास ठेवला तरी तो सांडत नाहीं. असं असतांना आमच्या 'जेट' विमानानं सुरू केलेलं 'कथ्थक' पाहून त्या विमानाइतकाच मीहि हादरून गेलों. हळूच डोळे किलकिले करून पाहिलं, तर समोर छोटी पाटी प्रकाशित झाली होती : 'Fasten your seat belt !'

एकदां मनाची समजूत घातली कीं, न्यूयॉर्क जवळ आलेलं दिसतंय्, म्हणून उतरण्याची ही पूर्वतयारी असावी ! पण छे ! इतक्यांत कुठलं न्यूयॉर्क यायला ? मग जवळून ये–जा करणाऱ्या एका 'एअर होस्टेस'ला विचारलं. तिनं "विशेष कांहीं नाहीं, थोडा 'ट्रबल' आहे" असं सांगितलं. एवढ्यात आमच्या विमानाच्या कॅप्टननंच 'अनाउन्समेंट' केली : "आपलं विमान 'turbulance'मधें सांपडलं आहे. कृपा करून सर्वांनी शांत रहावं !'

विमानांतला नोकरवर्ग कमालीच्या शांतपणं, हंसतमुखानं इकडेतिकडे वावरत होता. असले प्रकार कदाचित् त्यांच्या अंगवळणी पडलेले असावेत. पण आमचे चेहेरे मात्र उतरून गेले. खिडकींतून बाहेर पाहिलं तर अंधाराचा काळा समुद्र सर्वत्र पसरलेला! खाली पहाण्याची सोयच नव्हती ! अटलांटिक महासागरावरून विमान चाललेलं ! कुणीतरी म्हणालं, "आपलं नशीब म्हणून ह्या वेळीं आपण पाण्यावरून उडतों आहोंत !"

"म्हणजे ? " मीं विचारलं.

" म्हणजे असं कीं, पाण्यावर समुद्रांत विमान कोसळलं तर आपल्यापैकीं कांहीं लोक तरी जिवंत राहण्याची शक्यता आहे ! जमिनीवर किंवा एखाद्या ' आल्प्स्'-सारख्या पर्वतावर विमान कोसळलं, तर आपले सर्वांचेच फार बारीक तुकडे होतील ! "

त्या भयानक कल्पनेनंच माझं अंग शहारलं. विमान अजून हेलकावे खातच होतं. कोणत्याहि क्षणीं कांहींहि घडूं शकत होतं. त्या दहाबारा मिनिटांत ब्रह्मांड आठवलं ! कल्पनाहि नव्हती, आपला शेवट असा होईल म्हणून !

कुणालातरी अटलांटिक महासागराची चांगलीच माहिती होती. तो दुसऱ्याला अटलांटिकमधल्या ' व्हेल ' माशांची निश्चित लांबी-रुंदी सांगत होता. आपल्या शेंपटीच्या एका फटकाऱ्यान मोठमोठे ' व्हेल ' मासे मोठमोठ्या आगबोटी कशा पालथ्या करतात त्याचं वर्णन तो प्रत्यक्ष पाहिल्यासारखं करीत होता.

माझ्या अंगावर कांटा उभा राहिला ! विमान अटलांटिकवर आदळलं आणि स्फोट झाला कीं प्रश्नच मिटला ! कित्येकदां म्हणे अशा प्रसंगीं विमानांतलं पेट्रोल समुद्रावर पसरतं, आणि समुद्र अक्षरशः पेट घेतो. ह्याहि पद्धतीचा मृत्यू कांहीं फारसा चांगला नव्हता. पण त्या 'स्टाइल'चा मृत्यू नको असेल, तर आपले ' व्हेल' मासे आहेतच गिळायला टपून बसलेले ! ' ' व्हेल ' माशाच्या पोटांत फारच बुळबुळीत वाटेल ! शिवाय आंत गेल्यावर जीव गुदमरेल तो वेगळाच ! ' त्यापेक्षां परमेश्वरा, भीतीनं आधी माझं ' हार्ट-फेल ' करून टाक ! मग तो व्हेल मासा गिळो अथवा पेटलेल्या समुद्राचे चटके बसोत ! आपण त्यावद्दल कांहींच तक्रार करणार नाहीं ! ' अशी मनांतल्या मनांत प्रार्थना केली आणि डोळे घट्ट मिटून बसलों. – आपलं मरण आपल्याला दिसूं नये म्हणून !

पण अखेर घडलं कांहीच नाहीं ! दहाबारा मिनिटानंतर विमानाचे हेलकावे थांबले आणि जणूं काय मघांशीं कांहींच घडलं नाहीं असा निर्विकार चेहेरा करून आमचं विमान पुन्हा पूर्वीच्याच डौलानं सरळ रेषेंत दिशा कापूं लागलं !....

आम्ही न्यूयॉर्कला पोचलों. त्या वेळी माझ्या घड्याळांत भारतीय वेळेप्रमाणे सकाळचे सात वाजले होते. आणि घड्याळात तारीख दिसत होती सत्तावीस ! – २७ सप्टेंबर ! पण न्यूयॉर्कच्या स्थानिक वेळेप्रमाणं तिथं त्या वेळीं रात्रीचे साडेनऊ वाजले होते. आणि तारीख चालू होती – २६ सप्टेंबर ! निदान वेळेच्या बाबतीत कां होईना, पण अमेरिका भारताच्या मागं आहे, हें पाहून मला फार बरं वाटलं ! न्यूयॉर्कला ' हॉटेल गव्हर्नर क्लिंटन ' ( Hotel Governor Clinton )-मधें आम्ही त्या रात्रीं मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळीं साडेदहाला स्टेशन-वॅगननं आम्हीं न्यूयॉर्क सोडलं आणि दुपारीं अडीचला ब्राटलबरोला पोंचलों.

ब्राटलबरोला गेल्याबरोबर तिथल्या ' स्कूल फॉर इंटरनॅशनल ट्रेनिंग 'चे



'स्कूल फॉर इंटरनॅशनल ट्रेनिंग'चे हसमुख 'लँग्वेज कोऑर्डिनेटर' डेव्हिड जे. बर्न्स.

(एस्. आय्. टी. चे) 'लँग्वेज कोऑर्डिनेटर' डेव्हिड जे. वर्न्स आणि त्यांचे साहाय्यक फँटिनी यांचा परिचय झाला. दोघांनींहि आपल्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वानं आणि हंसऱ्या चेहऱ्यानं पहिल्याच भेटींत आमचीं मनं जिंकलीं. त्या दिवशीं विश्रांति घेऊन दुसऱ्या दिवसापासून आम्ही कामाला लागलों. प्रथम तिथं कोणत्या पद्धतीनं कसं शिकवायचं त्यासंबंधींच्या ५ छोटया फिल्म्स् डेव्हिड वर्न्सनीं आम्हांला दाखवल्या. आणि त्याच्या आधारानं आम्हांला चर्चात्मक मार्गदर्शन केलं. कोणतीहि परदेशी भाषा शिकवण्याचं आधुनिक तंत्र जगांत किती प्रगत झालं आहे त्याची कल्पना आम्हांला त्या फिल्म्स्वरून आली.

आमच्या मराठी भाषेच्या गटामधें सौ. विजया जोशी, सौ. सुलोचना जोशी, सौ. शीला भार्गव, सौ. शालिनी जेंट्ल्, कु. विजया दांडेकर व श्री. रघुनाथ यादवाडकर हे 'इन्स्ट्रक्टर्स' होते. डॉ. नरेश कवडी आणि मी 'लिंग्विस्ट' म्हणून काम करीत होतों. 'इन्स्ट्रक्टर्स'ना रोज सकाळीं ८ ते १०, दुपारी १ ते ३ नि कधींकधीं संध्याकाळीं ७ ते ९ सुद्धां प्रत्यक्ष शिकवण्याचं काम होतं.

माझ्या तिथल्या कामाचं स्वरूप असं होतं :—

रोज सकाळीं ८ ते १० इन्स्ट्रक्टस घेत असलेल्या निरनिराळ्या वर्गांत व 'लँग्वेज लॅबोरेटरीं'त जाऊन, तिथं थोडा वेळ बसून 'सुपरव्हिजन' करायची. त्या वेळेला लक्षांत आलेल्या कांहीं गोष्टींबद्दल नंतर केव्हांतरी 'इन्स्ट्रक्टर्स'ना मार्गदर्शन करायचं. नंतर रोज दुपारी २॥ ते ३ ह्या वेळांत सर्व वर्गांतले सुमारं ५०।५५ विद्यार्थी-विद्यार्थिनी एका मोठ्या हॉलमधें एकत्र करून त्यांना उच्चारशास्त्र, भाषाशास्त्र, व्याकरण, आणि देवनागरी लिपि यांचे धडे द्यायचे. आठवड्यांतून दोन वेळां संध्याकाळीं ७ ते ८ किंवा ८ ते ९ टेप-रेकॉर्डिंगच्या वेळीं सुपरव्हिजन करायची. म्हणजे एक पुरुष नि एक स्त्री-इन्स्ट्रक्टर विद्यार्थ्यांसाठीं कांही संभाषणं 'रेकॉर्ड' करायचीं

त्या वेळीं त्यांचे उच्चार चुकले तर ते जागच्या जागीं दुरुस्त करायचे. पुरुष—इन्स्ट्रक्टर एकुलता एक असल्यानं पुढंपुढं बऱ्याच वेळां मला स्वतःलाच रेकॉर्डिंगसाठीं माझा आवाज वापरावा लागला. अजूनहि आमच्या आवाजांत ध्वनिमुद्रित केलेल्या त्या 'टेप्स्' अमेरिकेंतच असल्यानं, आपल्यामागं आपला 'आवाज' अमेरिकेंत ठेवून आल्याचं समाधान आम्हाला लाभलं आहे!

आठवडयांतून दोन वेळां तरी आमचे प्रमुख डेव्हिड बर्न्स यांच्याबरोबर आमच्या सर्वांच्या एकत्र 'मीटिंग्स्' होत. अशा 'मीटिंग्स्'चं वातावरण खूपच अनौपचारिक आणि खेळकर असं असायचं. एकीकडे सर्वजण चहा—कॉफी घेतांघेतां गप्पा मारतांना बर्न्स आम्हांला कांही मार्गदर्शन करीत.

'एस्. आय्. टी.'च्या परिसरांत संस्थेच्या एकूण पांचसहा इमारती होत्या. खुद्द ब्राटलबरो गांवापासून सुमारं तीन मैल अंतरावर अगदी एकीकडे असलेल्या आमच्या ह्या निसर्गरम्य वसाहतीला 'सॅंडानोना' असं नांव होतं.

आम्ही, आमचे विद्यार्थी—विद्यार्थिनी आणि तिथं असलेले कांहीं अधिकारी



लॅंग्वेज लॅबोरेटरींत आपल्या अमेरिकन विद्यार्थ्यां-बरोबर काम करतांना प्रा. प्रभाकर तामणे.

ब्रेकफास्ट नि जेवण नेहेमीं एकत्रच, एकाच ठिकाणी, एकाच टेबलावर घेत होतों. आमच्या 'मेस्'च्या बिल्डिंगमधें जेवणासाठीं एक खूप मोठा हॉल होता. बऱ्याच वेळां जेवण आटोपल्यानंतर भराभर टेबलं उचलून टाकून खुर्च्यांची पुनर्रचना करून त्या हॉलचं रूपांतर थिएटरमधें करण्यांत येई. मग त्या ठिकाणीं एखादी मोठी सभा होई, कधीं विद्यार्थ्यांचे करमणुकीचे कार्यक्रम होत, कधीं "स्क्वेअर डान्स' होई, तर कधीं एखादा सिनेमा दाखवला जाई. भारतांत असतांना बघायचा राहून गेलेला सत्यजित रॉय यांचा 'अपूर संसार' हा बंगाली चित्रपट मीं त्यात्र 'मल्टिपर्पज हॉल'मधें पाहिला.

रोज सकाळीं सात ते आठ ह्या वेळांत हॉलमधें आम्ही ब्रेकफास्ट घेत असूं. ब्रेड, बटर, पॅन–केक्, कॉर्न फ्लेक्स्, फळांचे रस, अंड्यांचे वेगवेगळे प्रकार, हॅम, बेकन्, टोस्ट, चहा, कॉफी किंवा 'चिल्ड मिल्क' – असा संपन्न ब्रेकफास्ट असे. आपापल्या आवडीनुसार आपण त्यांतून निवड करायची, पाहिजे ते पदार्थ 'ट्रे'मधें घ्यायचे अन् हॉलमधल्या टेबलावर बसून ते खायचे, अशी पद्धत तिथं होती. दुपारीं बारा ते एक ही दुपारच्या जेवणाची आणि संध्याकाळीं साडेपांच ते साडेसहा ही आमची रात्रीच्या जेवणाची वेळ होती. जेवण बहुतेक वेळां शाकाहारी आणि मांसाहारी अशा दोन्ही पद्धतींचं असे. प्रत्येकानं रांगेत उभें रहावं अन् आपल्याला हवे ते पदार्थ मागून किंवा उचलून घ्यावेत. ह्या रांगांमधें उभं रहाण्यांत कधीच कुठं भेदभाव अथवा पक्षपात आढळला नाहीं. अमेरिकन नि निग्रो विद्यार्थी-विद्यार्थिनी एकाच रांगेत शेजारी–शेजारी उभी रहात, एकाच टेबलावर खात-पीत. वेळप्रसंगीं एकमेकांच्या पानांतलंसुद्धां खात. 'एस्. आय्. टी.' चे सर्व अधिकारी, अगदी प्रेसिडेंटसुद्धां, जशा क्रमानं तिथं येतील तसे 'क्यू'मधें आमच्याबरोबर उभे रहात. आमच्याच टेबलावर किंवा विद्यार्थ्यांच्या टेबलावरसुद्धां मोकळेपणानें गप्पा मारीत जेवण घेत.

'क्यू'मधेंसुद्धां एकमेकांच्या गप्पा किंवा थट्टामस्करी चालायचीच. बऱ्याच वेळां 'क्यू' फार मोठा असायचा. कारण 'एस्. आय्. टी.' मधें फक्त मराठी व कानडी भाषा शिकणारे विद्यार्थीच नव्हते, तर जगांतल्या अनेक देशांतलीं अनेक तरुण–तरुणी तिथं निरनिराळ्या परदेशी भाषा शिकायला येत. आमचं 'एस. आय्. टी.' म्हणजे खऱ्याखुऱ्या अर्थानं आंतरराष्ट्रीय शिक्षणाचं एक मोठं केंद्र होतं.

'क्यू' वरून आठवण झाली म्हणून सहज एक गंमत सांगतो. १६ ऑक्टोबर १९६५ला 'एक्स्पेरिमेंट'च्या सर्व ट्रस्टींनी आमच्या 'स्कूल'ला भेट दिली. संध्याकाळच्या जेवणाच्या वेळी त्यांच्या 'बोर्ड ऑफ डिरेक्टर्स'मधील एक 'डिरेक्टर' डॉ. एलाइट ( Dr. Elite ) 'क्यू'मधें माझ्याच शेजारीं उभे होते. अमेरिकेंत कुणालाहि ओळख अशी लागत नाहीं! त्यामुळं लागलीच आमच्या गप्पा सुरू झाल्या. बोलतांबोलतां डॉ. एलाइट मला म्हणाले, "दोन वर्षांपूर्वी केव्हांतरी एकदा

मी 'एक्स्पेरिमेंटर्स'चा एक ग्रुप घऊन हिंदुस्थानांत आलों होतों. तेव्हां मीं दोन हिंदी सिनेमा पाहिले – 'जंगली' आणि 'गीत गाया पत्थरोंने.' 'जंगली'चीं गाणीं मला आवडलीं. तो सिनेमा म्हणजे नुसती गंमत आहे! 'गीत गाया'चं कथानक मात्र प्रयत्न करूनहि मला समजूं शकलं नाहीं. कारण मला हिंदी अजिबात येत नाहीं. पण त्या सिनेमांत नायिका दर दहा मिनिटांनीं रडत होती. मीं तिचं रडणं मोजलं. सबंध चित्रपटांत ती एकूण अठ्ठावीस वेळां रडली!"

—आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या शांतारामबापूंच्या चित्रपटाबद्दलचा एका परदेशी विद्वानाचा हा अभिप्राय ऐकून मला मात्र हंसावं का रडावं तें कळेना!

जिथं आमच्या सर्वांच्या रहाण्याची सोय केलेली होती तें 'एस्.आय्. टी.'चं गेस्ट हाउस फार सुरेख होतं. आमच्या स्कूलच्या कँपस्वरच मुख्य इमारतीपासून तीनचार मिनिटांच्या अंतरावर तें होतं. 'गेस्ट हाउस'ची इमारत जवळजवळ संपूर्णपणं लाकडाचीच होती. सुमारं बारा खोल्यांच्या त्या इमारतींतली प्रत्येक खोली सुसज्ज होती. प्रत्येक खोलीतलं उष्णतामान नियंत्रित करण्याची यांत्रिक सोय तिथं केलेली होती. दिव्याच्या बटनांशेजारीच उष्णतामान–नियंत्रकाचं बटन असायचं. रेडिओच्या कांट्याप्रमाणं 'नॉब' फिरवून पाहिजे त्या 'टेंपरेचर'च्या आंकड्यावर कांटा आणला कीं त्या खोलींत हवं तें 'टेपरेचर' निर्माण व्हायचं. आम्हां भारतीय लोकांना आपल्या मर्जीप्रमाणं खेळायला असं एक नावीन्यपूर्ण अद्‌भुतरम्य छानदार यंत्र मिळाल्याचा असा परिणाम झाला कीं, आमच्यापैकीं प्रत्येकाच्या खोलींत वेगळंवेगळं उष्णतामान असायचं! त्यामुळं एकाच्या खोलींतून दुसऱ्याच्या खोलींत प्रवेश केला कीं आपण एका नवीनच देशांत आलो आहोंत असा भास व्हायचा! कुणाची खोली अगदीं थंड असायची. कुणाची उबदार, तर कुणाला आपल्या भारतीय हवेवांचून करमायचं नाहीं, म्हणून तो आपल्या खोलींतलं वातावरण गरम ठेवायचा!

आमच्या निवासस्थानांत आम्हीं एकूण सोळा भारतीय लोक रहात होतों. दहा स्त्रिया आणि सहा पुरुष. आमच्यावरोबरच कानडी इन्स्ट्रक्टर्सहि तिथं रहात होते. माझी खोली वरच्या मजल्यावरच्या कोपऱ्यांत होती. आणि डॉ. हिरेमठ माझे 'रूम-पार्टनर' होते. आमच्या होस्टेलच्या आसपास अवघ्या पांचदहा फुटांवरच खूप उंचउंच वृक्षांची दाटी झालेली होती. त्यामुळं खोलीच्या खिडक्यांतून बाहेरचं दृश्य फार सुंदर दिसायचं. आमच्या निवासस्थानाच्या इमारतींत फक्त दोनतीनच अमेरिकन्स रहात होते. बाकी सगळे आम्ही भारतीय होतों. त्यामुळं त्याला आम्ही 'इंडिया हाउस' असं गंमतीनं नांव ठेवलं होतं.

आमच्या 'इंडिया हाउस'च्या मागच्या बाजूनं, घनदाट झाडींतून वळण घेत जाणारी एक सुरेख पाउलवाट होती. त्या वाटेनं गेलं कीं शेवटीं आमच्या 'एस्. आय्. टी.'चा स्विमिंग पूल लागायचा. स्विमिंग पूलचा परिसर फार आल्हाददायक



खोलीखोलीगणिक हवामान बदलतां येण्याची सोय असलेलें,
हवामानखात्याला फशीं पाडणारें हेंच तें ' इंडिया हाऊस ' !

होता. कित्येकदां संध्याकाळीं अगर सुट्टीच्या दिवशीं सकाळीं आम्ही फिरतफिरत तिथं गप्पा मारायला जाऊन बसत होतों.


असच एकदां सौ. सुलोचना जोशी, सौ. विजया जोशी आणि मी ' स्विमिंग पूल 'च्या पायऱ्यांवर गप्पा मारीत बसलों असतांना सौ. शालिनी जेंट्ल् यांनी माझ्या कॅमेऱ्यानं आमचा फोटो घेतला. पण ' क्लिक् 'चा आवाज नेहेमींसारखा आला नाहीं, म्हणून मीं सौ. जेंट्ल् यांच्या ' फोटो घेण्याच्या कौशल्याबद्दल ' माझा संशय प्रकट केला. त्यांना अर्थातच माझं प्रामाणिक मत तितकंसं आवडलं नाहीं ! म्हणून त्यांनी माझ्या कॅमेऱ्याच्या एकंदर फोटो घेण्याच्याच यांत्रिक क्षमतेबद्दल आपलं प्रतिकूल मत नोंदवलं. कॅमेरा जर्मन होता, आणि तो ' माझा ' असल्यानं माझा फार लाडका होता. शिवाय जातांजातां सौ. जेंट्ल् यांनी माझ्या कॅमेऱ्याचा, फोटो काढण्याशिवाय अन्य कांहीं कामासाठीं उपयोग झाला तर पाहावा, असं सहज सुचवल्यानं माझी अस्मिता दुखावली. मीं म्हटलं, "एक स्नॅप् घेतल्यावर माझा कॅमेरा ऑटोमॅटिकली लॉक होतो. दुसरा नंबर फिरवल्याशिवाय त्याच्यानंतरचा फोटो निघत नाहीं. हें पहा, मी नंबर न फिरवतां पुन्हा ' क्लिक् ' करून दाखवतों."

असं म्हणून मी चालतांचालतां दोन पावलं पुढं गेलों, अन् समोरून चालत येणाऱ्या दोन सौ. जोशी आणि एक जेंट्ल् यांच्याकडे कॅमेरा फिरवून ' क्लिक् ' केलं. आतां मात्र ' क्लिक् ' चा आवाज माझ्या मनासारखा आला. विजयी मुद्रेनं मीं म्हटलं, " वघा ! मघाशीं शालिनीबाईनी फोटो घेतलाच नव्हता ! आतां ही फिलम ' डेव्हलप् '

होऊन आली की तुम्हाला फोटो दाखवतों. फक्त मीं घेतलेलाच आत्तांचा फोटो येतो कीं नाहीं तें पहा ! "

केवळ 'तो' फोटो पहाण्याच्या उत्सुकतेपायीं उरलेले 'स्नॅप्स्' वाटेल तसे घेऊन मीं फिल्म संपवली. घाईघाईनं तीं डेव्हलप् करून आणली. आणि पहातों तों काय ? – आम्ही दोघांनींहि घेतलेले फोटो आलेले होते. सौ. शालिनीबाईनीं घेतलेला 'लाँग् शॉट्' आणि मी घेतलेला क्लोजप् एकावर एक सुपर इंपोज करून काढावा तसा एक चमत्कारिक फोटो तयार झाला होता. 'ट्रिक फोटोग्राफी'चा तो नावीन्यपूर्ण नमुना पाहून माझा चेहेरा मात्र माझ्याच अद्भुतरम्य कॅमेऱ्यानं फोटो काढण्यासारखा झाला !

ऑक्टोबर महिना संपत आला. 'एस्. आय्. टी.'च्या परिसरांतली सारी हिरवीगार सृष्टि निष्पर्ण झाली. वारा आला कीं आपल्या भोंवतालचा सारा पालापाचोळा आपल्याबरोबर घेऊन गरगरत जाई. बर्फ पडायला सुरुवात बरोबर एक नोव्हेंबरलाच झाली. ज्या दिवसाची मी फार उत्सुकतेनं वाट पहात होतों तो दिवस अखेर एक नोव्हेंबरला उजाडला ! दुपारची वेळ होती. दुपारचं 'एक्स्पॉझिटरी सेशन' घेऊन स्कूलमधून मी नुकताच परत आलों होतों. येतांयेतां मेसमधून पेपर ग्लासमधें आणलेला चहा घेत एकीकडे मी पत्र लिहीत बसलों होतों. एवढ्यांत सौ. विजया



**हिमफुलांचा वर्षाव चालू असतांनाचें एक दृश्य : हा शुभ्रधवल वर्षाव जागोजाग झेलून धरणारी एक वास्तु नि तिच्याभोंवतालची सृष्टि**

जोशी घाईघाईनं माझ्या खोलींत आल्या आणि म्हणाल्या, " बाहेर पाहिलंत का ? बर्फ पडायला सुरुवात झालीय् ! कधींची तुम्ही वाट पहात होतांत ना ? घ्या ! एकदाची झाली सुरुवात बर्फ पडायला ! "

खिडकीचा पडदा बाजूला सारून मीं बाहेर पाहिलं. खरंच बर्फ पडत होता ! जें स्वप्न पहाण्यासाठीं आजपर्यंत माझं मन आसुसलं होतं तें अखेर माझ्या दृष्टीसमोर साक्षात् अवतीर्ण झालं होतं ! हजारों, लाखों जुईच्या नाजुक फुलांच्या कोमल पाकळ्या आकाशांतून हलकेच तरंगत भूमीवर उतराव्यात तसं तें दृश्य दिसत होतं. कांहीं क्षण तें स्वप्न पहात मी खिडकीशीं तसाच निश्चल उभा राहिलों. डोळ्यांमधें तो अद्भुत अनुभव कांठोकांठ भरून घेतला. अन् मग दुसऱ्याच क्षणाला मी बाहेर धांवलों.


आमच्या ' इंडिया हाउस 'चा सारा आसमत पांढऱ्याशुभ्र हिमफुलांनीं फुलून आला होता. जिकडे पहावं तिकडे शुभ्रता ! आणि ती नुसतीच शुभ्रता नव्हती. त्या शुभ्रतेंत निसर्गानं कसलीतरी गूढ नाजुक कलात्मकता मिसळली होती. सृष्टीचा सारा चेहेराच बदलून गेला होता. अधिक सुंदर झाला होता. झाडांच्या फांद्यांवर, इमारतींच्या छपरांवर, रस्त्यांवर, चिमुकल्या पाउलवाटांवर — सगळीकडे बर्फच बर्फ ! कसलाहि आवाज येत नव्हता. सारी सृष्टि निःस्तब्ध झाली होती. कांहीं वेळ मी तसाच त्या हिमवृष्टींत उभा राहिलों. माझ्या हातांवर, खांद्यांवर, मस्तकावर हिम-फुलांचा वर्षाव होत होता. कितीतरी वेळ त्या नाजुक हिमफुलांचा सुखद स्पर्श मीं सर्वांगानं अनुभवला. भानावर आलों तेव्हां नकळत पुढं झालेल्या माझ्या हातांच्या ओंजळींत सांठलेल्या हिमाचं पाणी व्हायला लागलं होतं......

□

# अमेरिका अंधारांत

एक दिवस माझं काम नुकतंच संपलं होतं. परत येतांना आमच्या 'मेस्'मधून गरम चहाचा कागदी पेला घेतला अन् माझ्या खोलीवर आलों. रात्रीच्या जेवणाला – खरं म्हणजे संध्याकाळच्या जेवणाला – अजून सुमारं पाऊण तास अवकाश होता. थोडा वेळ आराम करून एकदम उठलों. विचार केला, बऱ्याच दिवसांचीं पत्रं सांचलीं आहेत. एकदां पत्रलेखनाचा मोठा कार्यक्रम करून टाकूं! म्हणून उत्साहानं टेबलाशीं बसलों. लेटरहेड पुढं ओढलं अन् पहिल्याच पत्रावर तारीख लिहिली:– ९ नोव्हेंबर १९६५.

इतक्यांत काय झालं कुणास ठाऊक! माझ्या खोलींतल्या दिव्यानं दोनचारदां डोळे मिचकावले आणि खोलींतला प्रकाश एकाएकीं अगदीं कमी झाला. मग पुन्हा क्षणभरच तो जरासा वाढला. मी पुण्याचा रहिवासी असल्यानं दिव्याचे हे खेळ मला अपरिचित नव्हते. त्यामुळं अमेरिकेंतल्या गोऱ्या दिव्याची ही चेष्टामस्करी थोडा वेळ मीं कौतुकानं पाहिली. नंतर डोळे ताणून मीं हातांतल्या घड्याळाकडं पाहिलं. पांच वाजून सत्तावीस मिनिटं झालीं होतीं. आतां किती वेळ असं अंधुक प्रकाशांत बसावं लागणार, असा विचार माझ्या मनांत येतो न येतो तोंच एकाएकीं दिवे गेले आणि खोलींत संपूर्ण अंधार झाला. खिडकींतून बाहेर पाहिलं. पण कांहींच दिसेना, सगळीकडे नुसता अंधारच अंधार! 'म्हणजे आपल्या सगळ्या वसाहतीमधलेच दिवे गेलेले दिसतात!'– मीं मनाशीं म्हटलं.




**वीजेअभावीं अंधःकारांत झांकळला गेलेला मॅनहॅटनचा एक भाग.**

—त्या वेळीं अमेरिकेंतली हवा फार सुंदर होती. हिवाळ्याला नुकतीच सुरुवात झालेली होती. त्यामुळं थंडी होती तरी तिचा चावरा गारठा अजून अंगाला झोंबत नव्हता. मी उठून खिडकीशीं गेलों अन् पडदा बाजूला केला. त्याबरोबर थंडगार वाऱ्याची एक झुळूक आंत आली अन् माझं अंग शहारलं. मग मात्र तशा काळोखांत खोलींत बसवेना. मधें एक खोली टाकून पलिकडच्या खोलींत माझे तेथील सहकारी डॉ. नरेश कवडी होते. खोलीचं दार नुसतं ओढून घेतलं अन् कवडींच्याकडे गेलों. कुठंतरी सांपडलेली एक मेणबत्ती पेटवून तिच्या थरथरत्या प्रकाशांत ते कांहीतरी वाचीत पडले होते. जरा वेळ त्यांच्याकडे बसलों. पण आमच्या गप्पांना नेहेमीसारखा रंग चढेना. उगीचच भूक लागल्यासारखं वाटायला लागलं. आमच्या दोघांच्याहि खोल्यांत त्या दिवशीं खाण्यापिण्याचा खडखडाट होता. आमच्याबरोबर काम करणारा स्त्रीवर्ग या बाबतींत नेहेमींच संपन्न असायचा. साहजिकच आठवण झाली सौ. विजया जोशीची ! पलिकडेच त्यांची खोली होती. मी आणि कवडी त्यांच्याकडे गेलों. आम्हीं अगदीं योग्य वेळीं 'एन्ट्री' घेतली असा अनुभव आला. कारण नाना प्रकारच्या बिस्किटांचे, वेफर्सचे, खाऱ्या दाण्यांचे डबे नुकतेच उघडून त्याच्या भोंवताली तिघी-जणींचं भगिनीमंडळ बसलेलं होतं. सौ. विजया जोशी, त्यांच्या रूम-पार्टनर सौ. सुलोचना जोशी आणि तळमजल्यावरच्या सौ. शालिनी जेंट्ल्. आतां मात्र गप्पांची मैफल छान जमली, अन् आमच्यापुढचे डबे वेगानं रिकामे व्हायला लागले ! .....

बराच वेळ झाला. दिवे जाण्याच्या सर्व प्रकारच्या आठवणी बोलून झाल्या. पण दिवे येण्याचं चिन्ह दिसेना. म्हणून मग आम्हीं कुणातरी ट्रॅन्झिस्टरवाल्याला विचारलं. तेव्हां समजलं कीं आमची 'सँडानोना' ही वसाहतच काय, पण सबंध



**वीज आल्यानंतर लगेच मॅनहॅटन पुन्हा पूर्ववत् झगमगूं लागलें.**

व्हर्‌माँट स्टेट अंधारांत आहे. फक्त व्हर्‌माँटच नव्हे, तर मॅसॅच्युसेट्स्, ऱ्होड आयलंड, कनेक्टीकट, न्यू हॅम्पशायर, न्यूयॉर्क, न्यू जर्सी, पेन्सिल्व्हानिया अशीं अमेरिकेंतलीं एकूण आठ राज्यं आणि कॅनडांतला कांहीं भागसुद्धां अंधारांत आहे! म्हणजे असं एकाएकी झालं तरी काय? न्यूयॉर्कसुद्धां अंधारांत? जगांतली सर्वांत प्रसिद्ध प्रकाश-नगरी न्यूयॉर्क – तीसुद्धां अंधारांत बुडाली?.....माझ्या डोळयांपुढं '६४ सालीं मी पाहिलेल्या न्यूयॉर्क शहराची प्रतिमा उभी राहिली. तें माझं न्यूयॉर्कचं पहिलं दर्शन होतं. रात्रीच्या वेळीं निरनिराळ्या रंगीबेरंगी दिव्यांच्या प्रकाशझोतांमुळं विश्व-प्रसिद्ध अक्षय्य तरुणनगरी न्यूयॉर्क प्रकाशाच्या समुद्रांत पार बुडून गेलेली दिसत होती. त्याच न्यूयॉर्कमध्यें आतां सर्वत्र फक्त अंधार? ....मला कल्पनाच करतां येईना! पण न्यूयॉर्कच काय, अमेरिकेच्या ईशान्य भागांतल्या बर्लिंग्टन, बॉस्टन, रॉचेस्टर, प्रॉव्हिडन्स इत्यादि अनेक शहरांना आणि शेंकडों लहानमोठया गांवांना हा तडाखा बसला होता. एकूण ८०००० चौरस मैल विभागांत सगळीकडे अंधारच अंधार पसरला होता. सुमारं तीन कोटींपेक्षां अधिक लोक पांच तासांपासून बारा तासांपर्यंत अंधारांत चांचपडत होते, हा सारा प्रकार घडला तरी कसा, याचा विचार करीत होते. पण कुणालाच कांहीं सुचत नव्हतं. उत्तर सांपडत नव्हतं.

न्यू हॅम्पशायरमधला जे.हाउन्सेल नांवाचा अकरा वर्षांचा एक छोटा मुलगासुद्धा असाच गोंधळून गेला होता. त्यालाहि कांहीं समजेना. संध्याकाळचं खेळणं झाल्यावर नेहेमींप्रमाणं रमतगमत हातांतली काठी आडवीतिडवी फिरवीत तो घरीं येत होता. वाटेतल्या एका टेलिफोनच्या खांबावर त्यानं सहज गमतीनं काठी मारली. – आणि काय चमत्कार! त्याच क्षणी दिवे गेले! सगळीकडचेच! मग मात्र पोर घाबरलं.

धूम ठोकून घरीं आलं. आणि आईपुढं आपल्या हातून घडलेल्या अपराधाचा त्यानं नम्रपणं कबुलीजबाब दिला. आपला मुलगा ‘ पराक्रमी ’ आहे ह्याची आईला खात्री होती. तरीसुद्धां त्याच्या ‘ ह्या ’ पराक्रमावर तिचा विश्वास बसेना ! ती साशंक नजरेनं त्याच्याकडे पाहूं लागली. हें घडणं कसं शक्य आहे ?.....पण घडलं होतं हें सत्य होतं ! विलक्षण योगायोग ! दुसरं काय !

आदली रात्र पौर्णिमेची होती. आणि दुसऱ्या दिवशीं हा असा अंधार ! संध्याकाळीं ५ वाजून १३ मिनिटांनीं चंद्रोदय झाला होता. आपापलीं कामं आटोपून लोक नेहेमींच्या संवयीनं धांवतपळत घरीं जाण्याच्या गडबडींत होते. गर्दीच्या वेळीं रस्त्यावर मोटारगाड्यांच्या रांगेंत अडकून पडायला नको म्हणून स्वतःच्या मोटरकार्स असूनहि बरेचसे लोक भूमिगत रेल्वेनं (‘ सब्–वे’नं ) प्रवास करीत होते. रहदारीचे पोलिस नेहेमींप्रमाणं रस्त्यावरच्या गर्दीचं नियंत्रण करीत होते. बरींचशीं दुकानं संध्याकाळीं साडेपांचलाच बंद होत असल्यानं खरेदीला बाहेर पडलेल्या बायकांची धांदल उडाली होती. दुकानांच्या पाट्यांवरचे आणि रस्त्यावरील प्रचंड जाहिरातींवरचे लाखों रंगीबेरंगी दिवे केव्हांच झगमगायला लागले होते. कांहीं लोक चित्रपटगृहांत चित्रपट पहाण्यांत रंगून गेले होते. कांहींजण घरीं पोंचतांच आरामांत पडून सावकाश हातांतल्या मद्याचे घोट घेत शांतपणं टेलिव्हिजन पहात होते. कांहीं कर्तव्यदक्ष गृहिणी संध्याकाळच्या जेवणाची पूर्वतयारी करण्यांत गर्क झाल्या होत्या. दिवसभर सवड न झाल्यामुळं ‘ सब्–वे ’च्या परतीच्या प्रवासांत कांहींजण वर्तमानपत्रावर धांवती नजर टाकीत होते.


इतक्यांत अगदीं अनपेक्षितपणं गाड्यांमधील दिवे गेले, आणि भुयारांतल्या दाट काळोखांत वेगानं धांवणाऱ्या गाड्या एकाएकीं जागच्या जागीं थांबल्या. दुकानांतले, चित्रपटगृहांतले, उपाहारगृहांतले, ऑफिसांतले, घरांतले–सगळीकडचे दिवे गेले ! ‘ इलेव्हेटर्स ’मधून वेगानं तीसतीस, चाळीसचाळीस मजले वरती जाणारीं माणसं एकाएकीं त्यांतच अडकून पडलीं. ‘ टीव्ही ’वरचीं चित्रं प्रथम अस्पष्ट झालीं, नंतर थरथरलीं आणि मग एकाएकीं अंधारांत लुप्त झालीं. मोठ्या दिमाखानं आपल्या रंगीबेरंगी डोळ्यांची क्षणाक्षणाला उघडझांप करणाऱ्या प्रचंड जाहिरातीनीं अंधार होतांच भीतीनं आपले डोळे घट्ट मिटून घेतले. न्यूयॉर्कच्या एका हमरस्त्यावर सिगरेटचे झुरके घेऊन तोंडांतून धूर सोडणाऱ्या ‘ कॅमल ’ सिगरेटच्या जाहिरातींतल्या देखण्या माणसाच्या तोंडांतला धूर तोंडांतच राहिला ! कारखान्यांतलीं धडधडणारीं प्रचंड यंत्रं एकाएकी गप्प झालीं आणि घरगुती विजेची सारीं उपकरणंहि एका क्षणांत बंद पडलीं.

असं एकाएकी काय घडलं हें कुणालाच समजेना ! कांहींच्या मनांत शंका आली: व्हिएतनामयुद्धविरोधी निदर्शकांनीं कांहीं घातपात तर केला नाहीं ना ? कांहींना

वाटलं, बहुधा मंगळावरच्या लोकांनीं अमेरिकेवर स्वारी केली असावी ! कांहीं लोकांच्या मनांत भीति चमकून गेली. रशियाचं एखादं दूरगामी अण्वस्त्र चुकून उडालं कीं काय ? भुयारी रेल्वेंत अडकून पडलेल्या एका माणसाची विनोदबुद्धि अजूनहि शाबूत होती. तो गमतीनं म्हणाला, “ बरं झालं ह्याच वेळीं कम्युनिस्टांनीं हल्ला केला ! आतां अशा अंधारांत आपण कांहीं त्यांना खात्रीनं सांपडत नाहीं ! काय वाटेल तो गोंधळ घाला वरती ! ”

सर्वांत जास्त आणीबाणीची परिस्थिति विमानतळावर होती. ‘ केनेडी इंटर-नॅशनल ’ आणि ‘ ल–गार्दिआ ’ हे न्यूयॉर्कचे दोन जगप्रसिद्ध विमानतळ अंधारांत अडकलेल्या हजारों प्रवाशांच्या गर्दीनं गजबजून गेले होते. दिवे जातांच दोन्ही विमान-तळांवरच्या सर्व विमानांच्या ‘ फ्लाइट्स् ’ रद्द करण्यांत आल्या. विमानतळावर उतरण्यासाठी आकाशांत घिरट्या घालणारी सुमारं ५०० विमानं त्या रात्रीं परस्पर दुसरीकडे पाठवण्यांत आलीं. ती चांदणी रात्र नसती आणि आदल्या रात्रीसारखा वादळ–वारा–पाऊस असता तर फार मोठमोठ्या दुर्घटना तिथं घडल्या असत्या !

मॅनहॅटनमधील ‘ माउंट सिनाइ हॉस्पिटल’मधें मिसेस् मार्कोना या पस्तीस वर्षं वयाच्या बाईनं दोन जुळ्या मुलींना जन्म दिला. एकीचा जन्म दिवे जाण्यापूर्वी झगझगीत प्रकाशांत झाला. आणि दुसरीचा जन्म मात्र अंधारांत फ्लॅश्लाइटच्या उजेडांत झाला.



**हा कुणी चोर–दरोडेखोर नव्हे ! ‘ एम्पायर स्टेट ’ मधल्या इलेव्हेटर-मधें अडकलेला हा इसम भिंतींतल्या भगदाडांतून बाहेर येत आहे.**

टोरोंटोमधें सुमारं २०० मुलं वर्फावर स्केटिंग करीत होतीं. दिवे जातांच उद्यान खात्याचा एक ट्रक तिथं आणला गेला. आणि त्याच्या दिव्यांच्या उजेडांत स्केटिंग पुढं चालू ठेवण्यांत आलं.

मॅसाच्युसेट्स्मधील वॉलपोलच्या 'स्टेट प्रिझन'मधें दिवे जातांच कैद्यांनीं बाहेर पडण्यासाठीं दंगा सुरू केला आणि सुमारं दोन तास टेबल, खुर्च्या वगैरे वस्तूंची फेंकाफेक करून खूप मोडतोड केली. या दंग्यांत एकूण ७५००० डॉलर्सचं नुकसान झालं. दंगा आटोक्यांत आणण्यासाठी पोलिसांना अश्रुधुराचा वापर करावा लागला.

मॅसाच्युसेट्स्मधेंच इतरत्र अंधारांत उंचीवरून खालीं पडल्यामुळं आणि भीतीनं हृदयविकाराचा झटका आल्यामुळं कांहीं लोक मरण पावले. न्यूयॉर्कच्या 'हॉटेल विडसर 'मधें सुमारं ५२ वर्षांचा व्हेंज वर्नेट नांवाचा उतारू हॉटेलच्या सोळाव्या मजल्यावर अंधारांत बहुधा जिना शोधीत फिरत होता. सहा दिवसांनंतर हॉटेलच्या एका नोकराला 'इलेव्हेटर'च्या खोलीच्या तळाशीं वर्नेटचं प्रेत आढळलं. त्याच्या हातांत जवळजवळ संपूर्ण जळालेली मेणबत्ती तशीच होती!

जगांतली सर्वात उंच एकशेदोन–मजली इमारत 'एम्पायर स्टेट बिल्डिंग', आणि तिच्यासारख्याच प्रचंड उंचीच्या दोन इमारती –R. C. A. ची इमारत व 'पॅनॅम'ची इमारत यांच्या 'इलेव्हेटर्स'मधें अडकून पडलेल्या लोकांची सुटका करून त्यांना बाहेर काढण्यासाठीं भिंती फोडाव्या लागल्या. या तीन इमारतींतील अनेक 'इलेव्हेटर्स 'मधें शंभरपेक्षां अधिक लोक अडकून पडले होते. एकटया 'एम्पायर स्टेट ' इमारतींतल्या तेरा 'इलेव्हेटर्स'मधेंच ९६ लोक अडकले होते! बऱ्याचशा इमारतींत विद्युत्प्रवाह थांबल्यामुळं 'इलेव्हेटर' बंद पडतांच तो आपोआप खालीं घसरून खालच्या मजल्याच्या दाराजवळ यावा अशी स्वयंचलित व्यवस्था केलेली असते. लिफ्ट खालीं येतांच त्या मजल्यावरचं दार हातानं उघडून वाहेर पडतां येतं. या व्यवस्थे-मुळं शेंकडों लोक सहज सुखरूप बाहेर पडूं शकले. पण अशी योजना सर्वच ठिकाणीं नसल्यामुळं कांहीं लोकांना सात तास आपल्या सुटकेची वाट पहात 'इलेव्हेटर'मधें अडकून पडावं लागलं. सुरुवातीला एकमेकांना पूर्ण अनोळखी असणाऱ्या अशा 'बंदिवानांनी' अखेर कंटाळून तिथल्या तिथं 'ब्लॅकआउट क्लब' स्थापन केला!

'इलेव्हेटर्स 'मधें अडकून पडलेल्या लोकांपैकीं कुणाकडे ट्रॅन्झिस्टर असला तर त्यांना आपला संदेश मिळेल, या आशेन 'ओटिस इलेव्हेटर कंपनी'नं एक संदेश रेडिओवरून प्रसारित केला. संदेश होता . 'Don't try to get out.' अशा गोंधळाच्या परिस्थितींतहि लोकांच्या सुरक्षिततेची किती काळजी घेतली गेली, याचं हें एक लहानसं उदाहरण आहे!

आगगाड्यांत अडकून पडलेले लोक संख्येनं बरेच असल्यामुळं त्यांना या प्रका-राची भीति मात्र वाटली नाहीं. उलट एरव्हीं अनोळखी माणसांशीं कधींहि न बोलणाऱ्या

स्त्रियासुद्धां चांगल्या गप्पा मारायला लागल्या. कांहीं भुकेलेल्या प्रवाशांनीं निरनिराळ्या चविष्ट खाद्यपदार्थांच्या रसाळ आठवणी काढायला सुरुवात केली. ज्यांच्याजवळ खिशामधें चुकून राहिलेलीं चॉकलेट्स्, शेंगदाणे, च्युइंग गम् इत्यादि किरकोळ पदार्थ सांपडले ते त्यांनीं त्यांना देऊन त्यांचं सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. कांहींनीं चंद्रप्रकाशाच्या अंधुक उजेडांत वृत्तपत्रं, पुस्तकं वाचायला सुरुवात केली. कांहीं लोकांनीं प्राप्त परिस्थितीचा विसर पडावा म्हणून हलक्या आवाजांत समूह-गाणीं म्हणायला सुरुवात केली. कानाशीं सतत ट्रॅन्झिस्टर लावून बसलेल्य एका इसमाचा इतर लोक हेवा करूं लागले. अशा अडचणींत अंधारांत नवख्या भागांतून जाण्यापेक्षां कांही लोकांनीं गाडींतच झोंपणं पसंत केलं. भुयारी रेल्वेंत अडकलेल्या लोकांना टॉर्चच्या प्रकाशांत रस्ता दाखवून पोलिसांनी त्यांची सुटका केली. अंधारांत आपण कुठं जातों आहोंत याचा कुणालाच पत्ता नव्हता. इथं बोगद्यांत जमिनीखालीं अडकून पडण्यापेक्षां डोळे मिटून मुकाट्यानं पुढच्या माणसाच्या मागोमाग जावं, एवढाच विचार बहुतेकांनी केला. 'ग्रँड सेंट्रल' आणि 'व्हरनॉन्–जॅक्सन' या दोन स्टेशनांच्या मधें बरोबर पूर्व–नदीच्या खालीं IRT 'सब्–वे'ची एक भुयारी गाडी अडकून पडली होती. दोन–अडीच तासांनंतर पोलिसानीं तिच्यांतल्या उतारूंना सुमारं २००० यार्ड अंतरावर असलेल्या 'क्वीन्स' स्टेशनपर्यंत चालत नेऊन त्यांची सुटका केली. सगळीकडचे मिळून एकूण आठ लाख लोक त्या रात्रीं जमिनीखालीं अडकून पडले होते. ज्या लोकांनीं आपल्या सुरक्षिततेच्या काळजीमुळं भुयारी रेल्वेंतून बाहेर पडायचं नाकारलं त्यांच्यासाठीं वाहतूकखात्याच्या अधिकाऱ्यांनी मध्यरात्रीं कॉफी आणि कांही खाद्यपदार्थ पाठवण्याची व्यवस्था केली. अशा परिस्थितीतसुद्धां तिथं एकहि अपघात झाला नाहीं हें विशेष.



**घरीं जायची ओढ लागलेल्या लोकांनी असें साहस पत्करून (विनातिकिटाचेंसुद्धां !) बसच्या बंपरवर उभें राहून प्रसंग साजरा केला. यांत कांही महिलाहि होत्या.**

संध्याकाळ संपायच्या सुमाराला वाहतूकविभागाच्या एकूण ४००० बसेस्-पैकीं ३५०० बसेस् न्यूयॉर्कच्या रस्त्यांवरून धांवत होत्या. तरीसुद्धां बस्–स्टॉप्स्वर शेंकडों माणसं बस्‌ची वाट पहात ताटकळत उभीं होतीं. एरव्हीं बसेस्ना गर्दी अशी फारशी कधीं नसायचीच. पण त्या रात्रीं मिळेल त्या बस्नं वेगानं घरीं जाण्यासाठीं कांहीं स्त्रीपुरुष बस्च्या मागच्या बाजूला धरूनसुद्धां लोंबकळत गेले.

'ब्रॉन्क्स' आणि 'सेंट्रल पार्क' प्राणिसंग्रहालयांत एक नवीनच समस्या निर्माण झाली. संग्रहालयाच्या अधिकाऱ्यांनीं निरुपद्रवी प्राण्यांना ब्लँकेटांत गुंडाळलं. पण योग्य उष्णतेच्या अभावीं कांहीं सरपटणाऱ्या भयानक प्राण्यांना जिवंत कसं ठेवायचं, हा त्यांना प्रश्न पडला. अजगराच्या भोंवतीं ब्लँकेट कोण गुंडाळणार? शेवटीं प्रोपेन–गॅस्–हीटर्सच्या साहाय्यानं साप, अजगर, सुसरी वगैरेंच्या वसति-स्थानाचं योग्य तें उष्णतामान राखण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

विजेच्या अभावीं टेलिव्हिजन–केंद्रं बंद पडलीं तरी आठ घटकेच्या ह्या अंधार-नगरींत रेडिओस्टेशन्सनीं फार मोलाची कामगिरी बजावली. बऱ्याच रेडिओस्टेशन्सची स्वतंत्र विद्युत्–निर्मिति–यंत्रणा होती. अमेरिकेंतल्या नागरिकांची जागरूकता आणि समाजावर संकट आलं असतांना मदतीसाठीं धांवून जाण्याची त्यांची वृत्तीहि या प्रसंगीं दिसून आली. आपापल्या विभागांतल्या मिळतील तेवढ्या 'ब्लॅकआउट' संबंधीच्या बातम्या गोळा करून कांहींजणांनीं स्वयंस्फूर्तीनं त्या रेडिओला कळवल्या. 'न्यूजर्सी'-मधील एक जोडपं स्वत:च्या मोटरकारनं न्यूयॉर्कला आलं, आणि चोवीस मजल्यांच्या पायऱ्या चढून आपल्याबरोबर आणलेलं सात गॅलन पेट्रोल जनरेटर चालविण्यासाठीं त्यांनीं W. O. R. रेडिओस्टेशनला दिलं. कारण विद्युत्प्रवाह बंद पडल्यामुळं न्यूयॉर्कचे पेट्रोल–पंप बंद पडले होते. लोकांमधें गोंधळ व घबराट पसरूं नये म्हणून हातीं आलेली प्रत्येक ताजी बातमी क्षणोक्षणीं रेडिओवरून प्रसारित होत होती.

अंधाराचा फायदा उठवण्यासाठीं कांहीं लहानसहान दुकानदारांनीं मेणबत्त्या व टॉर्चेस् जास्त दरानं विकल्याचीं कांहीं उदाहरणं घडलीं, तरी मोठमोठ्या दुकान-दाराच्या मनाचा मोठेपणाहि फार मोठ्या प्रमाणांत दिसून आला. अंधारांत अनेक अडचणींतून घरीं जाण्यापेक्षां मॅनहॅटनमधल्या डिपार्टमेंट-स्टोअर्सचा आश्रय घेणंच शेंकडों लोकांनीं पसंत केलं. 'हेराल्ड स्क्वेअर'मधल्या 'मेसीज्' डिपार्टमेंट स्टोअरमधें आश्रय घेणाऱ्या सुमारं चारपांच हजार लोकांना चालकांनीं त्यांच्या कॅफेटेरियांत रात्रीचं जेवण दिलं, आणि नंतर गृहसजावट–विभागांत उरलेली रात्र काढण्याची त्यांना विनंती केली. फिफ्थ अव्हेन्यूमधील 'अल्टमन्स्'च्या दुकानांत पांचशें लोकांना आश्रय मिळाला, आणि 'अल्टमन्स्'च्या 'फॅन्सी फूड्स्' विभागांतील नाना प्रकारचे खाद्यपदार्थ त्यांना खायला मिळाले. 'द फोर सीझन्स्' हे न्यूयॉर्कमधील एक अत्यंत महागडं हॉटेल! ह्या हॉटेलनं भुकेलेल्या सर्व वाटसरूंना गरमगरम 'सूप्' मोफत



अंधार झाला तरी नटयांचा मेकअप् थांबून कसें चालेल ?

वाटलं. मोठमोठ्या डिपार्टमेंट स्टोअरमधें आश्रय घेतलेल्यांची अगत्यानं व्यवस्था ठेवतांना आपला भारी किंमतीचा विक्रीचा माल खराब होईल याचीहि चिंता चालकांनीं केली नाहीं ! दुसऱ्या दिवशीं एका स्त्रीनं आनंदानं सांगितलं कीं, 'काल रात्रीं मी ८०० डॉलर्स किंमतीच्या बिछान्यावर झोंपले होतें ! ' 'ब्लूमिंगडेल 'मधें झोंपलेल्या लोकांना दुसऱ्या दिवशीं सकाळीं 'ब्रेकफास्ट'हि देण्यांत आला.

विमानतळावर अडकून पडलेल्या शेंकडों उतारूंची चोख व्यवस्था ठेवण्याची कामगिरी 'अमेरिकन एअरलाईन्स 'नं मोठ्या अगत्यानं पार पाडली. दिवे जातांच 'केनेडी इंटरनॅशनल एअरपोर्ट 'वरील सर्व विमानांचीं उड्डाणं रद्द झालीं. त्याबरोबर 'अमेरिकन एअरलाइन्स'नं आपलीं सर्व विमानं बाहेर काढलीं. प्रत्येक विमानाची विद्युत्निर्मितीची यंत्रणा स्वतंत्रच होती. त्यामुळं कांहीं प्रश्न नव्हता. सुमारं ८०० लोकांना अगत्यानं आपल्या विमानांत बसवून 'अमेरिकन एअरलाइन्सनं' त्यांना मोफत जेवण दिलं, आणि शिवाय करमणुकीसाठीं विमानांतच सर्वांना चित्रपटहि दाखवले.

'युनायटेट नेशन्स 'ची बिल्डिंग चांदण्या रात्रीं फार सुंदर दिसत होती. ' युनो'चे सेक्रेटरी जनरल उ थांट दिवे गेले त्या वेळीं आपल्या ऑफिसमधें काम करीत बसले होते. त्यांचं ऑफिस होतं बिल्डिंगच्या अडतिसाव्या मजल्यावर ! उ थांट आणि त्यांचे

अंडर सेक्रेटरी सुमारं पांच तास ऑफिसमधेंच गप्पा मारीत आणि रेडिओवरील वातम्या ऐकत बसले. मग मात्र आपल्या कुटुंबियांना भेटायला जाण्यासाठीं उ थांट अडतीस मजल्यांच्या जिन्यांच्या पायऱ्या उतरून खालीं आले. खालीं यायला त्यांना पस्तीस मिनिटं लागलीं. 'युनो'त काम करणाऱ्या सुमारं ४०० कर्मचाऱ्यांनीं मात्र तिथंच रात्र काढण्याचं ठरवलं. खुर्च्या, बांकं, सोफा-सेट्स् वगैरे मिळेल त्या ठिकाणीं त्यांनीं हातपाय ताणून दिले.

दिवे गेले तेव्हां 'युनो'च्या जनरल असेंब्लीची मीटिंग जोरांत चालू होती. सोव्हिएट रशियाचे प्रतिनिधी श्री. जॉर्जी अर्कादिव् जोरजोरांत भाषण करीत होते "I fear that tensions are about to be revived......" आणि या वाक्यालाच दिवे गेले !

असा आणीबाणीचा प्रसंग आलाच तर त्याला तोंड देण्याचं शिक्षणहि 'युनो'च्या निवडक नोकरांना दिलेलं असतं. प्रसंग येतांच 'कॅप्टन' आणि 'फ्लोअरवॉर्डन' म्हणून त्यांच्यापैकीं प्रत्येकजण आपापल्या नेमलेल्या जागीं झटकन् जातात आणि इंग्रजी व फ्रेंच भाषेंतून मार्गदर्शक सूचना देऊन 'युनो'तील ३००० लोकांना सुरक्षित बाहेर नेतात. याहि वेळीं दिवे जातांच इमारतीच्या १८ 'इलेव्हेटर्स'मधें अडकून पडलेल्या अनेक लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यांत आलं. आणि हें काम चालू असतांना कुठंहि गोंधळ माजला नाहीं ! 'युनो'च्या कॅफेटरियापुढं सँडविचेस मिळवण्यासाठीं लांबलचक 'क्यू' लागला होता. थोड्याच वेळांत, एरव्हीं एकमेकांना पाण्यांत पहाणाऱ्या राष्ट्रांचे प्रतिनिधी एकमेकांची आपलेपणानं विचारपूस करून सँडविचेस्ची आणि मेणबत्त्यांची देवाणघेवाण करतांना सर्वत्र दिसूं लागले. आंतरराष्ट्रीय सहजीवनाची ती रंगीत – नव्हे, अंधारी तालीम पाहून उ थांट यांच्या डोळ्यांचं पारणं फिटलं असेल ! ते परस्पर समजुतदारपणाचं विलोभनीय दृश्य पाहून, 'याचसाठीं केला होता अट्टाहास........' असं उ थांट स्वतःशींच पुटपुटल्यावांचून राहिले नसतील !

न्यूयॉर्कचे गव्हर्नर रॉकफेलर दिवे गेले त्या वेळीं केनेडी विमानतळावरून आपल्या घरीं चालले होते.अॅटलांटाला असलेली एक परिषद आटोपून ते नुकतेच न्यूयॉर्कला आलेले होते. पंधरा मजल्यांचे जिने चढून घरी जाऊन त्यांनीं मेणबत्तीच्या प्रकाशांत घाईघाईनं जेवण उरकलं आणि बरोबर साडेसात वाजतां आपल्या पत्नीसह ते आपल्या ऑफिसांत आले. 'नॅशनल गार्ड्स्'ना आज्ञा देणं, रेडिओसाठीं निवेदनं तयार करणं आणि इतर तांतडीचीं महत्त्वाचीं कामं करणं यांत ते इतके गुरफटून गेले कीं त्या रात्रीं घरीं जायला त्यांना मध्यरात्र झाली.

अमेरिकेंत अंधार पसरतांच अमेरिकेच्या संरक्षणखात्याची फार धांदल उडाली. संरक्षणव्यवस्था संपूर्ण सुरक्षित आहे कीं नाहीं याची तपासणी करण्याची आज्ञा

प्रेसिडेंट जॉन्सन यांच्याकडून येण्याच्या आंतच 'पेंटॅगॉन'चीं चक्रं भराभर फिरलीं. अण्वस्त्रांच्या हल्ल्याची पूर्वसूचना देणारं 'रडार'चं जाळं 'ब्लॅकआउट'मधेंहि सुरक्षित असल्याचं पाहून 'पेंटॅगॉन'मधें सर्वांना हायसं वाटलं! प्रेसिडेंट जॉन्सन त्या वेळीं ऑपरेशननंतर विश्रांति घेण्यासाठीं टेक्ससमधील त्यांच्या गांवीं गेले होते. संध्याकाळीं सहा वाजतां त्यांना ही वार्ता कळतांच, उद्भवलेल्या परिस्थितीचीं सर्व सूत्रं त्यांनीं ताबडतोब हातांत घेतलीं. मधेंच एकदां त्यांनीं घाईघाईनं घेतलेल्या जेवणाचा वेळ सोडला तर रात्रीं एक वाजेपर्यंत ते सतत टेबलाशीं फोनजवळ बसून होते. संध्याकाळीं सहा वाजल्यापासून अमेरिकेंत कुठं काय घडतंय् याची माहिती क्षणाक्षणाला वॉशिंग्टन-हून प्रेसिडेंट जॉन्सन यांच्याकडे पाठविण्यांत येत होती. मध्यरात्रीपूर्वींच त्यांनी 'FBI'ला या घटनेची कसून चौकशी करण्याचा तांतडीचा हुकूम दिला.

पण या अचानक अंधाराचा काळा पडदा 'FBI'लासुद्धां भेदतां आला नाहीं! पांच दिवस सर्वांनीं कसून तपास केला. पण या घटनेमागचं रहस्य उल-गडण्यांत कुणालाहि यश आलं नाहीं. पांच दिवसानंतर शोध लागला कीं, 'नायगरा'-पासून चार मैल उत्तरेकडे असलेल्या क्वीन्स्टन गांवांतील 'अॅडॅम बेक, स्टेशन नंबर टू' या विद्युत्गृहांत झालेल्या यांत्रिक बिघाडामुळं हा सारा अनर्थ ओढवला. पण तो यांत्रिक बिघाड तरी कसा झाला, कां झाला, याबद्दल मात्र निश्चितपणं कुणीच कांहीं सांगं शकलं नाहीं!

'हिमफुलांच्या देशांत' या ग्रंथाची छपाई चालू असतांनाच माझ्या वाचनांत एक ग्रंथ आला. त्यांतील 'उडत्या तबकड्या' या प्रकरणांत लेखकानें म्हटलें आहे : "फार पुरातन काळापासून परग्रहस्थ मधून मधून पृथ्वीस भेट देत असल्याचे उल्लेख सांपडतात.

....मंगळावर अशी परिस्थिति उत्पन्न झालेली दिसत आहे कीं त्यांचे हवा व पाणी आता बरेंच कमी झालें असून त्यासंबंधीं दुर्भिक्ष्य तीव्रतेनें जाणवूं लागलें आहे, व म्हणून त्यांनी समुद्रापासून मोठमोठे कालवे काढून ते सर्व ग्रहभर फिरविले आहेत. कांहीं शास्त्रज्ञांनीं हें विधान खोडण्याचा प्रयत्न केला होता. परंतु अगदी अलीकडेच त्यास दुजोरा मिळाला आहे. त्यामुळे तेथील बुद्धिमान व विज्ञानसंपन्न जीवांना साह-जिकच यापुढे जगावयाचें कसें व कोठे हा प्रश्न पडला असेल व ही महान् समस्या सोडविण्याकरितां सोयीच्या अशा एखाद्या परग्रहावर स्थलांतर करण्याची कल्पना त्यांच्या बुद्धीस सुचणें कांहीं अशक्य नाहीं. आपणापेक्षा विज्ञानांत ते अनेक पटींनी पुढे गेलेले असल्याने ती कल्पना प्रत्यक्ष कृतींत कशी आणतां येईल यासंबंधीं प्रयत्न करणेंसुद्धा कांहीं अशक्य नाही. त्यांना सर्वांत जवळचा व जीवसृष्टि टिकविण्यास अनुकूल असा ग्रह म्हणजे आपली पृथ्वीच होय.

....परग्रह किंवा ताऱ्यांपासून पृथ्वीस भेट देणारीं बहुतेक यानें मोठ्या

तबकडयांच्या आकाराचीं दिसतात. त्यांस 'उडत्या तबकडया' किंवा 'Flying saucers' म्हणतात. मात्र सरकार दप्तरी त्यांस 'Unidentified Flying Objects (U. F. O.) या नांवाने संबोधलें जातें. त्या अज्ञात प्रदेशांतून येतात, कांहीं वेळ दिसतात व परत अज्ञात प्रदेशांत निघून जातात.

...हीं यानें दिसलीं कीं, जवळपासचे सर्व वीजप्रवाह बंद पडतात. कांहीं कारण नसतां मोटारींचीं एंजिनें अथवा इतर यंत्रें काम करीनाशीं होतात. यांत्रिक बिघाड असा कांहीहि नसतो.

हें असें कां व्हावें याचें कारण शोधूनहि अद्याप कळलें नाही. ता. ९ नोव्हेंबर १९६५ रोजीं न्यूयॉर्कच्या प्रसिद्ध ब्लॅक-आऊटचें कारण अशाच प्रकारचीं यानें असावींत असें अनुमान करण्यांत येत आहे. कारण नंतर यंत्रसामुग्रींत कोणत्याहि प्रकारचा बिघाड सांपडला नाही. त्याच वेळीं अशीं कांहीं अज्ञात यानें दिसलीं होतीं, असें मात्र रेकॉर्डवर आहे."

('अज्ञाताचा शोध व बोध.' लेखक — आत्मानंद).

– या प्रकारावद्दल वृत्तपत्रांची प्रतिक्रिया फार जोरदार झाली. झाला हा प्रकार लाजिरवाणाच होता. याबद्दल बहुतेक सर्व वृत्तपत्रांचं एकमत होतं. जवळजवळ सर्व वृत्तपत्रांनीं 'ब्लॅकआउट'वर अग्रलेख लिहिले होते. 'न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यून'चा ११ नोव्हेंबरचा अग्रलेख होता : 'When the lights went out'. घटनेचा संपूर्ण आढावा घेऊन, अशा अनपेक्षित आणीबाणीच्या परिस्थितींतहि अमेरिकन नागरिकांनीं जी शिस्त आणि जें मनोधैर्य दाखवलं त्याची अखेर संपादकांनीं वाखाणणी केली होती. 'The Boston Globe' या वृत्तपत्रानं 'The Big Lesson' या शीर्षकाचा अग्रलेख १० नोव्हेंबरला पहिल्या पानावर छापला होता. या घटनेवद्दल वीज-कंपनीची कडक शब्दांत हजेरी घेऊन 'ग्लोब'नं शेवटी लिहिलं होतं, – 'And so the biggest lesson of all is that it CAN happen here, and that it must never happen again in peacetime.'

'The New York Times'नं आपल्या 'Alladdin's Lamp Blacks Out' या अग्रलेखांत म्हटलं होतं,– 'It is hard to comprehend why a single break at one point in an interconnected system compels a virtually complete suspension of service affecting nine states and two Canadian provinces.'

अशाच प्रकारची कडक टीका 'द वॉल स्ट्रीट जर्नल', 'द न्यूयॉर्क पोस्ट'' 'द बॉस्टन ट्रॅव्हलर' इत्यादि वृत्तपत्रांनीं केली होती.

ज्या विभागांत वीज गेली होती त्यांतील एकहि वर्तमानपत्र दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रसिद्ध झालं नाहीं. अपवाद होता फक्त 'न्यूयॉर्क टाइम्स'चा. 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या

संपादकांनीं आणि इतर कर्मचाऱ्यांनीं त्या रात्रीं अक्षरशः जिवाचं रान करून अविश्रांत मेहनत केली, 'द निवार्क न्यूज'च्या छापखान्यांतून आपला लहान अंक छापून घेतला आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं नेहेमींप्रमाणं प्रसिद्ध केला. 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या नेहेमीच्या प्रती आठ लाख, चाळीस हजार निघतात. त्या दिवशीं मात्र फक्त चार लाख ऐंशीं हजार प्रतीच वेळेवर निघूं शकल्या. ती सारी आवृत्ति न्यूयॉर्कमधेंच खपली. त्या दिवशीं बाहेरगांवीं अंक पाठवतां आला नाहीं एवढंच ! पण 'टाइम्स'–प्रकाशनाच्या अखंड परंपरेंत एक दिवसहि खंड पडूं दिला नाहीं, याचं केवढं श्रेय आणि मानसिक समाधान त्यांनी मिळवलं !

त्या अंधाऱ्या रात्रीं गुन्हेगारीला ऊत येईल अशी बहुतेकांना भीति वाटत होती. पण सुदैवानं ती खोटी ठरली. पोलिस-कमिशनर व्हिन्सेन्ट ब्रॉडरिक या घटनेवर भाष्य करतांना म्हणाले कीं, "खरोखर आश्चर्य आहे ! पण त्या रात्रीं घडलेल्या गुन्ह्यांची संख्या नेहेमींपेक्षा कितीतरी कमी होती !"

त्या दिवशीं वीज गेल्यामुळं झालेल्या नुकसानीचा आंकडा फार मोठा आहे ! 'न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यून'नं तर या नुकसानीचा तपशील देतांना शीर्षक दिलं होतं,– 'Northeast's 100 Million Dollars Night'! सर्वांत मोठं नुकसान झालं वाहतूक-खात्याचं ! २८५००० डॉलर्सचं ! व्यापारी टेलिव्हिजन कंपन्या ५००००० डॉलर्सच्या जाहिरातींच्या उत्पन्नाला मुकल्या. चित्रपट–नाट्यगृहांचं २८०००० डॉलर्सचं नुकसान झालं. एका कंपनीनं रिपोर्ट केला कीं, त्यांचं २००००० डॉलर्स किंमतीचं आइस्क्रीम वितळून गेलं ! नुकसान झालेल्या शेंकडों व्यक्तींपैकीं फारच थोड्याजणांना



**अंधारावर मात : महत्त्वाच्या शस्त्रक्रिया विजेऱ्यांच्या प्रकाशांत केल्या गेल्या.**

इन्शुअरन्स कंपनीकडून नुकसानभरपाई मिळण्याची शक्यता होती. कारण झाला हा प्रकार अनपेक्षितपणं झाला. आणि प्रत्येक गोष्टीचा विमा उतरवतां येत नाहीं !

एखाद्या राष्ट्रावर अगदीं अनपेक्षितपणं जेव्हां एखादी आपत्ति कोसळते तेव्हांच त्याची खरी कसोटी लागते ! घड्याळाच्या कांट्यांना बांधलेलं आणि सतत स्वयंचलित यंत्रांच्या चाकांवर फिरणारं अमेरिकन लोकांचं जीवन विद्युत्यंत्रांतील एका साध्या बिघाडामुळं उध्वस्त होतं. नेहमींच्या ठराविक चाकोरींतून वेगानं फिरणारीं हीं माणसं एकदम बसलेल्या या धक्क्यानं क्षणभर गोंधळून जातात. पण भांबावून जाऊन आरडाओरडा करीत नाहींत. तशाहि परिस्थितींत स्वतःला लागलेली शिस्त तीं माणसं मोडीत नाहींत. एखाद्या ठिकाणीं खाद्यपदार्थ दुर्मिळ असले तरी त्यांच्यावर तुटून पडत नाहींत; क्यूमधें उभे रहातात आणि आपला नंबर येण्याची शांतपणं वाट पहातात. मनुष्यस्वभावाचे कांहीं थोडे हीन नमुने सोडले तर हीं माणसं संकटकाळीं परस्परांशीं समजुतदारपणं वागतात, एकमेकांना मदत करायला तत्पर असतात, आलेल्या संकटाला तोंड द्यायला ताठ मानेनं उभीं राहतात. त्या रात्रीं लहानलहान मुलंसुद्धां आपल्या शेजाऱ्यांना जिना दिसावा म्हणून हातांत मेणबत्त्या घेऊन उभीं राहिलेलीं होतीं. न्यूयॉर्कमधें त्या रात्रीं एका हॉस्पिटलमधें एक तांतडीचं ऑपरेशन चालू होतं. मधेंच दिवे गेले. पण लगेच फ्लॅशलाइट्स्च्या साहाय्यानं तें पार पाडण्यांत आलं. दिवे गेल्यानं मधें व्यत्यय आला तो फक्त ९० सेकंदांचा ! कोणत्याहि कठिण परिस्थितींतसुद्धां अविचलित राहून आपलं कार्य पार पाडण्याची शिस्तच त्यांनी आपल्या मनाला लावलेली आहे.

अनपेक्षितपणं आलेल्या आपत्तींतसुद्धां अमेरिकन लोकांचा मिस्किल खोडकर-पणा, विनोदी मनोवृत्ति त्यांना सोडून जात नाहीं याचा प्रत्यय आणून देणारे कितीतरी प्रसंग त्या अंधाऱ्या रात्रीं घडले. ' एम्पायर स्टेट बिल्डिंग'मधल्या ' इलेव्हेटर'मधें कांहीं स्त्रीपुरुष अडकून पडले होते. फायर ब्रिगेडच्या लोकांनीं भिंतीला भोक पाडून आंत डोकावलं. आणि आंत अडकलेल्या लोकांत एखादी गरोदर स्त्री असली तर सर्वांत आधीं तिला बाहेर काढावं ह्या हेतूनं त्यांनीं चौकशी केली, " इथं कुणी गरोदर स्त्रिया आहेत का ? "

क्षणभर कुणीच कांहीं बोललं नाहीं. नंतर मग एक मिस्किल पुरुष हळूच पुटपुटला, ' आत्तांशी तर कुठं आमची भेट होत्येय् ! '

कोणत्याहि परिस्थितींत ज्या राष्ट्राची माणुसकी शाबूत रहाते, शिस्त अभंग रहाते आणि चेहऱ्यावरचं हास्य मावळत नाही, त्या राष्ट्राला ' भूतकाळ ' नसला तरी त्याचा ' भविष्यकाळ ' फार मोठा आहे यांत शंका नाहीं. अमेरिकेंतल्या अंधारांत-सुद्धां मला प्रकाश दिसला तो असा !

□

# पाऊस : हिमफुलांच्या देशांतला....

अमेरिकेच्या दुसऱ्या सफरींतलंहि माझं वास्तव्य फार सुखाचं झालं, ह्याला कारण माझ्याबरोबर काम करणारे माझे सारे सहकारी चांगले होते हें एक आहेच. पण तिथं मला लाभलेले सगळे अमेरिकन विद्यार्थीहि खूप चांगले होते, हेंहि एक कारण आहेच ! ते ' विद्यार्थी ' आणि आपण ' प्राध्यापक ' , असं मला तिथं कधीं जाणवलंच नाहीं. त्यांची आणि माझी फार जुनी मैत्री असावी अशा तऱ्हेनं ते वागत. माझ्या कामांत मला चांगलं सहकार्य देत.

वास्तविक अगदीं सुरुवातीला ज्यांना ज्यांना भारतांत 'यू. एस्. पीस कोअर'चं काम करायला येण्याची इच्छा होती, त्या सर्वांना आमच्या मराठी ( आणि कानडी) भाषेच्या अभ्यास–वर्गांत ' एस्. आय्. टी. ' नं प्रवेश दिला होता. त्यामुळं २१ पासून ७० व्या वर्षापर्यंतच्या वयाचे स्त्रीपुरुष आमचे ' विद्यार्थी ' बनले होते. सर्वांत लहान असलेली एमिलिआ ॲडेसा ( Amelia Addesa ) ही मुलगी २१ वर्षांची होती. एलिझाबेथ ब्लेक ( Elizabeth Blake ) ही ४८ वर्षांची होती. ॲली पर्किन्स ( Allie Perkins ) ४८ वर्षांचा विद्यार्थी होता. मरिअन फ्रीमन ही ५९ वर्षांची होती. रुथ जॉन्सन ही ६८ ची होती. आणि एडिथ चेंबर्लिन ( Edith Chamberlin ) ही ७० वर्षांची ' विद्यार्थिनी' होती ! नंतर पुढें महिन्याभरानं सर्वांची एक प्राथमिक परीक्षा झाली. केवळ ' मराठी 'चीच नव्हे, तर इतरहि अनेक दृष्टींनी त्यांची परीक्षा घेण्यांत आली. त्यांत अनेक कारणांनीं पन्नाशीच्या पुढचे

बहुतेक विद्यार्थीविद्यार्थिनी बाद झाले. नंतरच्या आठवड्यांत ते 'कोर्स' सोडून आपापल्या गांवीं गेले.

पण मला अमेरिकनांच्या ज्ञानासक्तीचं आणि एकंदर जीवनाच्याच आसक्तीचं फार कौतुक वाटलं. बघा ना! साठीला नि सत्तरीला आल्यावर आपापल्या घरीं 'हरि हरि' म्हणत स्वस्थ बसण्याऐवजीं, मुलांच्या–सुनांच्या संसारांत ढवळाढवळ करण्याऐवजीं, त्या अमक्यातमक्याच्या मुलीचं अजून लग्न कसं जमत नाहीं, बाकी सगळं चांगलं असून एखाद्या 'स्थळां'त दोष कसा आहे, ह्याबद्दल चर्चा करण्याऐवजीं हीं वेडीं अमेरिकन म्हातारीं माणसं हातांत चक्क 'पाटी-पेन्सिल' घेऊन एक नवी, अगदी परकी भाषा शिकण्याची धडपड करीत होतीं! आपल्याला ह्या वयांतसुद्धां सगळं कांहीं जमेल अशा आत्मविश्वासानं शिकण्याचे कष्ट करून, हिंदुस्थानसारख्या उष्ण हवेच्या देशांत एखाद्या मागासलेल्या खेड्यांत जाऊन स्थानिक लोकांच्या उपयोगी पडण्याची उमेद बाळगीत होतीं! विशिष्ट सामाजिक नि सांस्कृतिक वातावरणांत वाढलेल्या आपल्याकडच्या लोकांना ह्या सगळ्या वेडेपणाचा अर्थच कळणार नाही! .....

एखाद्या कामासाठीं विशिष्ट प्रकारचं 'वातावरण' कसं निर्माण करावं, हें अमेरिकनांना फार चांगलं कळतं. 'पीस कोअर'च्या कांहीं व्हॉलंटिअर्सना महाराष्ट्रांत आणि कांहींना कर्नाटकांत काम करायला जायचं असल्यानं, त्यांना मराठी नि कन्नड भाषा चांगल्या बोलतां आल्याच पाहिजेत. ह्यावर 'एस्. आय्. टी.'च्या जेवणाच्या हॉलच्या भिंतींवरहि – त्यांना निरनिराळ्या पाट्या लावून ठेवल्या होत्या. उदाहरणार्थ — (i) Going to India? Speak Marathi–Kannad.

(ii) If you know the word in Marathi, why say it in English?

(iii) Kannad–Marathi can be exciting — If you speak them!

(iv) In India, people speak Marathi — Even outside of class.

(v) Saying 'Namaste' is not enough. — Speak Marathi–Kannad.

(vi) In India, even puppets speak Marathi-Kannad!

जेवणाच्या एका टेबलावर त्यांनीं पाटी लावली होती : This is the Marathi Table — No English speakers please.'

मार्था नांवाची आमच्या स्कूलची एक रिसेप्शनिस्ट होती. तिला अर्थातच मराठी किंवा कानडी येण्याचं कांहीच कारण नव्हतं. तिच्याशीं मुद्दाम मोडकंतोडकं मराठी बोलून आमची मुलं तिला कधींकधीं खूप सतवायचीं ! एक दिवस मार्थाच्या टेबलावर पाटी लावलेली मुलांना आढळली : 'Be patient with Martha— she doesn't speak Marathi–Kannad!' अशा रीतीनं जिकडे नजर टाकावी तिकडे ' मराठी–कन्नड 'चा साक्षात्कार आमच्या मुलांना घडत होता. सारं वातावरण ' मराठी '–' कन्नड 'च्या प्रसारानं आमच्या अधिकाऱ्यांनीं भारून टाकलेलं होतं.

एकदां कांहींहि करून, मराठी-कन्नड बोलायला लाजणाऱ्या विद्यार्थ्यांचा संकोच कमी करण्यासाठीं आमचे लँग्वेज को-ऑर्डिनेटर डेव्हिड बर्न्स यांनी एक गमतीदार कल्पना प्रत्यक्षांत आणली. एक संपूर्ण दिवस विद्यार्थ्यांना मराठी किंवा कन्नड सक्तीनं बोलायला लावण्याचा त्यांचा उद्देश होता. त्यासाठीं शुक्रवार ता. ५ नोव्हेंबर १९६५ हा शुभ दिवस त्यांनीं निवडला. त्या दिवशीं सर्व ' पीस कोअर व्हॉलंटिअर्स 'नीं फक्त मराठी ( किंवा कन्नड ) बोललं पाहिजे, अशी त्यांनीं सक्ती केली. ह्या विशिष्ट दिवसाला त्यांनीं नांव दिलं – 'Keep–The–Staff-In-The–Dark–Day.' त्यासाठीं काढलेल्या कडक नोटिशींत त्यांनीं लिहिलं, 'On this day, volunteers will speak only Marathi ( and Kannad ) From 7 a. m. to 12 p. m. Instructors will serve as interpreters between volunteers and staff.'

अमेरिकेंत अनेक कॉलेजांत आहे त्याप्रमाणें उघड्या नोटिसबोर्डांवर सगळ्या नोटिसा लावण्याची पद्धत आमच्याहि स्कूलमधें होती. नोटिस-बोर्डाला कांचेच्या दारांची पेटी, तिला भक्कम कुलूप वगैरे प्रकार तिकडे नव्हते ! आमचे बरेचसे विद्यार्थी चांगले ' ग्रॅज्युएट ' झालेले होते. कांहींकांहीं तर विवाहित असून पत्नीसह आमच्या मराठीच्या कोर्सला आलेले होते. अर्थातच अशा सपत्नीक विद्यार्थ्यांना होस्टेलमधें स्वतंत्र वेगळ्या खोल्या दिलेल्या होत्या. अमेरिकेंतलं सबंध देशांतलंच वातावरण एकंदर खेळकर असल्यानं तो खेळकरपणा आणि मिस्किल खोडकरपणाहि आमच्या विद्यार्थ्यांमधें चांगलाच उतरलेला दिसे. त्यामुळं ऑफिसनं एक नोटिस बोर्डावर लावली, कीं बऱ्याच वेळां तिला उत्तर देणारी, तिच्यावर टीका करणारी दुसरी एखादी विनोदी नोटिस तिच्याच शेजारी लावली जाई. विशेष म्हणजे अधिकारीवर्गहि अशा ' प्रति-नोटिसा ' वाचे, त्यांतल्या विनोदाचा आस्वाद घेई, आणि त्यांच्याकडे काणाडोळा करून त्या तशाच तिथं ठेवून पुढं जाई.

" Keep—The—Staff—In—The—Dark—Day'च्या दिवशीहि अशीच एक ' प्रति–नोटीस ' मुलांनीं मूळच्या नोटिशीशेजारीं लावली. तिच्यांत लिहिलं होतं :– 'Question :— If the married couples go to bed

before mid-night, must they take an interpreter with them?' त्याच कागदावर कुणींतरी चावट विद्यार्थ्यानं पुढं लिहून ठेवलं : 'Depends on whether they plan to use words !'

आमच्या विद्यार्थ्यांना 'मराठी' किंवा 'कन्नड' बोलायची संवय व्हावी म्हणून डेव्हिड बर्न्स यांनीं केलेल्या कांहींकांहीं युक्त्या फार गमतीदार होत्या. त्यांचा हेतू फार चांगला असायचा. पण मुलांना त्यांच्या कांहीं योजना फार तापदायक वाटायच्या. जीं मुलं 'मराठी' बोलायची टाळाटाळ करतील त्यांच्या नांवावर येणारी पत्रं अडवून ठेवायची एक योजना एकदां त्यांनीं अमलांत आणली. आपल्या घरादारापासून दूर येऊन तिथं राहिलेल्या विद्यार्थ्यांना ती शिक्षा फार मोठी वाटली. मार्थाला आपलं टपाल अडवून ठेवायचा आदेश मिळालेला आहे हें समजतांच कांहीं मुलांनीं नोटिसबोर्डावर आपलीहि एक नोटिस लावली : 'It is against Federal Law to withhold U. S. Mail.....Violators will be prosecuted to the full extent of law!!'

ता. ३० ऑक्टोबर १९६५ला ही 'कडक' नोटिस लागली मात्र, – ३१ ऑक्टोबरला बर्न्सनीं आपला आदेश मागं घेतला. – मुलांच्या नोटिशीला घाबरून नव्हे, तर त्यांचे उतरलेले केविलवाणे चेहेरे पाहून !

– विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यांत असं खेळीमेळीचं निरोगी वातावरण असायचं.

माझ्या अमेरिकन विद्यार्थ्यांपैकी बऱ्याचजणांचीं वयं २१ ते २४ च्या दरम्यान होतीं. त्यामुळं तारुण्यांतला अवखळपणा, खोडकरपणा आणि उत्साह त्यांच्या नसानसांतून वाहात होता. त्यांतले दोनतीन विद्यार्थी फार मिस्किल, विनोदी आणि खोडकर होते. हेन्री केनीली ( Henry Keneally ), ब्रायन बर्जिन ( Brian Bergin ) आणि जॉर्ज ड्यूहर्स्ट (George Dewhurst) हे तिघेजण त्यांच्यांत शिरोमणी शोभण्यासारखे होते ! कु. ॲन मॅक्गिलीस ( Ann Macgillis ) नांवाची एक वाळसेदार विद्यार्थिनीसुद्धां खूप खेळकर आणि विनोदी होती. पीटर बेलेन्की



हेन्री केनीली



ॲन मॅक्गिलिस

( Peter Belenky ) हा स्मार्ट विद्यार्थी फार हुषार होता. विल्यम कोंडो ( William Condo ) हा इतर मुलांच्या मानानं अगदी गरीब, दिसायला सौम्य आणि सर्वांच्या उपयोगी पडणारा होता. लॉरेन पार्क्स (Loren Parks) आणि त्याची पत्नी डायना((Diana) हें २२–२१ वर्षांचं तरुण जोडपं नेहेमींच फार जबाबदारीनं वागे. ह्या जोडप्याची आणि माझी तिथं विशेष मैत्री झाली. मार्जी नांवानं प्रसिद्ध असलेली कु. मार्गारेट पोप ( Margaret Pope ) ही दिसायला जितकी सुंदर होती तितकीच स्वभावानं फार चांगली होती. कु. रुथ कार्नेर ( Ruth Carner ) ही नर्सिंगचा कोर्स झालेली विद्यार्थिनी अखंड विणकाम करीत असायची. ह्या सगळ्या विद्यार्थ्यांच्या सहवासांत माझा वेळ फार छान जायचा. आमच्या 'स्कूल'मधें शिस्तीला महत्त्व असलं तरी त्याहिपेक्षां अनौपचारिक आणि मैत्रीचं वातावरण सर्वत्र राखण्याकडेच आमचा सर्वांचा कल होता. त्यामुळंच प्राध्यापक आणि विद्यार्थी अशी आमच्यामधल्या नात्याची सीमारेषा अशी जवळजवळ नाहींशी झालेली होती. वर्गाच्या बाहेरहि आम्ही सतत आमच्या विद्यार्थ्यांच्या सहवासांत राहून त्यांना आमचा देश, आमची संस्कृति, आमची भाषा यांची चांगली ओळख करून द्यावी, असं आम्हांला सुरुवातीलाच सांगण्यांत आलेलं होतं. त्यामुळं जेवतांना–खातांना, गावांत जातांना, खरेदी करतांना, फिरायला जातांना, सिनेमाला किंवा नृत्यसंगीत-गृहांत जातांनाहि बहुतेक वेळां आमचे विद्यार्थि-विद्यार्थिनी आमच्याबरोबरच असायचे.

कित्येकदां संध्याकाळीं आम्ही ब्राटलबरो गांवामधल्या 'हार्मनी रूम' नांवाच्या हॉटेलांत जाऊन बसत असू. तिथं 'जाझ' संगीताच्या विलक्षण द्रुतगतीच्या वाद्य-मेळाव्यांत स्वरलहरींच्या सहवासांत जीवनाची एक वेगळीच गोडी अनुभवायला मिळायची. आपल्या मित्रमैत्रिणींच्या सान्निध्यांत समोरासमोर किंवा शेजारींशेजारीं एखाद्या पेयाचे प्याले ठेवून तासन् तास जिव्हाळ्याच्या गप्पा मारण्यांतहि फार मोठा आनंद होता. 'ऑर्केस्ट्रा'च्या तालावर स्त्रीपुरुषांनीं नृत्य करण्याचीहि तिथं सोय होती. कधीं आमच्या विद्यार्थ्यांच्याबरोबर जरी आम्ही तिथं गेलों नाहीं, तरी त्यांच्यापैकीं कुणाचीतरी तिथं हमखास गांठ पडायचीच. पाश्चिमात्यांच्या सांस्कृतिक जीवनांत नृत्याला अन् पेयप्राशनाला प्रतिष्टा असल्यामुळ अशा प्रसंगीं कुणालाहि संकोचल्यासारखं वाटायचं कारण नसे. 'हॅलोऽ !' किंवा 'हाय् !' म्हणून आम्हांला अभिवादन करून ते वेगळ्या टेबलावर



पीटर बलेन्की

बसत. आम्हीं बोलावलंच तर ते आमच्या टेबलावर येऊन बसत. पण आपला सहवास ते आमच्यावर कधीं लादीत नसत.

.....कांहीं दिवसांनीं थंडीचा कडाका वाढतच गेला. गंमत म्हणून रात्रीं खिडकी-बाहेर ठेवलेल्या पेपर ग्लासमधल्या दुधाचं सकाळीं उठून पाहावं तर गोठून बर्फ झालेलं! आमच्या आवडत्या स्विमिंग पूलकडे एकदां चक्कर मारायला गेलों. तलावांतलं पाणी संपूर्ण गोठून त्याचं बर्फ झालेलं होतं ! काठीनं आणि दगडांनीं त्या बर्फाची घनता अजमावून पाहिली. तलावाचा पृष्ठभाग दगडासारखा कठिण झाला होता. सहज गमतीनं एखादा छोटासा दगड तलावांत फेंकला, तर बर्फाच्या गालिच्यावरून नाजुकपणं उड्या मारीत तो पैलतीराला सुखरूप जायचा. तलावाच्या गोठलेल्या पाण्यावरून अनवाणी चालत जायचा मला मोह झाला. मोठ्या कष्टानं मीं तो आवरला !

आमच्या 'स्कूल'च्या परिसरांत सफरचंदाचीं पुष्कळ झाडं होतीं. आम्ही अमेरिकेंत पोंचलों त्या वेळीं तीं झाडं फळांनी नुसतीं बहरून आलीं होतीं. मधल्या सुट्टींत आम्ही आणि आमचे विद्यार्थी–विद्यार्थिनी कित्येकदां त्या झाडांखालीं जाऊन बसत होतों. गप्पागोष्टी, चेष्टामस्करी करीत होतों. त्या सफरचंदांच्या नारिंगी दिवसांत 'सफरचंद' हें येतांजातां सहज खाण्याचं, एकमेकांना देण्याचं एक फळ बनलं होतं. झाडावरचीं ताजीं सफरचंदं पाडण्यासाठींसुद्धां अनेकदां दगडाऐवजीं खालीं पडलेलीं सफरचंदंच फेंकून मारलीं जात. रात्रीं दहा वाजतां जरी एकमेकांच्या खोल्यांत आम्ही गप्पा मारायला गेलों, तरी तशा अवेळींसुद्धां सफरचंद खाण्याचा परस्परांना आग्रह केला जाई. पुढं लवकरच सफरचंदांचा बहर ओसरला. झाडावरचीं फळं गळून पडलीं. पानंसुद्धा गळालीं. तींच निष्पर्ण झाडं विरही प्रेमिकांप्रमाणं थंडगार वाऱ्याचे उसासे सोडीत आमच्या येण्याजाण्याच्या वाटेंत खिन्न मुद्रेनं उभीं राहिलीं. तो मोसम संपला ! बहर उडाला ! पण त्या झाडांच्या सहवासांत आम्हीं घालवलेले कांहीं क्षण मात्र मधेंच केव्हांतरी चित्रपटासारखे स्पष्ट दिसतात. अमेरिकेची आठवण करून जातात.

आमच्या 'स्कूल'च्या वर्गांमधलं वातावरण आपल्याकडल्या कांहीं 'शिस्त-प्रिय' शिक्षकांना धक्का बसेल इतकं अनौपचारिक होतं. कांहीं मुली वर्गांत बसल्या-बसल्या एकीकडे विणकाम चालू ठेवीत. कंटाळा आला म्हणजे कांहीं विद्यार्थी मधूनच सिगरेट पेटवीत, किंवा आधीपासून शेजारीं आणून ठेवलेली 'पेप्सी कोला'ची बाटली तोंडाला लावीत. एकदोन विद्यार्थ्यांनीं वर्गांत मी शिकवीत असतांना माझे फोटोसुद्धां घेतले. ह्या सगळ्या गोष्टी लवकरच आमच्या अंगवळणीं पडल्या. वर्गांत शिकवतांना भाषेच्या दृष्टीनं तें बरोबर आहे काय ह्याकडेच आमचं जास्त लक्ष असायचं. त्यामुळं

कित्येकदां अज्ञानानं तर कित्येकदां केवळ गंमत म्हणून मुलं वाटेल तीं उत्तरं देत असत. असे बरेच गमतीदार किस्से आमचे इन्स्ट्रक्टर्स सांगत.

एकदां जॉर्जला एका इन्स्ट्रक्टरनं विचारलं, "काल संध्याकाळीं तूं काय करीत होतास ?"

"काल संध्याकाळीं मी सिनेमा होतों !" जॉर्जनं उत्तर दिलं. म्हणजे त्याला म्हणायचं होतं कीं, 'काल संध्याकाळीं मी सिनेमा पहात होतों !"

दुसऱ्या एका विद्यार्थ्याला – मला वाटतं बहुधा ब्रायनलाच – एकदां वर्गांत प्रश्न केला गेला : "तुला काय पाहिजे ?"

"मी सिगारेट आहे." – हें त्याचं उत्तर !

अशीं उत्तरं ऐकलीं म्हणजे वर्गांत ज्यांना बऱ्यापैकीं 'मराठी' यायचं असे विद्यार्थी तर खदखदून हंसतच, पण विशेष गंमत म्हणजे ज्याच्यामुळं हा विनोद घडला तोहि त्यांच्या हंसण्यांत सामील व्हायचा. कोणतीहि परकीय भाषा शिकतांना असे विनोद व्हायचेच ! त्यांत खजील होण्यासारखं आहेच काय ?

आमच्या विद्यार्थ्यांना जरा बरं मराठी यायला लागल्यानंतरची गोष्ट आहे. एकदां माझं लेक्चर सुरू होण्यापूर्वी हेन्रीनं मला विचारलं, "I love you'चं मराठी भाषांतर कसं करायचं ?"

मीं त्याला तें नीट समजावून सांगितलं. त्याबरोबर त्यानं पलिकडे बसलेल्या स्कॉटला मराठीत म्हटलं, "माझं तुझ्या बायकोवर प्रेम आहे !"

स्कॉटचं लग्न झालेलं होतं. त्यामुळं त्याला हेन्रीचं हें विधान तितकंसं आवडलं नाहीं. लगेच माझ्याकडे वळून स्कॉटनं मला विचारलं, "I will kill you हें मराठीत कसं म्हणतात ?"

माझ्याकडून तें समजून घेतांच हेन्रीकडे रागानं पहात मुठी वळून तो म्हणाला, "मी तुला ठार मारीन !"

नंतर दोघंहि हंसायला लागले. अशी चेष्टामस्करी नेहेमीं चालायची. त्या वेळीं मात्र माझ्या मनांत आलं . अरे बाप रे ! 'माझं तुझ्या बायकोवर प्रेम आहे' हें चेष्टेंत कां होईना, पण कुणापुढं बोलायची आपल्याकडे कुणाची हिम्मत होईल का ? हा देशच वेगळा. त्यांची संस्कृति वेगळी. नीतिअनीतीच्या कल्पना वेगळ्या. जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोणच वेगळा.

एकदां आम्हीं गांवांतून बसनं आमच्या स्कूलकडे परत येत होतों. स्कूलच्या परिसरांतील मुलींच्या वसतिगृहाची इमारत दिसताच मीं जॉर्जला विचारलं, "हें काय आहे ?"

तो म्हणाला, "हें घर आहे."

"इथं कोण रहातं?"

"माझ्या बायका!"

आश्चर्यानं मीं विचारलं, "तुझ्या बायका?"

त्यावर गडबडून जाऊन घाईघाईनं जॉर्ज म्हणाला, "नाहीं नाहीं! तुमच्या आणि माझ्या बायका!"

— मीं कपाळाला हात लावला. मला बरं वाटावं म्हणून त्यानं तडजोड केली असावी!

नोव्हेंबरच्या अखेरीला एक दिवस मीं आमच्या विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा घेतली. त्या वेळेपर्यंत आमच्या विद्यार्थ्यांनी बरी प्रगति केली होती. तरीसुद्धां एखाद्या प्रश्नाचं उत्तर झटकन् सुचलं नाहीं म्हणजे विचार करण्याकरतां वेळ मिळावा म्हणून बहुतेक विद्यार्थी म्हणत, "पुन्हा सांगा पाहूं."

त्यांची ही युक्ति माझ्या लक्षांत येऊन मी त्यांना म्हणायचों, "माझा प्रश्न तुला समजला नाही का?"

त्यावर तो विद्यार्थी निष्पाप चेहेरा करून म्हणायचा, "प्रश्न समजला, पण पुन्हा सांगा पाहूं."

त्यांच्या ह्या 'पुन्हा सांगा पाहूं'ची आम्हांला फार गंमत वाटायची.

तोंडी परीक्षेंत विद्यार्थ्यांना मराठी बोलायला लावणं, इतकंच नव्हे तर त्यांनीं आम्हांला कांहीं प्रश्नहि विचारावेत असा आमचा हेतु होता. म्हणून माझे कांहीं प्रश्न विचारून झाल्यावर कु. मिआ ॲडेसा (Mia Adessa) ह्या माझ्या एका विद्यार्थिनीला मीं म्हटलं, "आतां तूं मला कांहीं प्रश्न विचार."

— त्यावर तिनं जो पहिलाच प्रश्न विचारला त्यानं मी गारच झालों!

नर्गिससारखा चेहेरा असलेल्या त्या मुलीनं आपल्या गोड आवाजांत, शुद्ध मराठींत मला विचारलं, "तुमचा जन्म झालाय् का?"

'तुमचा जन्म कधीं झाला?' असं तिला विचारायचं होतं. आणि मीं तें तिला समजावून सांगतांच ती विलक्षण ओशाळली.

ह्याच परीक्षेच्या एका विभागांत आम्हीं 'टेप्' करून विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनीं त्यांचीं उत्तरंहि 'टेप' करूनच द्यायचीं होतीं. ह्या सगळ्या प्रकारांत कांहीं तांत्रिक चुकीनं म्हणा किंवा अन्य कांहीं कारणानं म्हणा, आमची एक विद्यार्थिनी कु. हनी रोव्हिक (Honey Rovick) ही नापास झाली.

इतरांपेक्षां तिला खूपच कमी मार्क्स पडले. शेवटीं नोटिसबोर्डावर रिझल्ट लागला. प्रत्येकाच्या नांवापुढं त्याला मिळालेले मार्क्स टाइप करून लावले होते. हनीला मिळालेले मार्क्स इतके कमी होते कीं, त्याची तिला लाज वाटणं अगदीं साहजिक होतं. आणि ह्या गोष्टीची कल्पना आमच्या बर्न्ससाहेबांना असावी. म्हणून तिच्या नांवाच्या पुढ एक 'स्टार' टाकून खालीं शेवटीं त्यांनीं एक 'नोट' टाकली होती, "Sorry Honey! We know that it was a technical error! We still love you!"

आपल्या विद्यार्थ्यांचा तेजोभंग होऊं नये म्हणून जपण्याची केवढी ही धडपड! 'We still love you'चा अर्थ मात्र आमच्याकडच्या भल्या-भल्यांनींसुद्धां भलताच केला असता. अन् असं जाहीर करणाऱ्याविरुद्ध गहजब केला असता! आपल्याकडे कुणीं असं लिहिण्याचं धाडस केलंच असतं तर त्या मुलीचासुद्धां गैरसमज झाला असता. नोटिशीचा कागद फाडून घेऊन ती तक्रार करायला प्रिन्सि-पॉलकडे रडत गेली असती.

आमच्या तिथल्या नेहेमींच्या जीवनांत जरासा बदल होण्याचा योग एकदां आला. ऑक्टोबर '६५मधें ता. १७ ते २४ ह्या आठ दिवसांत 'न्यू हॅवन' (कने-क्टिकट) इथं जाऊन रहाण्याची संधि आम्हांला मिळाली. 'पीस कोअर'च्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रत्यक्ष एखाद्या मोठ्या हॉस्पिटलमधें काम करण्याचा अनुभव मिळावा म्हणून त्यांचे गट पाडून त्यांना निरनिराळ्या शहरीं पाठवण्याची योजना होती. न्यू हॅवनला जाणाऱ्या गटांत तेरा मराठी शिकणारे आणि सहा कानडी शिकणारे विद्यार्थी होते. त्यांनीं सर्वांनीं 'येल युनिव्हर्सिटी'शीं संलग्न असणाऱ्या सुप्रसिद्ध 'येल-न्यू हॅवन मेडिकल सेंटर' या खूपच मोठ्या हॉस्पिटलमधें प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव घ्यायचा होता. ह्या आठ दिवसांत त्यांनीं रोज दोन तास तरी मराठीचा अभ्यास करावाच, अशी अपेक्षा होती. नाहींतर मराठीच्या अभ्यासांत एवढा मोठा आठ दिवसांचा खंड पडला तर तीं मुलं पूर्वीं शिकलेलं सारं कांहीं विसरून जाण्याची शक्यता होती. म्हणून त्यांच्याबरोबर मला नि आमच्या 'इन्स्ट्रक्टर्स'ना न्यू हॅवनला पाठवण्यांत आलं होतं. माझ्याबरोबर सौ. शालिनी जेंट्ल् आणि सौ. विजया जोशी ह्या मराठी आणि सौ. उषा रंगनाथ आणि कु. उमा कपनीपथी ह्या कानडी इन्स्ट्रक्टर्स होत्या.

सतरा तारखेला सकाळी आठला आमच्या SIT च्या बस्नं आम्हांला 'लिऑन बस् डेपो'ला आणून सोडलं. तिथून सकाळी नऊ वाजतां आम्हीं 'ग्रेहाउंड बस्'नं निघालों, आणि ग्रीनफील्ड, नॉर्दॅम्प्टन, होलीओक, स्प्रिंगफील्ड, हार्टफोर्ड – अशा मार्गानं दुपारीं साडेबारा वाजतां न्यू हॅवनला पोंचलों.

न्यू हॅवनला 'चॅपूल स्ट्रीट'वर असलेल्या 'हॉटेल डंकन' (Hotel Duncan) या सुमारं १२५ खोल्यांच्या भव्य हॉटेलांत आमची सर्वांची रहाण्याची सोय केलेली होती. आम्हांला दिलेल्या खोल्या खूपच मोठ्या आणि सर्व सुखसोयींनीं सुसज्ज अशा होत्या. अर्थात् प्रत्येक खोलींत रेडिओ, टेलिव्हिजन आणि टेलिफोन होता, हें वेगळं सांगायला नकोच.

सकाळीं ८ ते संध्याकाळीं ७ पर्यंत आमच्या विद्यार्थ्यांना 'हॉस्पिटल-ड्यूटी' होती. त्यांचं काम संपल्यानंतर लगेच संध्याकाळीं ७ ते रात्री ९ आमच्या इन्स्ट्रक्टर्सनीं हॉस्पिटलमधेंच एका हॉलमधें त्यांना मराठी शिकवायचं, अशी योजना होती. हा वेळ तसा फारच थोडा असल्यानं ह्या काळांत मला त्यांना प्रत्यक्ष शिकवायचं नव्हतं. फक्त त्यांच्या दोन तासांत तिथं वसून सुपरव्हिजन करण्याचं काम माझ्याकडे होतं. नुसतं बसण्याचा कंटाळा आला तर मीहि त्यांचा एखादा तास घेऊन आमच्या इन्स्ट्रक्टर्सना विश्रांति देत असें.

दिवसभर हॉस्पिटलमधें उभ्यानं काम करून आमचीं मुलं इतकीं थकलेलीं असत आणि इतकीं झोंपेला आलेलीं असत, कीं मराठीच्या तासाला रात्रीं तीं वर्गांतल्या डेस्कवर माना टाकीत. त्यांचे डोळे उघडे ठेवण्याचे प्रयत्न पाहून कित्येकदां त्यांची खरोखर कींव येई! पण काय करणार? ज्या कामासाठीं आमची तिथं योजना झाली होती तें काम करणं भागच होतं.

न्यू हॅवनलासुद्धां आम्हीं सतत आमच्या विद्यार्थ्यांबरोबर असावं अशी अपेक्षा असल्यामुळं, दिवसभरांत कांहीं तास आम्हींसुद्धां हॉस्पिटलमधें वावरत होतों. पण संध्याकाळीं सातपर्यंत प्रत्यक्ष कांहींहि काम नसल्यामुळं दिवसभर तसे आम्ही मोकळेच होतों. ॲली पर्किन्स (Allie Perkins) आणि जॉन हॉवर्ड (John Howard) हे दोन विद्यार्थी माझे रूम-पार्टनर होते. सकाळीं साडेसातला ते दोघे बाहेर पडत आणि रात्री केव्हांतरी खोलींत परत येत. जॉनचं वय २४ आणि ॲलीचं वय ४८ होतं.

ॲली आणि जॉन दोघेहि घोरत असत. माझ्या खोलींत एखादा घोरणारा माणूस असला कीं त्याचं घोरणं थांबेपर्यंत मला कधीहि झोंप येत नाहीं. त्या माणसाचं घोरणं कधीं थांबतंय् ह्याची वाट पहात मी रात्रभर जागाच रहातों. आणि बहुधा घोरणाऱ्या माणसाचं घोरणं कधीच थांबत नाही. तें थांबतं तेव्हां बहुतेक सकाळ झालेली असते, आणि घोरणारा माणूस उठून आपल्या कामाला लागलेला असतो.

जॉनची कॉट जरा पलिकडे होती. आणि रात्रीं बाराच्या सुमाराला तो परत येत असे. त्यामुळं त्याचा फारसा त्रास मला नव्हता. परंतु ॲलीची कॉट माझ्या शजारीं होती नि तो खूपच मोठ्यानं घोरत असे. त्यामुळं पहिल्या दिवशीं रविवारीं

रात्रीं मी जवळजवळ रात्रभर जागा होतों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी सहज बोलतांबोलता ॲलीजवळ त्याचा गमतीनं उल्लेख केला तेव्हां तो म्हणाला, "आतां केव्हांहि मी घोरायला लागलों कीं मला चिमटा घेऊन उठव! संकोच करूं नकोस!"

मीं म्हटलं, "छे छे! तसं कांहीं करणं मला जमायचं नाहीं. त्यापेक्षां तूंच जरा हळू आवाजांत घोरून पहा ना! तुला तें सहज जमेल प्रयत्न केलास तर!"



ॲली पर्किन्स

हें बोलणं सोमवारीं सकाळीं झालं. त्या दिवशीं रात्रीं ॲलीच्या आधीं खोलींत येऊन मी जरा लवकरच झोंपलों. कारण आदल्या रात्रीचं खूप जागरण झालं होतं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी उठून पहातों तों शेजारच्या कॉटवर ॲली नाहीं! कुठं गेला तें कळेना. आमच्या खोलीच्या पॅसेजमधें एक खूप मोठा भिंतींतला 'वॉर्डरोब' होता. रूममधें सगळीकडे शोधलं तेव्हां ॲली वॉर्डरोबचं सरकतं दार उघडून, डोक्याच्या बाजूनं अर्धा 'वॉर्डरोब'मधें आणि अर्धा बाहेर खोलीच्या पॅसेजमधें असा झोंपलेला आढळला.

मला फार शरम वाटली. वाईटहि वाटलं. मला त्याच्या घोरण्याचा त्रास होऊं नये म्हणून कॉटवरची मऊ गादी सोडून बिचारा जमिनीवरच्या कडक 'मॅट'वर पांघरूण घेऊन झोंपला होता. नंतर कितीतरी वेळ मी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. "मी चेष्टेंत म्हणालों. मला खरोखरच त्रास होत नाहीं! तू कॉटवरच झोंपत जा." असं मीं त्याला खूप सांगून पाहिलं.

पण तो म्हणाला, "तूं विनाकारणच मनाला लावून घेतोस! मी तुझ्यासाठीं जमिनीवर झोंपतच नाहींय्! मला कॉटवर झोंपायला आवडत नाहीं. घरीसुद्धां मी जमिनीवरच झोंपत असें."

माझा अर्थातच त्याच्या ह्या सांगण्यावर विश्वास बसला नाहीं. पण ॲलीनं माझं म्हणणं कांहीं ऐकलं नाहीं. आम्ही न्यू हॅवनहून परत येईपर्यंत तो त्याच जागीं अखेरपर्यंत झोंपत होता. सर्वसामान्य अमेरिकन माणसामधल्या परोपकारबुद्धीचं, माणुसकीचं नि सौजन्याचं हें दर्शन मला हृद्य वाटलं. आपल्याकडे असं कांहीं घडलं असतं तर घोरणाऱ्या माणसानं त्याच्या हक्कांची मला जाणीव करून देऊन माझ्याशीं भांडण केलं असतं, हा विचार मात्र मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

न्यू हॅवनच्या एकत्रित वास्तव्यापासून ॲलीशीं माझा स्नेहसंबंध अधिक वाढला. पूर्वी ब्राटलबरोला असतांना केवळ औपचारिकपणं आम्ही एकमेकांना 'हॅलोऽ' करायचों. पण आतां त्या औपचारिक अभिवादनांत मैत्रीचा जिव्हाळा निर्माण झाला.

ॲली पर्किन्स चांगला सहा फूट उंच होता. अमेरिकेचे त्या वेळचे अध्यक्ष जॉन्सन यांच्याप्रमाणं त्याचं नाक मोठं होतं. वाचन करायला त्याला चष्मा लागायचा. मी इंग्रजी आणि मराठीसुद्धां फार 'फॅस्ट' बोलतों, अशी त्याची तक्रार असायची. त्यामुळं त्याच्याशीं बोलतांना मला प्रत्येक वाक्य साधारणपणं दोनदां तरी उच्चारावं लागायचं!

ॲली स्वभावानं मुळांतच अबोल होता कीं काय कुणास ठाऊक! पण तो नेहेमींच अगदीं मोजकं बोलायचा. सतत कसल्यातरी विचारांत गढलेला असायचा. 'पीस कोअर'मध्यें येण्यापूर्वी तो स्वतंत्र धंदा करीत होता. घरोघर किंवा लहानमोठ्या 'फर्म्स'मध्यें फिरून कीटकनाशक द्रव्यांचे फवारे मारून मच्छर–डांस नाहींसे करण्याचा त्याचा व्यवसाय होता. सुमारं अडीचशें गिऱ्हाइकं त्याचीं कायमचीं बांधलेली होतीं. त्याच्याशिवाय ते लोक दुसऱ्या कुणालाच काम देत नसत. साधारणपणं एकेका घराचे एक वेळचे आठ ते दहा डॉलर्स त्याला मिळत. मोठ्या फर्म्सकडून पंधरा ते वीस डॉलर्सची प्राप्ति होई. दिवसाला सरासरी तीस ते पस्तीस डॉलर्स त्याला मिळत.

"एवढे पैसे मिळत असून धंदा करायचा सोडून तूं 'पीस कोअर'ला कां येऊन मिळालास?" असं मीं एकदां त्याला विचारलं.

त्यावर सहजतेनं तो म्हणाला, "कंटाळा आला! नुसते पैसे मिळवण्यापेक्षां अधिक कांहींतरी चांगलं काम करावंसं वाटलं. त्या निमित्तानं दोन वर्षं एखाद्या परदेशांत जाऊन रहायला मिळेल असं वाटलं, म्हणून इकडे आलों."

"पण हीं दोन वर्षं संपल्यावर हिंदुस्थानांतून तुला अमेरिकेंत परत यावं लागेल. पुन्हा धंद्यांत नवीन जम बसवण्याची काळजी नाहीं तुला वाटत?"


"मुळीच नाहीं! माझ्या सगळ्या गिऱ्हाइकांनीं मला आश्वासन दिलंय् कीं तू परत आल्यानंतर आमचं काम आम्ही पुन्हा तुलाच देऊं!"

"आणि समजा त्यांनीं तुला दगा दिला तर?"

"तसं घडणार नाहीं! पण घडलंच तर मी नवीं गिऱ्हाइकं मिळवीन."– तो कमालीच्या आत्मविश्वासान सहज म्हणाला, "पण अजून माझं जाणंच अनिश्चित आहे!"

"म्हणजे काय? तुझी निवड तर झालीय्!"

"हो, पण माझ्या बायकोपासून घटस्फोट मिळाल्याशिवाय मला ते हिंदुस्थानला



**येल युनिव्हर्सिटींतील ‘स्टर्लिंग डिव्हाय्निटी’ चौकाचें रमणीय दृश्य वृक्षांच्या नि फुलझाडांच्या सोबतीनं युनिव्हर्सिटीच्या छोट्याछोट्या इमारती फेर धरून उभ्या आहेत.**

पाठवणार नाहींत. माझ्या वकिलाची खटपट चालू आहे; पण गेलीं दोन वर्षं माझी बायको कुठं आहे तेंच मला माहीत नाहीय्! ”

“ किती वर्षं संसार केलात तुम्हीं? ”

“ चौदा वर्षं. ”

“ मुलं किती आहेत? ”

“ एकहि नाहीं. ”

“एक विचारूं का? तुमचं न पटायला कारण काय झालं? ”

“ कारणं अनेक आहेत. पण महत्वाचं कारण म्हणजे ती माझं कधींच कांहीं ऐकत नसे. ”

“ व्यक्तिस्वातंत्र्याच्या फाजिल कल्पना? ”

“ मला तसं वाटतं! ” – ॲली उद्‌गारला.

– ॲलीला कोणत्या दुःखानं अबोल बनवलं असावं तें आतां माझ्या लक्षांत आलं. एखाद्या परक्या देशांतल्या माणसाला आपल्या घोरण्याचा त्रास होऊं नये म्हणून दूर जाऊन जमिनीवरसुद्धां झोंपणारा ॲली पर्किन्स......

न्यू हॅवनला असतांना लागोपाठ तीनचार दिवस मीं जगप्रसिद्ध ‘येल युनिव्हर्सिटी’त फिरलों. अठराव्या शतकाच्या सुरुवातीला स्थापन झालेल्या ह्या विद्यापीठाच्या परिसरांत वेगवेगळ्या ‘फॅकल्टीजचं’ शिक्षण देणारीं एकूण २५ कॉलेजं आहेत. ‘येल कॉलेज’, ‘बर्कले कॉलेज’, ‘कल्हौम कॉलेज’, ‘स्कूल ऑफ ड्रामा’,

'स्कूल ऑफ म्युझिक', 'स्कूल ऑफ एंजिनिअरिंग', 'स्कूल ऑफ आर्ट अँड आर्किटेक्चर' अशीं अनेक कॉलेजं मीं पाहिलीं. विद्यापीठाच्या सर्वच्या सर्व इमारती पहाणं मात्र केवळ अशक्य होतं.

अमेरिकेंतल्या सर्वांत मोठ्या असलेल्या पहिल्या चार ग्रंथालयांत 'येल युनिव्हर्सिटी लायब्ररी'चा समावेश होतो. '६५ सालीं त्या लायब्ररींत ४४००,००० ग्रंथ होते. 'येल युनिव्हर्सिटी'चं 'द पीबॉडी म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी' हें असंच भव्य आहे. दर वर्षी ८५००० पेक्षां अधिक प्रेक्षक 'म्युझिअम'ला भेट देतात.

'६४ सालीं अमेरिकेच्या सर्व भागांतून आणि जगांतून आलेले एकूण ८६१४ विद्यार्थी येल विद्यापीठांत अभ्यास करीत होते. एकूण ७७ परकीय देशांतून आलेले विद्यार्थी त्या वेळीं तिथं शिक्षण घेत होते.

ता. १५ ऑक्टोबर १९६५च्या 'न्यूयॉर्क टाइम्स'मध्यें 'Students At Yale To Judge Faculty' ह्या शीर्षकाखालीं एक विस्तृत वार्ता प्रसिद्ध झालेली माझ्या वाचनांत आली होती. त्या वातमीमुळं येल युनिव्हर्सिटींत उठलेल्या एका शैक्षणिक वादळाकडे माझं लक्ष वेधलं गेलं. त्याच वेळीं मनाशीं ठरवलं: आतां आपण दोन दिवसांत न्यू हॅवनला जातोंच आहोंत तर येल युनिव्हर्सिटींत वहाणाऱ्या या वादळी वाऱ्यांचा परिचय आपण करून घेतलाच पाहिजे.

येल युनिव्हर्सिटी आमच्या 'हॉटेल डंकन'पासून खूपच जवळ होती. न्यू हॅवनला गेल्यावर एकदोन दिवसांतच मी येल विद्यापीठांत गेलों आणि अनेकांना भेटून त्या शैक्षणिक वादळाची पार्श्वभूमी समजावून घेतली. सुमारं सहा महिन्यांपूर्वी येल विद्यापीठांत 'फिलॉसॉफी'चे अॅसोशिएट प्रोफेसर म्हणून काम करणारे प्रो. डॉ. रिचर्ड बर्नस्टिन (Richard Bernstein) यांना 'कायमची नेमणूक' (Tenure Appointment) विद्यापीठ-अधिकाऱ्यांनीं न दिल्यामुळे ते 'येल'मधून बाहेर पडले होते. प्रा. बर्नस्टिन हे त्यांच्या चांगल्या शिकवण्यामुळं विद्यार्थ्यांत खूप प्रिय झालेले होते. त्यांच्यावर झालेल्या ह्या अन्यायामुळं त्यांचे विद्यार्थी चिडले आणि विद्यापीठांत त्यांनी उग्र निदर्शनं केलीं. प्राध्यापकांच्या 'कायम' म्हणून नेमणुका करतांना आमचं विद्यार्थ्यांचं त्या त्या प्राध्यापकांबद्दलचं मतहि विचारांत घेतलं पाहिजे,' अशी चळवळ विद्यार्थ्यांनी सुरू केली. मग विद्यापीठांतले अधिकारी जागे झाले आणि त्यांनीं विद्यापीठांतील 'पोलिटिकल सायन्स'चे प्रोफेसर डॉ. रॉबर्ट डाल्ह् (Robert Dahl) यांच्या नेतृत्वाखालीं कायम नेमणुका करण्याच्या पद्धतीची सर्वांगीण चौकशी करण्यासाठीं एक समिति नेमली.

चौकशी–समितीच्या जूनमध्यें प्रसिद्ध झालेल्या अहवालाची एक प्रत मीं आधीं मिळवली, तिचा अभ्यास केला, आणि मगच मी डॉ. रॉबर्ट डाल्ह् यांना प्रत्यक्ष

भेटलों. प्रो. डॉ. डाल्ह् हे पन्नाशीच्या वयांतले एक उंच सडपातळ गृहस्थ असून हंसतमुख होते. सुमारं एक तास मी ह्या विषयावर त्यांच्याशीं चर्चा केली. माझ्या सर्व प्रश्नांना त्यांनीं अगदीं न कंटाळतां उत्तरं दिलीं. ( त्यासंबंधीं सविस्तर लिहायचं झालं तर स्वतंत्र मोठा लेखच होईल. ) आपल्याकडच्या कॉलेजांमधे 'लाइफ मेंबर' होण्यांत प्राध्यापकांना जें संरक्षण मिळतं आणि फायदे मिळतात, तोच प्रकार थोडयाफार प्रमाणांत 'टेन्यूर अपॉइंटमेंट'च्या बाबतींत तिकडे घडत असल्यामुळं, प्राध्यापकाची 'कायम नेमणूक' करतांना त्याची पात्रताहि विचारांत घ्यावी, याबाबत सर्वांचंच एकमत होतं. पात्रता असूनहि एखाद्या स्वतंत्र विचाराच्या प्राध्यापकाला 'कायम नेमणूक' मिळाली नाही, तर त्याच्यावर सतत नोकरी जाण्याची टांगती तलवार असणार! ह्या धोक्याबद्दल बोलतांना डॉ. रॉबर्ट डाल्ह् स्पष्टपणं म्हणाले, "Dangers can also arise within a university community : from senior colleagues, departmental chairmen, directors of programs, deans and others who might be tempted — in the absence of tenure—to rid themselves of a colleague whose ideas they rejected."

विद्यार्थ्यांच्या आग्रही मागणीसंबंधीं बोलतांना डॉ. डाल्ह् यांनीं सांगितलं कीं, "इथं तर नेमणुका करतांना विद्यार्थ्यांचं नुसतं मतच विचारांत घेण्याची मागणी आहे. पण ''ओहायओ' ( Ohio) राज्यांतल्या 'यलो स्प्रिंग्स्' ( Yellow Springs ) मधल्या 'अँटिऑक कॉलेज' ( Antioch College ) मधें तर विद्यार्थ्यांचंच 'सेल्फ गव्हर्मेंट' आहे. त्या कॉलेजांतल्या प्राध्यापकांच्या नेमणुका फार पूर्वींपासून तिथले विद्यार्थीच करतात! "

न्यू हॅवनला असतांना आम्ही ज्या हॉस्पिटलमधें रोज जात–येत होतों, तिथंच त्या वेळीं काम करीत असलेल्या डॉ. सुमन किनरे यांची आणि आमची सर्वांची योगायोगानं ओळख झाली. एरवीं त्या हॉस्पिटलचा पसारा एवढा मोठा होता कीं कांहीं भारतीय माणसं आठ दिवस इथं चकरा मारून गेलीं हें डॉ. कु. किनरे यांना कळलंसुद्धां नसतं. त्यांच्याकडून जेवायचं आमंत्रण मिळतांच मी, सौ. विजया जोशी, सौ. शालिनी जेंट्ल् वगैरे पांचहिजणं मोठ्या उत्साहानं त्यांच्या 'अपार्टमेंट'वर एका रात्रीं जेवायला गेलों. जेवणाचं आमंत्रण! उगीचच औपचारिकपणं 'नाहीं' कशाला म्हणायचं? त्या दिवशीं फार दिवसांनी आम्हांला सर्वांना भारतीय पद्धतीचं जेवण डॉक्टरीणबाईंकडे मिळालं. म्हणून आम्ही जराशी मनापासूनच जेवलों! मसुराच्या डाळीची आमटी, भात, वांग्याची भाजी, कोशिंबीर वगैरे पदार्थांचीं टेबलावरचीं भांडीं आम्हीं खूपच थोड्या वेळांत पालथीं घातलीं. जेवणानंतर डॉक्टरीणबाईंनीं उत्कृष्ट दर्जाचीं रसाळ 'सीड्लेस्' द्राक्षं आमच्यापुढं आणून ठेवलीं. पण तीं खायलासुद्धा आम्हाला भूक उरली नव्हती.

'' जेवणानंतर अशा प्रकारचीं द्राक्षंहि तुम्हांला देण्यांत येतील, तेव्हां थोडंसं कमी जेवलात तरी हरकत नाहीं, ' असं डॉक्टरीणबाईंनीं जेवतांना बोलतांबोलतां सहज सूचित केलं असतं तर बरं झालं असतं !

रात्रीं ११–११।। ला आम्ही डॉक्टरीणबाईंकडून जेवण करून बाहेर पडलों तेव्हां त्यांच्या जिन्याच्या तोंडाशींच असलेल्या त्यांच्या घरमालकाच्या ' फ्लॅट'च्या दाराजवळ लावलेल्या एका छोट्या कवितेनं माझं लक्ष वेधून घेतलं. जवळ सुटा कागद नव्हता. पण डॉ. डाल्ह् यांच्या कमिटीचा छापील रिपोर्ट होता. त्याच्यावर ती कविता मी लिहून घेतली –

' Dear House,
You are really very small —
Just big enough
for Love—
that's all.......'

न्यू हॅवनहून बसनं दोन तासांत येणाऱ्या न्यूयॉर्कच्या इतक्या जवळ आल्यानंतर तिथ गेल्यावांचून पुन्हा ब्राटलबरोला जायला मन घेईना. म्हणून शनिवार ता. २३ला सकाळीं साडेसातच्या बसनं न्यूयॉर्कला गेलों. तिथं एक दिवस राहून दुसऱ्या दिवशीं सकाळीं साडेदहा वाजतां ' ग्रेहाउंड ' बसनं न्यू हॅवनला परतलों. आणि त्याच बसनं पुढं निघून ब्राटलबरोला दुपारी अडीचला पोंचलों. अर्ध्यापाऊण तासांतच ' लियॉन बस् डेपो'वर आम्हांला घ्यायला आमची ' SIT 'ची बस आली.

न्यू हॅवनहून आम्ही परत आल्यानंतरचे अमेरिकेंतले आमचे दिवस फार भर्रकन् गेले. एक ' हॅलोविन डे ' आणि ' फेअरवेल पार्टी 'चा अपवाद सोडला, तर त्यानंतर खाण्यापिण्याचे, नाचगाण्याचे कार्यक्रम जवळजवळ झालेच नाहींत.

ता. ३१ ऑक्टोबर हा दिवस अमेरिकेंत मृतांची स्मृति साजरी करण्यासाठीं " All Souls' Day " म्हणून पाळला जातो. त्यालाच ' Halloween Day ' असंहि म्हणतात. आमच्या सोयीसाठीं ता. ३० ऑक्टोबरलाच रात्रीं गांवांतल्या एका अमेरिकनाच्या शेतांतल्या बंगल्यावर आम्हीं 'Halloween Party' चा समारंभ साजरा केला. निरनिराळे मुखवटे चढवलेल्या तरुणतरुणींच्या मेळाव्यांत त्या रात्रीं खाणं, पिणं, गाणं, नाचणं यांचा एकच जल्लोप उडाला. आतां आमचं अमेरिकेंतलं वास्तव्य फारच थोडं राहिलं होतं, आणि त्याची जाणीव आमच्या मनाला सतत व्हायलाहि लागली होती. दुसरं असं कीं त्या वेळेपर्यंत अमेरिकन जीवन आमच्या पुष्कळसं अंगवळणीं पडलेलं होतं. त्यामुळं ' हॅलोविन पार्टी 'च्या रात्रीं झालेल्या ' स्क्वेअर डान्स 'मधें आम्ही सर्वांनीं मनापासून भाग घेतला. त्यांतली गति, त्यांतलं चैतन्य यांचा अखेरचा अनुभव घेतला.

डिसेंबरच्या पहिल्या दिवशीं, मी 'दि ब्राटलबरो डेली रिफॉर्मर' या स्थानिक वृत्तपत्राच्या कार्यालयाला भेट दिली. आपल्याकडच्या एखाद्या जिल्हा–पत्राच्या छापखान्याएवढाच 'रिफॉर्मर'च्या छापखान्याचा पसारा होता. 'रिफॉर्मर'चे कार्यकारी संपादक रॉबर्ट ड्यूबक यांना फार सुंदर व्यक्तिमत्त्वाची देणगी लाभलेली होती. इतर अनेक अमेरिकनांप्रमाणं रॉबर्ट ड्यूबक हेहि खूप उत्साही होते. माझ्या बरोबर सर्व छापखान्यांत आणि कार्यालयांत स्वत: फिरून त्यांनी मला सर्व विभागांची माहिती करून दिली, आणि त्यांच्या सहकाऱ्यांची ओळख करून दिली. प्रेसिडेंट केनेडींच्या खुनाची बातमी त्यांच्या वृत्तपत्रानं कशी दिली हें पाहण्याची मला उत्सुकता होती. मीं तसं बोलून दाखवतांच फायलींच्या मोठ्या शेल्फमधून स्वत: योग्य ती फाइल शोधून त्यांनीं मला त्या दिवशींच्या अंकाचं मुखपृष्ठ दाखवलं. त्याच वेळीं त्यांच्या एका सहकाऱ्यानं घेतलेला आमचा दोघांचा एक फोटो त्यांनीं लगेच दुसऱ्या दिवशींच्या 'रिफॉर्मर'च्या अंकांत छापला.

सात डिसेंबरला आमच्या विद्यार्थ्यांचा 'कोर्स' संपणार होता. म्हणून त्यांची अधिक तयारी करून घेण्याकरतां रात्रीं ८ ते १० पर्यंत आम्ही 'जादा तास' घ्यायला लागलों होतो. कित्येकदां पहांटे उठून बघावं, तर कडाक्याच्या थंडींत आमचे विद्यार्थी पळण्याचा व्यायाम घेऊन आलेले असत. कांहींजण सर्व प्रकारच्या कामाचा सराव व्हावा म्हणून सकाळी शेजारच्या जंगलांत जाऊन अक्षरश: कुऱ्हाडीनं झाडं तोडीत असत. ह्या शारीरिक मेहेनतीच्या जोडीला डोक्याला त्रास देणारे आमचे रात्रीचे 'जादा तास'! त्यामुळं 'पीस कोअर'चं हें 'ट्रेनिंग' घेणारे आमचे विद्यार्थी शेवटींशेवटीं अगदीं वैतागून गेले होते. दोन डिसेंबरला मीं सहज आमच्या 'स्कूल'चा नोटिसबोर्ड पाहिला. तर त्यावर एक नवीनच



रॉबर्ट ड्यूबक हे प्रा. तामणे यांना प्रे. केनेडींच्या खुनाची वार्ता त्यांच्या वृत्तपत्रानें कशी सादर केली तें दाखवीत आहेत.

‘ नोटिस ’ विद्यार्थ्यांनीं लावली होती :–

Overheard on the stairway —

“Peace Corps Training is a conscious effort to drive us insane. ”

— Henry Keneally.

“No! an insane effort to make us conscious!”

— Peter Belenky.

आमच्या ‘ स्कूल’च्या अधिकाऱ्यांनीं आपल्या विद्यार्थ्यांचा हाहि ‘सवालजवाब’ हंसण्यावारी नेला. कारण सबंध ‘ ट्रेनिंग कोर्स ’मधें विद्यार्थ्यांना किती कष्ट करावे लागत होते तें त्यांनीं स्वतःच पाहिलं होतं.

सात डिसेंबर हा दिवस जसजसा जवळ येऊं लागला तसतशी मनांतली हुरहुर वाढली.आपल्या मित्रमैत्रिणींचा निरोप घेणं, त्यांना लहानमोठ्या भेटी देणं सुरू झालं. खरं म्हणजे त्या ‘ निरोप ’ घेण्याला फारसा कांहीं अर्थ नव्हता. कारण आमच्या पाठोपाठच डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यांत आमचे विद्यार्थी ‘ पीस कोअर’चं काम करण्यासाठीं महाराष्ट्रात येणार होते. तिथं एखाद्या खेड्यांत पावणेदोन वर्षं रहाणार होते. त्या काळांत केव्हांतरी आमच्या परस्परांच्या भेटीगाठी होण्याची शक्यता होतीच. पण इतक्या सर्वांचं एकत्र येणं, एकत्र रहाणं मात्र पुन्हा कधीं घडणार नव्हतं.

‘ फेअरवेल पार्टी’च्या रात्री आम्हांला व ‘ स्कूल’च्या अधिकाऱ्यांना आमच्या विद्यार्थ्यांनीं कांहीं भेटी दिल्या.मला डाग हॅमरशूल्ड यांचा ‘ मार्किंग्स् ’(Markings) हा ग्रंथ माझ्या विद्यार्थ्यांनी दिला. आंतल्या पहिल्याच पानावर लिहिलेलं होतं,–

‘ To our dear Professor
Prabhakar Tamane,
With warmest regards from
his students in the Peace Corps
Marathi Program.

-- Dec. 7, 1965.’

राजकारणांत असूनहि अखेरपर्यंत आपल्या काव्यात्म भावविश्वाची जपणूक करणाऱ्या आणि अखेर जागतिक शांततेच्या प्रयत्नांत देह ठेवणाऱ्या लेखकाच्या ग्रंथाची ती भेट मला फार आवडली.

– ‘ फेअरवेल् पार्टी’चा जल्लोष चाललेला होता. सारेजण खात होते, पीत होते, गप्पा मारीत होते. कांहींजण भाषणं करीत होते......मनांतल्या हुरहुरीवर आनंदाचा, हास्याचा मुखवटा चढवीत होते.

आणि इकडे हॉलच्या एका बाजूला असलेल्या 'सर्व्हिस काउंटर'च्या कमानींत मिआ ॲडेसा खालीं पाय सोडून एकटीच उदास होऊन बसली होती. मी तिच्या जवळ जाऊन उभा राहिलों तरी तिला त्याचं भान नव्हतं. तिच्या डोळ्यांत आंसवांचं धुकं दाटून आलं होतं.

"अशी एकटीच बसलीस?" – मीं म्हटलं, "आणि हें काय? रडतेस तूं?"

"छे :! रडतें कुठं?" – डोळ्यांतलं पाणी पुसून सहजतेनं ती म्हणाली, "उगीचच बसलें होतें!"

तेवढ्यांत तिथं आलेली तिची एक मैत्रीण उद्‌गारली, "आतां लवकरच आपल्या आईवडिलांना, घरादाराला सोडून दोन वर्षांसाठीं हिंदुस्थानांत जायचं, म्हणून वाईट वाटतंय् तिला!"

"मग आम्ही नाहीं का आमचं घरदार सोडून इकडे आलों!" –मीं म्हटलं.

"पण आतां तुम्हीं तुमच्या घरी जाणार आहांत! माझं तिथं कोण आहे?"– मिआ म्हणाली.

"असं म्हणू नकोस मिआ!" –मीं म्हणालों, "तुमच्या देशांतल्या लोकांमध्यें मला माझं असं वेगळेपणच राहिलं नाहीं, तसंच तुझंहि तिथं होईल! तिथली सारीं घरं तुझींच होतील. कमींत कमी निदान एक घर तरी! – माझं घर!"

कृतज्ञतेनं भारावलेल्या डोळ्यांनीं माझ्याकडे पहात मिआ उद्‌गारली, "थँक्यू सर!.....थँक्यू व्हेरी मच्!"

– आठ डिसेंबरला सकाळीं साडेनऊला 'SIT'च्या बसनं आम्हीं ब्राटलबरो सोडलं, आणि कीन ( Keen )च्या विमानतळावर आलों. साडअकराला 'कीन' विमानतळ सोडला, आणि पाऊणशे 'सीट्‌स्'च्या छोट्या 'डग्लस' विमानानं सव्वाबारा वाजतां न्यूयॉर्कला पोंचलों.

वास्तविक वॉशिंग्टनचं एक आमंत्रण मला होतं. अगत्याचं आमंत्रण होतं. पण वॉशिंग्टनपेक्षां न्यूयॉर्कनंच माझ्या मनाला अधिक मोहिनी घातली होती. म्हणून मग पुन्हा एकदा न्यूयॉर्कला 'अखेरचं' म्हणून राहून घेतलं. त्यानंतर लंडनला आणि पॅरिसला राहून डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत मीं हिंदुस्थानांत परत आलों.

........'सिंदबादची दुसरी सफर'हि अखेर संपली. मुंबईला सांताक्रूझच्या विमानतळावर पहिलं पाऊल टाकलं, आणि मनांत आलं : अखेर एक सुंदर स्वप्न संपलं! एका नव्या जगाचं दर्शन संपलं! एका नव्या जीवनाचा सहवास संपला! सातासमुद्रापलिकडची हजारो मैलांची ही सफर करून अखेर मला काय मिळालं? पण मानवी जीवनांतल्या सगळ्याच गोष्टी काय व्यवहाराच्या फूटपट्टीनं मोजायच्या

असतात ? अमेरिकेच्या माझ्या दोन्ही सफरींमधें अनेक देशांतलीं, अनेक जाति-धर्मांचीं माणसं माझ्या सहवासांत आलीं. माणूस जेव्हां माणसाच्या जवळ जातो तेव्हां इतर सारीं कृत्रिम बंधनं, आवरणं गळून पडतात. तिथं फक्त उरतं माणसाला माणसाबद्दल वाटणारं प्रेम ! माणसाला माणुसकीची असणारी ओढ ! जपानचा त्सुजिओ तोर्यू, घानाचा बेंजामिन आशी, इराणची कु. शाहीन् एर्फान्, फिलिपिन्स्ची कु. जोसेफिना नापुली, मेक्सिकोचा टी. ऑगस्टो कॅस्ट्रो, थायलंडची कु. ऑर्न, ग्रीसची कु. व्हिनिशिआ स्तात्रोपौल, अमेरिकेची कु. मिआ अॅंडेसा, ओवेन आणि सॅली फेअरवेदर, विल् आणि एलन बिघॅम्, जॉन आणि लोएस हॉप्किन्स् – हीं सारीं तुमच्याआमच्यासारखींच माणसं आहेत. आपल्या देशाबद्दल, कुटुंबाबद्दल, प्रिय व्यक्तीबद्दल त्यांनाहि तुमच्याआमच्यासारखंच उत्कट प्रेम वाटतं. युद्धाच्या नुसत्या आठवणीनंसुद्धा जर्मन कु. लॉटी शर्लेचं चित्त थरारून जातं हें कुणीं मला शिकवलं असतं ? अखेर जगांतलीं सगळीं माणसं सारखींच असतात. कुणी वाईट; कुणी चांगलीं ! तसं पाहिलं तर माणूस ‘ चांगला ’ किंवा ‘ वाईट ’ असा नसतोच. तो चांगलाहि असतो. वाईटहि असतो. अमेरिकेंत वाईट माणसं नसतील का ? अमेरिकेंत वाईट गोष्टी घडत नाहींत का ? – जरूर घडतात. पण फक्त व्रणावरच चोंच मारली तर कावळ्यांत आणि माणसांत फरक काय राहिला ? माणुसकीच्या देहावरचे असे व्रण, अशा जखमा जगांतल्या साऱ्याच देशांत असतात. माणसानं शोधायचा असतो तो माणुसकीचा आत्मा ! त्या आत्म्याचं सौंदर्य ! जगांत कुठंहि गेलों तरी तें सारखंच असतं !

...कधीं कधीं झिम्झिम् पाऊस पडतो. माझ्या खोलीच्या खिडकींतून पावसाच्या तुटलेल्या धारांकडे मी पहात असतों. आणि मधेंच केव्हांतरी अमेरिकेंतलं एक दृश्य मला दिसायला लागतं... असाच झिम्झिम् पाऊस पडत असतो. हवेंत खूपच गारवा आलेला असतो. आमच्या ‘ इंडिया हाउस ’पासून जवळच आमचं ‘ स्कूल ’ असल्यामुळं नुसता रेनकोट पांघरून घाईघाईनं मी ‘ लेक्चर’ला चाललेलों असतों. डोकं उघडंच असतं. वाटेंत माझ्या दोन वयोवृद्ध विद्यार्थिनी भेटतात. मला थांबवतात. त्यांतली एक आपली पर्स उघडते आणि मला प्लॅस्टिकचं घडीचं ‘ बॉनेट ’ काढून देते. मी तें घ्यायला संकोच करतों.

“ उगीच कशाला ? इथून जवळ तर आहे आपलं स्कूल ! आणि पाऊसहि फारसा पडत नाहीय् ! ” –मी म्हणतो.

– पण अखेर तिच्या आग्रहापुढं माझा नाइलाज होतो.

“ असू दे तुझ्याकडेच ! ”– ती म्हणते, “ पुन्हा परत देऊं नकोस ! आणि हें पहा, पुन्हा असा पावसांत भिजत जाऊं नकोस ! आजारी पडलास म्हणजे ? ”

तिच्या समाधानाखातर तें ‘ बॉनेट ’ मी डोक्यावर चढवतों. दोघींच्या सुरकुतलेल्या चेहेऱ्यांवर वात्सल्याच्या रेषा उमटलेल्या असतात. आभाराचे माझे शब्द

पूर्ण होण्याच्या आंत त्या दोघी चालायला लागतात. मी त्यांच्याकडे पहातच रहातों. कदाचित् तिचाहि असाच एखादा तरुण मुलगा असेल. व्हिएटनाम–युद्धांत आघाडीवर चिखलांत, पावसांत, गोळ्यांच्या वर्षावांत मोठ्या कष्टानं तो एकेक पाऊल उचलीत असेल.........आणि इकडे हजारों मैल दूर असलेली ही म्हातारी मला झिम्झिम् पावसांतहि भिजू देत नाहीं. प्लॅस्टिकचं ' बॉनेट ' घालायला लावते. आणि म्हणते, " पुन्हा असा पावसांत भिजत जाऊं नकोस ! " .... हिमफुलांच्या देशांतला हा पाऊस मला दिसायला लागतो, आणि कांहींच दिसेनासं होतं....कांहींच दिसेनासं होतं ! ......

REFBK-0018650

१८६५०

## प्रभाकर तामणे

## यांचीं प्रकाशित पुस्तकें

### कादंबऱ्या :

पुनर्मीलन

रात्र कधी संपूच नये...

का मोगरा फुलेना...

जीवनचक्र

### कथासंग्रह :

निम्मी

घडीभराची वस्ती

सांगू नको साजणी

मध्यरात्री...चांदण्यात

तो स्पर्श...तो सुगंध...

### नाटय :

अशीच एक रात्र येते...

स्वप्नफुलाच्या पाकळ्या..